म.ग्रं.सं. ठाणे
विषय : चरित्र
सं. क्र. : ३२८

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

REFBK-0005725

# लेनिन

## (चरित्र)

लेखक

विनायक महादेव भुस्कुटे

REFBK-0005725

किंमत दोन रुपये

प्रकाशक—
विनायक महादेव भुस्कुटे,
१९६ (८५) भागेश्वरनिवास,
सदाशिव पेठ, पुणें नं. २.

[सर्व हक्क प्रकाशकानें राखून ठेवले आहेत.]

मुद्रक—
लक्ष्मण नारायण चापेकर,
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८(१७) सदाशिव पेठ,
टिळकरस्ता, पुणें २.

# निवेदन

१९३४ च्या जानेवारींत समाजसत्तावादाचा आद्यप्रवर्तक कार्ल मार्क्स याचें चरित्र व त्याबरोबरच त्याची शिकवणही महाराष्ट्रीय वाचकवर्गास मीं सादर केली. त्याच वेळीं मार्क्सचें तत्त्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारांत उतरवून त्या तत्त्वज्ञानाप्रमाणें राज्यक्रांति घडवून आणण्याचें व दलित, दरिद्री, श्रमजीवी जनतेवर होणाऱ्या जुलुमांचें निराकरण करून बहुसंख्य अशा शेतकरी व कामकरी वर्गाला सत्ताधीश बनविण्याचें ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें असें कार्य करणाऱ्या महापुरुषाचें—लेनिनचें—चरित्र मीं लिहिण्याचें ठरविलें होतें. ठरविल्याप्रमाणें लेनिनच्या चरित्राचें हस्तलिखित सुमारें दीड वर्षापूर्वीच लिहून तयार झालें होतें. पण निरनिराळ्या कारणांमुळें आजपर्यंत मी तें प्रसिद्ध करूं शकलों नाहीं. लेखनाच्या बाबतींत लेखक बराचसा स्वावलंबी असतो पण आपल्या लिखाणाच्या प्रकाशनाच्या कामीं त्याला किती तरी अडचणींना तोंड द्यावें लागतें. मराठी लेखकांचा तर हा नित्याचा अनुभव आहे. इतक्या अवधीनंतर कां होईना आज या महापुरुषाचें चरित्र महाराष्ट्रीय वाचकवर्गास सादर करणें शक्य होत आहे याबद्दल मला समाधान व आनंद वाटत आहे.

लेनिन हा क्रांतिकारक होता. तेव्हां त्याचें चरित्रही क्रांतिकारकच असणार. क्रांतिकारकाचें चरित्र हें नेहमींच चमत्कृतिपूर्ण व चैतन्योत्पादक असतें, तसेंच तें रमणीयही असतें. लेनिनचें चरित्र चैतन्योत्पादक व रमणीय आहे. पण त्याच्या चरित्रांत आपणांस चमत्कार फारसे आढळून येणार नाहींत. ज्या तत्त्वज्ञानाच्या जलसिंचनानें लेनिनचा चरित्रवृक्ष वाढला, बहरला, त्या तत्त्वज्ञानाकडे दृष्टि फेकली असतां लेनिनच्या चरित्रांत चमत्कृतिपूर्ण घटना कोणास दिसणें अगर त्या कोणीं शोधूं पाहणें हें बुद्धिहीनतेचेंच निदर्शक ठरेल. लेनिन मार्क्सप्रणीत तत्त्व-

ज्ञानाचा कट्टा अनुयायी होता. पण तो सिद्धान्तजड नव्हता. त्यानें ज्याप्रमाणें वैयक्तिक बुद्धीचे अगर शक्तीचे अगर अन्य कांहीं गूढ सिद्धान्तांचे चमत्कार करून रशियांतील राज्यक्रान्ति व समाजक्रांति घडवून आणली नाहीं त्याचप्रमाणें त्यानें ही क्रांति विशिष्ट तात्त्विक सिद्धान्त स्थलकालनिरपेक्ष व त्रिकालाबाधित सत्य आहेत, असें मानून व वस्तुस्थितीकडे डोळेझांक करून घडवून आणली नाहीं. लेनिनचें आयुष्य आपणांस नाना युद्धप्रसंगांनीं, तंट्यांनीं, धाडसांनीं, साहसांनीं, संकटांनीं भरलेलें दिसतें. पण या प्रत्येकाच्या पाठीमागें आपणांस त्याची जागृत विचारशक्ति दिसून येते. त्याचा चेहेरा जसा मोहक नव्हता तसेंच त्याच्या चरित्रांतही मृदुमनोहारित्व नव्हतें. पण त्याच्या आयुष्यांत रमणीयता नव्हती असें आपणांस म्हणतां येत नाहीं. त्याचें जीवन संकटांनीं, हालांनीं, युद्धांनीं, दुःखांनीं जरी भरलेलें असलें तरी ज्या बहुसंख्य अशा कामकरी, शेतकरी व दलितवर्गांचें कष्टमय जीवन रमणीय, आशामय व उत्साहपूर्ण बनविण्याचें ध्येय त्यानें आपल्या जीवनापुढें ठेविलें होतें त्यामुळेंच त्याच्या चरित्रांत रमणीयता आली होती. गुलाबाचें कांटेरी झाड जसें नेत्रमनोहर व मधुरगंधी गुलाबसुमनांस जन्म देतें व सृष्टींत रमणीयता निर्माण करतें त्याचप्रमाणें लेनिननें आपल्या हालांतून, संकटांतून, दुःखांतून बहुसंख्य समाजाच्या आनंदास व सुखास जन्म दिला व जगामध्यें मानवी जीवनाचा व समाजाचा एक नवा आदर्श निर्माण केला. बहुजनसमाजाचें जीवन रमणीय करण्याच्या कल्पनेनें भारलेलें लेनिनचें जीवन त्यांतील युद्धप्रसंगांनीं अधिकच रमणीय दिसत आहे. लेनिन शरीरानें जसा कणखर होता तसा मनानेंही कणखर होता. त्याचा आत्मविश्वास जबर होता. तर्कशुद्ध बुद्धीनें व मार्क्सवादी विचारसरणीनें तो प्रत्येक घडामोडीचा विचार करीत असे व अशा रीतीनें विचार करून एखादें कृत्य करण्याचें त्यानें एकदां ठरविलें म्हणजे मग त्याच्या सफलतेसंबंधींचा त्याचा आत्मविश्वास कधींही ढळत नसे. मग त्याच्यापुढें कितीही संकटांचे प्रश्न उभे राहोत, तो डगमगत नसे. रशियन राज्यक्रान्तींतील कांहीं महत्त्वाच्या घडामोडींचें श्रेय आपणांस लेनिनच्या या आत्मविश्वासास द्यावें लागेल. लेनिन नसता व तो असूनदेखील त्याच्याजवळ इतका

आत्मविश्वास नसता तर रशियांतील समाजवादी क्रान्तीस कितपत यश आलें असतें हें सांगतां येत नाहीं. परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन व दूरदृष्टि हे गुणही लेनिनमध्यें आपणांस विशेष दिसून येतात. तो बुद्धिवादी होता तरी बहुजनसमाजाचें मन आपणासारखें बुद्धिवादी नाहीं, अनेक संस्कारांची, सामाजिक कल्पनांची व परंपरांची छाप त्याच्या मनावर असते, हें त्यानें ओळखलें होतें. त्यामुळें बहुजनसमाजास आज कोणत्या गोष्टी पटतील, कोणत्या गोष्टी पटवून देण्यास आज भौतिक परिस्थिति अनुकूल आहे याचा तो नीट विचार करीत असे व त्याप्रमाणें आपलें क्रांतीचें प्रचारकार्य चालवीत असे. कोरडें तत्त्वज्ञान तो कधींच सांगत बसला नाहीं. तसेंच तो तात्त्विक सिद्धान्तांचा दासही झाला नाहीं. जर्मनीशीं तह करतांना व नवें आर्थिक धोरण स्वीकारतांना, लेनिननें त्याच्या इतर बुद्धिमान् दोस्तांहून वेगळी भूमिका स्वीकारली होती. त्याच्या चरित्रांतील इतर महत्त्वाच्या प्रसंगांच्या वेळीं त्यानें स्वीकारलेली तात्त्विक भूमिका व या वरील दोन प्रसंगांच्या वेळीं त्यानें स्वीकारलेली तात्त्विक भूमिका यांची ओळख व ज्ञान ज्यानें पूर्णपणें संपादन केलें व ज्याला या दोन भूमिकांत विरोध न आढळतां ऐक्यच आढळून आलें, त्यानेंच लेनिनला खरें ओळखलें असें म्हटलें पाहिजे. पुढारीपणाची छाप पाडण्यासारखें वक्तृत्व त्याच्याजवळ नव्हतें. पण अंतःकरणाची तळमळ, दूरदर्शित्व व स्वीकृत कार्याच्या यशासंबंधींचा आत्मविश्वास आणि त्यांमुळें येणारी जबर कार्यनिष्ठा, या गुणांमुळें पुढारीपण त्याच्याकडे धांवून आलें होतें. कांहीं थोडे प्रसंग—व तेही क्षणिक—सोडले तर लेनिन निराश झालेला असा आपणांस कधीं आढळावयाचा नाहीं. तो खरा कर्मयोगी होता. उत्साह व कर्तृत्वशक्ति त्याच्या रक्तांत नेहमीं मुसमुसत असत. तो चैतन्याचा एक जिवंत झरा होता. लेनिनकडे पाहिल्यावर कोणाला स्फुरण चढणार नाहीं व क्रांतीच्या कल्पनांनीं कोणाचें मन भरलें जाणार नाहीं!

लेनिन हा क्रांतिवाद्यांचा आदर्श आहे. आणि अशा आदर्शभूत व्यक्तीचें तत्वज्ञानच आपणांस क्रांतिवादी बनवितें. लेनिननें तत्त्वज्ञानासंबंधीं अगर समाजरचनेसंबंधीं नुसते ग्रंथच लिहिले नाहींत तर प्रत्यक्ष आपणांस हवी तशी समाजरचना त्यानें निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

यांतच त्याचा विशेष आहे. म्हणूनच तो आपणापुढें आदर्श म्हणून आहे. एखादा सिद्धान्ती ज्या वेळीं आपले सिद्धान्त व्यवहारांत उतरविण्याचा प्रयत्न करतो त्या वेळींच त्याच्या सिद्धान्तांच्या सत्यतेची कसोटी लागते. आपल्या सिद्धान्तानुसार अमुक दिशेनें जावयाचें आहे, पण प्रत्यक्ष त्या दिशेनें वाट चालूं लागलें असतां पुढें जबर खड्डा आला आहे, अशा वेळीं सिद्धान्ती काय करणार ! खरा सिद्धान्ती आपल्या सिद्धान्तानें दुसरी वाट सांगितली नाहीं म्हणून तेथें अडून बसणार नाहीं तर आपल्या बुद्धीनें अपेक्षित ध्येया प्रत जाण्याचा दूरचा अगर जवळचा दुसरा रस्ता शोधून काढण्याचा तो प्रयत्न करील. लेनिनचा हाच विशेष होता. तो कधीं अडला नाहीं. समाजसत्तावाद आज ना उद्यां केव्हां तरी इतिहासक्रमानें येणार आहे म्हणून लेनिन स्वस्थ बसला नाहीं, तर आपल्या अंगच्या जबरदस्त कर्तृत्वानें त्यानें तो प्रस्थापित केला. इतिहासक्रम अगर भौतिक परिस्थिति अनुकूल असली तरी तिचा फायदा घेण्यास जबरदस्त कर्तृत्ववान् असा क्रांतिकारकांचा वर्ग देशांत असावाच लागतो. असा वर्ग नसला तर भौतिक परिस्थिति अनुकूल असूनही अपेक्षित क्रांति घडवून आणतां येत नाहीं, हेंच आपणांस युरोपांतील इतर देशांच्या व रशियाच्या इतिहासाकडे पाहिलें असतां दिसून येतें. हिंदुस्थानसारख्या राजकीय व सामाजिक दृष्ट्या संक्रमणावस्थेंतील देशांनीं तर यापासून अवश्य बोध घेतला पाहिजे. म्हणून क्रांतिवादी हिंदी तरुणांनीं लेनिनच्या तत्त्वज्ञानाचा व चरित्राचा अभ्यास करणें अत्यंत अवश्य आहे. लेनिनचें तत्त्वज्ञान कांहीं वेगळें नाहीं मार्क्स-प्रणीत शास्त्रीय समाजसत्तावाद हेंच त्याचें तत्त्वज्ञान. व या तत्त्वज्ञानाबर-हुकूमच त्यानें रशियांत क्रांति घडवून आणली. पण त्यानें घडवून आणली हा थोडा फार त्यांत विशेष आहे. म्हणूनच त्याचें चारित्र बारकाईनें अभ्यासणें अवश्य आहे. हिंदी क्रांतिवादी स्वातंत्र्येच्छु तरुण जर या चरित्राचा बारकाईनें अभ्यास करतील तर त्यांना आपल्या देशाच्या विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट कालांत या समाजवादी क्रांतिकारक तत्त्वज्ञानाप्रमाणें आपल्या देशांत राजकीय व सामाजिक क्रांति कशी घडवून आणावी याचें निःसंशय ज्ञान होईल. लेनिन ज्याप्रमाणें विशिष्ट मार्ग व विशिष्ट धोरण यांनीं स्वतःस बांधून घेऊन अडून बसला नाहीं व देशकालपरिस्थिती-

प्रमाणें आपल्या ध्येयाप्रत पोंचण्याचा मार्ग ज्याप्रमाणें आपल्या बुद्धीनें त्यानें शोधून काढला व आपलें उद्दिष्ट सफल केलें त्याप्रमाणेंच आम्ही आमच्या देशकालपरिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करून व लेनिनच्या कार्यकौशल्याचा, कर्तृत्वशक्तीचा, आत्मविश्वासाचा, धडाडीचा व दलित समाजासंबंधींच्या तीव्र तळमळीचा आदर्श आपल्यापुढें ठेवून कार्यास लागूं तर आमच्या राष्ट्रीय व सामाजिक स्वातंत्र्याचा व क्रान्तीचा प्रश्न लवकर सुटण्यास मदत होईल, यांत शंका नाहीं.

या चरित्रलेखनाच्या कामीं मुख्यतः ज्या इंग्रजी ग्रंथांचा उपयोग झाला त्यांची यादी येथें दिलीच आहे. या ग्रंथकारांचे, जरी ते प्रस्तुत लेखकास अपरिचित व अज्ञात असले तरी प्रथम आभार मानले पाहिजेत. तसेंच या चरित्राचें हस्तलिखित माझे मित्र भाई श्रीपाद अमृत डांगे यांनीं वाचून कांहीं महत्त्वाच्या सूचना व दुरुस्त्या सुचविल्या त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. तसेंच माझे मित्र से. पां. म. बापट व श्री. वा. म. जोशी यांनीं या चरित्रासंबंधीं आपले अभिप्राय पुस्तकावर छापण्यासाठीं दिले याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहें. पुस्तकामध्यें लेनिन व क्रुप्सकाया यांचीं छायाचित्रें देण्यांत आलीं आहेत. इंटर नॅशनल बुक सर्व्हिसचे व्यवस्थापक श्री. दीक्षित यांच्या कृपेमुळेंच तीं देतां आलीं याबद्दल त्यांचेही आभार मानले पाहिजेत.


पुस्तकांत कांहीं लेखनदोष, मुद्रणदोष आढळले तर त्याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

पुणें,
ता. १०।८।१९३८.

विनायक महादेव भुस्कुटे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | बालपण | १ |
| २ | बंडखोर विद्यार्थी | २१ |
| ३ | कार्यारंभ | ३४ |
| ४ | सैबेरियांतील दिवस | ५८ |
| ५ | पक्षांतील मतभेद | ७९ |
| ६ | १९०५ | १०३ |
| ७ | पुन्हा देशत्याग | १२९ |
| ८ | वादळाचीं पूर्वचिन्हें | १५५ |
| ९ | महायुद्धाच्या वणव्यांत | १७६ |
| १० | क्रान्तीचा उठाव | २०३ |
| ११ | ऑक्टोबर क्रान्ति | २६३ |
| १२ | क्रान्तीनंतर | २८७ |
| १३ | अंतकाल | ३१९ |
| | सूचि | ३३३ |
| | संदर्भ-ग्रंथ | ३३९ |



व्ह्लाडीमीर इलिच् उलियानोव्ह् (लेनिन)

जन्म : मृत्यु :

ता. २२ एप्रिल १८७०] [ता. २१ जानेवारी १९२४

६६०१
चौरंग ६२८
१५९१३८

# लेनिन

## बालपण

लेनिनचें घराणें मध्यम वर्गांतील होतें. एक सज्जन, बालबोध व आदर्श घराणें म्हणून या घराण्याची प्रसिद्धि होती. मनःपूर्वक व काळजीनें चरितार्थाकरितां काम करावें, इतरांशीं दिलदारपणानें वागावें, कोणाच्या अध्यामध्यांत जाऊं नये, आपण बरें कीं आपलें काम बरें या वृत्तीनें आपला व्यवहार चालवावा, आपला आदा पाहून खर्च करावा, निर्व्यसनी असावें, दुसऱ्यांना उपयोगी पडावें, सार्वजनिक काम निघालें कीं त्याला मदत करण्यास तयार असावें, वगैरे गुण या घराण्यांतील मंडळींत होते.

लेनिनचा बाप इलिया निकोलायविच् उलियानोव्ह हा शिंप्याचा मुलगा होता. त्याचा बाप आस्ट्राखान येथें राहत असे. इलियाच्या लहानपणींच त्याचा बाप वारला. आपल्यामागें त्यानें फारशी इस्टेट ठेवली नव्हती. घरचा कर्ता मनुष्य वारला म्हणजे त्याच्यामागें त्याच्या पोराबाळांचे हाल व्हावयाचेच. मध्यम वर्गांतील कुटुंबाच्या बाबतींतील या सामान्य नियमाला इलियाचें कुटुंब अपवाद नव्हतें; तथापि असल्या स्थितींतही इलियाच्या शिक्षणांत व्यत्यय आला नाहीं. इलियाचा वडील भाऊ बॅसिल यानें आपल्यावर आलेल्या या प्रसंगाला धैर्यानें तोंड दिलें. बॅसिल अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. विश्वविद्यालयीन शिक्षण संपादन करावें, अशी त्याची जबर इच्छा होती. पण सर्व कुटुंबाचा भार त्याच्यावर पडल्यामुळें त्याला आपली ही इच्छा बाजूला ठेवावी लागली. विश्वविद्यालयीन शिक्षणक्रम आपल्याला पुरा करतां आला नाहीं तरी इलियाच्या अभ्यासांत व्यत्यय येऊं द्यावयाचा नाहीं; विश्वविद्यालयीन शिक्षणक्रम संपवून पुढील आयुष्यांत अनेक सार्वजनिक कार्यें पुढारीपणानें करावयाचीं हीं आपलीं सुखस्वप्नें जागच्या जागीं विरघळणार याबद्दल त्याला वाईट वाटलें खरें, पण

आपल्याला जी गोष्ट साधली नाहीं ती आपल्या धाकट्या भावाला करतां येईल, अशी सर्व प्रकारची संधि त्याला देण्याचें त्यानें अत्यंत दिलदारपणानें ठरविलें. इलियाचें हायस्कुलांतील शिक्षण संपलें. त्याला कॉलेजांत पाठवावयाचें हें खरोखरीच फार खर्चाचें काम होतें, म्हणून बॅसिलनें त्याला शिष्यवृत्ति मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या द्यावयाच्या व त्यांना उत्तेजन द्यावयाचें हा सर्वसामान्य नियम खरा, पण रशियांत त्या कालांत या नियमाकडे कोणी लक्ष देत नसे. शिष्यवृत्ति देतांना विद्यार्थी गरीब आहे कीं नाहीं हें पाहण्यापेक्षां तो सरदार घराण्यांतील आहे कीं नाहीं, हें अगोदर पाहण्यांत येत असे. परिस्थिति याप्रमाणें प्रतिकूल असतांही बॅसिलनें आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. इलियाला शिष्यवृत्ति मिळाली नाहीं, जवळ तर पैसे नाहींत. अशा स्थितींत आपला निश्चय पार पाडण्याच्या कामीं त्यानें कोणत्या उपायाचा अवलंब केला व कोणता स्वार्थत्याग केला ही गोष्ट बाहेर आली नाहीं; पण कसेंही करून इलियाला काझान युनिव्हर्सिटींत प्रवेश करतां येईल अशी व्यवस्था त्यानें केली, हें मात्र खरें. इलियालाही आपल्या आर्थिक स्थितीची जाणीव होतीच. त्यानेंही आपला खर्च भागविण्याकरितां खाजगी शिकवण्या मिळविण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्याला थोडेंबहुत यश आलें. त्यानें गणित व पदार्थविज्ञानशास्त्र या विषयांचा या ठिकाणीं विशेष अभ्यास केला. १८५५ सालीं या विषयांचा अभ्यासक्रम त्यानें संपविला. पेंझा नोबल्स इन्स्टिटयूटमध्यें यानंतर पदार्थविज्ञानशास्त्राच्या सीनियर प्रोफेसरच्या जागीं त्याची नेमणूकही झाली.

रशियांतील या भागांत ही एकच एक शिक्षणसंस्था होती. पण तिच्या भोंवतालचें वातावरण अगदीं खराब होतें. पेंझा येथील सरदार स्वार्थी व आळशी होते. एकोणिसावें शतक निम्में अधिक उलटून गेलें होतें, पण रशियाच्या सरदार घराण्यांतील लोकांच्या लोभी व नीच वृत्तींत फरक झालेला नव्हता. रशियन भांडवलदारीच्या वाढीला अवसर देण्यासाठीं झारनें सन १८६०-६१ च्या कायद्यानें रशियांतील भूदासपद्धति नष्ट केली. सरंजामशाहीवर उभारलेल्या जमीनदारपद्धतीमध्यें शेतकऱ्यांची उन्नति होणें शक्य नव्हतें. जमीनदारीच्या त्रासामुळें व लुबाडणुकीमुळें

शेतकरी जास्त धान्य पिकवीनासा झाला होता. अर्थात् त्याची कुचंबणा होत होती. घरीं खावयाला धान्य नाहीं, जास्तकमी पिकवावें तर जमीन-दार लुबाडून नेई. या हालाला व जुलमाला कंटाळून शेतकरी बंडाकडे झुकूं लागले होते. त्यांना तिकडून परावृत्त करण्यासाठीं १८६०–६१ चा कायदा करण्यांत आला, तरी त्याचा उद्देश फारसा सफल झाला नाहीं. त्यांना स्वतंत्र होण्याची सवलत दिली, पण शेतकरीवर्ग खरोखरी त्यामुळें स्वतंत्र झाला नाहीं. पण थोडीं तरी शेतकरी कुळें या कायद्यानें स्वतंत्र होऊं शकतील हें पाहून पेंझाच्या भागांतील सरदारांचा जळफळाट झाला. झारच्या या धोरणाविरुद्ध अनेक सभा भरवून त्यांनीं आपला हा संताप व्यक्त केला. पण तेवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं ठिकठिकाणीं शेतकऱ्यांच्या झोंपड्यांना आगी लावून आपल्या वर्गनिष्ठ नीच व स्वार्थी वृत्तिचें प्रदर्शन केलें. लेनिनच्या बापाला ही गोष्ट आव-डली नाहीं. पण शास्त्रीय संशोधनाकडे त्याचा विशेष कल असल्यामुळें सरदारांच्या या धोरणाला विरोध करण्याच्या भानगडींत तो पडला नाहीं. हवामानशास्त्राचा त्यानें चांगला अभ्यास केला होता. या शास्त्रांतील आपलें प्राविण्य त्यानें तेथील लोकांच्या नजरेसही आणून दिलें होतें. तेव्हां या प्रांतांतील हवामान खात्यांतील मुख्याधिकाऱ्याच्या जागीं त्याची नेमणूक करण्यांत आली. रशियासारख्या कृषिप्रधान देशांत या शास्त्रां-तील संशोधकांना अर्थात्च विशेष मान मिळत असे. लेनिनच्या बापानें आपल्यावर पडलेली ही जबाबदारी उत्तम रीतीनें पार पाडल्यामुळें तेथील मध्यम व वरिष्ठ समाजांत तो लोकप्रिय झाला होता. याच वेळीं याच कामाच्या निमित्तानें त्याची निझनी–नोव्हगोराड येथें बदली कर-ण्यांत आली. निझनी–नोव्हगोराड येथें बदली झाली ही गोष्ट इलियाला एकपरीनें बरी वाटली. कारण त्या ठिकाणीं त्याला आपल्या आयुष्यां-तील एक मोठा हेतु सफल करून घेतां आला. त्याची भावी पत्नी मरिया अलेक्झांड्रोव्हना ब्लँक, येथेंच राहत होती. मरियाचा बाप जर्मन होता. आपल्या डॉक्टरीच्या धंद्याचा कंटाळा आल्यामुळें त्यानें एक लहानशी इस्टेट काझानजवळ खरेदी केली होती व आपल्या इस्टेटीच्या गांवीं ( निझनी–नोव्हगोराड ) तो येऊन राहिला होता. दिवसभर काम कराव-

याचें, चैन-ऐषआराम करावयाचा नाहीं, खाणें-पिणें-वागणें यांत संयमानें वागावयाचें अशी त्याची राहणी होती. या वातावरणांत मरिया लहानाची मोठी झाली होती. मरियाचें सौंदर्य वाखाणण्यासारखें नव्हतें, पण तिच्या शुद्ध चारित्र्यानें त्यांतील उणीव भरून काढली होती. तिचा बाप व तिच्या दोन जर्मन आत्या यांनीं तिला निरनिराळ्या भाषांचें व नृत्यगायनाचें शिक्षण दिलें होतें. तिनें आपल्या प्रयत्नानें प्राथमिक अध्यापनाचा अभ्यासक्रम पुरा केला व या परीक्षेंत ती पासही झाली. यापुढेंही या विषयाला उपयोगी असें शिक्षण ती घेत होती. याच वेळीं इलिया उलियानोव्हशीं तिचा परिचय झाला व त्याचें प्रेमांत रूपांतर होऊन १८६३ सालीं तीं विवाहबद्ध झालीं.

मरिया व इलिया या प्रेमी जोडप्याचा संसार सुखाचा झाला. निझनी-नोव्हगोराड येथें त्यांनीं पांचसहा वर्षें काढलीं. यानंतर १८६९ सालीं सिंबिर्स्क भागांतील प्राथमिक शाळांवरील इन्स्पेक्टरच्या जागेवर इलियाची नेमणूक झाली व व्होल्गा नदीच्या भव्य तीरावरील सिंबिर्स्क गांवींच हें कुटुंब राहूं लागलें. सिंबिर्स्क हें गांव मोठें होतें. सुखवस्तु, जमीनदार व पांढरपेशा लोकांची त्या ठिकाणीं वस्ती होती. यामुळें येथें आल्यापासून इलियाचा चांगल्या मोठ्यांमोठ्यांशीं परिचय झाला. एकच गोष्ट इलियाला याठिकाणीं आवडली नाहीं. निझनी-नोव्हगोराड हें व्यापाराचें व उद्योगधंद्यांचें केंद्र होतें. त्यामुळें तेथील सुखवस्तु व पांढरपेशा लोकांच्या स्वभावांत भांडवलदारीच्या प्रगतीला अनुरूप असा एक प्रकारचा उदारपणा होता; पण सिंबिर्स्क येथें मात्र असा मोकळेपणा इलियाला आढळून आला नाहीं, तर अधोगतीस लागलेल्या जमीनदारशाहीचा संकुचितपणा व प्रतिगामित्व हींच या ठिकाणीं त्याला आढळून आलीं. अर्थात्च शेतकऱ्यांत जागृति उत्पन्न करणाऱ्या व त्यांच्या हक्कांची त्यांना जाणीव करून देणाऱ्या कोणत्याही चळवळीला येथील जमीनदार विरोधच करीत असत.

पण याच वेळीं पाश्चात्य भांडवली राष्ट्रांच्या संसर्गानें रशियांतील भांडवलदारी पद्धतीची वाढ होत होती व सरंजामशाहीस उतरती कळा लागली होती, व त्यामुळें रशियन समाजांत आमूलाग्र उलथापालथ होऊं लागली होती. समाजांतील हा विस्कळितपणा थांबविण्याला उपाय म्हणून समाजाची

पुनर्घटना करणारे जे अनेक पक्ष निघाले होते त्यांपैकीं एकाचें धोरण, शेतकऱ्यांत जाऊन त्यांच्यांशीं सर्वतोपरी—पोषाख, भाषण, राहणींतसुद्धां—तद्रूप होऊन व त्यांच्यांत जागृति निर्माण करून त्यांच्या जोरावर रशियांतील पूर्वकालीन गांवपंचायतप्रधान समाज प्रस्थापित करणें हें होतें व त्याला अनुसरून ते शेतकऱ्यांत शिक्षणप्रसार करण्याची चळवळ करूं लागले. तेव्हां कांहीं उदारमतवादी जमीनदार व खुद्द झार सरकारही, आपणसुद्धां शेतकऱ्यांच्या शिक्षणाचे चाहते आहोंत हें भासविण्यासाठीं योजना तयार करून ती अंमलांत आणण्याचा थोडाफार प्रयत्नही करूं लागले. इलियाला शिक्षणप्रसाराची मनापासून इच्छा असल्यामुळें त्यानें या परिस्थितीचा फायदा घेतला व सिंबिर्स्क व त्याच्या आसपासच्या गांवांतील शेतकरी समाजांत शिक्षणप्रसार करण्याकरितां त्यानें एक विस्तृत योजना तयार केली. त्यानें ती सरकारी अधिकाऱ्यांपुढें मांडली व ती स्वतंत्रपणें अंमलांत आणून थोडेंफार यशही मिळविलें. इलियाचें हें काम पाहून सरकारी अधिकारी खूष झाले व १८७४ सालीं सिंबिर्स्क प्रांतांतील सर्व प्राथमिक शाळांच्या डायरेक्टरच्या जागीं त्याची नेमणूक करण्यांत आली.

सिंबिर्स्क येथें इलियाचें कुटुंब राहूं लागल्यानंतर थोड्याच महिन्यांनीं म्हणजे ता. २२ एप्रिल १८७० रोजीं लेनिनचा जन्म झाला. लेनिनचें मूळचें नांव व्ह्लाडिमीर इलिच् असें होतें. लेनिन पितृमुखी होता. बापाप्रमाणेंच त्याचीं गालावरचीं हाडें पुढें आलेलीं होतीं. त्याची दृष्टि तीव्र होती. कपाळ भव्य होतें. करारीपणा व्यक्त करणारी अशी त्याच्या हनुवटीची व ओठांची ठेवण होती. लेनिनचा मोठा भाऊ अलेक्झांडर मातृमुखी होता. तो आईप्रमाणें सुंदर होता. त्याच्या शरीराची सर्व ठेवण जर्मन होती. त्याची आई मरिया जर्मन होती. याप्रमाणें इलियाच्या पहिल्या मुलानें सर्वतोपरी आपल्या आईचें अनुकरण केलें होतें. लेनिन मात्र पक्का रशियन होता. त्याच्या शरीराची सर्व ठेवण रशियांतील, विशेषतः व्होल्गा भागांतील रहिवाश्यांच्या शरीरयष्टीप्रमाणें होती. त्याच्या या विशिष्ट प्रकारच्या शरीरयष्टीवरून "व्होल्गाचा प्रख्यात रहिवाशी" अशा टोपण नांवानें त्याची पुढें प्रसिद्धि झाली.

लेनिनचा बाप एक बडा व सुशिक्षित सरकारी नोकर असल्यामुळें त्याच्या घरीं गांवांतील प्रतिष्ठित मंडळींचा दर शनिवारीं अड्डा बसत असे. या मंडळींत गांवांतील वरिष्ठ शाळाधिकारी, शिक्षक, धर्मगुरु, पोलीस-अधिकारी व कांहीं सुखवस्तु मंडळी असत. त्यामुळें त्यांच्या गप्पांमध्यें त्या गांवांतील ऐतखाऊ वर्गाची विचारसरणीच प्रतीत होत असे. गप्पांतील गोष्टींमध्यें अशिक्षितांची चेष्टा, शेतकऱ्यांची निंदा, जहाल राजकीय चळ-वळीबद्दल जळफळाट, अधिकारीवर्ग व जमीनदार यांच्याविरुद्ध गांज-लेल्या शेतकऱ्यांची उठावणी 'शूर' अधिकारी कशी शिताफीनें दडपून टाकीत याची बढाई इत्यादि विषय रंगत व त्यांमधून दलित, गांजलेला व कष्टाळू वर्ग, जीवनाच्या साध्या गरजा भागविण्याकरितां माणूस म्हणून खटपट करीत असतां कसा चिरडला जातो, याचें चित्र या गप्पांत उठून दिसत असे, आणि श्रोत्यांच्या मनोवृत्तीप्रमाणें त्यांतून एक विशिष्ट बौद्धिक वातावरण निर्माण होत असे. हें वातावरण अर्थात्‌च लेनिन व त्याचा भाऊ यांना ग्रासून टाकी. पण लेनिनचा बाप स्वतः उदारमतवादी असल्या-मुळें व आईही तशीच असल्यामुळें तीं या गप्पांचा मुलांच्या मनावर वाईट परिणाम होऊं देत नसत व या वर्गविशिष्ट पोलिसी जुलुमाविरुद्ध उठाव करणारी अशीच मनोवृत्ति या मुलांमध्यें निर्माण होई व त्यांची उदयोन्मुख विचारशक्तिही यासंबंधींचे प्रश्न स्वतांपुढें मांडून त्यांचें उत्तर शोधूं लागे.

अशाच एका शनिवारीं गांवांतील मंडळी इलियाच्या घरीं उपाहारा-करितां जमा झाली होती. त्यामध्यें त्या प्रांताचा पोलीस कमिशनर बागेटोव्ह हाही होता. बागेटोव्हची शरीरयष्टि उंच व पिळदार आणि कपाळ भव्य होतें. पण त्याच शरीरबांध्याला पोलिसी विचार, वागणूक व वातावरण यांची जोड मिळाल्यामुळें, त्याच्या आवाजांत व डोळ्यांत जो एक 'पोलिसी-पणा' नि सफाईदार व बेफिकिर हिंस्रता प्रतीत होत होती तिचा व्लादिमीर लेनिन याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्याला बागेटोव्हबद्दल तिरस्कार वाटूं लागला व पुढील गोष्ट ऐकून तर त्या तिरस्काराला विचारशुद्ध संतापाचा पाया मिळाला.

मंडळी जमल्यावर अनेक विषयांवर गप्पा सुरूं झाल्या. सरकारी अधि-काऱ्यांना तर आत्मप्रौढी गाण्याची नेहमींच संवय असते. आपण जें सांगूं

तें लोकांनीं मुकाट्यानें ऐकून घेतलें पाहिजे व आपल्या म्हणण्यास होकार दिला पाहिजे असेंही त्यांना वाटत असतें. बागेटोव्ह या नियमाला अप. वाद नव्हता. त्यानें बोलतां बोलतां आपल्या खिशांतून मली जाड सिगारेट काढून ती शिलगावली व तिचे झुरके घेत घेत आपल्या अनुभवांतील घड-लेली गोष्ट सांगण्यास आरंभ केला.

"मि. अकसाकोव्ह हे एक जुन्या घराण्यांतले नांवाजलेले गृहस्थ आहेत हें तुम्हांला माहीत असेलच. त्यांच्या गांवांतले शेतकरी त्यांना फार चहातात व त्यांच्याबद्दल शेतकरी मंडळींना आदरही वाटतो. पण एकदां असें झालें कीं, आगीमुळें खेड्यांतील एक भाग साफ जळून गेला. तो पुन्हा बांधून काढण्याकरितां म्हणून गांवांतील मंडळी अकसाकोव्हकडे त्याच्या मालकीच्या रानांतील सागवानाचीं लांकडें मागण्याकरितां गेली. अकसाकोव्ह आपली मागणी मान्य करील अशी त्यांना पूर्ण खात्री होती. पण अनुभव उलटाच आला. अकसाकोव्हनें त्यांची मागणी साफ धुडका-वून लावली. अर्थात्च शेतकरी संतापले व त्यांनीं अकसाकोव्हच्या कोठारा-वर हल्ला केला. आमचे पोलिस तयारच होते. त्यांनीं त्या शेतकऱ्यांवर गोळीबार केला व त्यांना पिटाळून लावलें. गोळीबारांत दोन शेतकरी ठार झाले व तिघे जखमी झाले. या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां मी त्या गांवीं गेलों. इकडेतिकडे सुगावा घेतला व जखमी माणसांचा शोध काढून त्यांना माझेसमोर हजर राहण्याचा हुकूम दिला. या प्रकरणाच्या मुळाशीं कोण होते व तें कसें सुरू झालें याची चौकशी मी करूं लागलों. पण कोणीच दाद देईनात. मग काय ! मी संतापून गेलों. या लोकांच्या मी सपाटून कानशिलांत लगावल्या. एकाची बत्तीशीच खिळखिळी केली. एकाच्या नाकावर असा जोराचा ठोसा मारला कीं त्यांतून भळभळा रक्त वाहूं लागलें. मग सगळे ताळ्यावर आले व मी विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देऊं लागले. आमच्या प्रांताचा गव्हर्नर मोठा खाष्ट आहे. आपल्या प्रांतांतील लोक असंतुष्ट आहेत, तेथें गडबड माजली आहे, असल्या प्रकारचे रिपोर्ट सेंट पीटर्सबर्गला जातां कामा नयेत असा त्याचा कटाक्ष असतो. तेव्हां प्रांतांत कांहीं गडबड झाली कीं, तिचा जेथल्या तेथें बंदोबस्त करावयाचा असें त्याचें धोरण असतें. त्यामुळें तो आमच्यासारख्या अधि-

कार्‍यांना विश्वासांत घेतो. या बाबतींतही असेंच झालें. त्यानें मला बाजूला बोलावलें व कानमंत्र दिला; "हे पहा बागेटोव्ह, या बंडखोरांना चांगला हात दाखीव, यांचीं डोकीं चांगलीं ठेचून काढ. सरदार घराण्यांतील लोकांविरुद्ध त्यांनीं कधींही पुन्हा उठतां कामा नये असा पक्का बंदोबस्त कर." प्रत्यक्ष गव्हर्नरचाच हुकूम मला मिळाला. मीं माझे पोलिस बरोबर घेतले आणि या प्रकरणाच्या बाबतींत मला जसा योग्य वाटला तसा न्याय मीं दिला. हें बंड ज्यांनीं उठविलें असा मला संशय आला त्यांना शंभर शंभर फटक्यांची शिक्षा दिली आणि गांवांतील प्रत्येक स्त्रीपुरुषाला पंचवीस पंचवीस फटके लगावण्यांत आले. आतां तेथें कबरस्थानांत जशी शांतता असते त्याप्रमाणें शांतता झाली आहे. या शेतकर्‍यांना 'दंडा पाहिजे दंडा !' दंडा हेंच त्यांचें उत्तम औषध.

आपली ही गोष्ट संपल्यावर पोलिस कमिशनर मोठ्यानें हंसले.

इलियाच्या घरीं जमलेल्या मंडळींत एक डॉक्टर व एक पाद्री गृहस्थ होते. डॉक्टरांनीं पोलिस कमिशनरच्या शेवटच्या उद्गारांना होकारार्थी मान हालविली.

"बरोबर आहे" ते म्हणाले. "कांहीं कांहीं रोगी बरे करण्याकरितां जळवा लावून त्यांचें रक्त बाहेर काढावें लागतें. दंड्याचा उपयोग असाच होतो. तो डोक्यांतील व अंतःकरणांतील रक्त बाहेर काढतो."

"ही शिक्षा साधी व सौम्य आहे.बापानें आपल्या मुलांना जशी शिक्षा करावी तशी ही शिक्षा. आमचे शेतकरी हे लहान मुलांसारखे आहेत." पाद्रीबुवा आपल्या गळ्यांतील क्रॉसवर हात फिरवीत म्हणाले.

"लोकांना कोर्टापुढें खेंचावयाचें, त्यांना तुरुंगांत डांबावयाचें किंवा सैबेरियांत हद्दपार करावयाचें यापेक्षां हें बरें" असें तेथें हजर असलेले एक शाळामास्तर म्हणाले.

इलियाला व त्याच्या पत्नीला वरील चर्चा अर्थातच आवडली नाहीं. मरियाचा चेहरा तर संतापानें लाल झाला. पण तिनें आत्मसंयमन केलें. तिनें आपल्या मुलांना खुणावलें व त्यांना घेऊन ती तेथून उठून गेली.

इलियाचे दोघे मोठे मुलगे असल्या गोष्टी ऐकत होते व त्यांनीं दिग्दर्शित होत असलेल्या रशियाच्या परिस्थितींत ते वाढत होते. या दोघां

मुलांपैकीं वडील मुलगा अलेक्झांडर हा विशेष तापट स्वभावाचा होता. तो जसजसा मोठा होऊं लागला तसतसा अधिकाधिक उदासीन होत चालला. त्यांचें अंतःकरण भावनामय होतें. इलिया सरकारी नोकर असला तरी घरीं या बापलेकांचे राजकीय व सामाजिक विषयांवर अनेक वाद-विवाद होत. या वादविवादांत अर्थात्‌च रशियाच्या सद्यःस्थितीसंबंधानेंही चर्चा होत असे. इलिया विद्वान् होता. त्याचें वाचन विस्तृत व गाढ होतें. आपल्या मुलांबरोबर व पत्नीबरोबर वरीलप्रमाणें चर्चा करीत असतां रशियाला या दुःस्थितींतून मुक्त करण्याकरितां काय केलें पाहिजे याचा निश्चित मार्ग मात्र तो सांगू शकत नसे. या चर्चांमुळें अलेक्झांडरची वृत्ति अधिकाधिक प्रक्षुब्ध होत चालली होती. पण लेनिनचें मन इतकें उतावीळ नव्हतें. घरीं चालू असलेल्या चर्चा व शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायांची कल्पना देणाऱ्या गोष्टी ऐकून त्याचेंही मन प्रक्षुब्ध होई. पण या प्रक्षुब्धतेचा त्याच्या मनावर झालेला परिणाम फार वेळ टिकत नसे. वयानुरूप असलेल्या आनंदी व खेळकर स्वभावामुळें ती प्रक्षुब्धता नाहींशी होई.

उलियानोव्ह कुटुंब उन्हाळ्याच्या दिवसांत खेड्यांत राहण्याकरितां जात असे. या दिवसांत रात्रीं शिकार करण्याकरितां गांवांतील मंडळी निघत. त्यांत व्ह्लाडिमीरही उत्साहानें भाग घेत असे. या टोळींत तो सर्वांत पुढें असायचा व कसलाही प्रसंग आला तरी तो डरायचा नाहीं. व्ह्लाडिमीर लेनिन धाडसी होता पण हूड नव्हता. तो हट्टी होता पण संतापी नव्हता. तो निश्चयी होता पण उतावळा नव्हता. तो खेळाडू होता पण असंयमी नव्हता. तो मनमिळाऊ होता. घरांत काय किंवा शाळेंत काय सर्वांशीं तो प्रेमानें वागे. शाळेंतील त्याची वागणूक तर वाखाणण्यासारखी होती. व्ह्लाडिमीर असामान्य बुद्धीचा नसला तरी तो अगदीं 'ढ'ही नव्हता. परीक्षांतून व खेळांतून तो वेळोवेळीं बक्षिसें व पदकें मिळवीत असे; पण यामुळें त्यानें आपल्या सोबत्यांना कधींही कमी लेखलें नाहीं. तो सर्वांना मनोभावानें मदत करी. ज्यांचा अभ्यास कच्चा असेल त्यांना टांचणें काढून द्यावयाची, अभ्यासाच्या निरनिराळ्या पुस्तकांतील महत्त्वाचे भाग त्यांना समजावून सांगायचे, अशा वृत्तीमुळें तो शाळेंतल्या मुलांना अत्यंत प्रिय झाला होता.

एखाद्या गोष्टीनें लेनिनचें चित्त आकर्षित केलें म्हणजे तिचा पिच्छा पुरवावयाचा हा त्याच्या स्वाभावांतील विशेष होता. मग तो अभ्यासांतील एखादा विषय असो किंवा एखादा खेळ असो. शाळेत असतांना लॅटिन भाषेकडे त्याचें चित्त वेधलें. त्यानें लगेच ती भाषा आत्मसात् करण्याचें ठरविलें. इतर मुलांपेक्षां त्यानें या भाषेंत जास्त प्राविण्य संपादन केलें खरें; पण या भाषेच्या अभ्यासामुळें शाळेच्या इतर विषयांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होतें असें त्याला आढळून आलें तेव्हां मात्र त्यानें तो नाद सोडून दिला. खेळाच्या बाबतींतही तसेंच. उन्हाळ्यांत पोहावयाचें व मासे पकडावयाचें व हिवाळ्यांत व्होल्गाच्या भागांतील बर्फमय कड्यावरून खालीं घसरत यावयाचें व सर्व दिवसभर स्केटिंग (बर्फावरून घसरणारे बूट घालून चालणें) करीत असायचें हा त्याचा सामान्य कार्यक्रम बनला होता. पण या खेळांतच दिवसचे दिवस जाऊं लागले व त्याचा अभ्यासावर परिणाम होऊं लागला असें त्याला आढळून आल्याबरोबर त्यानें स्केटिंग खेळण्याचें अजिबात सोडून दिलें. याचप्रमाणें बुद्धिबळें खेळण्याचाही लेनिनला या दिवसांत नाद लागला होता. थोड्याच दिवसांत त्यानें या खेळांत चांगलेंच प्राविण्य संपादन केलें व चांगल्या मोठमोठ्या मंडळींनाहीं तो हरवूं लागला. या खेळांत व्यायाम नाहीं, वेळ फार जातो, बौद्धिक शक्ति व उत्साह खर्ची पडतो व यामुळें अभ्यासांत खंड पडतो हें पाहून त्यानें त्या खेळाकडे पुष्कळ वर्षेंपर्यंत ढुंकूनही पाहिलें नाहीं. पुढें हद्दपारीच्या दिवसांत खेड्यांतून एकांतवासांत दिवस कंठायचा त्याच्यावर प्रसंग आला त्या वेळीं मनाला विरंगुळा मिळावा म्हणून हा खेळ पुन्हा तो खेळूं लागला.

जिवलग असा मित्र लेनिनला कोणी नव्हता. तथापि आपल्या थोरल्या भावावर त्याचें प्रेम होतें व श्रद्धाही होती. त्याचा थोरला भाऊ उंच व देखणा होता. तो नेहमीं गंभीर व विचारमग्न दिसत असे. भावी आयुष्यांत आपण काय करायचें याचा विचार तो नेहमीं करीत असे व त्या स्वप्नांतच तो दंग राही. तो अभ्यासू होता. आपल्यावर पडलेली जबाबदारी ओळखून ती योग्य रीतीनें पार पाडण्याच्या कामीं तो अत्यंत दक्ष असे.

लेनिन सतरा वर्षांचा असतांनाच त्याचा बाप एकाएकीं वारला. त्यामुळें संसाराचा सर्व भार वडील भाऊ साशा अलेक्झांडर यावरच पडला.

पण साशानें या प्रसंगीं आपला धीर खचूं दिला नाहीं. लेनिनच्या कुटुंबावर हा एक मोठा आघातच झाला. पण लेनिनच्या आईनें शांत चित्तानें या प्रसंगाला तोंड दिलें. या प्रसंगीं साशानेंही धैर्य सोडलें नाहीं व आपल्या मनाची शांति ढळूं दिली नाहीं हें पाहून तर त्याच्याबद्दलचा लेनिनच्या मनांतला आदर जास्तच वाढला व प्रत्येक बाबतींत साशाचें अनुकरण करण्यांतच त्याला आनंद वाटूं लागला. लेनिन सर्व बाबतींत साशाचें अनुकरण करी. पण एका गोष्टींत साशाचें अनुकरण करणें त्याला शक्य नव्हतें. साशा गंभीर व विचारमग्न असावयाचा. पण लेनिनच्या स्वभावांतच या गोष्टी नसल्यामुळें साशाच्या चेहऱ्यावर सदोदित उमटून दिसणारी विचारमग्नता लेनिनच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती. यामुळें लेनिनसंबंधानें साशाचा एक निराळ्याच प्रकारचा ग्रह झाला होता.

"आपल्या व्हालोडियाबद्दल (लेनिनचें लाडकें नांव) तुला काय वाटतें !" असें साशाच्या धाकट्या बहिणीनें साशाला सहज एकदां विचारलें व ती त्याच्याकडे चमत्कारिक व कुतूहलपूर्ण दृष्टीनें पाहूं लागली.

"तो तसा चांगला हुशार आहे पण ज्या दृष्टीनें आपण प्रत्येक विषयाचा विचार करतों तसा तो करीत नाहीं" असें साशानें उत्तर दिलें.

"कां बरें नाहीं !" बहिण उद्गारली.

"असें आहे खरें" साशा म्हणाला.

वडील वारल्यानंतर लेनिनच्या स्वभावांत फरक पडला होता. तो उद्धट व बेपर्वा बनत चालला होता. पण ही त्याची वृत्ति फार दिवस टिकली नाहीं.

हायस्कुलांतील लेनिनचें शिक्षण संपत आलें तेव्हां पुढें कॉलजचें शिक्षण कसें घेतां येईल याचा विचार घरांत सहजच चालू झाला. पण शाळेंतील शिक्षण जसजसें संपत आलें तसतसा शाळेंतील इतर हुशार मुलांप्रमाणें शाळेंतील शिक्षकांसंबंधानें त्याला तिरस्कार वाटूं लागला होता. हे शिक्षक निव्वळ पोटभरू असतात, स्वार्थापलीकडे त्यांची दृष्टि नसते, समाजांत चालू असलेल्या घडमोडींकडे ते संकुचित दृष्टीनें पाहतात, मुलांकडून घोकंपट्टी करून घ्यायची व परीक्षेकरितां त्यांना तयार करावयाचें यापेक्षां ते कोणताही विचार करीत नाहींत, हें सर्व पाहून लेनिनला या

लोकांचा तिटकारा येत चालला होता. शिक्षकांबद्दल वाटणाऱ्या तिरस्कारा-बरोबर त्या वेळच्या शिक्षणक्रमासंबंधानेंही त्याचें वाईट मत बनलें होतें. धर्माच्या आज्ञा पाळल्याच पाहिजेत, प्रचलित रूढींना मान दिला पाहिजे, सरकारी अधिकाऱ्यांचे हुकूम मानले पाहिजेत, झारवर निष्ठा ठेवली पाहिजे. बुद्धीला न पटणाऱ्या व पूर्वग्रहानें दूषित अशा वरील प्रकारच्या गोष्टी या शाळांतून शिकवल्या जात. असल्या शिक्षणपद्धतीमुळें या शाळा, त्यांतील शिक्षक व त्यांनीं आंखलेला शिक्षणक्रम या सर्वांबद्दलच त्याला तिरस्कार वाटूं लागला व तो दिवसेंदिवस दृढ होत चालला.

लेनिनच्या लहानपणची आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्याला शंका वाटूं लागली ही होय. पूर्वी सांगितल्याप्रमाणें लेनिनच्या बापाच्या घरीं दर शनिवारीं भरणाऱ्या चहापानाच्या बैठकींत राजकारणाप्रमाणें धर्मावरही गप्पा चालत. अधोगतीस लागलेल्या ऐत-खाऊ वर्गाचे प्रतिनिधि व रक्षक, पोलिस, भटभिक्षुक, पाद्री व मास्तर यांच्या या गप्पांत ईश्वर व धर्म यांवर कुत्सित टीका होणें साहजिकच होतें. कारण दलितांना जरबेंत ठेवण्यासाठीं उभारलेल्या धर्माकडून तें काम होणें अशक्य झालें व सर्वच समाजरचना दलितांच्या उठावणीनें मोडूं लागण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं कीं, अधिष्ठित वर्गसुद्धां आपल्या पूर्वपरंपरेच्या धर्माबद्दल अनादरयुक्त भावना धरूं लागतो. पण आपल्या पेशाला विसंगत दिसूं नये म्हणून ईश्वर व धर्म यासंबंधानें ढोंगही तो माज-वितो. मध्ययुगीन युरोपांत धर्मोपदेशकांमध्येंच अशाप्रकारचें ढोंग, नास्तिकता व धर्मनिंदेची प्रवृत्ति उत्पन्न होऊं लागली होती. तीच वृत्ति अधिकारी वर्गांतही दिसून येत होती. अर्थात्‌च या सर्वांचें प्रतिबिंब लेनिनच्या घरांतील गप्पांमध्यें लेनिनला पाहायला मिळे. शेतकऱ्यांची कत्तल, त्यांची आर्थिक पिळणूक, भटभिक्षुक पाद्र्यांकडून केली जाणारी त्यांच्या स्त्रियांची विटंबना, व त्याबद्दल अधिकारीवर्गाकडून दाखविला जाणारा राक्षसी आनंद व विनोद, धर्माच्याच नांवानें शेतकऱ्यांना अज्ञानांत ठेवण्याची योजना,, शेतकऱ्यांमध्येंच आपापसांत चालू असलेले जुलूम अथवा हल्ले इत्यादींचीं वर्णनें लेनिनला या गप्पांत ऐकायला मिळत.

चहापानाच्या बैठकींत रशियन रीतिरिवाज व हवामान यांना अनुसरून मद्यपानाचीही प्रथा होतीच. एकदां एक पाद्रीमहाशय जरा जास्त प्याले तेव्हां ते लाजून आपल्या वर्तनाचें विनोदपूर्ण व धर्ममूलक असें समर्थन करण्यासाठीं म्हणाले, "तुम्हांला जें खावयाचें असतें तें मजेनें खा, आणि दारू प्यायची तीही मजेनें प्या. कारण तुमच्या कृत्यांनीं ईश्वराला आनंद होतो."

उपाहार करतांना ही मंडळी असले अचकट विचकट बोलूं लागलीं म्हणजे त्या ठिकाणीं आपल्या मुलांनीं बसूं नये असे लेनिनच्या आईला वाटत असे व असले प्रकार सुरू झाले म्हणजे ती आपल्या मुलांना घरांत बोलावून घेई व त्यांना आपल्या जागीं जाऊन निजण्यास सांगे. आईचें हें करणें लेनिनला अर्थात्च आवडत नसे. या मंडळींत चालू असलेली चर्चा आपण कां ऐकूं नये, त्यांत काय बिघडतें, असें त्याला नेहमीं वाटे. पण आईची आज्ञा तर ऐकलीच पाहिजे. तेव्हां आईनें मुलांना तेथून आंत जाण्याला सांगितलें म्हणजे त्या सगळ्यांच्या बरोबर तोही आंत जाई व आपल्या अंथरुणावर पडून निजल्याचेंही सोंग करी. पण थोड्या वेळानें सामसूम झालें कीं, मुख्य हॉलजवळील खोलीच्या दरवाजाआड तो मुकाट्यानें येऊन बसे व मंडळींत मोकळेपणानें चालू असलेली चर्चा ऐकत असे.

पाद्र्यानें ईश्वराचें नांव काढल्याबरोबर मंडळींमध्यें देवाधर्मासंबंधानेंच गोष्टी सुरू झाल्या. ईश्वरकल्पनेसंबंधाचा व धर्मसमजुतीसंबंधाचा आपल्याला मिळालेला अनुभव मंडळींत बसलेले एक शिक्षक सांगूं लागले. "व्होल्गा प्रांतांतील खेड्यांतून आम्ही फिरत असतों व त्या ठिकाणीं शाळा काढण्याची आम्ही खटपट करीत असतों. या खेड्यांतील लोकांना शिक्षणाची आवड कोठून असणार! त्यांच्या धर्मसमजुती कोत्या आहेत, ते अद्याप मूर्तिपूजकच आहेत, ते सनातनधर्माचे अनुयायी आहेत, अशी सरकारी दप्तरांत नोंद केली आहे. सरकारी अधिकाऱ्यांची या गांवांतून फिरती आली व त्यांनीं या लोकांना हांकून बाहेर काढलें म्हणजे चर्च गांवापासून ५० मैल लांब कां असेना, तेथपर्यंत ते तंगडत जातात. त्या

ठिकाणीं गुडघे टेकून प्रार्थनाही करतात. पण घरीं आलें कीं ते पुन्हा मूर्तींची पूजा करूं लागतात व त्यांना दूधसाखरेचे नैवेद्य दाखवितात."

"असें असेल तर ही गोष्ट बिशपला कळविली पाहिजे व तेथें मिशनरी पाठविले पाहिजेत." पाद्री म्हणाला.

"पण तुम्ही मिशनरी तेथें जाण्यापूर्वी मी कांहीं घोडेस्वारच पाठवून देतों. या मूर्तिपूजकांना ताळ्यावर आणण्याकरितां चाबकाचा बाप्तिस्मा दिला पाहिजे. आमचे शेतकरी अद्यापि रानटीच आहेत." पोलिस कमिशनर ओरडून बोलला.

"त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे." इलिया उलियानोव्ह म्हणाला.

"तें तर उपयोगाचेंच नाहीं." पोलिस कमिशनर बोलूं लागले. "तें तर फारच भयंकर. यामुळें ते जास्तच असंतुष्ट होतात व बंडखोर बनतात. दुसऱ्या अलेक्झांडर झारच्या खुनाचा प्रयत्न करण्यांत आला ही गोष्ट तुम्हांला माहीत आहे. मी त्यावेळीं पीटर्सबर्गमध्यें होतों. या कटांतील लोकांना फांसावर चढविलेले मीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहे. ईश्वराच्या कृपेनेंच हें सर्व घडून आलें. ईश्वराचा हात त्या कामांत नसता तर हा कट उघडकीस आला नसता व हे लोक फांसावर लटकले नसते."

लेनिन हें सर्व बोलणें ऐकत होता. परमेश्वर लोकांना फांशीं देतो व सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या जुलमी कृत्यांत मदतही करतो इत्यादि शंका त्याच्यापुढें उभ्या राहिल्या व त्यांनीं त्याचे मनांत काहूर उठवून दिलें.

मंडळींच्या गप्पांना जणूंकाय भरच आला होता. पोलिस कमिशनर आपल्या अनुभवाची आणखी एक गोष्ट सांगूं लागला.

"व्होल्गा प्रांतांतीलच ही गोष्ट आहे. या भागांत जिप्सी लोकांच्या टोळ्या नेहमीं फिरत असतात. घोडे विकणें, दोर विकणें व किरकोळ जिनसा विकणें हे त्यांचे धंदे; पण त्यांचा मुख्य धंदा चोऱ्या करण्याचा. या भागांतील शेतकरी आडदांड, रानटी व मूर्तिपूजक आहेत व त्यामुळें जिप्सी लोकांत व त्यांच्यांत नेहमींच मारामाऱ्या होतात. पण एकदां असें झालें कीं, या टोळींतील एका तरुण मुलीवर एका जवळच्या गांवांतील तरुणाचें लक्ष गेलें. त्या दोघांचें प्रेम जमलें. त्या दोघांचा याप्रमाणें

चोरून मारून चाललेला व्यवहार उघडकीस आला. शेतकऱ्यांना ही गोष्ट सहन झाली नाहीं. आपल्या एका तरुणानें जिप्सीशीं व्यवहार केला याबद्दल त्यास देहान्त शासन करण्याचें त्यांनीं ठरविलें. या तरुण जोडप्याला एकत्र असतांना पकडण्यांत आलें होतें. तेव्हां या तरुणाबरोबर तिलाही शिक्षा देण्याचें अर्थात् ठरलेंच. ही तरुण मुलगी चेटकी आहे, असा तिच्यावर आरोप ठेवण्यांत आला व तिच्या गळ्यांत दगडाचें कडें अडकवून तिला व्होल्गा नदीच्या मध्यपात्रांत बुडविण्यांत आलें. पुढें या तरुणाला कसें मारायचें यासंबंधानें चर्चा झाली. त्याचे हाल करण्याची एक नवीनच युक्ति काढण्यांत आली. त्याचे हात मागें पाठीवर बांधण्यांत आले. त्याच्या सर्वांगाला मध चोपडण्यांत आला व मुंग्यांच्या वारुळावर त्याला टांगण्यांत आलें. त्याच्या पायांचे दोन्ही आंगठे वारुळाला टेकतील अशा रीतीनें त्याला लोंबकळत ठेवण्यांत आलें. तीन दिवस व तीन रात्री या वारुळांतील मुंग्या त्या तरुणाला खात होत्या. त्या तरुणाचे होत असलेले हे भयंकर हाल त्या खेड्यांतील बायका-पुरुष मोठ्या आनंदानें पाहत होते.[1]

"किती भयंकर शिक्षा ! या मूर्तिपूजकांना अशीच शिक्षा केली पाहिजे. हे मूर्तिपूजक अशा रीतीनें नरकांत गेलेले पाहून ईश्वराला आनंदच वाटला असेल." असें पाद्री मध्येंच म्हणाला.

पाद्र्याचे हे उद्गार ऐकून लेनिनचें अंतःकरण कळवळून गेलें. ईश्वर इतका दुष्ट असेल काय ? लेनिनच्या मनांत अशी शंका आल्याशिवाय राहिली नाहीं. या प्रसंगानंतर ईश्वरावरचा लेनिनचा विश्वास पार ढासळून गेला. लेनिनला त्या रात्रीं झोंप आली नाहीं. अंथरुणावर तो सारखा तळमळत पडला होता. त्यानें ती सर्व रात्र रडून काढली. लेनिनचा उतरलेला चेहरा पाहून त्याच्या वडील भावाला सहजच शंका आली.

"तुला कांहीं झालं काय ? रात्रभर तुला झोंप आली नाहीं ! काय, तुला रडायला काय झालें ?"

---

१. या भयंकर कृत्याची पुढें चौकशी झाली व या गुन्ह्याबद्दल तीन शेतकऱ्यांना तीन वर्षांची शिक्षा मिळाली.

भावाचे हे शब्द ऐकून लेनिन हुंदके देऊं लागला. त्याच्या डोळ्यांतून आसवें गळूं लागलीं. त्यानें आपल्या भावाला रात्रीची सर्व हकीकत सांगितली. "ईश्वर दुष्ट आहे, दुष्ट आहे." असें तो मुठी वळवून म्हणाला.

साशानें त्याच्याकडे विचारपूर्ण दृष्टीनें पाहिलें व आपल्या नेहमींच्या निश्चयी स्वरांत तो म्हणाला,

"ईश्वर नाहीं."

भावाचे हे शब्द लेनिनच्या मनांत किती दिवस तरी सारखे घुमत होते. याप्रमाणें हे दोन्ही भाऊ नास्तिक झाले. त्यांची धर्मावरील श्रद्धा नष्ट झाली. ते जसजसे मोठे होऊं लागले तसतशी त्यांची ही वृत्ति बळावतच चालली. त्यांचा बाप धार्मिक वृत्तीचा होता. ईश्वर व धर्म या विषयांवर या बापलेकांमध्यें अनेक वेळां चर्चा होई. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मुलांनीं बापाचीं मतें मानलींच पाहिजेत, तीं त्यांनीं पटवून घेतलींच पाहिजेत, त्यावर त्यांनीं श्रद्धा ठेवलीच पाहिजे अशी जबरदस्ती करण्याचें त्याच्या मनांत चुकूनसुद्धां आलें नाहीं. आपला ईश्वरावर विश्वास नाहीं व आपण चर्चला जाणार नाहीं, असें या दोघां भावांनीं बापाला एकदां स्पष्ट सांगून टाकलें. बापही त्यावर कांहीं बोलला नाहीं.

राजकीय मतांच्या दृष्टीनें मात्र लेनिनवर त्याच्या भावाच्या विचारांचा कितपत परिणाम झाला होता हें सांगतां येत नाहीं. लेनिनचीं राजकीय मतें अद्याप निश्चित झालेलीं नव्हतीं. राजकीय मतें परिपक्व होण्याइतकें त्याचें वय झालेलें नव्हतें. तो व त्याचा भाऊ एकाच खोलींत अभ्यास करीत असत. पण जेव्हां पहावें तेव्हां लेनिन कादंबऱ्या वाचीत पडलेला आढळावयाचा. शाळेचा अभ्यास करावयाचा म्हणजे त्याला कांहींच वाटत नसे. सेकंड फॉर्मच्या परीक्षेंत तो पास झाला व त्याचा नंबर बराच वर लागला असें त्याच्या आईला समजलें. त्या वेळीं तिनें मोठ्या आनंदानें त्याच्या कपाळाचें चुंबन घेतलें. पण यामुळें लेनिनला आनंद झाला असें दिसलें नाहीं. आईला इतका आनंद कां वाटावा याचाच त्याला प्रश्न पडला. आपण जो अभ्यास करतों तो परीक्षेकरितां थोडाच करतों. आपली ज्ञानतृष्णा तृप्त करण्याकरितां आपण अभ्यास करतों अशी त्याची भावना होती. यामुळें सिसरोचे ग्रंथ त्यानें स्वतःच डिक्शनरीच्या साहा-

त्यानें कोणाचीही मदत न घेतां वाचून टाकले होते. वाचनाचा त्याला नाद होता. त्यानें आपल्या वाचण्याच्या पुस्तकाचे दोन भाग पाडले होते; एक ललित, भावनामय व अर्थहीन पुस्तकें. हीं पुस्तकें केवळ गंमत व करमणूक म्हणून तो वाचीत असे. या पुस्तकांतील मनोहर शब्दरचना व भाषासौष्ठव हींच तो पाहात असे. टुर्गेनीव्ह, पुष्किन व टॉलस्टॉय यांचीं पुस्तकें त्याला फार आवडत. टॉलस्टॉयची "वार ॲन्ड पीस" ही कादंबरी त्यानें किती वेळां तरी वाचली. त्याला आवडणारीं दुसऱ्या प्रकारचीं पुस्तकें म्हणजे गंभीर विषयांवरील पुस्तकें होत. आपल्या बुद्धीला व भावनेला पटणाऱ्या व आपलीं मतें दृढ करणाऱ्या गोष्टी या पुस्तकांत त्यास आढळून येत. तीं तो मननपूर्वक वाचीत असे. त्याचा वडील भाऊ कार्ल मार्क्सचीं व इतर अर्थशास्त्रावरील पुस्तकें वाची. पण त्याकडे लेनिनचें लक्ष गेलें नव्हतें; त्यास राजकीय व अर्थशास्त्रविषयक वाङ्मयाची गोडी अद्याप लागली नव्हती.

साशाला आवडेल तें करावयाचें, तो वागेल तसें वागावयाचें, या वृत्तीमुळें लेनिनच्या स्वभावांत आणखी एक मोठा बदल घडून आला. लेनिन नेहमीं आनंदी व टवाळखोर असावयाचा. पण दुसऱ्याच्या अंगच्या दोषांपेक्षां त्यांच्यांतील गुणांकडेच त्याचें लक्ष आतां जाऊं लागलें. इतर मंडळी साहसाचीं व धैर्याचीं कामें करतात, तशीं कामें आपणही करावीं असें त्याला वाटत असे. कोणी एखाद्यानें साहसाचें कृत्य केलें कीं, "आपल्यांतही इतकें धैर्य उत्पन्न होईल कां!" असे स्वगत उद्गार तो काढीत असे. लेनिनच्या स्वभावांत घडून आलेला हा फरक त्याच्या बहिणीच्या लक्षांत आला होता व एकदोन प्रसंगीं लेनिननें काढलेले वरील उद्गार तिनें ऐकलेही होते. लेनिन धीट होता, उत्साही होता, तसाच तो थट्टेखोरही होता. दुसऱ्यांची टर उडवावयाची हा तर त्याचा स्वभावच बनला होता. पण इतकें असलें तरी त्यानें कधींही आत्मप्रौढी गायली नाहीं किंवा अहंमन्यतेचा विटाळही त्याला कधीं झाला नाहीं. त्याचा हा निगर्वी स्वभाव पुढील आयुष्यांत त्याला फार उपयोगी पडला.

बाप वारल्यानंतर त्याचा प्रिय भाऊ साशा अलेक्झांडर इलिच् लवकरच सेंट पीटर्सबर्गला गेला व तेथील एका कॉलेजांत त्यानें आपलें नांव

दाखल केलें. रशियाच्या ज्या परिस्थितींत साशा अलेक्झांडर लहानाचा मोठा झाला होता तिचें पूर्ण ज्ञान त्याला झालेलें होतें व त्यामुळें पीटर्सबर्गला गेल्यानंतर लवकरच तेथील क्रांतिकारक विद्यार्थ्यांच्या चळवळींत तो शिरला.

ता. १ मार्च १८८१ रोजीं रशियाचा झार दुसरा अलेक्झांडर याचा खून करण्यांत आला. या खुनानंतर सरकारानें आपलें पूर्वींचें दडपशाहीचें धोरण जास्त कठोर केलें व रशियांत चालू असलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्व चळवळी अगदीं नामशेष करून टाकण्याचा त्यानें निश्चय केला. १८८४ सालीं युनिव्हर्सिट्यांच्या घटनांत फेरबदल करण्यांत आले. विद्यार्थ्यांच्या सर्व राजकीय व सामाजिक हालचालींवर देखरेख ठेवण्याकरितां इन्स्पेक्टर नेमण्यांत आले. हे इन्स्पेक्टर विद्यार्थी व शिक्षक या दोघांवरही सारखीच टेहळणी करीत व त्यांच्या हालचालींचे रिपोर्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांना करीत. देखरेख ठेवण्यास पोलिसांना सोपें जावें म्हणून एक विशिष्ट युनिफॉर्म विद्यार्थ्यांनीं वापरला पाहिजे असे हुकूम देण्यांत आले. सरकारच्या या दडपशाहीमुळें रशियांतील विद्यार्थी नामोहरम झाले नाहींत, तर उलट जास्तच खवळून गेले. इन्स्पेक्टर व विद्यार्थी यांच्या झटापटी सुरू झाल्या. या झटापटींमध्यें विद्यार्थ्यांवर कोसॅक शिपायांच्या तुकड्या पाठविण्यापर्यंत पाळी आली. अर्थात् याच वेळीं कामगारांचे जे संप होत त्यांवर पाठविल्या जाणाऱ्या पोलिस तुकड्या गोळीबाराचा उपयोग करीत, तर विद्यार्थ्यांच्या झटापटींत फक्त चाबकांचाच प्रयोग केला जात असे. पण त्यामुळें विद्यार्थी-चळवळ थांबली नाहीं. लेनिनचा भाऊ साशा त्या वेळच्या नारोडनिक् अगर अन्य गटांत सामील झाला नव्हता; त्यानें विद्यार्थ्यांचा एक स्वतंत्रच गट तयार केला व १८८७ च्या १ मार्चलाच तिसऱ्या अलेक्झांडरला मारण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाहीं. दुसऱ्या अलेक्झांडरचा खून ता. १ मार्च रोजींच झाला होता. त्याची स्मृति ताजी करण्याकरितांच कटवाल्यांनीं पुन्हा तीच तारीख या कृत्याकरितां मुक्रर केली होती. कटवाल्यांना या कामांत यश आलें नाहीं व त्यांना पकडण्यांत आलें. या कटवाल्यांत अर्थात्च लेनिनचा वडील भाऊ साशाही पकडला गेला.

साशाला पकडण्यांत आलें आहे व त्याच्यावरील आरोपाची चौकशी

लवकरच व्हावयाची आहे, ही बातमी त्याच्या एका नातेवाइकानें सिंबिर्स्क येथील आपल्या एका मित्रास कळविली. या मित्राकडून ही बातमी गांवांत पसरली. ही भयंकर बातमी समजतांच साशाची आई तावडतोब शाळेकडे धांवतच गेली. यावेळीं व्यायामाच्या वर्गांत लेनिन व्यायाम करीत होता. या मित्राला आलेलें पत्र त्याच्या आईनें त्याला वाचावयास दिलें. लेनिनच्या चेहऱ्यावरील आनंद एकाएकीं मावळला आणि तो कायमचाच मावळला. त्याच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा पुन्हा कधींही दिसली नाहीं.

"ही तर फारच भयंकर बातमी आहे. साशाची आतां धडगत दिसत नाहीं." पत्र वाचतांच तो म्हणाला. लेनिन यापुढें कोणाची थट्टा करीनासा झाला. स्नेह्यांबरोबर खेळण्याचें तर त्यानें सोडूनच दिलें. तासन् तास आपल्या खोलींत एकटेंच बसून राहावें, आपण स्वतः होऊन कोणाशीं बोलूं नये व बोललें तर अगदीं मोजक्या शब्दांत त्याच्या प्रश्नाला उत्तर द्यावें व सारखें गंभीरपणें विचार करीत असावें, अशा प्रकारची लेनिनची ही बदललेली वृत्ति पाहून त्याच्या आईच्या काळजींत अधिकच भर पडली.

पति एकाएकीं वारला. मुलें मोठीं झालीं होतीं. त्यांचें शिक्षण लवकर संपेल व तीं आपल्या पायांवर उभीं राहून संसाराचा गाडा चालवूं लागतील अशी आशा त्या माउलीनें केली होती; पण साशासंबंधाची वरील बातमी ऐकून तिचें अंतःकरण खचून गेलें. आतां लवकरच आपल्या प्रिय मुलाच्या मरणाची बातमी ऐकण्यास तयार होण्याचा दुर्धर प्रसंग तिच्यावर आला होता. पण या खडतर प्रसंगाला तिनें धैर्यानें तोंड दिलें. पीटर्सबर्गला जाण्याची तिनें तयारी केली. कॉलेजचे विद्यार्थी सेंट पीटर्सबर्गचा हा खडतर प्रवास चैनींत व मजेंत करीत. पण लेनिनच्या आईला हा प्रवास अत्यंत कष्टमय झाला. कारण तिला तेथें एका भयंकर दिव्याला तोंड द्यावयाचें होतें. झारचा खून करण्याचा प्रयत्न करण्याच्या आरोपावरून साशाला पकडण्यांत आलें होतें. साशाची बहीण ॲना ही त्यावेळीं त्याच्याजवळच राहत होती. तेव्हां तिलाही संशयावरून पकडण्यांत आलें होतें. पण तिला लवकरच सोडून देण्यांत आलें. आई पीटर्सबर्गला जाण्याकरितां निघाली तेव्हां तिच्याबरोबर कोणीतरी सोबतीला द्यावें असें लेनिनला वाटलें. गांवांत त्याची पुष्कळ स्नेही मंडळी

होती. पण त्यांपैकीं एकही जण तिच्याबरोबर जाण्यास तयार होईना. झारचा खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल पकडण्यांत आलेल्या मुलाच्या आईबरोबर आपण गेलों तर आपल्यावर सरकारी अधिकाऱ्यांचा रोष होईल या भीतीनें जो तो मागें घेऊं लागला. लेनिननें आपल्या ओळखीचें घरन् घर पालथें घातलें, पण एकही माणूस त्याला मिळेना. आपल्या कुटुंबावर गांवांतल्या लोकांनीं जणूंकाय बहिष्कारच घातला आहे, असें त्याला वाटलें. कांहीं मंडळींनीं तर लेनिननें आपल्या घरांत पाऊलही टाकतां कामा नये असें बजावलें. या लोकांची भ्याड वृत्ति पाहून लेनिनच्या अंगाचा तीळपापड झाला. एरवीं क्रांतीच्या गप्पा मारणारे हे लोक संकटांत सांपडलेल्या एका म्हातारीला मदत करण्यास देखील तयार नाहींत, हें पाहून त्याचा संताप द्विगुणित झाला. शेवटीं लेना अस्टापोव्ह नांवाची एक तरुण विद्यार्थिनी त्याच्या आईबरोबर जाण्यास तयार झाली. प्रवासांतले अनेक शारीरिक कष्ट व आपल्यावर पुढें ओढवणाऱ्या आपत्तींच्या कल्पनेमुळें होणाऱ्या भयंकर मानसिक यातना सहन करीत लेनिनची आई पीटसबर्गला पोंचली. पण या बिचारीचा हा हेलपाटा अगदीं फुकट गेला. आपल्या मुलाला ती कोणत्याही प्रकारें मदत करूं शकली नाहीं. आपल्या मुलाला झालेली फांशीची शिक्षा रद्द करून ती जन्मठेप कैदेची करण्यांत यावी, याबद्दल तिनें झारला अर्ज केला. पण तिची ही विनंति नाकारण्यांत आली व लुसेलबर्गच्या किल्ल्यांतील एका अंधाऱ्या आवारांत अलेक्झांडरला फांशीं देण्यांत आलें. रशियांतील झारांच्या एकतंत्री सत्तेविरुद्ध बंड करून उठलेल्या कितीतरी लोकांना या भयाण जागेंत फांसावर चढविण्यांत आलें होतें !

# बंडखोर विद्यार्थी

अलेक्झांडर इलिचला फांशीं देण्यांत आल्यापासून दहशतवाद्यांच्या पक्षाला उतरती कळा लागली व पुढें थोड्याच दिवसांत हा पक्ष नामशेष झाला. अधिकाऱ्यांचें किंवा झारांचे खून केल्यानें जनतेच्या स्वातंत्र्याचे मार्ग खुले होत नाहींत, ही गोष्ट रशियांतील त्या वेळच्या तरुणांना पटत चालली होती. रशियांत या वेळीं एका नवीनच युगाला प्रारंभ झाला होता. रशियन समाजांत एक नवीन वर्ग निर्माण होत होता व क्रांतीच्या चळवळीचीं सर्व सूत्रें त्याच्या हातांत जाऊं लागलीं होतीं. १८६१ सालीं शेतकरीस्वातंत्र्याचा म्हणून जो कायदा करण्यांत आला होता त्यानें सत्ताधीश वर्गाच्या अपेक्षेप्रमाणें शांतता व सुबत्ता झाली नाहीं. या कायद्यामुळें जमीनदारांचे व सावकारांचें खेडेगांवांतील वजन थोडेंसें कमी झालें खरें, पण खुद्द शेतकरीसमाजांतच श्रीमंत शेतकरी (कुलक) व गरीब शेतकरी असे दोन वर्ग पडले. १८८० च्या सुमारास व्होल्गा नदीवरील साराटोव्ह प्रांतांतील शेतकऱ्यांवरील खंडाचें प्रमाण १८६१ सालीं असलेल्या प्रमाणापेक्षां ८।१० पटीनें वाढलें. त्याचप्रमाणें सरकारी साऱ्याचेंही प्रमाण भरमसाट वाढत चाललें. त्यामुळें शेती खालावत चालली. शेतकरी कंगाल झाले. १८८४ सालीं युरोपियन रशियांतील ९० लाख शेतकऱ्यांपैकीं २५ लाख शेतकऱ्यांजवळ शेतावर काम करण्याकरितां लागणारे घोडे नव्हते. आस्लाव प्रांतांतील शेती तर जवळजवळ बंदच पडली होती. १८८९ ते १८९९ पर्यंतच्या दहा वर्षांत या भागांतील शेतकऱ्यांपाशीं असलेल्या शेतीच्या जनावरांपैकीं शें. २० जनावरें मृत्युमुखीं पडलीं. दुसऱ्या अलेक्झांडर झारनें केलेल्या कायद्यामुळें खेडेगांवांतील शेतकरीवर्गांत दुफळी माजली. या कायद्यामुळें शेतकरी थोडा स्वतंत्र झाला; पण या कायद्यानें शेतकरीसमाजांतच फूट पाडल्यामुळें रशियांतील खेड्यांतून असलेल्या ग्रामपंचायती नष्ट झाल्या. हजारों भूदास शेतकरी

या कायद्यानें स्वतंत्र झाले, पण त्यांना कसावयाला जमीन देण्यांत आली नाहीं. यामुळें बेकार झालेले शेतकरी आपापलीं गांवें सोडून शहरांकडे काम शोधण्याकरतां जाऊं लागले. शहरांत निघालेल्या कारखान्यांतून मजुरांची जरूरी होती. हजारों शेतकरी बेकार झाले, हजारों देशोधडीला लागले व त्यांनीं सैबेरिया व तुर्कस्थान गांठलें. खेड्यांतील श्रीमंत शेतकरी (कुलक) हा एक प्रकारचा भांडवलदारच होऊन बसला. या कुलकांनीं खेड्यांतील जमीनी सावकारीच्या जोरावर आपल्या मालकीच्या केल्या व शेताच्या मूळ मालकाला शेतावर राबणारा मजूर बनविलें. रानांत आपल्या मालकीचें शेत आहे हा अभिमान शेतकऱ्याला पूर्वी वाटत असे, त्यामुळें त्याचें आपल्या राहत्या खेड्यावरही प्रेम असे. पण ती स्थिति पालटली. कुलकांनीं सर्व जमिनी बळकावल्या. अशा रीतीनें १८९० सालीं जवळ जवळ एक कोट शेतकरी रोजगार घेऊन जमिनीवर राबणारे मजूर बनले. अशा परिस्थितींतच १८९१ सालीं रशियांत भयंकर दुष्काळ पडला. या दुष्काळानें रशियन शेतकऱ्यांच्या हालांत अधिकच भर पडली. इतका भयंकर दुष्काळ रशियांत यापूर्वी कधींही पडला नव्हता. खेड्यांतील शेतकरीवर्ग याप्रमाणें अत्यंत असंतुष्ट झाला होता व शहरांतील मध्यमवर्गीय क्रांतिवादी तरुण, झारचा व इतर सरकारी अधिकाऱ्यांचे खून करून रशियांत क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करीत होते. पण या मूठभर जहाल क्रांतिवादी मध्यमवर्गीय तरुणांना त्यांच्या प्रयत्नांत यश आलें नाहीं; झारच्या वाढत्या दडपशाहीला हे तरुण तोंड देऊं शकले नाहींत. या दडपशाहींत शेकडों तरुणांचे बळी पडले. यामुळें साहजिकच या तरुणवर्गांत निराशेचा जन्म झाला. हा निराश झालेला तरुण, चेखोव्हच्या नाटकांत चांगलाच पाहायला सांपडतो. 'ऐंशीच्या भोंवऱ्यांतला तरुण' (ए मॅन ऑफ दी एटीज) म्हणजे निराश झालेला व शून्य दृष्टीनें जगाकडे पाहणारा मनुष्य, असाच या तरुणांच्या बाबतींत शब्दप्रचार रूढ झाला होता. पण याच काळांत रशियांत दुसऱ्या क्रांतिकारक चळवळीचा पाया रोवला गेला. क्रांतिकारक चळवळीची धुरा आजपर्यंत केवळ मध्यमवर्गीय तरुणांकडेच होती; पण तिचीं सूत्रें यापुढें प्रामुख्यानें कामगारवर्गाच्या हातीं गेलीं व त्याबरोबर तिचें ध्येय, तत्त्वज्ञान व मार्ग यांतही आमूलाग्र असा

फरक झाला. १८७७ ते १८९७ च्या वीस वर्षांत रशियांतील उद्योग-धंदे झपाट्यानें वाढीस लागले होते. रशियांतील खनिज पदार्थांचें उत्पादन या अवकाशांत तिपटीनें वाढलें आणि कापडाच्या गिरण्यांचीही दुपटीनें वाढ झाली. या वीस वर्षांत खाणींतून काम करणाऱ्या मजूरांची संख्या १,०३,००० ची १,५३,००० व गिरण्यांतील मजुरांची संख्या ३,०९,००० ची ६,४२,००० वर आली. शहरांतील कामकरीवर्गाची संख्या याप्रमाणें झपाट्यानें वाढत होती. पण या लोकांच्या परिस्थितीकडे भांडवलवाल्यांचें मुळींच लक्ष नव्हतें. कारखाने वाढवावयाचे व हजारों मजूर कामावर लावावयाचे एवढीच गोष्ट हे कारखानदार जाणत असतात. कारखान्यांबरोबर हजारोंनीं वाढत चाललेला कामगारसमाज कोठें राहतो, काय खातो व कसे दिवस काढतो याकडे भांडवलदारवर्ग मुळींसुद्धां लक्ष देत नसतो. भांडवलशाही पद्धतीचाच हा दोष आहे. औद्योगिक क्रांतीच्या वेळीं युरोपांतील इतर देशांतून कामगारांचे जे हाल झाले तशाच प्रकारचे हाल रशियन कामगारवर्गाला अर्थात् सोसावे लागले. मालकाकडे आपलें वेतन किती शिल्लक राहिलें आहे, एवढी साधी गोष्टही रशियांतील त्यावेळच्या कामगारांना माहीत नव्हती. १८८२–८३ सालीं मास्कोमधील १८१ कारखान्यांची सरकारी रीत्या पाहणी करण्यांत आली. मजुरांना वेतन किती द्यावें, कामाचे तास किती असावे, वेतन केव्हां द्यावें, यासंबंधाचे कांहींतरी ढोबळ नियम फक्त ७१ कारखान्यांतून करण्यांत आले होते. एका मोठ्या गिरणींत तर वर्षांतून दोनच वेळां पगार होत असे. कारखान्यांतील मजुरांनीं कारखान्यांतर्फें काढण्यांत आलेल्या दुकानांतूनच आपल्याला लागेल तो माल घेतला पाहिजे अशी सक्ति त्यांवर करण्यांत येत असे. यामुळें पगाराच्या दिवशीं मजुराच्या हातांत दिडकीही पडत नसे. दंडाची रक्कम व दुकानांतील उधारीची वसुली यांतच सर्व पगार खलास होत असे. हा कामगारवर्ग शहराच्या ज्या भागांत रहात होता तो तर अतिशय कोंदट व गलिच्छ होता. रात्रीं अंग टाकावयास भरपूर जागाही मिळत नव्हती. कारखानदारांनीं व इतर श्रीमंत लोकांनीं भाडेकरूकरितां बांधलेल्या झोंपड्यांतून व चाळीं-तून अतिशय गर्दी करून राहावें व दिवसभर कारखान्यांत काम करावें;

रशियन कामगारवर्ग या राहणीला साहजिकच कंटाळून गेला होता. तुरुंगांतील कैद्यांप्रमाणें त्यांची स्थिति झाली होती.

असल्या परिस्थितीला तोंड देण्याचा एकच उपाय कामगारवर्गापाशीं असतो व तो म्हणजे संप होय. नारोड्नायां (पीपल्स पार्टी) तील मंडळी दहशतवादी खरी, पण त्यांतीलही कांहीं मंडळींना कामगारसंघटनेचें महत्त्व आतां समजूं लागलें होतें. व्हीरा फिग्नेरच्या पुढारित्वाखालीं काम करणारे तरुण, मास्को येथील गिरण्यांतून काम करणाऱ्या कामगारांत जागृतीचें काम करीत होते. या चळवळीमुळें कामगारवर्गांतील लोकही पुढें येऊं लागले होते. १८७५ सालीं पीटर अलेक्झीव नांवाच्या एका कामगार तरुणाला, संपाला चिथावणी देण्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलें. अधिकाऱ्यांच्या या दडपशाहीमुळें हा तरुण घाबरला नाहीं. त्यानें आपल्यावर आलेल्या प्रसंगाला धैर्यानें तोंड दिलें. "संघटित झालेल्या लाखों कामगारांच्या मनगटाच्या शक्तीपुढें दडपशाहीवर उभारलेली जगांतील कोणतीही सत्ता टिकाव धरूं शकणार नाहीं." असें या तरुणानें आपल्या जबानींत सांगितलें. यानंतर थोड्याच दिवसांनीं पार्टीर्सबर्गमधील काझान कॅथिड्रलच्या बाहेरच्या पटांगणांत एकाएकीं दोनअडीचशें कामगार जमा झाले व त्यांनीं लाल बावटा उभारून आपली सभा भरविली. या सभेचें नेतृत्व रशियांतील समाजसत्तावादाचा आद्य प्रवर्तक जॉर्ज प्लेखानोव्ह यानें स्वीकारलें होतें. लाल बावट्याच्या या चळवळी रशियांतील शहरांतून यापुढें उघडपणें चालणें कित्येक वर्षें अशक्य झालें हें खरें, तथापि निशाणें न मिरवतां किंवा सभा न भरवितां कामगारांच्या चळवळी रशियांतील सर्व मोठमोठ्या शहरांतून सुरू झाल्या व हजारों कामगार या चळवळींत सामील होऊं लागले. १८६५–७५ पर्यंतच्या दहा वर्षांत वीस हजार कामगारांनीं शहरांतील निरनिराळ्या कारखान्यांत संप केले. १८८१ १८८५ हीं वर्षें उद्योगधंद्याच्या दृष्टीनें अत्यंत आणीबाणीचीं गेलीं. या काळांत रशियांत ठिकठिकाणीं संप झाले. या संपांतून ८०,००० वर कामगार सामील झाले होते. १८९० च्या सुमारास रशियांतील कारखान्यांची संख्या झपाट्यानें वाढत होती व दुसऱ्या बाजूला संपाची चळवळही चालू होती. १८९५ सालीं संपाच्या चळवळीनें पुन्हा डोकें

वर काढलें. या सालीं ४८,००० कामगारांनीं संपांत भाग घेतला. १८९६–९९ या सालांत रशियांत सर्वत्र प्रचंड संप झाले व त्यांत ४,३४,००० कामगारांनीं भाग घेतला. कामगारांच्या या संघटित चळवळीमुळें भांडवलवाला वर्गहि मेटाकुटीस आला व त्यानें कामगारांच्या पगारांत वाढ करण्याची कबूली दिली

रशियामध्यें याप्रमाणें प्रचंड चळवळी चालू होत्या आणि याच वेळीं लेनिन आपला विश्वविद्यालयीन अभ्यास पुढें चालविण्याकरितां काझान युनिव्ह-र्सिटींत दाखल झाला होता. तिसऱ्या अलेक्झांडर झारच्या खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल फांसावर चढलेल्या एका कटवाल्याच्या भावाला युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळाला हेंच आश्चर्य होतें. लेनिनवर पोलिसांचा साहजिकच वहीम होता. पण हेडमास्तरानें लेनिनसंबंधानें फारच चांगली शिफारस केली होती. लेनिननें आपल्या वर्गाच्या अभ्यासांत तर आपलें नांव गाज-विलें होतेंच, शिवाय शाळेच्या जिमखान्यांतील एक उत्तम खेळाडू म्हणून-ही त्याची प्रसिद्धि होती. याशिवाय लेनिनच्या बापानें मरेपर्यंत सर-कारची इमानें इतबारें सेवा केली होती. यामुळें त्या पुण्याईचाही लेनिन-ला या प्रसंगीं उपयोग झाला. लेनिन शाळेंत शिकत होता तेव्हांपासूनच नास्तिक झाला होता. शाळेंत विद्यार्थ्यांकडून कांहीं धार्मिक विधि करून घेण्यांत येत व कांहीं धर्मवचनें त्यांनीं पाठ केलीं पाहिजेत अशी त्यांच्या-वर सक्ति करण्यांत येई. शिवाय शाळेंतील शिक्षणपद्धतीही तात्या पंतो-जीला शोभेल अशीच जुनीपुराणी होती. लेनिनला या गोष्टी आवडत नसत. यावद्दल त्याचे व शाळेच्या हेडमास्तराचे वारंवार खटके उडत. तथापि या हेडमास्तराचें लेनिनवर प्रेम होतें या हेडमास्तराचें नांव एफ्. केरेन्सी असें होतें. १९१७ नोव्हेंबरमध्यें बोल्शेविकांनीं सत्ता काबीज केल्यानंतर विंटर राजवाड्यांतून पळून गेलेल्या केरेन्स्कीचा हा बाप होय.

या हेडमास्तराच्या वशिल्यानें व मिनतवारीनें काझान येथील युनि-व्हर्सिटींत लेनिनला प्रवेश मिळाला खरा, पण तो त्या ठिकाणीं फार दिवस राहूं शकला नाहीं. ता. १५ ऑगस्ट १८८७ रोजीं या युनि-व्हर्सिटीच्या लॉ कॉलेजमध्यें त्याला दाखल करण्यांत आलें. लेनिननें या कॉलेजांत अवघे चार महिने काढले. लेनिनचा स्वभाव जात्याच चळवळ्या

होता. तथापि अभ्यासाकडे त्यानें कधींच दुर्लक्ष केलें नाहीं. पुढील आयुष्यांत नांव काढावयाचें म्हणजे युनिव्हर्सिटीच्या चाकोरींतून गेलेंच पाहिजे, ही गोष्ट लेनिनसारख्या मध्यमवर्गीतील तरुणांस पूर्णपणें माहीत होती. काझान युनिव्हर्सिटींतील विद्यार्थी बहुतेक या मध्यमवर्गीतीलच होते आणि चळवळीपेक्षां अभ्यासाकडे ते जास्त लक्ष देत होते. पण रशियांतील राजकीय परिस्थिति झपाट्यानें बदलत चालली होती व रशियांत चालू असलेल्या गुप्त व उघड चळवळी हाणून पाडण्यासाठीं अंमलांत आणलेल्या दडपशाहीचा काच अर्थात् विद्यार्थीवर्गालाही लागला होता. विद्यार्थ्यांच्या हालचालींवर देखरेख ठेवण्यासाठीं जेव्हां इन्स्पेक्टर नेमण्यांत आले, त्यावेळीं सरकारच्या जुलुमाला तोंड देण्याकरितां रशियन विद्यार्थीही संघटित होऊं लागले. मास्को येथील विद्यार्थ्यांनीं प्रथम या चळवळीला तोंड पाडलें. सरकारी इन्स्पेक्टरांना बाहेर तोंड काढण्याचीही पंचाईत पडूं लागली. काझान युनिव्हर्सिटींतील विद्यार्थी अशा प्रसंगीं स्वस्थ कसे बसणार ? डिसेंबर १६ रोजीं नेहमींप्रमाणें इन्स्पेक्टर जेव्हां कॉलेजांत दाखल झाला त्यावेळीं विद्यार्थ्यांनीं त्याची हुर्यो केली व आपल्या मागण्यांचा मसुदा त्याच्यापुढें ठेवला. ज्या कायद्यामुळें विद्यार्थ्यांचें सर्व प्रकारचें स्वातंत्र्य नष्ट करण्यांत आलें होतें, तो रद्द करण्यांत यावा अशी मुख्य मागणी विद्यार्थ्यांनीं केली; इतकेंच नव्हें तर कॉलेजांतून नेमण्यांत आलेल्या इन्स्पेक्टरांना काढून टाकण्यांत यावें व देशाच्या राज्यपद्धतींत समूळ फेरबदल घडवून आणावा अशीही आपली मागणी त्यांनीं त्याच्यापुढें मांडली. दडपशाही करण्यास प्रवृत्त झालेले सरकारी अधिकारी विद्यार्थ्यांच्या या मागण्यांना थोडीच भीक घालणार !

दुसरे दिवशीं या कॉलेजच्या वसतिगृहावर पोलिसांनीं हल्ला चढविला व ४० विद्यार्थी गिरफदार करण्यांत आले. पोलिसांची एक तुकडी लेनिनच्या बिऱ्हाडींही गेली. लेनिन आपल्या आईसह तेथें रहात होता. थोरल्या मुलाला नुकतेंच फांसावर चढविण्यांत आलें होतें, आतां धाकट्या मुलालाही पोलिसांनीं पकडून नेलें, हें पाहून मरियाचें मन खचून गेलें. विद्यार्थ्यांना याप्रमाणें पकडून नेल्यानंतर या प्रकरणाची चौकशी होऊन तरुण लेनिनला कोकुश्किनो या त्याच्या आईच्या वतनाच्या

गांवीं अनियमित मुदतीपर्यंत स्थानबद्ध करण्याचा हुकूम सुटला.

इन्स्पेक्टर कॉलेजच्या आवारांत शिरल्याबरोबर ज्या विद्यार्थ्यांनीं त्याची हुर्यो केली त्यांत लेनिननें पुढारीपणा घेतला होता असें इन्स्पेक्टरचें म्हणणें होतें व या विद्यार्थ्याला पकडण्याबद्दल त्यानें पोलिसला मुद्दाम सांगून ठेवलें होतें. हा खटला मॅजिस्ट्रेटपुढें चौकशीकरितां आला त्या वेळीं हा सरकारी अधिकारीही तेथें हजर होता. लेनिनची चौकशी चालू असतां हा अधिकारी अरेरावीच्या स्वरांत म्हणाला, "तुम्ही तरुण लोकांनीं कसली ही गडबड चालविली आहे! भिंतीवर तुम्ही आपलें डोकें आपटून घेत आहां, हें तुम्हांला दिसत नाहीं."

"होय. ही भिंत आहे खरी; पण आंतून ती सर्व पोकळ झाली आहे. तिला थोडा धक्का द्या कीं ती कोलमडून पडेल." असें उत्तर लेनिननें त्यावेळीं दिलें.

या प्रसंगीं स्वतांला जें वाटलें तें तो स्पष्टपणानें बोलला. याशिवाय त्यानें दुसरा कोणताच गुन्हा केला नव्हता. अलेक्झांडर उलियानोव्हचा तो भाऊ होता, हाच त्याचा मोठा गुन्हा होता. कांहीं तरुण विद्यार्थ्यांच्या घोळक्यांत तोही होता. इतर विद्यार्थ्यांप्रमाणें त्यानेंही घोषणा केल्या व आपल्या स्वातंत्र्याच्या हक्काची मागणी केली. यापेक्षां त्यानें जास्त कांहींही केलें नव्हतें. पण या भयंकर (!) गुन्ह्याकरितां त्याला हद्दपार करण्यांत आलें. त्याच्या हद्दपारीचीं कारणें म्हणून सरकारी दप्तरांत जी नोंद करण्यांत आली आहे तींत असें लिहिलेलें आढळतें कीं, तो उद्धटपणानें वागतो; ज्या विद्यार्थ्यांबद्दल पोलिसांना संशय वाटतो अशा विद्यार्थ्यांशीं तो धूम्रपानगृहांत बोलत असतो, यामुळें तो कांहींतरी वाईट कृत्य करण्याचा विचार करीत असला पाहिजे असें सिद्ध होतें. कोकुश्किनो येथें असतांना त्यानें एकही दिवस फुकट घालविला नाहीं. आपला कायद्याचा अभ्यास त्यानें तसाच चालू ठेवला. मे महिन्यांत त्यानें आपली हद्दपारीची शिक्षा रद्द करण्यांत यावी व काझानशिवाय दुसऱ्या कोणत्याही युनिव्हर्सिटींत आपल्याला दाखल करण्यांत यावें असा त्यानें शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज केला. पण हा त्याचा अर्ज फेटाळण्यांत आला. कांहीं महिन्यांनंतर शिक्षणखात्याच्या मंत्र्याला त्याच्या आईनें एक खासगी पत्र पाठविलें. शाळाखात्यांत एका मोठ्या

हृद्द्यावर बरींच वर्षें आपल्या पतीनें सरकारची नोकरी बजावली आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन तरी आपल्या मुलाला युनिव्हर्सिटींत घ्यावें व त्याच्या अभ्यासाचें नुकसान करूं नये अशी तिनें विनंति केली. पण या विनंतीचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. आपल्या स्वतःच्या देशांत आपल्याला शिक्षण घेतां येत नाहीं, तेव्हां परदेशांत जाण्याची आपल्याला परवानगी मिळावी म्हणजे त्या ठिकाणीं आपल्याला शिक्षणक्रम पुरा करतां येईल असाही एक अर्ज लेनिननें सरकारकडे पाठविला. पण त्या अर्जालाही केराचीच टोपली दाखविण्यांत आली. पुढें आक्टोबरमध्यें लेनिनवरचा हद्दपारीचा हुकूम रद्द करण्यांत आला व त्याला काझानमध्यें राहण्याची परवानगी देण्यांत आली. काझान युनिव्हर्सिटींत मात्र त्याला दाखल करून घेण्यांत आलें नाहीं. पण काझान गांवांत कां होईना आपल्याला राहण्याची परवानगी मिळाली हें पाहून लेनिनला बरें वाटलें. काझान येथें आल्यावर पुन्हा त्यानें आपल्या अभ्यासाला झपाट्यानें सुरुवात केली. लेनिन आतां स्वयंशिक्षकच बनला होता. आपल्याला शिकवावयास कोणी असो वा नसो त्याचा विचार न करतां त्यानें युनिव्हर्सिटीचा दोन वर्षांचा कायद्याचा अभ्यासक्रम पुरा करण्याचें ठरविलें. सकाळ—दुपार कायद्याचा अभ्यास करावा व संध्याकाळीं समाजवादावरील व अर्थशास्त्रावरील निवडक पुस्तकें वाचावीं असें त्यानें ठरविलें. कार्ल मार्क्सच्या 'कॅपिटल' पुस्तकाचा पहिला भाग त्यानें याच दिवसांत अत्यंत लक्षपूर्वक वाचला. रशियांत यावेळीं हीं पुस्तकें मिळणें अत्यंत कठीण झालें होतें. तथापि मोठ्या प्रयत्नानें त्यानें मार्क्स व एंजल्स यांचीं सर्व प्रसिद्ध पुस्तकें मिळविलीं व वाचून टाकलीं.

मार्क्स व एंजल्स यांना रशियांतील परिस्थितीचें पूर्ण ज्ञान होतें. रशियन भाषा या दोघांनाही येत होती. रशियांत क्रांति होण्याचा संभव आहे असेंही त्यांना वाटत होतें व या दोघांनीं आपल्या पत्रव्यवहारांत यासंबंधानें बरीच चर्चा केलेली होती. जागतिक युद्ध झाल्यास त्यावेळीं रशियांत क्रांति होईल असें एका पत्रांत एंजल्सनें मार्क्सला लिहिलें होतें. कार्ल मार्क्स १८८३ सालीं वारला. एंजल्स अद्याप हयात होता. रशियांत व इतर युरोपीय देशांत चालू असलेल्या समाजवादी

चळवळीकडे त्याचें पूर्ण लक्ष होतें. लंडनमधील रीजंट पार्क रोड-वरील त्याचें घर म्हणजे युरोपियन सोशालिस्टांचें आश्रयस्थानच बनलें होतें. यामुळें जगांतील समाजवादी चळवळींशी तो संबंध ठेवूं शकत होता व कांहीं कांहीं प्रसंगीं आंतरराष्ट्रीय समाजवादी चळवळींत तो प्रत्यक्ष भागही घेत होता. जर्मन सोशल डेमोक्रॅट पक्षाचा तो पुढारी होता. फ्रेंच व ब्रिटिश सोशालिस्ट पुढाऱ्यांना योग्य सल्ला देण्याचें काम तो करीत होता आणि व्होल्गा नदीच्या किनाऱ्यावरील शहरांतून चालू झालेल्या चळ-वळींनाही तो पाठिंबा देत होता.

मार्क्सच्या 'कॅपिटल' ग्रंथाचें आणि मार्क्स व एंजल्स यांनीं तयार केलेल्या कम्युनिस्ट जाहीरनाम्याचें रशियन भाषांतर करण्यांत आलें होतें. प्रसिद्ध निःशासनवादी (अनार्किस्ट) रशियन पुढारी बाकुनिन व मार्क्स यांचा मतभेद झाला होता तरी त्या वेळच्या लोपॅटिन व व्हेरा झासुलिच वगैरे रशियन समाजवादी पुढाऱ्यांना मार्क्ससंबंधानें अत्यंत आदर वाटत होता.

रशियांतील कामगार चळवळीचा आद्य प्रवर्तक जॉर्ज प्लेखानोव्ह याच्याशीं तर मार्क्स व एजंल्स यांचा निकटचा संबंध होता. १८८२ सालीं जॉर्ज प्लेखानोव्हनेंच कम्युनिस्ट जाहीरनाम्याचें भाषांतर केलें. मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें रशियांतील सामाजिक परिस्थितीचें अध्य-यन प्लेखानोव्हनें केलें होतें. रशियांत भांडवलशाहीचें प्रस्थ वाढत चाललें असल्यामुळें रशियांतील कामगारवर्ग अधिकाधिक संघटित होत जाणें अपरिहार्य आहे असे विचार तो आपल्या लेखांतून प्रदर्शित करीत होता. प्लेखानोव्हनें १८८५ सालीं 'आमचे मतभेद' या नांवाचें एक पत्रक प्रसिद्ध केलें. पीपल्स पार्टीच्या (नारोड्निक्) लोकांचें आर्थिक व राजकीय धोरण व त्यांनीं स्वीकारलेला मार्ग कसा चुकीचा आहे, याचे विवेचन त्यानें या लेखांत केलें होतें. रशियांतून हद्दपार झालेल्या समाज-सत्तावादी तरुणांना संघटित करून प्लेखानोव्हनें रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना केली. १८८९ सालीं पॅरिस येथें झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेच्या (सेकंड इंटरनॅशनल) पहिल्या अधि-वेशनास रशियाचा प्रतिनिधी या नात्यानें तो हजर होता. या रीतीनें युरोपांतील इतर देशाप्रमाणें रशियांतही मार्क्सवादाचा प्रवेश झाला होता.

लेनिन काझान येथें असतांना मार्क्सवादाचा अभ्यास करणारीं विद्यार्थ्यांचीं अनेक अभ्यासमंडळें त्या ठिकाणीं स्थापन झालेलीं होतीं. या मंडळांचा प्रत्यक्ष कामकरी जनतेशीं कांहींच संबंध नव्हता. परदेशांतील चोरून मारून आणलेलीं पुस्तकें, मासिकें,जाहीरनामे, पत्रकें या मंडळांतील विद्यार्थी परस्परांना वाचून दाखवीत व त्यांवर चर्चा करीत. लेनिन यांपैकीं एकाही मंडळांत सामील झालेला नव्हता. रशियांतील त्यावेळचा प्रसिद्ध मार्क्सवादी एन. ई. फेडोसेयेव्ह हा या मंडळाचा सूत्रचालक होता. फेडोसेयेव्ह विद्वान् होता, तो चांगला लेखक व वक्ताही होता. रशियाच्या इतिहासावर त्यानें कांहीं पुस्तकेंही लिहिलीं होतीं. हीं पुस्तकें प्रसिद्ध करणें शक्य नसल्यामुळें त्याच्या हस्तलिखिताच्या प्रति करून त्या या निरनिराळ्या मंडळांतून वाचण्यांत येत. फेडोसेयेव्ह हा विद्यार्थ्यांच्या अभ्यासमंडळांतून समाजवादाचा एकीकडे प्रचार करीत असे, तर प्येस्कोव्ह नांवाच्या एका पाव भाजणाऱ्या कामगारानें काझान येथील कामगारांत त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याचें कार्य चालू ठेवलें होतें. पावाच्या कारखान्यांत सर्व दिवसभर तो राबत असे. आगीजवळ सारखें काम करावें लागल्यामुळें तो थकून जात असे. तथापि काम संपलें कीं कामगारवस्तींत तो जाई व त्यांच्या निरनिराळ्या गटांतून कामगारवाङ्मय वाचून दाखवी. विद्यार्थीमंडळांत काम करणाऱ्या फेडोसेयेव्हशींही त्याचा चांगला परिचय झाला होता. प्येस्कोव्ह हा फारसा शिकलेला नव्हता. काझान येथें तो चार वर्षें होता. या चार वर्षांत त्यानें जें काय वाचलें तेंच त्याचें शिक्षण. पण योगायोग असा कीं, लेनिन काझानला आला आणि प्येस्कोव्हला काझान सोडून जावें लागलें. तथापि या मधल्या अवकाशांत प्येस्कोव्ह व लेनिन यांचा थोडासा परिचय झाला होता. प्येस्कोव्हसारखा वर्गजागृत सामान्य कामगार आपल्या जातभाईंत कशी जागृति घडवून आणतो याची पूर्ण कल्पना लेनिनला या परिचयामुळें झाली होती. या दोन्ही मित्रांची भेट यानंतर बऱ्याच वर्षांनीं झाली. त्यावेळीं कारखान्यांत पाव भाजण्याचें काम करणारा हा प्येस्कोव्ह मॅक्झिम गॉर्की या नांवानें प्रसिद्धीस आला होता.

१८८९ मध्यें लेनिननें काझान सोडलें व तो समारा येथें राहावयास गेला. मध्यंतरीं कांहीं दिवस समाराजवळील अलाकेव्हका या खेड्यांत

तो राहिला होता. या खेड्यांत असतांनाच फेडोसेयेव्ह व त्याच्या विद्यार्थी-मंडळांतील पुष्कळ विद्यार्थी पकडण्यांत आल्याची बातमी त्याला समजली. या सर्वांना जबर शिक्षा देण्यांत आल्या. दोन वर्षें शिक्षा भोगल्यानंतर फेडोसेयेव्हला पूर्व सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें. फेडोसेयेव्ह तुरुंगांत असतांना त्याची भेट घेण्याचा लेनिननें अनेक वेळां प्रयत्न केला. पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. फेडोसेयेव्हला तुरुंगांतून बाहेर काढून सैबेरियाकडे नेण्यांत येत आहे असें त्याला कळल्यावरून या मार्गावरील व्लाडीमीर गांवापर्यंतही तो चालत गेला. पण येथेंही त्याची निराशा झाली.

समारा येथें असतांना लेनिननें समाजवादाचा अभ्यास तसाच चालू ठेवला होता. आर्थिक व सामाजिक दृष्टया रशियाची प्रत्यक्ष परिस्थिति काय आहे, हें समजून घेण्याकरितां समारा येथील सरकारी ग्रंथसंग्रहालयांतील सर्व सरकारी रिपोर्ट त्यानें वाचून टाकले. काझानप्रमाणें समारा येथेंही तरुणांचीं अनेक गुप्तमंडळें होतीं. 'लॅन्ड ॲन्ड फ्रीडम' (जमीन व स्वातंत्र्य) व पीपल्स पार्टी या पक्षांतील बरेच हद्दपार झालेले तरुणही समारा येथें होते. लेनिननें या चळवळ्या लोकांचा परिचय करून घेतला. अलेक्झांडर उलियानोव्हचा भाऊ म्हणून लेनिनला आपल्या मंडळांत घेण्यास हे लोक तयार होते. पण लेनिन त्यांच्या मंडळांत सामील झाला नाहीं. अनेक राजकीय व आर्थिक प्रश्नांच्या बाबतींत लेनिनचा या लोकांशीं मतभेद झाला.

अर्थशास्त्रावरील पुस्तकांचें अध्ययन केलें, सरकारी रिपोर्ट वाचले किंवा त्यांतील आंकडे गोळा केले तरी रशियांतील राबणाऱ्या वर्गाची प्रत्यक्ष परिस्थिति समजून यावयाची नाहीं, त्याकरितां या वर्गांतील लोकांतच मिसळलें पाहिजे, त्यांच्याशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलल्या पाहिजेत, त्यांच्या प्रत्यक्ष अडचणी काय आहेत हें पाहिलें पाहिजे असें लेनिनला वाटूं लागलें. लेनिननें आपलीं पुस्तकें कांहीं दिवस बाजूला ठेवलीं. समाराजवळील खेडेगांवांत तो जाऊन राहिला. तेथल्या शेतकरी मंडळींत तो मिसळला. या खेड्यांतून फिरत असतांना कुलक (श्रीमंत शेतकरी) व मजूर शेतकरी (कुळें) या सर्वांशीं तो प्रेमानें वागे. कुलकवर्गांतील शेत-

करी दिवसेंदिवस कसे डोईजड होत चालले आहेत हें त्याला यावेळीं प्रत्यक्षच पाहावयास सांपडलें. हे कुलक प्रत्यक्ष शेतावर राबत असले तरी सावसावकारी करून इतर गरीब शेतकऱ्यांच्या जमीनी ते बळकावीत व पूर्वी मालकी हक्कानें शेतावर कामें करणाऱ्या शेतकऱ्यांना मजूर बनवीत. अशीं कितीतरी उदाहरणें लेनिनला या प्रचारांत आढळून आलीं. लेनिन याप्रमाणें इतर गोष्टींत लक्ष घालीत होता तरी कायद्याच्या परीक्षा देऊन त्यांतील शेवटची पदवी मिळविण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें सोडलेली नव्हती. काझान व समारा येथें असतांना लेनिनच्या सर्व हालचालींवर गुप्त पोलिसांची नजर होतीच. काझान येथील धरपकडीच्या प्रकरणामुळें तर त्याच्यावर विशेष कडक नजर ठेवण्यांत आली. लेनिनला या सर्व गोष्टी माहीत होत्या तरी एक बाहेरचा विद्यार्थी म्हणून युनिर्सिटीच्या कायद्याच्या परीक्षेला बसण्याची परवानगी देण्याबद्दल त्यानें सरकारकडे अर्ज केला. त्याचा अर्ज अर्थात्च फेटाळण्यांत आला. पण त्याच्या आईनें या बाबतींत शिक्षणखात्याच्या दिवाणाची प्रत्यक्ष भेट घेतली व तिच्या मध्यस्तीनें १८९० सालीं या परीक्षेला बसण्याची त्याला परवानगी मिळाली. १८९१ च्या उन्हाळ्यांत तो पीटर्सबर्गला गेला व तेथील कायद्याच्या सर्व परीक्षांत तो चांगल्या रीतीनें पास झाला. नोव्हेंबरांत कायद्याच्या परीक्षेंत पास झालेल्या विद्यार्थ्यांना डिप्लोमा देण्यांत आला त्या वेळीं सेंट पीटर्सबर्ग युनिव्हर्सिटीनें त्याला पहिल्या वर्गाचा डिप्लोमा दिला.

हा डिप्लोमा मिळाल्यानंतर लेनिननें समारा येथें वकिलीच्या धंद्याला सुरुवात केली. लेनिनचे पक्षकार नेहमीं गरीब शेतकरी, कामकरी व कारकून असायचे. लेनिननें चालविलेल्या खटल्यांत त्याला क्वचित्च यश येई. न्यायमंदिरांतून झालें तरी श्रीमंतांची चलती असायची, गरीबांना कोणी विचारावयाचें नाहीं व त्यांना न्यायही मिळायचा नाहीं. वकिलीचा धंदा चालवितांना लेनिनला अनेक प्रसंगीं वरील अनुभव आला व त्याचें मन खिन्न झालें.

लेनिनचें वय यावेळीं २२ वर्षांचें होतें. तो शरीरानें धडधाकट होता. तो फारसा उंच नव्हता किंवा ठेंगणाही नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर दाढीमिशी नुकतीच डोकें वर काढूं लागली होती. त्याचे केंस

तांबूस होते. कपाळ विशाल होतें. त्याची दृष्टि सूक्ष्म होती. तो नेहमी गंभीर व विचारांत गढलेला असा दिसे. त्याच्या चेहऱ्यावर नेहमींच स्मित झळकत असे. पण तें उपरोधिक होतें. वकिलीची परीक्षा पास झाल्यानंतर लेनिन समारा येथें जवळ जवळ एक वर्ष राहिला. समारा प्रांत हा रशियांतील एका बाजूचा प्रांत आहे. या भागांत राहून अगदीं एकलकोंडें जीवन कंठण्याचा त्याला साहजिकच कंटाळा आला. त्याच्या चळवळ्या स्वभावाला तें आवडलें नाहीं. आपण ज्या कार्याला आरंभ करूं पहात आहों त्या कार्याच्या दृष्टीनें समारा गांव फारच बाजूला आहे असें त्याला वाटूं लागलें. याच सुमारास चेखोव्हचें 'वॉर्ड नं. ६' या नांवाचें पुस्तक त्याच्या हातीं पडलें. हें पुस्तक वाचल्यानंतर समारादेखील आपल्याला 'वॉर्ड नं. ६' सारखाच वाटूं लागला आहे, असें त्यानें आपल्या बहिणीपाशीं बोलून दाखविलें.

समारा येथें असतांना उलियानोव्ह कुटुंबावर एक आपत्ति आली. लेनिनची बहीण ओल्गा पीटर्सबर्ग येथें वैद्यकीचा अभ्यास करीत होती. रोग्याची शुश्रूषा करतांना तिला सन्निपातज्वराची बाधा झाली व त्यांतच ती मरण पावली. ओल्गा अत्यंत प्रेमळ व हुशार मुलगी होती. या आपत्तीमुळें लेनिनच्या आईच्या अंतःकरणाला जबरदस्त धक्का बसला. बहीण आजारी पडलेली ऐकतांच लेनिन पीटर्सबर्गला गेला होता. तेथून आल्यानंतर या कुटुंबांतील मंडळींनीं मास्कोला जाण्याचें ठरविलें. लेनिनच्या धाकट्या भावाला मास्कोच्या विद्यालयांत प्रवेश मिळाला होता व त्याचें शिक्षण होईपर्यंत मास्कोलाच राहावें असा लेनिनच्या आईचाही विचार होता. लेनिनला हा बेत पसंत पडला नाहीं. मास्को म्हणजे एक मोठें खेडेगांवच आहे असें लेनिनला वाटलें. १८९० सालचें मास्को तसेंच होतें. उलियानोव्ह कुटुंबांतील बाकीची सर्व मंडळी मास्कोला गेली व लेनिननें सेंट पीटर्सबर्गकडे आपला मोर्चा वळविला.

---

# कार्यारंभ

कोकुश्किनो येथील हद्दपारीच्या दिवसांत आणि काझान व समारा येथें वकिलीचा अभ्यास करीत असतांना मार्क्स व एंजल्स यांचीं पुस्तकें लेनिननें वाचलीं. काझान व समारा येथें 'जमीन व स्वातंत्र्य' पक्षाचीं व दहशतवाद्यांचीं लहान लहान तरुणमंडळें होतीं. पण यांपैकीं कोणत्याच मंडळाशीं लेनिनचें फारसें पटलें नव्हतें. शेतकरीवर्गाची संघटना करून त्यांना क्रांतीकरितां प्रवृत्त करावयाचें असें दहशतवादी पुढाऱ्यांपैकीं कांहीं पुढारी म्हणूं लागले होते. काझान व समारा येथें असतांना शेतकरीवर्गाच्या संघटनेसंबंधाच्या प्रश्नांचा विचार लेनिननें केला होता व या भागांतील खेडेगांवांतून फिरून शेतकरीवर्गाची प्रत्यक्ष परिस्थितीही त्यानें पाहिली होती. तेव्हां देशांतील शेतकरीवर्ग व्हावा तसा संघटित होऊं शकत नाहीं व प्रत्यक्ष परिणामकारी चळवळीच्या दृष्टीनेंही त्याचा फारसा उपयोग होऊं शकत नाहीं, असें त्याला आढळून आलें होतें. यामुळें रशियांतील मोठमोठ्या शहरांतून झपाट्यानें वाढत चाललेल्या कामकरीवर्गाचीच संघटना करणें अधिक श्रेयस्कर आहे, असें लेनिनला निश्चितपणें वाटूं लागलें व म्हणूनच तो पीटर्सबर्गला येऊन राहिला. पीटर्सबर्गसारख्या मोठ्या राजधानीच्या शहरांत आल्यानंतर लगेच कामकरीसंघटनेच्या आपल्या कामास सुरुवात करणें लेनिनला शक्य झालें नाहीं. पोलिसचे हेर हात धुवून त्याच्या मागें लागले होते. त्याच्या सर्व बारीकसारीक हालचालींवर पोलिसची नजर होती. यामुळें पीटर्सबर्ग येथें आल्यावर त्यानें तेथील स्थानिक वकीलमंडळांत प्रवेश मिळविला व व्हॉल्केन्स्टिन नांवाच्या प्रसिद्ध वकिलाबरोबर त्याचा एक सहाय्यक या नात्यानें काम करण्यास सुरुवात केली. पीटर्सबर्ग येथें आल्यावर लेनिननें वकीलीच्या धंद्याला पुन्हा सुरुवात केली खरी, पण हा सर्व वरकरणीं देखावा होता. त्याचें लक्ष धंद्याकडे नव्हतें. पीटर्सबर्ग येथें आल्यानंतर

आपल्या नियोजित कार्याला कशी सुरुवात करावयाची, हें त्यानें ठरविलें होतें.

१८९३ च्या सप्टेंबरमध्यें लेनिन पीटर्सबर्गला येऊन राहिला; पण पुढें लवकरच नाताळच्या सुट्टींत त्याला मास्कोला जावें लागलें. नाताळचा सण त्यानें मास्को येथें आपल्या नातेवाइकांत आनंदानें घालविला. आणि याच ठिकाणीं पीपल्स पार्टीच्या धोरणाचा निषेध करून मार्क्सवादाचा उघड उघड पुरस्कार करण्याची संधि त्याला मिळाली. रशियांतील खरा क्रांतिकारक पक्ष म्हणजे पीपल्स पार्टी—पाप्युलिस्ट पक्ष—होय, अशी रशियन तरुणांची परंपरागत समजूत होती. या समजुतीमुळें रशियांतील तरुणवर्गाच्या चळवळीची वाढ खुंटली होती.

नाताळच्या सणांतच एके दिवशीं मास्को येथील पाप्युलिस्ट पक्षाच्या मंडळाची एक सभा पक्षाच्या 'मास्को रूम'मध्यें भरली होती. या सभेस लेनिनला निमंत्रण देण्यांत आलें होतें. या सभेंतील मुख्य वक्ता पी. व्ही. व्होरोन्ट्सेव्ह हा होता. पाप्युलिस्ट पक्षांतील एक प्रसिद्ध लेखक व मार्क्सवादावर कडक टीका करणारा अशी त्याची प्रसिद्धी होती. सोशल रेव्होल्यूशनरी पार्टीचा पुढारी म्हणून पुढें प्रसिद्धीस आलेला व केरेन्स्कीच्या हंगामी सरकारच्या कारकीर्दींत शेतकीखात्याचा दिवाण झालेला व्हिक्टर चेर्नोव्ह हाही या सभेस हजर होता. लेनिनला सहजगत्या या सभेस बोलावण्यांत आलें होतें. तेथें जमलेल्या मंडळींशीं त्याची ओळखही नव्हती.

व्होरोन्ट्सेव्हचें भाषण झाल्यावर लेनिन बोलावयास उठला व त्यानें या भाषणावर सडकून टीका केली. व्होरोन्ट्सेव्ह लेनिनपेक्षां वयानें बराच मोठा होता व विद्वान्ही होता. पण या पोक्तपणाचा व विद्वत्तेचा लेनिनवर कांहीं परिणाम झाला नाहीं. उगाच शब्दांची लटपट करून वेळ मारून न्यावयाची ही गोष्ट लेनिनला माहीत नव्हती. लेनिननें या सभेंत ज्या तत्त्वांचा निर्भीड व स्पष्टपणानें पुरस्कार केला तीं त्याला पूर्णपणें पटलेलीं होतीं. मार्क्सवादाचा त्यानें पूर्ण अभ्यास केला होता. आपण जीं विधानें करणार त्यांचा शास्त्रीयरीत्या पुरस्कार करण्याकरितां त्यानें आंकडेवार व साधार

माहिती जमा केली होती. या सर्व सामुग्रीच्या जोरावर लेनिननें त्या विषयीं भाषण केलें व पाप्युलिस्ट पक्षाच्या विचारसरणीचा व धोरणाचा त्यानें धुव्वा उडविला. दहशतवादी पक्षाच्या धोरणामुळें देशाच्या प्रगतीचा मार्ग पूर्णपणें खुंटला आहे, अशी त्याची खात्री झाली होती. यामुळें त्याच्या जहाल टीकास्त्रापुढें या पक्षापैकीं कोणताही पुढारी टिकाव धरूं शकत नव्हता.

लेनिनच्या या जहाल पण विद्वत्तापूर्ण भाषणामुळें सभेंत जमलेल्या दोन्ही पक्षांच्या लोकांवर परिणाम झाला. एक कट्टा विरोधक निर्माण झाला म्हणून पीपल्स पार्टीच्या दहशतवादी लोकांना दहशत बसली व मास्को व पीटर्सबर्गमधील मार्क्सवाद्यांना आपल्या पक्षाला एक चांगला कर्तृत्ववान् पुढारी मिळाल्याबद्दल आनंद वाटला. पण असल्या चर्चामंडळांतून आपल्या मतांचें समर्थन करण्यांत आलें एवढ्यानें लेनिनचें समाधान होण्याजोगें नव्हतें. १८९४ मध्यें लेनिननें या पक्षाच्या तत्त्वांचें खंडन करणारा एक विस्तृत व चर्चात्मक प्रबंध लिहिला. "भांडवलदारी पद्धतीची वाढ रशियांत होत आहे ही गोष्ट रशियाच्या अवनतीस कारणीभूत होत आहे. भांडवलशाहीच्या वाढीमुळें ग्रामिक लोकसत्ताक पद्धतीचा नाश होत आहे. तेव्हां भांडवलशाहीला आळा घालणें जरूरीचें आहे. रशियांतील शेतकरी-पंचायत व लहान लहान उद्योगधंद्यावर आधारलेली समाजरचना हा रशियाचा विशेष असून त्याची ही विशिष्ट संस्कृति नष्ट होतां कामा नये. रशियांतील बुद्धिमान् वर्गांतील लोक इतिहासाला इष्ट तें वळण लावून देण्यास व समाजांतील निरनिराळ्या अर्थोत्पादक वर्गांचें हितरक्षण करण्यास समर्थ आहेत." अशी या पाप्युलिस्ट पार्टीचीं मुख्य तत्त्वें होतीं. रशियांतील बदलत चाललेल्या परिस्थितीला विरोधविकासवादाची कसोटी लावून पाप्युलिस्ट पक्षाच्या वरील तत्त्वांचें त्यानें चांगलेंच खंडन केलें. रशियांत भांडवलदारी पद्धतीची वाढ करण्यांत आली पाहिजे, असें लेनिनचें म्हणणें नव्हतें. युरोप व अमेरिकेप्रमाणें रशियांतही या पद्धतीचा अवलंब करणें जरूरीचें आहे, असें लेनिन सांगत नव्हता; तर रशियांत या पद्धतीची कशी वाढ होत चालली आहे, हें त्यानें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें. रशियन भांड-

वलशाहीची वाढ होणें हें जसें अपरिहार्य आहे, त्याचप्रमाणें या पद्धतींतून कामगारवर्ग निर्माण होणें हेंही अपरिहार्य आहे. कामगारवर्ग एकदां वाढूं लागला म्हणजे तो स्वस्थ बसणें शक्य नाहीं. ज्या मातेच्या उदरांतून तो निर्माण झाला तिलाच तो खाऊन टाकील व शेवटीं समाजसत्तात्मक क्रांति घडवून आणील ही गोष्टही तितकीच अपरिहार्य आहे, असें लेनिननें या 'लोकांचे मित्र' नांवाच्या वरील प्रबंधांत दाखविलें आहे.

रशियांत लिहिलेला लेनिनचा हा पहिला ग्रंथ होय. इतकेंच नव्हे तर मार्क्सवादावर सुसंगतपणें लिहिलेला रशियांतील हाच पहिला ग्रंथ होय. रशियांतील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा या पुस्तकांत विचार करण्यांत आला आहे. तत्त्वज्ञानीय, ऐतिहासिक व आर्थिक दृष्टीनें या सर्व प्रश्नांचा विचार करून मार्क्सवादाचा प्रसार होणें हाच त्यावर एकच एक उपाय आहे असें लेनिननें या पुस्तकांत दाखवून दिलें आहे. रशियाच्या त्या वेळच्या परिस्थितींत शास्त्रीय समाजवादाचा अवलंब करून त्याच्या अनुरोधानें राजकीय चळवळ चालविणाऱ्या एका स्वतंत्र पक्षाची कशी आवश्यकता आहे, ही गोष्ट लेनिननें या पुस्तकांत निःसंदिग्धपणें मांडली आहे. रशियांतील समाजवादी तरुणांनीं प्रस्थापित केलेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या सर्व कार्यक्रमाला लेनिननें या पुस्तकांत अर्थात्च उचलून धरलें आहे. मास्को, पीटर्सबर्ग वगैरे रशियांतील मोठमोठ्या शहरांतून वरील पक्षाची मंडळी काम करीत असत. लेनिनची विचारसरणी सडेतोड, निस्संदिग्ध व प्रतिपक्षाला निरुत्तर करणारी अशी होती. यामुळें लेनिन या पक्षाचा लवकरच पुढारी बनला. शेतकरीसमाजाची संघटना करून व दहशतवादाचा अवलंब करून राज्यक्रांति घडवून आणूं पाहणाऱ्या जुन्या क्रांतिकारकांचा मार्ग कसा चुकीचा आहे, ही गोष्ट लेनिननें या पुस्तकांत दाखवून दिली व रशियांतील तरुण मंडळींवर असलेलें जुन्या क्रांतिकारकांचें वजनही त्यानें कमी केलें.

हें पुस्तक रशियांत उघडपणें छापणें व प्रसिद्ध करणें शक्यच नव्हतें. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील बेकायदेशीर वाङ्मय प्रसिद्ध करणाऱ्या मंडळानें हें पुस्तक छापण्याचें काम अंगावर घेतलें. या मंडळांत गॅनाशन नांवाचा विद्यार्थी प्रमुख होता. पीटर्सबर्गमध्यें हें पुस्तक अशा रीतीनें छापण्याची

त्यानें खटपट करून पाहिली पण त्याला ती गोष्ट शक्य झाली नाहीं. नंतर तो मास्कोला गेला. त्या ठिकाणीं त्याला गुप्तरीतीनें कामें करणारा एक लहानसा छापखाना मिळाला. पण ज्या कंपॉझिटरनें हें काम करण्याचें कबूल केलें त्यानें आयत्या वेळीं हातपाय गाळले. गनाशननें नंतर मास्को सोडलें व तेथून दीडशें मैलांवर असलेल्या एका खेड्यांत लिथोग्राफवर त्यानें हें पुस्तक छापून घेतलें.

या पुस्तकावर अर्थातच ग्रंथकाराचें नांव घालण्यांत आलें नव्हतें. पीटर्सबर्ग, मास्को वगैरे शहरांतून या पुस्तकाचा गुप्तपणें प्रसार होऊं लागला तेव्हां गुप्त पोलिसांच्या हातींही या पुस्तकाच्या कांहीं प्रति लागल्या. पण हें पुस्तक कोणी छापलें व तें कोठें छापलें याचा मुळींसुद्धां पत्ता लागला नाहीं. पुस्तक वाचून गुप्त पोलिसखात्यानें सरकारकडे त्यासंबंधाचा पुढीलप्रमाणें रिपोर्ट केला.

"समाजवादावर अगदीं नवीन धर्तीचें हें पुस्तक लिहिलें आहे. श्रमजीवी वर्गाची गाऱ्हाणीं दूर करून घेऊन भांडवलवाल्या लोकांचें वजन कमी करावें व हळूहळू समाजवादाची प्रस्थापना करावी, ही सुधारणावाद्यांची विचारसरणी या पुस्तकांत खोडून काढली आहे. देशांतील कामगारवर्ग हाच खरा क्रांतिकारी वर्ग असून वर्गजागृतीच्या तत्त्वावर त्याची संघटना केली पाहिजे. रशियांतील एकतंत्री सत्ता नष्ट करून तिच्या जागीं समाजवादी सत्ता प्रस्थापित करावयाची असेल तर या क्रांतिकारी वर्गाची संघटना करणें हाच त्यावर उपाय आहे, असें या पुस्तकांत म्हटलें आहे."

मार्क्सवाद हा एक सांप्रदायिक वाद आहे, असें लेनिनला कधींसुद्धां वाटलें नाहीं· मार्क्सचे ग्रंथ पवित्र आहेत. त्यांच्यावर केवळ भाष्य करावें व त्या तत्त्वांबरहुकूम अगदीं तंतोतंत वागावें अशी लेनिनची समजूत नव्हती. सभोंवारची परिस्थिति लक्षांत घेऊन शास्त्रीय समाजवादाच्या दृष्टीनें तिच्यांत कसा बदल घडवून आणला पाहिजे व जुनी अस्वाभाविक समाजरचना नष्ट करून तिच्या जागीं स्वाभाविक व सर्व समाजाला हितकारक अशी नवी समाजरचना कशी निर्माण करावी, हें मार्क्सनें सांगितलें

आहे. तेव्हां मार्क्सच्या एकंदर तत्त्वज्ञानाचा केवळ सांप्रदायिक रीत्या विचार न करतां, त्यांतील त्याचा शास्त्रीय दृष्टिकोन स्पष्टपणें डोळ्यांपुढें ठेवूनच विचार करावा व समाजांतील वस्तुस्थितीला केव्हांही डोळ्यांआड होऊं देऊं नये असें लेनिनचें मत होतें. अशा व्यापक, स्वतंत्र व उदार दृष्टीनें लेनिननें 'लोकांचे मित्र' हें पुस्तक लिहिलें होतें. यामुळें ज्यांनीं हें पुस्तक वाचलें त्यांना तर त्यानें वेडें करून सोडलें. रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील मंडळी तर या पुस्तकाला धर्मग्रंथाप्रमाणें मानूं लागली. कार्ल मार्क्सचें 'कॅपिटल' हें समाजवाद्यांचें बायबल आहे असें मानण्यांत येतें असें म्हणतात. शास्त्रीय समाजवादाचा व विरोधविकासवादाचा पुरस्कार करणाऱ्या मार्क्सला आपलें 'कॅपिटल' हें पुस्तक बायबल म्हणून मानलें जावें ही कल्पना कधींच पसंत पडली नसती. कार्ल मार्क्स काय किंवा लेनिन काय हे दोघेही विरोधविकासवादी होते. शास्त्रीय समाजवादाचा ते पुरस्कार करीत होते. आपल्या मतांना एकाद्या धर्मपंथाचें किंवा सांप्रदायाचें स्वरूप प्राप्त होऊं नये अशी त्यांना इच्छा असणें स्वाभाविक होतें. तथापि मनुष्यस्वभावच शेवटीं बलवत्तर ठरला व मार्क्सच्या कॅपिटल ग्रंथाला कम्युनिस्ट पार्टीचे लोक मान देऊं लागले व लेनिनचें 'लोकांचे मित्र' हें पुस्तक रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील तरुण मंडळींचें 'गॉस्पेल' (धर्मग्रंथ) बनलें. बुद्धीचें महत्त्व कमी झालें व श्रद्धेचें स्तोम माजलें म्हणजे कोणत्याही थोर पुरुषाचीं मतें कितींही उदात्त व सात्त्विक असलीं तरी त्यांचे पुढें येणारे शिष्य त्या मतांवर अनेक प्रकारचीं भाष्यें लिहूं लागतात. या शिष्यमंडळांत अर्थात् मतभेद माजतात. मार्क्सवादही या सामान्य सिद्धान्ताला अपवाद कसा ठरणार ! लेनिनचा सहकारी व प्रसिद्ध कर्तबगार समाजवादी प्लेखानोव्ह यानें मार्क्सच्या मतांवर उत्तम भाष्यें लिहिलीं; ही गोष्ट लेनिनला अर्थात्च आवडली नाहीं. मार्क्सच्या मतांचा भाष्यकार होण्यापेक्षां त्याचीं मतें प्रत्यक्ष आचरणांत आणावीं व श्रमजीवी वर्गाची प्रचंड संघटना करून त्यांना क्रांतीकरितां उद्युक्त करावें, हीच त्याची उत्कट मनीषा होती. 'लोकांचे मित्र' हें पुस्तक त्यानें याच उद्देशानें लिहिलें व भावी क्रांतीच्या चळवळींत कामगारवर्ग कसा पुढाकार घेईल व तो या क्रांति-

युद्धांत कसा यशस्वी होईल हें त्यानें या पुस्तकांत दाखवून दिलें. या पुस्तकांतील पुढील उताऱ्यावरून लेनिनच्या या विचारसरणीची योग्य कल्पना आल्याशिवाय राहणार नाहीं. "कारखान्यांतून काम करणाऱ्या कामगारवर्गाची संघटना करण्याकडेच सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील लोक आपल्या सर्व शक्ति खर्च करतात. रशियन कामगारवर्गांतील कामगार पुढाऱ्यांना शास्त्रीय समाजवादाचीं तत्त्वें पूर्णपणें समजलीं पाहिजेत. हीं तत्त्वें त्यांनीं आत्मसात् केलीं पाहिजेत. भावी इतिहासांत आपल्याला कोणतें महत्त्वाचें कार्य करावयाचें आहे याची त्यांना जाणीव झाली पाहिजे. त्यांची मतें व्यापक झालीं पाहिजेत. आज जो आर्थिक झगडा विस्कळित रीतीनें चालला आहे त्याला स्थिर व संघटनात्मक वर्गकलहाचें स्वरूप कसें द्यावें हें त्याला समजलें पाहिजे. या दृष्टीनेंच सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची तरुण मंडळी कामगारवर्गांत जागृति करण्याचें काम करीत असतात. रशियन कामगारवर्गाची अशा तऱ्हेची तयारी झाली म्हणजे तो साहजिकच एकतंत्री राज्यसत्ता उलथून पाडण्याच्या कामीं चालू असलेल्या राजकीय चळवळींतही पुढाकार घेईल व कम्युनिस्ट क्रांतियुद्धांत यशस्वी होईल."

लेनिनचें वय या वेळीं अवघें चोवीस वर्षांचें होतें. श्रमजीवी जनतेला संघटित करून तिला क्रांतीकरितां उद्युक्त करावयाचें असा कार्यक्रम त्यानें आंखलेला होता. त्या वेळच्या परिस्थितींत असला कार्यक्रम आंखून त्याप्रमाणें काम करीत राहणें अत्यंत कठीण होतें. या मार्गांत अनेक प्रकारच्या अडचणी होत्या; पण त्या सर्वांतून लेनिननें आपला मार्ग काढला. जगांतील कोणत्याहि राजकीय पुढाऱ्यानें असला प्रचंड उद्योग केलेला नाहीं.

लेनिन मार्क्सचा एकनिष्ठ शिष्य होता. "वर्गजागृत झालेला एक कामगार व्याख्यानें झोडणाऱ्या वीस पुढाऱ्यांपेक्षां अधिक काम करतो." असें लेनिन म्हणत असे. म्हणूनच पीटर्सबर्गमध्यें असतांना कामगारवर्गांत जागृति करण्याच्या प्रत्यक्ष कामाला त्यानें हात घातला. लेनिनला या कामांत सहकाऱ्यांची जरूरी होतीच. आपल्यासारखेच विचार करणारे व काम करूं इच्छिणारे कोण कोण आहेत हें पाहण्याकरितां पीटस-

बर्गचे सर्व रस्ते व शहरांतील सर्व भाग त्यानें धुंडून काढले. यावेळीं पीटर्स-बर्गमध्यें मार्क्सवाद्यांचे दोन गट काम करीत होते. या दोन्ही गटांत अर्थात् सर्व तरुण मंडळी होती. त्यापैकीं एक गट अत्यंत गुप्तपणें काम करीत होता. शाळा व कॉलेजांतील तरुण विद्यार्थ्यांना मार्क्सवादाचीं तत्त्वें समजावून देण्याकरितां या गटांतील तरुणांनीं शहरांतील अनेक भागांत अभ्यास–केंद्रें काढलीं होतीं. उद्योगशाळांतील व विद्यापीठांतील विद्यार्थी व शाळांतील शिक्षक या केंद्रांतून जाऊन मतप्रचाराचें काम करीत होते. लेनिनची भावी पत्नी क्रुप्सकाया ही या मंडळींतच काम करीत होती. या गटांतील मंडळी लेनिनला आपला पुढारी मानीत असत. आपलें हें मतप्रचाराचें काम यापेक्षांही कितीतरी मोठ्या प्रमाणांत वाढविलें पाहिजे व शहरांतील सर्व विचारी तरुणांना एकत्र व संघटित करून त्यांना आपल्यासारखेंच काम करावयास लावलें पाहिजे, हें लेनिनचें म्हणणें या गटांतील मंडळींना मान्य झालें व त्या दृष्टीनें शहरांतील मार्क्सवादी तरुणांना संघटित करण्याचे कामीं लेनिनला त्यांनीं मदतही केली. मार्क्सवादाचीं तत्त्वें मध्यम स्थितींतील बुद्धिमान् तरुणांना समजावून देणें ज्याप्रमाणें आवश्यक आहे त्यापेक्षांही कारखान्यांतील कामगार-वर्गांत या तत्त्वांचा प्रसार होणें अधिक महत्त्वाचें आहे, हें लेनिननें या गटांतील मंडळींना पटवून दिलें व त्या दिशेनें काम करण्यास त्यांना प्रवृत्त केलें. पीटर्सबर्गमध्यें मार्क्सवादाचा प्रसार करूं पाहणाऱ्या या गुप्तमंडळाकडून अद्याप फारशी कामगिरी झालेली नव्हती. 'लोकांचे मित्र' हें लेनिनचें पुस्तक त्यांनीं गुप्तपणें छापलें व त्याचा सर्वत्र गुप्तपणें प्रसारही केला, एवढेंच काय तें काम त्यांनीं केलें होतें. आपल्या पक्षाचें एक नियतकालिक असेंच गुप्तरीतीनें छापून त्याचा प्रसार करण्याचें लेनिनच्या मनांत होतें. या गटांतील तरुणांनीं लेनिनला आपला पुढारी बनविलें होतें व तो सांगेल तें काम करण्यास ते तयार होते. याच वेळीं सेंट पीटर्सबर्गमध्यें कामगारवर्गांत संघटनेचें काम करणारा आणखी एक तरुणांचा गट होता. ट्रेड यूनियनच्या तत्त्वांवर कामगारसंघटनेचें काम हा गट करीत होता. लेनिननें या गटाशींही संगनमत केलें होतें. पीटर्सबर्गमधील कांहीं कारखान्यांतील कामगारांचे पगार कमी करण्याचा

प्रयत्न कारखान्यांच्या मालकांनीं केला. मालकांच्या या हल्ल्याला या तरुण मंडळींनीं कामगारसंघटनेच्या जोरावर नेटानें तोंड दिलें व त्यांत त्यांना यश मिळालें. या कायदेशीर व उघड चळवळीमुळें कामगारवर्ग व या गटांतील तरुण मंडळी यांचे संबंध वाढत चालले. कामगारांना या मंडळीबद्दल विश्वासहि वाटूं लागला. मार्क्सवादाचा गुप्तपणानें प्रचार करणारीं मंडळीं आपलें प्रचाराचें कार्यक्षेत्र वाढवूं पाहात होतीं. ट्रेड यूनियनची चळवळ करणाऱ्या वरील तरुण मंडळींशीं लेनिननें सहकार्य केलें व कामगारवर्गांतही मोठ्या प्रमाणावर मतप्रचार करण्यास सुरुवात केली.

एखादा तरुण शिकलेला मुलगा कामगाराशीं बोलत आहे असें आढळलें कीं, पीटर्सबर्गमधील पोलिस त्याचा पिच्छा पुरवीत असत. शहरांतील कामगारवर्गांत कायदेशीर रीतीनेंच संघटनेचें काम सुरू होतें तरी या चळवळीकडे पोलिसचे अधिकारी साशंक दृष्टीनें पहात होते. अशा स्थितींत आपलें प्रचाराचें काम लेनिनला व त्याच्या अनुयायांना फारच जपून करावें लागे. हल्लींच्या भांडवलशाहीच्या दिवसांत पीटर्सबर्गसारख्या मोठमोठ्या शहरांच्या लोकवस्तींत दोन भाग पडलेले दिसून येतात. सेंट पीटर्सबर्ग शहर या नियमाला अपवाद नव्हतें. या शहराच्या मध्यभागीं मोठमोठ्या राजवाड्यासारख्या इमारती, विंटर पॅलेस, सीनेटमधील लोकांचे राजवाडे, आरमारी खात्यांतील अधिकाऱ्यांचे प्रशस्त व भव्य बंगले होते. या भागांतील रस्ते रुंद, स्वच्छ व प्रशस्त होते. या भागांत राहणाऱ्या लोकांच्या सुखसोयींची काळजी घेण्यांत आलेली होती. या लोकांकरितां मोठमोठीं ग्रंथसंग्रहालयें, नाटकगृहें, क्रीडांगणें, बाग व इतर करमणुकीच्या जागा निर्माण करण्यांत आल्या होत्या. पण शहराचा हा भाग सोडला व शहरालगत असलेल्या वस्तीकडे पाहिलें म्हणजे तेथें अगदींच निराळा प्रकार आढळून येत असे. तेथील सर्व इमारती एक मजली होत्या. रस्ते अरुंद व अस्वच्छ होते. सर्वत्र घाण पसरलेली, दिवाबत्तीचीही चांगली सोय नाहीं, तेथें इतर सुखसोयींची व करमणुकीच्या साधनांची व्यवस्था कोठून आढळणार ! पण रशियांत मतप्रचार करूं पाहणाऱ्या समाजवादी तरुणांनीं या दोन्ही भागांत आपलें काम चालू ठेवलें होतें. सुशिक्षित, बुद्धिमान् वर्गांतील तरुणांचे अभ्यासाचे वर्ग चांगल्या भव्य

दिवाणखान्यांतून व कधीं कधीं सार्वजनिक लायब्ररींतून भरत असत आणि कामगार वस्तींतील अभ्यासाचे वर्ग गल्लयाकुच्च्यांतून, हॉटेलांतून किंवा कारखान्याच्या मागच्या बाजूस मोकळ्या पडलेल्या जागांतून भरत असत. आपल्या तरुण समाजवादी सहकाऱ्यांनीं कामगारवर्गांत अगदी मोकळ्या मनानें मिसळावें, त्यांच्यांत मतप्रचाराचें काम करावें, सद्यःस्थितीचें त्यांना ज्ञान करून द्यावें, आपल्या जन्मसिद्ध हक्कासंबंधानें त्यांच्यांत जागृति निर्माण करावी व त्याबरोबरच कामगारांची प्रत्यक्ष परिस्थिति काय आहे हें समजून घेण्याकरितां आंकडेवार माहितीही मिळवावी असें लेनिनचें सांगणें होतें. या कामाकरितां तो स्वतः कामगारवस्तींत फिरत असे. कारखानदारांच्या हस्तकांची व पोलिसाची नजर चुकवून लेनिनला व त्याच्या सहकाऱ्यांना हें काम करावें लागे. हें काम करतांना लेनिन नेहमीं वेषांतर करी. कामगार वापरतात असा साधा पोषाख तो करीत असे. लेनिनचा पोषाख, त्याचा वर्ण, त्याची बोलण्याची पद्धति हीं सर्व या बहुजनसमाजांतील लोकांना साजेशीं अशींच होतीं. त्याचा पिवळसर चेहरा व घोगरा व दणगट आवाज ऐकला म्हणजे कामगारांना हा आपल्यापैकींच एक आहे असें वाटत असे. आपल्या प्रेमळ व मनमिळाऊ वर्तनानें लेनिन कामगारवर्गांत अत्यंत लोकप्रिय झाला होता. एकाद्या कारखान्यांत कांहीं थोडीशी गडबड झाली असें समजलें कीं, लेनिन त्याठिकाणीं धांवत जात असे. तेथील कामगारांना एकत्र जमवून त्यांची गाऱ्हाणीं समजून घेत असे. कारखान्यांतील स्त्री कामगारांत व मुलींत संपासंबंधानें तो चर्चा करूं लागला म्हणजे लेनिनवरील त्यांचें प्रेम द्विगुणित होई व त्याचें म्हणणें त्या लक्षपूर्वक ऐकत. लेनिनच्या गटांतील कांहीं मंडळी कारखान्यांत मजूर म्हणून काम करीत होतीं. तसेंच क्रुप्सकाया व गटांतील इतर तरुण स्त्रिया कामगार स्त्रियांत मिसळून त्यांच्यांत मतप्रचाराचें काम करीत होत्या. कारखान्यांत सुट्टीच्या वेळीं ठिकठिकाणीं लहान लहान गट जमवून त्यांच्याशीं ही मंडळी चर्चा करीत. गटातर्फे प्रसिद्ध झालेलीं पत्रकें त्यांच्यांत वाटीत. तसेंच चाळीचाळींत फिरून तेथेंही अशाचप्रकारचें काम करीत. कामगारांकडे गेले म्हणजे ते कोणतें काम करतात, त्यांच्या कामांत कोणत्या अडचणी आहेत, कारखान्यांतील काम कसें चाललें आहे, धंदा जोरांत चालू

आहे कीं खालावत चालला आहे, कामगारांना मजुरी काय मिळते, त्यांच्या घरची स्थिति काय आहे, आपल्या परिस्थितीसंबंधानें ते कधीं विचार करतात किंवा नाहींत, त्यांना काय वाटतें, ते कोणतीं पुस्तकें वाचतात वगैरे अनेक प्रश्न त्यांना विचारावे. व त्यांच्यासंबंधाची सर्व माहिती गोळा करावी, असें लेनिन आपल्या सहकाऱ्यांना सांगत असे.

"कामगारांबरोबर बोलूं लागलें म्हणजे झारविरुद्ध किंवा प्रचलित सरकारविरुद्ध एकदम कांहींतरी बोलूं नये. आपली स्थिति सुधारायची असेल तर देशाच्या परिस्थितींत बदल घडून येणें किती जरूर आहे, कामगार-चळवळीचा व राजकीय चळवळीचा किती निकट संबंध आहे हें त्यांना समजावून द्यावें. पोलिस, मॅजिस्ट्रेट वगैरे सर्व अधिकारी नेहमीं कारखानदारांचाच कसा कैवार घेतात व त्यांनाच कशी मदत करतात हें त्यांना सांगावें. कामगारांसंबंधाचा एकादा कायदा झाला तर त्यामुळें कामगारांच्या हितसंबंधांचे कितपत रक्षण होईल व कारखानदारांना कितपत फायदा घेतां येईल, हें सर्व त्यांना स्पष्ट करून सांगावें. सरकारच्या मंत्रिमंडळासंबंधानें किंवा एखाद्या मंत्र्याच्या कारभारासंबंधानें बोलावयाचें झाल्यास अगदीं नेमस्तपणानें बोलावें. झारचा तर या बाबतींत मुळींसुद्धां उल्लेख करूं नये. कामगारवर्गांत मतप्रचाराचें काम करीत असतांना संपाची भाषा वारंवार बोलूं नये. भांडवलशाही नष्ट करण्याकरितां किंवा प्रचलित समाजपद्धतींत क्रांति घडवून आणण्याकरितां ठिकठिकाणीं संप केले पाहिजेत असली भाषाही वारंवार बोलूं नये. संपासंबंधानें असली पोकळ भाषा पुनःपुन्हा बोलल्यानें संपाचें महत्त्वही कमी होतें." लेनिनची शिकवण व त्याची प्रत्यक्ष काम करण्याची पद्धति वरील प्रकारची होती.

बोल्शेव्हिकांनीं लेनिनच्या या शिकवणीचा व कार्यपद्धतीचा स्वीकार केला म्हणूनच रशियांत राज्यक्रांति करतां आली. रशियांतील या अत्यंत कर्तृत्वशाली पक्षाच्या स्थापनेचा मूळ पाया १८९५ च्या वसंतऋतूंत सेंट पीटर्सबर्ग येथें घालण्यांत आला. रशियांतील एका मोठ्या राजधानींत अशा रीतीनें कामास सुरुवात झाली हें पाहून लेनिनला फार समाधान

वाटलें व यानंतर परदेशांत जाऊन राहिलेल्या रशियन समाजवाद्यांची संघटना करण्याच्या कामाला त्यानें हात घातला. स्वदेशांतून हद्दपार झाल्यामुळें परदेशांत जाऊन राहावें लागलें तरी प्लेखानोव्हसारख्या पुढाऱ्यांनीं कामगारवर्गाच्या स्वातंत्र्याचें आपलें नियोजित कार्य पुढें चालविलें होतें. तेव्हां परदेशांत काम करणाऱ्या या पुढाऱ्यांबरोबर संबंध ठेवणें इष्ट वाटल्यावरून लेनिननें स्विट्झर्लंड, जर्मनी वगैरे देशांतून एकदां फेरी मारून येण्याचें ठरविलें. पण रशियांतून बाहेर पाऊल टाकायचें कसें ? लेनिनसारख्या चळवळ्या इसमाला सहजासहजीं पासपोर्ट मिळणें शक्य नव्हतें. अमुक एका विषयाचा अभ्यास करण्याकरितां आपण परदेशांत जात आहों, असें निमित्त पुढें केलें असतें तर सरकारी अधिकाऱ्यांनीं तें सुळींसुद्धां ऐकलें नसतें. पण सुदैवानें त्याला त्याच वेळीं एक निमित्त सांगतां आलें. फुप्फुसांत सूज आल्यामुळें तो यावेळीं आजारी पडला. तेव्हां या रोगांतून मुक्त होण्याकरितां व हवापालट करण्याकरितां स्विट्झर्लंडला जाणें भाग आहे असें अधिकाऱ्यांना कळविल्याबरोबर त्याला पासपोर्ट मिळण्यास फारशी अडचण पडली नाहीं. वाटेंत साल्झबर्ग येथें कांहीं दिवस मुक्काम करून तो नंतर स्विट्झर्लंडला गेला. जिनिव्हा येथें तो प्लेखानोव्हच्या घरींच उतरला होता; पण या ठिकाणीं लेनिन किती दिवस होता, प्लेखानोव्ह व लेनिन यांच्यांत काय बोलणें झालें, दोघांचीं मतें एकमेकांच्या मतांशीं कितपत जुळलीं हें बाहेर आलें नाहीं. येथून तो झ्यूरिचला गेला. प्लेखानोव्हचा निर्वासित बंधु ॲक्सेलरॉड हा त्याला त्या ठिकाणीं भेटला. लेनिन परदेशांत आल्यापासून त्याच्यामागें गुप्त हेरांचा ससेमिरा होताच. तसेंच रशियांतून किंवा इतर देशांतून हद्दपार झालेले जे देशभक्त स्विट्झर्लंडमध्यें रहात होते त्यांच्यावरही या गुप्त हेरांची सारखी टेहळणी होती. तेव्हां ही कटकट टाळण्याकरितां ॲक्सेलरॉड व लेनिन डोंगराळ मुलखांतील एका खेडेगांवांत जाऊन राहिले. या ठिकाणीं या दोन्ही देशभक्तांनीं अनेक विषयांवर चर्चा केली. एकतंत्री सत्तेपासून रशियाला मुक्त करण्याकरितां रशियांत आज जे अनेक प्रागतिक पक्ष काम करीत आहेत त्यांच्याशीं संगनमत करून झारच्या सरकारला एकजुटीनें तोंड द्यावयाचें कीं नाहीं, हाच या दोघां कार्यकर्त्यांमधील चर्चेचा

मुख्य विषय होता. राजकीय चळवळींत भाग घेणाऱ्या प्रागतिक पक्षांच्या लोकांबद्दल लेनिनला अत्यंत तिटकारा वाटत असे. या पक्षांशीं सहकार्य करून आपल्याला कामगारवर्गाच्या पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय साध्य करतां यावयाचें नाहीं अशी लेनिनची पक्की खात्री झाली होती. तथापि देशांतील सर्व पक्षांनीं एकजूट होऊन झारच्या सरकारशीं लढण्याचें ठरविलें तर त्याचाही इष्ट तो परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं, ही गोष्ट ॲक्सेल-रॉडशीं झालेल्या चर्चेंत त्याला पटली व आपलें पूर्वीचें धोरण बदलण्यास लेनिन तयार झाला. पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें आपलें ठाम झालेलें मत सोडून द्यावयाचें ही गोष्ट सामान्य नाहीं. पण लेनिननें निरहंकारवृत्तीनें आपल्या मतांत इष्ट तो फरक केला हें पाहून ॲक्सेलरॉडला फारच आश्चर्य वाटलें. रशियांत वाढत चाललेल्या तरुण समाजवादी पक्षाचा लेनिन पुढारी होता; पण अशा पुरुषानें दुसरे काय म्हणतील याची पर्वा न करतां आपलें मत बदललें व आपल्या सहकाऱ्यांना त्याचें महत्त्व पटवून देण्याचें ठरविलें हें पाहून एक्सेलरॉडच्या मनांतील लेनिनबद्दल असलेला आदर द्विगुणित झाला.

लेनिन याप्रमाणें इतर पक्षांशीं सहकार्य करण्यास तयार झाला तरी या संयुक्त प्रतिकाराचा त्यानें निराळ्याच प्रकारें फायदा घेतला. या बाब-तींत कामगारपक्षाचें वजन यत्किंचित्‌ही कमी न होईल किंवा कामगार-चळवळीच्या मूलभूत तत्त्वांना धक्का न लागेल अशी पूर्ण खबरदारी त्यानें घेतली. यापुढें ८।१० वर्षांनंतर रशियांतील राजकीय चळवळीला मूर्त स्वरूप आलें, त्या वेळीं लेनिनचें हें कट्टर धोरण प्लेखानोव्ह व ॲक्सेलरॉड यांना पसंत पडलें नाहीं.

स्विट्झर्लंडमधील आपला प्रवास आटोपून लेनिन पॅरिसमध्यें आला. कार्ल मार्क्सचा जांवई पॉल लाफार्ग याची त्यानें या ठिकाणीं भेट घेतली. मार्क्सची आवडती मुलगी लॉरा व जांवई लाफार्ग हीं दोघेंही कट्टर समाज-सत्तावादी होतीं. १८७१ सालीं पॅरिसमध्यें झालेल्या क्रांतीच्या चळवळींत लाफार्गनें बराच मोठा भाग घेतला होता. तेव्हां रशियांतील चळवळी-संबंधानें लाफार्गशीं चर्चा करणें व त्याचा या बाबतींत सल्ला घेणें लेनि-

नला अत्यंत आवश्यक वाटलें. लाफार्ग व लेनिन या दोघांमध्यें या विषया-संबंधानें बरेच दिवस चर्चा चालू होती. "मार्क्सवाद रशियांतील कामगारांना समजूं लागला आहे," असें लेनिननें या प्रसंगीं सहज एकदां म्हटलें.

"समाजसत्तावादी चळवळ गेलीं वीस वर्षे आम्ही करीत आहों तरी आम्हांला मार्क्सचें म्हणणें पूर्णपणें समजलें नाहीं. तेव्हां रशियन कामगारांना तें कसें काय समजणार ?" लाफार्ग म्हणाला. या दोघांमधील हा संवाद त्या वेळीं या ठिकाणींच थांबला.

जर्मनींत गेल्यानंतर कॉट्स्कीची गांठ पडली. त्या वेळीं लेनिनला लाफार्गच्या वरील शब्दांची आठवण झाली. प्रथम कट्टर मार्क्सवादी म्हणवून घेणारा कॉट्स्की पुढें कसा बदलला हें लेनिननें पाहिलें. मार्क्सवाद पुस्तकांतून शिकावयाचा नसतो; भाराभर पुस्तकें वाचून तो समजत नाहीं किंवा पार्लमेंटांत जाऊन अनेक डावपेच लढविले तरी मार्क्सवाद अंमलांत आणल्यासारखें होत नाहीं, हें लाफार्गचें म्हणणें लेनिनला पटलें. कामगारवर्गांत मिसळून त्यांचीं गाऱ्हाणीं व दुःखें काय आहेत हें समजून घ्यावें व हीं गाऱ्हाणीं दूर कशीं करावयाचीं हें त्यांना शिकवून त्यांची संघटना करावी. मार्क्सवादाचें हेंच रहस्य होय. मार्क्सवादाचा प्रचार करावयाचा असल्यास वरील धोरणानेंच काम केलें पाहिजे, ही गोष्ट परदेशांतील समाजवादी निर्वासित बंधूनाही लेनिन सांगत होता.

लाफार्गची भेट घेतल्यानंतर लंडनला जाऊन एंजल्सचीही भेट घ्यावी असें लेनिनच्या मनांत होतें. पण ता. ५ ऑगस्ट १८९५ रोजीं त्याचें देहावसान झाल्याची बातमी लेनिनला समजली. त्यामुळें तिकडे जाण्याचें त्यानें रहित केलें. एंजलसच्या मरणानंतर लेनिननें त्याच्या कामगिरीसंबंधीं एक लेख लिहिला. एंजल्सच्या मरणामुळें समाजवादी चळवळीचा एक एकनिष्ठ मित्र नाहींसा झाला, असें या लेखाच्या शेवटीं लेनिननें म्हटलें आहे. कार्ल मार्क्सचें मत कोणाला कितपत समजलें असेल यासंबंधानें लाफार्गला नेहमीं संशय वाटत होता; पण लेनिनचा हा लेख वाचल्यानंतर मार्क्सवाद पूर्णपणें समजलेला एक तरी मनुष्य युरोपमध्यें आहे, अशी लाफार्गची खात्री झाली असली पाहिजे असें म्हणतात.

लेनिन बर्लिनमध्यें होता त्यावेळीं त्यानें आपल्या आईला खुशालीचें पत्र पाठविलें. हें पत्र वाचून लेनिनच्या आईला फार बरें वाटलें व लेनिन परदेशांत आहे तेंच चांगलें आहे; त्या ठिकाणीं त्याला अटक होण्याची तरी भीति नाहीं, असें तिला वाटलें. पण त्याच्या आईचें हें समाधान फार दिवस टिकलें नाहीं. लेनिन बर्लिनहून पीटर्सबर्गला येण्याकरितां निघाला. सप्टें-बरच्या ६ तारखेस (१८९५) त्यानें पीटर्सबर्गला जाण्याची तयारी केली. त्यानें आपली ट्रंक भरली. एखाद्या सामान्य ट्रंकेसारखी त्याची ट्रंक नव्हती. त्याच्या ट्रंकेला खालीं आणखी एक खण तयार करण्यांत आला होता. परदेशांत मिळविलेलें सर्व मार्क्सवादाचें वाङ्मय त्यानें त्या खणांत लपवून ठेवलें होतें. पीटर्सबर्गला आल्यानंतर तेथील कस्टम खात्यांतील लोकांनीं त्याची कसून झडती घेतली, पण त्यांना या खणाचा पत्ता लागला नाहीं. या झडतींतून तो अगदीं सुरक्षितपणें पार पडला.

पीटर्सबर्गला आल्यानंतर त्यानें एक भाड्याची जागा घेतली व पुन्हा आपला वकीलीचा धंदा सुरू करण्याचें त्यानें ठरविलें. वकीलीचा धंदा करणें, पैसा मिळविणें व स्वतःचा संसार सुखाचा करणें हें लेनिनच्या आयुष्याचें ध्येय नव्हतें. वकीलीचा धंदा हा केवळ वरचा थाटमाट होता. स्वदेशांतील परिस्थिति पाहून व परदेशांतील समाजवादी पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन यापुढें कोणत्या विशिष्ट धोरणानें काम करावयाचें, हें लेनिननें आपल्या मनाशीं नक्की ठरविलें होतें व त्याप्रमाणें पीटर्सबर्गला आल्या-बरोबर त्यानें आपल्या कार्यक्रमाला हात घातला.

सेंट पीटर्सबर्ग व रशियांतील इतर शहरें यांतील समाजवादी तरुणांना संघटित करून त्यांचा एक स्वतंत्र पक्ष बनवावा असें प्लेखानोव्ह व ॲक्सेलरॉड यांनीं लेनिनला सांगितलें होतें व लेनिनलाही ही गोष्ट मान्य झाली होती. पीटर्सबर्गला आल्याबरोबर तेथें आपल्या पूर्वींच स्थापन केलेल्या 'सोशल डेमोक्रॅटिक' पक्षांतील समाजवादी तरुणांशीं या बाबतींत चर्चा करून हा पक्ष अधिक संघटित व व्यापक करण्याचें लेनिननें व त्याच्या सहकाऱ्यांनीं ठरविलें. या कामाकरितां व्हिल्ना, मास्को, ओरेखोवो, इव्हेवो वगैरे गिरण्यांची केंद्रें असलेल्या शहरांतून त्यानें एक दौरा काढला. या शहरांतून काम

करणाऱ्या समाजवादी तरुणांच्या त्यानें भेटी घेतल्या. लेनिनला हीं सर्व कामें अर्थात् गुप्तपणानेंच करावीं लागलीं. लेनिनला या दौऱ्यांत एक चांगला अनुभव आला. रशियांत औद्योगिक प्रगति झपाट्यानें होत होती, सर्वत्र मोठमोठाले कारखाने निघत होते आणि त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून रशियांतील वर्गकलहाला तीव्र स्वरूप येत चाललें होतें. रशियांतील श्रमजीवी वर्ग व सुखवस्तु वर्ग यांच्या राहणींत झपाट्यानें अंतर पडत चाललें होतें, तसेंच या दोन्ही वर्गांच्या हितसंबंधांतही झपाट्यानें अंतर पडत चाललें होतें, ही गोष्टही लेनिनला या दौऱ्यांत स्पष्टपणें कळून चुकली होती. ॲक्सेलरॉडला सांकेतिक लिपींत एक पत्र लिहून त्यानें ही गोष्ट कळविली. युरोपमधून प्रवास करून आल्यानंतर आपण रशियांत कोणती कामगिरी केली व रशियांतील परिस्थिति संघटनेला कशी अनुकूल आहे हेंही त्यानें त्या पत्रांत लिहून कळविलें.

दौरा संपवून पीटर्सबर्गला परत आल्यानंतर तेथील थॉर्न्टन् कंपनीच्या गिरण्यांतील कामगारांना उद्देशून एक पत्रक काढण्याचें लेनिननें ठरविलें. या गिरण्यांतून काम करणाऱ्या कामगारांची खरी परिस्थिति काय आहे हें समजावून घेऊन त्याच्या आधारावर हें पत्रक काढण्याचें त्यानें योजिलें होतें. या बाबतींत क्रुप्सकायाची त्याला फार मदत झाली. तसेंच मार्टोव्ह व क्रिझिझानोव्हस्की यांनींही या कामीं लेनिनला मदत केली. मार्टोव्ह मात्र यापुढें लेनिनच्या पक्षांत टिकून राहिला नाहीं. तो त्याचा प्रतिस्पर्धी झाला व मेन्शेव्हिकांचा पुढारी बनला. क्रिझिझानोव्हस्की मात्र लेनिनबरोबर शेवटपर्यंत काम करीत राहिला. क्रांति घडवून आणल्यानंतर रशियांत आपण सर्वत्र वीज खेळवूं व तिच्या शक्तीवर खेड्यांपाड्यांतून अनेक धंदे चालवूं असे पुष्कळ मनोरथ लेनिननें क्रांतीपूर्वी केले होते. लेनिनचे हे मनोरथ क्रिझिझानोव्हस्कीनें पूर्ण केले.

या पत्रकाची सर्व तयारी झाल्यावर तें गुप्तपणें छापण्यांत आलें व प्रसिद्धही करण्यांत आलें. कामगारवर्गांत जागृति करण्याकरितां एखादें नियतकालिक काढण्याची लेनिनची पुष्कळ दिवसांची इच्छा होती व त्याप्रमाणें 'कामगारांचें ध्येय' (वर्कर्स कॉज) या नांवाचें वृत्तपत्रही काढण्याचें

ठरविण्यांत आलें. वरील पत्रक व त्याकरितां जमविण्यांत आलेली इतर पुष्कळ माहिती या नियतकालिकाकरितांही उपयोगी पडली.

याप्रमाणें लेनिनच्या कामाच्या व्याप जसजसा वाढूं लागला तसतशी त्याच्यावरची गुप्त पोलिसांची टेहळणीही अधिकाधिक वाढूं लागली. तेव्हां साध्या पोषाखांत आपल्याभोंवतीं घिरट्या घालणाऱ्या या लोकांच्या हातावर तुरी देण्याचें कार्य यापुढें लेनिनला करावें लागलें. लेनिननें हें कामही मोठ्या शिताफीनें केलें. जे लोक बाहेर राहून टेहळणी करतात त्यांना कसेंही चुकवितां येतें; पण असे हेर प्रत्यक्ष काम करणाऱ्या मंडळींतच शिरल्यावर त्यांना चुकवून आपलीं कामें करीत राहणें अत्यंत कठीण असतें ही गोष्ट पुढें त्याच्या अनुभवास आली.

पीटर्सबर्गमध्यें गुप्तपणें मतप्रचार व संघटनेचें काम करणारा एक प्रौढ मंडळींचा गट होता, तसेंच कायद्याच्या कक्षेत राहून कामगारसंघटनेचें काम करणारा दुसरा एक तरुण मंडळींचा गट होता हें मागें सांगितलेंच आहे. वरील प्रौढ मंडळींत कोणत्याही हेराचा कोणत्याही मिषानें प्रवेश होणें शक्य नव्हतें. पण उघडपणें काम करणाऱ्या मंडळींत मात्र मिखाइलोव्ह नांवाच्या एका हेरानें आपला प्रवेश करून घेतला होता. कामगारवर्गांत गुप्त रीतीनें पत्रकें वांटीत असतांना मिखाइलोव्हला व त्याच्या साथीदारांना पकडण्यांत आलें होतें. या लोकांवर झालेल्या खटल्याचा निकाल झाला त्यावेळीं मिखाइलोव्हच्या साथीदारांना सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें, पण मिखाइलोव्हला मात्र मुक्त करण्यांत आलें. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील मंडळींना मिखाइलोव्हचा प्रथमपासूनच संशय आला होता व तो वरील प्रकरणामुळें अधिकच बळावला. मिखाइलोव्हनें आपला विश्वासघात केला आहे ही गोष्ट लेनिनला व त्याच्या साथीदारांना समजली व आपल्याला यापुढें लवकरच पकडण्यांत येणार अशी लेनिनची खात्री झाली. लेनिननें ही गोष्ट आपल्या बहिणींना कळविली; पण त्याच वेळीं त्यानें ही बातमी आपल्या आईला कळवूं नये अशी सूचना त्यानें दिली होती. आपल्याला पकडलें म्हणजे आईनें पीटर्सबर्गला यावें व तुरुंगांत आपल्या अनेक सोयी करून देण्याबद्दल शहरांतील आपल्या ओळखीच्या अधिकाऱ्यांच्या घरीं तिनें पायपिटी करावी, ही गोष्ट लेनिनला पसंत नव्हती.

१८२५

आपल्या सुखसोयीकरतां आईनें त्याच्यापायीं अनेक दगदगी, अपमान व कष्ट सोसावे, हें त्याला बरें वाटलें नाहीं.

आपल्यावर उगाच वहीम घेण्यांत येत आहे असा मिखाइलोव्हनें कांगावा केला व आपल्यावरील हा वहीम पुराव्यानिशीं सिद्ध करून द्यावा असें त्यानें मार्टोव्हला आव्हान दिलें. पार्टीच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मिखाइलोव्हच्या या प्रकरणाची पंचांपुढें चौकशी करण्यांत आली व मिखाइलोव्ह पोलिसचा गुप्त हेर आहे हें पुराव्यानें सिद्ध करण्यांत आलें.

मिखाइलोव्हच्या या प्रकरणानंतर पार्टीतील सर्व मंडळी सावध झाली. ‘ कामगारांचें ध्येय ’ या वर्तमानपत्राचा पहिला अंक काढण्याची यावेळीं सर्व तयारी झाली होती. लेनिननें सर्व मजकूर लिहून त्याची एक नक्कल त्यानें वान्येव्हच्या स्वाधीन केली व दुसरी नक्कल क्रुप्सकायाला दिली. या नकलांशिवाय इतर कागदपत्र व सामग्री नष्ट करण्यांत आली.

क्रुप्सकायाच्या बिऱ्हाडीं हा मजकूर सर्वांनीं काळजीपूर्वक वाचला. या मजकुरांत ज्या कांहीं थोड्या दुरुस्त्या करावयाच्या होत्या त्या वान्येव्हनें कराव्या आणि सकाळीं वान्येव्हकडून ही दुरुस्त केलेली नक्कल घेऊन ती छापण्याची व्यवस्था करावी, असें ठरविण्यांत आलें होतें. पण दुसरें दिवशीं सकाळीं वान्येव्हच्या बिऱ्हाडीं जाऊन ही नक्कल आणण्यापूर्वींच वान्येव्ह व लेनिन या दोघांना पकडण्यांत आलें (ता. ९ डिसेंबर १८९५).

शहरांत चळवळ करणाऱ्या समाजवादी तरुणांच्या पुढाऱ्यांनाच पकडल्यामुळें ही चळवळ नष्ट होईल अशी पोलिसची कल्पना होती; पण ती चुकीची ठरली. लेनिनप्रभृति पुढाऱ्यांनीं तयार केलेलीं पत्रकें छापण्यास सरकार बंदी करतें व या पुढाऱ्यांनीं असलीं पत्रकें लिहूं नये म्हणून सरकार त्यांना तुरुंगांत टाकतें असें पाहून पीटर्सबर्गमधील खुद्द कामगारवर्गांतीलच पुढाऱ्यांनीं एक पत्रक लिहून तयार केलें व तें त्यांनीं लेनिनच्या मार्गें काम करणाऱ्या तरुण सुशिक्षित मंडळींकडे छापून प्रसिद्ध करण्याकरितां दिलें. या पत्रकांतील मजकूर फार जहाल होता. पीटर्सबर्गमधील कामगारांना न झेपतील अशा कार्यक्रमांचा ऊहापोह या पत्रकांत केला होता. पण प्रत्यक्ष कामगारांनींच हें पत्रक तयार केलेलें असल्यामुळें पार्टी-

मधील बुद्धिमान् तरुणांना त्याचा स्वीकार करणें भाग पडलें. कामगारांनीं प्रत्यक्ष राजकीय चळवळींतही यापुढें भाग घेणें अत्यंत जरूरीचें आहे, असें या पत्रकांत म्हटलें होतें.

लेनिन व त्याचा दोस्त वान्येव्ह या दोघांना बंद कोठडींत (लॉकअप्‌मध्यें) ठेवण्यांत आलें. एखाद्या इसमाला संशयावरून अटक केल्यानंतर त्याला लॉकअप्‌मध्यें विनाचौकशी किती दिवस डांबून ठेवावयाचें याला रशियांत कांहीं धरबंध नव्हता. लेनिनला या तुरुंगांत १४ महिने रहावें लागलें. लेनिनला पकडल्यानंतर तीन आठवड्यांनीं पोलिसखात्याचा मुख्याधिकारी लेफ्टनंट कर्नल क्लिकोव्ह यानें त्याची जबानी घेतली. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीशीं त्याचा संबंध आहे कीं नाहीं, कारखान्यांतून वांटलीं जाणारीं पत्रकें त्यानेंच लिहिलीं कीं नाहीं, विशेषतः संपासंबंधानें विस्तृत विवेचन केलेलें पत्रक कोणीं लिहिलें, इत्यादि सर्व प्रश्नांस त्यानें नकारार्थी उत्तरें दिलीं. संपासंबंधाचें पत्रक लेनिनच्या खोलींतच सांपडलें होतें. हें पत्रक त्या ठिकाणीं सहज-गत्या पडलें होतें. एका इसमाकडून आपण तें सहज वाचण्याकरितां आणलें होतें, असें या पत्रकासंबंधाच्या प्रश्नाला त्यानें उत्तर दिलें. लेनिननें आपल्या सर्व जबानींत कोणाचींही नांवें सांगितलीं नाहींत. पीटर्सबर्ग-मधील कोणत्याही राजकीय पक्षाशीं आपला कांहींच संबंध नाहीं; पण आपल्या परिचयाच्या माणसांचीं नांवें आपण कांहीं केल्या सांगणार नाहीं असें त्यानें स्पष्टपणें सांगितलें. परदेशांतून येतांना आपण कांहीं पुस्तकें आणलीं; पण त्या सर्वांचीं नावें आपल्याला माहीत नाहींत. 'वव्हेरियां-तील कामगारवर्गाची स्थिति', 'कामगार कायद्यावरील टीकात्मक ग्रंथ' व बायझॅकची एक कादंबरी एवढींच पुस्तकें आपल्याला आठव-तात, असें तो आपल्या जबानींत म्हणाला. परदेशांतून आणलेल्या प्रसिद्ध ट्रंकेसंबंधानेंही या अधिकाऱ्यांनीं अनेक प्रश्न विचारले. या ट्रंकेसंबंधानें पोलिसांना वहीम आला असला पाहिजे अशी कल्पना लेनिनच्या डोक्यांत चमकून गेली. ही ट्रंक आपल्यापाशीं आतां नाहीं, ज्याची होती त्यानें नेली, असें त्यानें सांगून टाकलें. यानंतर एप्रिल, मे व जून या महिन्यांत त्याच्याकडून आणखी माहिती काढण्याचा प्रयत्न करण्यांत आला; पण याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. या जबानीच्या वेळीं एक पत्र व तार

लेनिनला दाखविण्यांत आली. पण हें पत्र आपण पाहिलें नाहीं व तार कोणाची आहे हें तर आपल्याला मुळींच माहीत नाहीं, असें त्यानें सांगितलें. उलट लोकांचा पत्रव्यवहार याप्रमाणें फोडून पाहावा या पोलिसांच्या गैरकायदेशीरपणाबद्दल त्यानें पोलिसखात्याला दोष दिला. रशियांत येण्यास बंदी झाल्यामुळें परदेशांत जाऊन राहिलेल्या लोकांशीं आपला कांहींच संबंध नाहीं, प्लेखानोव्ह कोणत्या शहरीं राहतो हें आपल्याला माहीत आहे; पण त्याच्याशीं आपला परिचय नाहीं, असें त्यानें उत्तर दिलें.

कच्च्या कैदेमध्यें असतांना बाहेरच्या मित्रमंडळींशीं लेनिनला गुप्त पत्रव्यवहार करतां येईल अशी व्यवस्था करण्यांत आली होती. पहिली जबानी झाल्यानंतर लेनिननें क्रुप्सकायाला सांकेतिक भाषेंत एक गुप्त पत्र पाठविलें. मास्को येथें आपल्या घराची झडती घेण्यांत आल्यास आपल्या दोन तळ असलेल्या ट्रंकेसारखी एक ट्रंक विकत घेऊन ठेवावी, असें आपल्या बहिणींना कळवावें असें क्रुप्सकायाला पाठविलेल्या या पत्रांत लेनिननें लिहिलें होतें. कच्च्या कैदेमध्यें असतांना लेनिनला ज्या खोलींत ठेवण्यांत आलें होतें ती खोली १० फूट लांब, ५ फूट रुंद व ६ फूट उंच होती. खोलीच्या मागच्या बाजूला एक गजाची खिडकी होती व तीतून आकाशाचा कांहीं भाग दिसत होता. खोलीच्या एका कोपऱ्यांत मलमूत्रविसर्जनादि देहधर्मांकरितां टिनचें झांकण असलेला एक कुंडा ठेवण्यांत आला होता. भिंतीला लागून लोखंडाची एक खाट होती. गवताची एक चटई त्याच्यावर आंथरण्यांत आली होती. एक उशी, एक ब्लँकेट व एक करड्या रंगाची चादर या खाटेवर ठेवण्यांत आली होती. तुरुंगांत उपयोगांत आणित असलेल्या कृमिनाशक द्रव्यांचा या कपड्यांना वास येत होता. पाणी पिण्याकरितां एक टिनपॉट, जेवणाकरितां एक टिनची थाळी, एक लाकडी चमचा, लाकडी कांटा व एक मडकें एवढें सामान लेनिनच्या या खोलींत होतें. लेनिन रोज सकाळीं आपल्या खोलीची फरशी चांगली जोरजोरानें चोळून धुवून काढीत असे. खोलीची फरशी धुण्याची सक्ति राजबंद्यांवर करण्यांत येत नसे; पण लेनिनला कांहीं तरी व्यामाम करणें आवश्यक वाटत होतें व आपली खोली ज्याला स्वच्छ ठेवतां येत नाहीं तो मनुष्य कसला असें त्याला वाटत

असे. म्हणून तो हें काम स्वतः होऊन करी. लेनिनची प्रकृति जात्या कणखर असली तरी या बंदिवासाचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. तो अशक्त होत चालला, त्याची कातडी पिवळी पडत चालली व त्याला थोडा खोकलाही येऊं लागला. पण बंदिवासामुळें त्याचें अंतःकरण मात्र खचून गेलें नाहीं. "त्याच्या खोलींत सूर्याचे किरण पडत नव्हते, तथापि त्याचें अंतःकरण इतकें विशाल होतें, त्याच्या आकांक्षा इतक्या उदात्त व उज्ज्वल होत्या कीं, त्यांसंबंधींच्या सतत विचारामुळें त्याचें मन नेहमीं प्रफुल्ल असलेलें दिसत होतें," असें लेपेशिन्स्की नांवाच्या त्याच्या एका कैदी मित्रानें एका प्रसंगीं बोलून दाखविलें.

लेनिन तुरुंगांत होता तरी सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचें पुढारीपण अद्यापि त्याच्याकडेच होतें. बाहेरच्या सर्व चळवळींची माहिती समजावून घेऊन आपल्या साथीदारांना वेळोंवेळीं सूचना देतां येतील अशी सर्व व्यवस्था लेनिननें केली होती. शहरांतील निरनिराळ्या लायब्ररींतून लेनिनला पुस्तकें मागवितां येत असत. तेव्हां हीं पुस्तकें मागवितांना व तीं परत करतांना सांकेतिक लिपीचा उपयोग करून तो आपल्या मित्रमंडळींशीं पत्रव्यवहार करीत असे. पुस्तकांची यादी तयार केली तर त्यांचीं नांवेंच अशीं लिहावयाचीं व त्यांच्यापुढें अशीं टिंबें द्यावयाचीं कीं तेवढ्यावरून कोणीं कोठें जावें व कोणतीं कामें कोणीं करावीं याचा बोध व्हावा. क्रुप्सकायाला येथून तो जीं पत्रें पाठवीत असे तीं सर्व अदृश्य शाईनें लिहिलेलीं असत. ही अदृश्य शाई दुधापासून तयार केलेली होती. पावाच्या लहान लहान तुकड्यांचीं पाळीं करून त्यांत ही शाई ठेवावयाची व वॉर्डरची फेरी आली कीं हीं पाळीं खाऊन गिळून टाकावयाचीं. या सोयीमुळें लेनिनला आपल्याजवळ असलें लेखनसाहित्य ठेवण्याची फारशी अडचण पडत नसे. एकदां असें घडलें कीं, त्याचें गुप्तलेखनाचें काम चालू असतांना सहा वेळां वार्डरची फेरी आली व सहा वेळां त्यानें तीं पाळीं मटकावून टाकलीं.

१८९६ सालीं रशियांत संपाची एक लाटच आली. या संपांसंबंधींची सर्व माहिती लेनिननें तुरुंगांत राहूनच मिळविली व 'संपांवर' (ऑन स्ट्राइक्स) या नांवाचें एक पत्रक त्यानें लिहिलें व गुप्तपणें बाहेर पाठविलें. पण पोलिसनें अगदीं आयत्या वेळीं पार्टीच्या गुप्त छापखान्यावर छापा घातल्या-

मुळें हें पत्रक प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं. लेनिनला ही गोष्ट समजली; पण त्यामुळें तो मुळींच नामोहरम झाला नाहीं. संपाचीं सूत्रें आपल्या पक्षातर्फेंच हलविलीं जात आहेत, हें त्याला माहीत होतें. संपासंबंधाचें पत्रक प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं तर दुसरीं पत्रकें काढून संपवाल्यांना त्यानें उत्तेजन दिलें व त्यांच्यावरील आपलें वजन त्यानें कायम ठेवलें.

मे-दिन जवळ येत चालला होता. मेची पहिली तारीख युरोपांतील सर्व मजूर मोठ्या उत्साहानें पाळतात. रशियांत या दिवसांत संप तर चालूच होते. तेव्हां या दिवशीं मोठ्या मिरवणुकी काढून व सभा भरवून हा दिवस साजरा करण्याचें पीटर्सबर्गमधील सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या मंडळींनीं ठरविलें. सरकारनें कितीही दडपशाही केली तरी कामगारांच्या चळवळी नष्ट झाल्या नाहींत; त्या तशाच चालू आहेत; तसेंच आपल्या पार्टीचें कामगारांवर असलेलें वजनही कमी झालेलें नाहीं, हें दाखविण्याकरितांच शहरांतील या पार्टीच्या मंडळींनीं हा दिवस साजरा करण्याची तयारी केली. लेनिननें मे-दिनाला उद्देशून "मेची पहिली तारीख म्हणजे कामगारांचा सणाचा दिवस" या नांवाचें एक पत्रक लिहिलें. कामगारांत वांटण्याकरितां जीं पत्रकें काढावयाचीं असतात तीं अगदीं सोप्या भाषेंत लिहावयाचीं असतात; सहज चालतां चालतां वाचलें तरी त्याचा अर्थ समजला पाहिजे. लेनिन अशाच भाषेंत हीं पत्रकें लिहीत असे. लेनिनचें हें पत्रक लिथोप्रेसवर छापण्यांत आलें. त्याच्या २००० प्रति काढण्यांत आल्या होत्या. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त व गुप्त पोलिसांची कडक निगराणी होती तरी पार्टीच्या मंडळींनीं हीं पत्रकें छापलीं. मिरवणूक, सभा वगैरे सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहानें पार पाडले. लेनिनला ही सर्व हकीगत कळली त्या वेळीं त्याला फार समाधान वाटलें. हा प्रचंड संप सोशल डेमोक्रॅटिक पार्टीनें चालविला. संपवाल्या कामगारांना या पार्टीचाच पाठिंबा होता व या दुष्ट वृत्तीच्या लोकांनींच ही चळवळ चालविली आहे, असें सरकारी रिपोर्टांतही कबूल करण्यांत आलें होतें. पण या चळवळीचीं सर्व सूत्रें प्रत्यक्ष झारच्याच तुरुंगांत असलेला एक मनुष्य हलवीत होता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

लेनिननें या कारावासाच्या दिवसांत वेळोवेळीं अनेक पत्रकें लिहिलीं.

पण यापेक्षांही एक अधिक महत्त्वाचें काम त्यानें आपल्या हातीं घेतलें होतें. पीटर्सबर्ग लायब्ररींतून ब्ल्यू बुकें व सरकारी रिपोर्ट मागवून त्यांच्या आधारावर 'रशियांतील भांडवलशाहीच्या प्रगतीचा इतिहास' हें पुस्तक लिहिण्याचें त्यानें योजलें होतें. वरील पुस्तकांशिवाय आणखी अनेक पुस्तकें मागवून व त्यांतील माहिती संकलित करून या पुस्तकाची तयारी त्यानें अत्यंत कसोशीनें चालविली होती. तसेंच सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या कार्यक्रमाची एक विस्तृत योजना त्यानें आंखली व या योजनेवर एक पत्रक लिहून तें गुप्तपणें बाहेर आपल्या मित्रमंडळींकडे त्यानें पाठवून दिलें.

पीटर्सबर्ग येथील समाजवादी मंडळींत राहून क्रुप्सकाया पुष्कळ दिवस कामगारजागृतीचें व संघटनेचें काम करीत होती. लेनिननें या मंडळींचें पुढारीपण पतकरल्यापासून क्रुप्सकायाशीं त्याचा परिचय वाढत चालला व या परिचयाचेंच पुढें प्रेमांत रूपांतर झालें. लेनिन तुरुंगांत असतांना या दोघांचा प्रेमाचा पत्रव्यवहार चालू होता. तुरुंगांत असतांना लेनिनला बाहेरचीं पुस्तकें मिळत असत व या पुस्तकांकरितांच तेवढ्या आपल्या मित्रमंडळींना त्याला चिठ्ठया पाठवितां येत असत. लेनिनसारख्या कैद्यांची कोणालाही मुलाखत मिळत नसे. तुरुंगांत असतांना आपल्या प्रेमी माणसाचें दर्शन व्हावें असें लेनिनला नेहमीं वाटे. लेनिनला त्याच्या खोलींतून दिवसांतून कांहीं विशिष्ट वेळींच बाहेर काढीत. याप्रमाणें बाहेर काढलें असतां तेथून दिसणाऱ्या तुरुंगाबाहेरील एका विशिष्ट जागीं क्रुप्सकायानें येऊन उभें रहावें, असें लेनिननें तिला कळविलें होतें. लेनिनच्या या सूचनेप्रमाणें त्या जागीं जाऊन ती उभी राहात असे. पण दोघांची वेळेची चुकामूक होत असल्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा लेनिनची ही मनीषा पूर्ण होऊं शकली नाहीं.

लेनिनसारख्या राजबंद्यांच्या बाबतींत कोर्टामार्फत उघड चौकशी रशियांत करण्यांत येत नव्हती. पोलिसखात्याकडून जो रिपोर्ट केला जाईल त्याच्या आधारावरच झाराच्यातर्फे या बाबतींत हुकूम सुटत असत व या प्रकरणांचा निकाल करण्यांत येत असे. लेनिनच्या बाबतींतही असेंच फर्मान सुटलें व त्याला पूर्व सैबेरियांतील पोलिसांच्या नजरेखालील भागांत तीन वर्षेपर्यंत हद्दपार करण्यांत आलें. या हुकुमाप्रमाणें लेनिनला ता. २६

जून १८९८ रोजीं तुरुंगांतून बाहेर काढण्यांत आलें व तीन दिवसपर्यंत पीटर्सबर्गमध्यें मोकळेपणानें राहण्यास त्याला परवानगी देण्यांत आली. लेनिनबरोबर आणखी बऱ्याच राजबंद्यांना झारच्या हुकुमान्वयें हद्दपार करण्यांत यावयाचें होतें. त्यांनाही याच दिवशीं मोकळें सोडण्यांत आलें होतें. यांपैकीं लेनिननें व त्याच्या साथीदारांनीं या संधीचा पूर्ण फायदा घेतला. पीटर्सबर्गमध्यें सनदशीरपणें ट्रेड युनियनच्या चळवळी करणाऱ्या पार्टींतील तरुण मंडळींच्या सहायानें गुप्त सभा भरविण्यांत आल्या. या सभांत समाजवादावर बरीच तात्त्विक चर्चा झाली व पुढील कार्यक्रमासंबंधानेंही विचार झाला. चौथे दिवशीं ठरल्याप्रमाणें लेनिनप्रभृति सर्व निर्वासित देशभक्तांना पोलिसबंदोबस्ताखालीं सैबेरियाकडे नेण्याची तयारी करण्यांत आली आणि हे सर्व लोक सैबेरियाच्या लांब प्रवासावर निघाले.

---

# सैबेरियांतील दिवस

सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलेल्या देशभक्तांना सेंट पीटर्सबर्गमध्यें तीन दिवस मोकळें सोडण्यांत आलें होतें व त्या संधीचा फायदा घेऊन या चळवळींतील सर्व पक्षांच्या मंडळींनीं गुप्त सभा भरविल्या हें मागें सांगितलेंच आहे. कामगारचळवळीच्या पुढील धोरणासंबंधानें व ध्येयासंबंधानें या सभांतून अर्थांतूच चर्चा झाली. रशियांतील दहशतवादाची चळवळ तर जवळ जवळ नामशेषच झाली होती. लेनिनप्रभृति क्रांतिकारक कामगारपुढाऱ्यांना या चळवळीची भीति वाटत नव्हती. कामगारचळवळीविरुद्ध आतां एक नवीनच शत्रु निर्माण झाला होता. कामगारचळवळीविरुद्ध उत्पन्न झालेला हा नवीन शत्रु दहशतवाद्यांपेक्षां अधिक भयंकर होता. आपल्याला मार्क्सवादी म्हणविणारा एक नवीनच पक्ष रशियांत यावेळीं निर्माण झाला. मार्क्सवादांतील तात्त्विक गोष्टी या पक्षाला मान्य होत्या, पण तपशील मात्र मान्य नव्हता. कामगारवर्गात जागृति करावयाची असली तर ती वर्गजागृतीच्या तत्त्वावरच केली पाहिजे असें नाहीं. इंग्लंडमध्यें प्रचलित असलेल्या ट्रेड यूनियनच्या धोरणानें कामगारचळवळी चालवाव्या, कामगारांच्या रोजच्या गाऱ्हाणीं दूर करण्याचा व त्यांना सुखसोयी मिळवून देण्याचा व त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करावा, कामगारांची सर्व चळवळ आर्थिक स्वरूपाची असावी, राजकीय चळवळीशीं तिचा मुळींसुद्धां संबंध येऊं देतां कामा नये, असें या पक्षांतील मंडळींचें मत होतें. सिडने वेबप्रभृति इंग्लंडमधील पुढारी व ग्रंथकार या तत्त्वाचाच पुरस्कार करीत होते. रशियांत सुरू झालेल्या दडपशाहीमुळें व सर्व क्रांतिवादी कार्यकर्त्यांना हद्दपार करण्यांत आल्यामुळें क्रमशः पुढें पुढें पाऊल टाकीत समाजसत्तावादाचें ध्येय गांठण्याचा मार्ग या नवीन पक्षाला बरा वाटला. मार्क्सवादाला याप्रमाणें विकृत स्वरूप येत चाललें होतें. मार्क्स व एंजल्स यांनीं प्रतिपादलेला उज्ज्वल व पुरुषार्थयुक्त असा हा समाज-

वाद नव्हता. लेनिन व प्लेखानोव्ह ज्या क्रांतिकारक मार्क्सवादाचा प्रचार रशियांत करूं पाहत होते तो हा मार्क्सवाद नव्हता. हा मार्क्सवाद वांझ होता. वरील गुप्त सभांतून लेनिननें व त्याच्या साथीदारांनीं या मार्क्स-वादाचें खंडन केलें. हद्दपार झालेल्या या पुढाऱ्यांना आतां दुसरें कांहीं करणें शक्यच नव्हतें. कारण एक दोन दिवसांतच पोलिसच्या कडेकोट बंदो-बस्ताखालीं सैबेरियाच्या प्रवासावर त्यांना निघावयाचें होतें. वरील सभा अगदीं गुप्तपणें भरल्या हें खरें असलें तरी पीटर्सबर्गमधील कामगारचळ-वळींतील कार्यकर्त्यांमध्यें मतभेद निर्माण झाले आहेत व त्यांच्यांत यासंबंधीं या सभांतून कडाक्याचे वादविवाद झाले, ही गोष्ट शेवटीं बाहेर पडलीच. अर्थात् पोलिसला ही गोष्ट पुढें समजली व त्याचा परिणाम असा झाला कीं, सबेरियांत हद्दपारीवर निघतांना पीटर्सबर्गमध्यें फिरण्या-करितां राजबंदींना जी तीन दिवसांची मोकळीक दिली जात असे तीही यापुढें काढून घेण्यांत आली.

लेनिनला मास्को येथें आणल्यानंतर त्या ठिकाणीं त्याला आपल्या कुटुं-बांतील मंडळीबरोबर कांहीं दिवस राहण्याची परवानगी देण्यांत आली. पोलिसांच्या बंदोबस्ताखालीं ठरलेले मुक्काम करीत करीत सैबेरियाला जाणें अत्यंत त्रासाचें व दगदगीचें होतें. सर्व प्रवास पायीं करावयाचा; खाण्या-पिण्याचे व कपडयालत्त्याचे हाल सोशीत हा कंटाळवाणा प्रवास करावया-चा; तेव्हां लेनिनला हे कष्ट सहन करण्याची पाळी येऊं नये म्हणून त्याच्या आईनें सरकारकडे अर्ज केला व क्रास्नोयार्स्कपर्यंत लेनिनला आप-ल्या खर्चानें प्रवास करण्याची परवानगी मागून घेतली. लेनिनला ही गोष्ट आवडली नाहीं. सरकारकडे अर्ज करून आपल्या एकटयाच्या सुखसोयीची व्यवस्था करून घ्यावी ही गोष्ट त्याला पसंत नव्हती. आईनें आपल्याला न कळवितांच हा परवाना मिळविला होता तरी त्याचा फायदा घ्यावा असें त्याला वाटलें नाहीं. इतर हद्दपार कैद्यांप्रमाणें आपणही हाल सोशीत जाऊं, आपण आपलीच तेवढी सोय पाहणार नाहीं, असा विचार करून आपल्याला पुन्हा अटकेंत ठेवावें अशी त्यानें मास्को येथील पोलिस अधिकाऱ्यांना विनंति केली. याप्रमाणें पोलिसच्या अटकेंत राहिल्यानंतर सगळे हद्दपार राजबंदी जेव्हां मास्कोला येतील तेव्हां त्यांच्याबरोबर आप-

त्यालाही नेण्यांत येईल अशी लेनिनची कल्पना होती. पोलिसच्या अटकेंत राहावयाचें तर खुशाल रहा, पण अमक्याच वेळीं सैबेरियाकडे जाण्याकरितां बाहेर काढण्यांत येईल अशी हमी घेण्यास पोलिस अधिकारी तयार नव्हते. तेव्हां पोलिसच्या अटकेंत निष्कारण राहावें लागेल आणि आपला हेतु मात्र साध्य होणार नाहीं, आपली व आपल्याबरोबर हद्दपारी झालेल्या इतर मंडळींची चुकामूक पडेल असें जेव्हां त्याला आढळून आलें तेव्हां त्यानें आपला बेत बदलला व आपल्या आईनें मिळविलेल्या सवलतीचा फायदा घेण्याचें त्यानें ठरविलें. मास्कोहून मार्च ता. ६ रोजीं तो सैबेरियाहून निघाला. वनवासाला निघालेल्या आपल्या मुलाला आईनें मोठ्या कष्टानें निरोप दिला. ओब नदीपर्यंत तो गाडीनें गेला. नंतर भाड्याचे तट्टू करून तो क्रास्नोयार्स्कला गेला. हद्दपारीच्या दिवसांत त्यानें कोठें रहावें हें अद्याप निश्चित झालें नव्हतें, यामुळें या ठिकाणींच त्याला कांहीं दिवस रहावें लागलें.

या गांवांत असतांना कांहीं दिवसांनीं त्याचे इतर हद्दपार दोस्त त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. ऊन, वारा, पाऊस सोशीत व सरकारचे ठरलेले मुक्काम करीत ते आले होते. वाटेंत त्यांचे फार हाल झाले होते. अनेक प्रकारचे कष्ट त्यांनीं सोसले होते. सर्वांचे चेहरे फिक्के पडले होते. ते सर्व रोडावून गेले होते. या सर्व लोकांनीं कोठें कोठें राहावयाचें याचा हुकूम शेवटीं एकदांचा आला. मिनुसिंस्कजवळ येनेसी नदीला येऊन मिळणाऱ्या एका लहानशा नदीच्या कांठीं असलेल्या शुशेन्स्कोई गांवांत लेनिननें राहावें असें त्यास सरकारकडून कळविण्यांत आलें. क्रस्नोयार्स्कहून हीं सर्व मंडळीं निघालीं व येनेसी नदीवरील मिनुसिंस्क गांवीं पोंचल्यानंतर त्या सर्वांची फाटाफूट झाली. तेथून हीं सर्व मंडळीं सरकारनें त्यांच्याकरितां निश्चित केलेल्या गांवीं निघून गेलीं.

पूर्व सैबेरियाच्या अरण्यांतील एका भिकारड्या खेड्यांत लेनिनला यापुढील तीन वर्षें काढावयाचीं होतीं. असल्या एकांतवासाचा माणसाच्या मनावर साहजिकच वाईट परिणाम होतो. खाण्यापिण्याची, आंथरुणापांघरुणाची व राहण्याची कांहींच सोय नाहीं, सरकारनें नेमून दिलेल्या पोटगींत या खेड्यांतून ज्या जिनसा मिळतील त्यांच्यावर निर्वाह

करावयाचा व तेथील रानटी शेतकऱ्यांशिवाय दुसरें कोणी माणूस पहावयास मिळावयाचें नाहीं; करमणुकीचीं साधनें तर नाहींतच नाहींत; या राहणीमुळें या हद्दपार देशभक्तांच्या प्रकृतीवर तर वाईट परिणाम होतच असे; शिवाय कांहीं लोक या हद्दपारीच्या मुदतींत वेडेही होत असत. लेनिनला अशीं उदाहरणें कितीतरी माहीत होतीं. पण आपल्या प्रकृतीवर या परिस्थितीचा कोणत्याही प्रकारचा परिणाम होऊं द्यावयाचा नाहीं, उलट सैबेरियांतील मोकळ्या हवेचा फायदाच घ्यावयाचा असें लेनिननें ठरविलें व त्या दृष्टीनें त्यानें आपला दिनक्रम आंखला.

पीटर्सबर्गमध्यें तुरुगांत असतांना लिहावयास घेतलेलें 'रशियांतील भांडवलशाहीची प्रगति' हें पुस्तक त्यानें या ठिकाणीं संपविण्याचें ठरविलें. याशिवाय रशियांत व परदेशांतून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करावयाचा व या प्रचाराबरोबर बाहेर काम करणाऱ्या लोकांना संघटनेची दिशा दाखवून द्यावयाची असेंही त्यानें ठरविलें. या उद्देशाप्रमाणें शुशेन्स्कोई येथें असतांना त्यानें जे लेख लिहिले त्यांखालीं तो 'एन्. लेनिन' अशी सही प्रथमच करूं लागला व हेंच त्याचें टोंपणनांव पुढें रूढ झालें. याशिवाय रशियांत प्रचलित असलेल्या दहशतवादाचाही पाडाव त्याला करावयाचा होता. हद्दपार होऊन सैबेरियाच्या अरण्यांत येऊन पडावें लागलें तरी हरकत नाहीं, आपलें जीवितकार्य येथें राहूनही चालविण्याचे मार्ग शोधून काढावयाचे व तें कार्य सतत चालू ठेवावयाचें असें लेनिननें ठरविलें असल्यामुळें सैबेरियांतील या वनवासाचा व एकांतवासाचा त्याच्या मनावर कांहींही परिणाम होऊं शकला नाहीं.

शुशेन्स्कोई गांवांत लेनिनला हद्दपारीचे दिवस काढावयाचे होते. तेव्हां या आपल्या गांवाला त्यानें थट्टेनें 'शुः शुः शुः' असें नांव ठेवलें होतें. मित्रमंडळींत गप्पा मारतांना किंवा बाहेरच्या लोकांशीं पत्रव्यवहार करतांना याच नांवाचा तो उपयोग करीत असे. या गांवांत येऊन राहिल्याबरोबर तेथील शेतकरी मंडळींत तो जाऊं येऊं लागला. लेनिनची शरीरयष्टि, त्याचा पिवळसर फिकट चेहरा, त्याची बोलण्याचालण्याची ढब व इतर राहणी एखाद्या साध्या कामकऱ्याला साजेशीच होती. यामुळें लेनिन हा आपल्यापेक्षां कांहीं निराळा मनुष्य आहे असें त्यांना वाटलें नाहीं.

थोड्याच दिवसांत ते त्याच्याशीं मोकळ्या मनानें बोलूं लागले व अनेक विषयांवर ते त्याच्याशीं चर्चा करूं लागले. लेनिनला सरकारकडून महि-न्याला आठ रुबल (जवळजवळ १२ रु.) पोटगीदाखल मिळत होते. खेडे-गांवच्या राहणीला एवढे पैसे पुष्कळ झाले असें तो म्हणत असे. लेनिननें कायद्याचा अभ्यास केला होता व एक दोन ठिकाणीं त्यानें वकिलीचा धंदाही केला होता. या ज्ञानाचा लेनिनला या ठिकाणीं चांगला उपयोग झाला.

शुशेन्स्कोई गांवांतील आसपासच्या खेड्यांतील शेतकरी आपल्या अड-चणी व तक्रारी त्याच्यापुढें मांडूं लागले म्हणजे त्यांना तो कायदेशीर सल्ला देत असे व कधीं कधीं त्यांचे खटले जिल्ह्याच्या कोर्टांतून कांहींही मोबदला न घेतां लढवीत असे. याप्रमाणें लेनिन शुशेन्स्कोईमध्यें लोकप्रिय होत चालला होता. गांवांतल्या शेतकऱ्यांना एकत्र आणायचें, त्यांच्या सभा करावयाच्या वगैरे कामांत शुशेन्स्कोईमधील एक दुकानदार झावर्ट्किन त्याला पुष्कळ मदत करीत असे. या गांवांत आल्यापासून लेनिनचें व त्याचें बरेंच सख्य जमलें होतें. अशा रीतीनें लेनिननें या ठिकाणीं आपला जम बसविला. या एकान्तवासाच्या जीवनांतही त्यानें रम्यता उत्पन्न केली. या वनवासी जीवनाशींही तो एकरूप होत चालला होता. दिवसेंदिवस गांवांतल्या मंडळींशीं लेनिनचा परिचय वाढत जात होता. तसाच त्याचा बाहेरचा गुप्त पत्रव्यवहारही जोरांत चालू होता. लेखनवाचनांतही तो दिवसांतील बराच भाग घालवीत असे. लेनिनच्या या सर्व हालचालींचा सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रिपोर्ट गेल्यामुळें म्हणा किंवा दुसरें कांहीं कारण सांपडलें म्हणून म्हणा लेनि-नच्या राहत्या घराची याच सुमारास झडती घेण्यांत आली. पण लेनिन-पाशीं आक्षेपार्ह असें कांहींच सांपडलें नाहीं. ही झडती घेणाऱ्या पोलि-सांनीं झावर्ट्किनजवळ लेनिनसंबंधानें बरीच विचारपूस केली. पण झावर्ट्किननें त्यांना कांहींच दाद लागूं दिली नाहीं.

"लेनिन ! काय एकलकोंडा व माणुसघाण्या इसम आहे. त्याचें येथें कोणाशींच जमत नाहीं. कदाचित् तो येथील कांहीं शेतकऱ्यांशीं कांहीं प्रसंगीं बोलला असला तरी राजकारणासारख्या भानगडीच्या विपया-संबंधानें बोलण्याचें त्याच्या स्वप्नांतही आलें नसेल," अशी थाप झावर्ट्-

किननें पोलिसांजवळ ठेवून दिली आणि आपला साळसूदपणा दाखविण्यासाठीं तो असेंही म्हणाला कीं,

"तुम्ही सांगत असाल तर असल्या माणसाशीं मी पुन्हा संबंध ठेवणार नाहीं."

पोलिसला त्याचें हें म्हणणें खरेंच वाटलें.

"छे, छे! तसं करूं नको. त्याच्याशीं पहिल्याप्रमाणेंच आपला संबंध ठेव. इतकेंच नव्हे तर त्याच्यावर चांगली नजर ठेव व तो कोठें जातो, कोणाकडे जातो, त्याच्याकडे कोण कोण येतात, तो कोणाशीं काय बोलतो, हें नीट लक्षांत ठेव व त्याची माहिती आम्हांला देत जा."

झावर्ट्किननें अधिकाऱ्यांचें हें सर्व म्हणणें ऐकून घेतलें. तो किंचित् हंसला. पण त्यानें लेनिनसंबंधानें त्यांना कांहींही माहिती दिली नाहीं. किंवा लेनिनचा विश्वासघातही केला नाहीं. पार्टींत शिरून कांहीं सुशिक्षित लोकांनींच गुप्त हेराचें काम केलें व सरकारी अधिकाऱ्यांना माहिती पुरविली. पण लेनिनशीं ज्यांचा ज्यांचा संबंध आला अशा शेतकऱ्यांपैकीं किंवा कामकऱ्यांपैकीं एकानेंही लेनिनचा कधींसुद्धां विश्वासघात केला नाहीं.

वरील झडतीमुळें पोलिस अधिकाऱ्यांचा कांहीं फायदा झाला नाहीं. उलट लेनिनचेंच महत्त्व वाढलें. शुशेन्स्कोईच्या शेतकऱ्यांना लेनिनसंबंधानें जास्त आदर वाटूं लागला. पूर्वीं ते लेनिनबरोबर मुख्यतः इतर अनेक विषयांसंबंधानें चर्चा करीत असत व राजकारणावर क्वचित् प्रसंगींच बोलत असत. पण झडती येऊन गेल्यापासून मात्र राजकारणाकडेच त्यांचें विशेष लक्ष लागलें. सरकार इतक्या चांगल्या चांगल्या शिकलेल्या लोकांना असें हद्दपार कां करतें, हें लेनिनला ते विचारूं लागले. लेनिनला तर हेंच पाहिजे होतें. त्यानें या लोकांना चालू राजकारणाची माहिती दिली. "सैबेरियांत जे कांहीं थोडे शेतकरी आहेत ते सुखी आहेत, स्वतंत्र आहेत. त्यांच्याजवळ त्यांच्या मालकीच्या जमिनी आहेत. पण रशियांत तसें नाहीं. तेथील शेतकरी अगदीं गांजून गेला आहे. त्यांच्या जमिनी वतनदारांनीं, जमिनदारांनीं, सरदारांनीं व मठाधिपतींनीं आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत. रशियांतील शेतकरी शेतांत पुष्कळ काबाडकष्ट करतो, पण शेतांत तो जें धान्य पिकवितो त्याच्यावर त्याची

सत्ता नसते. इतकेंच नव्हे तर त्याच्या श्रमाचा योग्य मोबदलाही त्याला मिळत नाहीं. यामुळें त्याच्या पोटाचे हाल होतात. खेडेगांवांत पोट भरेनासें झालें म्हणजे शहरांतील कारखान्यांत मजूर म्हणून तो काम करूं लागतो.'' याप्रमाणें रशियांतील शेतकऱ्यांची किती निकृष्टावस्था झाली आहे, तो कसा मजूर बनत चालला आहे व भांडवलशाहीची तेथें कशी वाढ होत चालली आहे, हें तो त्या शेतकऱ्यांना समजावून देत असे.

लेनिनला व सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील त्याच्या साथीदारांना पकडून हद्दपार करण्यांत आलें, पण एवढ्यानें रशियांतील दडपशाहीचें सत्र बंद पडलें नव्हतें; या सत्रांत रोजच्या रोज नवीन नवीन लोकांची आहुति देण्यांत येत होती. शुशेन्स्कोई येथें आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मास्को येथें लेनिनचा भाऊ मित्या याला पकडण्यांत आलें अशी बातमी आली. पण यापेक्षांही एक महत्त्वाची बातमी लेनिनला या ठिकाणीं समजली. या बातमीमुळें त्याला किंचित् दुःख वाटलें; पण दुःखापेक्षां आनंदच अधिक वाटला असें म्हटल्यास त्यांत कांहीं गैर होणार नाहीं. तुरुंगांतून मुक्त करून लेनिनला सैबेरियाकडे चालविलें त्या वेळींच क्रुप्सकायाला पकडण्यांत आलें आहे, असें त्याला समजलें होतें. आणि आतां तर तिला हद्दपार करण्यांत आलें आहे व "पूर्व सैबेरियांत आपल्याला पाठवावें व लेनिनपाशीं राहण्यास आपल्यास परवानगी द्यावी,'' हा तिनें केलेला अर्ज पोलिस अधिकाऱ्यांनीं मंजूर केला आहे ही बातमी त्याला समजली. लेनिनकडे जाऊन त्याच्याजवळ राहावयाचें असेल तर त्याच्यावरोवर लग्न केलें पाहिजे या अटीवर क्रुप्सकायाला अशी परवानगी देण्यांत आली होती. ही परवानगी मिळाल्यानंतर क्रुप्सकाया आपल्या आईसह सैबेरियाकडे यावयास निघाली व थोड्याच दिवसांत शुशेन्स्कोईला येऊन पोंचली.

आपलें प्रेमी माणूस आपल्याला भेटणार म्हणून लेनिनला या हद्दपारीच्या एकलकोंडया जिण्यांतही आनंदप्राप्तीची आशा वाटूं लागली. क्रुप्सकाया आपल्या आईबरोबर शुशेन्स्कोईला येणार असें कळल्याबरोबर त्यानें तिघांना राहाण्याकरितां योग्य अशी प्रशस्त जागा पाहून ठेवली होती. शुशेन्स्कोई अगोदरच खेडेगांव. तेथें प्रशस्त अशीं घरें कोठलीं अस-



क्रुप्सकाया

चौ ६५ ५२८

णार ! जीं कांहीं दोन चार होतीं तीं आपल्याकरितां राखून ठेवण्याचा तेथल्या पाद्री मंडळींचा विचार होता; पण लेनिन त्या ठिकाणीं थोडयाच दिवसांत इतका लोकप्रिय झाला होता कीं, तेथील लोकांनीं लेनिनला हवें तें घर मोकळें करून दिलें. ठरल्याप्रमाणें क्रुप्सकाया आपल्या आई-बरोबर शुशेन्स्कोईला आली. लेनिननें नवीन घर पाहून ठेवलें होतें खरें, पण त्या घरांत काय होतें ! सर्व घर रिकामेंच होतें. क्रुप्सकायानें येऊन या घराची प्रथम घरभरणी केली. आणि गृहिणीनेंच एकदां घरांत प्रवेश केल्यानंतर इतर सामानानें सर्व घर भरून जावयास कितीसा उशीर लागणार !

शुशेन्स्कोईला आल्यानंतर सरकारनें घातलेल्या अटीबरहुकूम लेनिन व क्रुप्सकाया यांचें लग्न होणें जरूरच होतें. याकरितां सरकारकडे पाठवावयाच्या अर्जावर व पोलिसखात्याकडून आलेल्या फॉर्मवर सह्या करावयाच्या व त्यांतील सदरें भरून द्यावयाचीं हा सरकारी शिष्टाचार लेनिनच्या अगदीं मर्जीविरुद्ध असला तरी त्याला तें करावें लागलें. हे सर्व अर्ज करून व फॉर्म भरून दिल्यानंतर सरकारकडून लग्नाची मंजुरी मिळण्यास जुलै महिना उजाडला. जवळच्याच एका चर्चमध्यें लेनिन व क्रुप्सकाया यांचें लग्न झालें. या लग्नसमारंभास त्या खेड्यांतील कांहीं मंडळी आलीं असतील तेवढींच. आपल्या आजुबाजूच्या गांवांतून राहणाऱ्या हद्दपार राजबंदींना या समारंभाला हजर राहाण्याबद्दल परवानगी विचारण्यांत आली होती, पण सरकारकडून ती मिळाली नाहीं. हद्दपारीच्या दिवसांत व सरकारनें ठरवून दिलेल्या एका कोपऱ्यांतल्या खेड्यांत झालेल्या लग्नांत इतर अनेक समारंभ व सोहाळे कसे साजरे करतां येणार ! अगदीं जरूर असलेले विधीच करण्यांत आले. लग्नानंतर सर्वसामान्यपणें करण्यांत येणारा मधुचंद्राचा सोहळाहि करण्यांत आला नाहीं.

पण असले सोहाळे व समारंभ करतां आले नाहींत म्हणून लेनिनला किंवा क्रुप्सकायाला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. त्यांचें प्रेम या समारंभावर व सोहळ्यावर थोडेंच अवलंबून होतें ! त्या दोघांचीं मनें यापूर्वींच प्रेमानें एकरूप होऊन गेलीं होतीं. आपल्या एकुलत्या एका मुलीवर आलेला प्रसंग व तिला भोगावे लागणारे कष्ट याची कल्पना येऊन

क्रुप्सकायाच्या आईला वाईट वाटणें साहजिकच होतें; पण क्रुप्सकाया व लेनिन यांच्यामधील शुद्ध प्रेम पाहून व त्या दोघांना आनंदांत असलेलें पाहून ती आपलें दुःख केव्हांच विसरून गेली.

सेंट पीटर्सबर्गमध्यें असतांना सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील एक 'कॉमरेड्' म्हणून क्रुप्सकाया लेनिनच्या खांद्यांशीं खांदा लावून काम करीत होती. आतां हद्दपार होऊन शुशेन्स्कोई येथें आल्यानंतर व या दोघांचें जाहीरपणें लग्न झाल्यानंतर क्रुप्सकाया लेनिनच्या जीवाची मैत्रिण झाली व लेनिननें पतकरलेल्या कार्यांत ती जीवाभावानें त्याला मदत करूं लागली. लग्न झाल्यानंतर या दोघांनीं आपला दिनक्रम निश्चित ठरविला. लवकर उठून सकाळचें सर्व काम आटोपल्यावर तीं दोघेंही मिळून सिडने वेबच्या 'औद्योगिक लोकशाही' (इन्डस्ट्रियल डेमॉक्रसी) या पुस्तकाचें भाषांतर करीत बसत असत. दोनप्रहरीं जेवणाची वेळ होई-पर्यंत हें काम चाले. दोनप्रहरचें जेवण झाल्यानंतर लेनिन आपलें 'रशियांतील भांडवलशाहीची प्रगति' हें पुस्तक लिहिण्याकरितां बसे. या कामांतही क्रुप्सकाया त्याला मदत करीत असे. लेनिननें या पुस्तकाकरितां जी सामग्री जमविली होती ती नीट शेजवार लावणें, लेनि-ननें या पुस्तकाकरितां जीं टांचणें केलीं होतीं तीं वाचून ठेवून कोणत्या टांचणाचा पुस्तकांत कोठें उपयोग करावयाचा हें त्यास सुचविणें, पुस्त-कांतील निरनिराळ्या प्रकरणांसंबंधानें त्याच्याबरोबर चर्चा करणें व वेळो-वेळीं त्याला उपयुक्त सूचना करणें वगैरे अनेक कामें ती करीत असे. संध्याकाळीं तीं दोघेंही फिरावयास जात. त्या वेळीं त्यांच्या-बरोबर लेनिनचा आवडता कुत्रा जेनका असावयाचाच. याशिवाय लेनिन कधीं कधीं एकटाच आपल्या कुत्र्याला बरोबर घेऊन शिकारीला जात असे. शिकारीकरितां पुष्कळ टेकड्या त्यानें पालथ्या घातल्या किंवा पुष्कळ रान तुडविलें तरी त्याला फारशी शिकार कधीं मिळत नसे. कधीं कधीं येनेसी नदीवर लांबवर रात्रीं तो मासे पकडण्यासाठीं जात असे. रात्रीचा हा प्रवास अत्यंत अडचणीचा व धोक्याचा होता, पण त्याचा मोबदला म्हणून त्याच्या जाळ्यांत मासेही कधीं फारसे सांपडत नसत. लेनिनला बुद्धिबळें खेळण्याचाही खूप नाद होता. खेड्यांतील परिचयाच्या झालेल्या मंडळींशीं

किंवा चुकून माकून आलेल्या आपल्या हद्दपार दोस्तांशीं तो बुद्धिबळें खेळत असे. फारा दिवसांत शुशेन्स्कोईला कोणी आलें नाहीं तर आपल्या इतर गांवांतील दोस्तांबरोबर पत्रद्वारें हे डाव तो खेळत असे. त्याचा मेहुणा इलिसारोव्ह हा बुद्धिबळें खेळण्यांत मोठा तरबेज होता. त्या वेळचा रशियांतील बुद्धिबळपटु लास्कर याला मास्को येथें झालेल्या दोन सामन्यांत त्यानें पराजित केलें होतें. तेव्हां या सामन्यांतील प्रत्येक पगाच्या सारणीसंबंधाचें विवेचन तो आपल्या मेहुण्याबरोबर करीत असे. हद्दपारीच्या दिवसांत लेपेशिन्स्की हा लेनिनबरोबर नेहमीं बुद्धिबळें खेळत असे. लेनिन एकदां खेळूं लागला म्हणजे तो त्यांत इतका गढून जाई कीं, आपल्याभोंवतीं काय चाललें आहे याचें त्याला भान नसे. "आग! आग! चला, पळा बाहेर पडा." असें जरी कोणीं ओरडलें तरी पटावरील पगावर खिळलेली त्याची दृष्टि कधीं ढळावयाची नाहीं किंवा त्याची भुवईही वर उचललेली दिसावयाची नाहीं; इतका तो त्या खेळांत गढून जात असे, असें लेपेशिन्स्कीनें आपल्या एका दोस्तापाशीं बोलून दाखविलें होतें.

वर्षारंभाचे दिवशीं आपल्या दोस्तांना व गांवांतल्या मंडळींना एकत्र जमवून लेनिन हा दिवस साजरा करीत असे. येनेसी नदीवरील रानांतून मिळणाऱ्या फळांपासून लोकांनीं स्वतः घरींच तयार केलेली दारू या समारंभांत पिण्यांत येत असे. आपले जे दोस्त या समारंभास येऊं शकले नाहींत त्यांच्या नांवांचा उल्लेख करून व क्रांतीचा व कामगारचळवळीचा जयघोष करून या दारूचा स्वीकार करण्यांत येत असे. या प्रसंगीं जमलेले सर्व दोस्त निरनिराळीं क्रांतिगीतें व इतर कवींचीं सुंदर गीतेंही गात. लेनिनचा आवाज गाण्याला योग्य असा नव्हता व तालावर गावयाचें कसें हें तर त्याला माहीतही नव्हतें. तथापि तो गाण्यांत भाग घेत असे व सर्व गाण्याचा स्वरभंग करून टाकीत असे. लेनिन याप्रमाणें गाऊं लागला म्हणजे इतर मंडळी गायचें थांबत व त्याला एकट्यालाच गाऊं देत. लेनिनला शुद्ध व शास्त्रोक्त गातां येत नसलें तरी त्याचा स्वरच असा होता कीं, त्याचें गाणें परिणामकारक होत असे.

लेनिनला लहानपणापासूनच वाचनाचा अतिशय नाद होता. हद्दपारीच्या दिवसांत मिळालेल्या फुरसतीचा त्यानें पूर्ण फायदा घेतला व

आपल्या आवडत्या ग्रंथकारांचे ग्रंथ त्यानें वाचून काढले. पुष्किन्, लर्मो-टोव्ह् व नेक्रासोव्ह् हे रशियन कवि त्याला फार आवडत. टुर्गेनीव्ह् व टॉलस्टॉय यांच्या कादंबऱ्या व चेर्नीशेव्हस्कीचें 'काय करावें' हें पुस्तक त्यानें पुन्हा पुन्हा वाचून काढलें. तसेंच झोला व हर्झेन या लेखकांचीं पुस्तकेंही तो मोठ्या आवडीनें वाचीत असे. आपल्या सर्व आवडत्या ग्रंथकारांचे व कवींचे फोटोही त्यानें जमविले होते व आपल्या अल्बमध्यें त्यानें ते नीट चिकटवून ठेविले होते.

याप्रमाणें लेखन, वाचन, शिकार, बुद्धिबळें खेळणें यांत लेनिननें आपले हे हद्दपारीचे दिवस काढले. हें सर्व करीत असतांना पूर्वी सांगित-ल्याप्रमाणें रशियांतील व परदेशांतील आपल्या समविचारी दोस्तांची संघ-टना करावयाची व त्यांना वेळोवेळीं कार्यक्रम आंखून द्यावयाचा, हीं कामेंही तो करीत होता.

लेनिन व त्याचे साथीदार हद्दपार झाल्यानंतर रशियांत चालू अस-लेल्या मार्क्सवादाच्या प्रचाराला सुधारणावादी दृष्टीनें मुरड घालण्याचा जो प्रयत्न चालू होता त्याचा आपल्या हातून होईल तेवढा निषेध करणें व मार्क्सवादाचें रहस्य काय हें रशियांतील व युरोपांतील श्रमजीवी जनतेला पटवून देणें, हेंच काम आपण या वेळीं करणें जरूरीचें आहे असें लेनिनला वाटलें. पण हें करण्यापूर्वी या मिनुसिंस्कच्या भागांत त्याचे जे साथीदार हद्दपार होऊन आले होते त्यांना एकत्र आणून त्यांचीं निराश झालेलीं अंतःकरणें पुन्हा आशापूर्ण करणें जरूरीचें होतें. झारच्या सरकारनें कामगारचळवळींत जे जे कोणी काम करणारे आढ-ळले, विशेषतः मार्क्सवादाचा पुरस्कार करणारे जे कोणी आढळले त्या सर्वांना पकडून सैबेरियांत हद्दपार केलें होतें. सरकारच्या या दडपशा-हीमुळें आपलें कांहीं चालत नाहीं असेंच या हद्दपार झालेल्या मंडळींना वाटूं लागलें होतें. ते सर्व निरुत्साही व निराश झाले होते. शिवाय अशा रीतीनें निरुत्साही होऊन एकलकोंडेपणानें आयुष्य काढणाऱ्या या मंडळींत व्यक्तिविषयक भांडणेंही सुरू झालीं होतीं. ही मंडळी परस्प-रांवर व्यक्तिशः दोषारोप करूं लागलीं होतीं. इतिहासांतील अनेक उदाहरणें देऊन निरुत्साही झालेल्या अंतःकरणांत उत्साह कसा उत्पन्न

करतां येईल, निराश अंतःकरणें आशायुक्त कशीं बनवितां येतील आणि आपापसांतील भांडणांमुळें व वितुष्टांमुळें त्यांच्या मनावर जो अनिष्ट परिणाम होत होता व कांहीं हळवी हृदयें जीं दुखावलीं जात होतीं व हताश होत होतीं तीं कशीं उल्हसित करावीं हा एक मोठाच प्रश्न लेनिनपुढे होता.

या आपसांतील कलहाचा शेवटीं व्हावयाचा तो परिणाम झालाच. एन. ई. फेडोसेयेव्हनें आत्महत्या केल्याची बातमी लेनिनला समजली. फेडोसेयेव्हनें आत्महत्या केल्याचें कळतांच त्याच्यावर प्रेम करणारी त्याची मैत्रीण एम. जी. हॉफेन्हॉस इनेंही आत्महत्या केली. या दोन्ही आत्महत्यांची बातमी ऐकून लेनिनचें अंतःकरण अत्यंत कळवळून गेलें. फेडोसेयेव्ह हा गॉर्कीचा गुरु होता व एका दृष्टीनें लेनिनचाही तो गुरु होता. मार्क्सवादाचा प्रचार करण्याच्या बाबतींत व गुप्तपणें कामगार-संघटना करण्याच्या बाबतींत फेडोसेयेव्हचा अत्यंत उपयोग होत असे. फेडोसेयेव्ह हा कर्तबगार पुरुष होता. हद्दपारीच्या दिवसांतही गुप्त पत्रव्यवहार करून लेनिननें त्याच्याशीं आपला असलेला संबंध कायम ठेवला होता. या कामीं फेडोसेयेव्हची मैत्रीण हॉफेन्हॉस लेनिनला मदत करीत होती. फेडोसेयेव्ह व लेनिन यांच्यामधील दुव्याचें काम ती करीत असे. या आत्महत्यांमुळें आपल्या कार्याची अत्यंत हानि झाली आहे असें लेनिनला वाटलें. फेडोसेयेव्ह कर्तृत्ववान् खरा, पण त्याचें अंतःकरण कोमल व भावनामय होतें. आपल्यावर किंवा आपल्या माणसांवर दुसऱ्या कोणीं निष्कारण टीका केली किंवा उगाच निराधार आरोप केले तर ते त्याला मुळींच सहन होत नसत. त्याचें वैयक्तिक आचरण तर अत्यंत शुद्ध होतें. पण चांगल्या माणसाचे 'निष्कारण वैरी' असतातच. निर्वासितांना मदत करण्याकरितां मिळालेले पैसे फेडोसेयेव्हनें मधल्यामधें गडप केले असा त्याच्यावर कोणीं एका निर्वासितानेंच आरोप केला. फेडोसेयेव्हला ही गोष्ट अर्थात्च सहन झाली नाहीं. निर्वासितांना मदत म्हणून जे पैसे जमा झाले होते त्यांतून कांहीं थोडीशी मदत इतरांप्रमाणें फेडोसेयेव्हलाही मिळत होती. पण त्याच्यावर वरील आरोप करतांच त्यानें हीसुद्धां मदत घेण्याचें नाकारलें व सरकारकडून मिळणाऱ्या मासिक आठ रुबलवरच राहण्याचें त्यानें ठरविलें. फेडोसे-

येव्हला ज्या भागांत ठेवण्यांत आलें होतें तेथील महागाईमुळें हे आठ रुबल त्याच्या खर्चाला पुरणें शक्य नव्हतें. बाहेरची मदत घेण्याचें नाकारल्यामुळें फेडोसेयेव्हचे अत्यंत हाल होऊं लागले. त्याला कित्येक वेळां उपासही काढावे लागले. फेडोसेयेव्ह चांगला लेखक होता. या परिस्थितींत त्याला आपलें लेखनाचें कामही बंद ठेवावें लागलें. तेव्हां ज्याचा कोणत्याही प्रकारें उपयोग होत नाहीं अशा आपल्या निरर्थक जविनाचा अंत करण्याचें त्यानें ठरविलें व एके दिवशीं आपल्या स्वतःवर गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली.

लेनिनचें अंतःकरण खंबीर होतें. निर्वासित देशभक्तांपैकीं कित्येकांनीं आत्महत्या केल्या, कित्येक वेडे झाले, कित्येक कायमचे रोगी बनले, हा इतिहास लेनिनच्या परिचयाचा होता. पण फेडोसेयेव्ह व हॉफेन्हॉस यांच्या आत्महत्येमुळें आपल्या कार्याची मोठी हानी झाली व आपल्यापैकीं दोन कार्यकर्ती माणसें नाहींशीं झालीं हें पाहून लेनिनला अत्यंत दुःख झालें. तथापि त्यानें तें बाजूला सारलें व आपल्या रोजच्या निश्चित कार्यक्रमांत त्यानें खंड पडूं दिला नाहीं.

येनेसीच्या तीरावर असलेल्या गांवांतून व मिनुसिंस्क भागांतील खेड्यांतून असलेल्या निर्वासितांकडे गुप्त रीतीनें निरोप पोंचवून येनेसीच्या वाळवंटांत त्यांच्या गुप्त सभा भरविण्याचें काम लेनिन व त्याच्या आसपास राहणारे त्याचे साथीदार करीत असत. हद्दपार झालेल्या मंडळींत निरुत्साह पसरलेला असला तरी असल्या सभांना येण्यास ते चुकत नसत. लेनिनवर या लोकांची भक्ति बसली होती. या लोकांतील मावळलेला उत्साह पुन्हा उत्तेजित करण्याचें काम लेनिननें या सभांतून केलें. जेलियाबोव्ह, सोफिया पेरोव्हस्काया, स्टीफन हाल्पेरिन वगैरे अनेक लोकांनीं ज्या कार्याकरितां आत्मबलिदान केलें आहे त्या कार्याचा कधींही नाश व्हावयाचा नाहीं, आपण चिकाटी धरली पाहिजे, कोणत्याही व कसल्याही जुलमांना व छळांना आपण दाद देतां कामा नये, असें सांगून आपल्या निर्वासित बंधूंच्या अंतःकरणांतील निस्तेज होत चाललेली आशेची ज्योत तो पुन्हा सतेज करीत असे.

येनेसी नदीतीरावर भरणाऱ्या या सभांना रशियांतील पॉप्युलिस्ट (दहशतवादी) पक्षाचे हद्दपार झालेले लोकही केव्हां केव्हां येत असत. "रस्त्यांतून भटकणारे उडाणटप्पू लोक आतां हद्दपारीवर आले आहेत" असें लेनिनच्या साथीदारांना उद्देशून हे लोक नेहमीं म्हणत असत. या लोकांच्या या हिणवण्याकडे लेनिन फारसें लक्ष देत नसे. दहशतवादाचें तो खंडण करीत असे तरी आपल्या इतर साथीदारांप्रमाणें तो या पाप्युलिस्ट पक्षांतील शहाण्या मंडळींचा द्वेष करीत नसे. या पक्षाच्या विचारसरणीनें भारावून जाऊन आपला भाऊ अलेक्झांडर निष्कारण फांसावर गेला याची त्याला नेहमीं आठवण होत असे. पॉप्युलिस्ट पक्षांतील मंडळी खरोखरी सुशिक्षित व पांढरपेशा वर्गांतीलच होतीं आणि लेनिनचे बहुतेक सर्व साथीदार बेताचे शिकलेले व कामगारवर्गांतील होते. दोघांच्या राहणींत अर्थात्‌च फरक होता. श्रीमंत व पांढरपेशा वर्गांतील निर्वासितांना बाहेरून जी मदत मिळे तशी मदत अर्थात्‌च या लेनिनच्या साथीदारांना मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां सैबेरियांत आल्यावरसुद्धां या दोन्ही वर्गांतील निर्वासितांच्या राहणींतील फरक स्पष्टपणें दिसून येणें साहजिक होतें. तथापि सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील मंडळींमध्यें जी शिस्त व आज्ञाधारकपणा होता, तितकी शिस्त पॉप्युलिस्ट पक्षांत कधींच दिसून आली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

पार्टीनें नेमून दिलेलें काम पार पाडण्याकरितां रेचिंग नांवाचा सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा एक हद्दपार देशभक्त सरकारनें ठरवून दिलेल्या त्याच्या गांवांतून पळून गेला. पोलिसला ही बातमी कळतांच निर्वासितांना ज्या अनेक प्रकारच्या सवलती होत्या त्या सर्व काढून घेण्यांत आल्या. रेचिंगचें हें कृत्य पॉप्युलिस्ट पक्षांतील मंडळींना आवडलें नाहीं व त्याच्या कृत्यामुळें आपली गैरसोय झाली हें पाहून तर रेचिंगचा त्यांना जास्तीच राग आला. रेचिंगचें हें कृत्य कितपत रास्त आहे यासंबंधानें चर्चा व्हावी अशी या पक्षांतील लोकांनीं मागणी केली. रेचिंग हा पार्टीच्या कांहीं कामाकरितांच पळून गेला असल्यामुळें या चर्चेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पण पार्टीचें काम पार पाडण्याकरितां कांहीं व्यक्तींनीं आपली स्वतःची गैरसोय करून घ्यावी व स्वतःवर संकटें ओढवून घ्यावीं व त्यामुळें पार्टीच्या इतर

लोकांनाही कांहीं तोशीस सहन करावी लागल्यास त्यांनीं ती मुकाट्यानें सोसावी, या गोष्टीचें महत्त्व पॉप्युलिस्ट पक्षांतील मंडळींना कळत नव्हतें. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे लोक पार्टीनें नेमून दिलेली शिस्त अत्यंत कडकपणें पाळतात, त्याकरितां कोणतेही हाल सोसायला ते तयार असतात, हे लोक स्वतः हाल सोसतातच पण त्यांच्या कृत्यामुळें इतरांना हाल सोसावे लागले तरी तेही त्याची पर्वा करीत नाहींत, ही इतकी कडक शिस्त पॉप्युलिस्ट पार्टीमधील लोकांना मान्य नव्हती. यामुळें कामगारचळवळींतले हे कार्यकर्ते परस्परांशीं इतक्या सहानुभूतीनें व प्रेमानें कां वागतात व दुसऱ्यानें केलेल्या कृत्यांबद्दल आपल्याला प्रायश्चित्त भोगावें लागलें तरी तें मुकाट्यानें सहन करण्यास ते कां तयार असतात यांतील मर्म पॉप्युलिस्ट पार्टींतील लोकांच्या लक्षांत येणें शक्यच नव्हतें. पॉप्युलिस्ट पार्टीमध्यें व सोशल डेमोक्रॅटिक पार्टीमध्यें एवढा एकच फरक होता असें नाहीं तर तात्त्विक दृष्ट्याही या दोन्ही पक्षांमध्यें मूलतःच भेद होता. सरकारची दडपशाही जसजशी वाढूं लागली तसतसा हा मतभेद अधिकाधिक व्यक्त होऊं लागला.

रशियांत पसरत चाललेल्या कम्युनिझमच्या प्रचाराला तेथील सरकारनें दडपशाहीच्या साधनांनीं आळा घालण्याचें ठरविलें होतें व या वादाचा पुरस्कार करणारे बहुतेक सर्व पुढारी व त्यांचे साथीदार हद्दपार करून त्यांना सैबेरियांत पाठविण्यांत आलें होतें. याच वेळीं सर्व युरोपांतील सोशालिस्टांवर त्या त्या देशांतील सरकारनेंही अशाच प्रकारचें हत्यार उपसलें होतें. अशा परिस्थितींत मागें राहणाऱ्या लोकांनीं आपल्या पूर्वींच्या मित्रांना विसरावें, इतकेंच नव्हे तर ते ज्या वादाचा पुरस्कार करीत आले त्यालाही आपल्याला इष्ट व सोयीस्कर अशी मुरड घालण्याचा प्रयत्न त्यांनीं करावा, हें साहजिक होतें. लेनिनला व युरोपांतील त्याच्या साथीदारांना जेव्हां ही गोष्ट समजली तेव्हां या वांझट समाजवादाविरुद्ध मोहीम काढण्याचें त्यांनीं ठरविलें. जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत फूट पडून त्यांतील बर्नस्टीन नांवाच्या एका पुढाऱ्यानें याच वेळीं 'समाजवादाचा मार्ग' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें होतें व त्यांत क्रांतिवादी समाजवादाचें व मार्क्स व एंजल्स यांच्या विरोधविकासवादात्मक भौतिक तत्त्वज्ञानाचें खंडन

केलें होतें. लेनिनला ही बातमी समजली त्या वेळीं त्यानें या संधिसाधू भ्याड लोकांच्या समाजवादाला वेळींच नामोहरम करून टाकण्याचा चंग बांधला. वर्गकलहाचा पुरस्कार न करतां त्यांच्यांत सलोखा उत्पन्न करावा व आस्ते आस्ते आपल्याला जरूर असतील त्या सुधारणा करून घ्याव्या, असें मार्क्सचेंही म्हणणें होतें असें सांगून बर्नस्टीनप्रभृति पुढाऱ्यांनीं कम्युनिझमला एक नवीनच कलाटणी देण्याचें ठरविलें होतें. रशियांतील या वेळच्या परिस्थितींत बर्नस्टीनचा हा समाजवाद तेथील कामगार-चळवळींत सनदशीरपणें काम करणाऱ्या मंडळींनाहि पटला. रशियांतील या उदारमतवादी बुद्धिजीवी पुढाऱ्यांनीं वरील तत्त्वानुसार आपल्या कार्याचें धोरण ठरविलें व तें जाहीरही केलें. राजकारण हा बुद्धिमान् वर्गातील लोकांचा विषय आहे, कामगारचळवळीनें राजकारणामध्यें उगाच लुडबूड करूं नये व इंग्लिश ट्रेड यूनियनच्या धर्तीवर आपल्या सर्व कामगारचळवळी चालवाव्या असें या पक्षाच्या धोरणामध्यें नमूद करण्यांत आलें होतें. रशियांत चालू असलेल्या कामगार चळवळीचें पाय मागें ओढणाऱ्या या धोरणाला तोंड देणें जरूरच होतें. तेव्हा सैबेरियांत डांबून ठेवलेल्या व रशियाबाहेर युरोपांतील इतर देशांत जाऊन राहिलेल्या ठिकठिकाणच्या आपल्या दोस्त पुढाऱ्यांशीं लेनिननें गुप्तपणें पत्रव्यवहार केला व या धोरणाला उत्तर देण्याची तयारी केली. लवकरच रशियांत कम्युनिझमची चळवळ करणाऱ्या लोकमान्य अशा सतरा कामगारपुढाऱ्यांच्या सह्यांचें एक पत्रक छापून घेण्यांत आलें आणि रशियांत तें सर्वत्र गुप्तपणानें वांटण्यांत आलें. प्लेखानोव्हला व स्वित्सर्लंडमध्यें राहिलेल्या निर्वासित मंडळींना हें उत्तर फारच आवडलें. हें उत्तर प्रसिद्ध झाल्यानंतर आपल्या पक्षाची संघटना मजबूत करण्याकरितां रशियाबाहेरच्या एकाद्या देशांत आपल्या पक्षाचें एखादें वर्तमानपत्र काढावें, रशियांतील व बाहेरच्या देशांतील आपल्या सर्व चळवळींशीं या पत्राचा संबंध असावा, या चळवळींतील सर्व महत्त्वाच्या गोष्टी या पत्रांतून प्रसिद्ध कराव्या व वेळोवेळीं कोणत्या धोरणानें या चळवळी चालविण्यांत याव्या हेंही या पत्रांत निःसंदिग्धपणें प्रसिद्ध करण्यांत यावें, अशी एक कल्पना लेनिनला या वेळीं सुचली व ती त्यानें आपली प्रिय पत्नी क्रुप्सकाया व आपला

प्रिय दोस्त क्रिझिझानोव्हस्की याजपाशीं बोलून दाखविली. लेनिनची हीं कल्पना या दोघांना पसंत पडली. लेनिननें या बाबतींत आपल्या इतर निर्वासित मित्रांशीं पत्रव्यवहार केला. मार्टोव्ह, पोट्रेसेव्ह वगैरे दोस्तांशीं तर लेनिनचा या बाबतींत बरेच दिवस पत्रव्यवहार चालू होता.

सतरा कामगारपुढाऱ्यांच्या सह्यांचें एक पत्रक रशियांत सर्वत्र वांटण्यांत आलें हें पाहून रशियांतील पोलिस चकितच झाले. पण या सर्व खटाटोपाच्या मुळाशीं कोण आहे याची दादसुद्धां पोलिसला अद्याप लागलेली नव्हती. सैबेरियांत असलेल्या निर्वासितांच्या गुप्त सभा होतात व या सैबेरियांतील मंडळींचा युरोपमधील निर्वासितांशीं गुप्त पत्रव्यवहार चालतो याची कुणकुण रशियाच्या पोलिसखात्यापर्यंत पोंचली होती; पण या बाबतींत प्रत्यक्ष पुरावा असा कांहींच मिळाला नव्हता. तेव्हां पोलिसनें या गोष्टीचा नीट छडा लावण्याकरितां लेनिनच्या घराची झडती घेतली. शुशेन्स्कोई येथें आल्यानंतर लेनिनवर झडतीचा हा दुसरा प्रसंग आला. या झडतींत वरील चळवळीच्या बाबतींत पुराव्यादाखल उपयोगी पडेल अशी एकही चीज पोलिसला सांपडली नाहीं; फक्त फेडोसेयेव्हचें स्मारक करण्याकरितां पैसे जमविण्यासंबंधानें लेनिनकडे पाठविलेल्या पत्राच्या पोंहोचेची एक पावती पोलिसला सांपडली. लेनिननें आपल्या मित्रांशीं केलेल्या गुप्त पत्रव्यवहाराचे सर्व कागदपत्र व नव्या वर्तमानपत्रासंबंधानें तयार करण्यांत आलेल्या योजनेचेही कागदपत्र पोलिसनें तपासलेल्या पुस्तकांच्या शेल्फच्या खालच्याच कप्प्यांत होते. त्याच खणांत क्रुप्सकायानें जमा केलेल्या शिक्षणविषयक पुस्तकांचाही लहानसा संग्रह एका बाजूला ठेवला होता. पण हे सर्व कागदपत्र पोलिसच्या नजरेंतून मोठ्या मुष्किलीनें बचावले. लेनिनच्या समयसूचकतेनें यावेळीं त्याला हात दिला. पोलिसचे अधिकारी ज्या वेळीं या शेल्फची झडती घेऊं लागले त्या वेळीं लेनिननें मोठ्या नम्रतेनें या झडती घेणाऱ्या अधिकाऱ्याला बसण्याकरितां एक खुर्ची दिली व ती शेल्फसमोर नेऊन ठेवली. या खुर्चीवर बसून या अधिकाऱ्यानें वरच्या कप्प्यांतील सर्व पुस्तकें व कागदपत्र यांची अगदीं कसून तपासणी केली. लेनिननें आपल्या पुस्तकाकरितां जमविलेले सरकारी रिपोर्ट, कांहीं शास्त्रीय ग्रंथ, भाराभर पत्रकें व इतर पुष्कळ सामग्री या कप्प्यांतून ठेवली

होती. हीं सर्व पुस्तकें व पत्रें चाळतां चाळतां झडतीकरितां आलेला अधिकारी व त्याच्या हाताखालचे शिपाई थकून गेले. वरचे सर्व कप्पे याप्रमाणें पाहून थकून गेल्यानंतर खालच्या तळाच्या कप्प्यांत क्रुप्सकायानें सांगितल्याप्रमाणें मॉंटेसोरी पद्धतीवरील शिक्षणविषयक पुस्तकें असतील, त्यांना काय पहावयाचें आहे, अशी त्यांनीं आपली समजूत करून घेतली व त्या कप्प्याला त्यांनीं हातही लावला नाहीं. पोलिस आले तसेच रिक्त हस्तानें निघून गेले व लेनिनवर आलेलें हें संकट टळलें.

सैबेरियांतून बाहेर पडल्यावर पुढें काय काय करावयाचें याच्या योजना ठरवून त्या कशा अंमलांत आणावयाच्या याची तयारी लेनिन एकीकडे करीत होता व त्याच वेळीं तुरुंगांत लिहावयास घेतलेलें पुस्तक सर्वांग-सुंदर व पूर्ण निर्दोष अशा स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचीही त्यानें तयारी चालविली होती. लेनिनचें हें पुस्तक ता. ११ फेब्रुवारी १८९९ रोजीं लिहून संपलें. बाहेरच्या कांहीं मित्रांशीं गुप्तपणें पत्रव्यवहार करून हें पुस्तक छापून घेण्याची त्यानें व्यवस्था केली. हें पुस्तक त्यानें आपल्या नांवानें प्रसिद्ध केलें नाहीं. 'व्ही. इलिन' या टोपण नांवाखालीं त्यानें तें प्रसिद्ध केलें. या पुस्तकाचा लेखक कोण हें जरी लेनिननें गुप्त ठेवलें होतें तरी तें बेकायदा ठरून जप्त व्हावें अशी लेनिनची इच्छा नव्हती. याकरितां या पुस्तकाला त्यानें शक्य तितकें शास्त्रीय व कायदेशीर स्वरूप दिलें होतें. या पुस्तकांत त्यानें जी माहिती संग्रहित केली होती व आपले जे विचार प्रगट केले होते त्यांवरून निघणाऱ्या निर्णयात्मक सिद्धांतांचा त्यानें या पुस्तकांत कोठेंच उल्लेख केला नव्हता किंवा रशियाच्या परिस्थितीची इतर देशांच्या परिस्थितीबरोबर तुलना करून रशियांत अमुक एक झालें पाहिजे असें निर्णायक मतही त्यानें या पुस्तकांत दिलें नव्हतें. लेनिन स्वतः कायदेपंडित होता, तेव्हां आपलें पुस्तक कायद्याच्या कक्षेंत न सांपडेल अशी सर्व प्रकारची दक्षता त्यानें घेतली होती. या पुस्तकांत कांहींही दोष राहूं नयेत म्हणून त्यानें त्याचें प्रत्येक पान क्रुप्सकायाला वाचून दाखविलें होतें व त्यावर चर्चा केली होती. पुस्तकांतील मजकूर व्यवस्थित जुळविण्यासंबंधाच्या व कांहीं कांहीं ठिकाणीं भाषासरणींत सुधारणा करण्यासंबंधींच्याही तिनें केलेल्या सूचना मान्य करून पुस्तकांत

त्याप्रमाणें त्यानें फेरफार केले होते. शिवाय ज्या आपल्या मित्रांकडे हें पुस्तक छापण्याचें काम त्यानें सोपविलें होतें त्यांच्याकडे कितीतरी सूचना त्यानें लिहून धाडल्या होत्या. या पुस्तकाची सर्व प्रुफें त्यानें स्वतः जातीनें तपासलीं होतीं. एवढीच इच्छा कीं, पुस्तकांत कोठें तरी क्षुल्लक कां होईना चूक राहून पुस्तकाच्या निर्दोषत्वाला बाध येऊं नये.

या पुस्तकांत लेनिननें आपलें पांडित्य प्रदर्शित केलें नव्हतें. सरकारी रिपोर्टांतून व इतर सामग्रींतून त्याला जी माहिती मिळाली तिच्या आधारा-वरच त्यानें आपले विचार या पुस्तकांत प्रदर्शित केले होते. कार्ल मार्क्सनें ज्या व्यापक उद्देशानें 'कॅपिटल' हा ग्रंथ लिहिला तितका व्यापक उद्देश लेनिननें हें पुस्तक लिहितांना आपल्यापुढें ठेवलेला नव्हता. रशियांतील पॉप्युलिस्ट पक्षाचे लोक किंवा भांडवलदार वर्गाचे लोक ज्या आर्थिक सिद्धान्तांचा प्रचार करूं पाहत होते त्यांच्यावर लेनिननें या पुस्तकांत साधार व खरमरीत टीका केली होती. रशियांतील पॉप्युलिस्ट पक्षानें दहशत-वादाचा पुरस्कार करण्याचें आतां सोडून दिलें होतें. देशाच्या आर्थिक चळवळींत भाग घेऊन एकतंत्री सत्तेविरुद्ध शेतकऱ्यांची संघटना करण्याचें त्या पक्षानें ठरविलें होतें. रशियांतील खेडेगांवांची प्रगति भांडवलदारी धोरणानें व्हावयाची नाहीं असें त्यांचें मत होतें. रशियांतील खेडीं स्वयंपूर्ण व्हावीं याच दृष्टीनें ते अलीकडे खटपट करूं लागले होते. लेनिननें आपल्या या पुस्तकांत पॉप्युलिस्ट पक्षाचा हा सिद्धान्त साधार खोडून काढला आहे व रशियांतील शेतीची व उद्योगधंद्यांची जोरानें वाढ होत असून ती सर्व भांडवलदारी पद्धतीबरहुकूमच होत आहे, असें त्यानें या पुस्तकांत सप्रमाण सिद्ध करून दिलें आहे. ज्या देशांत शेतकरीवर्गच बहुसंख्य आहे व रोजंदारीवर राहणारा मजूरवर्ग अल्पसंख्य व असंघटित आहे त्या देशांत कदाचित् क्रांति झाली तर तींत शेतकरी वर्गाच्या हितसंबंधाच्या प्रश्नांचाच प्रथम निर्णय लावावा लागेल व अशा रीतीनें या क्रांतीचें स्वरूप भांडवलदारी लोकशाही क्रांतीच्या स्वरूपाचें असलें तरी ही क्रांति पूर्ण यशस्वी व्हावयाची असल्यास कामगारवर्गाच्या पुढारीपणाखालीं ती लढवावी लागेल, असें आपलें मत त्यानें या पुस्तकांत प्रदर्शित केलें आहे.

याप्रमाणें सैबेरियांतील हद्दपारीच्या मुदतींतील एकही दिवस लेनिननें

फुकट घालविला नाहीं. आपल्या आयुष्याचें जें ध्येय त्यानें निश्चित केलें होतें त्याच्या सिद्ध्यर्थ सैबेरियांतील अरण्यांतही त्याला जेवढें कार्य करतां आलें तेवढें त्यानें कसोशीनें केलें. या हद्दपारीच्या दिवसांत त्याची वहीण मेरी इनें ब्रुसेल्सहून त्याला एक पत्र लिहिलें. मेरीच्या या पत्राला पाठविलेल्या उत्तरांत आपल्या कार्यसिद्धीविषयींची त्याची उत्कंठा व जबर आकांक्षा प्रकट झाली आहे.

"तुझें पत्र आल्यावरोबर आम्हीं युरोपचा नकाशा काढला व ब्रुसेल्स कोठें आहे तें पाहूं लागलों. तुला सांगितलें तर खोटें वाटेल, आम्हांला तें कितीवेळ तरी सांपडलें नाहीं. आम्हांला जेव्हां तें सांपडलें त्या वेळीं आमच्या मनांत अनेक विचार आले. तसेंच लंडन, पॅरिस या शहरांवरही आम्हीं आपलीं बोटें ठेवलीं. जर्मनीचाही सर्व प्रदेश आम्हीं नकाशांत पाहिला. युरोपांतील या केंद्रस्थानांसंबंधानें आम्हीं चर्चा केली. होय, खरोखरी तूं ज्या परिस्थितींत आहेस तिचा विचार केला म्हणजे तुझ्यासंबंधानें आम्हांला फार हेवा वाटतो. आमच्या हद्दपारीच्या पूर्वार्धांत युरोपचा नकाशा उघडावयाचा देखील नाहीं असें मी ठरविलें होतें. तो नकाशा एकदां उघडावा व त्यांतील निरनिराळ्या ठिकाणच्या काळ्या गोल ठिपक्यांकडे निरखून पहावें असें मला कितीतरी वेळां वाटत होतें. पण मी तो उघडला नाहीं. आतां मी तो बाहेर काढून उघडला आहे. मला पुष्कळ दम आहे. बाहेर पडायला मी कांहीं इतका उतावीळ झालेलों नाहीं. या नकाशाकडे मी आतां शांत चित्तानें पहात आहें. क्रुप्सकायाही माझ्याजवळ बसली आहे. हद्दपारीची मुदत संपल्यानंतर या काळ्या ठिपक्यांपैकीं कोणत्या ठिपक्यावर जावयाचे यासंबंधानें अनेक प्रकारचे विचार करण्यांत व त्या कल्पनासृष्टींत दंग होण्यांत आम्हांला कितीतरी मजा वाटते! हद्दपारीच्या मुदतीच्या पूर्वार्धांत मनुष्य मागच्याच गोष्टींचा विचार करीत असतो, पण आमची अर्धीअधिक मुदत आतां संपून गेली आहे. आतां याच्या पुढचा(!) पुढचा (!) विचार आम्ही करीत आहों. बरं, खुशाल. "यदि जीवति पश्यति."

लेनिन हा जात्याच चळवळ्या होता. तो क्रांतिवादी शूर शिपाई होता.

केवळ बळजबरी झाल्यामुळेंच त्याला या ठिकाणीं आपलें कार्यक्षेत्र सोडून बाहेर येऊन राहावें लागलें होतें. युरोपच्या नकाशांतील ज्या काळ्या ठिपक्यांचा त्यानें उल्लेख केला त्या शहरांतील मोठमोठीं हॉटेलें, थिएटर्स किंवा तेथील अनेक करमणुकीचीं स्थानें किंवा तेथें उत्तम पोषाख करून फिरणारे स्त्रीपुरुष यांच्यासंबंधानें त्याच्या मनांत विचार आले नाहींत, तर काळ्या ठिपक्यांनीं निदर्शित होणारीं हीं शहरें युरोपांतील क्रांतीचीं रणक्षेत्रें आहेत या दृष्टीनें या काळ्या ठिपक्यासंबंधानें तो विचार करीत होता.

त्याच्या हद्दपारीची मुदत शेवटीं एकदांची संपली. १९०० च्या फेब्रुवारींत त्यानें आपल्या 'शुः शुः शुः' (शुशेन्स्कोई) गांवाला शेवटचा निरोप दिला. शुशेन्स्कोईहून तो मास्कोकडे निघाला पण त्याच्या प्रिय क्रुप्सकायाला त्याला आपल्याबरोबर घेतां आलें नाहीं. सैबेरियाच्या सरहद्दीवरील उफा या गांवीं या दोघांनीं अत्यंत दुःखित अंतःकरणानें परस्परांना निरोप दिला. लेनिन सैबेरियांतून बाहेर पडल्याबरोबर आपल्या नियोजित कार्याला लागला. पण क्रुप्सकायाला आपल्या हद्दपारीचें आणखी एक वर्ष सैबेरियाच्या जंगलांत काढावयाचें होतें !

# पक्षांतील मतभेद

सैबेरियांतून बाहेर पडल्यानंतर लेनिन मास्को येथें आईजवळ कांहीं दिवस राहिला व नंतर तो सेंट पीटर्सबर्गला आला. या दोन्ही ठिकाणीं असतांना आपल्या पार्टीचें वर्तमानपत्र कोठें काढावयाचें, कसें काढावयाचें, त्याच्या प्रसाराची व्यवस्था कशी करावयाची यासंबंधानें त्यानें आपल्या मित्रमंडळींत बरीच चर्चा केली. पीटर्सबर्ग येथें आल्यानंतर व्हेरा झासुलिच् त्याला भेटली. एक खोटाच पासपोर्ट मिळवून ती रशियांत आली होती. व्हेरा झासुलिच् ही प्लेखानोव्हची पट्टशिष्या होती. रशियांत समाजसत्तावादाचा गुप्तपणें मतप्रसार करण्याचे कामीं तिचा हातखंडा होता. शाळा–कॉलेजांतून विद्यार्थ्यांच्या गुप्तपणें गांठी घ्यावयाच्या, कम्युनिझमसंबंधानें त्यांच्याशीं चर्चा करावयाची व त्यांना आपल्या गटांत सामील करावयाचें हें काम ती मोठ्या शिताफीनें करीत असे. तसेंच मास्को, पीटर्सबर्ग वगैरे उद्योगधंद्यांच्या शहरांतील कामगारांत बेकायदा वाङ्मय गुप्तपणें वांटावयाचें कामही ती करीत असे. रशियांतून तिला बाहेर घालविण्यांत आल्यानंतर ती कोठें तरी स्वस्थ जाऊन बसली नाहीं, तर युरोपांतील अनेक देशांतून पसरलेल्या निर्वासित समाजवाद्यांच्या तिनें गांठी घेतल्या व कोण, कोठें, काय करूं शकेल ही गोष्ट तिनें पूर्णपणें समजून घेतली होती. तेव्हां लेनिननें या वेळीं असल्या कर्तबगार तरुण स्त्रीचा उपयोग करून घेण्याचें ठरविलें व पार्टीच्या नवीन सुरू करावयाच्या पत्रासंबंधानेंही त्यानें तिच्याशीं चर्चा केली.

पार्टीचें पत्र काढावयाचें तर तें कोणीं, कोठें छापावयाचें व कोठें प्रकाशित करावयाचें; तसेंच या कामीं जो खर्च येईल त्याकरितां पैशाची उभारणी कशी करावयाची या प्रश्नांचा विचार करणें अर्थात् जरूरीचें होतें. तेव्हां वरील गोष्टी निश्चित करण्याकरितां सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुढाऱ्यांची एक सभा प्स्कोव्ह येथें भरविण्यांत आली. ही सभा

भरविण्याचे कामीं लेनिननेंच पुढाकार घेतला होता. ही सभा अर्थात्‌च गुप्तपणें भरविण्यांत आली होती. या सभेस बहुतेक निर्वासित पुढारीच हजर होते; पण रशियांत या पत्राचा प्रसार करावयाचा तर तेथील इतर मंडळींचेंही साह्य घेणें इष्ट व जरूरीचें होतें म्हणून "सनदशीर मार्क्सवादी" पक्षाचीही कांहीं पुढारी मंडळी या सभेला बोलावण्यांत आलीं होतीं. पीटर स्ट्रुव्ह व टौगनबारानोव्हस्की हे या मंडळींपैकीं प्रमुख पुढारी म्हणून गणले जात होते. पीटर स्ट्रुव्ह व त्याचे दोस्त यांचें काम करण्याचें धोरण लेनिनला पसंत नव्हतें व या लोकांच्या कार्यक्रमावर त्याचा विश्वासही नव्हता. तथापि आपल्या क्रांतिवादी मतांचा प्रसार करण्याचे कामीं त्यांचा उपयोग करून घेण्याचें त्यानें ठरविलें. शिवाय कामकरी पक्षाचें सामर्थ्य वाढविण्याचे कामीं व तसेंच रशियांत आपल्याला ज्या प्रकारची क्रांति घडवून आणावयाची आहे त्या दृष्टीनेंही या पक्षांतील मंडळींशीं सहकार्य केल्यास त्यांत कांहीं वावगें होणार नाहीं, असें लेनिननें ठरविलें होतें.

प्स्कोव्ह येथें भरलेल्या सभेंत या पत्राचें धोरण कसें असावें हेंच मुख्यतः ठरविण्यांत आलें. या धोरणाचा मसुदा लेनिननेंच तयार केला होता. रशियांत व रशियाबाहेरच्या देशांत समाजवादी लोकांच्या चळवळी चालू असल्या तरी त्यांच्यांत कोणत्याही प्रकारचा एकसूत्रीपणा नाहीं; या सर्व चळवळी अगदीं विस्कळितपणें चालू आहेत; या चळवळींमुळें मतप्रचाराचें काम होत असलें तरी संघटनेचें काम जसें व्हावें तसें होत नाहीं; तसेंच ठिकठिकाणच्या मार्क्सवादी मंडळींत ध्येयदृष्ट्याही अनेक मतभेद उत्पन्न झाले आहेत; या मतभेदांचा विचार करून आपल्या ध्येयासंबंधानें व आपल्या नियोजित कार्यासंबंधानें व त्याच्या पद्धतीसंबंधानेंही स्पष्ट व निश्चित कल्पना ठरविणें जरुरीचें आहे; या सर्व गोष्टींचा विचार लेनिननें या मसुद्यांत केला होता. आणि आपल्या पक्षातर्फे एखादें पत्र काढल्यास युरोपांत सर्वत्र स्वयंस्फूर्तीनें चाललेल्या चळवळींत एकसूत्रीपणा आणण्यास व कामगार-चळवळीचें सामर्थ्य वाढविण्यास त्याचा फार उपयोग होईल, असें त्यानें या मसुद्यांत म्हटलें होतें. तसेंच रशियांत आपल्याला एक संघटित प्रबल राजकीय

पक्ष निर्माण करावयाचा आहे, आपली ही चळवळ केवळ रशियापुरतीच नसून इतर देशांतील श्रमजीवी वर्गालाही कामगारक्रांतीचा मार्ग दाखवून देण्याचें कार्य आपल्याला या पत्राच्या द्वारें करावयाचें आहे, असें लेनिननें या मसुद्याच्या शेवटीं नमूद केलें होतें.

लेनिननें तयार केलेल्या या मसुद्याची सभेंत बराच वेळ चर्चा झाली व त्याबाबत फारसा मतभेदही झाला नाहीं. त्यानंतर पत्राच्या प्रकाशनासंबंधानें व प्रसारासंबंधानेंही विचार होऊन पोट्रेसेव्हनें पत्राच्या प्रकाशनाची व्यवस्था लावण्याकरितां ताबडतोब जर्मनीला जावें व सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या लवकरच भरणाऱ्या दुसऱ्या परिषदेला 'कामगारदास्यविमोचनसंघा'-तर्फे रशियाचा प्रतिनिधि म्हणून लेनिननें हजर राहावें असें ठरविण्यांत आलें. पार्टीची ही सभा रशियाबाहेर भरविण्यांत यावयाची असल्यामुळें लेनिननें पासपोर्टकरितां सरकारकडे अर्ज केला व तो मंजूर होऊन लेनिनला मिळालाही. पण या पासपोर्टांत एक विलक्षण अट घालण्यांत आली होती. यापुढें पीटर्सबर्गमध्यें यावयाचें असल्यास लेनिननें पोलिस अधिकाऱ्यांची परवानगी घेतली पाहिजे, अशी ही अट होती. रशियाबाहेर जावयाचें तर ही अट मान्य करणें लेनिनला भागच होतें. पण लेनिननें तसें केलें नाहीं.

आपल्या पक्षाच्या नवीन काढण्यांत यावयाच्या पत्रासंबंधानें कांहीं व्यवस्था करण्यास सांगण्याकरितां आपल्या मित्रमंडळीस भेटावें म्हणून लेनिन व मार्टोव्ह यांनीं पीटर्सबर्गमध्यें गुप्तपणें फिरण्याचें ठरविलें. पण पोलिसच्या हेरांनीं या दोघांना रस्त्यावरच ओळखलें व त्यांना ताबडतोब अटक करण्यांत आली. लेनिनजवळ त्या वेळीं दोन हजार रुबल होते. मार्क्सवादी लोकांनीं रशियांत चालविलेल्या चळवळीसंबंधानें सहानुभूति वाटणाऱ्या एका इसमानें लेनिनला हे पैसे या नव्या वर्तमानपत्राकरितां दिले होते. पण यापेक्षांही अधिक भयंकर स्वरूपाचा एक कागद लेनिनजवळ होता. परदेशांत कोणाकोणाकडे केव्हां केव्हां जावयाचें याची सविस्तर योजना या कागदावर लिहिलेली होती. सुदैवाची गोष्ट ही कीं, हीं सर्व नावें व योजना अदृश्य शाईत लिहिलेल्या होत्या. त्यांतल्या त्यांत आणखी सुदैवाची गोष्ट म्हणजे पोलिसनें हा कागद पाहिला खरा, पण त्यांना त्याबद्दल कांहीं संशय आला नाहीं. लेनिनला व मार्टोव्हला पोलि-

सनें दहा दिवस कच्च्या कैदेंत ठेवलें व त्यानंतर त्यांची मुक्तता करून प्स्कोव्ह येथें त्यांना पुन्हा पोंहोचविण्यांत आलें.

लेनिननें आगष्टच्या (१९००) पहिल्या आठवड्यांत रशिया सोडला व थेट स्वित्झर्लंड गांठलें. ज्या पत्रासंबंधानें आपण गेलीं तीन वर्षें विचार केला तें आतां लवकरच काढतां येणार अशी आतां त्याची खात्री झाली होती. या पत्राला कोणतें नांव द्यावयाचें हेंही त्यानें ठरविलें होतें व लेनिननें ठरविलेलें या पत्राचें 'इस्क्रा' (ठिणगी) हें नांव त्याच्या दोस्तांना पसंतही पडलें होतें. आतां एकच साधी व सोपी गोष्ट शिल्लक राहिली होती.

आपल्या पक्षाचें पत्र काढावयाचें तर पक्षांतील सर्व मंडळींना मान्य असलेला असाच संपादक या पत्राकरितां निवडणें जरूर होतें व प्लेखा-नोव्हकडे हें काम सोंपविण्याचा सल्लाही लेनिनला त्याच्या दोस्तांनीं दिला होता. तेव्हां पत्राच्या संपादनाची व्यवस्था कशी करावयाची हें ठरविण्याक-रितां लेनिन व पोट्रेसेव्ह हे प्लेखानोव्हकडे गेले. प्लेखानोव्ह या वेळीं स्वित्झ-र्लंडमधील एका खेड्यांत राहात होता. लेनिननें व्हेरा झासुलिच्लाही आपल्या-बरोबर घेतलें होतें. पत्राच्या धोरणाबाबत लेनिननें तयार केलेला मसुदा अर्थात् प्लेखानोव्हला देण्यांत आला.प्लेखानोव्हनें तो आपल्या खिशांत टाकला व दोन चार दिवसांनीं हा मसुदा 'संधीसाधूपणाचा' आहे असा शेरा मारून त्यानें तो लेनिनला परत केला. लेनिननें तयार केलेला हा मसुदा प्स्कोव्ह येथें जम-लेल्या मंडळींनीं मान्य केला होता. या मसुद्याला प्लेखानोव्हचा वरील प्रकारचा शेरा मिळतांच त्याची निराशा झाली व प्लेखानोव्ह या पत्राच्या संपादनाची बाजू कशी काय संभाळील याबद्दल त्याला काळजी वाटूं लागली. पण प्लेखानोव्हनें वरील शेरा मारला म्हणून त्याचें नांव सोडून देणें शक्यच नव्हतें. मसुदा बाजूस ठेवून पत्राच्या धोरणासंबंधानें लेनिन, पोट्रेसेव्ह, व्हेरा झासुलिच् व प्लेखानोव्ह यांच्यांत खूप चर्चा झाली. या चर्चेनंतर प्लेखानोव्हनें मसुद्यासंबंधाचें आपलें मत बदललें व पत्राचें संपादकीय काम हातीं घेण्याचें कबूल केलें. पण हें करतांना पत्राच्या धोरणाची सर्व जबाबदारी अर्थात् केवळ आपल्याकडेच राहील असेंही त्यानें दिग्दर्शित केलें. ज्या पत्रासंबंधानें आपण रात्रंदिवस विचार केला

ते आतां अगदीं बिनशर्त दुसऱ्याच्या स्वाधीन करावयाचें, ही गोष्ट लेनिनला पटली नाहीं. प्लेखानोव्ह आपणा सर्वांत वृद्ध आहे, अनुभवी आहे, विद्वान् आहे, त्याच्या दूरदर्शित्वासंबंधानें व तत्त्वनिष्ठेसंबंधानें आपल्या पक्षांतील सर्व मंडळींची खात्री आहे, वरील सर्व गुणांमुळेंच पक्षांतील सर्व तरुण मंडळींचें त्याच्यावर प्रेम आहे; तथापि हें पत्र चालविण्याच्या बाबतींत प्लेखानोव्हनें सर्वाधिकार आपल्या हातीं घ्यावे व आम्हां तरुण मंडळींना केवळ मूर्ख पोरें आहेत, त्याचा हवा तसा उपयोग करतां येईल असें मानावें, ही गोष्ट लेनिनला मुळींच आवडली नाहीं. पण कसेंही असलें तरी पत्राचीं संपादकीय सूत्रें प्लेखानोव्हच्या हातीं देणेंच भाग होतें. या चर्चेनंतर एक दिवस प्लेखानोव्हलाच काय वाटलें कोणास ठाऊक, त्यानें स्वतः होऊनच पुन्हा हा विषय काढला व आपण घातलेल्या अटीसंबंधानें उगाच गैरसमज करून घेऊं नये असें त्यानें लेनिनप्रभृति मंडळींना सांगितलें. व्हेरा झासुलिच् या सर्व चर्चेला हजर होती. प्लेखानोव्हनें कसल्याही प्रकारच्या अटी घातल्या तरी त्याच्याशीं जमवून घ्यावें असें ती लेनिनला सांगत होती. त्याप्रमाणें पत्राच्या बाबतींत प्लेखानोव्हशीं सहकार्य करावयाचें ठरवून लेनिन नरेनूबर्गला गेला व त्या ठिकाणीं जाऊन पत्राच्या प्रकाशनाची सर्व व्यवस्था त्यानें केली; पण ही व्यवस्था करतांना प्लेखानोव्हशीं केलेल्या समेटाचा आपल्याला कितपत उपयोग होईल याची त्याला शेवटपर्यंत शंका वाटत होती. शेवटीं हें पत्र म्युनिच् येथें एका कामगारानें गुप्तपणें छापून देण्याचें कबूल केलें व अशा रीतीनें लेनिनचा फार दिवसांचा बेत सिद्धीस गेला.

लेनिन हा उपजत पुढारी होता. पत्राच्या धोरणासंबंधानें वगैरे चर्चा करतांना प्लेखानोव्हला देखील हीच गोष्ट आढळून आली. व्हेरा झासुलिच् आपली एकनिष्ठ शिष्या आहे, ही गोष्ट प्लेखानोव्हला माहीत होती. सोशल डेमोक्रॅटिक पक्षामध्यें प्लेखानोव्हला गुरुप्रमाणें मानणारे व त्याचा शब्द म्हणजे वेदवाक्य असें समजणारे कांहीं लोक होते. व्हेरा झासुलिच् त्यांपैकींच एक होती. पण लेनिनचें बोलणें ऐकून ती त्याच्यावरही लुब्ध होई. लेनिननें घातलेल्या मंत्रानें ती भारून जाते हें प्लेखानोव्हनें पाहिलें होतें. लेनिन आपल्यापेक्षां लहान असला, तरुण असला, तरी पुढारीपणाचे गुण

त्याच्या ठिकाणीं आहेत ही गोष्ट प्लेखानोव्हला पटत चालली होती. आपल्या बुद्धीला जें पटलें तें तो स्पष्टपणें बोलून दाखवीत असे. तो गर्विष्ठ नव्हता. अहंमन्य नव्हता. आपल्याला जें खरें वाटतें तें बोलावयाचें या त्याच्या स्वभावामुळें तो लोकप्रिय झाला होता. मनांत एक व बाहेर बोलायचें दुसरेंच, असें त्यानें कधींच केलें नाहीं. लेनिनच्या या स्वभावामुळें तो जें बोलत असे तें कधींही वायफळ असावयाचें नाहीं अशी त्याच्या दोस्तांची खात्री झालेली होती. यामुळें तो जें बोलत असे त्याचा लोक विचार करीत असत. आपण सुरू केलेला लढा एकट्या रशियापुरता नाहीं, तो आंतरराष्ट्रीय आहे, रशियन क्रांतिकारक या नात्यानेंच केवळ आपण काम करूं नये, असें करणें हें संधिसाधूपणाचेंच एक लक्षण आहे, संधिसाधूपणा हा एक आंतरराष्ट्रीय रोग आहे असें त्याला वाटे. आपण लोकांवर सत्ता गाजवावी, आपला प्रत्येक शब्द लोकांनीं झेलला पाहिजे, त्याच्याविरुद्ध कोणीही वर्तन करतां कामा नये, असा अरेरावीपणा लेनिननें कधींही गाजविला नाहीं. आपल्या साथीदारांनीं कसून काम केलें पाहिजे, रात्रंदिवस त्यांनीं सारखें कामांत गढून राहिलें पाहिजे असें त्यास वाटे व याप्रमाणें आपल्या मंडळींकडून तो कामही करून घेत असे. पण लेनिन आपणाशीं असें वागतो हें पाहून त्याच्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाचीही छाति नव्हती. लेनिन स्वतःच त्यांच्यापेक्षां शतपटीनें अधिक काम करीत असे. लेनिनच्या अंगच्या या सर्व गुणांमुळें तो पक्षांतील मंडळींत प्रिय होत चालला होता व त्यांच्यावर त्याचें वजनही वाढत चाललें होतें. प्लेखानोव्हच्या खालोखाल लेनिनलाच हीं मंडळी आपला पुढारी मानूं लागलीं होतीं. आपणाबद्दल लोकांना कितीही प्रेम वाटत असलें तरी प्लेखानोव्हशीं सहकार्य केल्याशिवाय आपलें कधींही चालावयाचें नाहीं, ही गोष्ट लेनिन पूर्णपणें जाणून होता व प्लेखानोव्हचें व आपलें फार दिवस पटावयाचें नाहीं, हें माहीत असतांही त्यानें त्याच्याशीं सहकार्य करण्याचें ठरविलें होतें.

याप्रमाणें प्लेखानोव्हशीं सहकार्य करून 'इस्क्रा' पत्र सुरू करावयाचें असें ठरवून पत्राच्या प्रकाशनाच्या व्यवस्थेंत लेनिन गुंतला असतां त्याची प्रिय पत्नी क्रुप्सकाया म्युनिच् येथें आली. या ठिकाणीं एका

कामगाराच्या बिऱ्हाडांत या पतिपत्नींनीं आपलें बिऱ्हाड थाटलें. या बिऱ्हाडांत दोन खोल्या होत्या; एक लहानसें स्वैंपाकघर व एक बसायची खोली. स्वैंपाकघरांत तो कामगार, त्याची बायको व सहा मुलें राहात होतीं. कामगार पतिपत्नींनीं हीच जागा पसंत केली. लेनिन व क्रुप्सकाया हीं पुढच्या खोलींत राहूं लागलीं. या दोघांही कुटुंबांना आपापल्यापरी या खोल्या तोकड्या पडत होत्या. कामगाराच्या खोलींत मुलांची गर्दी होती तर लेनिनच्या खोलींत पुस्तकांची गर्दी होती. शिवाय त्याच्याकडे येणारी हद्दपार पाहुणे मंडळीही असत. स्वैंपाकाची तर फारच गैरसोय होई. कामगारपत्नीनें आपला स्वैंपाक आटोपल्यावर क्रुप्सकायाला चूल रिकामी सांपडावयाची. पण असल्या अडचणींच्या जागेंतही लेनिनचीं सर्व कामें पूर्ववत् चालूं होतीं. त्यानें एक नवीन पुस्तक लिहावयास सुरुवात केली होती. 'काय करावें' या चेर्निशेव्हस्कीच्या कादंबरीचें नांव आपल्या पुस्तकाला द्यावयाचें असें त्यानें ठरविलें होतें. लेनिन ज्या जागेंत राहात होता तेथें किती तरी गैरसोयी होत्या. ज्या कामगारानें लेनिनला आपल्या बिऱ्हाडांत जागा दिली होती त्याच्या मुलांची आपसांतील भांडणें, त्यांचा गोंगाट, शिवाय कामगार पतिपत्नींमधील धुसफूस, पाहुण्यांची गर्दी, जागेची अडचण, एक ना दोन. याशिवाय ज्या वर्तमानपत्राकरितां एवढी दगदग सोसायची त्याच्या व्यवस्थेबाबतसुद्धां कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नसून पत्राच्या संपादकवर्गांतही सारखीं भांडणें चालूं होतीं. पण अशा स्थितींतही त्यानें आपलें मन शांत ठेवलें होतें. इतक्या सगळ्या गैरसोयी असतांनासुद्धां लेनिनचें पुस्तक लिहिण्याचें काम चालूंच होतें. पुस्तकाकरितां निरनिराळ्या प्रकारची सामग्री जमवावयाची, ती वाचून त्यांचीं टिपणें करावयाचीं, त्यांच्यावर विचार करावयाचा व प्रत्यक्ष पुस्तक लिहावयाचें, हीं सर्व कामें जणूंकाय एखाद्या यंत्राप्रमाणें त्यानें चालूं ठेवलीं होतीं. आजूबाजूची सर्वस्वी प्रतिकूल परिस्थिति त्याच्या खिसगणतींतही नव्हती. पुस्तकांतील एखादें प्रकरण लिहिण्याची तयारी झाली म्हणजे त्या प्रकरणांतील विषयांची मांडणी कशी करावयाची यासंबंधीं त्याचा विचार सुरू होई. त्या लहानशा खोलींत तर इकडून तिकडे येरझाऱ्या घालीतच तो

हा विचार करीत असे आणि केव्हां केव्हां न कळत पुस्तकांत लिहावयाचा मजकूर तो स्वतःशींच भराभर बोलून जात असे.

"काय, कम्युनिझम्ची तुम्ही आर्डर दिली होती ना ! घ्या हें कम्युनिझम्चें ताट !"

असें तो एकदां बोलून गेला.

भांडवलशाहीमध्यें तिच्या नाशाचीं बीजें सांठविलीं आहेत; तथापि हीं बीजें आपोआप उगवतील असें नाहीं. हीं बीजें सहज उगवावीं, पुढें या बीजांचा स्वाभाविक मोठा वृक्ष बनावा व त्याला भांडवलशाहीच्या नाशाचीं फळें यावीं, इतकी सहजासहजी होणारी अशी ही गोष्ट नाहीं. भांडवलशाही आपलें थडगें स्वतःच तयार करीत आहे, हें खरें असलें तरी हा परिणाम घडून येण्यास बाह्य चळवळींची आवश्यकता आहे. भांडवलशाहींचें थडगें बांधणारा कामगारवर्ग स्वत: भांडवलशाहीच निर्माण करीत असते; पण या कामगारवर्गाला आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव होणें अत्यंत जरूर आहे आणि या वर्गानें संघटितपणें व सावधानपणें आपल्या चळवळी चालविणेंही आवश्यक आहे, असें आपलें मत तो आपल्या मंडळींत बोलून दाखवीत असे. भांडवलशाहीचा नाश आपोआप होणारच आहे, मग त्याच्याकरितां चळवळ कशाला, असें कोणीं म्हणेल तर त्याचें हें म्हणणें घातकीपणाचें आहे; भांडवलशाहीचा नाश व्हावा अशी ज्याची इच्छा असेल व तो शक्य तितक्या त्वरित व्हावा अशी इच्छा असेल तर तिच्या अंगीं असलेल्या दोषांचें आविष्करण करावें लागेल व त्याच्या जोरावरच कामगारवर्गाच्या संघटनेचा कार्यक्रम आंखावा लागेल, असें तो सांगत असे. म्हणूनच या चळवळीस वाहून घेतलेल्या धंदेवाईक क्रांतिवाद्यांचा पक्ष निर्माण करण्याची त्याची या दिवसांत खटपट चालू होती. 'इस्क्रा' पत्र त्यानें या उद्देशानेंच सुरू केलें होतें.

म्यूनिच्मध्यें 'इस्क्रा' पत्र प्रकाशित होऊं लागले व त्याचा रशियांत व इतरत्रही जोराचा प्रसार होऊं लागला, हें पाहून या पत्राच्या छापखान्याचा ठावठिकाण शोधून काढण्याकरितां म्यूनिच्मध्यें रशियन गुप्त पोलिसांचा सुळसुळाट झाला होता. या पोलिसांनीं कैसरच्या गुप्त

पोलिसखात्याशीं संगनमत केलें होतें. लेनिन व त्याचे साथीदार यांच्या लक्षांत ही गोष्ट आल्याबरोबर यापुढें म्यूनिच्‌मध्यें राहणें धोक्याचें आहे असें त्यांनीं ठरविलें. म्यूनिच्‌मधील या पत्राचें प्रकाशन बंद करून ही सर्व मंडळी लंडनला गेली व लवकरच छापखान्याची वगैरे जुळवाजुळव होऊन 'इस्क्रा' पत्र लंडनमध्यें प्रकाशित होऊं लागलें.

लंडनमधील एका बाजूच्या वस्तींत लेनिननें आपल्या बिऱ्हाडाकरितां जागा घेतली होती. क्रुप्सकाया, तिची आई व लेनिन हीं तिघेंही या वेळीं एकत्र राहात होतीं. लेनिनची अगोदरच अत्यंत गरिबीची राहणी व त्यांतच समाजांत प्रचलित असलेल्या रूढी न मानण्याची या पतिपत्नींची प्रवृत्ति पाहून त्यांच्याबद्दल त्या घराच्या मालकिणीला साहजिकच संशय आला. क्रुप्सकायानें आपल्या खोलीच्या खिडक्यांना पडदेदेखील लावले नव्हते. अशा रीतीनें पडदे न लावतां राहणें ही गोष्ट लंडनमध्यें त्या वेळीं अगदीं रानटीपणाची व असभ्यपणाची समजली जात असे. पण क्रुप्सकायानें या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें होतें. क्रुप्सकायाचे कपडे अगदीं साधे होते. तिच्या अंगावर अगदीं जरूरीचे देखील दागिने नव्हते. प्रत्येक विवाहित स्त्रीनें, आंगठ्या राहिल्या पण निदान विवाहमुद्रिका तरी वापरलीच पाहिजे या रूढीला क्रुप्सकायानें अगदी फांटा दिला होता. घराची मालकीण मिसेस् यो हिला क्रुप्सकायाचें हें वर्तन पाहून कसेंसेंच वाटलें. क्रुप्सकाया चांगल्या चालीची बाई नसावी, लेनिनशीं तिचें लग्न झालेलें नसावें, हीं दोघेंजण लग्नाशिवाय एकत्र राहत असलीं पाहिजेत, असें तिला वाटूं लागलें. पण लेनिनचे एक स्नेही डॉ. ॲलेक्सेयेव्ह यांनीं मिसेस् योच्या या शंकेचें निवारण केलें. लेनिन व क्रुप्सकाया यांचें कायदेशीर लग्न लागलें आहे, प्रत्यक्ष झारच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखी-खालीं हें लग्न झालें आहे, ही गोष्ट मिसेस् योला जेव्हां समजली तेव्हां ती अगदीं चूपच झाली. लेनिन व क्रुप्सकाया यांनीं कारागृहवासाचे कष्ट सहन केले आहेत व या दोघांना हद्दपारही करण्यांत आलें होतें, ही गोष्ट मिसेस् योला व शेजारीपाजारी मंडळींना समजली असती तर या मंडळींना त्यांच्याबद्दल आदर व कौतुकही वाटलें असतें. पण या अज्ञात-

वासांत लेनिन व त्याच्या साथीदारांसंबंधानें कोणत्याही प्रकारच्या गोष्टी बाहेर फोडणें शक्यच नव्हतें.

लंडनमध्यें असतांना लेनिननें आपलें नांव बदललें होतें. मि. रिशर व मिसेस् रिशर या नांवांनीं हीं पतिपत्नी या ठिकाणीं ओळखलीं जात होतीं. मि. रिशरचा बहुतेक सर्व वेळ ब्रिटिश म्युझियममध्यें जात होता. मि. रिशर घरीं असे त्या वेळींही तो वाचनांत गढलेला असावयाचा. मिसेस् रिशरही कधीं रिकामी व चकट्या पिटीत असलेली आढळावयाची नाहीं. तीही नेहमीं लिहिण्यांत गुंतलेली असावयाची. मिसेस् योला हें सर्व पाहून आश्चर्य वाटत होतें. विशेषतः मिसेस् रिशरची अभ्यासु वृत्ति पाहून तर तिला विशेषच कौतुक वाटे. पण मिसेस् रिशरचा हा प्रचंड लेखन-व्यवसाय कोणत्या प्रकारचा होता हें मिसेस् योला विचारीला काय माहीत! क्रांतिवादी पक्षांतील मंडळींशीं सांकेतिक भाषेंत पत्रव्यवहार चालू ठेवावयाचा व या पत्रांच्या नकला करून त्या सर्वत्र रवाना करावयाच्या असलें काम मिसेस् रिशर दिवसरात्र करीत होती, या गोष्टीची कल्पना मिसेस् योला कशी काय येणार!

लंडनमध्यें असतांना सर्व निर्वासित रशियन मंडळींनीं एक सामुदायिक कुटुंब निर्माण केलें होतें. या कुटुंबांत सर्वांनीं एकत्र जेवावयाचें, या कुटुंबाच्या जागेंतच सर्वांनीं एकत्र राहावयाचें, असें कांहीं दिवस या मंडळींनीं करून पाहिलें. पण तें जमलें नाहीं. या कुटुंबाकरितां जी जागा घेतली होती ती या निर्वासितांना पुढें पुढें त्यांची संख्या वाढू लागल्यामुळें अपुरी पडूं लागली. शिवाय जेवणाची ह्या सामुदायिक कुटुंबांत अशी आयती सोय होते असें पाहून निर्वासितांपैकीं बरीच मंडळी शहरांत काम मिळविण्याची खटपट न करतां बेकार राहूं लागलीं. अर्थात् या मंडळींमध्यें हलुंहळूं तंटे होऊं लागले व हें सामुदायिक कुटुंब मोडावें लागलें. हें सामुदायिक कुटुंब अस्तित्वांत असेपर्यंत या मंडळीकडे लेनिन नेहमीं जात येत असे व त्यांच्याशीं पुढील कार्यक्रमासंबंधानें चर्चाही करीत असे. हें कुटुंब टिकून राहावें, निर्वासितांची जेवणाखाणाची व राहण्याची निश्चितपणें सोय व्हावी अशी लेनिनचीही इच्छा होती. अशी सोय झाल्यास या मंडळींकडून चळवळीला उपयुक्त अशीं बरींच कामें करून घेतां येतात हेंही लेनि-

-नर्ने पाहिलें होतें. पण हें कुटुंब चालू ठेवणें वरील कारणामुळें शक्य झालें नाहीं.

याच सुमारास लंडनमध्यें एके दिवशीं ट्रॉट्स्की लेनिनच्या बिऱ्हाडीं अकस्मात् येऊन दाखल झाला. ही पहाटेची वेळ होती. क्रुप्सकायानें आपल्या खोलीचें दार फार सावधगिरीनें उघडलें. ट्रॉट्स्कीला तिनें ओळखलें व 'पेन आला ! पेन आला !' असें तिनें लेनिनला सांगितलें. लेनिनचे साथीदार ट्रॉट्स्कीला 'पेन' या टोपणनांवानें ओळखीत असत. सैबेरियांतून मोठ्या धैर्यानें व चातुर्यानें त्यानें पळ काढला होता. त्यानंतर इतर रशियन निर्वासितांप्रमाणें युरोपांतील निरनिराळ्या देशांतून गुप्त पोलिसांच्या हातावर तुरी देत देत तो लंडनला आला होता. ट्रॉट्स्की लेनिनजवळच कांहीं दिवस राहिला व 'इस्क्रा'च्या प्रकाशनाच्या कामीं त्याला मदत करूं लागला. ट्रॉट्स्कीची विद्वत्ता, हुशारी व धडाडी पाहून लेनिनला त्याच्याबद्दल साहजिकच प्रेम वाटूं लागलें. 'इस्क्रा'च्या प्रकाशनाच्या कामात फारच थोडी तरुण व बुद्धिमान् मंडळी लेनिनला मदत करीत होती. ट्रॉट्स्कीची या मंडळींत भर पडल्यामुळें लेनिनला बरें वाटलें. लंडनमध्यें असतांना या रशियन निर्वासितांच्या सभाही वारंवार होत असत. असल्या सभांतून किंवा इतर ठिकाणींही हे सर्व निर्वासित अत्यंत शिस्तीनें वागत असत. हे लोक आपसांत भांडत असत, पण आपल्या इतर व्यवसायांत आपल्याकरितां ठरवून घेतलेले शिस्तीचे नियम ते कधींही मोडत नसत. अज्ञातवासांत राहावयाचें व आपल्या सर्व चळवळी गुप्तपणें चालावयाच्या तर हा गुप्तपणा राखण्याच्या दृष्टीनें विसंगत असें कोणतेंही वर्तन ते करीत नसत. लंडनमध्यें वरील प्रकारच्या सभा होत त्या वेळीं लंडनच्या रिवाजाप्रमाणें सभा संपल्यानंतर साध्या मद्याचा एकेक प्याला घ्यावयाचा हा साधा शिष्टाचारही हे लोक पाळीत नाहींत, ही गोष्ट लंडनमधील त्यांच्या मित्रांना थोडी चमत्कारिक वाटे. एकदां तर ज्याच्या घरांत ही सभा भरली त्या मालकानें या लोकांनीं आपला हा अपमानच केला अशी समजूत करून घेतली होती. पण केवळ शिस्तीकरितां ही मंडळी मद्याला शिवत नाहींत हें पाहून त्याची गैरसमजूत दूर झाली. इतकेंच नव्हे तर या निर्वासितांसंबंधानें लंड-

नच्या मंडळींना आदरही वाटूं लागला. लंडनमध्यें होणाऱ्या या सभांत लंडनमधील कांहीं मंडळीही भाग घेत असत व समाजवादाच्या अनेक पक्षोपपक्षांसंबंधानें तींत चर्चा चाले. लेनिनप्रमाणें ट्रॉट्स्कीही या चर्चेंत भाग घेत असे. ट्रॉट्स्की लेनिनपेक्षां चांगला वक्ता होता. श्रोत्यांना मोहून टाकण्याचें सामर्थ्य त्याच्या वक्तृत्वांत होतें. लेनिन हा एक साधा व सरळ माणूस होता. आपल्याला जें वाटत असेल तें कोणाची भीडभाड न ठेवतां तो लोकांपुढें मांडीत असे. ट्रॉट्स्कीचें त्याच्या अगदीं उलट होतें. तो जसा बुद्धिमान् तसा चतुरही होता. आपलें भाषण इतर अंगोपांगांनीं कसें सजवावें व लोकांचीं मनें आपल्याकडे कशीं आकर्षून घ्यावीं हें त्याला पक्कें माहीत होतें. 'इस्क्रा' पत्राच्या संपादकमंडळांतील भांडणें आतां कमी होत चाललीं होतीं. सर्व मंडळी आतां एकोप्यानें कामें करूं लागलीं होतीं. ट्रॉट्स्कीची हुशारी पाहून लेनिननें त्याला संपादकवर्गांत मदतनीस म्हणून घेतलें. याच सुमारास लेनिनची आई त्याला भेटण्याकरितां लंडनला आली. आईच्या इच्छेप्रमाणें त्यानें कांहीं दिवस बोस्टनला जाऊन राहण्याचें ठरविलें. लेनिनलाहि विश्रांतीची जरूर होती. बोस्टन येथें हीं दोघें एक महिनाभरच होतीं, पण त्यांचा हा महिना फार आनंदांत गेला. लेनिनच्या आईच्या मनांत आणखीही कांहीं दिवस राहावयाचें होतें, पण लेनिनला कोठें फुरसत होती ! लवकरच भरविण्यांत यावयाच्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कॉंग्रेसची त्याला तयारी करावयाची होती.

'इस्क्रा' पत्राची व्यवस्था लंडनमध्यें करण्यांत आली होती व त्या ठिकाणीं ते सुरळीतही चाललें होतें. या ठिकाणीं गुप्त हेरांचें फारसें लफडें नव्हतें. परंतु पक्षांतील मंडळींनाच ही जागा पुढें गैरसोयीची वाटूं लागली. सगळाच व्यवहार गुप्तपणें चाललेला ! पत्र छापण्याचें काम गुप्तपणें करण्यांत आलें तरी त्याच्या पुढची व्यवस्था तितक्याच गुप्तपणानें व सुलभतेनें झाली पाहिजे. छापण्यापासून ते सर्वत्र पाठविण्याची व्यवस्था करण्यापर्यंतचें काम लंडन येथें राहून करणें गैरसोयीचें होऊं लागलें असें पाहून या पत्राची कचेरी जिनिव्हा येथें नेण्याचें ठरविण्यांत आलें.

जिनिव्हा ही युरोपांतील मध्यवर्ती व सर्व बाजूंनीं सोयीस्कर अशी जागा होती व त्या ठिकाणीं केलेली ही व्यवस्था सर्वांना पसंतही पडली.

पूर्वी ठरल्याप्रमाणें ब्रुसेल्स येथें जुलैअखेर सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची कॉंग्रेस भरविण्याची सर्व तयारी करण्यांत आली. या कॉंग्रेसमध्यें पार्टीच्या कार्यक्रमासंबंधानें, घटनेसंबंधानें व इतर अनेक गोष्टीसंबंधानें चर्चा व्हावयाची होती. या सर्व बाबतींत पार्टीत बराच मतभेद होणार ही गोष्ट उघड होती. परंतु पार्टीच्या या सभेंत कितीही चर्चा झाली व मतभेद झाला तरी शेवटीं आपल्या पक्षाच्या मंडळींचाच विजय होणार ही गोष्ट लेनिनला कळून चुकली होती. 'इस्क्रा'चे सर्व संपादकीय मंडळ लेनिनच्या बाजूचें होतें. पार्टीतील सर्वांत वृद्ध पुढारी प्लेखानोव्ह लेनिनच्या बाजूला होता व पार्टीत नव्यानें सामील झालेला ट्रॉट्स्कीही लेनिनलाच पाठिंबा देण्यास तयार होता.

या कॉंग्रेसला ठिकठिकाणाहून एकंदर ४० प्रतिनिधी आले होते. यांपैकीं फक्त चारच प्रतिनिधी प्रत्यक्ष कामगारवर्गांतले होते. ब्रुसेल्ससारख्या बाजूच्या शहरीं यावयाचें हें खर्चाचें काम तर होतेंच, पण त्यापेक्षांही या सभेस हजर असल्याचा मागमूसही कोणाला लागूं द्यावयाचा नाहीं, ही गोष्ट कामगारमंडळींना साधणें शक्य नव्हतें.

पार्टीचा कार्यक्रम निश्चित करणें हेंच या कॉंग्रेसपुढील महत्त्वाचें काम होतें. मार्क्सच्या मताप्रमाणें हा सर्व कार्यक्रम क्रांतिकारक स्वरूपाचा असला पाहिजे व रोजंदारवर्गाची सत्ता व सर्वाधिकारित्व स्थापन करण्याच्या धोरणानें पार्टीच्या सर्व चळवळी चालविण्यांत आल्या पाहिजेत असें एका पक्षाचें मत होतें, तर कम्युनिझम्ला थोडी मुरड घालावी, त्याची प्रखरता थोडी कमी करावी, कामगारचळवळींतील सर्व पक्षांशीं सहकार्य करतां येईल या धोरणानेंच पार्टीचा कार्यक्रम आंखण्यांत यावा, असें दुसऱ्या पक्षाचें म्हणणें होतें. वृद्ध प्लेखानोव्ह व लेनिनप्रभृति मंडळी अर्थात् क्रांतिवादी कार्यक्रमाचा पुरस्कार करणारी होतीं. आश्चर्याची गोष्ट ही कीं, १९१७ सालीं झालेल्या रशियांतील क्रांतीच्या ऐन भरांत कामगारवर्गाच्या सर्वाधिकारित्वाला विरोध करणारा प्लेखानोव्ह या वेळीं लेनिनच्या बाजूचा होता. पण ज्या पुढाऱ्यानें १९०३ सालीं लेनिनच्या सर्व क्रांतिवादी कार्य-

क्रमाचा पाठपुरावा केला त्याच पुढाऱ्यानें १९१७ सालीं म्हणजे यानंतर १४ वर्षांनीं, कामगारवर्गाची प्रबल संघटना निर्माण झाली असतांना व या वर्गाचें सर्वाधिकारित्व प्रस्थापित करण्याची सर्वप्रकारें अनुकूल संधि प्राप्त झाली असतांना लेनिनच्या कार्यक्रमाला विरोध करावा, ही खरोखरीच ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. प्लेखानोव्हचें पुढें कितीही मतांतर झालें तरी या काँग्रेसमध्यें त्यानें लेनिनला पूर्ण पाठिंबा दिला व लेनिननेंही या वेळीं प्लेखानोव्हच्या लोकप्रियतेचा व विद्वत्तेचा चांगला फायदा करून घेतला.

"कामगारवर्गानें विजय संपादन करणें हेंच क्रांतीच्या चळवळींतील अत्यंत श्रेष्ठ तत्त्व होय. या विजयाकरितां लोकशाहीच्या एखाद्या तत्त्वाला मर्यादा घालण्याचा प्रसंग आला तर तसें करण्यास आपण तयार असलें पाहिजे. ही मर्यादा घालण्यास मागेंपुढें पाहणें म्हणजे या तत्त्वाच्या दृष्टीनें गुन्हा करण्यासारखेंच आहे."

या मतभेदासंबंधानें चर्चा चालू असतां प्लेखानोव्हनें वरील प्रकारचे उद्गार एकदां काढले होते.

पोलंडमधील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे लोक व ज्यू लेबर पक्षाचे लोक (ज्यूइश 'बंड') लेनिनला या काँग्रेसमध्यें विरोध करीत होते. लेनिनचा आजपर्यंत सहकारी असलेला मार्टोव्ह हा या विरोधी पक्षाला जाऊन मिळाला होता. ब्रुसेल्समध्यें काँग्रेसच्या प्रत्यक्ष बैठकीला अद्याप सुरुवात व्हावयाची होती. या परिषदेकरितां निरनिराळ्या ठिकाणांहून प्रतिनिधी येत होते आणि काँग्रेसमध्यें कोणता कार्यक्रम मांडावयाचा यासंबंधानें या प्रतिनिधींमधून जोराच्या चर्चा चालू होत्या. पण ब्रुसेल्समध्यें काँग्रेस भरविण्याची ही योजना गुप्त राहूं शकली नाहीं. पोलिसखात्यांतील हेरांना या काँग्रेसचा सुगावा लागला. काँग्रेसची बैठक ज्या हॉलमध्यें भरविण्याचें ठरविलें होतें त्याच्याभोंवतीं बेल्जियन व रशियन गुप्त पोलिसांची टेहळणी सुरू झाली आहे ही गोष्ट लेनिनप्रभृति पुढाऱ्यांना समजली, त्या वेळीं ब्रुसेल्समध्यें काँग्रेस भरविणें धोक्याचें आहे असें त्यांना वाटूं लागलें. काँग्रेसकरितां आलेल्या दोन प्रतिनिधींना अटक करण्यांत आली आहे अशीही बातमी लेनिनला समजली. पकडण्यांत आलेल्या दोन प्रतिनिधींत झेम्लियाश्का

नांवाची एक तरुण स्त्री होती. झेम्लियास्का ही धाडसी व कर्तृत्व-वान् स्त्री होती. पुढें १९०५ सालीं झालेल्या सशस्त्र बंडांत याच स्त्रीनें पुढाकार घेतला होता आणि १९१७ सालच्या क्रांतीनंतर सोव्हिएट सर-कारच्या ट्रॅन्सपोर्ट खात्याच्या कॉमिसरिएटमध्यें असिस्टंट कॉमिसरच्या जागीं तिची नेमणूक झाली होती. कॉंग्रेसची जागा पोलिसांना कळून चुकली व सरकारतर्फे पकडापकडीलाही सुरुवात झाली असें दिसत असतांना कॉंग्रेसची बैठक भरवावयाची ही गोष्ट शहाणपणाची तर खासच नव्हती. अशा स्थितींत ही कॉंग्रेस भरली असती तर कॉंग्रेसला कोण कोण प्रतिनिधि आले होते याची पूर्ण नोंद गुप्त पोलिसांना करतां आली असती; इतकेंच नव्हे तर प्रसंगीं या बैठकींत हजर असलेल्या प्रतिनिधींपैकीं बऱ्याच मंडळींना पकडण्यांतही आलें असतें व त्यांना रशियांतील तुरुंग किंवा सैबेरियांतील निर्जन प्रदेश दाखविण्यांत आला असता. या परिस्थितीमुळें अत्यंत परिश्रमानें ब्रुसेल्स येथें कॉंग्रेस भरविण्याची केलेली तयारी निष्फळ होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. पण लेनिनप्रभृति पुढारी मंडळी या प्रसं-गाला थोडीच डरणार! त्यांनीं आपला सर्व बेत ताबडतोब बदलला. ब्रुसेल्स येथें आलेल्या निवडक कार्यकर्त्यांची एक गुप्त सभा भरविण्यांत आली व कॉंग्रेसची बैठक लंडन येथें भरविण्याचें ठरविण्यांत आलें. ब्रुसेल्सला आलेलीं सर्व मंडळी कोणालाही आपला मागमूस लागूं न देतां लंडनला रवाना झालीं.

लंडन येथें जमल्यानंतर ब्रुसेल्स येथें चालू असलेला वादविवाद तेथेंही चालूं झाला. याप्रमाणें आगस्ट १९०३ मध्यें ब्रुसेल्स येथें सुरूं झालेल्या या दुसऱ्या कॉंग्रेसचें काम लंडन येथें पुन्हा चालू झालें. ब्रुसेल्सपेक्षां लंडन येथें या वादाला विशेष रंग चढला. 'इस्क्रा' पत्र काढण्याच्या बाबतींत व इतर चळवळी चालविण्याच्या बाबतींत लेनिन ज्याचा वारंवार सल्ला घेत असे असा लेनिनच्या अगदीं विश्वासांतील दोस्त मार्टोव्ह यानेंच विरोधी पक्षाचें पुढारीपण स्वीकारलें होतें. या सर्व वादविवादांत 'इस्क्रा' पत्राचा पक्ष व इतर पक्ष असे दोन तट पडलेले दिसत होते. पण सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची संघटना व धोरण या दोन प्रश्नावर तर खडाजंगीच उडाली व खुद्द 'इस्क्रा' पक्षांतही दोन तट पडले. या तटांपैकीं बहुमत-

वाला पक्ष लेनिन व प्लेखानोव्ह यांच्या बाजूचा होता. मार्टोव्ह, पोट्रेसॅव्ह व ॲक्सेलरॉडप्रभृति पुढारी अल्पमतवाल्यांचे अध्वर्यु होते. रशियन राज्यक्रांतीच्या वेळीं बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक या नांवांनीं प्रसिद्ध झालेले पक्ष या कॉंग्रेसमध्येंच निर्माण झाले. या कॉंग्रेसमध्यें ज्या दोन प्रश्नांची विशेष चर्चा झाली त्यांच्या बाबतींत कोणत्या बाजूला किती प्रतिनिधि आहेत हें अजमावण्यासाठीं मतें घेण्यांत आलीं; त्या वेळीं ज्या बाजूला बहुमत झालें त्या मंडळींना बहुमतवाले (बोल्शेव्हिक) व ज्या बाजूला अल्पमत पडलें त्या मंडळींना अल्पमतवाले (मेन्शेव्हिक) अशीं नांवें पडलीं व पुढील चळवळींत याच नांवांनीं या दोन्ही पक्षांचा उल्लेख करण्यांत येऊं लागला. पण यापुढें बोल्शेव्हिक काय किंवा मेन्शेव्हिक काय दोन्ही पक्षांच्या बाजूला त्यांच्या नांवांप्रमाणें नेहमींच बहुमत व अल्पमत राहिलें असें मात्र नाहीं. बहुमतवाले (बोल्शेव्हिक) कधीं अल्पमतवाले (मेन्शेव्हिक) झाले तर उलट अल्पमतवाले (मेन्शेव्हिक) बहुमतवाले (बोल्शेव्हिक) झाले. तथापि त्यामुळें त्यांचीं नांवें मात्र बदललीं नाहींत. दुसऱ्या कॉंग्रेसमध्यें लेनिनप्रभृति बहुमतवाल्यांनीं पुरस्कृत केलेल्या तत्त्वाचे अभिमानी ते बोल्शेव्हिक व त्या वेळीं त्यांना विरोध करणारे ते मेन्शेव्हिक असें जें एकदां ठरलें तें ठरलें व बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक या शब्दांचा मूळ अर्थ नष्ट झाला.

"सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची शिस्त तिच्या सभासदांनीं कसोशीनें पाळली पाहिजे. या पार्टीचे शिस्तीचे नियम कडक असले पाहिजेत. ते न पाळणारांस पार्टींतून हांकून दिलें पाहिजे. एका मध्यवर्ती मंडळाकडून पार्टीच्या चळवळीचीं सूत्रें हालविण्यांत आलीं पाहिजेत. या पार्टीतर्फे झारशाहीविरुद्ध निरनिराळ्या ठिकाणीं चालविलेल्या चळवळींत एकसूत्रीपणा येण्यास वरील गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. भांडवलदारवर्गांतील जहाल पक्षानें झारशाहीविरुद्ध जी क्रांतिकारक चळवळ चालविली आहे तिला या पार्टीचा पाठिंबा असला तरी भांडवलदारवर्गांतील क्रांतिकारक पक्षाचे लोक व सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे लोक यांचीं ध्येयें मूलतःच भिन्न स्वरूपाचीं आहेत. रशियांतील उदारमतवादी पक्षाशीं संगनमत करून सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचें लोक आपलें स्वतंत्र अस्तित्व गमावण्यास केव्हांही तयार

होणार नाहींत. या पार्टींत सामील होणारा प्रत्येक मनुष्य प्रत्यक्ष काम करणारा असला पाहिजे. पार्टीच्या तत्त्वाबदल व धोरणाबद्दल केवळ सहानुभूति दाखविणाऱ्या लोकांना पार्टींत घेण्यांत येऊं नये." असा ब्रुसेल्स-लंडनच्या या दुसऱ्या कांग्रेसमध्यें लेनिन–प्लेखानोव्हप्रभृति बोल्शेव्हिकांनीं आपल्या तत्त्वाचा व धोरणाचा पुरस्कार केला होता. मार्टोव्ह, पोट्रेसेव्ह व ॲक्सेलरॉड या मेन्शेव्हिक पक्षाच्या पुढाऱ्यांनीं वरील तत्त्वाला व धोरणाला जोराचा विरोध केला. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची शिस्त फारशी कडक असतां उपयोगाची नाहीं. आपल्या मतांचा प्रसार होण्यास व आपल्या पार्टीतर्फे चाललेल्या चळवळी मोठ्या प्रमाणावर व सुलभ रीतीनें चालण्यास आपल्या पार्टीबद्दल सहानुभूति वाटणाऱ्या सर्व लोकांना पार्टींत सामील करून घेण्यांत यावें, असें मेन्शेव्हिकांचें मत होतें.

दुसऱ्या कॉंग्रेसमध्यें वरीलप्रमाणें तात्त्विक मतभेद होऊन दोन स्वतंत्र पक्ष पडल्यामुळें पार्टीच्या प्रत्यक्ष घटनेच्या बाबतींतही तंटे उपस्थित झाले. 'इस्का' पत्राच्या संपादकवर्गांत कोणकोणाला घ्यावें या बाबतींतही मतभेद दिसून आला. मार्टोव्हनें 'इस्का'च्या संपादकीय वर्गांत सामील होण्याचें नाकारलें. ब्रुसेल्स–लंडनची कॉंग्रेस झाल्यानंतर ट्रॉट्स्कीनें मार्टोव्हशीं सहकार्य करण्याचें ठरविलें. ट्रॉट्स्कीनें प्रथम प्रथम लेनिनला पाठिंबा दिला तरी मार्टोव्हशीं संबंध आल्यानंतर त्याचीं मतें बदलूं लागलीं. ट्रॉट्स्कीचें हें मतपरिवर्तन कॉंग्रेसच्या बैठकींतच व्यक्त होऊं लागलें होतें. मार्टोव्हसारखा आपला जुना दोस्त प्रतिपक्षाला जाऊन मिळाला, तरुण व कर्तबगार ट्रॉट्स्कीही आपल्याला सोडून गेला, हें पाहून लेनिनला अत्यंत वाईट वाटलें. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत शाब्दिक सहानुभूति दाखविणाऱ्या लोकांची खोगीरभरती करण्यास लेनिन तयार नव्हता. दिवस रात्र न पाहतां स्वार्थत्यागपूर्वक कसून काम करणारे निवडक लोकच त्याला या पार्टींत पाहिजे होते. दक्षिण रशियांत सार्वत्रिक संप होणार असें त्याला वाटूं लागलें होतें. आपल्या पार्टीचें सामर्थ्य वाढविण्याच्या दृष्टीनें या संपाचा उपयोग करून घ्यावा, संपवाल्या कामगारवर्गाला कम्युनिझम्‌ची जाणीव करून द्यावी, त्यांना क्रांतिकारक बनवावें, कारखान्यांतून काम करणाऱ्या कामकरीवर्गाला क्रांतिकारक चळवळीचें पुढारीपण मिळेल

इतकें सामर्थ्य या वर्गांत निर्माण करावें व अशा रीतीनें कामकरीवर्गानें संघटित होऊन देशांतील शेतकरीवर्गाचा विश्वास त्यानें संपादन करावा अशी लेनिनची इच्छा होती व त्यामुळेंच सोशल डेमोक्रॅटिक पार्टी अत्यंत कडक शिस्तीच्या तत्त्वावर चालवावी असें त्याचें मत होतें.

ब्रुसेल्स व लंडन या दोन्ही ठिकाणीं झालेल्या कॉंग्रेसच्या बैठकीच्या वेळीं लेनिननें आपलें समचित्तत्व बिघडूं दिलें नाहीं. अत्यंत शांत चित्तानें तो त्यांत भाग घेत असे. आपल्या पार्टीत फूट पडूं नये याबद्दल लेनिननें फारच कसोशीनें प्रयत्न केला. निःपक्षपातीपणाबद्दल लेनिनची ख्याति होती. यामुळें बऱ्याच प्रसंगीं कॉंग्रेसमधील बैठकींचें अध्यक्षस्थान त्याला देण्यांत आलें होतें. पक्षाच्या पुढाऱ्यांत मतभेद झाले तरी प्रत्यक्ष काम करतांना दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांनीं संगनमतानें काम करावें, विशेषतः ‘ इस्क्रा ’ पत्राच्या संपादनाच्या कामांत तर सर्वांनीं एकदिलानें सहकार्य करावें अशी पुष्कळ खटपट लेनिननें करून पाहिली, पण या खटपटीचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

ब्रुसेल्स–लंडनची ही दुसरी कॉंग्रेस झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे नोव्हेंबरच्या सुमारास जिनिव्हा येथें परदेशांतील रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या लोकांच्या संघाची एक कॉंग्रेस भरविण्यांत आली. दुसऱ्या कॉंग्रेसमध्यें घडलेल्या गोष्टींचा वृत्तांत लेनिन व मार्टोव्ह या दोघांनीं या कॉंग्रेसपुढें मांडावा अशी संघाच्या चालकांनीं त्यांना विनंति केली होती. या कॉंग्रेसला हजर राहण्याकरितां लेनिन जिनिव्हा येथें येऊन राहिला होता. जिनिव्हा येथील आपल्या बिऱ्हाडांतून कॉंग्रेसच्या जागीं सायकलवरून जातांना वाटेंत एक अपघात घडून आला. लेनिनची सायकल ट्रॅमच्या मागच्या बाजूला जाऊन आदळली. थोडक्यांत चुकलें, नाहीं तर लेनिनचा एक डोळाच फुटला असता. गहन विचारांत गढून गेल्यामुळें लेनिनचें लक्ष आपल्यापुढून जाणाऱ्या ट्रॅमकडे जावें तितकें गेलें नाहीं. जिनिव्हा येथें भरलेल्या संघाच्या सभेंत लेनिनवर व त्याच्या पक्षाच्या इतर मंडळींवर जोराची टीका करण्यांत आली. संघाच्या या बैठकींत लेनिनच्या मताचे लोक फारसे नव्हते. मेन्शेव्हिकांचेंच या सभेंत बहुमत होतें. लेनिननें आपली बाजू या कॉंग्रेसपुढें जोरानें मांडली. पण त्याचा कांहीं उपयोग

झाला नाहीं. केवळ दोन महिन्यांपूर्वी निवडलेल्या पार्टीच्या मध्यवर्ती (सेंट्रल) कमिटीशीं आपला कांहीं संबंध नाहीं असें ज्या वेळीं या संघानें (लीगनें) मार्टोव्हच्या सूचनेवरून जाहीर केलें त्या वेळीं लेनिन व त्याचे अनुयायी संतापानें या कॉंग्रेसमधून निघून गेले.

याच वेळीं लेनिनच्या अंतःकरणाला चटका लावणारी आणखी एक गोष्ट घडून आली. कॉंग्रेसमध्यें घडून आलेल्या या अनेक प्रकारांमुळें प्लेखानोव्हची वृत्ति चलबिचल होऊं लागली. त्याचा जुना दोस्त ॲक्सेलरॉड मेन्शेव्हिक पक्षाला जाऊन मिळाला ही गोष्ट त्याला रुचली नाहीं. प्लेखानोव्ह ॲक्सेलरॉडचें मतांतर करूं शकलाच नाहीं तर उलट ॲक्सेलरॉडनें प्लेखानोव्हला आपलेंसें केलें. यामुळेंच प्लेखानोव्हनें 'इस्क्रा' पत्राच्या संपादकमंडळांतील मेन्शेव्हिक पक्षाचे पूर्वींचे सर्व सभासद पुन्हा त्याच जागीं राहूं द्यावे, त्यांतून कोणासही काढूं नये, असा हट्ट धरला. मार्टोव्हनें 'इस्क्रा'च्या संपादकमंडळांत राहून आपल्याशीं सहकार्य करावें असें लेनिनला वाटत होतें तरी पूर्वींचे सर्वच सभासद या मंडळांत कायम राहावे व त्यामुळें 'इस्क्रा' पत्राचें धोरणही बदलावें ही गोष्ट त्याला पटणें शक्य नव्हतें; म्हणून लेनिननें 'इस्क्रा' पत्राच्या संपादकीय कामांतून आपलें अंग काढून घेतलें. पण 'इस्क्रा'वर पूर्ण बहिष्कार घालण्यास तो तयार नव्हता. तथापि परिस्थितीच अशी निर्माण झाली कीं, 'इस्क्रा' पत्राची सर्व संपादकीय व्यवस्था त्याला प्लेखानोव्हच्या हातीं सोंपवावी लागली व पत्राशीं असलेला आपला संबंध त्याला पूर्णपणें तोडावा लागला. यामुळें 'इस्क्रा' पत्र मार्टोव्ह, पोट्रेसेव्ह, व्हेरा झासुलिच् यांच्या हातीं गेलें. १९०३ च्या डिसेंबरमध्यें 'इस्क्रा'मध्यें लेनिनचा एक लेख प्रसिद्ध झाला. या पत्रांत प्रसिद्ध झालेला लेनिनचा हा शेवटचाच लेख होय. पॉप्युलिस्ट पक्षाचें अस्पष्ट धोरण, मध्यमवर्गानें पुरस्कृत केलेला भिळमिळीत समाजवाद व त्यामुळें रशियांतील शेतकरीवर्गांत उत्पन्न झालेली समाजवादविरोधक वृत्ति, या सर्वांचा समाचार लेनिननें आपल्या या शेवटच्या लेखांत घेतला होता व त्याच्यावर सडकून टीका केली होती. याच कामाकरितां लेनिननें 'इस्क्रा' पत्र सुरू

केलें होतें. पण वेळच अशी आली कीं, लेनिनला हें पत्र दुसऱ्याचे हातीं द्यावें लागलें !

रशियांत व रशियाबाहेरच्या देशांत चाललेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या चळवळींत मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक दोघेही काम करीत होते. पण रशियांतील या पक्षाच्या सेंट्रल कमिटींत व 'इस्क्रा' पत्राच्या संपादक-मंडळांत मेन्शेव्हिकांचा वरचष्मा झाल्यामुळें लेनिनवर सर्व बाजूंनीं टीकेचा मारा होऊं लागला. कॉट्स्कीनें लेनिनच्या धोरणाविरुद्ध लेख लिहून त्याच्यावर सडकून टीका करण्यास सुरुवात केली. पोलंडमधील सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील पुढारी रोझा लक्झेंबर्ग हिनेंही लेनिनवर टीकेचा मारा सुरू केला. आणि पुढें पुढें तर असें होऊं लागलें कीं, लेनिननें सुरू केलेल्या पत्रांतूनच त्याच्यावर टीका होऊं लागली व लेनिनचें वर्चस्व कमी करण्याकरितां या पत्राचा उपयोग करण्यांत येऊं लागला. रशियांतील सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या सेंट्रल कमिटीनें तर याहीपुढें पाऊल टाकलें. सेंट्रल कमिटीतर्फें कामगारचळवळीच्या प्रसारार्थ परदेशांतून ज्या अनेक खटपटी होत त्यांच्याशीं लेनिननें यापुढें कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवूं नये, असें त्यास कळविण्यांत आलें आणि पार्टीतर्फें लेनिनला जीं पुस्तकें छापावयाचीं असतील त्या बाबतींत-ही त्यानें कमिटीची संमति घेतली पाहिजे, असा ठराव करण्यांत आला. याप्रमाणें रशियांत सर्वच बाजूंनीं लेनिनला विरोध होऊं लागल्यामुळें पार्टीच्या सेंट्रल कमिटीवरील सभासदत्वाचाही राजीनामा त्याला द्यावा लागला. 'इस्क्रा' पत्र लेनिनच्या हातून काढून घेण्यांत आलें व पार्टीच्या परदेशांतील चळवळीशीं असलेला त्याचा संबंध तोडण्यांत आला. तिसऱ्या कॉंग्रेसच्या बैठकींत बोल्शेव्हिकांचा वरचष्मा होता, पण प्रत्यक्ष चळवळी चालविणाऱ्या संस्थांतून मेन्शेव्हिकांचेंच वर्चस्व असल्याचें दिसून आलें. लेनिन व त्याचे कांहीं थोडे साथीदार यांच्यावर जणूंकाय बहिष्कारच टाकण्यांत आला. या परिस्थितींत लेनिननें कांहीं दिवस विश्रांति घ्यावयाचें ठरविलें व तो आपल्या पत्नीसह स्वित्झर्लंडमधील डोंगराळ भागांत जाऊन राहिला. याप्रमाणें चित्ताचे स्वास्थ्य बिघडविणारे प्रसंग ज्या ज्या वेळीं येत त्या वेळीं लेनिन असाच एकांतांत जाऊन राहात

असे व डोंगरपठारावरील व नदीतीरावरील ताजी हवा खाऊन तो ताजातवाना होत असे. लेनिन या भागांत जवळ जवळ एक महिनाभर राहिला. क्रुप्सकायानें या प्रवासाचें फारच मजेदार वर्णन केलें आहे. "जनसंमर्दापासून अगदीं दूर अशा डोंगराळ भागांत आम्ही या दिवसांत फिरत होतों. अमुक एका ठिकाणीं जावयाचें किंवा अमुक एका ठिकाणीं राहावयाचें असें आमचें कांहीं ठरलेलें नव्हतें. दिवसभर रानावनांतून फिरावें, ज्या ठिकाणीं पांणी आढळेल त्या ठिकाणीं फराळ करावा व रात्रीं कोणत्या तरी एखाद्या लहानशा खेड्यांतील झोंपडींत विश्रांति घ्यावी. दिवसभर झालेल्या श्रमामुळें आंथरुणाला पाठ टेकली कीं आम्हांला झोंप लागे. या सर्व प्रवासांत आम्हांला मनाजोगतें असें जेवण कधींच मिळालें नाहीं. या खेड्यांतून अंडीं, चीज, वाळली कोळली भाकरी जी काय मिळेल ती विकत घेऊन खावी व त्यावर स्वच्छ झऱ्याचें पाणी प्यावें. या प्रवासांत आम्हांला मद्य फारच थोड्या ठिकाणीं मिळालें. स्वित्झर्लंड-मधील वनश्रीनें भरलेल्या या डोंगराळ भागांतून हिंडत असतां अनेक विषयांवर आमचीं भाषणें चालत. या वेळीं राजकारणासंबंधानें आम्ही फारच थोडी चर्चा करीत असूं. काव्य, नाटकें व कादंबऱ्या वगैरे ललित वाङ्मयांतील अनेक प्रसंगांसंबंधानें आमच्या चर्चा चालत. अशा रीतीनें फार तर एक महिना आम्हीं घालविला. पण एवढ्या विश्रांतीमुळें लेनिन ताजातवाना झाला व तो पुन्हा आपल्या कामाला लागला."

सोशल डेमोक्रॅट्रिक पार्टीमधील मंडळींनीं लेनिनला पदोपदीं विरोध केला तरी कामगारवर्गांतील सर्व जनता आपल्याच मागें आहे अशी लेनिनची खात्री होती. परदेशांतील चळवळीच्या बाबतींत लेनिननें आपल्याशीं कांहीं संबंध ठेवूं नये असा पार्टीच्या सेंट्रल कमिटीनें ठराव केला होता तरी हा हुकूम त्यानें धाब्यावर बसविला व परदेशांतील ठिकठिकाणच्या कार्य-कर्त्यांशीं पत्रव्यवहार करून सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची तिसरी कॉंग्रेस भरविण्याच्या तयारीस तो लागला. 'इस्क्रा' पत्र मेन्शेव्हिकांनीं आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें आपल्या पार्टीकरितां नवीन पत्र काढणें अवश्य आहे असें लेनिनला वाटलें व 'व्हपेरेड' (फॉरवर्ड-आघाडी) या नांवाचें नवीन पत्र काढण्याचीही त्यानें तयारी चालविली. 'इस्क्रा' पत्र चालू असतांना

पुन्हा एक, नवीन पत्र सुरूं करावयाचें हीं सोपी गोष्ट नव्हती. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीतील सर्व नांवाजलेली विद्वान् मंडळी 'इस्क्रा'मध्यें काम करीत होती. 'इस्क्रा' पत्र सुरूं करण्याच्या वेळीं संपादकवर्गासंबंधानें लेनिनला फारशी काळजी करावी लागली नाहीं. हीं मंडळी तयारच होती. पण या नवीन पत्राच्या बाबतींत मूळापासून सर्व तयारी त्याला करावी लागली. हें पत्र कोठें छापावयाचें, कोणीं छापावयाचें, त्याच्या प्रकाशनाची व्यवस्था कोणी करावयाची, याला लागणारा पैसा कोठून आणावयाचा, आणि या सर्व काळजीबरोबरच आणखी या पत्रांत लिहावयाचें कोणीं याचीही काळजी लेनिनला करावी लागली. 'इस्क्रा' पत्राच्या वेळीं लेनिनला पक्षांतील सर्व मंडळींचा पाठिंबा होता. या वेळीं आपल्या बाजूच्या सामान्य बुद्धीच्या मंडळींच्या हातूनच त्याला हें काम करून घ्यावयाचें होतें. सैबेरियांतील हद्दपारीच्या दिवसांत 'इस्क्रा' पत्राच्या प्रकाशनासंबंधानें व त्याच्या द्वारें आपल्या पक्षाची संघटना करण्यासंबंधानें आपण कितीतरी विचार केला व आपले व आपल्या दोस्तांचें श्रमसर्वस्व खर्ची घालून आपल्या पक्षाची उभारणी केली; पण या सर्व श्रमांचा इतरांनींच फायदा घेतला व आपल्याला पुन्हा 'नवी विटी नवा डाव' सुरूं करावा लागला, याबद्दल लेनिनला थोडासा विषाद वाटला. पण या परिस्थितीलाही त्यानें तोंड दिलें.

लेनिन स्वित्झर्लंडमध्यें एक महिनाभर फिरावयास गेला; पण जाण्यापूर्वी त्यानें आपल्या विश्वासांतील तरुण स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांची एक सभा भरविली होती व नव्या पत्राच्या बाबतींत व तिसरी कॉंग्रेस भरविण्याच्या बाबतींत कोणीं कोणीं कसकशीं कामें करावयाचीं, याची आंखणी त्यानें करून दिली होती. स्वित्झर्लंडहून परत आल्यानंतर लेनिननें ताज्या दमानें हे काम पुढें चालविलें. रशियांतील व इतर देशांतील आपल्या मंडळींशीं त्यानें खूप पत्रव्यवहार केला. परदेशांतील २२ प्रमुख बोल्शेव्हिक पुढाऱ्यांच्या सहीनें तिसऱ्या कॉंग्रेसचें निमंत्रणपत्र काढावयाचें त्यानें ठरविलें व त्याबरोबर नव्या पत्राची सर्व व्यवस्थाही त्यानें केली. इतकी सर्व तयारी करण्याला लेनिनला जवळ जवळ एक वर्ष लागलें व या वर्षाच्या अखेरीस हें पत्र सुरूं करण्यासंबंधाची नोटीस प्रसिद्ध झाली.

१९०४ हें वर्ष लेनिनला एकंदरींत अत्यंत कष्टांचेंच गेलें. रशियांतील कामगारवर्गाची चळवळ चालविणारा सोशल डेमोक्रॅटिक पक्ष ज्या वेळीं अत्यंत संघटित असावयास पाहिजे होता त्या वेळींच तो नेमका विस्कळित झाला. रशियांतील कामगार व शेतकरी वर्गाच्या परिस्थितीचें लेनिननें सूक्ष्म निरीक्षण केलें होतें व आपला पक्ष सर्व बाजूंनीं संघटित करून या परिस्थितीचा पूर्ण फायदा घेतां येईल असें त्याला वाटलें होतें. पण त्याचें हे बेत फिसकटले. अगदीं ऐन वेळीं त्याला आपल्या पक्षाची स्वतंत्र संघटना करावी लागली व या कामीं त्याला अत्यंत कष्ट सोसावे लागले. कौटुंबिक दृष्टयाही लेनिनवर या दिवसांत एक आपत्ति आली. कीव्ह येथें रहात असलेल्या त्याच्या भावाला व त्याच्या दोन बहिणींना अटक करण्यांत आली. या अटकेनंतर लेनिनला त्याच्या आईचें एक पत्र आलें. "आपल्याजवळ असलेला आपला एक मुलगा व आपल्या लाडक्या दोन्ही मुली सरकारनें पकडून नेल्यामुळें जगांत आतां मी अगदीं एकाकी झालें आहे." अशा आशयाची आपली हृदयद्रावक कहाणी तिनें या पत्रांत लिहिली होती. लेनिनसारखा कर्तबगार व हुशार मुलगा रशियांत राहूं शकत नव्हता व बाकीचीं जीं मुलें तिच्याजवळ होतीं त्या मुलांनाही सरकारनें तुरुंग दाखविला, हें पाहून त्या माउलीचें अंतःकरण विदीर्ण झालें असल्यास त्यांत नवल नाहीं. पण आपलीं मुलें इतर प्रापंचिक लोकांप्रमाणें पैशाच्या व सुखाच्या मागें लागलेलीं नाहींत, आपल्या ध्येयाच्या सिद्धीकरितां तीं अनेक प्रकारचे कष्ट सोसण्यास तयार आहेत, या समाधानामुळेंच असल्या दुःखद प्रसंगांचा तिला विसर पडत असे. आईचें पत्र वाचून लेनिनलाही वाईट वाटलें. पण जें कार्य आपण आपल्या अंगावर घेतलें आहे त्याकरितां असले कष्ट सोसणें प्राप्तच आहे या समजुतीनें लेनिननेंही हें दुःख मागें सारलें. या दिवसांत लेनिनच्या अंतःकरणाला अत्यंत लागून राहिलेली गोष्ट म्हणजे मार्टोव्ह आणि प्लेखानोव्ह यांच्याशीं त्याचा मतभेद झाला ही होय. या दोन्ही पुढाऱ्यांवर त्यानें व्यक्तिशः अशी कधींच टीका केली नाहीं. या दोघांबद्दल त्याला मत्सर तर कधींच वाटला नाहीं. या वर्षी लेनिनवर अनेक दुःखद प्रसंग आले तरी त्या सर्वांना त्यानें मोठ्या धैर्यानें तोंड दिलें. या वर्षाच्या अखेरीस जिनिव्हा

येथें तेथील कामगारमंडळींपुढें त्याचें एक व्याख्यान झालें. या व्याख्यानास व्हेरा झासुलिच् हजर होती. लेनिनची ध्येयनिष्ठा, त्याची निःसंदिग्ध विचारसरणी, त्याचा आत्मविश्वास व श्रोत्यांना—विशेषतः कामगार श्रोत्यांना आपलेंसें करून टाकण्याची त्याची हातोटी, हें सर्व पाहून तिनें पुढील उद्गार काढले :—

"होय, एखादा नेताच अशा प्रकारचें भाषण करूं शकतो. जनतेला आपलें म्हणणें पटवून देऊन तिला आपल्यामागें घेऊन जाण्यास लेनिनच समर्थ आहे."

व्हेरा झासुलिच्चे हे उद्गार अक्षरशः खरे होते. १९०४ मध्यें लेनिनविरुद्ध कितीहि काहूर उठलें तरी त्यानें आपल्या ध्येयांत किंवा धोरणांत यत्किंचितही बदल केला नाहीं. कामगारवर्गाला आपलें ध्येय पटविण्याचें कार्य त्यानें आत्मविश्वासानें आपल्याबरोबर राहिलेल्या थोड्याशा दोस्तांसह पुढें चालविलें व त्याच्या यत्नास यशही आलें. त्यानें योजलेल्या नवीन पत्राचा पहिला अंक १९०५ च्या जानेवारीच्या ४ तारखेस बाहेर पडला. १९०४ सालीं सर्व बाजूंनीं खालावलेल्या लेनिनच्या पक्षानें १९०५ सालीं आपलें डोकें वर काढलें व या सालीं रशियांत झालेल्या क्रांतीच्या चळवळींत त्यानें पुढारीपणानें भाग घेतला. बोल्शेव्हिक पक्षाच्या या पुढील विजयाच्या दृष्टीनें १९०५ च्या जानेवारींत सुरू झालेल्या 'आघाडी' या पत्रानें शुभशकुनच केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें पत्र छापण्याची सर्व तयारी झाल्यानंतर,

"कामगारजनतेंतील चैतन्य जागें होत आहे. उत्साहानें पुढें या. आपण मागें सरलों नाहीं. आपण सारखें पुढें पुढेंच जात आहों."

असा संदेश त्यानें आपल्या सांथीदारांना पाठविला.

# १९०५

'अघाडी' पत्र सुरू झालें त्या वेळीं लेनिननें पाठविलेला संदेश अर्थपूर्ण होता. रशियांतील कामकरी व शेतकरीवर्ग झपाट्यानें जागा होत आहे व तो आपल्या हक्काकरितां प्रतिपक्षाशीं लढण्यास तयार होत चालला आहे हें लेनिननें पाहिलें होतें. १८९० सालचे रशियांतील कामकरी व १९०२ सालचे तेथील कामकरी यांच्यांत पुष्कळ फरक पडला होता. १८९० सालींही रशियांतील कामकरी संप करीत असत. हे संप लेनिननेंही चालविले होते. पण १९०२ सालच्या सुमारास झालेल्या संपांचें स्वरूप अगदीं निराळें होतें. या संपांमधून कामगारांची संघशक्ति किती तरी वाढलेली दिसत होती. १८९० सालांत झालेले संप किरकोळ व विस्कळित स्वरूपाचे असत. निरनिराळ्या कारखान्यांतून व गिरण्यांतून वेळोवेळीं संप होत असत, पण आपल्या मागणीला सार्वत्रिक स्वरूप देऊन तिच्याकरितां सर्वांनीं एकोप्यानें सार्वत्रिक संप करण्याची कला त्या वेळच्या कामगारांना साधलेली नव्हती. १९०२ सालीं दक्षिण रशियामध्यें एक प्रचंड सार्वत्रिक संप झाला. या संपांत कामगारांच्या वाढलेल्या संघटित शक्तीचा जसा प्रत्यय आला त्याचप्रमाणें कामगारवर्गाचा आत्मविश्वास, त्याचें साहस, त्याची स्वार्थत्यागाची तयारी व त्याचें युद्धकौशल्य या गोष्टीही प्रतीतीस आल्या. दक्षिण रशियांतील रॉस्टोव्ह व इतर अनेक शहरांतील कामगार या सार्वत्रिक संपांत सामील झाले होते. हा संप अर्थात् आर्थिक स्वरूपाचा होता. आपली स्थिति सुधारण्याकरितांच कांहीं मागण्या निश्चित करून त्या मिळविण्यासाठीं हा संप करण्यांत आला होता. पण कामगारांच्या या मागण्या मालकवर्गानें मान्य केल्या नाहींत. १८९० सालीं व त्या सुमारास जे संप झाले ते केवळ आर्थिक स्वरूपाचे होते; पण त्यानंतर मात्र कामगारांच्या चळवळीला निराळेंच स्वरूप प्राप्त

होत चाललें. आपल्या आर्थिक मागण्या मान्य करून घ्यावयाच्या असल्यास राजकीय हक्कही आपण संपादन केले पाहिजेत असें रशियांतील कामगारवर्गाला वाटूं लागलें. १९०२ सालीं झालेल्या या सार्वत्रिक संपांत कामगारवर्गांतील ही प्रवृत्ति स्पष्टपणें दिसून आली. हा संप चालू असतां तिकडील विद्यार्थ्यांनीं चालविलेल्या राजकीय चळवळींतही हे संपवाले सामील झाले. विद्यार्थ्यांच्या राजकीय मिरवणुकींतून ते भाग घेऊं लागले. या मिरवणुकीवर झालेल्या पोलिसांच्या हल्ल्याला त्यांनीं तोंड दिलें. सरकारी हुकुमानें मनाई करण्यांत आलेल्या सभांना ते हजर राहूं लागले. कामगारवर्गाची ही शक्ति पाहून झारच्या सरकारनेंही या वेळीं थोडी माघार घेतली. यामुळें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुढाऱ्यांना मात्र चांगली संधि सांपडली. १९०२ व १९०३ मध्यें रशियांत सार्वत्रिक संपाची चळवळ चालू होती व तेवढ्या अवकाशांत झारशाहीच्या एकतंत्री सत्तेविरुद्ध कामगारवर्गांत क्रांतीचें बीज पेरण्याचें काम या पक्षाच्या लोकांनीं यशस्वी रीतीनें केलें.

रशियांत या वेळीं झपाट्यानें वाढत असलेल्या कामगारवर्गांत ज्याप्रमाणें असंतोष पसरला होता त्याचप्रमाणें शेतकरीवर्गही असंतुष्ट झाला होता. जमीनदारांनीं लादलेला बेसुमार खंड भरतां भरतां तो जेरीस आला होता. कर्जाच्या ओझ्याखालीं तो दडपून गेला होता. गुरचराईच्या रानांच्या बाबतींत अनेक प्रकारचे निर्बंध लादल्यामुळें शेतकऱ्याला शेती करणें मुष्कील झालें होतें. शेतांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या खेडेगांवतून वाढत चालली होती व आपल्या गावांत पोट भरेनासें झालें म्हणजे हे मजूर शेतकरी शहराची वाट धरीत होते. रशियांतील युक्रेन भागांतील जमीन अत्यंत सुपीक आहे. या सुपीक जमिनींतून काबाडकष्ट करून पीक निर्माण करावें पण वर्षाकाठीं आपल्या उदरनिर्वाहापुरतेंसुद्धां धान्य आपल्याजवळ राहूं नये या गोष्टीला तेथील शेतकरी अर्थातच कंटाळले होते. या भयंकर परिस्थितीला तोंड देण्याकरितां तेथील शेतकऱ्यांनीं १९०२ सालीं बंडाचें निशाण उभारलें. जमीनदारांचीं कोठारें या शेतकऱ्यांनीं जाळून टाकलीं व गांवाखालची जमीन शेतकऱ्यांची आहे, जमीनदारांचा तिच्यावर हक्क नाहीं, ही जमीन

शेतकऱ्यांत वांटून टाकली पाहिजे, अशा प्रकारच्या घोषणा या बंडाच्या वेळीं करण्यांत आल्या.

झारच्या सरकारनें शेतकऱ्यांचें हें बंड अर्थात्‌च अत्यंत निर्दयतेनें मोडून टाकलें. शेतकऱ्यांमधील ही चळवळ मोडून टाकण्याकरितां शिपायांच्या पलटणी खेडेगांवांवर हल्ला करूं लागल्या व त्यांच्यावर गोळीबार करूं लागल्या, त्या वेळीं तेथील शेतकरीवर्गाला आश्चर्य वाटूं लागलें. हें बंड मोडण्याकरितां पोलिसांनीं जे अत्याचार केले ते अत्यंत क्रूर होते. बंडांत भाग घेतलेल्या कांहीं शेतकऱ्यांना मरेमरेतों फटके मारण्यांत आले. कित्येकांना महिनोगणती तुरुंगांत डांबून त्या ठिकाणीं त्यांचे नानाप्रकारचे हाल करण्यांत आले. तुरुंगांतील छळानें अर्धमेल्या झालेल्या या शेतकऱ्यांना कुत्र्यांमांजरांसारखें तुरुंगांतून बाहेर ओढून काढलें व पायीं चालावयास लावून झोडपीत झोडपीत सैबेरियांत पोंचविण्यांत आलें. पोलिसांच्या या अत्याचारांमुळें हें बंड मोडलें गेलें, तरी झारनें या शिपायांना असा हुकूम दिला नसला पाहिजे असेंच या भाविक शेतकऱ्यांना वाटलें. कांहीं झालें तरी झार आपल्या बाजूचा आहे. तो आपला 'लहान बाप' आहे, पोलिसांनीं केलेल्या अत्याचारांबद्दल तो त्यांना शिक्षा करील, अशीच त्यांची समजूत होती. हें बंड मोडल्यानंतर या शेतकऱ्यांच्या हालांत अधिकच भर पडली व त्यांच्या कल्पनेप्रमाणें त्यांच्या 'लहान बापा'नें शिपायांना मुळींच दंड केला नाहीं, हें पाहून त्यांच्या श्रद्धावंत अंतःकरणाला धक्का बसला व 'लहान बापा'वरील त्यांचा विश्वास कमी कमी होत चालला.

कामकरी व शेतकरीवर्गातील या वाढत्या असंतोषामुळें रशियांत या वेळीं क्रांतीचें वारें जोरानें वाहूं लागलें होतें. क्रांतीच्या भावनांच्या मुळाशीं असलेल्या असंतोषाचीं कारणें नष्ट करून क्रांतीच्या चळवळीला आळा घालण्याचा सल्ला या वेळीं झारला त्याच्या प्रधानांनीं द्यावयास पाहिजे होता. पण झारच्या विश्वासांतील मंडळींनीं त्याला उलटाच सल्ला दिला. या प्रधानांपैकीं प्लेव्ह हा झारच्या विश्वासांतला आवडता प्रधान होता. कांहीं थोड्या ध्येयवादी चळवळ्या लोकांनीं ही चळवळ चालविली आहे, देशांतील सामान्य जनतेचा या चळवळीला पाठिंबा नाहीं, अशी या लोकांनीं झारची समजूत करून दिली. आणि ही चळवळ

हाणून पाडावयाची म्हणजे या चळवळ्यांचा नायनाट करावयाचा असें प्लेव्हनें ठरविलें. त्यानें प्रथम रशियांतील ज्यू लोकांवर हत्यार उचललें. क्रांतिकारी मंडळींत ज्यू लोकांचा जास्त भरणा आहे, तेव्हां देशांतील ज्यू लोकांची जमातच जर नष्ट करण्यांत आली तर या चळवळीच्या नाड्या कायमच्याच थंड पडतील अशी प्लेव्हची समजूत झाली होती. परिस्थिति मात्र याच्या उलट होती. क्रांतिकारक चळवळीमध्यें ज्यू लोकांनीं फारसा भाग घेतलेला नव्हता. कांहीं थोडे ज्यू लोक क्रांतिकारकांना येऊन मिळाले होते. पण अधिकाऱ्यांची एकदां झालेली समजूत दूर कोण करूं शकणार ? रशियांत जेथें जेथें ज्यू मनुष्य आढळेल तेथें तेथें त्याला शासन करण्याचें प्लेव्हनें या वेळीं फर्मान काढलें. बेस अरेबियांतील किशिनेव्ह या गांवीं ज्यू लोकांची सर्वांत मोठी वस्ती होती. या वस्तीवर तर उघड उघड स्वारी करण्यांत आली. शेकडों ज्यूंना व त्यांच्या बायकामुलांना कापून काढण्यांत आलें. या वस्तींतील घरें लुटण्यांत आलीं व तीं शेवटीं जाळून टाकण्यांत आलीं. प्लेव्हच्या या कृत्यामुळें देशांत सर्वत्र हाहाःकार उडाला. आणि या किशिनेव्हच्या कत्तलीनंतर थोड्याच दिवसांत प्लेव्हचा त्याच्याच एका विश्वासांतल्या माणसानें खून केला.

प्लेव्हचा खून करणारा अझेव्ह नांवाचा एक ज्यू होता. क्रांतिकारकांत शिरून त्यांच्या सर्व बातम्या सरकारला पुरविण्याचें काम तो करीत होता. प्लेव्हचा हा आवडता हस्तक होता व त्याच्याच सल्ल्यानें त्यानें हें हेरगिरीचें काम पत्करलें होतें. क्रांतिकारकांचा आपल्यावर विश्वास बसावा म्हणून अझेव्ह नेहमीं अत्यंत धाडसाचीं कामें करीत असे. असलीं कामें करतांना तो प्राणाचीहि पर्वा करीत नसे. पण किशिनेव्ह येथें झालेल्या कत्तलीमुळें त्याच्या मनानें उलट खाल्ली. त्यानें हेरगिरीचें काम अजिबात सोडलें; इतकेंच नव्हे तर प्लेव्हचा खून करण्याचा कट त्यानें रचला व आपला बेत यशस्वी रीतीनें तडीस नेला.

रशियांत याप्रमाणें सर्वत्र असंतोषाची चळवळ माजून राहिली आहे असें दिसत असतांही झारनें व त्याच्या अधिकाऱ्यांनीं तिच्याकडे दुर्लक्ष केलें; इतकेंच नव्हे तर आपल्या घरांतील ही आग अशीच जळत ठेवून दुसऱ्याच्या घरावर निखारे ठेवण्यासही ते तयार झाले. आशियांतील कोरिया

देशावर रशियाचें बरेच दिवस लक्ष होतें. रशियाच्या राज्यकारभाराचा वाढता खर्च—विशेषतः झारच्या वाढत्या राजघराण्याचा वाढता खर्च भागविण्याकरितां कोठेंतरी मुलुखगिरी केली पाहिजे असें झारला वाटत होतें. या मुलुखगिरीच्या दृष्टीनें झारनें कोरियांत कोणत्या तरी निमित्तानें प्रवेश करण्याचें ठरवलें.

झारचें रोमानोव्ह घराणें या वेळीं खरोखरीच अमर्याद वाढलें होतें. या घराण्यांतील जवळचे नातेवाईक असे पन्नास जहागीरदार होते. प्रत्यक्ष गादीवर असलेल्या या झारचा राजपरिवार व या पन्नास जहागीरदारांचा परिवार सरकारच्या तिजोरींतूनच पोसला जात होता. झार व त्याचे जवळचे नातेवाईक असलेले हे जहागीरदार या सर्वांचा दर्जा सारखाच मानला जात असे. तेव्हां प्रत्यक्ष झारच्या कुटुंबांतील मंडळी ज्या इतमामानें व वैभवानें राहात, तितक्याच वैभवानें व इतमामानें या सर्व जाहागीरदारांच्या कुटुंबांतील मंडळी अर्थात्च राहावयास पाहिजेत. या घराण्यांतील तरुण मुलींना गायन व नर्तन शिकविण्याकरितां ज्या नर्तकी व गायिका ठेवण्यांत आल्या होत्या त्यांचें प्रस्थ त्यांच्या मालकिणींपेक्षांही जास्त वाढलें होतें. आपल्या थोरल्या बाईसाहेबांचा जसा पोषाख असेल व त्यांच्या जितक्या दासदासी असतील तितकीच आपली बरदास्त ठेवावयास पाहिजे असा हट्ट ह्या नर्तकी करीत व तो त्यांचा हट्ट त्या त्या घराण्यांतील पुरुष मंडळी पुरविण्यास तयार असत. राजघराण्याचा हा इतमाम व हें वैभव राखणें दिवसेंदिवस अशक्य होत चाललें होतें. सरकारी खजिन्याला दिवसेंदिवस हा बोजा सहन होईनासा झाला होता. तेव्हां हा खर्च भरून काढण्याकरितां कोरियासारख्या जपानच्या कोन्या वसाहतींत प्रवेश करण्याचें झारच्या सरकानें नक्की केलें व या बाबतींतील आपल्या अटी जपानी सरकारला कळविल्या. जपानी सरकारला या अटी अर्थात्च मान्य झाल्या नाहींत व त्यानें त्या धुडकावून लावल्या. याप्रमाणें १९०४ सालीं रशियानें जपानशीं आपण होऊन भांडण उकरून काढलें.

कोरियाचा मुलूख जिंकावयाचा म्हणजे केवळ हातचा मळ आहे असें झारच्या सेनापतींना वाटलें होतें. या लोकांनीं आपल्या सैनिकांचीही अशीच समजूत करून दिली होती. "रशियाचा युद्धांत कधींच पराभव

व्हावयाचा नाहीं" अशी परंपरागत समजूत होती व या समजुतीचा फायदा घेऊनच झारच्या सेनापतींनीं रशियन जनतेला या युद्धास प्रवृत्त केलें होतें.

पण या युद्धांत झारच्या सेनापतींना निराळाच अनुभव आला. या युद्धाकरितां जे सैनिक जमा करण्यांत आले होते ते सर्व नेहमींप्रमाणें शेतकरीवर्गांतलेच होते. या अडाणी तरुण शेतकऱ्यांना आपल्या खांद्यावर रायफली वागविणें जड झालें होतें, मग इतर सामान ते आपल्या पाठीवर कसें वागविणार! शिवाय या नवीन रिक्रूटांकडून अर्वाचीन युद्धांत जरूर असलेल्या लांब पल्ल्याच्या हालचाली कशा होणार! रशियांतल्या थंड प्रदेशांत राहणारे हे तरुण शेतकरी मांचूरियाच्या ओसाड व उष्ण प्रदेशांत अगदीं कुचकामाचे ठरले. आरमाराच्या बाबतींतही रशियाची तयारी व्हावी तशी झालेली नव्हती.

जपानची गोष्ट याच्या अगदीं उलट होती. जपानी तरुण सैनिक स्वदेशाभिमानानें भारलेले होते. रशियाशीं आपल्याला केव्हां तरी तोंड द्यावें लागणार, हें लक्षांत ठेवून जपाननें आपली सर्व युद्धसामग्री जय्यत राखली होती. सर्व अर्वाचीन शोधांचा उपयोग करून जपाननें खुष्कीच्या व आरमारी अशा दोन्ही युद्धाची तयारी जय्यत ठेवली होती. यामुळें या रुसो-जपानी युद्धांत रशियन सेनापतींच्या सर्व कल्पना खोट्या ठरल्या. सुशिमा व पोर्ट आर्थर या दोन्ही ठिकाणीं रशियाचा पूर्ण पराभव झाला आणि सर्व युरोपखंडांत रशियाचें नांव बद्दू झालें.

आशियांत मुलुखगिरी करून आपली घटत चाललेली तिजोरी भरून काढण्याकरितां झारनें व त्याच्या सल्लागारांनीं या युद्धाला हात घातला खरा, पण या युद्धामुळें नवीन मुलूख मिळाला नाहींच तर उलट तिजोरी रिकामी झाली व त्याबरोबरच रशियाची सर्व जगांत नाचक्की झाली. आणि या सर्वांत अनिष्ट गोष्ट म्हणजे खुद्द रशियांतील बहुजनसमाजाच्या असंतोषांत यामुळें भर पडली.

"पोर्ट आर्थरचा पाडाव झाल्यामुळें जगांतील भांडवलशाहीच्या वाढीला जोराचा पाठिंबा मिळाला व त्याबरोबरच कामगार जनतेच्या सामाजिक क्रांतीच्या चळवळीलाही एक जोराची कलाटणी मिळाली" असें लेनिननें

या युद्धासंबंधीं लिहितांना म्हटलें होतें. रशियन राज्यक्रांतीच्या बाबतींत तरी तें खरें ठरलें यांत शंका नाहीं. पोर्ट आर्थरमध्यें रशियाचें लष्करी सामर्थ्य धुळीला मिळाल्यामुळें रशियांतील जनतेच्या स्वातंत्र्याचे दिवस जवळ आले; इतकेंच नव्हे तर सर्व युरोपांतील कामगारचळवळींना नवीन क्रांतिकारक वळण लागलें.

युद्धांत पराभव पावल्यामुळें झालेला तोटा भरून काढण्यासाठीं झारच्या सरकारनें शेतकऱ्यांवर नवीन नवीन कर लादले व त्यामुळें त्यांच्या हालांत अधिकच भर पडली. या युद्धामुळें कामकरीवर्गाच्या हालांनाही सीमा राहिली नव्हती. कारखानदारांच्या जुलुमांमुळें कामगारवर्गांतील या असंतोषाचा फायदा देशांतील क्रांतिकारक चळवळ्या लोकांना घेतां येऊं नये म्हणून झारच्या सरकारनें आपल्या हस्तकांकरवीं रशियांतील निरनिराळ्या शहरांतून कामगारसंघही स्थापन केले होते. कर्नल झुबॅटोव्ह नांवाच्या सरकारच्या कृपेंतील एका इसमानें या संघाचा पुरस्कार केला होता व आपल्याला या कामांत यश मिळावें म्हणून या कार्यास चर्चचाही आशीर्वाद त्यानें मिळविला होता. पण रशियांतील 'झुबॅटोव्ह संघ' कामगारांवर होणारे अन्याय दूर करूं शकले नाहींत. या संघांनीं मागितलेल्या अगदीं किरकोळ मागण्यासुद्धां कारखानदारांनीं मान्य केल्या नाहींत. झुबॅटोव्हला या कार्यांत यश आलें नाहीं. उलट या संघाचें बल खच्ची करण्याकरितां मालकवर्गानें संघांतील कामगारवर्गाच्या पुढाऱ्यांना छळण्यास आरंभ केला. कामगारांचे संघ, मग ते कोणींही निर्माण केले तरी मालकवर्गाला ते नकोच असतात.या संघांचें महत्त्व मालकवर्ग कधींही वाढूं देत नाहीं व पदोपदीं त्यांच्या चळवळी हाणून पाडण्याचा तो प्रयत्न करीत असतो. रशियांतील कारखानदारांनीं हेंच केलें. संघांतील चळवळ्या पुढाऱ्यांना घडा देण्याकरितां पुटिलोव्ह कारखान्यांतील दोघां कामगार-पुढाऱ्यांना त्यांनीं कामावरून दूर केलें. कारखान्यांतील मजूर यामुळें अर्थातच संपावर गेले. पुटिलोव्हच्या प्रचंड कारखान्यांतील या संपानंतर पीटर्सबर्गमध्यें सर्वत्रच संपाची वावटळ उठली. हे संप कसे तरी मिटविण्यांत आले. पण झुबॅटोव्ह मात्र या सर्व गडबडींत अप्रिय झाला व त्याचें कामगारांवरील वजन नाहींसें झालें. १९०३ मध्यें फादर जॉर्ज गेपॉन नांवाच्या

इसमानें झुबॅटोव्हची जागा घेतली. जॉर्ज गेपॉन हा एक तरुण पाद्री होता. तेव्हां या पाद्याकडून आपलें गाऱ्हाणें झारच्या कानापर्यंत पोंचविलें तर आपला फायदा होईल असें कामगारसंघाच्या पुढाऱ्यांना वाटलें व कामगारांच्या गाऱ्हाण्यांचा अर्ज फादर गेपॉननें झारला सादर करावा अशी त्यास विनंति करण्यांत आली. गेपॉनला ही कल्पना फारच पसंत पडली. कामगारांच्या अर्जांत त्यांच्या गाऱ्हाण्यांचा उल्लेख करावाच, पण त्याबरोबरच सनदशीर राजकीय हक्कांच्या मागण्याही या अर्जांत नमूद करण्यांत याव्या असें ठरविण्यांत आलें. गेपॉननें या दुसऱ्या कल्पनेलाही आपली संमति दिली. गेपॉननें हा अर्ज झारला सादर करण्याचा एक नवीनच मार्ग शोधून काढला. कामगारांची एक प्रचंड मिरवणूक काढावी, ती झारच्या राजवाड्यापर्यंत न्यावी व कामगारांचा प्रतिनिधि म्हणून आपण हा अर्ज झारला सादर करावा अशी त्याची योजना होती. फादर गेपॉननें कामगारांच्या या मिरवणुकीला धार्मिक मिरवणुकीचें स्वरूप दिलें. या लोकांनीं आपल्याबरोबर ख्रिस्ताच्या व साधु- संतांच्या मूर्ति घेतल्या होत्या व धर्मगीतें म्हणत ते रस्त्यांतून चालले होते. झार हा आपला 'लहान पिता' आहे अशी रशियांतील बहुजनसमाजाची समजूत होती व त्याला हा अर्ज सादर करावा म्हणून हजारों मजूर आपल्या बायकांमुलांसह लाल रंगाचीं क्रॉसचीं चिन्हें असलेलीं निशाणें घेऊन राजवाड्याकडे निघाले. आपला 'छोटा पिता' आपलें स्वागत करील व कामगारांच्या अर्जाचा स्वीकार करील अशी गेपॉनला मोठी आशा होती. पण प्रकार अगदीं उलट झाला. झारनें या लोकांचें त्यांच्यावर बंदुकीच्या फेरी झाडून स्वागत केलें व पीटर्सबर्गमध्यें लष्करी कायदा जाहीर केला. या मिरवणुकींत १५००० वर कामगार आपल्या बायकांमुलांसह सामील झाले होते. त्यांच्यावर अगदीं अनपेक्षितपणें गोळ्यांचा वर्षाव झाला. या गोळीबाराला ३००० वर लोक बळी पडले. यांत शेंकडों स्त्रिया व मुलेंही मृत्युमुखीं पडली. झारच्या या अत्याचारामुळें पीटर्सबर्गमध्यें सर्वत्र हाहाःकार उडाला. 'छोट्या बापा'नें मजुरांना भाकरीचा तुकडा दिला नाहींच तर उलट गोळ्या चारल्या; यामुळें रशियन जनतेचा या 'छोट्या बापा'वरील विश्वास अजीबात उडाला. पोर्ट आर्थर ज्या दिवशीं पडलें त्या दिवशींच ही मिरवणूक काढण्यांत

आली होती. पोर्ट आर्थरच्या पाडावाचा दिवस म्हणजे रशियन राष्ट्राच्या अपमानाचा दिवस होय. या दिवशींच निघालेल्या या मिरवणुकीवर झारनें गोळया झाडण्याचा हुकूम केल्यामुळें झारच्या सरकारच्या अपकीर्तींत आणखी भरच पडली. रशियाच्या इतिहासांत 'रेड सन्डे' (लाल रविवार) या नांवानें हा दिवस प्रसिद्ध आहे.

पीटर्सबर्गमधील विंटर पॅलेससमोरील चौकांत झालेल्या या गोळीबारानें कामगारचळवळीचा नाश झाला नाहीं तर उलट झारच्या ज्या राजसत्तेनें या गोळीबाराचा हुकूम केला त्या राजसत्तेचे "दिवस भरले" असें या 'लाल रविवार'च्या गोळीबारानें सर्व जगाला सांगितलें. लेनिन या वेळीं जिनिव्हांत होता. दुसरे दिवशीं सकाळीं लेनिनला ही हृदयद्रावक हकीगत समजली. क्रुप्सकायानें या प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:—

"व्ह्लाडीमीर व मी आज सकाळीं वाचनालयाकडे चाललों होतों. वाटेंत आम्हांला लुनाचार्स्की भेटला. त्याच्याबरोबर त्याची बायकोही होती. लुनाचार्स्कीची बायको ॲना अलेक्झांड्रोव्हिना ही बातमी ऐकून इतकी घाबरून गेली कीं, तिच्या तोंडांतून एकही शब्द बाहेर पडेना. ती केवळ आपल्या हातांतील मफ* हलवीत होती. आम्हीं सर्वजण लेपेशिन्स्कीनें हद्दपाऱ्यांकरितां चालविलेल्या हॉटेलांत आलों. पीटर्सबर्गची बातमी ऐकून सगळे बोल्शेव्हिक या हॉटेलांत पूर्वींच जमा झाले होते. आम्ही सर्व हद्दपार मंडळींनीं या प्रसंगीं एकत्र जमावें अशी आमची इच्छा होतीच. या ठिकाणीं जमा झालेल्या लोकांपैकीं कोणी एक शब्द देखील बोलला नाहीं. सर्वांचीं मनें प्रक्षुब्ध झालीं होतीं. क्रांतीच्या वेळचें स्मशानयात्रा-गीत त्यांनीं या वेळीं म्हटलें. रशियांतील राज्यक्रांतीला आतांच सुरुवात झाली आहे, लोकांचा झारवरील विश्वास पार उडाला असून जुलमी राजसत्तेचे दिवस संपले आहेत व जनतेच्या उद्धाराचे व स्वातंत्र्याचे दिवस जवळ येत चालले आहेत असें त्यांना वाटलें."

झारच्या या अत्याचारामुळें पीटर्सबर्गमधील कामगारवर्ग अगदीं

* थंडीपासून हाताचें रक्षण व्हावें म्हणून वापरण्यांत येणारा कापडाचा किंवा चामड्याचा तुकडा.

खवळून गेला. गोळीबार झाल्यामुळें मिरवणुकींतील मजूर मागें हटले, पण त्यामुळें त्यांच्यामधील असंतोष नाहींसा झाला नाहीं किंवा त्यांची चळवळही नष्ट झाली नाहीं, तर उलट ती अधिकच वाढली. या मिरवणुकींतून बाहेर पडलेल्या लोकांनीं ज्या ज्या ठिकाणीं पोलिस आढळले तेथें तेथें त्यांच्यावर हल्ले चढविले. रस्तोरस्तीं दंगे सुरू झाले. व्हायबर्ग भागांत तर त्याच दिवशीं रात्रीं कामगारांनीं घरांतलें लाकडी सामान, लोखंडी खाटा वगैरे रस्त्यांत टाकून तटबंदी केली व पोलिसांना तोंड दिलें. पीटर्सबर्गच्या मध्यावरील व्हॅसिली भागांतील मजूरपुढाऱ्यांनीं तेथल्या एका छापखान्यांत आपला जाहीरनामा छापून घेतला व तो सर्वत्र प्रसिद्ध केला. "कामगारांनीं या वेळीं सशस्त्र व्हावें व झारच्या सरकारला तोंड द्यावें" असें या जाहीरनाम्यांत म्हटलें होतें.

लेनिननें १९०५ च्या झारच्या अत्याचारासंबंधानें 'क्रांतीचा प्रारंभ' या मथळ्याचा एक कडक लेख लिहिला व तो 'आघाडी' पत्रांत प्रसिद्ध झाला. कामगारांना धडा देण्याकरितां झारनें गोळीबार केला ही गोष्ट खोटी नाहीं. या गोळीबारापासून कामगारांनीं खरोखरीच एक धडा घेतला. सशस्त्र क्रांति केल्याशिवाय झारच्या एकतंत्री सत्तेचें जूं आपल्याला झुगारतां येणार नाहीं, हाच तो धडा होय.

आपण अत्यंत शांततेनें काढलेल्या या मिरवणुकीवर असा एकाएकीं हल्ला होईल अशी फादर गेपॉनची मुळींसुद्धां कल्पना नव्हती. अझेव्ह, झुबॅटोव्ह यांच्याप्रमाणें फादर गेपॉन हाही गुप्त पोलीसखात्यांतील एक हेर होता. यामुळें तर आपली ही मिरवणूक शांत रीतीनें पार पडेल अशी त्याला खात्री वाटत होती. एकदां अशा रीतीनें कामगार वर्गाचा विश्वास संपादन केला म्हणजे त्यांच्या पुढारीमंडळांत आपल्याला मोकळेपणानें वावरतां येईल व हेरगिरीचें काम उत्तम रीतीनें बजावतां येईल असे बेत त्यानें रचले होते. पण मिरवणुकीवर गोळीबार झाल्याबरोबर त्याचे हे बेत ढासळले, इतकेंच नाहीं तर सरकारच्या या कृत्याचा त्याला संताप आला. त्याचें मन पालटलें. गोळीबार झाल्याबरोबर फादर गेपॉननें तेथून पलायन केलें व त्याच्या मित्रांनीं त्याला दडवून ठेवलें. पण गोळीबारानंतर दोन तीन

प्रति ११३८५२

दिवसांनीं तो प्रगट झाला व त्यानेंही पुढील आशयाचें एक गुप्त पत्रक प्रसिद्ध केलें.

"झारवरचा आमचा विश्वास आतां उडाला आहे. रक्ताच्या नदीनें झारचा व आमचा संबंध तोडून टाकला आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीला आपण आतां हात घातला पाहिजे. स्वातंत्र्याची चळवळ चिरायु होवो."

यानंतर लवकरच गेपॉननें जिनिव्हा येथें लेनिनची भेट घेतली. फादर गेपॉन हा पोलिसांचा हस्तक आहे असा त्याच्यावर वहीम असला तरी लेनिन त्याची भेट घेण्याला उत्सुक झाला होता. गेपॉन हा कदाचित् हेर असेल व कामगारचळवळ करतांना आपल्या हेरगिरीच्या कामाची पूर्ण जाणीवही त्यानें ठेवली असेल. परंतु फादर गेपॉन हाही एक शेतकरी होता. रावणाऱ्या जनतेंतच तो लहानाचा मोठा झाला होता. तेव्हां 'लाल रविवारीं' जो प्रकार घडला त्यामुळें त्याचें मन पालटलें होतें व सरकारच्या हेरखात्यांत आपण फुकट शिरलों, आपली फसवणूक झाली, असें त्याला वाटूं लागलें होतें. गेपॉन हा पाद्री असो किंवा हेर असो, तो कोणीही असला तरी जनतेला बंडास प्रवृत्त करण्याच्या कामीं मुख्यत्वानें त्याचा हात होता ही गोष्ट लेनिननें आपल्या दृष्टीआड केलेली नव्हती. गेपॉननें यापुढें समाजवादाचा अभ्यास करावा असा लेनिननें त्याला उपदेश केला व त्याच्याशीं पत्रव्यवहारही सुरू ठेवला; पण गेपॉनला हा उपदेश आवडला नाहीं. गुप्तपणें हत्यारें जमवावयाचीं व कामगारवर्गाला सशस्त्र करावयाचें असा आपला बेत त्यानें लेनिनला कळविला. बंदुका व त्याला लागणाऱ्या दारुगोळ्याची बोट आपण गुप्तपणें बाल्टिक बेटांच्या किनाऱ्यावर आणणार आहों, असेंही त्यानें आपल्या साथीदारांना कळविलें. त्याप्रमाणें या बेटावर कांहीं कामगारही शस्त्रें आणण्याकरितां गेले. पण ही बंदुकांची बोट समुद्रावरील धुक्यांत कोठें नाहींशी झाली हें कळलें नाहीं व त्याबरोबरच गेपॉनचाही पुढें पत्ता लागला नाहीं.

'लाल रीववारा'मुळें असंतोषाची लाट पसरली व त्यामुळें बहुजनसमाजांत चळवळी सुरू झाल्या. या सर्व चळवळी स्वयंस्फूर्तीनें सुरू झाल्या होत्या. आयत्या वेळीं स्वयंस्फूर्तीनें पुढें आलेले लोक या चळवळींचे पुढारी

झाले. याच वेळीं पोटेम्किन क्रूझरवरील कप्तानांनीं व खलाशांनीं बंडाचें निशाण उभारलें. काळ्या समुद्रांत निशाणबाजीची प्रॅक्टिस चालू असतां या लढाऊ क्रूझरवरील अधिकाऱ्यांशीं बाचाबाची होऊन त्यावरील खलाशांनीं व इतर कामगारांनीं बंडाचें निशाण उभारलें. बंडाचा लाल बावटा लावून हें क्रूझर ज्या वेळीं ओडेसा बंदरांत दाखल झालें त्या वेळीं तें पाहण्याकरितां हजारों लोकांची किनाऱ्यावर गर्दी जमली. या बंडाचें वारें पोटेम्किनपुरतेंच थांबलें नाहीं. किनाऱ्यावर जमलेल्या लोकांवर पोलिसांनीं गोळीबार केल्यामुळें ओडेसा बंदरांत नांगरलेल्या सर्व बोटींवरील कामगारांनीं व शहरांतील कामगारांनींही संप केले. ओडेसा येथील बंडाची हकीगत ऐकतांच लेनिनला फार बरें वाटलें. यापुढें आपण ज्या ज्या सूचना करूं त्याप्रमाणें या बंडांतील पुढारी वागतील तर रशियांत आपल्याला क्रांति घडवून आणतां येईल अशी त्याची कल्पना झाली. त्याप्रमाणें जिनिव्हा येथें आपल्याजवळ असलेल्या व्हॅसिलीव्ह नांवाच्या दोस्ताला त्यानें ओडेसा येथें पाठविलें व पॉटेम्किनवरील संपवाल्यांनीं कसें वागावें याबद्दलच्या सूचना त्यानें त्याच्याजवळ दिल्या. आपल्या सर्व सूचना बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांनीं ऐकल्या व त्याप्रमाणें ते ताबडतोब वागले तर आपल्याकरितां एक टॉर्पेडो बोट पाठविण्याची व्यवस्था करण्यासही त्यानें सांगितलें. पण लेनिनचा हा निरोप घेऊन व्हॅसिलीव्ह ओडेसाला पोंचण्यापूर्वीच गोळीबार, धरपकड, तुरुंग, हद्दपारी वगैरे दडपशाही उपायांचा अवलंब करून सरकारनें हें बंड मोडून काढलें होतें. लेनिनच्या सूचनेप्रमाणें पोटेम्किनवरील बंडवाल्यांनीं आपली एक तुकडी किनाऱ्यावर उतरविली असती, बंडास अनुकूल असलेल्या तेथील सरकारी संरक्षक लष्कराशीं त्यांनीं संगनमत केलें असतें, बंडाविरुद्ध असलेल्या अधिकाऱ्यांना त्यांनीं पकडलें असतें, ओडेसामधील माऱ्याच्या ठिकाणांवर जरूर पडतांच तोफांचा मारा केला असता व शहर ताब्यांत घेतलें असतें तर या बंडाच्या जोरावर सर्व आरमारच फितूर करतां आलें असतें. पण लेनिनच्या या सूचना जागच्या जागींच राहिल्या. त्याला आणण्याकरितां टॉर्पेडो बोटही पाठविण्यांत आली नाहीं. ओडेसा बंदरांत झालेल्या या बंडाचें पुढारीपण तेथील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या मंडळींना स्वीकारतां आलें नाहीं.

बंड पुकारल्याबरोबर बंडवाल्यांनीं तावडतोब चढाईचें धोरण स्वीकारलें पाहिजे या लेनिनच्या नीतीचा पुरस्कार बंडवाल्या खलाशी पुढाऱ्यांनीं केला नाहीं; ते स्वस्थ बसले व त्यांनीं शत्रुपक्षास आपल्यावर चढाई करण्यास वाव दिला. केवळ शिपायांनीं व खलाशांनीं हें बंडाचें निशाण उभारलें होतें व आयत्या वेळीं पुढें आलेल्या मध्यमवर्गीतील कांहीं लोकांनीं या बंडाचें पुढारीपण स्वीकारलें होतें. असंतुष्ट होऊन संपास प्रवृत्त झालेले खलाशी किंवा कारखान्यांतले कामगार यांच्या हातून बंडें यशस्वी होत नसतात, अशी या मध्यमवर्गीतील पुढाऱ्यांची समजूत होती व बंड यशस्वी करून दाखविण्याइतका आत्मविश्वासही त्यांच्या ठिकाणीं नव्हता. झार-शाही नष्ट करावयाची असेल तर कामकरीवर्गाची संघटना केली पाहिजे आणि याप्रमाणें संघटित झालेला कामगारवर्गच शेतकऱ्यांच्या साह्यानें बंडाची चळवळ यशस्वी करून दाखवितो, ही गोष्ट या मध्यमवर्गीतल्या पुढाऱ्याना समजणें शक्य नव्हतें. त्यामुळें डोळ्यांपुढें कोणतेंही विशिष्ट ध्येय न ठेवतां उभारलें गेलेलें हें बंड सरकारच्या दडपशाहीला बळी पडलें. आयत्या वेळीं पुढें आलेल्या कांहीं पुढाऱ्यांना झारनें तुरुंगांत टाकलें, कांहींना सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें व कांहीं पुढारी या दडपशाहीला भिऊन कोठें पळून गेले त्याचा पत्ताही लागला नाहीं. राष्ट्रांतील कामकरीवर्ग क्रांतिकारी असतो, तोच क्रांतींत यश मिळवतो असा बोल्शेव्हिकांचा विश्वास होता. मेन्शेव्हिकांना तसें वाटत नव्हतें. त्यांचा सगळा भर मध्यम-वर्गावर होता. बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांच्या विचारसरणींतील हा फरक या १९०५ सालच्या क्रांतियुद्धांत चांगलाच निदर्शनास आला.

१९०५ सालीं बोल्शेव्हिकांचा पक्ष इतका वाढलेला नव्हता. जे कांहीं थोडे पुढारी या पक्षांत होते ते हद्दपार झाले असल्यामुळें बंडाच्या ऐन आणीबाणीच्या वेळीं रशियांत येऊं शकले नाहींत. बोल्शेव्हिक पक्षांतील लोकांचा याच वेळीं थोडासा कोठें जम बसत चालला होता व राष्ट्रांतील हजारों मजुरांना बोल्शेव्हिक पुढाऱ्यांची आतां कोठें थोडी ओळख होत चालली होती. अशा परिस्थितींतही १९०५ च्या क्रांतीच्या वेळीं तिचें पुढारीपण स्वीकारण्याचा कांहीं ठिकाणीं त्यांनीं प्रयत्न केला, पण तो साधला नाहीं. तथापि या बंडाच्या निमित्तानें बोल्शे-

व्हिकांची जी ठिकठिकाणीं जमवाजमव झाली होती तिचा फायदा लेनिननें घेतला व सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची परिषद् भरविण्याचें त्यानें ठरविलें. १९०४ सालीं लेनिनवर जे अनेक खडतर प्रसंग आले त्या वेळींच त्यानें अशी एखादी परिषद् भरविण्याचा बेत केला होता. लेनिनचा हा बेत या बंडानंतर सिद्धीस गेला. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची ही तिसरी परिषद् लंडन येथें भरली. बहुतेक सर्व बोल्शेव्हिकच या परिषदेला हजर होते, मेन्शेव्हिकांनीं या परिषदेला आपले प्रतिनिधि पाठविलेच नाहींत. ही परिषद् एप्रिलअखेर भरली. झारविरुद्ध बंड, हंगामी क्रांतिकारक सरकार (जर एखादें निर्माण झालें) व पक्षाची संघटना या विषयांवरच मुख्यतः या परिषदेंत चर्चा झाली. हंगामी सरकारशीं सहकार्य करण्याच्या प्रश्नाबाबत प्लेखानोव्ह, मार्टिनोव्ह व ट्रॉट्स्की या तिघांनीं लेनिनला जोराचा विरोध केला. असल्या बंडांत भांडवलदारवर्गाला सामील करून घेऊं नये व या बाबतींत आपलें ध्येय व कार्यक्रम अगदीं शुद्ध स्वरूपाचीं असावीं असें ट्रॉट्स्कीचें म्हणणें होतें. "आम्हांला झार नको, आम्हांला मजूरसरकार पाहिजे" या ब्रीदवाक्याचा व घोषणेचा पुरस्कार ट्रॉट्स्की या वेळीं करीत होता. ट्रॉट्स्कीचा हा ध्येयवाद लेनिनला पसंत पडला नाहीं. लेनिन ट्रॉट्स्कीपेक्षां अधिक वास्तववादी होता. कामगारवर्ग क्रांति घडवून आणील, पण घडून आलेली क्रांति तो टिकवूं शकेल असें लेनिनला वाटत नव्हतें. केवळ कामगारवर्गानेंच क्रांति घडवून आणल्यास देशांतील भांडवलदार प्रतिक्रांति घडवून आणतील अशी त्याला खात्री वाटत होती. म्हणूनच मध्यंतरींच्या काळांत त्या वेळीं निर्माण झालेल्या हंगामी सरकारशीं सहकार्य करावें आणि या लोकसत्तात्मक स्वातंत्र्याचा उपयोग करून आपलें सामर्थ्य वाढवावें, असें लेनिनचें मत होतें. असल्या प्रसंगीं ट्रॉट्स्कीचा ध्येयवाद जागच्या जागींच राहील व कामगार-सरकार न होतां भांडवलदारांचेंच वर्चस्व त्यांत कायम राहील अशी त्याची खात्री होती. हंगामी सरकार असतांना भांडवलदारांशीं सहकार्य करावें, पण कामगारवर्गाचें वर्चस्व राखण्याची तजवीज केल्याशिवाय राहूं नये, हा दूरदर्शीपणा व व्यवहारचातुर्य ट्रॉट्स्कीच्या अंगीं दिसून आलें नाहीं. लंडन येथें भरलेल्या

तिसऱ्या कॉंग्रेसमध्यें लेनिनच्या मतालाच पाठिंबा मिळाला. एका बाबतींत मात्र लेनिनला या कॉंग्रेसमध्यें विरोध करण्यांत आला. भांडवलशाही युगांत कामकरीवर्गच क्रांति करूं शकतो असें जर आहे तर आपल्या पक्षाचें पुढारीपण या कामकरीवर्गांतीलच नेत्यांकडे असलें पाहिजे, असें लेनिनचें म्हणणें होतें. क्रांतिकारक चळवळी चालविण्याकरितां ज्या कमिट्या नेमावयाच्या त्यांत कामकरीवर्गाचे लोक नसतील तर क्रांतीचा आपला उद्देश सफल व्हावयाचा नाहीं, हें लेनिनचें मत या परिषदेंतील मंडळींना मान्य झालें नाहीं. परिषदेंतील बहुमत या प्रश्नाच्या बाबतींत लेनिनच्या विरुद्ध गेलें. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची जी रशियन क्रांतिकारक कमिटी होती तींत अवघा एकच कामकरी सभासद आहे, असें एका प्रतिनिधीनें त्याला या बैठकींत सांगितलें. "असें असेल तर ती अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे," असें लेनिननें या वेळीं बोलून दाखविलें. लंडनच्या या तिसऱ्या कॉंग्रेसमध्यें लेनिनचें हें मत त्याच्या कांहीं दोस्तांना पसंत पडलें नाहीं; तरी लेनिन त्यामुळें हताश झाला नाहीं. प्रत्यक्ष कामकरीवर्गांतले लोक आपल्या पार्टीला मिळाल्याशिवाय तिचें सामर्थ्य वाढणें शक्य नाहीं व क्रांतीची चळवळ त्यांच्या साहाय्याशिवाय यशस्वी होणेंही शक्य नाहीं; तेव्हां या चळवळीचें पुढारीपण कामगारवर्गांतील पुढाऱ्यांनींच घेतलें पाहिजे, अशी त्याची स्वतःची पूर्ण खात्री झाली होती. म्हणून कॉंग्रेसच्या बैठकींत जरी त्याला बहुमत मिळालें नाहीं तरी तो निराश झाला नाहीं. लंडनहून व जिनिव्हाहून रशियांतील आपल्या दोस्तांना त्यानें पत्रावर पत्रें पाठविलीं व तेथील निरनिराळ्या शहरांतील पार्टी-कमिट्यांतून हुशार, जाणत्या व तरुण कामकरी पुढाऱ्यांना सामील करून घेण्याबद्दल त्यांना कळविलें.

ओडेसा बंदरांतील आरमारी बोटीवरील बंडें झारच्या अधिकाऱ्यांनीं अत्यंत निर्दयपणानें दडपून टाकलीं. त्याचप्रमाणें देशांतील निरनिराळ्या शहरांतून झालेले संप हाणून पाडण्यांत आले; तरीही रशियांतील बंडाची ही चळवळ अद्याप शमली नव्हती. जपानशीं सुरू केलेल्या युद्धांत झारच्या सैन्याची धूळदाण उडाल्याच्या बातम्या जसजशा येत होत्या तसतसा देशांतील कामगार व शेतकरीचळवळींना ऊत येत होता. तसेंच पोर्टस्मथ

येथें थिओडोर रुझवेल्टच्या मध्यस्थीनें जपानशीं तह करण्यासंबंधानें ज्या वाटाघाटी चालू होत्या त्यामुळें तर रशियांतील जनता अधिकच खवळून गेली होती. जपानशीं सुरू केलेल्या या युद्धांत रशियाचें सर्वतोपरी नुकसान झालें होतें; आणि त्यांतच झारच्या सरकारनें या तहाच्या अपमानास्पद अटी मान्य केल्यामुळें रशियन जनतेंतील असंतोष अधिकच वाढला होता. रशियानें सुरू केलेल्या या युद्धाचा सर्वांनाच कंटाळा आला होता; आणि त्यांतच कामगारवर्गाच्या न्याय्य मागण्या मान्य न करतां त्यांच्या मिरवणुकीवर गोळीबार करण्यांत आलेला पाहून रशियांतील प्रजेच्या संतापाग्नींत अधिकच भर पडली होती. आक्टोबर (१९०५) च्या सुमारास रशियांतील बहुतेक सर्व शहरांतून पुन्हा जोराचे संप झाले. त्याचप्रमाणें टिफ्लिस, रिगा वॉरसॉ, कोव्हनो या रशियाच्या लगत असलेल्या प्रांतांतील शहरांतूनही संपाचा वणवा पेटला. जानेवारी ९ रोजीं राजवाड्यापुढें कामगारांची कत्तल करण्यांत आली तेव्हांपासून रशियांतील कामगारचळवळीला एक नवीनच दिशा लागली. शहरांतील संपवाले कामगार आतां हत्यारें जमवूं लागले व सरकारच्या लष्कराला सशस्त्र तोंड देऊं लागले.

शहरांतील कामगारांच्या चळवळीचें हें लोण खेडेगांवांतही पोंचलें व तेथील मजूर शेतकरीही संप करूं लागले. खेड्यांतील असंतुष्ट झालेले हे मजूर शेतकरी ठिकठिकाणीं जमा होऊं लागले व खेड्यांतील जमीनदारांच्या कोठारांवर ते हल्ले करूं लागले. मांचूरियांत झालेला पराभव पाहून नाना प्रकारचे हाल सोशीत स्वदेशास परत आलेले लष्करी शिपाईही या संपवाल्या मजुरांत सामील झाले. "जो कसतो त्याची जमीन" हा मंत्र रशियन शेतकऱ्यांना पाठ झाला होता संपवाल्या किसान मजुरांनीं गांवच्या हद्दींतील जमिनी आपल्या ताब्यांत घेण्यास सुरुवात केली व जमीनदार व सावकार शेतकऱ्यांच्या वाड्यांवर हल्ले करून त्यांनीं सांठवून ठेवलेला मालही ते आपल्या ताब्यांत घेऊं लागले. या सर्व चळवळींत जमीनदारांना या संपवाल्यांनीं आपल्या गांवांतून बाहेर हांकून लावलें. फारच क्वचित् ठिकाणीं जमीनदारांवर अत्याचार करण्यांत आले व विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज़मीनदारांच्या ज्या मालमत्ता या लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतल्या त्यांची जाळपोळ करून नासधूस केली नाहीं. जमीनदार पुन्हा

परत आले तर त्यांना कोठेंही थारा मिळूं नये म्हणून कांहीं ठिकाणच्या संपवाल्यांनीं मात्र जमीनदारांचीं घरें पाडून त्यांचा नाश केला. पण असले अत्याचार फारच थोड्या ठिकाणीं झाले. कारण जमीनदाराच्या घरीं सांठवलेल्या धान्याची व मालाची नासधूस करणें म्हणजे पर्यायानें आपल्या श्रमानें निर्माण झालेलें अन्नच मातींत मिसळण्यासारखें आहे, ही गोष्ट संपवाल्यांतील जाणत्या शेतकऱ्यांनीं जाणली होती. कॉकेशस पर्वताच्या खोऱ्यामधील व कोरलँडमधील शेतकऱ्यांनीं तर सशस्त्र बंडाचेंच निशाण उभारलें होतें.

याप्रमाणें देशांतील कामगारचळवळींत शेतकरीचळवळीची भर पडलेली पाहून झारनें व त्याच्या अधिकाऱ्यांनीं आपलें धोरण बदलावयास पाहिजे होतें. पण तसें न करतां ठिकठिकाणीं उद्भवलेलीं हीं शेतकऱ्यांचीं बंडें अत्यंत निष्ठुरपणें दडपून टाकण्याचेच हुकूम झारनें सर्वत्र पाठवून दिले. झारच्या प्रचंड लष्करी सामर्थ्यापुढें शेतकऱ्यांचीं हीं बंडें टिकून राहणें शक्यच नव्हतें. ज्या ज्या खेड्यांतील शेतकऱ्यांनीं बंडें उभारलीं त्या खेड्यांवर तोफांचा मारा केल्यावर व कॉसॅक स्वारांनीं या खेड्यांवर हल्ला केल्यावर बंडवाले शेतकरी कितीसा दम धरूं शकणार ? पण इतकें झालें तरी बहुजनसमाजांतील क्रांतीचा आवेश कमी झाला नाहीं. ठिकठिकाणच्या बंडवाल्या शेतकऱ्यांवर झारच्या लष्करानें हल्ले चढविले ही बातमी शहरांतून पोंचतांच मास्को, पीटर्सबर्ग वगैरे शहरांतून कामगारांनीं पुन्हा जोराचे सार्वत्रिक संप केले. आक्टोबरमध्यें झालेल्या या सार्वत्रिक संपांना निराळेंच स्वरूप प्राप्त झालें. या संपांत शहरांतील वकील, डॉक्टर, रोटीवाले, विद्यार्थी, ट्रामवेंतील मजूर, रेल्वेवरील कामगार वगैरे बहुतेक सर्व धंद्यांतील लोक सामील झाले होते. या संपाचीं सूत्रें बोल्शेव्हिकांच्या हातीं होतीं. कार्यकारी कमिट्या नेमून या संपांतील सर्व कामें ते करीत होते. सार्वत्रिक संप चालविण्याची जबाबदारी घेऊन या कमिट्यांनीं अत्यंत दक्षतेनें काम केलें व कामगारवर्गांत ते लोकप्रियही झाले. हा संप चालू असतांनाच ता. १७ आक्टोबर रोजीं झारनें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. रशियाचा कारभार यापुढें लोकप्रतिनिधींच्या मदतीनें चालेल व त्याकरितां एक नवीन राज्यघटना निर्माण करण्यांत येईल, असें या

जाहीरनाम्यांत म्हटलें होतें. हा जाहीरनामा म्हणजे केवळ फसवणूक होती. देशांतील चळवळ्या लोकांत फूट पाडण्याच्या उद्देशानेंच झारनें हा जाहीरनामा काढला होता. देशांत सर्वत्र चालू असलेलीं बंडें मोडून काढण्यास झारजवळ आतां पुरेसे शिपाई राहिले नव्हते. मांचूरियांत पराजित झालेलें लष्कर परत येण्याचीच तो वाट पाहात होता. हें लष्कर परत येईपर्यंत लोकांना शांत राखण्याकरितांच त्यानें ही युक्ति काढली होती. पण झारची ही युक्ति सफल झाली नाहीं. सार्वत्रिक संप तसाच चालू होता व संपवाल्यांवर ठिकठिकाणीं गोळीबार करून व त्यांच्यावर सशस्त्र हल्ले चढवून तो मोडून काढण्याचा प्रयत्नही चालू होता. झारच्या अत्याचारामुळें सशस्त्र क्रांतीचें निशाण उभारलें पाहिजे अशी प्रवृत्ति कामगारवर्गांत वाढूं लागली होती. याच सुमारास बोल्शेव्हिक पक्षांतील एक पुढारी अर्नेस्ट ब्रोमन हा तुरुंगांतून सुटला. अर्नेस्ट बोमन हा व्हेटरनरी सर्जन —जनावरांचा डॉक्टर— होता. झारच्या जाहीरनाम्यांत राजकीय कैद्यांना मुक्त करण्याचें आश्वासन दिलें होतें त्याप्रमाणें त्याला तुरुंगांतून मुक्त करण्यांत आलें होतें. झारनें जाहीर केलेल्या राजबंदीमुक्ततेच्या घोषणेप्रमाणें कामगार-पुढारी बाहेर पडत. त्यांचें अर्थातूच स्वागत करण्यांत येत होतें व त्यांना शहरांतून मिरवीतही नेण्यांत येत होतें. पीटर्सबर्गच्या पोलिस अधिकाऱ्यांना ही गोष्ट सहन झाली नाहीं. त्यांनीं या मिरवणुकींना बंदी केली. पण कामगार थोडेच ऐकणार ! पोलिसचे हुकूम धाब्यावर बसवून या मिरवणुकी काढण्यांत येऊं लागल्या. अर्थात् नेहमींच्या रिवाजाप्रमाणें या मिरवणुकीवर गोळीबार करण्यांत येऊं लागला. पण बोमन सुटला त्या वेळीं अशी मिरवणूक काढण्यांत आली नव्हती. बोमन तुरुंगांतून बाहेर पडल्यावर त्याच्या कांहीं मित्रमंडळींनीं त्याचें स्वागत केलें व तो आपल्या मित्रमंडळींबरोबर आपल्या घराकडे पायीं चालत जांत असतां पोलिस अधिकाऱ्यांनीं या लोकांवर गोळ्या झाडण्याचा हुकूम केला आणि या गोळीबारांत बोमन ठार झाला. बोमन याप्रमाणें अगदीं नाहक ठार झाल्याची बातमी हां हां म्हणतां सर्व शहरभर पसरली. बोमनच्या प्रेतयात्रेला एक लाखावर मजूर जमा झाले. या प्रसंगीं पोलिस इतके घाबरून गेले होते कीं, रस्त्यांतून एकही पोलिस या वेळीं फिरकला नाहीं.

बोमनच्या दफनाचे वेळीं त्याच्या पत्नीनें भाषण केलें. झारचे अधिकारी असे अत्याचार करूं लागतील तर सशस्त्र बंडाशिवाय गत्यंतरच राहणार नाहीं, असे तिनें अगदीं निर्वाणीचे उद्गार काढले.

"सरकार एका बाजूला स्वातंत्र्याचे हक्क दिल्याचें जाहीर करतें व दुसऱ्या बाजूला आपल्या हातांत लष्कराची सर्व सूत्रें ठेवून त्याचा हवा तसा उपयोग करतें याचा अर्थ काय!" बोमनच्या वधासंबंधानें बोलतांना लेनिननें वरीलप्रमाणें उद्गार काढले. कामगार व शेतकरी यांच्यांत पसरूं लागलेली ही चळवळ झारच्या लष्करांत व आरमारांतही जोरानें प्रवेश करूं लागली होती. याच वेळीं क्रॉन्स्टॅट व सेवास्टपोल येथील आरमारी बोटींवरील काम करणाऱ्या लोकांनीं बंड केलें. परंतु या बंडखोरांना योग्य पुढारी न मिळाल्यामुळें हीं सर्व बंडें फुकट गेलीं.

रशियांत याप्रमाणें खळबळ चालू असतां नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत लेनिननें गुप्तपणें रशियांत प्रवेश केला व कामगारचळवळीची सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. स्वित्झर्लंडहून निघतांना त्यानें रशियांतील बंडखोर कामकऱ्यांना व शेतकऱ्यांना उद्देशून एक लेख लिहिला; त्यांत त्यानें पुढील विचार प्रकट केले होते. "रशियांतील हा लढा केवळ रशियापुरताच नाहीं. भांडवलशाहीच्या जुलमाला कंटाळलेल्या सर्व जगांतील कामगारांचा उद्धार करण्यासाठीं हा लढा सुरू झाला आहे. रशियांतील या कामगारक्रांतीच्या चळवळीला सर्व जगांतील कामगारांची सहानुभूति असून रशियांतील ही क्रांति जगांतील भावी क्रान्त्यांना मार्गदर्शक झाल्याखेरीज राहणार नाहीं."

रशियांत आल्यानंतर थोड्याच दिवसांत पीटर्सबर्गमध्यें भरलेल्या सोव्हिएटांच्या सभेंत त्यानें भाषण केलें. आपलें नांव बदलून व दाढी काढून टाकून तो या सभेंत प्रगट झाला होता. या सभेंतील फारच थोड्या लोकांनीं लेनिनला ओळखलें. पीटर्सबर्गमधील कामगारांनीं आपल्या दिवसाच्या कामाचे तास आठ करण्यांत यावेत, अशी मागणी केली होती. कारखानदारांनीं ही मागणी मान्य केली नाहीं व आपल्या कारखान्यांना कुलपें लावून कामगारांच्या मागणीला त्यांनीं लाथाडून दिलें. सरकारी

अधिकाऱ्यांनीं कामगारांचा सार्वत्रिक संप मोडून टाकला होता. झारनें सुधारणेच्या हक्कांचा जाहीरनामा काढल्यामुळें एकतंत्री राज्यसत्तेविरुद्ध लढणाऱ्या मध्यमवर्गाच्या व भांडवलदारवर्गाच्या लोकांनीं क्रांतिकारक चळवळींतून अंग काढून घेतलें होतें. पण या वेळीं लेनिननें मात्र देशांतील बोल्शेव्हिकांनीं ही क्रांतीची धुरा आतां आपल्या खांद्यावर घ्यावी व अखिल रशियन सार्वत्रिक संप करण्याची तयारी करावी, अशी सूचना केली. लेनिनची ही सूचना सर्वांना मान्य झाली, पण ती अमलांत आणायची कशी ? हें काम अंगावर घेण्यास कोणीही तयार नव्हते. मेन्शेव्हिक तर तयार नव्हतेच नव्हते. लेनिनच्या सांगण्याप्रमाणें बोल्शेव्हिकांनीं मात्र देशांत सर्वत्र संप घडवून आणून क्रांतीचा पुन्हा उठाव करण्याचें ठरविलें. पीटर्स-बर्गमध्यें बोल्शेव्हिकांची एक गुप्त मिलिटरी (युद्ध) कमिटी अस्तित्वांत होती व तिच्या जोरावर देशांत सार्वत्रिक संपाची तयारी करण्याच्या कामास त्यांनीं हात घातला. या संपाची तयारी करण्याच्या कामांत लेनिननें बराच मोठा भाग घेतला होता. पुन्हा सार्वत्रिक संप घडवून आणावयाचा व त्याच वेळीं क्रांतीचें निशाण उभारावयाचें अशी परिस्थिति आतां देशांत राहिली नव्हती. तथापि लेनिन मुळींच निराश झालेला नव्हता. आपण तयार केलेल्या योजनेप्रमाणें व आपण देत असलेल्या सूचनांप्रमाणें आपल्या पक्षाच्या मंडळींना ही क्रांतीची चळवळ पुन्हा सुरू करणें शक्य आहे असें त्यास वाटत होतें. शहरांतून कामगारांच्या क्रांतिकारक कमिट्या स्थापाव्या व खेड्यांतून किसानकमिट्या निर्माण कराव्या. शहरांतील कामगारांनीं संप करून आपल्या किमान मागण्या हस्तगत करण्याकरितां झगडा चालवावा व खेड्यांतील शेतकऱ्यांनीं आपल्या किसानकमिट्यांच्या नेतृत्वाखालीं संघटित होऊन जमीनी आपल्या ताब्यांत घ्याव्या, अशी त्याची योजना होती. पण लेनिनच्या या योजनेप्रमाणें देशांतील सर्व क्रांतिकारक चळवळी स्वतःच्या नेतृत्वाखालीं चालवितां येण्या-इतकें बोल्शेव्हिकांचें वजन अद्यापि वाढलेलें नव्हतें. देशांत क्रांतीचा प्रयत्न करणारा असा सोशल रेव्होल्यूशनरींचा दुसरा एक पक्ष होता. पण बहुजन-समाजाची संघटना करून क्रान्ति यशस्वी करूं असा आत्मविश्वास या पक्षाला वाटत नव्हता. अशा प्रतिकूल परिस्थितींतही लेनिननें आपला प्रयत्न पुढें

चालविला, पण त्याच्या या प्रयत्नाप्रमाणें देशांत सर्वत्र चळवळीला प्रारंभ झाला नाहीं.

१९ डिसेंबर रोजीं मास्कोमधील सोव्हिएटांनीं सार्वत्रिक संपाचा पुकारा केला. हा संप इतका पूर्णपणें यशस्वी झाला कीं, शहरांतला लहानसा मध्यभाग खेरीज करून बाकी सर्व शहर संपवाल्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. अवघ्या तीन दिवसांत या संपाला सशस्त्र बंडाचें स्वरूप प्राप्त झालें व शहराच्या संरक्षणाकरितां ठेवलेल्या लष्कराला त्यांनीं जोरानें तोंड दिलें. या संपवाल्यांनीं जवळ जवळ २००० सैनिकांचें लष्कर उभें केलें आणि हें बंड मोडण्यास झारच्या अधिकाऱ्यांना १० दिवस लागले. मास्कोनें पुढाकार घेतल्यानंतर तरी इतर शहरांतील कामगारजनता सार्वत्रिक संपांत सामील होईल अशी मास्कोमधील बोल्शेव्हिक पुढाऱ्यांची कल्पना होती. पण ती खोटी ठरली. गेल्या सबंध वर्षभर चालू असलेल्या या संपाच्या चळवळीमुळें कामगारवर्ग कंटाळून गेला होता व झारच्या प्रचंड लष्करी सामर्थ्यास तोंड देण्याइतकी तयारी नुकतेंच डोकें वर काढूं पाहणाऱ्या बोल्शेव्हिकांना करतां येणें शक्य नव्हतें. १९०५ सालीं क्रांतियुद्ध यशस्वी झालें नाहीं तरी या युद्धामुळें क्रांतिवादी पुढाऱ्यांना जो अनुभव मिळाला तो मात्र अमूल्य होता व त्यामुळें पुढें १९१७ सालीं झालेल्या क्रांतीचा पायाच या युद्धानें घातला असें म्हणावयास हरकत नाहीं.

मास्को येथें बंडाची धुमाळी चालू असतांना टामरफोर्स (फिनलंड) येथें बोल्शेव्हिक पुढाऱ्यांची गुप्त सभा भरली व त्या ठिकाणीं मास्कोप्रमाणें इतरत्रही सार्वत्रिक संप कसे घडवून आणावे याविषयीं चर्चा झाली. पण या चर्चेचा प्रत्यक्ष कांहीं उपयोग झाला नाहीं. मात्र या सभेंत लेनिनला एका नवीन दोस्ताची ओळख झाली. टामरफोर्सच्या गुप्त सभेला ठिकठिकाणांहून जे अनेक बोल्शेव्हिक कार्यकर्ते आले होते त्यांत स्टॅलिनही होता. क्रांतीची चळवळ आपण यापुढें मोठ्या प्रमाणावर चालवूं शकत नसलों तरी आपलें सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत आहे, नवीन नवीन धडाडीची कर्तृत्ववान् तरुण मंडळी आपल्या चळवळीला येऊन मिळत आहेत, हें पाहून लेनिनला आपलीं क्रांतीचीं सुखस्वप्नें खरीं होणार अशी खात्री वाटूं लागली होती. स्टॅलिन व लेनिन यांची यापूर्वीं कधीं भेट झाली

नव्हती. पण लेनिनच्या कर्तृत्वासंबंधानें व त्याच्या नेतृत्वासंबंधानें स्टॅलिनच्या मनांत पूर्ण आदरभाव वसत होता. या सभेसंबंधानें स्टॅलिननें आपला अनुभव आपल्या एका मित्रापाशीं सांगितला असून त्यांत लेनिनची योग्यता व स्टॅलिनची त्याच्यावरील भक्ति या दोन्ही गोष्टी पहावयास सांपडतात.

"टामरफोर्स येथील बोल्शेव्हिकांच्या सभेंत लेनिनला मीं प्रथम पाहिलें. आमच्या पक्षांतील गगनाला गवसणी घालणारा हा वैनतेय, हा थोर पुरुष, केवळ राजकीय दृष्टीनेंच नव्हे तर प्रत्यक्ष शरीरानेंही मोठा धिप्पाड, भव्य, लोकांवर वजन पाडणारा व फार टापटिपीचा असेल असें मला वाटलें होतें. पण माझी ही समजूत अगदीं चुकीची ठरली. लेनिन मला अगदीं चार सामान्य माणसांसारखाच दिसला. तो फार उंचही नव्हता. सामान्य माणसापेक्षांही त्याची उंची कमी होती व शरीरानेंही तो मोठा धिप्पाड होता असें नाहीं. कोणतीही सभा असली म्हणजे मोठीं माणसें नेहमीं उशीरां यावयाचीं. सभेंत जमलेल्या लोकांनीं मोठ्या आतुरतेनें त्यांची वाट पाहात असायचें आणि हे थोर गृहस्थ आले म्हणजे 'शुः शुः आले बरं का '···असें लोकांनीं आपसांत कुजबुजायचें. पण असा कांहीं प्रकार या सभेंत मला आढळून आला नाहीं. ठिकठिकाणचे प्रतिनिधि यावयाच्या पूर्वींच लेनिन आला आहे, कोठें तरी एका कोपऱ्यांत बसला आहे व सभेंत आलेल्या अगदीं सामान्य प्रतिनिधींशीं गप्पा मारीत आहे, हें जेव्हां मी पाहिलें तेव्हां तर माझी अगदीं निराशाच झाली. लेनिनचीं या सभेंत अनेक विषयांवर भाषणें झालीं. परंतु 'सद्यःस्थिति' व 'शेतकऱ्यांचा प्रश्न' या विषयांवरचीं त्याचीं भाषणें तर फारच परिणामकारक झालीं. लेनिनची विचारसरणी तर्कशुद्ध, स्पष्ट व निर्दोष होती. तो बोलूं लागला म्हणजे त्याचें भाषण प्रथम रुक्ष वाटत असे; पण पुढें पुढें श्रोत्यांचीं अंतःकरणें तो काबीज करी व त्यांना आपलेंसें करून टाकी."

टामरफोर्सच्या गुप्त सभेंत जमलेल्या बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना बंडाचा कांहीं निश्चित कार्यक्रम आंखतां आला नाहीं तरी मास्कोखेरीज इतर शहरांतून तुरळक संप झाले व कांहीं ठिकाणीं दंगेही झाले. पण या सर्व चळवळी झारनें दडपून टाकल्या. अशा रीतीनें क्रांतीच्या चळवळीला अपयश आलें तरी लेनिन रशियांतच यापुढें जवळ जवळ दोन वर्षें गुप्त-

पणें राहिला होता. लेनिनचें हें कृत्य अत्यंत धाडसाचें होतें. लेनिन या वेळीं पोलिसच्या तडाख्यांत सांपडला असतां तर त्याला फांसावरच चढविण्यांत आलें असतें. या दोन वर्षांत तो कधीं पीटर्सबर्गमध्यें तर कधीं फिनलंडमधील एखाद्या खेड्यांत राहात असे. झारच्या साम्राज्यांत फिनलंड ही अशीच एक जागा होती कीं ज्या ठिकाणीं झारच्या गुप्त हेरांचें व पोलिसांचें कांहीं चालत नसे. फिनलंडमधील निरनिराळ्या खेड्यांतून हे हद्दपार देशभक्त एकत्र जमूं शकत व उघडपणें सभाही भरवूं शकत असत.

"आपल्या चळवळीची इतकी धूळधाण करून घेण्यापेक्षां मास्कोंतील कामगारांनीं सशस्त्र बंड केलें नसतें तर फार बरें झालें असतें" असें प्लेखानोव्हनें या बंडाबद्दल लिहितांना म्हटलें होतें. लेनिनचें मत याच्या अगदीं उलट होतें.

"मास्कोमध्यें जो उठाव झाला तसा सशस्त्र उठाव झाला नसता तर १९०५ सालीं क्रांतीचा प्रयत्न झाला असें कोणींही म्हटलें नसतें" असें लेनिननें यासंबंधानें एका प्रसंगीं बोलून दाखविलें.

मास्कोच्या पराभवामुळें लेनिन मुळींच निराश झाला नव्हता. पुढल्या वसंत ऋतूंत रशियांत पुन्हा कामकरी व शेतकरी लोकांचीं बंडें होतील असें त्याला वाटलें होतें. या बंडांची तयारी करण्याकरितां लेनिननें गुप्तपणें रशियांतील अनेक शहरांतील बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या व त्या ठिकाणच्या क्रांतिकारी कमिटयांतून याबद्दल चर्चा केल्या. १९०६ सालीं प्रत्यक्ष कामकरी-शेतकऱ्यांनीं जरी बंडें केलीं नाहींत तरी झारच्या लष्करांतील व आरमारांतील सैनिकांनीं ठिकठिकाणीं बंडाचीं निशाणें उभारलीं. या परिस्थितीचा फायदा घेऊन रशियांत पुन्हा सार्वत्रिक संप घडवून आणण्याचा लेनिननें प्रयत्न केला; पण त्यांत त्याला यश आलें नाहीं.

बोल्शेव्हिक पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या शेतकरी-कामकरीवर्गाच्या या सर्व चळवळी अगदीं नामशेष करून टाकण्याचा झारनें व त्याच्या प्रधानांनीं जणूं काय चंगच बांधला होता. या बंडांच्या धामधुमींत झारला उघडपणें फिरण्याची सोयच नव्हती. या त्याच्या परिस्थिती-

बद्दल तो आपल्या प्रधानांना सारखीं तक्रारीचीं पत्रें लिहीत होता. झार समुद्रावरून सफर करून आला तर त्याची बोट कुठल्या तरी बाजूच्या खेड्याच्या किनाऱ्यावर नांगरावयाची व स्वतःच्या राजधानींतसुद्धां प्रवेश करण्यास प्रधानांनीं त्याला बंदी करावयाची ही गोष्ट लाजिरवाणी आहे, असें आपल्या प्रधानांना तो लिहीत होता. सर्व देशभरच जेथें बंडाची वावटळ उठलेली आहे त्या ठिकाणीं प्रधान तरी काय करणार! झारच्या संरक्षणाकरितां आपल्याला अशा संरक्षक तरतुदी करणें भाग आहे असें तेही झारला कळवीत असत. अशी स्वतःची स्थिति असली तरी देशांत सुरू असलेल्या चळवळी दडपशाहीच्या व लष्करी सामर्थ्याच्या जोरावरच नामशेष करून टाकावयाच्या असें झारनें ठरविलें व स्टॉलिपिनप्रभृति पुढाऱ्यांनीं त्याला या कामीं पूर्ण साहाय्यही केलें. एकट्या स्टॉलिपिननें कोर्ट मार्शल करून ३५०० वर रशियनांना या दिवसांत फांसावर चढविलें. स्टॉलिपिन हा स्वतः कडक नेक्टाय वापरीत असे. स्वतः कडक नेक्टाय वापरणाऱ्या स्टॉलिपिनची लोकांच्या गळ्यांना करकचून फांस आवळण्याची ही नीति "स्टॉलिपिनचा नेक्टाय (गळफांस)" या नांवानें प्रसिद्ध झाली होती. डयूमा सभेंतील एका लोकप्रतिनिधीनें स्टॉलिपिनच्या या नेक्टायचा उल्लेख करून त्याच्या हडपशाहीच्या धोरणाचा निषेध केला होता.

१९०६ मध्यें पुन्हा एकदां रशियांत बंडाची लाट उसळली. त्या वेळीं एप्रिलच्या सुमारास स्टॉकहोम येथें सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील निरनिराळ्या देशांतील प्रतिनिधींची एक सभा भरली. पण स्टॉकहोमच्या या कॉंग्रेसमध्यें लेनिनच्या पक्षाचा पूर्ण पराभव झाला. या कॉंग्रेसमध्यें मेन्शेव्हिकांचें बहुमत होतें. "एक पराभूत झालेला पुढारी या नात्यानें लेनिनला या वेळीं मीं प्रथमच पाहिलें. पण इतर पुढाऱ्यांप्रमाणें त्यानें या पराभवाबद्दल मुळींच चिरचिर केली नाहीं. आपल्यावर आलेल्या या पराभवाच्या प्रसंगाला मोठ्या दिलदारपणानें त्यानें तोंड दिलें. प्लेखानोव्ह, ॲक्सेलरॉड, मार्टोव्ह, वगैरे प्रतिपक्षाचे पुढारी या कॉंग्रेसमध्यें विजयी झाले हें खरें, पण विजयाचा उल्हास त्यांच्या चेहेऱ्यावर दिसला नाहीं. उलट पराभूत झालेल्या लेनिननें या पक्षाच्या धोरणावर सडकून

टीका करून त्यांचें कातडें इंचन् इंच सोलल्यामुळें तोच उलट विजयी योद्धा आहे असें मला भासलें." असा या कॉंग्रेससंबंधाचा आपला अनुभव स्टॅलिननें लिहून ठेवला आहे. या पराभवानंतर ज्या बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनीं लेनिनची भेट घेतली त्या वेळीं त्यांना उद्देशून त्यानें पुढील उद्गार काढले:—

"दोस्त हो, असें चिरचिरूं नका. आपलाच खात्रीनें विजय होणार ! कारण आपली बाजू न्यायाची आहे."

१९०५ सालच्या या धामधुमीच्या दिवसांत म्हणजे १९०५ ते १९०७ अखेरपर्यंत लेनिन हा रशियांतील कधीं पीटर्सबर्ग व इतर शहरांतून तर कधीं फिनलंडमधील खेड्यांतून राहात असे. अशा रीतीनें गुप्तपणें वावरतांना तो आपल्याजवळ नेहमीं एक संदेशवाहक ठेवीत असे. या सर्व गडबडींत त्याचें लेखनाचें काम तर अव्याहत चालूच होतें. बोल्शेव्हिकांनीं चालविलेल्या पत्रांतून व इतर दैनिकांतून लेख लिहिणें, वेळोवेळीं पत्रकें प्रसिद्ध करणें व आपल्या गुप्तपणें कामें करणाऱ्या अनेक दोस्तांशीं पत्रव्यवहार करणें हीं त्याचीं कामें सारखीं चालू होतीं. आपल्या चळवळीसंबंधानें कोण काय म्हणतो हें पाहण्यासाठीं सर्व पक्षांचीं वर्तमानपत्रें मिळविणें, तसेंच वेळोवेळीं प्रसिद्ध होणारीं इतर पत्रकें व रिपोर्ट मिळविणें व तीं सर्व वाचून त्यावर आपलें मत प्रदर्शित करणें व आपल्या चळवळीचें धोरण कायम ठेवणें, हीं सर्व कामें त्याला करावीं लागत आणि तीं सर्व अगदीं बेमालुमपणें तो करीत असे. लेनिनचा कामाचा उरक दांडगा होता. त्याची कार्यशक्ति प्रचंड होती. तो फार जलद लिहीत असे. "तो एकदां खालीं मान घालून लिहूं लागला कीं आपलें लिहिणें संपेपर्यंत मानदेखील वर उचलत नसे. दैनिक वर्तमानपत्रांतील दोन कॉलम तो पाहतां पाहतां लिहून देत असे. लेनिन लिहावयास बसला कीं तो कांहीं तरी विचार करीत लिहीत आहे असें वाटत नसे, तर अगोदरच लिहून ठेवलेल्या मजकुराची तो केवळ नक्कल करीत आहे असें वाटे." असें त्याच्या संदेशवाहकानें म्हटलें आहे.

फिनलंडमध्यें असतांना बोल्शेव्हिक पार्टीमधील अनेक लष्करी पुढारी त्याचा सल्ला घेण्याकरितां येत असत. या पुढाऱ्यांनीं चालविलेल्या गुप्त लष्करी शाळांमधून कसें शिक्षण दिलें जातें हें तो समजून घेत असे. पण

याच्यापेक्षांही जी तरुण मंडळी या शाळांतून शिकण्याकरितां येत असत त्यांची घरची परिस्थिति कशी काय आहे, तसेंच हे तरुण देशाच्या ज्या भागांतून आले तेथील चळवळीची परिस्थिति काय आहे, याची तो कसून चौकशी करीत असे.

१९०५ सालच्या या क्रांतीच्या चळवळींत अनेक वेळां अपयश मिळालें तरी आपली शिल्लक राहिलेली मंडळी पुनःपुन्हा संघटित करून व मोडलेल्या गुप्त कमिट्या स्थापून लेनिननें पुनःपुन्हा ठिकठिकाणीं बंडाची उभारणी करण्याचा प्रयत्न केला. पण अशा चळवळीला १९०५ सालचा कालच प्रतिकूल असल्यामुळें लेनिनचे सर्व बेत फसले व त्याला पूर्णपणें माघार घ्यावी लागली. पण वाईटांतून चांगलें निघतें. न्याया-करितां व सत्याकरितां केलेला स्वार्थत्याग व केलेलें आत्मबलिदान अग-दींच फुकट जात नाहींत. झारनें ही चळवळ दडपून टाकण्याकरितां आपलें सर्व सामर्थ्य खर्ची घातलें व स्टॉलिपिननें हजारों क्रांतिकारकांना फांसावर चढविलें तरी जुलमी सत्ताधाऱ्यांना शेवटीं लोकांना कांहीं तरी राजकीय हक्क द्यावेच लागले. पण शेतकरी—कामकरीवर्गाच्या हितरक्षणाच्या दृष्टीनें या हक्कांचा कांहीं उपयोग झाला नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. देशांतील भांडवलवाल्या वर्गानें या हक्कांचा भरपूर फायदा घेतला. युरोपांतील औद्यो-गिक दृष्ट्या मागासलेल्या या रशियन साम्राज्यांत उद्योगधंद्यांची वाढ होण्यास मात्र या सुधारणांचा चांगला उपयोग झाला. उद्योगधंद्यांची वाढ झाल्या-मुळें देशांतील कामगारवर्गाची संख्या वाढली, पण त्यांच्या परिस्थितींत यत्किं-चितही सुधारणा झाली नाहीं. स्टॉलिपिनच्या राजकीय सुधारणामुळें आणखी एक मोठा फरक घडून आला. मध्ययुगापासून चालत आलेली खेड्यांतील पंचायतपद्धति या सुधारणांमुळें नष्ट झाली व खेड्यापाड्यांतून सावकार शेतकरीवर्गाची (कुलक) संख्या वाढूं लागली. या सुधारणांमुळें बहुजन-समाजाची संघटना करण्यास थोडासा मोकळेपणा मिळाला. जनतेला मोठ्या प्रमाणावर मतदानाचा हक्क मिळाला व ड्यूमा सभेंत लोकांचे प्रतिनिधीही बसूं लागले. तथापि खरी सत्ता दुसरा निकोलस व त्याचें टोळकें यांच्याच हातीं राहिली.

# पुन्हा देशत्याग

१९०५–०७ सालीं झालेला क्रांतीचा प्रयत्न अयशस्वी झाला. या दोन वर्षांत लेनिन कधीं रशियांत तर कधीं फिनलंडमध्यें गुप्तपणें राहात होता व या क्रांतीचीं सूत्रें हलवीत होता. पण हा क्रांतीचा प्रयत्नच अयशस्वी झाल्यावर लेनिनला रशियांत काय, पण फिनलंडमध्येंसुद्धां राहणें अशक्य झालें. झारच्या सरकारनें या क्रांतीचीं पाळेंमुळें नष्ट करण्याकरितां क्रांतीच्या लहान मोठ्या सर्व पुढाऱ्यांना टिपून काढून कांहींना फांसावर चढविलें तर कांहींना सैबेरिया दाखविला. रशियांतील सर्व लहानमोठ्या शहरांतून गुप्त पोलिसांचें जाळें पसरून कामगारवर्गांतील सर्व उघड व गुप्त चळवळी नामशेष करण्याचा झारच्या पोलिस अधिकाऱ्यांनीं विडाच उचलला होता व त्यांत त्यांना यशही आलें होतें. फिनलंडमधील कांहीं बाजूच्या गांवांतून झारच्या गुप्त पोलिसांचा प्रवेश झाला नव्हता आणि या भागांतील कांहीं ठिकाणें तर अशीं होती कीं, त्या ठिकाणीं पोलिसांचें कांहीं चालतही नव्हतें. ऐन क्रांतीच्या दिवसांत बोल्शेव्हिक पक्षाचे पुढारी व त्यांचे हस्तक या भागांतून गुप्तपणें नव्हे तर कांहीं प्रसंगीं उघडपणेंही सभा भरवीत असत व क्रांतीसंबंधाचे अनेक कार्यक्रम ठरवीत असत. पण १९०७ नंतर झारच्या पोलिस अधिकाऱ्यांनीं हा प्रांतही व्यापला. फिनलंडच्या अगदीं कानाकोपऱ्यांतून आतां या गुप्त पोलिसांची टेहळणी सुरू झाली. अर्थात् फिनलंडमधील क्रांतिकारकांच्या सर्व हालचाली बंद झाल्या. अशा परिस्थितींत लेनिननें रशियांत किंवा फिनलंडमध्यें राहणें अत्यंत धोक्याचें होतें हें जाणून बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती कमिटीनें फिनलंडमधील आपलें ठाणें हलविण्याचें ठरविलें व लेनिननें तावडतोब देशत्याग करवा आणि स्वित्झर्लंडमध्यें जाऊन पुन्हा एखादें पत्र काढण्याचा प्रयत्न करावा, अशीही योजना या कमिटीच्या सभेंत ठरविण्यांत आली. मध्यवर्ती ( सेंट्रल ) कमिटीच्या या निर्णयाप्रमाणें

लेनिन गुप्तपणें पीटर्सबर्गमधून बाहेर पडला व हेलसिंगफोर्सजवळील एका खेड्यांत जाऊन राहिला. येथून संधि साधून हेलसिंफोर्सला जावें व तेथून स्टॉकहोमकडे जाणारी बोट गांठावी असा लेनिनचा बेत होता. ते हिंवाळ्याचे दिवस होते. सर्व प्रदेश बर्फमय झालेला होता. सर्वत्र गुप्त हेरांची टेहळणी असल्यामुळें दिवसा बाहेर पडण्याची सोयच नव्हती. या नवख्या भागांतील वाटाही त्याला माहीत नव्हत्या. इतक्या सर्व अडचणी असल्या तरी फिनलंड शक्य तितकें लवकर सोडणें भागच होतें. बराच प्रयत्न केल्यावर लेनिनला दोन वाटाडे कोळी मिळाले. कोळी इसम रात्रीं कधीं शुद्धीवर असावयाचा नाहीं. एका रात्रीं या दोन वाटाड्यावरोबर लेनिन व क्रुप्सकाया बाहेर पडलीं. हे दोन्ही कोळी दारू पिऊन तर्र झाले होते. परस्परांची भाषा परस्परांना कळत नव्हती. पण प्रसंगच आल्यावर काय करणार? रात्रीं भर काळोखांत बर्फ तुडवीत व मधून मधून ठेंचा खात दारूनें झिंगलेल्या या कोळ्यांच्या मागून जाणें त्यांना भागच होतें. हिंवाळा होता तरी कांहीं कांहीं ठिकाणचें बर्फ अद्याप चांगलेंसें गोठलें नव्हतें. एका ठिकाणीं तर त्याच्या पायाखालचें बर्फ हलूं लागलें. लेनिनवर हा मोठाच प्रसंग आला होता. थोडक्यांत चुकलें, नाहींतर हीं दोघें पतिपत्नी बर्फाखालीं गडपच होऊन गेलीं असतीं!!

"अशा रीतीनें बर्फाखालीं सांपडून मरून जायचें म्हणजे एक खुळचटपणाच आहे म्हणायचा"

असे लेनिननें यावेळीं उद्गार काढले. त्यानें या प्रसंगीं आपल्या अंगांतली होती नव्हती तितकी शक्ति खर्च केली व लगबगीनें क्रुप्सकायाला हाताशीं धरून त्यानें घट्ट जमीन गांठली. गेलीं दोन वर्षें क्रांतीकरितां त्यानें अनेक उलाढाली केल्या. या दिवसांत त्यानें कितीतरी मनोरथ केले, पण हीं मनोरम स्वप्नें जागच्या जागीं जिरलीं व शेवटीं दोन दारुड्या कोळ्यांबरोबर रात्रीं अंधारांतून ठेंचकाळत मोठ्या कष्टानें लेनिनला देशत्याग करावा लागला. स्टॉकहोमला गेल्यानंतर ठरल्याप्रमाणें लेनिननें जिनिव्हाला जाण्याची तयारी केली व १९०८ जानेवारींत लेनिन आपल्या पत्नीसह जिनिव्हाला आला. या देशत्यागाचा लेनिनच्या मनावर फारच वाईट परिणाम झाला. त्याचें चित्त अत्यंत उदास झालें. या उदासवाण्या प्रसं-

गाचें लेनिननें आपल्या बहिणीला लिहिलेल्या पत्रामध्यें फार हृदयद्रावक वर्णन केलें असून या भिकारड्या जिनिव्हामध्यें मला गाडून घेण्याकरितांच मी आलों आहें असें त्यानें त्यांत शेवटीं म्हटलें आहे.

जिनिव्हामध्यें असतांना अर्थात्च १९०५–०७ मधील अनेक चळवळींसंबंधानें व प्रसंगांसंबंधानें लेनिन व त्याची मित्रमंडळी यांच्यांत गप्पागोष्टी चालत या क्रांतीनंतर लेनिनप्रमाणें दुसरे कितीतरी बोल्शेव्हिक कार्यकर्ते रशियाचा त्याग करून स्वित्झर्लंड वगैरे युरोपांतील इतर देशांत येऊन राहिले होते. अर्थात् यांपैकीं कांहीं मंडळी जिनिव्हालाही येऊन राहिली होती. १९०५ च्या क्रांतीसंबंधानें या मित्रमंडळींत गप्पा सुरू झाल्या म्हणजे लेनिनचें चित्त रंगून जात असे. या सर्व क्रांतीच्या प्रसंगांत कोणता प्रसंग तुला आवडला असें त्याला त्याच्या अडोराट्स्की नांवाच्या एका दोस्तानें प्रश्न केला. "पीटर्सबर्गमधील पॅनिना मॅन्शनमध्यें भरलेली कामगारांची सभा मला चांगली आठवते" असें लेनिननें त्या वेळीं सांगितलें व तो पुढें म्हणाला कीं, "पीटर्सबर्गमध्यें कामगारांच्या सभेकरितां कोणीच जागा देत नव्हते. लोकसत्तावादी कौंटेस पॅनिना हिनें मात्र आपल्या वाड्यांतील हॉल कामगारांच्या सभेकरितां मोकळा करून दिला. या सभेला कामगारांची खूप गर्दी झाली होती. पीटसबर्गमध्यें अगदीं उघडपणें याच सभेंत मी काय तें बोललों. अशी संधि मला पुन्हा कधीं मिळाली नाहीं. कार्पोव्ह या नांवानें मी या वेळीं वावरत होतों. सभेंत मी उठून उभा राहिलों व बोलूं लागलों त्या वेळीं माझ्या कांहीं दोस्तांनीं मला ओळखलें. माझें भाषण चालू असतां श्रोत्यांनीं अनेक वेळां टाळ्या दिल्या. माझ्यापूर्वीं नव्या रशियन लिबरल पार्टीपैकीं एका सभासदाचें भाषण झालें होतें. या सभासदाच्या भाषणावर मीं सडकून टीका केली. रशियांतील एकतंत्री सत्ता पूर्णपणें नष्ट व्हावी असें या उदारमतवाद्यांना वाटत नव्हतें. रशियांत आज सर्वत्र बाजूंनीं स्वातंत्र्याची गळचेपी झाली आहे ती थोडी सैल व्हावी एवढीच या पक्षाची इच्छा होती; आणि या अर्धवटपणाच्या धोरणानेंच रशियांतील सर्व चळवळी या पक्षानें चालविल्या होत्या. सरकार व जनता यांच्यांत जेव्हां विरोध उत्पन्न होतो त्या वेळीं देशांतील क्रांतिकारी पक्षाचे

लोकच या बिकट परिस्थितींतून योग्य तो मार्ग काढूं शकतात असें मीं या सभेंत सांगितलें. पॅनिना मॅन्शनमध्यें जमलेल्या या श्रोत्यांना माझें भाषण फारच आवडलें."

या सभेला कामगारांची इतकी गर्दी झाली होती व त्यांच्यांत इतका उत्साह निर्माण झाला होता कीं, सभेच्या कामांत अडथळा करण्याची पोलिसची छातीच झाली नाहीं. कामगारांत या वेळीं दिसून आलेली जागृति व त्यांच्यांतील उत्साह पाहूनच लेनिनला या सभेची कायमची आठवण राहिली व आपण हातीं घेतलेल्या कार्यांत यश येईल अशी त्याला खात्री वाटूं लागली असें म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं.

पण लेनिन आज ज्या परिस्थितींत सांपडलेला होता ती परिस्थिति मात्र अत्यंत बिकट होती. बोल्शेव्हिक पक्षांतील त्याचे जोडीदार कोणी तुरुंगांत डांबले गेले होते तर कोणी लपून छपून गुप्तपणानें कोठेंतरी राहून दिवस काढीत होते. इव्हॅन बॅबुष्केन किंवा बोमनसारखे त्याच्या अगदीं विश्वासांतील दोस्त फांसावर लटकावण्यांत आले होते. या पार्टीवर आलेलें दुसरें मोठें संकट म्हणजे तिला पूर्वीसारखी आर्थिक मदत मिळण्याचें जवळ जवळ बंद झालें होतें. पार्टीची स्थिति पूर्वी या बाबतींत फार समाधानकारक होती. सनदशीर व उघडपणें चालणाऱ्या चळवळीं-करितां लागणारा पैसा उघडपणें मागतां येतो. वर्तमानपत्रें, सभा, मिरव-णुका, फंडाच्या पेट्या फिरवणें वगैरे सर्व मार्ग या चळवळींना मोकळे असतात. पण गुप्त चळवळींचें सर्वच निराळें. सर्वच प्रकारच्या हालचाली गुप्तपणें करावयाच्या असल्यामुळें या चळवळींना पैसाहि फार लागतो. पण १९०५–०७ व त्यापूर्वींही बोल्शेव्हिक पार्टीच्या कार्याबद्दल रशियन जनतेंत सहानुभूति होती व त्यामुळें पैशाच्या दृष्टीनें फारशी अडचण पडत नव्हती. पार्टीच्या आरंभींच्या कालांतही पार्टींत सामील झालेल्या तरुणांचे फार हाल झाले. कोणत्याही पार्टीला प्रथम असेच कष्ट सोसावे लागत असतात. पण या दिव्यांतून एकदां बाहेर पडल्यावर पार्टीला आपलें कार्य व्यवस्थित रीतीनें व जोरानें चालवितां येतें. बोल्शेव्हिक पार्टीच्या बाबतीं-तही असाच अनुभव आला. या पार्टीचें ध्येय, धोरण व प्रत्यक्ष कार्यपद्धति

ही केवळ सामान्य जनतेलाच पटली एवढेंच नाहीं तर मध्यम व भांडवल-वाल्या वर्गांतीलही कांहीं लोकांना ती पसंत पडली व ते तिला मनो-भावानें सर्व प्रकारची मदत करूं लागले. कांहीं पेढीवाल्या सावकारांनीं आपल्या थैल्यांचीं तोंडें या लोकांच्या चळवळी चालविण्याकरितां मोकळीं करून ठेविलीं होतीं. या वरिष्ठ वर्गांतील कांहीं स्त्रिया तर सर्व प्रकारें मदत करीत होत्या. आपल्याजवळचे दागदागिने देऊन त्या या चळवळ्यांना मदत करीत होत्याच, पण त्यांच्या वाङ्मयाचा गुप्तपणें प्रसार करण्याच्या कामींही त्या या पार्टीला मदत करीत असत. आपल्या सुंदर सुगंधी फणी-घराच्या पेटींतून या पक्षांतील तरुणांचा गुप्त पत्रव्यवहार त्या छपवून ठेवीत. शहरांतील सामान्य नागरिकही पार्टींतील लोकांना आपल्या घरांत गुप्तपणें आश्रय देत व पोलिसांपासून त्यांचें संरक्षण करीत असत. कोणी क्रांतिकारक आपल्या घरीं दडून राहिला आहे अशी कुणकुण घरांतील विद्यार्थ्याला अगर विद्यार्थिनीला लागलीं कीं, त्यांची जिज्ञासा तीव्र होत असे व या क्रांतिकारकांना पाहावयास मिळालें व त्यांचें बोलणें ऐकावयास मिळालें म्हणजे त्यांना मोठी धन्यता वाटत असे. १९०५ च्या क्रांतीच्या दिवसांत मास्को शहरांतील चाळीचाळींतून सशस्त्र क्रांतिकारक कामगार शिरले व त्यांच्या खिडक्यांच्या मागें दडून राहून तेथून त्यांनीं खालीं रस्त्यावर जमलेल्या पोलिसांवर व लष्करी शिपायांवर गोळ्यांचा वर्षाव केला व त्यांचे हल्ले मागें परतविले. या वेळीं तर मास्कोच्या नागरिकांनीं क्रांतिकारक कामगारांना सर्वतोपरी मदत केली होती. जंगलांतील झाडां-झुडपांमागें लपून गनिमी काव्यानें शत्रूंवर सर्व बाजूनीं गुप्तपणें मारा करावा व त्याला नामोहरम करावें तसाच प्रकार मास्को येथील क्रांतीच्या लढ्यांत घडून आला. मास्कोंतील चाळी या क्रांतिकारकांना जंगलांतील झाडां-झुडपांप्रमाणें उपयोगी पडल्या. त्यांतील नागरिकांनीं मोठ्या आनंदानें त्यांना आश्रय दिला. पण १९०५ च्या पराभवानंतर ही परिस्थिति पार पालटून गेली. क्रांतीला अपयश आल्यामुळें लोकांची निराशा झाली. बोल्शेव्हिक पार्टीच्या धोरणासंबंधानें व कार्यपद्धतीसंबंधानें लोकांना थोडासा अविश्वासही वाटूं लागला. सरकारच्या सर्वव्यापी टेहळणीमुळें व निर्दयतेच्या दडपशाहीमुळें लोकांचीं मनें भयभीत झालीं. अशा परिस्थितींत पार्टींतील

कांहीं कार्यकर्तेसुद्धां निराश झाले होते; मग सामान्य लोकांचीं मनें निराशेनें व्याप्त झालीं तर त्यांत कांहीं नवल नव्हतें.

याप्रमाणें समाजांतील बुद्धिवान् व पैसेवाला वर्ग बोल्शेव्हिकांशीं यापुढें कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवूं इच्छित नव्हता. कामगारवर्गाचा या पार्टीतील लेनिनप्रभृति पुढाऱ्यांवर अद्याप विश्वास होता; पण आर्थिक साहाय्याच्या दृष्टीनें या गरीब कामगारांच्या विश्वासाचा कितपत उपयोग होणार! पार्टीच्या चळवळी चालण्याच्या बाबतींत इतर सर्व अडचणींना तोंड देतां येतें, पण आर्थिक मदतीचाच तुटवडा पडला म्हणजे पार्टीतील लोकांपुढें जिवंत कसें राहावें हाच मोठा प्रश्न उभा राहतो. पण असल्या बिकट परिस्थितीलाही लेनिननें मोठ्या धैर्यानें तोंड दिलें. परदेशांतील मि. रॉथस्टिन, जॉर्ज लॅन्सबरी वगैरे लोकांना पत्रें पाठवून त्यानें त्यांच्याकडे द्रव्यसाहाय्याची मागणी केली. पार्टीला वेळोवेळीं मदत करणाऱ्या मॅक्झिम गॉर्कीशींही त्यानें या बाबतींत पत्रव्यवहार केला. ही सर्व खटपट चालू असतां मि. जोसेफ फेल्झ नांवाचा एक ज्यू कारखानदार कांहीं कर्जाऊ रक्कम देण्यास तयार झाला. पण १९०८ च्या जानेवारींत या रकमेची फेड केली पाहिजे अशी त्याची अट होती. पार्टीच्या या पडत्या काळांत ही अट पुरी करणें शक्य नव्हतें; तेव्हां मि. रॉथस्टिनच्या मध्यस्तीनें मि. फेल्झ यांची समजूत काढण्यांत येऊन त्यांच्याकडून ही रक्कम कर्जाऊ घेण्यांत आली. या वचनचिठ्ठीवर बोल्शेव्हिक व कांहीं मेन्शेव्हिक पुढाऱ्यांच्या सह्या होत्या. या वेळीं कर्जाऊ काढलेली ही रक्कम १९०८ च्या जानेवारींत नाहींच नाहीं तर १९२३ सालीं लेनिननें मि. फेल्झ यांना सव्याज परत केली.

याप्रमाणें पार्टीला आतां लोकांकडून आर्थिक मदत होत नव्हती. पार्टीच्या कार्यक्रमासंबंधानेंही कामगारवर्गांत अविश्वास वाढूं लागला होता. अशा परिस्थितींत पार्टीतील निरनिराळ्या गटांनीं आपले किरकोळ मतभेद विसरून आपली शक्ति अधिक संघटित राखावयास पाहिजे होती. पण प्रत्यक्ष परिस्थिति याच्या अगदीं उलट झाली होती. आपसांतील मतभेदांना तीव्र स्वरूप प्राप्त झालें होतें. पार्टीमधील ऐक्य केव्हांही भंग होऊं

द्यावयाचें नाहीं असें स्टॉकहोममधील सभेंत ठरले होतें. पण हे ठराव जागच्या जागीं कागदावरच राहिले. पार्टीमधील भांडणांना ऊत आला. कामगारांचा मतदानाचा हक्क नाशाबीत करण्यांत आला. ड्यूमा सभेच्या अगदीं पहिल्या निवडणुकीवर बहिष्कार घालण्यांत आला होता, तसाच बहिष्कार आतांही घालण्यांत यावा असें पार्टीमधील कांहीं मंडळी या वेळीं म्हणूं लागली. पण या पोरकटपणाच्या धोरणाला लेनिननें जोराचा विरोध केला व त्यांत त्याला यशही आलें. ड्यूमा सभेच्या प्रतिक्रियात्मक धोरणाचा निषेध करण्याकरितां आपल्या पक्षाचे प्रतिनिधि तींतून परत बोलावण्यांत यावे असेंही मत कांहीं लोक प्रतिपादन करूं लागले. पण लेनिननें या मंडळींचें कांहीं चालूं दिलें नाहीं. या वाटाघाटी-नंतर कांहीं महिन्यांनीं लंडन येथें या पार्टीची पांचवी परिषद् झाली. १९०७ च्या उन्हाळ्यांत ही परिषद् भरली. जॉर्ज लॅन्सबरी व मॅक्झिम गॉर्की यांनीं या बाबतींत फारच मदत केली. परिषदेच्या खर्चाची जबाबदारीही या दोघांनीं आपल्या अंगावर घेतली होती. या परिषदेंत मेन्शेव्हिकांचा अगदीं फजा उडाला. एक क्रांतिकारक संस्था या दृष्टीनें आंखण्यांत आलेलें पार्टीचें धोरण बदलून टाकावें, इतकेंच नव्हे तर ही पार्टीच मोडून टाकावी व 'कामगारसभा' या व्यापक नांवाची स्वतंत्र संस्था काढून तिच्यांत ही पार्टी सामील करून टाकावी व याप्रमाणें तिचें कायदेशीर अस्तित्वच नष्ट करून टाकावें, असेंही कांहीं लोक म्हणूं लागले होते. तसेंच पार्टीतील अगदीं जहाल लोक तिला अगदीं दुसऱ्या टोकाला नेऊं पाहात होते. सरकारी कायद्याच्या आधारानें आपली चळवळ यापुढें चालावयाची नाहीं, सर्व कायदेशीर चळवळींना फाटा द्यावयाचा, विशेषतः ड्यूमा सभेंत आपल्या प्रतिनिधींना राहूं देऊन त्यांच्याकडून पार्लमेंटरी पद्धतीची चळवळ करावयाचीच नाहीं, असें या जहाल मंडळींचें मत होतें. लेनिनला या दोन्ही पक्षांच्या लोकांना जोरानें तोंड द्यावें लागलें. मेन्शेव्हिकांमध्यें व या हट्टी जहाल बोल्शे-व्हिकांमध्यें फारसें अंतर नाहीं, असेंच लेनिनला आढळून आलें. हे जहाल लोक मोठमोठीं आवेशाचीं भाषणें करतात, बड्या बड्या जहाल शब्दांचा ते उच्चार करतात एवढेंच. बाकी सतत चिकाटीनें कामगारांचा लढा

चालू ठेवण्याकडे त्यांचें लक्ष नाहीं; उलट असें धोरण स्वीकारून या लढ्यांतून आपलें अंगच काढून घेण्याचा त्यांचा विचार आहे, असेंच लेनिनला आढळून आलें आणि लेनिनचा हा तर्क खराही झाला. कारण थोड्याच दिवसांत यांपैकीं बरेच लोक मेन्शेव्हिकांच्या गोटांत सामील झाले.

याप्रमाणें लेनिनची या दिवसांत सारखी ओढाताण चालू होती. दोन्हीही पक्षांच्या लोकांशीं त्याचें जमत नव्हतें. लेनिनच्या एका परम दोस्तानेंही त्याच्यावर या वेळीं मवाळपणाचा आरोप केला. पण या सर्व आरोपांना दाद न देतां तो या सर्वांशीं एकाकी झगडत राहिला. ज्या दोस्तानें त्याच्यावर वरील आरोप केला होता त्याला त्यानें स्वाभिमानानें पुढील उत्तर दिलें:— "एक ना दुसऱ्या कारणामुळें बहुजनसमाज असल्या लढ्यांतून माघार घेत असतो. असले प्रसंग या चळवळींत नेहमींच येत असतात आणि असे प्रसंग आले म्हणजे अर्थात् या लढ्यांचा पुढारी नालायक ठरविण्यांत येतो. हा लढा तो पुढें चालवूं शकत नाहीं असे त्याच्यावर आरोप करण्यांत येतात. मग अशा वेळीं या पुढाऱ्याला एकच मार्ग शिल्लक राहिलेला असतो. आपल्या निशाणाचें पावित्र्य व शुचित्व कायम ठेवण्याकरितां आपल्यांतील विरोधी मंडळींशीं व बाहेरच्या शत्रूंशीं अगदीं एकाकी राहून सारखें लढावें लागतें. याशिवाय त्याला या प्रसंगीं दुसरा मार्गच राहिलेला नसतो." या दिवसांत लेनिननें आपल्या आतेष्टांना व मित्रांना जीं पत्रें पाठविलीं त्यांतून या आपसांतील कलहांचाच त्यानें ऊहापोह केला आहे.

१९०५–०७ च्या क्रांतीच्या चळवळीनंतर ज्या बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना स्वतः होऊन हद्दपार व्हावें लागलें होतें, तसेंच ज्या लोकांना हद्दपार करण्यांत आलें होते त्यांची स्थिति हलाखीची झाली होती. बोल्शेव्हिक पक्षाचा पूर्ण पराभव झाला होता. रशियांत व बाहेरही या पक्षांतील लोकांना कोणी विचारीत नव्हतें. जणूं काय सर्वांनींच त्यांचा परित्याग केला होता. यामुळें त्यांचें जीवन खडतर झालें होतें. आयुष्यांत त्यांना कोणतीही उमेद राहिली नाहीं. परस्परांमधील त्यांचीं वितुष्टें वाढत चाललीं. त्यांच्यांत मतभेद झाले. चळवळीच्या धोरणासंबंधानें ते

परस्परांवर दोषारोप करूं लागले. या वेळीं खाजगी भांडणालाही ऊत आला. या लोकांत सरकारचे कांहीं हेरही बेमालूमपणें येऊन घुसले होते. तेही हीं भांडणें चेतवीत होतेच. परस्परविश्वासघाताचीं कृत्येंही या वेळीं घडून आलीं. अशा परिस्थितींत या सर्व निर्वासितांना आपलें जीवित अगदीं असह्य झालें होतें. "क्रांतीपूर्वी निर्वासितांचें जीवन जशा प्रकारचें कष्टमय होतें त्यापेक्षांही क्रांतीनंतर त्यांचें जीवन शतपटीनें कष्टमय झालें आहे. निर्वासितांचें जीवन जनापवादापासून अलिप्त राहणें अशक्य आहे. जनापवादाचा आपल्यावर वर्षाव होत असतांना स्वस्थ बसून राहणें हें अत्यंत किळसवाणें आहे. किंबहुना असल्या जीवनाकडे पाहणेंदेखील किळसवाणें आहे." असें लेनिननें मॅक्झिम गॉर्कीला पाठविलेल्या एका पत्रांत म्हटलें होतें.

याप्रमाणें शारीरिक व मानसिक दृष्टया अत्यंत कष्टमय जीवन व्यतीत करीत असतांनाही लेनिन हताश झाला नाहीं व आपल्या दोस्तांनाही त्यानें तसें होऊं दिलें नाहीं. गॉर्कीला पाठविलेल्या पत्रांत त्याच्या निराशावादीपणा-बद्दल लेनिननें त्याची चांगली खरटपट्टी काढली आहे.

"प्रिय अलेक्झी मॅक्झिमोविच्, तुझें आयुष्य तुला आतां अगदीं उदास वाटूं लागलें आहे. श्रद्धाहीन बुद्धिवान् वर्गांतील मंडळींना निराशा वाटावी अशी स्थिति कामगारचळवळीला प्राप्त झाली आहे आणि हें पाहण्याचा जुलुमाचा प्रसंग आपल्यावर ओढवला आहे असें तुला वाटत आहे. आमच्या या हद्दपार लोकांच्या जीवनांत अनेक निरनिराळे प्रसंग आम-च्यावर आले आहेत, तेव्हां या प्रसंगीं दुबळ्या मनोभावनांना तूं आपल्या हृदयांत ठाव द्यावा हें बरें नाहीं. अशी गोष्ट करण्यास मी तुला परवानगी देणार नाहीं. आम्हा हद्दपारी लोकांत झगडे सुरू होतात, आमच्यांत फूट पडते, आमच्यांत शब्दाशब्दी सुरू होते ही गोष्ट खरी आहे. आमच्यां-तील निरनिराळ्या गटांतून भांडणेंही होतात. पण तेवढ्यावरून सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या धोरणांत व ध्येयांत कांहीं अंतर्गत दोष आहेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. या पक्षांत जे लोक शिरले आहेत त्यांच्या ग्रहण-शक्तींत फरक आहे. या पक्षाच्या सिद्धान्तांचें त्यांना व्हावें तसें ज्ञान झालेलें नाहीं, असें फार तर म्हणतां येईल. वस्तुस्थिति अशी असली तरी ही चळ-

वळ त्यांतूनच आपलें डोकें वर काढील. रशियांतील हा क्रांतिकारी सोशल डेमोक्रॅटिक पक्ष या परिस्थितीला मार्गी टाकील. तिचा परिणाम तो आपल्यावर होऊं देणार नाहीं. निर्वासितांचें तिरस्करणीय जीवन त्यांच्या मार्गांत मुळींसुद्धां अडथळा आणूं शकणार नाहीं.''

या हद्दपारीपैकीं बरेच दिवस लेनिन व क्रुप्सकाया यांनीं पॅरिसमध्यें काढले. शहरांतील एका बाजूच्या वस्तींत त्यांनीं एक खोली भाड्यानें घेतली होती. प्रपंचाला सामान्यतः लागणारें सामानही या खोलींत नव्हतें. दोन जुनीं खिळखिळीं टेबलें, तशीच एक आरामखुर्ची, कांहीं स्टुलें व दोन साध्या लोखंडी खाटा त्यांनीं जिनिव्हाहून आणल्या होत्या. पॅरिस येथें अगदीं काटकसरीनें राहून हीं पतिपत्नी हालांत दिवस काढीत होतीं. तथापि इतर हद्दपाऱ्यांच्या स्थितीपेक्षां त्यांची स्थिति तुलनाच करावयाची तर थोडी चांगली होती असें म्हणणें भाग पडतें. कारण याच सुमारास भुकेनें व्याकूळ होऊन एक निर्वासित रशियन वेडा झाला व त्यानें सीन नदींत उडी टाकून आत्महत्या केली. पोटाला भाकरी मिळविण्याकरितां अति परिश्रम करावे लागल्यामुळेंच एकजण मृत्युमुखीं पडला. या निर्वासितांपैकीं कामो नांवाच्या निर्वासिताला तर फारच भयंकर हाल सोसावे लागले. कॉकेशस प्रांतांतील बोल्शेव्हिक बंडखोर सैनिकांचा तो नायक होता. १९०५–०६ च्या क्रांतीच्या वेळीं व त्यापूर्वींही त्यानें अनेक धाडसाचीं कृत्यें केलीं होतीं. अनेक वेळां पोलिसांच्या तावडींतून तो सुटला होता, तुरुंगांतून पळून गेला होता व अनेक कट त्यानें रचले होते. वेळोवेळीं नांवें बदलून व वेष बदलून राहात असल्यामुळें पोलिसांच्या हातीं तो सहसा लागत नसे. पोलिसांनींही त्याचा सारखा पिच्छा पुरविला होता व ज्या ज्या वेळीं तो त्यांच्या हातीं सांपडला त्या वेळीं त्याच्यावर खटले भरून त्याला फांशीच्या शिक्षाही देण्यांत आल्या होत्या. पण पोलिसांच्या हातावर तुरी देऊन त्यानें या शिक्षा चुकविल्या होत्या. बर्लिन येथें मात्र एका जर्मन हेरानें विश्वासघातानें त्याला गोत्यांत आणलें व जर्मन पोलिसांनीं त्याला रशियन पोलिसांच्या स्वाधीन केलें. या वेळीं पोलिसांच्या हातीं लागल्यानंतर त्यानें वेडाचें सोंग पांघरलें. दोन वर्षें त्यानें या सोंगाची बतावणी केली. जर्मनी व रशिया येथील तुरुंगांतील

दवाखान्यांत ठेवून त्याचा अत्यंत छळ करण्यांत आला; पण त्यानें आपलें वेडाचें सोंग पुरें केलें. पुढें या वेडाच्या पांघरुणाखालींच त्यानें पुन्हा एकदा तुरुंगांतून पळ काढला व पॅरिस येथें तो लेनिनला येऊन मिळाला. रशियांतील अनेक क्रांतिकारकांना विश्वासघातानें पकडून त्यांपैकीं कांहींना कारागृहांतून डांबून ठेवण्यांत आलें तर कांहींना हद्दपार करण्यांत आलें. या निर्वासितांत बोल्शेव्हिक पक्षाचे कांहीं पुढारीही होते. क्रांतीकरितां सुरू केलेलें युद्ध अयशस्वी झालें तरी आपल्या पक्षाच्या मतांचा प्रचार करण्याकरितां व कामगारसंघटनेचें काम चालू ठेवण्याकरितां कांहीं पुढारी गुप्तपणें रशियांत राहिलेच होते. या पुढाऱ्यांपैकीं कोणी एखादा पकडला गेला व तो हद्दपार झाला किंवा तुरुंगांत डांबला गेला कीं त्याचें काम चालविण्याची तरतूद करणें भाग पडे. या पुढाऱ्याच्या जागीं काम करीत राहील असा एखादा विश्वासू मनुष्य निवडावयाचा—तो निर्वासितांपैकींच विशेषतः निवडावयाचा, रशियांत तो गुप्तपणें जाऊन पोंचेल अशी व्यवस्था करावयाची व त्याच्या खर्चाची व्यवस्था करून द्यावयाची, हें सर्व काम लेनिनलाच करावें लागे. आणि इतकें सर्व करून या इसमाला केव्हां कोण विश्वासघात करून पोलिसच्या स्वाधीन करील याची काळजी पुन्हा आहेच. कारण १९०५ च्या क्रांतीच्या प्रयत्नानंतर झारच्या गुप्त पोलिसखात्यानें सर्व देशभर उच्छाद मांडला होता. या सर्वव्यापी गुप्त पोलिसखात्यानें रशियाचा कानाकोपरा व्यापून टाकला होता व देशाबाहेर निर्वासित झालेल्या लोकांच्याही मागें लागून त्यांनीं त्यांना सळो का पळो करून सोडलें होतें. आपसांतील कलहांना तर यावेळीं ऊतच आला होता. बाहेरचा शत्रु पुरवला पण घरांतल्या शत्रूंना तोंड देणें अत्यंत कठिण असतें. पण या प्रसंगालाही लेनिननें मोठ्या धैर्यानें तोंड दिलें. कम्युनिझमच्या पांघरुणाखालीं सुधारणावादाचा पुरस्कार बोल्शेव्हिक पक्षांतीलच कांहीं पुढारी मंडळी करूं लागली. या मंडळींनीं एका नवीनच तत्त्वज्ञानाची उभारणी केली व कम्युनिझमला अध्यात्मिकतेचें विकृत स्वरूप देऊन नवा देव उत्पन्न करण्याची व नवा धर्म स्थापण्याची भाषा ते बोलूं लागले. बोल्शेव्हिक पक्षांतील प्रसिद्ध पुढारी लुनाचार्स्की हा.या मंडळींपैकीं एक होता. या मंडळींचें हें नवें तत्त्वज्ञान हाणून पाडण्याकरितां लेनिननें

तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याचें ठरविलें. मॅक्, ॲव्हीनेरियस्, बॉगडॅनोफ, वाझारोव्ह, लुनाचार्स्की वगैरे कम्युनिझमला नवीन वळण देऊं पाहणारे लोक कट्टे ध्येयवादी नव्हते किंवा मार्क्सचा विरोधविकासात्मक भौतिकवादही त्यांना मान्य नव्हता. विरोधविकासवादापेक्षां भावनांना व सापेक्षतेला प्राधान्य देणाऱ्या व मार्क्सचें हेंच म्हणणें होतें असें प्रतिपादन करणाऱ्या या लोकांना तोंड देण्याकरितां लेनिनला तत्त्वज्ञानाचा एका निराळ्याच दृष्टीनें अभ्यास करावा लागला. १९०८–१९०९ या सुमारास तो या अभ्यासाकरितां कांहीं दिवस लंडनला जाऊन राहिला व ब्रिटिश म्यूझियममधील अर्वाचीन तत्त्वज्ञानी, मॅक्चे जर्मन अनुयायी, बर्गसॉं व त्याचे फ्रेंच अनुयायी यांच्या ग्रंथांचा त्यानें अभ्यास केला. त्याचप्रमाणें धड अध्यात्मवादीही नव्हेत व भौतिकवादीही नव्हेत असल्या व्यवहारवादी अमेरिकन तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांचेंही त्याला अवलोकन करावें लागलें. "मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा मीं अगदीं सूक्ष्मपणें अभ्यास केलेला नाहीं, त्याचें तत्त्वज्ञान ढोबळपणें मला समजलें आहे, मार्क्सची विचारसरणी व त्याचें तत्त्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारांत आणून दाखविणारा मी एक सामान्य माणूस आहे, कम्युनिझम्संबंधानें मी पुष्कळ विचार केला आहे, पण माझे हे विचार छापून या नवीन तत्त्वज्ञान्यांशीं वाद करण्याइतकें माझें सामर्थ्य नाहीं." अशा आशयाचें एक पत्र लेनिननें गॉर्कीला या वेळीं पाठविलें होतें. तथापि कम्युनिझमला विपरीत स्वरूप देऊन त्याला अध्यात्मिक तत्त्वज्ञानाचें स्वरूप देण्याचा प्रयत्न चाललेला पाहून तो प्रयत्न हाणून पाडणें आपलें कर्तव्य आहे असें त्याला वाटलें. म्हणून कम्युनिझम्चाच काय तर अर्वाचीन तत्त्वज्ञानाचाही सूक्ष्म अभ्यास करण्याचें त्यानें ठरविलें. आपल्या पक्षांतील लोक कम्युनिझम्च्या एका नव्या धर्माची स्थापना करूं पाहत आहेत याच गोष्टीचा लेनिनला अतिशय राग आला होता. स्वतःला भौतिकवादी म्हणवून बुद्धीला न पटणाऱ्या देवाच्या निर्मितीसंबंधाच्या कल्पनेची तर त्याला अतिशयच चीड आली होती. मॅक्झिम गॉर्की पूर्णपणें लेनिनच्या मताचा नव्हता, तरी नवा धर्म व नवा ईश्वर उत्पन्न करण्याच्या कल्पनेच्या तो अगदीं विरुद्ध होता. ईश्वर-

निर्मितीसंबंधाच्या या नव्या कल्पनेसंबंधानें डोस्टोव्हस्कीला गार्कीनें कळविलेले पुढील विचार मननीय आहेतः—

"हे लोक गूढवादी बनले आहेत, ते ईश्वराला निर्माण करूं पाहात आहेत, ईश्वराचा शोध करूं पाहत आहेत. ईश्वरसंशोधनाचें कार्य तूर्त तरी सोडून दिलें पाहिजे. तो एक निरुपयोगी धंदा आहे. जी वस्तु मुळीं नाहींच ती शोधीत राहणें व्यर्थ आहे. बी पेरलेंच नाहीं तर पिकाची मळणी तुम्हांला करतां यावयाची नाहीं."

गॉर्कीची ही मिळमिळीत भाषा लेनिनला खपली नाहीं. डोस्टोव्हस्कीच्या या पत्रासंबंधानें गॉर्कीला लिहितांना लेनिननें त्याची चांगलीच कानउघाडणी केली आहे. "तरुण मुलींवर अत्याचार करणाऱ्या भिक्षुकांच्या या अत्याचारांसंबंधाची माहिती जर्मन पत्रांतून मीं नुकतीच वाचली. कॅथॉलिक भिक्षुकांपेक्षां लोकसत्तावादाचा पुरस्कार करणारे भिक्षुक अधिक भयंकर आहेत. हे लोक पांढरे झगे वापरीत नाहींत किंवा एखाद्या क्षुद्र व हीन धर्माचा पुरस्कार करीत नाहींत, परंतु अध्यात्माचा व लोकसत्तेचा पुरस्कार करणारे हे भिक्षुक छोटे छोटे देव निर्माण करण्याची भाषा बोलूं लागले आहेत व लोकांना तसा उपदेश करीत आहेत." आपल्या पक्षांतील बुद्धिमान् लोकांनीं चालविलेल्या बुद्धिभेदाला आळा घालण्याकरितां लेनिनला या वादांत पडावेंच लागलें. कम्युनिझम्मधील इतर विषयांसंबंधानें त्यानें जसा अभ्यास केला व आपल्या पार्टीच्या प्रतिपक्षांना त्यानें जसें यशस्वी रीतीनें तोंड दिलें, त्याचप्रमाणें थोड्याच दिवसांत तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून त्यानें 'मटिरियालिझम् ॲन्ड इम्पीरिओ क्रिटिसिझम्' हें पुस्तक १९०८ च्या पावसाळ्यांत लिहिलें व त्यांत त्यानें मॅक्प्रभृति तत्त्वज्ञान्यांनीं काढलेल्या पंथांचा समाचार घेतला. पदार्थविज्ञानशास्त्रांतील शोधांचा आधार घेऊन मार्क्सवादाला मागें टाकूं पाहणाऱ्या हेन्री पॉंकारे व अमेरिकन व्यवहारवादी तत्त्वज्ञान्यांची विचारसरणीही त्यानें खोडून काढली.

लेनिननें वरील पुस्तकांत मार्क्स व एंजल्स यांनीं प्रतिपादिलेल्या विरोधविकासात्मक भौतिकवादाची शास्त्रोक्त मांडणी केली आहे.. प्रकृतीसंबंधीं (मॅटर) जे नवीन सिद्धान्त संशोधित झाले आहेत तेही विरोधविकासात्मक

भौतिकवादाशीं कसे जुळते आहेत हें त्यानें या पुस्तकांत दाखविलें आहे. वैज्ञानिक संशोधनाच्या कार्याची झपाट्यानें प्रगति होत आहे व विशेष बार्कले प्रभृतींनीं हें कार्य नेटानें पुढें चालविलें आहे हें खरें असलें तरी तत्त्वज्ञानांतील मूळ सिद्धान्त तसेच कायम आहेत. प्रकृति प्रथम कीं आत्मा प्रथम ? प्रकृतीला स्वतंत्र अस्तित्व आहे कीं माणसाच्या संवेदनांचेंच ती एक प्रतिबिंब आहे ? प्रकृतीला स्वतंत्र अस्तित्व आहे कां नाहीं ? या वादाला मॅक्प्रभृतींनीं तोंड फोडलें व प्रकृतीला स्वतंत्र अस्तित्व नाहीं, मनुष्याच्या मानसिक संवेदनांमुळें तिला अस्तित्व प्राप्त झालें आहे, असें ते प्रतिपादन करूं लागले होते. विश्व अशी स्वतंत्र वस्तु नाहींच, आपण आहों तर विश्व आहे, आपल्या संवेदनांचेंच तें प्रतिबिंबित स्वरूप आहे, या फिश्टेच्या तत्त्वज्ञानाचाच वरील मॅक्पंथीय तत्त्वज्ञान्यांनीं पुरस्कार करण्यास सुरुवात केली होती. लेनिननें वरील पुस्तकांत या विचारसरणीचें पूर्णपणें खंडन केलें आहे. विश्व व त्याचे सर्व व्यवहार आपल्या कल्पनेचे व संवेदनांचेच खेळ आहेत, त्यांना स्वतंत्र अस्तित्वच नाहीं, असें कोणी शहाणा शुद्धीवर असलेला मनुष्य म्हणावयाचा नाहीं. वेड्याच्या इस्पितळांत असलेलीं माणसेंच फक्त असें म्हणूं शकतील, असें लेनिननें या बाबतींत स्पष्ट व सडेतोड उद्गार काढले आहेत. "प्रकृति (मॅटर) सदैव गतिमान (सचेतन) आहे आणि संवेदना हा या सचेतन प्रकृतीचाच एक गुण आहे. प्रकृति सर्वांचें आदिकारण असून मन, संवेदना, जाणिवशक्ति, ज्ञान हीं सर्व तिच्या अधिकाधिक विकासाचीं फळें आहेत. ज्ञानोद्भवाचा हाच सिद्धान्त आहे आणि सृष्टिविज्ञानशास्त्रही याच सिद्धान्ताचा पाठपुरावा करीत आहे." या विचारसरणीचें लेनिननें आपल्या वरील पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे. मि. बरट्रॅन्ड रसेल, प्रो. एडिंग्टन व व्हाइटहेड वगैरेंनीं एका दृष्टीनें मॅक्च्या तत्त्वज्ञानाचाच पुरस्कार केला, प्रकृतीला स्वतंत्र अस्तित्व नाहीं असें दाखविलें व एक गणिती ईश्वर निर्माण केला असें लेनिनचें म्हणणें असून अध्यात्माचा व धर्माचा पुरस्कार करण्याकरितांच या लोकांनीं भौतिकवादाविरुद्ध तरवार उपसली आहे अशी लेनिननें आपल्या या पुस्तकांत तक्रार केली आहे. लेनिनला धर्माचा तर अत्यंत तिटकाराच असे. मनुष्याच्या

आत्म्याला गुलामगिरींत जखडून टाकण्याकरितांच धर्माची ही अत्यंत दुष्ट कल्पना काढण्यांत आली आहे असें लेनिन म्हणत असे. मनुष्य-जातीनें अगदीं प्राथमिक अवस्थेंत ईश्वरावर विश्वास ठेवला. निसर्गाचें भय वाटल्यामुळें त्यानें अशी कल्पना केली; पण अर्वाचीन सुधारलेल्या कालांत या ईश्वरविषयक कल्पनांचा निराळ्याच रीतीनें उपयोग करण्यांत येत आहे. प्राचीन काळीं निसर्गापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून मनुष्यानें ईश्वराला आपला खाविंद बनविलें व त्याचा तो गुलाम झाला. पण अर्वाचीन काळांत मनुष्य हा मनुष्याचा गुलाम बनला आहे व मनुष्यानें ही गुलामगिरी केली पाहिजे असा परमेश्वराचाच आदेश आहे असें त्यास सांगण्यांत येत आहे. प्राचीन काळीं मनुष्य हा निसर्गाचा गुलाम होता व ईश्वर हा या गुलामगिरीचा प्रतीक होता आणि अर्वाचीन काळीं तोच ईश्वर, मनुष्य हा मनुष्याचा गुलाम राहिला पाहिजे या भावनेचा प्रतीक बनला आहे. धर्म हें बुद्धीला मारून टाकणारें मादक द्रव्य आहे. भांडवलवाल्यांचे गुलाम बनलेली जनता या द्रव्याचें सेवन केल्यामुळें आपली मानवताच विसरून जाते व माणुसकीनें जिवंत राहाण्याची तिची इच्छाही या मादक द्रव्याच्या सेवनानें नष्ट होते. मनुष्य निसर्गाचा एकेक प्रांत काबीज करीत चालला असल्यामुळें निसर्गाला भिण्याची गरज आतां उरलेली नाहीं. आजच्या विसाव्या शतकांत तर निसर्गाच्या अंधःकारमय गुहेंत दडून राहिलेल्या अनेक अज्ञात शक्ति मनुष्यानें आपल्या वैज्ञानिक सामर्थ्यानें काबीज केल्या आहेत. अशा कालांत निसर्गातीत अशी कांहीं तरी शक्ति आहे असे भ्रामक सिद्धान्त प्रतिपादन करणें व धर्माचा व विज्ञानाचा समन्वय करूं पाहणें हें मूर्खपणाचें कृत्य आहे असें लेनिनचें मत होतें.

धर्मकल्पनेच्या अंगचे हे स्वाभाविक दोष प्रचलित समाजरचनेंतच आढळून येतात व भांडवलदार देशांतून प्रचलित असलेल्या समाजधारणेला धर्माचाच आधार देण्यांत आलेला आहे ही गोष्ट लेनिननें पूर्णपणें जाणलेली होती. श्रमजीवी जनतेवर आज जो सामाजिक जुलूम चालू आहे त्याचें मूळ धर्मांतच सांपडतें. भांडवलशाहीच्या अंध व विचारहीन शक्तीपुढें पूर्णपणें असहाय्य बनलेल्या या जनतेचें कांहीं चालत नाहीं.

महायुद्ध, भूकंप इत्यादि उत्पातांमुळें मानवी समाजावर जीं संकटें ओढवतात तशाच प्रकारचीं किंबहुना त्याहूनही हजारों पटींनीं अधिक भयंकर व असह्य दुःखें व छळ या भांडवलशाहीमुळें अज्ञ जनतेला सोसावीं लागतात. भयांतूनच देवाची उत्पत्ति झालेली आहे, तेव्हां वरील प्रकारचीं संकटें आलीं तरी तींसुद्धां ईश्वराच्या अवकृपेमुळेंच आपणावर आली आहेत असें या श्रमजीवी जनतेला स्वाभाविकपणेंच वाटतें. भांडवलशाहीची शक्ति खरोखरीच अंध असते. आपल्या सामर्थ्याच्या वाढीमुळें जगावर कोणतीं संकटें उद्भवतील हें खुद्द भांडवलशाहीलाही समजत नाहीं आणि अज्ञ श्रमजीवी जनतेला तर त्याची कल्पनाही नसते. भांडवलशाहीमुळें कोणतें संकट केव्हां उद्भवेल याचा नेमच नसतो. तें अगदीं अनपेक्षित व आकस्मिकपणें येतें. दारिद्र्य, कंगालपणा, वेश्यावृत्ति, उपासमार व त्यामुळें होणारे मृत्यु हे सर्व भांडवलशाहीचेच परिणाम असतात. आपल्या वांट्याला आलेलें काम आपण केलें पाहिजे व त्यामुळें उद्भवणाऱ्या आपत्तींनाही आपण मुकाट्यानें तोंड दिलें पाहिजे. शांतचित्तानें व निष्प्रतिकारबुद्धीनें हीं दुःखें व हा छळ सहन करणें हाच ईश्वरी आदेश आहे. ईश्वरी अवकृपेमुळें उद्भवलेल्या आपत्ति ईश्वरी कृपा होईल त्यावेळींच नाहींशा होतील. अशा प्रकारच्या या धार्मिक शिकवणीवर तर लेनिननें हल्ल्यांवर हल्ले चढविले होते. "उत्पादनाच्या साधनांवर समाजाचा ताबा असला, ठराविक योजनेप्रमाणें मालाचें उत्पादन होऊं लागलें व समाजांतील वर्गकलह नष्ट झाले म्हणजे मनुष्य सर्वतोपरी स्वतंत्र होईल. अशा समाजांत धर्माची आवश्यकता भासणार नाहीं. धर्माच्या भावना कदाचित् शिल्लक राहिल्या तर त्यांचा संबंध व्यक्तीपुरता राहील व असल्या धर्माचा कोणी छळही करणार नाहीं. कारण असल्या धर्मामुळें समाजाचाही छळ होणार नाहीं. ज्या समाजांत पिळणूक करणारे व पिळणुकीनें गांजलेले असे वर्गच राहणार नाहींत, सर्वांनाच ज्या समाजांत श्रमजीवी बनावें लागेल अशा वर्गरहित समाजांत पोपलासुद्धां एखाद्या कोपऱ्यांत काम करीत राहिलेला कारागीर बनावें लागेल." असें अनाटोल फ्रान्सनें एके ठिकाणीं म्हटलें आहे. अनाटोल फ्रान्ससारखा उपरोधिक लेखक व फ्रेंच ग्रंथकार व रशियन क्रांतिकारी लेनिन यांचें या बाबतींत अगदीं एकमत होतें.

परि१४५ ८८

आपल्या जीवनाचें रहस्य काय हें समजून घ्यावें याकरितांच तत्त्वज्ञान, धर्म व वाङ्मय यांचा उद्गम झालेला आहे, ही गोष्ट लेनिनला मान्य होती. पण भांडवलशाही समाजांत या सर्व गोष्टींचा—विशेषतः धर्माचा उपयोग जीवनाचें रहस्य झांकून टाकण्याकरितांच करण्यांत येतो असें लेनिन सांगत असे.

जीवनाचें रहस्य उकलण्याचा प्रयत्न ज्या वाङ्मयांत केलेला आढळेल असें वाङ्मय लेनिनला अर्थात्च अतिशय आवडत असे. समाजाच्या आजच्या रचनेंत क्रांति झाली पाहिजे, बौद्धिक व आर्थिक गुलामगिरींतून मानवी समाजाची मुक्तता झाली पाहिजे, या तत्त्वाचें प्रतिपादन जे ग्रंथकार करीत असत व या तत्त्वांच्या अंमलबजावणीकरितां जे ग्रंथकार झगडा करण्यासही तयार असत त्यांचे ग्रंथ तो पुनःपुन्हा वाचीत असे. हर्झेन पिसारेव्ह, चेर्नीशेव्हस्की, पुष्किन, नेक्रासोव्ह, टॉलस्टॉय, चेखोव्ह, गॉर्की वगैरे रशियन ग्रंथकार व त्याचप्रमाणें झोला, हॉफ्टमन, व्हेऱ्हारेन व याच विचारांचे इतर युरोपियन ग्रंथकार त्याला फार आवडत. टॉलस्टॉयवर त्याचें फारच प्रेम होतें. टॉलस्टॉय हा रशियन राजक्रांतीचा आरसा आहे असें लेनिन म्हणत असे. पण हा आरसा साधा नाहीं. रशियन समाजांतील परस्परविरोधी दृश्यें प्रतिबिंबित करणारा असा हा आरसा आहे. सर्व मानवी जीवन विरोधानेंच भरलें आहे. सुखाला, साधेपणाला या जीवनांत कधींच थारा मिळत नाहीं. टॉलस्टॉयचें जीवन व लेखन असेंच विरोधात्मक असून त्याच्यासंबंधानें लेनिननें पुढीलप्रमाणें आपलें मत व्यक्त केलें आहे.

"टॉलस्टॉय प्रतिभावान लेखक होता. जागतिक वाङ्मयांत पहिला नंबर पटकावतील असे ग्रंथ त्यानें लिहिले आहेत. कंगाल रशियन जीवनाचें अनुपमेय चित्र त्यानें आपल्या ग्रंथांत काढून दाखविलें आहे, पण तो स्वतः जमीनदार होता व खिस्ताच्या नांवानें हुतात्म्याचा कंटकयुक्त मुकुट त्यानें आपल्या शिरावर धारण केला होता. एका बाजूनें भांडवलशाहीनें चालविलेल्या पिळणुकीविरुद्ध निर्दयपणाची टीका तो करतो; सरकारनें केलेली अत्याचाराचीं कृत्यें, सरकारच्या कारभाराचा व न्यायाचा फार्स तो उघडकीला आणतो; व संपत्तीची व मानवी

संस्कृतीची वाढ व श्रमजीवी जनतेचा छळ व तिला भोगावी लागणारी दुःखें यांचा परस्परविरोध तो दाखवून देतो; तर दुसऱ्या बाजूला एखाद्या धर्मवेड्याप्रमाणें दुष्टांशीं निष्प्रतिकारबुद्धीनेंच वागलें पाहिजे असा उपदेश तो करतो. एका बाजूनें अत्यंत शांत व स्थिर बुद्धीनें वास्तवतेचें तो प्रकटीकरण करतो व सर्व प्रकारच्या ढोंगांचें आवरण तो फाडून टाकतो, तर दुसऱ्या बाजूनें जगांतील सर्व वस्तूपेक्षां अत्यंत दुष्ट, अशुद्ध व भ्रष्ट असलेल्या धर्माचा तो पुरस्कार करतो. सरकारी पाद्याऐवजीं नीतिनिष्ठ पाद्यांची योजना सरकारी कारभारावर करावी, म्हणजे पूर्वीपेक्षां अधिक धूर्त व तिरस्करणीय असा एक पाद्यांचा संप्रदायच निर्माण करावा असें तो सांगतो. खरें बोलावयाचें म्हणजे, 'हे रशियन मातृभूमि, तूं दारिद्री आहेस व तूं श्रीमंत आहेस, तुझ्यापाशीं भरपूर संपत्ति आहे, तूं सामर्थ्यशाली आहेस व तूं असहाय्य व दुबळी आहेस.' अशीं परस्परविरुद्ध विधानें टॉलस्टॉयनें केलीं आहेत व त्याचें स्वतःचें आचरणही असेंच परस्परविरुद्ध आहे."

दुष्टांशीं निष्प्रतिकारबुद्धीनें वागावें व आपल्यावर जे प्रसंग येतील ते मुकाट्यानें सहन करावे ही गोष्ट लेनिनसारख्या मर्द व जबर आशावादी माणसाला पटणें शक्यच नव्हतें. पण टॉलस्टॉय असें कां म्हणत असे यांतील मर्म मात्र लेनिननें जाणलें होतें. रशियांतील परिस्थितिच तशी होती. लाखों शेतकरी जुलुमाखालीं चिरडून गेले होते व भयंकर हालअपेष्टांत व दारिद्र्यांत ते दिवस काढीत होते. समाजाच्या अंतरंगांत शिरून त्यांची मनस्थिति प्रकट करणारा लेखक दुसरें काय करणार ! दारिद्र्याला हालअपेष्टांना व दुर्बलतेलाही सीमा असते. ही सीमा ओलांडली म्हणजे प्रतिकार करण्याचें सामर्थ्यही असल्या समाजांत राहात नाहीं. टॉलस्टॉय इतका दैववादी व निराशावादी कां बनला होता ही गोष्ट लेनिननें जाणली होती. प्रगति हा निसर्गाचा धर्म खरा, पण पौर्वात्य देशांच्या बाबतींत निसर्गाचा हा कायदा खोटा ठरला आहे असें टॉलस्टॉयला वाटत होतें. पौर्वात्य लोकांच्या पुराणप्रियतेकडे पाहून व आहे त्या जागेवरून हालावयाचें नाहीं हा त्यांचा स्वभाव पाहून निसर्गाचा वरील कायदा खोटा पडला आहे, मानवी समाजाचें पाऊल नेहमीं प्रगतीच्या मार्गावर असतें हा सामान्य सिद्धान्त खरा मानतां येत नाहीं, असें टॉलस्टॉयला

वाटूं लागलें होतें. १८६१ ते १९०४ पर्यंत रशियांतील सामाजिक परिस्थिति अशाच प्रकारची होती. देशांतील शेतकरीवर्गाला आपल्या प्रगतीचा मार्ग दिसत नव्हता. भांडवलशाहीच्या वाढीमुळें देशांत एक नवीनच क्रांतिकारी वर्ग निर्माण होत आहे याची जाणीव या शेतकरीवर्गाला झालेली नव्हती. श्रमजीवी जनतेला पिळून काढणारी भांडवलशाही ही एक दुष्ट शक्ति आहे, ही गोष्ट रशियांतील शेतकऱ्यांना पटली होती. पण या शक्तीला तोंड द्यावयाचें कसें ! दैववादी व निराशावादी बनलेल्या समाजाला निष्प्रतिकारच सुचावयाचा आणि या समाजाच्या परिस्थितीशीं एकरूप झालेले लेखकही तसेच दैववादी असावयाचे व आपल्यावर आलेले प्रसंग मुकाट्यानें सहन करीत राहिलें पाहिजे, यांतच एक प्रकारचें सामर्थ्य आहे असें ते सांगावयाचें हें साहजिक होतें. पण १९०५ च्या क्रांतीच्या प्रयत्नानें ही स्थिति पार बदलून टाकली. रशियांत एक क्रांतिकारी वर्ग निर्माण झाला आहे ही गोष्ट या चळवळीच्या वेळीं उघडकीस आली. १९०५ सालानें आणखी एक महत्त्वाची कामगिरी केली. 'पूर्व, जागची कधीं हालायची नाहीं' या पौराणिक कल्पनेला या सालानें मोठा धक्का दिला. पौर्वात्य देश जागे झाले आहेत, पूर्वींप्रमाणें स्थिर व अचल राहण्यास ते तयार नाहींत अशी खात्री या सालानें पटवून दिली. "पूर्वेच्या अचल वृत्तीचा अंत होण्यास १९०५ पासून प्रारंभ झाला" असें लेनिननें त्या वेळीं म्हटलें होतें. लेनिनचें हें म्हणणें यथार्थ नव्हतें असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. पण या क्रांतीनंतर जी परिस्थिति निर्माण झाली व १९१०-११ सालीं लेनिनवरही जे खडतर निराशेचे प्रसंग आले, त्यावेळीं या पुढील वीस वर्षांत रशियाची स्थिति पार बदलून जाईल, रशियांत क्रांति झालेली असेल, रशियांत सोव्हिएट सरकार स्थापन झालेलें असेल, ही कल्पना खुद्द लेनिनला देखील आली नसेल. तसेंच १९१०-११ सालीं हताश झालेल्या लेनिनचें नांव जगांत सर्वतोमुखीं होईल, चीनमधील कॅन्टन व हिंदुस्थानांतील मुंबई असल्या पौर्वात्य देशांतील शहरांतून त्याच्या नांवाचा जयजयकार होईल व पौर्वात्य देशांतील मजूर आपल्या निशाणावर लेनिनचे फोटो लावून ते मिरवीत नेतील याची कल्पना त्या वेळीं कोणालाच आली नसेल. असें असलें तरी रशियाच्या

बदलत्या परिस्थितींत निराशावादी व निष्प्रतिकारवादी टॉलस्टॉयला जी गोष्ट दिसली नाहीं ती गोष्ट मार्क्सवादी लेनिनला दिसली होती. रशियांतील जनतेंत क्रांतिकारी वर्ग निर्माण होत आहे ही गोष्ट त्यानें पूर्णपणें जाणली होती.

हर्झेनच्या शतवार्षिक जन्मदिनाच्या प्रसंगीं लेनिननें जो लेख लिहिला त्यांत रशियांतील स्वातंत्र्याच्या चळवळींत कसकशीं स्थित्यंतरें होत गेलीं व शेवटीं राज्यक्रांतींतच त्यांचें कसें पर्यवसान होईल, याचें त्यानें विवरण केलें आहे. "हर्झेनला जेव्हां आपण मान देतों त्या वेळीं रशियन क्रांतीच्या बाबतींत ज्यांनीं प्रयत्न केला अशा तीन पिढ्या, म्हणजे तीन वर्ग आमच्या डोळ्यांपुढें स्पष्टपणें दिसूं लागतात. प्रथम सरदार, जमीनदार, डिसेंब्रिस्ट व हर्झेन यांची पिढी डोळ्यांपुढें उभी राहते. या क्रांतिकारकांचें वर्तुळ फारच संकुचित होतें. सामान्य जनतेपासून ते फार लांब होते. डिसेंब्रिस्टांनीं हर्झेनला स्फूर्ति दिली. हर्झेननें क्रांतिकारक चळवळीला प्रारंभ केला. क्रांतिकारी बुद्धिमान् लोकांनीं नंतर ही चळवळ हातांत घेतली. त्यांनीं तिचा व्याप वाढविला. तिला जास्त संघटित व प्रबल बनविलें. चेर्नीशेव्हस्कीनें या बाबतींत प्रथम पुढाकार घेतला. 'पीपल्स वुइल' पार्टीच्या घाडसी लोकांनीं या चळवळीचा पाठपुरावा केला. या लढाऊ वृत्तीच्या लोकांचें वर्तुळ वाढत चाललें व त्यांचा जनतेशीं अधिकाधिक निकट संबंध येऊं लागला. "हे तरुण भावी वादळांतील कर्णधार आहेत" असें हर्झेननें यांच्यासंबंधानें म्हटलें होतें. पण हें वादळ अद्याप उत्पन्न व्हावयाचें होतें. हर्झेनपासून आपण एक धडा घेऊं शकतों. क्रांतीकरितां निस्वार्थबुद्धीनें केलेली एकनिष्ठ सेवा व क्रांतीवर दृढ श्रद्धा ठेवून लोकांना केलेली विनंति कधींही फुकट जात नाहीं. या चळवळींत व क्रांतींत वीसोगणति वर्षें जातात व बी पेरल्यापासून पुढें पीक हातीं येईपर्यंत मध्यंतरीं बराच काल जातो, तथापि क्रांतीचे प्रयत्न शेवटीं फळाला आल्याशिवाय राहात नाहींत."

लेनिनची श्रद्धा व लेनिननें चालविलेला लढा मृत्यूची साधना करण्याकरितां नव्हता. संन्यस्तवृत्तीनें राहावें किंवा निष्प्रतिकाराची भावना वाढवावी याकरितां त्यानें हा लढा चालविलेला नव्हता. मानवी समाजांतील जीवनसामर्थ्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता आणि हें प्रचंड

सामर्थ्य श्रमजीवी वर्गाच्या अंगीं असून जगाचें भवितव्य याच वर्गाच्या हातांत आहे अशीच त्याची श्रद्धा होती. आणि या श्रद्धेच्या जोरावरच आपल्यावर व आपल्या पक्षांतील मंडळींवर कसलींही संकटें आलीं तरी त्यांना न जुमानतां त्यानें आपल्या क्रांतीच्या मतप्रसाराचें काम चालूच ठेविलें होतें. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील कांहीं लोकांनीं उत्पन्न केलेल्या निरनिराळ्या प्रश्नांवर त्यानें लेखमाला लिहिण्यास सुरुवात केली होती. १९०९ अखेरपर्यंत ही लेखमाला चालूच होती. आंतरराष्ट्रीय सोशालिस्ट ब्यूरोचें काम रशियाचा एक प्रतिनिधि या नात्यानें त्याला करावें लागत होतें. ब्रुसेल्स येथील सोशालिस्ट वृत्तपत्रसंघाचें काम त्याच्याकडेच होतें व रशियांत जी चळवळ चालू होती तिच्याकडे पूर्णपणें लक्ष ठेवून तिच्या मार्गदर्शकत्वाचें महत्त्वाचें कामही त्यालाच करावें लागत होतें. विशेष हें कीं, पॅरिसमधील एका बाजूच्या कोंदट व निर्जीव वातावरणांत राहून त्याला हें काम करावें लागत होतें. "येथील जीवन नरकमय झालें आहे, असल्या ठिकाणीं राहून आपल्या जुन्या मित्रांशीं संबंध ठेवणें दुरापास्त झालें आहे व त्यांच्याकडून कांहीं बातमी समजणें हें तर दसपटीनें मुष्किलीचें झालें आहे, म्हणूनच तुमचें आलेलें पत्र अत्यंत मोलाचें आहे." असें पत्र स्वेर्डलोव्ह नांवाच्या आपल्या एका रशियन दोस्ताला त्यानें धाडलें होतें. लेनिनचा हा रशियन दोस्त पुढें क्रांतीनंतर सोव्हिएट प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष झाला.

पॅरिसमधील स्फूर्तिहीन, कंटाळवाण्या व खडतर जीवनासंबंधानें लेनिननें आपल्या बहिणीला व आईला पत्रें लिहून कळविलें होतें. "गेलें संबंध वर्ष आम्ही पॅरिसमध्यें आहों. या ठिकाणीं आम्ही शहरांतील एका बाजूच्या भागांतील लहानशा खोलींत राहात आहो. दुःखाची गोष्ट ही कीं, खऱ्या जीवनांतील आनंदाची यत्किंचित्‌ही प्राप्ति आम्हांला या ठिकाणीं होत नाहीं. थोड्याच दिवसांपूर्वी जवळच्या एका लहानशा थिएटरांत आम्ही एक नाटक पाहावयास गेलों होतों. तेथून मात्र अगदीं उल्हसित अंतःकरणानें आम्ही परत आलों. हें नाटक पाहण्याकरितां आलेले बहुतेक सर्व लोक खऱ्याखुऱ्या कामकरीवर्गापैकींच होते. आया आपल्या मुलांना अंगावर पाजीत बसल्या होत्या. त्यांच्या डोक्यावर

टोप्या नव्हत्या. त्या प्रक्षुब्ध झालेल्या दिसत होत्या. समोर चालू असलेल्या नाटकाचा त्यांच्या मनावर ताबडतोब परिणाम होत होता. एखाद्या पात्रानें चांगला अभिनय केला म्हणून हे लोक त्याला टाळ्या देत नव्हते, तर हीं पात्रें जीं कृत्यें करीत होतीं त्या चांगल्या किंवा वाईट कृत्यांना उद्देशून ते आपले भाव व्यक्त करीत होते. या लोकांच्या अभिरुचीला साजेल अशीच या नाटकाची रचना करण्यांत आली होती. तूं या ठिकाणीं असतीस तर तुला तें फार आवडलें असतें. मन्याशा (लेनिनची एक बहीण) या ठिकाणीं हें नाटक पाहण्यास नाहीं, हें पाहून तर मला फारच वाईट वाटलें."

पॅरिसमध्यें असतांना त्याच्या पक्षांतील विरोधकांनीं व पक्षाबाहेरील त्याच्या शत्रूंनीं त्याचा सारखा पिच्छा पुरविला होता. ट्रॉट्स्की मेन्शेव्हिक पक्षाचा त्याग करणार आहे असें समजलें त्या वेळीं लेनिननें त्याला आपल्या पक्षाला येऊन मिळण्याबद्दल व आपल्याबरोबर काम करण्याबद्दल लिहिलें होतें. पण ट्रॉट्स्कीला ही कल्पना पसंत पडली नाहीं. लेनिननें आपल्या मनाशीं कांहीं तरी ठरविलें म्हणजे तें तो कधींही सोडीत नाहीं, आपलाच हट्ट तो चालवूं पाहतो, हीच गोष्ट त्याच्या विरोधकांना पसंत नव्हती. कोणी कितीही हल्ले करो, लेनिन आपली जागा सोडावयास कधींच तयार नाहीं असें पाहिलें म्हणजे त्याचे विरोधक सहजच संतप्त होत व त्याच्यावर भलतेसलते आरोपही करीत. पण त्यांना तो कधींच दाद देत नसे. बोल्शेव्हिक पक्षांतील लेनिनच्या विरोधकांना तर लेनिनचा हा स्वभाव मुळींच आवडत नसे. "हा एकटा मनुष्य सर्व पक्षाचा नाश करीत आहे. सगळे एका बाजूला आणि हा एकटा एका बाजूला हें चालावयाचें कसें ! असें तर कोठेंच पाहिलें नाहीं. हा कोठेंतरी नाहींसा झाला किंवा मरण पावला तर किती बरें होईल ! आपल्या पक्षाला खरोखरीच चांगले दिवस येतील." असेही उद्गार त्याच्या पक्षांतील लोक केव्हां केव्हां काढीत असत. मेन्शेव्हिक पक्षांतील डॅन नांवाच्या गृहस्थानें एकदां असे उद्गार काढल्याबरोबर "एकटा एक मनुष्य सबंध पक्षाचा नाश कसा करूं शकेल ! सर्वच लोक त्याच्यापुढें नमतें कसे घेतात ! त्याला विरोध करण्याची ताकद कोणाच्याच अंगीं कशी उरलेली नाहीं ! लेनिनला विरोध करण्याची ताकद आपल्या

अंगीं उरली नाहीं म्हणून त्याच्या मरणाची इच्छा काय म्हणून करावी ?" असें लेनिनचा एक जिगरदोस्त क्रिझिझानोव्हस्की यानें डॅनला विचारलें.

"दिवसाचे चोवीस तास सारखा क्रांतीच्या तयारीकरितां झटणारा असा दुसरा कोणीही मनुष्य बोल्शेव्हिक पक्षांत नाहीं हेंच त्याचें कारण आहे. जेव्हां पाहावें तेव्हां क्रांतीसंबंधानेंच त्याचे विचार चालू असतात. स्वप्नांत-सुद्धां क्रांतीशिवाय त्याला कांहीं दिसत नाहीं. पहा, असल्या माणसापुढें तुम्ही तरी काय कराल सांगा पाहूं !" असें डॅननें त्याला उत्तर दिलें.

डॅन किंवा लेनिनचे दुसरे विरोधक या वेळीं कदाचित् थट्टेनें त्याच्या मरणासंबंधानें बोलले असतील. पण १९१८ सालीं तर खरोखरीच या विरोधकांनीं त्याला ठार मारण्याचा अगदीं जोराचा प्रयत्न केला होता.

याप्रमाणें स्वकीय व परकीय शत्रूंनीं गांजल्यामुळें लेनिनला सर्व काम एकाकीच करावें लागत होतें. या दगदगीमुळें लेनिनची प्रकृति एकाएकीं ढासळते कीं काय, अशीही भीति वाटूं लागली होती. तो या दिवसांत पुनःपुन्हा आजारी पडूं लागला. त्याची प्रकृति खालावत चालली. क्रुप्सकायाही त्याच्यावरोबरच रात्रंदिवस काम करीत होती. "कामाच्या दगदगीमुळें लेनिन स्वतःही मरून जाईल व आपल्याबरोबर नाडयूशालाही (लेनिनच्या पत्नीचें लाडकें नांव) मारून टाकील" असें त्याची सासू केव्हां केव्हां वैतागानें म्हणत असे.

रात्रंदिवस क्रांतीसंबंधानेंच विचार करावयाचा व क्रांतीची तयारी करण्याकरितां बहुजनसमाजाला संघटित करण्यासंबंधानें रशियांतील आपल्या पक्षांतील दोस्तांशीं सारखा पत्रव्यवहार करावयाचा व राष्ट्रांतील कोणत्या वर्गाला कशा रीतीनें संघटित करावयाचें याच्या सूचना त्यांना द्यावयाच्या, हेंच काम तो या दिवसांत करीत होता. त्याच्या पक्षांतील त्याचे दोस्त निराशेनें व्याप्त झाले होते. दडपशाहीमुळें सर्वत्र सामसूम झालेलें पाहून त्याच्या दोस्तांनीं हातपाय गाळले होते. पण लेनिननें या पिछेहाटीच्या कालांतही निराशेचा पगडा आपल्या मनावर बसूं दिला नाहीं व आपल्या नियोजित कार्यांत त्यानें खंड पडूं दिला नाहीं. पीटर्सबर्ग, मास्को वगैरे शहरांतील कामगारांना संघटित करण्याबद्दल तो आपल्या दोस्तांना वारंवार लिहित होता व त्यांनीं प्रदर्शित केलेल्या अडचणींतून कसा मार्ग

काढावयाचा हेंही त्यांना कळवीत होता. पण कामगारांना संघटित करीत असतांना रशियांतील शेतकरीवर्गाच्या हिताकडे दुर्लक्ष करतां कामा नये हेंही त्यांना तो बजावीत होता. १९०५ पासून रशियांतील उद्योगधंदे झपाट्यानें वाढत आहेत व त्याबरोबर क्रांतिकारी कामगारवर्गही वाढत आहे; पण रशियांतील शेतकऱ्यांचा प्रश्न जोपर्यंत सुटला नाहीं तोपर्यंत या क्रांतिकारी वर्गानें केलेली क्रांतीची चळवळ यशस्वी व्हावयाची नाहीं असें तो नेहमीं म्हणत असे. कामगारवर्ग क्रांतिकारी असतो, तो क्रांति करूं शकतो, पण ही क्रांति यशस्वी होण्यास देशांतील शेतकरीवर्गाची त्याला सहानुभूति व साहाय्य असावें लागतें, हा लेनिनचा सिद्धान्त होता. १९०७ सालीं स्टूटगार्ट येथें झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या प्रसंगीं लेनिन हा रशियांतील शेतकरीच आहे असें रोझा लक्झेंबर्गनें म्हटलें होतें. "स्वतःच्या बुद्धीनें चालण्याची वृत्ति व आग्रही स्वभाव हे रशियन शेतकऱ्याच्या अंगचे गुण लेनिनमध्यें पूर्णपणें उतरले आहेत; त्याचें डोकेंही रशियन शेतकऱ्याच्या डोक्यासारखेंच आहे." असें तिनें या प्रसंगीं बोलून दाखविलें होतें. पण लेनिन हा खराखुरा क्रांतिकारी कामकरीवर्गाचाच पुढारी होता. लंडन येथें याच सुमारास झालेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या परिषदेच्या वेळीं हाइड पार्कमध्यें कांहीं रशियन कामगारांमधील झालेला पुढील मनोरंजक संवाद गॉर्कीनें आपल्या आठवणींत सांगितला आहे. या परिषदेच्या वेळीं या पक्षांत लेनिनचा एक तट व प्लेखानोव्हचा एक तट असे दोन तट पडले होते. या तटांसंबंधानें बोलतांना एक कामगार म्हणाला कीं, "युरोपांतील कामगारांच्या बाजूनें लढणारे पुष्कळ पुढारी असतील व लेनिनपेक्षां ते अधिक हुशारही असतील; पण ज्याला पाहिल्याबरोबर आपलेपणा वाटतो व ज्याच्याबद्दल प्रेम वाटतें असा लेनिनशिवाय दुसरा कोणीही पुढारी या सर्व मंडळींत मला दिसला नाहीं." दुसऱ्या वृद्ध कामगारानें सस्मित होऊन उत्तर दिलें "होय, तो पोरगा आपल्यापैकींच एक आहे असें वाटतें खरें."

"पण प्लेखानोव्हदेखील आपल्यापैकींच एक आहे" असें एकजण म्हणाला.

"प्लेखानोव्ह, होय, तो आमचा गुरु आहे, आमचा पंतोजी आहे.

परंतु लेनिन आमचा पुढारी आहे, आमचा दोस्त आहे." असें तावड-तोब अगदीं रास्त उत्तर त्याला मिळालें.

" प्लेखानोव्हचा जुना डगला आतां फारच घट्ट झाला आहे " असें एक तरुण कामगार थट्टेच्या स्वरांत बोलला.

लेनिन व गॉर्की यांची लंडन येथील या कॉंग्रेसच्या वेळीं प्रथमच गांठ पडली व यानंतर या दोघांमधील प्रेम अधिकाधिक दृढ होत गेलें. ' कॅप्री ' हें बेट गॉर्कीचें प्रिय वसतीस्थान होतें. या बेटावर लेनिन नेहमीं मधून मधून येऊन राहात असे. त्याचप्रमाणें बॉगर्डनोव्ह, लुनाचार्स्की, बाझारोव्ह वगैरे बोल्शेव्हिक पक्षांतील ठळक ठळक मंडळीही या ठिकाणीं येऊन राहात असत. एकाच पक्षांतील ही मंडळी, सर्वांचें ध्येयही एकच, मग हीं मंडळी आपापसांत भांडतात काय म्हणून, याचें गॉर्कीला नेहमीं आश्चर्य वाटत असे.

"तुझ्या मताप्रमाणें प्लेखानोव्ह व मी एका मताचेच आहों म्हणावयाचें ! पण मला तसें वाटत नाहीं. तो भौतिकवादी असला तरी त्याचें ध्येय अगदीं निराळें आहे." असें लेनिननें या प्रसंगीं बोलून दाखविलें.

प्लेखानोव्ह बोल्शेव्हिक पक्षांतील एक अत्यंत हुशार पुढारी होता. जुन्या राजवटींत जनतेवर कोणत्या प्रकारचे अन्याय होत आहेत विशेषतः भांडवलशाहीमुळें लोकांवर किती भयंकर जुलूम चालू आहेत हें त्याला समजत होतें. पण कामगारवर्गाच्या साहाय्यानें जनतेची विचारक्रांति घडवून आणतां येईल व जनतेच्या दृष्टिकोनांत पूर्ण बदल करतां येईल या गोष्टीवर त्याचा विश्वास नव्हता. अशी क्रांति व्हावी असें त्याला मनापासून वाटत होतें. तात्त्विक दृष्ट्या त्याकरितां तो मरायला देखील तयार होता. पण ही क्रांति प्रत्यक्ष होईल व ती कामकऱ्यांसारख्या आडदांड लोकांच्या हातून होईल असें त्याचें अंतःकरण त्याला सांगत नव्हतें. लेनिनचा कामगारवर्गावर पूर्ण विश्वास होता. लेनिनमध्यें आणखी एक विशेष होता. या बाबतींत गॉर्कीनें त्याच्यासंबंधानें काढलेले उद्गार मननीय आहेत. " आपल्यावर होत असलेल्या अन्यायांचा प्रतिकार न करता निष्प्रतिकारबुद्धीनें कष्ट सहन करीत राहिल्यानें आपल्याला मोक्ष प्राप्त

व्हावयाचा नाहीं. कष्ट सहन करीत राहणें ही जरूरीची व अपरिहार्य गोष्ट आहे असें नाहीं. ही वृत्ति अत्यंत तिरस्करणीय असून तिला मानवी समाजानें आपल्या मनांत कधींही थारा देऊं नये, असें प्रतिपादन करणारा सर्व रशियांत लेनिन हा एकटाच पुरुष होता.'' कष्ट सहन करून दुसऱ्याच्या मनांत सहानुभूति उत्पन्न करण्याच्या व त्याचें अंतःकरण बदलून टाकण्याच्या भरीस न पडतां बहुजनसमाजानें स्वावलंबनानें व आपल्या मनगटाच्या जोरावर आपल्या मुक्तीचा मार्ग शोधून काढावा असेंच लेनिनचें म्हणणें होतें.

# वादळाचीं पूर्वचिन्हें

१९१० च्या आगष्टमध्यें कोपेनहेगेन येथें सेकंड इंटरनॅशनलचें अधिवेशन झालें. रशियांतील समाजवादी पक्षाचा प्रतिनिधि या नात्यानें लेनिन या अधिवेशनास हजर होता. रशियांतील त्याचे जे दोस्त या अधिवेशनाकरितां आले होते त्यांच्याकडून रशियांतील परिस्थितीचें त्यानें पूर्ण ज्ञान करून घेतलें. त्यावरून रशियांतील परिस्थिति बदलत चालली आहे, शेतकरी व कामकरी जनतेंत पुन्हा चळवळीला सुरुवात झाली आहे, त्यांचीं मनें बिथरून गेलीं आहेत, सरकार व जनता यांचे पुन्हा दोन हात होण्याचा प्रसंग येत चालला आहे, असें लेनिनला दिसून आलें. पण रशियांत पुन्हा होऊं पाहणाऱ्या या चळवळीच्या दृष्टीनें कोपेनहेगेनच्या अधिवेशनाचा कांहीं उपयोग होईल असें लेनिनला वाटलें नाहीं. १९०७ सालीं स्टूटगार्ट येथें झालेल्या अधिवेशनाच्या वेळीं रोझा लक्झेंबर्ग, क्लारा झेट्किन व कार्ल कॉट्स्की यांनीं पार्लमेंटरी व सनदशीर मार्गावर विश्वास असलेल्या कामगारपुढाऱ्यांना जोराचा विरोध केला. पण कोपेनहेगेनच्या अधिवेशनाच्या प्रसंगीं मात्र ही स्थिति राहिली नव्हती. रशियांतील कामगारांची चळवळ सरकारनें नामोहरम करून टाकण्याचा प्रयत्न चालविला होता. मजूरपक्षाच्या मदतीनें इंग्लंडमध्यें सुधारणावादी समाजवादाचा प्रसार करावयाचा व क्रांतिकारी समाजवादाचा प्रचार होऊं द्यावयाचा नाहीं असें मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज यांनीं ठरविलें होतें. रीच्स्टॅगमधील समाजवादी प्रतिनिधींबरोबर जर्मन कैसर गोडीगुलाबीनें वागत होता. यामुळें क्रांतीचें नांव देखील काढायला नको अशी परिस्थिति युरोपखंडांत उत्पन्न झाली होती. कोपेनहेगेन येथें जमलेल्या कामगार प्रतिनिधींपैकीं बहुतेक सर्व लोक क्रांतीची भाषा सोडून सनदशीर चळवळीच्याच गोष्टी बोलूं लागले होते आणि कॉट्स्कीप्रभृति लेनिनचे जुने दोस्तही या बहुमताकडेच झुकत चालले होते.

लेनिनचा तर या पुढाऱ्यांवर कधींच विश्वास नव्हता. कामगारवर्गावर त्याचा पूर्ण विश्वास होता आणि या वर्गानें हातपाय गाळले आहेत असें जर कां लेनिनला समजलें असतें तर मात्र त्याची निराशा झाली असती. कामगारवर्गाच्या पुढाऱ्यांनीं हातपाय गाळले होते, पण कामगारवर्ग मात्र शाबूत होतो. कामगारवर्गातील लढाऊ वृत्ति केवळ रशियांतच आपलें डोकें वर काढीत होती असें नाहीं, तर जर्मनीमध्येंही लढाऊ वृत्तीच्या कामगारवर्गानें खळबळ उडवून दिली होती. सॅक्सनी व रूहर प्रांतांतील कामगारांच्या चळवळी हाणून पाडण्याकरितां जर्मन सरकारला लष्करी कायदा पुकारावा लागला होता व लष्कराच्या मदतीनें कामगारवर्गात उत्पन्न झालेली लढाऊ वृत्ति चिरडून टाकण्याचा प्रयत्न तेथील सरकार करीत होतें. इंग्लंडमध्येंही या वेळीं संपाची लाट उसळली होती. कामगार-वर्गातील ही जागृति फुकट जाऊं देतां कामा नये असें लेनिननें या अधि-वेशनाच्या वेळीं ठरविलें. सेकंड इंटरनॅशनलचें मिळमिळत धोरण त्याला केव्हांही पसंत नव्हतें. जगांतील लढाऊ वृत्तीच्या कामगारांची एक आंतर-राष्ट्रीय संस्था निर्माण करण्यास हा काल अनुकूल आहे असें लेनिनला या अधिवेशनाच्या प्रसंगीं वाटलें व त्यानें कोपेनहेगेनला आलेल्या कामगार प्रतिनिधींपैकीं आपल्या मताचे लोक एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. वर्ग-सहकाराच्या तत्त्वावर नव्हे तर वर्गकलहाच्या तत्त्वावर कामगारवर्गाची संघटना करण्यांत आली पाहिजे, या मताचा एक जहाल पक्ष या प्रतिनिधीं-मध्यें होताच. कामकरीवर्ग हा क्रांतिकारी वर्ग असून सर्व जगांतील कामगारांची एकी घडवून आणून सर्वत्र क्रांतीचा प्रयत्न करण्यांत आला पाहिजे या मताच्या प्रतिनिधींची एक परिषद लेनिननें या प्रसंगीं भरविली. पोलंड, हॉलंड, जर्मनी, नॉर्वे, स्वीडन, बल्गेरिया वगैरे युरोपांतील बऱ्याच राष्ट्रांचे प्रतिनिधी या परिषदेंत एकत्र आले व लेनिनच्या अध्यक्षत्वाखालीं कामगारवर्गाच्या क्रांतिकारी धोरणाविषयीं त्यांनीं या परिषदेंत चर्चा केली. १९१९ सालीं स्थापन झालेल्या कम्युनिस्ट इंटरनॅशनलचें (थर्ड इंटर-नॅशनलचें) कोपेनहेगेनमध्येंच वरीलप्रमाणें बीजारोपण झालें. लढाऊ वृत्तीच्या क्रांतिकारी कामगारांची अशी एकादी आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन केली पाहिजे हा विचार १९०३ सालींच लेनिनच्या डोक्यांत आला होता.

रशियन कामगारपक्षांत बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक असे दोन पक्ष याच वेळीं पडले होते व त्या वेळेपासून असल्या संस्थेची आवश्यकता लेनिनला भासूं लागली होती. १९०३ सालापासून मनांत वागविलेल्या हेतूला मूर्त स्वरूप येणार असें लेनिनला १९१० सालीं वाटलें; पण हा हेतु पूर्णपणें सफल होण्याकरितां त्याला आणखी ९ वर्षें थांबावें लागलें; आपला हेतु पूर्णपणें सफल होत नाहीं म्हणून लेनिननें सेकंड इंटरनॅशनलशीं असलेला आपला संबंध मात्र कधींच तोडला नाहीं. सेकंड इंटरनॅशनलच्या कार्यकारी मंडळांत (इंटरनॅशनल सोशालिस्ट ब्यूरो) रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा अधिकृत प्रतिनिधि या नात्यानें लेनिन काम करीत असल्यामुळें सर्व जगांतील राष्ट्रांतून चाललेल्या कामगार चळवळीची त्याला पूर्ण माहिती झालेली होती. ब्रिटिश मजूरपक्षाला सेकंड इंटरनॅशनलमध्यें सामील करून घ्यावयाचें कीं नाहीं हा प्रश्न स्टूटगार्ट येथें झालेल्या सेकंड इंटरनॅशनलच्या अधिवेशनांत विचाराकरितां पुढें आला होता. वर्गकलहाच्या तत्त्वावर कामगारवर्गाची संघटना करावयाची हें तत्त्व ज्या पक्षाला मान्य असेल त्यांनाच या संस्थेंत सामील करून घ्यावें असें एक कलम सेकंड इंटरनॅशनलच्या घटनेंत आहे, त्यामुळें ब्रिटिश मजूरपक्षाला या संस्थेंत सामील करतां येत नाहीं, असें हिंडमन-प्रभृति ब्रिटिश कामगारपुढाऱ्यांचें म्हणणें होतें. ब्रिटिश मजूरपक्षाला तत्त्व मान्य आहे, पण तपशील मान्य नाहीं असें कॉट्स्की प्रतिपादन करीत होता. लेनिननें या दोघांचीही मतें खोडून काढलीं. ब्रिटिश कामगारवर्गानें भांडवलदारवर्गाशीं सारखा झगडा चालवून आपल्या राहणीचा दर्जा वाढवून घेतला आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील देशांची पिळणूक करण्यास हवा तितका वाव असल्यामुळें ब्रिटिश कामगारवर्गाचा हा दर्जा कायम ठेवण्याची हमीही सरकारनें घेतली आहे व लॉईड जॉर्जसारख्या मुख्य प्रधानानें कामगारवर्गाच्या चळवळीच्या बाबतींत जें धोरण ठेवलें आहे त्यामुळें ब्रिटिश कामगाराचा सामाजिक दर्जाहि वाढला आहे, असें लेनिननें या वादविवादाच्या प्रसंगीं दाखवून दिलें. स्टूटगार्ट येथील अधिवेशनाच्या वेळीं काय किंवा कोपेनहेगेनच्या परिषदेच्या वेळीं काय, लेनिनचा पक्ष अल्पसंख्याक होता तरी या

संस्थेशीं त्यानें आपला संबंध कायम ठेवला होता. आणि कोपेनहेगेनच्या परिषदेच्या वेळीं तर लेनिनला आपल्या मताच्या प्रतिनिधींना एकत्र आणण्याची संधीही मिळाली होती. कोपेनहेगेनच्या अधिवेशनाची ही हकीकत संपविण्यापूर्वी आणखी एका प्रसंगाचा उल्लेख करणें या ठिकाणीं जरूरीचें आहे. कोपेनहेगेनची परिषद् आगष्टमध्यें भरली. लेनिनला परिषदेची ही वेळ एप्रिलमध्येंच समजली होती. तेव्हां या प्रसंगाचा फायदा घेण्याचें लेनिननें ठरविलें व आपल्या आईला पत्र लिहून तिला त्यानें स्टॉकहोम येथें भेटण्याकरितां बोलावलें. "हा प्रवास तुला फारसा कंटाळवाणा वाटणार नाहीं. स्टॉकहोम येथें आपण एक आठवडा मोठ्या मजेंत घालवूं." असें लेनिननें आईला कळविलें. ठरल्याप्रमाणें सप्टेंबरमध्यें मायलेकांची भेट झाली. लेनिनची आई आतां म्हातारी झाली होती. तिच्या मुलांमुलींपैकीं, तिच्या जावईसुनांपैकीं कोणीं तुरुंगांत खितपत पडलीं होतीं तर कोणीं हद्दपार झालीं होतीं. पतिवियोगानंतर तिचा सर्वांत आवडता वडील मुलगा फांसावर चढविला गेला होता. तिला आपल्या आयुष्यांत असे अनेक दुःखाचे प्रसंग सहन करावे लागले होते. इतके सारखे दुःखाचे प्रसंग येऊनही तिचें मन अद्याप खंबीर होतें व तिच्या शरीरांतील ताठरपणाही कमी झाला नव्हता. पण तिची दृष्टि मात्र क्षीण झाली होती. मृत्यूच्या छायेनें तिची दृष्टि झांकोळली होती. लेनिनची आई १९१६ सालीं मरण पावली. आणि दुःखाची गोष्ट ही कीं, या कोपेनहेगेनच्या भेटीनंतर या मायलेकांची पुन्हा भेट झाली नाहीं व ज्या कार्याकरितां व ध्येयाकरितां तिच्या मुलांनीं अनेक प्रकारचे कष्ट सहन केले, आत्मबलिदान केलें, तें कार्य यशस्वी झालेलें पाहाण्यास ती जिवंत राहिली नाहीं.

१९०५ च्या क्रांतीनंतर झारच्या सरकारनें शेतकरी-कामकरीचळवळीला चिरडून टाकण्याचे कितीही प्रयत्न केले तरी ते यशस्वी झाले नाहींत. १९१० साल तर या दृष्टीनें अत्यंत खळबळीचें गेलें. शहरांतील कामकरीवर्गांत झारच्या राजवटीबद्दल असंतोष पसरला होता. कामकरीवर्गानें आर्थिक मागण्यांकरितां संप केला तरी या संपाच्या चळवळीला ताबडतोब राजकीय स्वरूप प्राप्त होत होतें. खेडेगांवांतील शेतकऱ्यांतही

असाच असंतोष माजून राहिला होता. जमीनदारांच्या व सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलुमामुळें शेतकरीवर्ग निराश होत चालला होता व अगदीं क्षुल्लक कारणांवरून खेडेगांवांतून दंगे होऊं लागले होते. या सालीं रशियांतील निरनिराळ्या भागांत शेतकऱ्यांचे लहानमोठे ९२८ दंगे झाले. त्या वेळच्या पोलिसखात्याच्या रिपोर्टांतच हा आंकडा नमूद असून हे दंगे राजकीय स्वरूपाचे होते असेंही त्यांत कबूल करण्यांत आलें आहे. १९११ सालीं रशियांतील पिकें बुडालीं व आपले दिवस आतां भरत आले आहेत अशी आठवण या परिस्थितीनें झारच्या सरकारला करून दिली, असें लेनिननें म्हटलें आहे. १९१० व १९११ सालीं शेतकरीवर्गांत जी प्रचंड चळवळ झाली व त्यांच्यावर जो जुलूम झाला त्यापेक्षांही १९१२ सालीं एक भयप्रद घटना घडून आली. या घटनेनें १९०५ सालच्या 'लाल रविवार'लाही मागें सारलें. या सालीं लेना येथील सोन्याच्या खाणींतील मजुरांनीं संप केला. फेब्रुवारी व मार्च हे दोन महिने हा संप चालू होता. रशियांतील कामकरीवर्ग कसा झपाट्यानें क्रांतिकारी बनत चालला आहे हें या संपांत आणखी एकदां दिसून आलें. सैबेरियाच्या अगदीं उत्तरेकडील प्रदेशांतील लेना नदीवर सोनें गाळण्याचें काम चालू होतें. रशियन लेन्स्कोई कंपनी नांवाची एक स्वतंत्र कंपनी या कामाकरितां स्थापण्यांत आली होती. या कंपनीच्या भागीदारांत मुख्य प्रधान कौंट विटे व खुद्द राणी मेरी फेडोरोव्हना अशीं बडींबडीं मंडळी होतीं. हें ठिकाण रेल्वेपासून पुष्कळ लांब होतें. रेल्वे सोडल्यानंतर या ठिकाणीं पोंचण्याला कितीतरी आठवडे लागत असत. डांसांच्या झुंडीच्या झुंडी या ठिकाणीं काम करणाऱ्या मजुरांवर हल्ला करीत असत. हिंवतापाचें तर तें आगरच बनलें होतें. इतक्या दूरवर काम करण्याकरितां आलेल्या मजुरांची काय स्थिति आहे, त्यांना किती मजूरी मिळते, ते राहतात कसे, खातात काय, याची चौकशी करणार कोण ? या कंपनीचे अधिकारीच कधीं पोलिस बनत तर कधीं जज्जही बनत असत. मुलकी व लष्करी अधिकारी, पोलिस, न्यायाधीश वगैरे सर्वांचे अधिकार त्यांना प्राप्त झाले होते. मजुरीची वाढ व्हावी म्हणून वरील संप झालेला नव्हता तर मजुरांवर जे अनेक प्रकारचे राक्षसी जुलूम करण्यांत येत होते व ज्या रानटी अवस्थेंत त्यांना राहावें लागत होतें

त्याच्या प्रतिकारार्थ हा संप झाला होता. मजुरांना राहण्याकरितां पुरेशी जागा नव्हती व त्यांना औषधपाणी मिळण्याची तर कांहींच सोय करण्यांत आली नव्हती. फार थोड्या मजुरांनीं आपल्या बायका तेथें नेल्या होत्या. या बायकांना खाणींतील नोकरी बजावावी लागत होती व त्याचबरोबर वेश्यांप्रमाणें कंपनीच्या अधिकारीवर्गांतील लोकांच्या विषयवासनातृती-चेंही काम करणें त्यांना भाग पडत होतें. तेथें मिळणारें अन्न तर अत्यंत गलिच्छ होतें आणि मजुरांकडून किती तास काम करून घ्यावयाचें याला तर सीमाच नव्हती. तक्रार करण्याची तर मुळींच सोय नव्हती. जो तक्रार करील त्याला ताबडतोब तुरुंग दाखविण्यांत येत असे. या खडतर परि-स्थितीला कंटाळूनच तेथील मजुरांनीं संप केला. संपवाल्यांची चांदी उडवायला सरकार तयार होतेंच. १९०५ सालीं मास्को येथील मिर-वणुकीच्या वेळीं कामगारांवर गोळी चालवून ज्यानीं सरकारी कामगिरी इमानें-इतबारें बजावली होती त्यापैकींच एक पोलिस अधिकारी या संपाचा बंदोबस्त करण्याकरितां पाठविण्यांत आला होता. कंपनीच्या अधिकाऱ्याबरोबर संपवाल्यांच्या कमिटीचें तडजोडीचें बोलणें या वेळीं सुरू झालें होतें. पण या अधिकाऱ्यानें हें बोलणें पुरें होण्यापूर्वींच संपवाल्यांच्या कमिटींतील सर्व प्रतिनिधींना अटक केली. या लोकांना मुक्त करण्याची मागणी करण्या-करितां दुसरे दिवशीं सकाळीं संपवाल्या स्त्रीपुरुषांची एक मोठी मिरवणूक निघाली. झालें, पोलिसांना एवढेंच निमित्त पुरें झालें. त्यांनीं या मिरवणुकीवर बंदुकांच्या फेरीवर फेरी झाडल्या. या गोळीबाराला २७० लोक बळी पडले व २५० लोक जखमी झाले. सैबेरियांतील एका बाजूच्या बर्फमय प्रदेशांत सरकारनें केलेल्या या भयंकर कत्तलीची बातमी हां हां म्हणतां सर्व देशभर पसरली. ही बातमी ऐकून रशियांतील सर्व कामगार संतापानें बेहोष झाले. १९०५ नंतर कामगारवर्गांत इतकी भयंकर खळबळ कधींच झाली नव्हती. लेना येथील सोन्याच्या खाणींतील या कत्तलीसंबं-धानें ड्यूमा सभेंत प्रश्न विचारण्यांत आले, त्या वेळीं "होय, असें करण्यांत आलें आणि पुढेंही असेंच करण्यांत येईल." असें उद्दामपणाचें उत्तर एका जबाबदार प्रधानानें दिल्यामुळें कामगारवर्गाच्या संतापांत आणखी अधिकच भर पडली. रशियांतील कामगारवर्गाला सरकारनें या प्रकारें

आव्हानच दिलें होतें. कामगारवर्गानें या आव्हानाचा स्वीकार केला व सरकारच्या या कृत्याचा निषेध करण्याकरितां देशांतील सर्व उद्योगधंद्यांच्या भागांत संप होऊं लागले. लेना येथील संपवाल्यांवर केलेल्या गोळीबाराचा निषेध करण्याकरितां पुकारण्यांत आलेल्या या संपांत ३००००० कामगारांनीं भाग घेतला व मे-दिनाच्या समारंभाच्या वेळीं आणखी ५००००० कामगारांनीं संप केला व ते या निषेधाच्या चळवळींत सामील झाले. कामगारांच्या या संपाच्या चळवळीला उघड उघड राजकीय स्वरूप प्राप्त झालें होतें. "जमीनदारांच्या जमीनी जप्त करा, आठ तासांचा दिवस करा व एकतंत्री राज्यसत्ता उलथून पाडा." या बोल्शेव्हिकांनीं दिलेल्या घोषणांचा सर्वत्र पुकारा करण्यांत येऊं लागला. संपवाल्यांच्या प्रचंड सभा भरून सरकारचा निषेध करणारे ठराव त्यांतून मंजूर होत असत. पण त्यांतल्या त्यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या ठरावाच्या अखेरीस "समाजसत्तावाद चिरायु होवो" हें पालुपद जोडण्यांत येत असे. रशियन कामगारवर्गानें क्रांति केली तर केवळ झारची एकतंत्री सत्ताच तेवढी उलथून पाडून हे कामगार स्वस्थ बसणार नाहींत, तर जमीनदारी व भांडवलदारी यांचाही निःपात केल्याशिवाय ते राहणार नाहींत, ही गोष्ट १९१२ सालीं झालेल्या या प्रचंड संपांच्या चळवळीच्या वेळींच उघडकीला आली होती. रशियांतील कामगारवर्गांतील लढाऊ वृत्ति जशी वाढत होती, त्याचप्रमाणें कामगारांची शक्तीही या कालांत वाढीला लागली होती. रशियांतील कामगारसंघटनेची चळवळ अद्याप बाल्यावस्थेंतच होती असें म्हणावयास हरकत नाहीं. १९०५ नंतर सरकारनें सर्वच मजूरसंघ चिरडून टाकले होते. १९१२ सालीं पुन्हा या संघटनेच्या कार्याला सुरुवात झाली. या वेळीं सर्व देशांत मिळून एकंदर ६३ मजूरसंघ होते व त्यांच्या सभासदांची संख्या सुमारें १५००० होती. मजुरांचे संघ स्थापूं द्यावयाचे नाहींत, ते स्थापन झाले तर त्यांची संख्या वाढूं द्यावयाची नाहीं, असा पोलिसचा प्रयत्न चालू असतांही मजूरसंघटनेची ही चळवळ चालू ठेवण्यांत आली होती. पुढील वर्षी म्हणजे १९१३ सालीं संघांच्या सभासदांची ही संख्या ४५००० पर्यंत गेली. पीटर्सबर्गमधील गिरणीकामगारसंघाचे फक्त ८८८

सभासद होते व भांड्याच्या कारखान्यांतील मजूरसंघाच्या सभासदांची संख्या मात्र पूर्वी ३३५३ होती ती १९१३ सालीं १२००० पर्यंत वाढली. पण १९१४ सालीं पोलिसनें हा संघ बंद करून टाकला. मजूरसंघ स्थापण्याची चळवळ सर्व देशांत याप्रमाणें चालू असली तरी त्याची प्रांतिक किंवा राष्ट्रीय संघटना अद्याप निर्माण झालेली नव्हती. तथापि कामगारवर्गाच्या पुढाऱ्यांनीं चालविलेल्या वर्तमानपत्रांचें सामर्थ्य मात्र सारखें वाढत होतें. १९१२ सालीं बोल्शेव्हिक पक्षाचें 'प्रवदा' ( सत्य ) व मेन्शेव्हिकांचें 'लुच्' ( किरण ) अशीं दोन पत्रें चालू होतीं. 'प्रवदा' पत्र कामगारवर्गांत मोठ्या प्रमाणांत खपत होतें. १९१४ च्या आरंभीं ड्यूमाच्या निवडणुकीच्या वेळीं या पत्राचा कामगारवर्गांत जो प्रसार झाला त्यावरून रशियांतील कामगारवर्गापैकीं दोन तृतीयांश कामगार बोल्शेव्हिक मताचे आहेत असें आढळून आलें.

कामगारसंघांची वाढ व कामगारांचा विमा उतरण्यासंबंधानें सरकारनें केलेले कायदे याचा फायदा बोल्शेव्हिकांना चांगलाच मिळाला. आपल्या मतांचा उघड प्रचार करण्याची मिळालेली ही संधि त्यांनीं फुकट दवडली नाहीं. मेन्शेव्हिक पक्षाचे पुढारी व ट्रॉट्स्कीनें स्थापलेलें मध्यवर्ती कामगारमंडळ यांनीं कामगारांची चळवळ केवळ आर्थिक गाऱ्हाणीं दूर करण्याकरितांच चालविली पाहिजे, राजकारणाचा या चळवळीला उपसर्ग पोचूं द्यावयाचा नाहीं, असें ठरविलें होतें. यामुळें अनुकूल परिस्थिति असूनही कामगारवर्गाला त्यांना आपलेंसें करून घेतां आलें नाहीं. या वेळीं अस्तित्वात असलेल्या धातुकामगारसंघाचें व मुद्रणकामगारसंघाचें पुढारीपण बोल्शेव्हिकांनीं पटकावलें आणि सरकारनें सुरू केलेल्या विम्याच्या योजनेंतील मुख्य मुख्य जागांवर बोल्शेव्हिक पक्षाचेच कामगार त्यांनीं निवडून दिले. १९१२ सालीं ड्यूमा सभेची चौथी निवडणूक झाली. कामगारांच्या चळवळी हाणून पाडण्याचा पोलिसांचा प्रयत्न या वेळीं चालू होता तरी या निवडणुकींत सात मेन्शेव्हिक व सहा बोल्शेव्हिक पक्षाचे उमेदवार निवडून आले. ड्यूमा सभेच्या निवडणुकी व प्रत्यक्ष ड्यूमा सभा या दोन्हींचा कामगारपुढारी मंडळींनीं आपल्या क्रांतिकारक मतांचा पुरस्कार व प्रचार करण्याचे कामीं उपयोग केला

आणि या सर्व चळवळींचें मार्गदर्शकत्व लेनिनकडे असल्यामुळें, या मत-प्रचाराच्या चळवळीला चांगलाच रंग चढला होता.

१९१३-१४ सालीं झालेल्या संपाच्या चळवळींनीं १९०५ सालालाही मागें टाकलें होतें. कामगारवर्गाला आतां फादर गेपॉनसारख्या पुढाऱ्यांची जरूरी राहिली नव्हती. संपवाले कामगार आपल्यांतील पुढारी निवडून त्यांच्या नेतृत्वाखालीं या चळवळी चालवूं लागले होते. विशेष हा कीं, हे सर्व कामगार सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे होते व त्यांच्यांतील बहुसंख्य लोकांचा क्रांतिकारक मंडळीकडेच ओढा होता. कामगारवर्गाचीं पत्रें बंद करण्याचा व कामगारसंघ नेस्तनाबूद करण्याचा सरकारनें प्रयत्न केला कीं या संपाच्या चळवळीला विशेषच जोर चढत असे व तिला राजकीय स्वरूप प्राप्त होत असे. कोणत्याही कारखान्यांत संप झाला कीं तो प्रथम कांहीं तरी आर्थिक कारणाकरितांच असावयाचा, पण पोलिसच्या जुलमामुळें या संपाला ताबडतोब राजकीय स्वरूप प्राप्त व्हावयाचें. एखाद्या कारखान्यांत संप झाला कीं आजुबाजूच्या दहा बारा कारखान्यांतील मजूरही संपवाल्यांना सहानुभूति दाखविण्याकरितां बाहेर पडत. संप चालू असतांना कामगारांना सर्रास अटक करण्यांत आली व त्यांच्यावर गोळ्या झाडण्यांत आल्या कीं ही संपाची आग अधिकच भडकत असे. १९१४ सालीं रशियांत सर्वत्र एकप्रकारें संपाची सांथच पसरली होती असें म्हणावयास हरकत नाहीं. या वर्षाच्या जानेवारी महिन्यांत झालेल्या संपांत २५०००० कामगारांनीं भाग घेतला होता. पीटर्सबर्ग येथील रबराच्या व रासायनिक द्रव्यांच्या कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांना विषाची बाधा होते असें सिद्ध झालें असतांही त्या बाबतींत कोणतीही तरतूद न झाल्यामुळें या कारखान्यांतील कामगारांनीं संप केला व या संपाच्या बावटळींत तेथील सर्वच कारखाने सांपडले. जूनमध्यें बाकू येथील तेलाच्या गिरण्यांतून काम करणाऱ्या कामगारांनीं संप केला. बोल्शेव्हिक पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं हा संप चालू होता. त्याला ताबडतोब सार्वत्रिक संपाचें स्वरूप प्राप्त झालें. कारखानदारांनीं समेटाची भाषा करण्याचें नाकारलें. शहरांत लष्करी कायदा पुकारण्यांत आला. कामगारांना त्यांच्या चाळींतून बाहेर हांकून

लावण्यांत आलें. संपांत पुढाकार घेतल्याबद्दल शेकडों कामगारांना अटक करण्यांत आली व शेकडोंना हद्दपार करण्यांत आलें. शहरांतील दिवाबत्ती व पाणी यांचा पुरवठा बंद करण्यांत आला व अशा रीतीनें संपवाल्यांना नामोहरम करण्याचे सर्व उपाय योजण्यांत आले. बाकू येथील संपवाल्यांना मदत करण्याकरितां पीटर्सबर्ग येथील कारखान्यांतून फंड गोळा करण्यांत येऊं लागले व बाकूच्या संपवाल्यांना सहानुभूति दाखविण्याकरितां पीटर्सबर्ग येथेंही संप होऊं लागले. पुटिलोव्हच्या कारखान्यांतील कामगारांनीं अशाच प्रकारचा संप केला असतां संपवाल्यांवर पोलिसांनीं गोळीबार केला. पोलिस व संपवाले यांच्यांत ठिकठिकाणीं दंगे झाले व कामगारवस्तींतील रस्त्यांवर तटबंदी करून कामगारांनीं पोलिसांच्या या हल्ल्याला तोंड दिलें व १९०५ ची आठवण सरकारला करून दिली.

रशियांतील कामगारवर्ग जागा होऊन आपल्यावर होत असलेल्या अन्यायांना तोंड देण्याकरितां तो तयार झाला, त्यानें पुन्हा संपाचें शस्त्र उगारलें व पोलिसांनीं कितीही दडपशाही केली तरी त्याला तो दाद देईनासा झाला, हें ऐकल्यावर रशियांत पुन्हा नवयुगास सुरुवात झाली असें लेनिनला वाटूं लागलें. त्याची प्रकृति सुधारली. तो ताजातवाना झाला. मार्क्स व एंजल्स यांनीं म्हटल्याप्रमाणें जगांतील भांडवलशाहीचे दिवस आतां भरले आहेत, केवळ रशियांतच नव्हे तर सर्व जगांतच वाढत्या भांडवलशाही पद्धतीमुळें उद्भवणारीं अरिष्टें तिच्या नाशाला कारणीभूत होतील अशीं चिन्हें लेनिनला दिसूं लागली. भांडवलशाहीच्या नाशाचे दिवस जवळ आले असून या कालाचा फायदा रशियांतील कामगारजनतेनें अवश्य घेतला पाहिजे ही गोष्ट त्यानें आपल्या रशियन अनुयायांना पटवून दिली. लेनिनचे रशियांतील अनुयायी कांहीं थोडे हजार असतील व त्याच्या मताचे लोक सर्व जगांत मिळून दहा हजारांवर नसतील; पण लेनिन ज्या आत्मविश्वासानें क्रांतीच्या गोष्टी बोलत होता तितका विश्वास त्या वेळीं प्रत्यक्ष दहा कामगारांत तरी होता कीं नाहीं हें सांगतां यावयाचें नाहीं.

रशियांतील कामगारपुढाऱ्यांत या वेळीं मतभेद असले तरी या पुढा-

त्यांतील बहुमत लेनिनच्या बाजूचें होतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कामगारवर्गाची चळवळ क्रांतिकारी धोरणावरच चालविली पाहिजे ही लेनिनची कार्यपद्धति या लोकांना पूर्णपणें मान्य होती. रशियांतील तीव्र वर्गकलहामुळेंच तेथील कामगारवर्गाला हें धोरण स्वीकारणें भाग पडलें होतें. शेतकऱ्यांची व कामकऱ्यांची कोणतीही चळवळ चालूंच द्यावयाची नाहीं असल्या कट्टर विरोधी धोरणामुळेंच तेथील जमीनदार व भांडवलदारवर्गानें कामगारवर्गाला क्रांतिकारी बनविलें होतें. रशियन कामगारांची ही नाडी लेनिननें पूर्णपणें ओळखली होती. मेन्शेव्हिक पुढाऱ्यांना मात्र या धोरणाचें महत्त्व समजलें नाहीं व रशियन श्रमजीवी जनता क्रांतीच्या लढ्यांत शेवटपर्यंत टिकून राहील असा विश्वासही त्यांना वाटला नाहीं. म्हणून १९०५ पासूनच कामगारचळवळीला एक निराळेंच वळण देण्याचें त्यांनीं ठरविलें. कामगारांचा झगडा केवळ आर्थिक स्वरूपाचाच असला पाहिजे असें ते प्रतिपादन करीत होते व कामगारवर्गाच्या हिताच्या दृष्टीनें सरकारनें जे कायदे केले आहेत त्यांचा पूर्ण फायदा घेतला पाहिजे असेंही ते म्हणूं लागले होते. कामगारचळवळीला अशा रीतीनें पूर्ण कायदेशीर स्वरूप द्यावयाचें असें म्हटलें म्हणजे गुप्तपणानें क्रांतिकारी मतांचा प्रचार चालू ठेवावयाचा व त्या दृष्टीनें कामगारवर्गाची संघटना करावयाची हा प्रश्नच रहात नाहीं, तेव्हां ही चळवळ अजीबात बंद करावी अशा प्रकारचा प्रयत्न सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील कांहीं लोक करूं लागले होते.

१९०७ सालीं लंडन येथें भरलेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कॉंग्रेसपासून या पक्षांतील दोन्ही तट नांवाला कां होईना एक होते. पण मेन्शेव्हिक पुढाऱ्यांचें वरील धोरण पाहिल्यावर बोल्शेव्हिकांना आपला सवता सुभा उभारल्याशिवाय गत्यंतरच नाहीं, असें लेनिनला वाटलें. क्रांतिकारी चळवळ बंद करूं पाहणाऱ्या लोकांविरुद्ध लेनिनला स्वतःच झगडावें लागलें. आश्चर्याची व अनपेक्षित गोष्ट ही कीं, प्लेखानोव्हनें त्याला या वेळीं मदत केली. कामगारचळवळीला शुद्ध कायदेशीर व आर्थिक स्वरूप देऊं पाहणाऱ्या या पुढाऱ्यांचें धोरण कम्युनिझमच्या विरुद्ध आहे, क्रांतिकारी कार्यपद्धतीला त्यांत मुळींच वाव नाहीं, लोकसत्ताक राज्यपद्धती-

करितां कामगारांनीं झगडत राहिलें पाहिजे ही गोष्ट मेन्शेव्हिकांना आतां आवडेनाशी झाली आहे, शेतकरीसमाजाच्या क्रांतिकारी चळवळीला तर त्यांचा विरोधच आहे, असें प्लेखानोव्हला त्या वेळीं वाटूं लागलें. अर्थात् या सर्व गोष्टी प्लेखानोव्हला आवडल्या नाहींत. कामगारसंघटनेचा अस्पष्ट व अनिश्चित कार्यक्रम चालू ठेवावा व ड्यूमामधील लिबरल पक्षाच्या प्रतिनिधींना मदत करीत राहावें, हें धोरण तर प्लेखानोव्हला मुळींसुद्धां पसंत पडलें नाहीं. मार्टोव्ह व ट्रॉट्स्की हे या मेन्शेव्हिकांच्या धोरणाचाच पुरस्कार करीत होते. तथापि सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील दोन्ही तटांशीं आपला संबंध नाहीं, आपण स्वतंत्रपणें विचार करणारे आहों असें दाखविण्याचा ते प्रयत्न करीत होते. पण त्याच वेळीं बोल्शेव्हिकांविरुद्ध—विशेषतः लेनिनविरुद्ध ते आपल्या लेखणीचा उपयोग करीत होते. अशा परिस्थितींत वर सांगितल्याप्रमाणें १९१२ च्या जानेवारींत प्रेग येथें लेनिननें आपल्या पक्षाच्या मंडळींची एक परिषद् भरविली व कामगारचळवळीबाबतचें आपलें क्रांतिकारी धोरण स्पष्टपणें आपल्या पक्षांतील मंडळींपुढें मांडून मेन्शेव्हिकांशीं असलेला आपला संबंध त्यानें कायमचा तोडून टाकला. लेनिननें ज्या दिवसांत व ज्या परिस्थितींत ही परिषद् भरविली तो काल व ती परिस्थिति किती बिकट होती हें झेक सोशालिस्ट पुढारी नीमेट्स याला लेनिननें यासंबंधीं पाठविलेल्या पुढील आशयाच्या पत्रावरून दिसून येईल.

"आमच्या पक्षांतील कांहीं कामगारसंघांना रशियाबाहेर एक परिषद् भरवावयाची आहे. या परिषदेला फार तर वीस किंवा पंचवीस प्रतिनिधी हजर राहूं शकतील. प्रेग येथें ही परिषद् एक आठवडाभर भरविणें शक्य आहे कां? कारण हें सर्व काम फारच गुप्तपणानें झालें पाहिजे. दुसऱ्या कोणाही इसमाला किंवा कामगारसंघाला या गोष्टीचा मागमूसही लागतां कामा नये. ही परिषद् सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची आहे. युरोपियन कायद्याप्रमाणें ती कायदेशीर आहे; पण या परिषदेला बहुतेक सर्व प्रतिनिधींना पासपोर्ट मिळावयाचे नाहींत व आपल्या स्वतःच्या नांवाचा तर त्यांना उपयोग करतां यावयाचाच नाहीं."

शेवटीं या झेक सोशालिस्टांच्याच मदतीनें ही परिषद् भरविण्यांत

आली व ती यशस्वीही झाली. या परिषदेचे प्रतिनिधी गुप्तपणें रशियाची सरहद्द ओलांडून आले. यांतले कांहीं लोक पायदळ आले. सरहद्दीवरील गुप्त वाटा दाखविणाऱ्या व गुप्तपणें मालाची ने-आण करणाऱ्या लोकांच्या मदतीनें हे लोक रशियाच्या बाहेर पडले. पुष्कळांनीं वेषांतर केलें व कांहींनीं खोटींच नांवें सांगून पासपोर्ट मिळविले. या परिषदेला दोन सरकारी हेरही हजर राहिले होते. यांपैकीं पीटर्सबर्ग येथील धातुकामगारसंघाचा प्रतिनिधि म्हणून आलेल्या रोमां मॅलिनोव्हस्की या हेरानें लेनिनचा पूर्ण विश्वास संपादन केला होता. ड्यूमाच्या चौथ्या निवडणुकींत बोल्शेव्हिक पक्षाचा प्रतिनिधि म्हणून त्याला निवडून देण्यांत आलें व बोल्शेव्हिक म्हणून त्याची ख्याति झाली. या परिषदेकरितां आलेले सर्व प्रतिनिधी प्रत्यक्ष क्रांतीची तयारी करणारेच लोक होते. रशियांतील सर्व गुप्त चळवळींत ते भाग घेत होते, त्यामुळें लेनिनचें क्रांतिकारी धोरण त्यांना सर्वथैव पसंत पडलें. त्यांनीं एकमतानें लेनिनच्या धोरणाचा स्वीकार केला व ही चळवळ बंद करूं पाहणाऱ्या सभासदांना सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतून हाकून लावण्याचें ठरविलें व आपल्या धोरणाप्रमाणें काम चालविण्याकरितां एक मध्यवर्ती कमिटीही त्यांनीं नेमली. १९०३ सालीं बोल्शेव्हिक पक्ष प्रस्थापित झाला खरा, परंतु १९१२ सालीं झालेल्या प्रेग येथील परिषदेपासून मात्र या पक्षाला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालें. प्रेग येथें एक स्वतंत्र परिषद् भरवून बोल्शेव्हिकांनीं आपला एक सवता सुभाच स्थापन केला ही गोष्ट मेन्शेव्हिक पुढाऱ्यांना सहन झाली नाहीं. प्रेगच्या परिषदेंत पास झालेल्या ठरावांचा त्यांनीं निषेध केला. लेनिन व त्याचे अनुयायी हे सांप्रदायिक आहेत, सोंवळे आहेत, मार्क्सनें लिहून ठेवलेल्या अक्षरांनाच ते चिकटून बसणारे आहेत, त्यांतील व्यापक अर्थाचा ते विचार करीत नाहींत, तत्त्व व व्यवहार यांतील भेद ते जाणत नाहींत, तडजोडीची वृत्ति तर यांच्या ठिकाणीं नाहींच नाहीं, अशी टीका त्यांच्यावर ट्रॉट्स्कीप्रभृति मेन्शेव्हिक पक्षाचे पुढारी करूं लागले. विशेष हें कीं, नुसती टीका करून किंवा निषेध प्रदर्शित करून ते थांबले नाहींत तर बोल्शेव्हिकांच्या विरुद्ध जे जे पक्ष होते त्या सर्वांचा एक गट बनवून बोल्शेव्हिक पक्षाला नामोहरम करण्याचें त्यांनीं ठरविलें. असा गट स्थापन करण्याचे

कामीं ट्रॉट्स्कीनेंच पुढाकार घेतला होता. या गटाला 'आगष्ट गट' असें म्हणत असत. कामगारवर्गांतील क्रांतिकारी पक्षाला हाणून पाडण्याकरितां ज्यांच्याशीं आपलें तत्त्वतः जमत नाहीं अशा लोकांशीं मेन्शेव्हिकांनीं दोस्ती केली व एक विरोधी गट बनविला ही गोष्ट लेनिनला अर्थात्च आवडली नाहीं. प्लेखानोव्हचा लेनिनला पाठिंबा होता ही गोष्ट लेनिनच्या फायद्याची होती खरी, पण प्लेखानोव्हचा अस्थिर स्वभाव त्याला आवडत नव्हता. एखादा आणीबाणीचा प्रसंग आला म्हणजे प्लेखानोव्ह एकाच पक्षाला कधीं नक्की चिकटून राहावयाचा नाहीं. प्लेखानोव्हच्या या धरसोडीच्या वर्तनाचा लेनिनला फार राग येत असे. "धरसोडीचें वर्तन ठेवणें हा एक रोगच प्लेखानोव्हला जडला आहे" असें तो म्हणत असे. सुदैवानें रशियांत आतां नवे नवे पुढारी उदयास येऊं लागले होते. १९१२ सालीं एक नवीन मध्यवर्ती कमिटी निवडण्यांत आली. या कमिटींत स्वेर्डलोव्ह, ओर्ड्झोनिकिड्झे, स्टॅलिन वगैरे मंडळींना घेण्यांत आलें होतें. यांपैकीं स्वेर्डलोव्ह हा सोव्हिएट प्रजासत्ताक राज्याचा पहिला अध्यक्ष झाला व स्टॅलिननें तर लेनिनच्या मागें रशियाचें समाजसत्ताक राज्य खूप शर्तीनें संभाळलें व त्याची भरभराट केली. स्टॅलिनचें आतांपर्यंतचें सर्व आयुष्य तुरुंग व हद्दपारी यांतच गेलें होतें. रशियन साम्राज्यांतील मोठमोठ्या शहरांत गुप्त रीतीनें राहून पक्षाच्या संघटनेचें कार्य तो करीत होता. बोल्शेव्हिकांनीं आपला सवता सुभा स्थापन केल्यानंतर "तुम्ही सगळे भांडकुदळ आहां" असा एक टोमणा गॉर्की यानें या मतभेदाच्या बाबतींत लेनिनला मारला. भांडवलदारवर्गाचे लोक आमच्यांतील मतभेदाच्या राईचा पर्वत करतात, सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत भांडणें होतात, नाहीं असें नाहीं, पण हीं भांडणें उगाच वरवरच्या कारणांवरून निर्माण झालेलीं नसतात. लिबरल पक्षाचे लोक व सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाचे लोक आपापसांत भांडले तरी त्यांचें हें भांडण मुत्सद्देगिरीचें असतें, राष्ट्रापुढील जळजळणाऱ्या प्रश्नांचा ते विचार करीत नाहींत, परस्परांत मतभेद माजवून आपापले डाव साधण्याचा विचार ते करीत असतात, आपल्या मतभेदांना सफेती चढवून व आपल्या मतांना गुळगुळीत स्वरूप देऊन आपल्यांतील भांडणें ते तात्पुरतीं मिटवूं पाहतात. पण सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचें तसें

नाहीं. त्यांचे मतभेद तात्त्विक व तीव्र स्वरूपाचे असतात व या पक्षांतील लोकांचीं भांडणें आपलें ध्येय स्पष्ट व शुद्ध राखण्याकरितांच चालू असल्यामुळें ते मतभेद मिटणें जवळ जवळ अशक्यच असतें, असें लेनिननें त्या वेळीं गॉर्कीच्या वरील टोमण्याला उत्तर दिलें.

१९११–१२ सालापासून रशियांतील कामगारचळवळीला पुन्हा तीव्र व क्रांतिकारी स्वरूप येत चाललेलें पाहून लेनिननें पॅरिस सोडून रशियाच्या जवळपास कोठें तरी राहण्याचें ठरविलें. पॅरिसमधील खडतर जीवनाचा त्याला कंटाळाही आला होता. १९१२ च्या जुलै महिन्यांत गॅलिशियांतील क्रॅको गांवीं तो राहण्याकरितां आला. पोलंडमधील हा भाग ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होता. हा भाग रशियाला लागून होता व येथील हवापाणीही रशियांतील माणसाला मानवेल असेंच होतें. या भागांत अद्याप सरंजामी पद्धति जारी होती. या पद्धतींत मुरलेल्या स्थानिक जमीनदारांचा अरेरावीपणा संतापजनक होता. पण येथील पोल लोक झारचे कट्टे द्वेष्टे होते. लेनिनप्रभृति रशियांतील हद्दपाऱ्यांना ही गोष्ट पथ्यावरच पडली व या लोकांची त्यांना चांगली मदतही झाली. शिवाय ऑस्ट्रियांतील सरकारनेंही या मंडळींना कोणत्याही प्रकारची तसदी दिली नाहीं किंवा यांच्या चळवळींत उगाच लुडबुडही केली नाहीं. यामुळें रशियांतील कामगारसंस्थांशीं प्रत्यक्ष संबंध ठेवून आपलें क्रांतीच्या संघटनेचें काम लेनिनप्रभृतींना चांगल्या रीतीनें करतां आलें. बुखारिन, सॅफारोव्ह व झिनोव्हिफ् हे तरुण व उत्साही कामगारपुढारी लेनिनला या ठिकाणीं येऊन मिळाले. स्टॅलिननें तर 'प्रवदा' पत्राचें देखरेख करण्याचें काम आपल्या अंगावर घेतलें व तें तो अत्यंत गुप्तपणें करीत होता. याप्रमाणें आस्ते आस्ते कां होईना क्रांतीच्या वेळीं व त्यानंतरही उपयोगी पडणारे कामगारचळवळींतील तरुण कर्णधार लेनिनला तयार करण्याची संधि मिळाली. क्रॅकोमधील जीवन आपल्याला किती सुखावह वाटलें याचें वर्णन लेनिननें गॉर्कीला पाठविलेल्या पुढील पत्रांत फारच मजेदार रीतीनें केलें आहे:—

"ऑस्ट्रियांत मी कां येऊन राहिलों आहें असें तूं मला विचारतोस. आपापल्यांतच बोलायचें म्हणजे मध्यवर्ती कमिटीनें आपली कचेरी याच ठिकाणीं ठेविली आहे ही कितीतरी महत्त्वाची गोष्ट आहे. शिवाय हें

ठिकाण रशियाच्या सरहद्दीजवळ आहे याचा आम्हांला फार उपयोग होतो. येथून पीटर्सबर्गही जवळ आहे. सगळीं वर्तमानपत्रें आम्हांला या ठिकाणीं तिसऱ्या दिवशीं मिळतात. पीटर्सबर्गमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांकरितां लेख लिहून पाठविणें आम्हांला येथून फार सोपें जातें व सर्वांच्या सहकार्यानें काम करण्याची व्यवस्थाही या ठिकाणाहून चांगल्या रीतीनें करतां येते. या ठिकाणीं उगाच भांडाभांडी व वितंडवाद नाहीं ही गोष्ट जमेच्या बाजूस धरली तर या ठिकाणीं चांगली लायब्ररी नाहीं ही गोष्ट खर्चाच्या बाजूस धरली पाहिजे."

रशियाच्या सरहद्दीवरच लेनिनप्रभृति पुढाऱ्यांनीं आतां ठाणें दिलें असल्यामुळें कामगारचळवळींतील कार्यकर्त्यांच्या वारंवार सभा भरवून त्यांना वेळोवेळीं सल्ला देणें सोपें जाऊं लागलें. देशांत चालू असलेल्या संपांची खडान्‌खडा बातमी लेनिनला या ठिकाणीं देण्याची सोय झाल्यामुळें संपवाल्यांच्या पुढाऱ्यांनाही वेळोवेळीं सल्ला देतां येऊं लागला. या संपाबाबतच्या चळवळींतच संपवाल्यांना सल्ला देण्याकरितां सॅफारोव्ह पीटर्सबर्गला जाण्याकरितां निघाला असतां "तेथें गेल्यावर तूं काय करशील?" असें लेनिननें त्याला सहज विचारलें.

"बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांच्या विचारसरणांत मूलतःच फरक आहे; क्रांतिकारी चळवळीला हात घालूं नये, कामगारांची चळवळ आर्थिक स्वरूपाचीच असावी, असें मेन्शेव्हिक म्हणतात या सर्व गोष्टी मी पीटर्सबर्गच्या कामगारांना समजावून देईन." असें सॅफारोव्ह म्हणाला.

"असें करशील तर मग तूं फारच शहाणा म्हणायचा!" लेनिन चटकन्‌ म्हणाला व संपाच्या चळवळीचें खरें स्वरूप काय हें त्यानें त्याला समजावून दिलें. तसेंच हजारों कामगार संपांत आतां सामील होऊं लागले आहेत, कामगारांना आतां कोठें राजकीय दृष्टि प्राप्त होऊं लागली आहे, बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांच्यांतील मतभेदाची त्यांना कल्पनाही यावयाची नाहीं, कामगारांना साहजिकच ऐक्याची आवश्यकता भासत असते आणि कामगारवर्गांत काम करूं पाहणाऱ्या लोकांनींही आपलें हेंच धोरण ठेवणें जरूरीचें आहे. तूं हे मतभेद समजावून दिल्यास ते आपल्या पक्षासच चिकटून राहातील, कायदेशीर चळवळ करूं

पाहणाऱ्या लोकांशीं त्यांचें कधींही जमावयाचें नाहीं, तेव्हां वरच्या पुढारी मंडळींतील मतभेदांची त्यांना कल्पना देण्याच्या खटपटींत पडण्यांत अर्थ नाहीं, असा त्यानें सॅफारोव्हला सल्ला दिला.

ड्यूमा सभेंतील बोल्शेव्हिक प्रतिनिधि व रेल्वे कामगार बाडायेव्ह हा एकदां लेनिनकडे आला व अंदाजपत्रकावर उपसूचना कशी आणावी हें तो त्याला विचारूं लागला.

"तूं असल्या भानगडींत पडूं नकोस. तूं कामगार आहेस. ड्यूमा सभा आळशी वर्गांकरितां, रेड्यांकरितां आहे. तूं सर्व रशियाभर फिरून कामगारांचें जिणें किती निकृष्ट झालें आहे, भांडवशाहीच्या गुलामगिरींत सांपडल्यामुळें कामगारांना किती भयंकर हाल सोसावे लागत आहेत, हें तूं रशियांतील कामगारांना पटवून दे. क्रांतीची तयारी करा असें त्यांना तूं सांग. ड्यूमा सभेंतील बदमाषांना व जनतेची पिळणूक करणारांना सांग कीं, देशांतील जमीनदारांना आम्ही कंदिलाच्या खांबावर लटकावून फांशीं देणार आहों. ड्यूमा सभेपुढें मांडावयाची हीच काय ती खरी व योग्य उपसूचना आहे." असें तो बाडायेव्हला म्हणाला. अर्धवट थट्टेच्या स्वरांत जरी तो हें बोलला तरी त्यांतील हेतु गंभीर होता. झारचें पार्लमेंट (ड्यूमा) म्हणजे रशियांतील जनतेच्या चळवळीला विरोध करणाऱ्या जमीनदारांच्या व बँकवाल्यांच्या हातांतील बाहुलें होतें. अशा परिस्थितींत या लोकांच्या धोरणाला तुच्छ मानून आपल्याला जें काय वाटतें तें स्पष्ट बोललें पाहिजे, कारण आपल्याला वाटेल तें बोलण्याचें स्वातंत्र्य असलेली ड्यूमा ही एकच काय ती जागा रशियांत आहे, आणि या प्रतिनिधींचीं येथील भाषणें कायदेशीर रीतीनें छापून तिचा फैलाव करणेंही शक्य आहे, हें जाणूनच बोल्शेव्हिक प्रतिनिधी अंदाजपत्रकाचा मोठ्या कसोशीनें विचार करीत असत व अंदाजपत्रक म्हणजे वरच्या वर्गांनीं खालच्या वर्गांवर चालविलेल्या जुलुमांचा कसा नमुना आहे हें दाखवून देत असत. ड्यूमा सभेंतील बोल्शेव्हिक पक्षाच्या पुढाऱ्याचें भाषण स्वतः लेनिनच तयार करून देत असे.

पुढील वर्षाच्या 'लाल रविवार'च्या (ता. ९ जानेवारी) वार्षिक दिनानिमित्त करण्यांत यावयाच्या समारंभाचें पत्रक लेनिननें या

वर्षाअखेर लिहून काढलें व तें त्यानें स्टॅलिनच्या स्वाधीन केलें. "लोकसत्तात्मक स्वराज्य," "आठ तासांचा दिवस", "जमीनदारांच्या जमिनी जप्त करा" अशा घोषणांचा समावेश या पत्रकांत करण्यांत आला होता. हें पत्रक सर्वत्र वांटण्यांत आलें व ९ जानेवारीच्या या वार्षिक समारंभाच्या दिवशीं २५०००० कामगारांनीं संप केला. या समारंभापुरता एकच दिवस संप करण्याचें पूर्वी ठरलें होतें; परंतु कांहीं कांहीं ठिकाणीं आपल्या आर्थिक मागण्या पूर्ण करून घेण्याकरितां हा संप कित्येक दिवस तसाच पुढें चालू ठेवण्यांत आला. जानेवारी ९ च्या समारंभाच्या निमित्तानें ही संपाची चळवळ सुरू झाली ती तशीच वर्षभर चालू होती. लेनिन क्रॅको येथें राहिला असल्यामुळें या चळवळीला बरेंच उत्तेजन मिळालें. रशियांतील कामगारवर्गापैकीं बहुसंख्याक कामगार बोल्शेव्हिक पक्षाला येऊन मिळाले, इतकेंच नव्हे तर लष्करांत व आरमारांतही बोल्शेव्हिकांच्या क्रांतिकारक तत्त्वांचा प्रवेश झाला.

लेनिनला या वर्षांत खूपच काम करावें लागलें. रशियांत होणाऱ्या अनेक परिषदांतून बोल्शेव्हिकांच्या क्रांतिकारक तत्त्वाचा पुरस्कार करणें, क्रांतिकारकांविरुद्ध चळवळ करणाऱ्या लोकांनीं चालविलेल्या वादविवादास तोंड देणें, ड्यूमा सभेंतील बोल्शेव्हिक प्रतिनिधींना भाषणें लिहून देणें व त्यांना कामाची दिशा दाखवून देणें व पुढील सालच्या (१९१४) जानेवारी ९ रोजीं करण्यांत यावयाच्या राजकीय संपाची तयारी करणें, इतकीं सगळीं कामें लेनिननें या वर्षांत केलीं. शिवाय 'प्रवदा' पत्राकरितां तो बहुतेक दररोज लेख लिहून देत असे. या वर्षी क्रॅको येथेंच राहण्याचा लेनिननें बेत केला होता तरी त्याचा हा बेत पूर्णपणें तडीस गेला नाहीं. क्रुप्सकाया आजारी पडल्यामुळें व तिचें ऑपरेशन करावें लागल्यामुळें त्याला स्वित्झर्लंडमध्यें जावें लागलें. तेथून परत गॅलिशियांत आल्यावर पुन्हा क्रॅको येथेंच न राहतां कार्पेथियन पर्वतांतील पोरोनिनो या गांवीं राहण्याचें त्यांनीं ठरविलें. हें गांव पर्वताच्या अगदीं पायथ्याशीं होतें. "या भागांतील हवा मधून मधून सर्द व वादळी होत असे, तरी एकंदरींत येथली हवा चांगली होती. आम्ही आमच्या बंगलीला लागूनच असलेल्या पठारावर फिरावयास जात असूं. बर्फानें आच्छादलेलीं टाट्रा

पर्वतांचीं रमणीय शिखरें आम्ही पहात असूं." असें क्रुप्सकायानें या ठिकाणच्या हवेसंबंधानें लिहितांना म्हटलें आहे. क्रॅको येथें असतांना इनेसा आर्मंड नांवाची एक रशियन स्त्री लेनिनच्या कुटुंबांत येऊन राहिली होती. तिची आई रशियन व बाप फ्रेंच होता. या स्त्रीनें पेट्रोग्राड व मास्को येथील कामगारांत वर्गजागृतीचें काम केलें होतें. ओडेसा येथें येऊन राहिलेल्या फ्रेंच लष्करांतही तिनें गुप्तपणें बरेंच जागृतीचें काम केलें होतें. यामुळें लेनिनला इच्याबद्दल प्रेम वाटत असे. क्रांतीनंतर लवकरच ही स्त्री मरण पावली. क्रांति झाली तरी मजुरांच्याबरोबर त्यांच्या चाळींत राहावयाचें व त्यांच्यांत काम करावयाचें तिनें सोडलें नव्हतें. मजुरांच्या गलिच्छ जागेंत राहिल्यामुळेंच ती एकदां तापानें पछाडली व त्यांतच ती मरण पावली.

बोल्शेव्हिक पक्षांतील कार्यकर्त्या माणसांवर लेनिनचें साहजिच प्रेम बसत असे. तो त्यांना आपल्याजवळ ठेवून घेत असे व वेळोवेळीं त्यांना सल्ला देत असे. या कार्यकर्त्या माणसांत नेहमींच विश्वास ठेवण्यालायक माणसें असत असें मात्र सांगतां येत नाहीं. प्रेग येथील परिषदेच्या वेळीं रशियांतील जे कार्यकर्ते गुप्तपणें आले होते त्यांत दोन पोलिसचे हेरही आले होते व या हेरांपैकीं रोमां मॅलिनोव्हस्की यानें लेनिनचा विश्वास संपादन केला होता असें मागें सांगितलेंच आहे. मॅलिनोव्हस्कीचा उत्साह व त्याची हुशारी पाहून हा मनुष्य क्रांतीच्या चळवळींत महत्त्वाची कामगिरी करील असें लेनिनला वाटत होतें; उलट क्रुप्सकायाला या माणसाबद्दल अत्यंत तिरस्कार वाटत होता. त्याचा दांभिकपणा तर तिला मुळींच आवडत नसे. त्याच्या दांभिक स्वभावामुळें व फाजील नम्रतेमुळें बोल्शेव्हिक पक्षांतील इतर पुष्कळ मंडळींना तो आवडेनासा झाला होता. परंतु अत्यंत हुशार व कार्यकर्त्या मंडळींपैकीं तो एक असल्यामुळें त्याच्याविरुद्ध बोलण्याची कोणाची छाति नव्हती. त्याचें वर्तन संशयास्पद वाटलें तरी तें सिद्ध करण्यास योग्य पुरावा नसल्यामुळें कोणालाच त्याच्याबद्दल उघडपणें संशय प्रदर्शित करणें शक्य नव्हतें. बुखारिन व रोझमिरोविच् या दोघांची मात्र मॅलिनोव्हस्की हा सरकारी हेर असल्याबद्दल खात्री झाली होती. रोझमिरोविच्‌ला

एक वर्षापूर्वी पकडण्यांत आलें होतें. आपल्याला कां पकडण्यांत आलें याचें कारण फक्त एका माणसालाच माहीत आहे असें रोझमिरोविच्‌ला पक्कें माहीत होतें. पण हा इसम उघडपणें कोर्टापुढें येऊन पुरावा देण्यास तयार नव्हता. यामुळें रोझमिरोविच्‌ला सोडून देण्याबद्दल त्यानें पोलिसाला विनंति केली व तिला मुक्त करण्यांत आलें. हा इसम दुसरा कोणी नसून तो मॅलिनोव्हस्कीच होता. अर्थात् या सर्व प्रकरणामुळें तो सरकारी हेरच आहे अशी या दोघांची खात्री झाली होती. दुसऱ्याही अनेक कारणांमुळें त्याच्या-संबंधाचा संशय जेव्हां बळावत चालला त्यावेळीं मध्यवर्ती कमिटीनें त्याच्या चौकशीकरितां एक कमिशन नेमलें व खुद्द लेनिनलाच या कमिशनचा अध्यक्ष नेमण्यांत आलें. मॅलिनोव्हस्कीविरुद्ध आलेला पुरावा भक्कम असला तरी तो अपुरा आहे, असा या कमिशननें अर्धवट निकाल दिला. पण या वेळीं या हेरानें यःपलाय केलें. बऱ्याच महिन्यांनंतर या हेराच्या सर्व विश्वासघाताच्या गोष्टी जेव्हां बाहेर आल्या त्या वेळीं मॅलि-नोव्हस्की हा पोलिसचा हेर होता अशी लेनिनची खात्री झाली. तथापि लेनिननें या बाबतींत लिहून ठेवलेले पुढील विचार मनन करण्यासारखे आहेत यांत शंका नाहीं.

"मॅलिनोव्हस्की आमच्यांत बेमालूमपणें मिसळला व आपला उद्देश साध्य झाला हें पाहून पोलिसला कदाचित् बरें वाटलें असेल. पण आमच्या पक्षांत या इसमाला महत्त्वाचीं कामें करावीं लागत होतीं. 'प्रवदा' पत्र व ड्यूमा सभेंतील आमचा गट यांचा व आमच्या पक्षाचा कायदेशीर संबंध राखण्याचें काम त्याला करावें लागत होतें. हे संबंध जोडणाऱ्या सांखळीचा तो बळकट दुवाच बनला होता. आमच्या पक्षांत आल्यामुळें मॅलिनोव्हस्कींत इतका फरक झाला होता कीं, आपलें ढोंग पुरें करण्याकरितां मॅलिनोव्हस्कीला 'प्रवदा' पत्राचें व ड्यूमा सभेंतील आमच्या पक्षाचें काम चोख रीतीनें करणें भाग पडत होतें. मॅलि-नोव्हस्की कांहीं व्यक्तींचा नाश करूं शकत होता व त्यानें तसा केलाही. परंतु बोल्शेव्हिक पक्षाच्या वाढीला तो विरोध करूं शकला नाहीं व या पक्षाचें जनतेंत वाढत चाललेलें महत्त्वही तो कमी करूं शकला नाहीं."

लेनिननें वर म्हटल्याप्रमाणें स्वेर्डलोव्ह व स्टॅलिन यांचें मॅलिनोव्हस्कीनें

नुकसान केलें व या दोघांना आश्रय दिल्यासारखें दाखवून त्यानें त्यांना पोलिसच्या स्वाधीन केलें. ड्यूमा सभेंतील गट व 'प्रवदा' यांचें काम मध्यवर्ती कमिटीचा प्रतिनिधि या नात्यानें स्टॅलिन गुप्तपणें पहात असे. स्टॅलिनवर पोलिसनें हात टाकल्यामुळें त्याचें काम पुढें चालविण्याकरितां कामेनेव्हची नेमणूक करण्यांत आली. पुढें युद्धाच्या गडबडींत मॅलिनोव्हस्की पकडला गेला. युद्धकैदी म्हणून जर्मनींत त्याला कांहीं दिवस ठेवण्यांत आलें होतें. पुढें १९१७ सालीं तो स्वदेशीं परत आला व ज्या दोस्तांचा त्यानें विश्वासघात केला होता त्यांच्याच तो स्वाधीन झाला. मॅलिनोव्हस्कीची पुन्हा रीतसर चौकशी करण्यांत येऊन त्याला गोळी घालून ठार करण्यांत आलें.

१९०५ नंतर झारच्या सरकारनें रशियांतील कामगारांची क्रांतीची चळवळ दडपून टाकण्याचा जोराचा प्रयत्न केला; पण या दडपशाहीला कामगारांनीं व क्रांतिवादी पुढाऱ्यांनीं दाद दिली नाहीं. १९१० सालापासून या पुढाऱ्यांनीं आपल्या पक्षाची पुन्हा जमवाजमव केली व सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील मेन्शेव्हिकांच्या क्रांतिविरोधी गटाशीं असलेला आपला संबंध पूर्णपणें तोडला. रशियांतील कामकरीवर्गाची चळवळ क्रांतीच्या धोरणावर चालविण्याचें त्यांनीं ठरविलें व त्यांच्या धोरणाला १९१३–१९१४ सालीं यशही आलें. युरोपांत लवकरच महायुद्धाला सुरुवात होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. प्रचंड प्रमाणावर वाढत चाललेल्या भांडवलशाहीवर अशीं अरिष्टें आलीं असतां त्याचा फायदा घेण्याकरितांच लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं रशियांत एक प्रचंड क्रांतिकारी कामगारांचा संघ निर्माण केला होता. १९१३ सालीं व विशेषतः १९१४ सालीं रशियांतील कामगारांनीं जे प्रचंड राजकीय संप केले त्यावरून आपल्या क्रांतिकारी पक्षाचें बल किती प्रचंड प्रमाणांत वाढलें आहे हेंही या क्रांतिवादी पुढाऱ्यांना कळून चुकलें होतें.

# महायुद्धाच्या वणव्यांत

१९१४ च्या ऑगस्टमध्यें युरोपांत महायुद्धाला सुरुवात झाली. या युद्धांत रशियालाही भाग घ्यावा लागला. कोणत्या साम्राज्यवादी राष्ट्राची जगावर सत्ता चालावी हें ठरविण्यासाठीं हें युद्ध सुरू झालें होतें. साम्राज्यवाद्यांचा एक लहानसा गट जगावर अधिराज्य चालवीत होता. या गटांतील राष्ट्रें समान दर्जाचीं नव्हतीं किंवा आर्थिक दृष्ट्या स्वतंत्रपणें आपल्या साम्राज्याचें बलसंवर्धन करण्याचें सामर्थ्यही त्यांच्यांत नव्हतें. या विषमतेमुळें जगाची वांटणी करण्याच्या बाबतींत या राष्ट्रांचा परस्परांत झगडा उत्पन्न होणें साहजिक होतें. महायुद्धाचें मूळ कारण हेंच होय, असें लेनिनचें म्हणणें होतें. इतर समाजवाद्यांना लेनिनचें हें म्हणणें पटलें नाहीं व यामुळेंच या महायुद्धाविरुद्ध समाजवाद्यांनीं कोणतें धोरण स्वीकारावयाचें याबद्दल मतभेद झाला.

भांडवलशाहीचें रूपांतर साम्राज्यशाहींत होत आहे ही गोष्ट लेनिनच्या लक्षांत आलेली होती. भांडवलशाहीची प्रगति झपाट्यानें होत आहे व बँकांचें सामर्थ्य वाढत आहे. भांडवलवाल्यांचे मोठमोठे ट्रस्ट जगांत निर्माण होत आहेत, जगाला लागणाऱ्या मालापैकीं कांहीं कांहीं मालाचा पुरवठा करण्याचा मक्ताच प्रचंड भांडवलवाल्या कंपन्यांनीं घेतला आहे. रोजच्या रोज नवीन यंत्रांचा शोध लागत असल्यामुळें थोडक्या वेळांत व थोड्या मनुष्यबळानें मालाचें प्रचंड प्रमाणावर उत्पादन करण्याचें भांडवलवाल्यांचें सामर्थ्य वाढत चाललें आहे. जगांतील औद्योगिक व्यवहारांत याप्रमाणें क्रांति होत आहे व भांडवलशाहीचें पूर्वीचें स्वरूप पार बदलत चाललें आहे, ही गोष्ट इतर अनेक अर्थशास्त्रज्ञांप्रमाणें लेनिनलाही मान्य होती. पण या क्रांतीमुळें भांडवलशाहीची प्रगति होत नसून तिची अधोगति होत आहे ही इतर अर्थशास्त्रज्ञांना न कळलेली गोष्ट लेनिनला पूर्णपणें कळून चुकली होती. लेनिन व इतर अर्थशास्त्रज्ञ यांच्यांत हाच फरक

होता. भांडवलशाहीचा नाश होण्याची वेळ जवळ जवळ येत चालली आहे, भांडवलशाहीच्या या विनाशकालांत अनेक महायुद्धें व क्रांत्या होतील व मानवी इतिहासाचा बराचसा मोठा खंड या विनाशकालाच्या इतिहासानें व्यापला जाईल, असें लेनिनचें म्हणणें होतें.

मूठभर मक्तेदार कंपन्यांनीं मालाच्या उत्पादनाची सत्ता आपल्या हातांत घ्यावी, मूठभर बँकांनीं जगाच्या पैशाचा सर्व व्यवहार आपल्या ताब्यांत ठेवावा, मूठभर पैसेवाल्या जमीनदारांनीं सर्व जमिनी ताब्यांत घ्याव्या व असंख्य श्रमजीवी जनतेला भांडवलशाहीचे गुलाम बनवावें, हीं भांडवलशाहीच्या प्रगतीचीं चिन्हें नसून तिच्या नाशाचींच चिन्हें आहेत. अशा स्थितींत जीवनाला आवश्यक असणाऱ्या पदार्थांचे भाव वाढत चालले व त्याबरोबरच बहुजनसमाजाचें दारिद्र्य व कष्टही वाढत चालले व हा समाज शेवटीं क्रांतीला प्रवृत्त झाला तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं, हा सिद्धान्त लेनिननें अनेक लेख लिहून लोकांपुढें मांडला होता. भांडवलशाहीवर वारंवार कोसळणाऱ्या उत्पातांपैकींच महायुद्ध हा एक उत्पात असून या युद्धांतून क्रांतीचा उगम झालाच पाहिजे अशीही लेनिनची खात्री झाली होती. या युद्धासंबंधानें लेनिननें १९०८ सालींच भविष्य वर्तविलें होतें. पॅरिस येथें एके प्रसंगीं युद्धासंबंधानें गॉर्कीशीं बोलतांना भांडवलशाहीची जसजशी वाढ होत जाईल तसतशीं तिच्यावर एकामागून एक अरिष्टें येणार व त्याचप्रमाणें एकामागून एक युद्धांची मालिका लागणार असें त्यानें बोलून दाखविलें होतें. संस्कृतीच्या रक्षणाकरितां ग्रेट ब्रिटननें व रशियानें इराण आपल्यामध्यें वांटून घ्यावा अशी भाषा युरोपमध्यें या वेळीं चालू होती. जगाची वांटणी आपापसांत कशी करावी यासंबंधानें युरोपांतील साम्राज्यांत चढाओढ होणें व त्याकरितां एकामागून एक युद्धें होणें साहजिक आहे हें लेनिनचें भविष्य बाल्कन युद्धाच्या वेळीं खरें ठरलें होतें. "युद्धाचें अरिष्ट येत आहे. तें अपरिहार्य आहे. भांडवलशाहीच्या कुजक्या घाणीनें सर्व जगाचें वातावरण भरून गेलें आहे व राष्ट्रीयत्वाच्या विषारी वायूनें लोकांचीं मनेंही भारून जात आहेत. अशा स्थितींत युरोपांत एक महायुद्ध झाल्याखेरीज राहणार नाहीं."

कोटाच्या खिशांत हात घालून आपल्या खोलींत येरझाऱ्या घालतांना व

खोलींत बसलेल्या गॉर्कीप्रभृति दोस्तांशीं बोलतांना लेनिननें वरील उद्गार काढले. तो पुन्हा म्हणाला,

“या युद्धामुळें होणारी कत्तल थांबविण्याइतकें सामर्थ्य कामगारवर्गांत अद्याप आलेलें नाहीं. ही गोष्ट कशी घडवून आणतां येईल? सर्व युरोप-भर सार्वत्रिक संप करून! पण या वर्गाची अद्याप तितकी संघटना झालेली नाहीं व त्याकरितां लागणारी वर्गजागृतीही या समाजांत अद्याप झालेली नाहीं. असा संप करणें म्हणजे आपापसांतील युद्धाला आमंत्रण करण्या-सारखेंच आहे. परंतु आमच्यासारख्या व्यवहारवादी राजकारणी लोकांनीं असल्या गोष्टींची फिकीर करून चालावयाचें नाहीं. पण गडगंच हवें तेवढें खाऊन सुखी झालेल्या लोकांनीं गरीब भुकेलेल्या लोकांना एकमेकांविरुद्ध कां बरें लढावयास भाग पाडावें! याच्यासारखा दुसरा वेडेपणाचा गुन्हा असूं शकेल काय? कामगारवर्गाच्या लोकांना याकरितां बरेंच दुःख सोसावें लागेल, पण शेवटीं त्यांचाच जय होईल. इतिहासाची तशीच इच्छा आहे.”

१९१४ च्या ऑगस्टमध्यें लेनिन गॅलिशिया प्रांतांतील पोरोनिनो खेड्यांतच रहात होता. ता. ७ ऑगस्ट रोजीं एका शेतकऱ्याला बरोबर घेऊन एक ऑस्ट्रियन सरकारचा पोलिस शिपाई लेनिनच्या झोंपडींत आला व त्यानें लेनिनची विचारपूस करून त्या झोपडीची झडती घेतली. दुसरे दिवशीं लेनिनला पकडण्यांत आलें. लेनिन हा रशियाचा हेर आहे असा त्याच्यावर आरोप ठेवण्यांत आला व नोव्ही टार्ग नांवाच्या जव-ळच्या शहरांतील तुरुंगांत त्याला ठेवण्यांत आलें. लेनिन १२ दिवस या तुरुं-गांत होता. त्याच्या सुटकेबद्दल त्याच्या मित्रांनीं बरीच मध्यस्थी केली. या दिवसांत क्रुप्सकाया रोज लेनिनची मुलाखत घेत असे व युद्धाच्या बातम्या त्यास सांगत असे. युद्ध सुरू झाल्याबरोबर जर्मनी, इंग्लंड, ऑस्ट्रिया व फ्रान्स वगैरे देशांतील मजूरपक्षांनीं आपल्या सरकारला या वेळीं मदत करण्याचें ठरवून कामगारवर्गाचा विश्वासघात केला ही बातमी त्याला या ठिकाणीं समजली. दोन वर्षांपूर्वी बॅसल येथें आंतर-राष्ट्रीय परिषद् झाली त्या वेळीं साम्राज्यवादी राष्ट्रांनीं सुरू केलेल्या युद्धांत

त्यांना मदत करावयाची नाहीं, या ठरावास वरील देशांतील मजूरपक्षाच्या पुढाऱ्यांनीं एकमतानें पाठिंबा दिला होता.

तुरुंगांत असतांना तेथील शेतकरी कैद्यांना कायदेशीर सल्ला देण्यांत व त्यांच्याशीं गप्पा मारण्यांत तो आपला वेळ घालवीत असे. महायुद्धामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा कामगारवर्गाच्या हिताच्या दृष्टीनें कसा फायदा घेतां येईल याचाही विचार करण्यांत तो या वेळीं गढलेला होता. थोडयाच दिवसांत ऑस्ट्रियन सोशालिस्ट पुढारी व्हिक्टर ॲडलर यानें लेनिन हा झारचा कट्टा शत्रु आहे, अशी व्हिएन्ना येथील पोलिस अधिकाऱ्यांची खात्री करून दिली व लेनिनला मुक्त करण्यांत आलें.

यानंतर क्रॅको येथें थोडे दिवस राहून लेनिन पुन्हा स्वित्झर्लंडमध्यें राहावयास गेला. या ठिकाणीं लेनिननें युद्धावर एक निबंध लिहिला व तिकडील हद्दपार झालेल्या बोल्शेव्हिकांच्या एका सभेंत त्यानें तो वाचून दाखविला. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत ही सभा भरली होती. हें युद्ध साम्राज्यवाद्यांनीं सुरू केलेलें असून निरनिराळ्या देशांतील भांडवलवाल्यांच्या हितरक्षणाकरितांच तें चालविण्यांत आलेलें आहे, या युद्धांत सामील झालेल्या दोस्त राष्ट्रांत हा बरा व तो वाईट असा भेदभाव करण्यांत अर्थ नाहीं, या राष्ट्रांपैकीं कोणाचाही जय झाला तरी श्रमजीवी जनतेच्या हितसंबंधाविरुद्धच त्याचा उपयोग करण्यांत येईल यांत शंका नाहीं. अशा परिस्थितींत आपापल्या साम्राज्यवादी सरकारचा या युद्धांत पराजय कसा होईल याचाच विचार प्रत्येक राष्ट्रांतील कामगारांनीं केला पाहिजे. खऱ्या समाजसत्तावाद्याचें या वेळीं हेंच कर्तव्य आहे. रशियांतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षानें तर झारच्या सरकारचा पराजय होईल असाच प्रयत्न केला पाहिजे आणि असा पराजय झाला तरच त्यांत कामगारांचें हित आहे असें मानलें पाहिजे. या महायुद्धाचें परिवर्तन आपसांतील युद्धांत घडवून आणावयाचें अशा प्रकारचें आपलें स्पष्ट व निश्चित धोरण असलें पाहिजे. स्टूटगार्टच्या परिषदेंत यासंबंधानें झालेल्या ठरावाला निश्चित स्वरूप देण्यांत आलें पाहिजे. सेकंड इंटरनॅशनलचा मृत्यु कायमचा समजून तिचें पुनरुज्जीवन करण्याच्या भानगडींत पडूं नये. समाजसत्तावादाचा विश्वासघात करणारा—मग तो प्लेखानोव्ह,

शील्डमन, ग्यूसड अथवा हिंडमन कोणीही असो, त्याच्याशीं असलेला संबंध तोडून टाकला पाहिजे आणि नवीन खरी क्रांतिवादी आंतरराष्ट्रीय परिषद् स्थापण्याचा व नांवाप्रमाणें तिचें धोरण राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे वगैरे विचार लेनिननें वरील निबंधांत प्रदर्शित केले होते. बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती कमिटीनें या निबंधांतील वरील विचारांना संमति दिली व त्याला अनुसरूनच आपल्या कामाचें धोरण आंखण्याचें ठरविलें. आंतरराष्ट्रीय कामगार-गीत गात गात आपण या महायुद्धांत सामील होऊं ही कल्पना लेनिनला केव्हांच पटली नाहीं. कारण या युद्धांत जर्मनीला जय मिळाला तर त्याचा उपयोग तो झारविरुद्ध करणार व फ्रान्सला जय मिळाला तर कैसरचा मुलूख तो गिळंकृत करणार हें उघड होतें. सेकंड इंटरनॅशनलचा या कालांत धुव्वा उडाला होता व या संघांतील पुढारी आपापल्या युध्यमान सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतून मोठमोठ्या जागा पटकावण्याच्या विचारांत होते. तथापि या सर्व देशांतून असलेल्या क्रांतिवादी कामगारपुढाऱ्यांना एकत्र आणून एक नवीनच क्रांतिवादी आंतरराष्ट्रीय कामगारसंघ स्थापन करण्याचा लेनिनचा विचार होता व या महायुद्धाचें समाजसत्तावादी क्रांतींतच रूपांतर झालें पाहिजे, असें लेनिनचें म्हणणें होतें. परंतु या प्रसंगीं कोणत्याही दोस्त राष्ट्रांत अशा प्रकारचा प्रयत्न करणें अशक्य असल्यामुळें स्वित्झर्लंडच्या सरहद्दीवर राहून लेनिनला योग्य कालाची वाट पहात बसावें लागलें.

लेनिनची आर्थिक परिस्थिति या वेळीं नेहमींप्रमाणेंच हलाखीची होती. क्रुप्सकायाच्या आईला तिच्या वारसाहक्कानें ५८० पौंड मिळाले होते. क्रॅकोहून बर्नला हे पैसे पाठवितांना मधल्या व्हिएन्ना येथील दलालानें यांतली निम्मी रक्कम गिळंकृत केली. क्रांतीच्या या कालांत लेनिनला एवढ्या थोड्या पैशावरच दिवस काढावे लागले. योगायोग असा कीं, १९१७ च्या जुलैमध्यें केरेन्स्कीच्या पोलिसांनीं लेनिनच्या पेट्रोग्राड येथील घराची झडती घेतली त्या वेळीं त्याच्याजवळ यापैकीं थोडे पौंड सांपडले आणि यावरून लेनिन हा जर्मनीचा हेर आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यांत आला !! पहिल्या कामगारक्रांतीचा लेनिन पुढारी होता

व सामान्य मजुराप्रमाणें आपली राहणी असली पाहिजे, त्याच्यापेक्षां आपण निराळ्या पद्धतीनें राहतां कामा नये, अशी लेनिनची इच्छा होती. हीच गोष्ट वरील प्रकारावरून सिद्ध होण्याजोगी आहे.

स्वित्झर्लंडनें महायुद्धांत भाग घेतला नाहीं, तें तटस्थ राहिलें, तथापि त्या देशांत राहणेंसुद्धां कमी धोक्याचें होतें असें नाहीं. महायुद्धाच्या वेळीं कोणत्याही राष्ट्राला अगदीं तटस्थपणें राहणें शक्यच नव्हतें. युद्धोपयोगी माल व लष्कर या देशांतून पाठविणें वगैरेंच्या बाबतींत या राष्ट्रांना दोस्त राष्ट्रांकडून तोशीस सोसावी लागत होती आणि त्यांच्या इच्छेला मोठ्या नाखुषीनें या तटस्थ राष्ट्रांना मान द्यावा लागला होता. अशा परिस्थितींत आपलें सर्व काम अत्यंत गुप्तपणें चालविलें पाहिजे ही गोष्ट लेनिननें आपल्या अनुयायांवर बिंबविली होती. झारचें सरकार व स्विस सरकार यांच्यांत केव्हां करारमदार होतील व आपणा सर्वांना केव्हां कैद करण्यांत येईल याचा नेम नाहीं, ही गोष्ट अगदीं सहज घडून येण्याजोगी आहे, याची कल्पना लेनिननें आपल्या सहकाऱ्यांना पूर्णपणें दिली होती. महायुद्धांत सामील झाल्याबरोबर झारच्या सरकारनें लेनिनच्या युद्धविरोधी व क्रांतिवादी अनुयायांचा प्रथम समाचार घेतला. लेनिनच्या क्रांतिकारक कल्पनांचा प्रसार करण्याचे कामीं ड्यूमा सभेंतील बोल्शेव्हिक पक्षाच्या प्रतिनिधींनीं जोराचा प्रयत्न केला, ड्यूमा सभेंतील प्रतिनिधि या नात्यानें त्यांना हें काम करण्यास अनुकूलताही मिळाली. पण ही चळवळ फार दिवस चालूं शकली नाहीं. ड्यूमा सभेंतील बोल्शेव्हिकांचे सहाही प्रतिनिधी पकडण्यांत आले. त्यांच्याबरोबर कामेनेव्हलाही पकडण्यांत आलें. या सर्वांवर रीतसर खटले भरण्यांत आले व त्यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्यांत येऊन त्यांना सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें. लेनिनच्या मतांचा प्रसार करण्याच्या कामीं या चौकशीचा फार उपयोग झाला. बोल्शेव्हिक प्रतिनिधींनीं या वेळीं अंगिकारिलेल्या धोरणाची लेनिननेंही प्रशंसा केली. बोल्शेव्हिक प्रतिनिधींनीं अंगिकारिलेलें हें धोरण समाजसत्तावाद्यांनीं अनुकरण करण्याजोगें आहे असें या वेळीं लेनिननें म्हटलें आहे. यानंतर साहाजिकच लेनिनच्या पक्षांतील कामगारांच्या घरांवर छापे घालणें, त्यांच्या झडत्या घेणें, त्यांची धरपकड करणें व

कोर्ट मार्शल करून या कामगारांना शिक्षा देणें असे प्रकार रशियांत सर्वत्र घडून आले. १९१५ मध्यें रशियांतील कारखानदारांनीं सरकारला दारू-गोळा पुरविण्याच्या कामीं मदत करण्याकरितां एक औद्योगिक युद्धकमिटी नेमण्याचें ठरविलें व या कमिटींत कामगारांनीं आपले प्रतिनिधी निवडून द्यावे अशी विनंति केली. पण पेट्रोग्राडमधील कामगारांनीं या निवडणुकीवर बहिष्कार घातला. झारच्या सरकारी अधिकाऱ्यांना ही गोष्ट अर्थात्च आवडली नाहीं व कामगारवर्गांतील या युद्धविरोधी वृत्तीचा बीमोड करण्याचें त्यांनीं ठरविलें.

बोल्शेव्हिकांचें 'प्रवदा' पत्र तर ताबडतोब बंद करण्यांत आलें. सरकारच्या या दडपशाहीच्या धोरणामुळें लेनिनला व त्याच्या दोस्तांना रशियांतील आपल्या पक्षाच्या मंडळींशीं पत्रव्यवहार ठेवणें अत्यंत कठिण व भयावह झालें होतें. रशियांतील बोल्शेव्हिक पक्षाचें मतप्रचाराचें काम तर अगदींच बंद पडलें होतें. बहुतेक सर्व बोल्शेव्हिक हद्दपार करण्यांत आले होते. यामुळें १९१६ च्या अखेरीस प्रत्यक्ष क्रांतीची वेळ येऊन ठेपली त्या वेळीं बोल्शेव्हिक मताचे कामगार आपल्या पुढाऱ्यांची वाट पहात बसले नाहींत. अगदीं स्वतंत्रपणें त्यांनीं या परिस्थितीचा फायदा घेतला. रशियन राज्यक्रांति हें लेनिनचें जीवितकार्य खरें, परंतु रशियांशीं अगदीं संबंध तुटल्यामुळें त्याला आंतरराष्ट्रीय प्रश्नांकडेच लक्ष द्यावें लागलें. रशियांत क्रांति होणार ही गोष्ट त्यानें पूर्णपणें जाणली होती. झारची एकतंत्री सत्ता उलथून पडावी एवढ्यावरच तो संतुष्ट नव्हता किंवा आपल्या राष्ट्राचा कोणीकडून तरी पराजय व्हावा असेंही त्याला वाटत नव्हतें. देशांतील कामगारवर्गानें जागें होऊन आपल्या सरकारचा पराभव होण्याचे कामीं कारणीभूत झालें पाहिजे, ही गोष्ट त्याला पाहिजे होती. जर्मनींतील कामगारपुढारी लिबनेक्ट व रोझा लक्झेंबर्ग यांनीं या बाबतींत स्वीकारलेलें धोरण लेनिनला पूर्णपणें पसंत होतें.

रशियांतील परिस्थिति याप्रमाणें अत्यंत बिकट झाली होती. पण रशियाखेरीज युरोपांतील इतर राष्ट्रांतील परिस्थिति इतकी बिकट झालेली नव्हती. या वेळीं लिट्विनॉफ् लंडनमध्यें, श्लियाप्निकोव्ह स्टॉकहोममध्यें, कोलोन्टाई खिश्चयानियांत व बुखारिन न्यूयॉर्कमध्यें होता. आपल्य

पक्षाची इतस्ततः पसरलेली सर्व मंडळी एकत्र आणून जगांतील क्रांतिकारी समाजवादाच्या चळवळीला पुन्हा संघटित करण्याचा प्रयत्न हे पुढारी करीत होते. महायुद्धाचें आपसांतील युद्धांत परिवर्तन करून क्रांतिकारी समाजसत्तेची प्रस्थापना करण्याचे लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचे प्रयत्न चालू होते खरें, पण युद्धाच्या वेळीं वारंवार बदलत चाललेल्या परिस्थितीमुळें कामगारचळवळींत लक्ष घालणाऱ्या पुढाऱ्यांतही नाना मतांचा गलबला झाला होता. ट्रॉट्स्की व मध्यवर्ती कमिटींतील कांहीं मंडळी शांतताप्रस्थापनेच्या चळवळीच्या मागें होती. इंग्लंडमधील स्वतंत्र मजूरपक्षाचा 'शांति' हा घोषशब्दच बनला होता. जर्मनींतील कॉट्स्की व त्याचे अनुयायी शांतीचाच पुकारा करीत होते. फक्त अगदीं थोडे डच, स्विस, जर्मन समाजसत्तावादी व नॉर्वे-स्वीडनमधील कांहीं समाजसत्ता-वादी लेनिनच्या बाजूचे होते. पण जर्मनींतील लिबनेक्ट व रोझा लक्झेंबर्ग-प्रभृति पुढाऱ्यांनीं स्वीकारलेलें युद्धविरोधी धोरणच विशेषतः या क्रांतिवादी पुढाऱ्यांना संमत होतें. शांततेचा पुरस्कार केल्यामुळें समाजसत्तावादी चळ-वळीचा विश्वासघात केल्यासारखें होतें ही गोष्ट टॉट्स्की व इतर अस्थिर बुद्धीच्या पुढाऱ्यांना समजत नव्हती. महायुद्धाच्या वेळीं आपसांतील युद्धाला सुरुवात होऊन त्याचें क्रांतींत पर्यवसान होणें ही आकस्मिक होणारी घटना नसून या युद्धापूर्वीं या दोस्त राष्ट्रांतून जीं अनेक आर्थिक व राजकीय स्थित्यंतरें घडून आलीं आहेत त्यांचाच हा स्वाभाविक परिणाम आहे, हें लेनिननें अत्यंत शांतचित्तानें व धीमेपणानें आपल्या अनुयायांना, विशेषतः शांततावादी कामगारपुढाऱ्यांना दाखवून दिलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दुसऱ्या इंटरनॅशनलमधील पुढाऱ्यांनीं या वेळीं जें विश्वास-घाताचें वर्तन केलें त्यामुळें लेनिनचें चित्त प्रक्षुब्ध झालें. विशेषतः जर्मन पार्टीच्या पुढाऱ्यांनीं व त्यांतल्या त्यांत कॉट्स्कीसारख्या प्रसिद्ध भविष्यवादी पुढाऱ्यानें या वेळीं विश्वासघात केलेला पाहून तो अधिकच संतप्त झाला होता. मार्क्स व एंजल्स यांनीं 'जर्मन सोशल डेमॉक्रसी'ची प्रस्थापना केली होती. सर्व जगांतील कामगार या पक्षाकडे एक अधिकृत पक्ष या नात्यानें पहात होते. पण या पक्षांतील पुढाऱ्यांनीं कामगारचळ-वळीचा विश्वासघात केला व कैसरनें या पक्षाला पूर्णपणें पाठीशीं घातलें,

यामुळें बोल्शेव्हिक पक्षातर्फे चालू असलेल्या युद्धविरोधी चळवळीला बराच मोठा धक्का बसला.

"इतर कोणापेक्षांही कॉट्स्की हा अधिक ढोंगी आहे, त्याचें वर्तन तिरस्करणीय आहे व त्याचें धोरण तर नुकसानकारक आहे. पितृदेशाचें संरक्षण करण्याचें निमित्त करून एका राष्ट्रांतील कामगारांनीं दुसऱ्या राष्ट्रांतील कामगारांना गोळ्या घालून ठार करावयाचें हेंच त्याचें आंतरराष्ट्रीयत्व होय. पीटर्सबर्ग येथील कामगारांच्या मनोभावना अत्यंत शुद्ध आहेत. 'जर्मन सोशल डेमॉक्रसी' मधील विश्वासघातकी पुढाऱ्यांसंबंधानें त्यांना द्वेषभाव वाटत असेल तर अगदीं साहजिक आहे. त्यांना तसेंच वाटलें पाहिजे. दुसऱ्या इंटरनॅशनलमधील संधिसाधू पुढाऱ्यांविरुद्ध झगडण्याचा त्यांचा निश्चय बळावत जाईल व क्रांतीची भावना त्यांच्या मनांत जागृत राहील अशी काळजी आपण घेतली पाहिजे. 'जर्मन डेमॉक्रसी'ला कामगारचळवळीच्या बाबतींत बोलण्याचा अधिकार आहे अशा दृष्टीनें या संस्थेकडे इतर कामगारसंस्था पहात असत. पण हा मनु आतां पालटला आहे. कामगारचळवळीच्या बाबतींत कोणत्या गोष्टी करूं नयेत याचें उदाहरण पहावयाचें असल्यास या पक्षाकडे पहावें, अशी स्थिति आतां आली आहे." अशा आशयाचे विचार लेनिननें ऑक्टोबरमध्यें श्लियाप्निकोव्ह याला लिहिलेल्या पत्रांत प्रगट केले आहेत. आपसांतील युद्ध व क्रांति किंवा संधिसाधू पुढाऱ्यांशीं संगनमत, यांपैकीं कोणता मार्ग स्वीकारावयाचा हें ठरविण्याची वेळ आतां आली आहे असें तो आपल्या कामगारसंघांतील सहकाऱ्यांना सांगत असे. क्रांतीचें धोरण लवकरच यशस्वी होईल अशी त्याची आतां खात्री झाली होती.

महायुद्धांत घडणारा मनुष्यसंहार व युद्धाच्या धुमाकुळींत होणारी राष्ट्रीय हानि यासंबंधानें युध्यमान राष्ट्रांतील मुत्सद्यांची खात्री पटवून द्यावयाची, त्यांचीं अंतःकरणें द्रवतील अशा रीतीनें त्यांच्यापुढें हा प्रश्न मांडावयाचा, या गोष्टींवर लेनिनचा मुळींच विश्वास नव्हता. आणि या शांततारक्षणाच्या चळवळीचा फायदा घेऊन भांडवलवालीं राष्ट्रें सामान्य जनतेला फसवतील, ही गोष्टही तो पूर्णपणें जाणून होता. भांडवलशाही राष्ट्रां-

तील शांतता म्हणजे साम्राज्यशाहीचें पुनरुज्जीवन व दृढीकरण होय. युद्धाला अपरिहार्यपणें कारणीभूत होणाऱ्या साम्राज्यशाहीला जगविण्यापेक्षां मानवी समाजाला कायमच्या शांततेची व सुखाची प्राप्ति करून देणाऱ्या कामगारक्रांतीची आराधना करणें अत्यंत श्रेयस्कर आहे भांडवलशाहीला जगविणारी शांतता आपल्याला नको आहे तर भांडवलशाही युद्धाच्या ऐवजीं देशांतील निरनिराळ्या वर्गांत आपसांत युद्ध होणें जरूरीचें आहे. युद्ध म्हणजे मानवी समाजावर येणारें एक महत् संकटच होय, ही गोष्ट लेनिन जाणून होता. क्रॅस्निकच्या लढाईंत जखमी झालेले सैनिक क्रॅको येथील रस्त्यांतून नेण्यांत आले त्या वेळचा भीषण देखावा लेनिनच्या मनांत सारखा घोळत होता. यामुळें ठिकठिकाणीं चालू असलेल्या युद्धाचीं वर्णनें वाचून त्याच्या अंगावर शहारे येत. यावरून लेनिनला युद्धाची भीति वाटत होती असें मुळींच नाहीं. गोळीबाराला लेनिन भीत नव्हता किंवा रक्तपाताच्या कल्पनेनें त्याचें अंत:करणही भयभीत होत नव्हतें; आणि मरणाची तर लेनिनला मुळींच भीति वाटत नव्हती. त्याला एकाच गोष्टीचें भय वाटत होतें. पुढाऱ्यांनीं हातचे सोडल्यामुळें ठिकठिकाणचे कामगार कत्तलीकरितां रणक्षेत्रांत हाकून नेण्यांत येत आहेत, हे कामगार निरनिराळ्या देशांतील आपल्याच वर्गांतील लोकांची कत्तल करून आपली शक्ति कमी करून घेत आहेत व यापेक्षांही चांगल्या कार्याकरितां आपल्या रायफलींचा उपयोग करण्याची संधि गमावीत आहेत, याचीच काय ती खंत लेनिनला वाटत होती.

लेनिनची लेखणी स्वाभाविकच तीव्र होती आणि या युद्धाच्या दिवसांत तिचा तिखटपणा फारच वाढला होता. पूर्वीचे आपले दोस्त युध्यमान लोकांना मदत करीत आहेत हें पाहून तर त्याचा संताप अनावर होत चालला होता. रीच्स्टॅगमधील सोशालिस्ट प्रतिनिधींनीं युद्धकर्जाला संमति दिली ही हकीगत जर्मन सोशालिस्ट पक्षाचें मुखपत्र 'व्हॉर्वर्ट्स्' यामध्यें प्रसिद्ध झालेली त्यानें पाहिली. ही हकीगत वाचतांना स्वत:च्या डोळ्यांवर देखील त्याचा विश्वास बसेना. जर्मनींतील इंपीरियल जनरल स्टाफनें ही खोटीच हकीगत या पत्रांत प्रसिद्ध केली असेल असें त्याला वाटलें. यानंतर पॅरिस येथील निर्वासित कामगारांच्या सभेंतील प्लेखानोव्हचें

भाषण त्याच्या वाचण्यांत आलें. कामगारांनीं आतां फ्रेंच सैन्यांत दाखल व्हावें अशी प्लेखानोव्हनें या सभेंत विनंति केली होती.

"काय, प्लेखानोव्हसुद्धां स्वपक्षद्रोही बनला! ही गोष्ट शक्य नाहीं." लेनिननें असे उद्गार आपल्या दोस्तांपाशीं अनेक वेळां काढले. प्लेखानोव्हचें इतकें मतांतर झालें असेल या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तो तयार नव्हता. परंतु या बाबतींत त्याची जेव्हां खात्री करून देण्यांत आली त्या वेळीं लेनिननें प्लेखानोव्हला चांगलाच आडवा तिडवा घेतला. बर्न येथें झालेल्या एका धामधुमीच्या सभेंत प्लेखानोव्हचा त्यानें स्वतः अगदीं तोंडावर निषेध केला. या वेळीं प्लेखानोव्हशीं हस्तांदोलन करण्याचें व त्याला आपला 'भाई' म्हणण्याचें देखील त्यानें नाकारलें. लेनिननें आपल्या सबंध आयुष्यांत कोणाशींही असें वर्तन केलें नव्हतें.

प्लेखानोव्हसारखे जुने दोस्त साम्राज्यशाहीशीं संगनमत करण्यास एका बाजूनें तयार झाले होते तर रोझा लक्झेंबर्ग, रॅडेक, बुखारिन यांच्यासारख्या नव्या दोस्तांना जागतिक क्रांतीचीं स्वप्नें पडूं लागलीं होतीं. महायुद्धामुळें या लोकांचीं डोकीं फिरून गेलीं होतीं व जागतिक क्रांति करून ताबडतोब समाजसत्तावादाची प्रस्थापना करण्यांत आली पाहिजे, असें ते म्हणूं लागले होते. बुखारिन, रॅडेकप्रभृति दोस्त खऱ्या आंतरराष्ट्रीय वृत्तीचे आहेत ही गोष्ट लेनिनला मान्य होती. पण जगांतील राष्ट्राराष्ट्रांतून जी चढाओढ चालली आहे व जे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवले आहेत ते सोडविल्याशिवाय जागतिक क्रांति करतां यावयाची नाहीं, असें लेनिनचें मत होतें. एकीकडे प्लेखानोव्हप्रभृतींचा निषेध करीत असतांना रोझा लक्झेंबर्गप्रभृति कट्टर जहालांशीं वादविवाद करून त्यांची समजूत काढण्याचेंही काम लेनिनला करावें लागलें. जागतिक क्रांति करून सर्व सत्ता कामगारजनतेच्या ताब्यांत येणें ही साधी गोष्ट नाहीं. कामकरी, शेतकरी व गरीब मध्यमवर्ग यांची सत्ता असणाऱ्या (लोकसत्ताक) राज्यपद्धतीचा आश्रय घेऊन राष्ट्रीय आकांक्षा पूर्ण झाल्याशिवाय अशी क्रांति करतां यावयाची नाहीं, असें लेनिनला वाटत होतें. १९१६ च्या ईस्टरच्या सणांत आयर्लंडमध्यें जें स्वातंत्र्ययुद्ध झालें त्यावरून तर या वेळीं जागतिक क्रांतीला हात घालणें अत्यंत धोक्याचें आहे, ही गोष्ट

लेनिननें जाणली होती. साम्राज्यशाहीची सत्ता व सामर्थ्य ज्या ठिकाणीं मोडकळीस आलीं आहेत, युद्धामुळें उत्पन्न होणाऱ्या हलाखीच्या परिस्थितीला तोंड देण्याचें सामर्थ्य ज्या राष्ट्रांत राहिलें नाहीं, अशा रशियासारख्या राष्ट्रांतूनच या वेळीं प्रथम क्रांति होईल व मग जागतिक क्रांति करतां येईल, असें ट्रॉट्स्कीला उद्देशून लिहिलेला एका लेखांत लेनिननें म्हटलें होतें. जगांत साम्राज्यशाहीची वाढ होत आहे, जगांतील निरनिराळ्या साम्राज्यवादी राष्ट्रांचे हितसंबंध गुंतागुंतीचे होत चालले आहेत अशा वेळीं जागतिक क्रांतीची भाषा बोलणें चुकीचें आहे, असें त्यानें आपल्या जहाल दोस्तांना दाखवून दिलें होतें. १९१५ सालीं लेनिननें 'साम्राज्यवाद (इंपीरियालिझम्)' हें पुस्तक लिहिलें. भांडवलशाहीमुळें उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीचें त्यानें या पुस्तकांत पृथक्करण केलें आहे. विशेषतः राष्ट्राराष्ट्रांत सुरू होणाऱ्या युद्धांची कारणमीमांसा त्यानें या पुस्तकांत केली आहे व आर्थिक उत्पात झाल्याबरोबर सर्व जगांत एकदम क्रांति घडून येईल असें ज्यांना वाटत होतें त्यांची ती समजूत कशी निखालस चुकीची आहे, हें त्यानें या पुस्तकांत दाखवून दिलें आहे.

१९१४ सालीं महायुद्धाला सुरुवात झाली. सत्य व न्याय यांचें रक्षण, लहान राष्ट्रांचा कैवार, राष्ट्राभिमान इत्यादि विषयांवर आवेशयुक्त उत्साह उत्पन्न करणारीं भाषणें करून व लेख लिहून दोस्त राष्ट्रांतील मुत्सद्यांनीं लाखों सैनिकांची जमवाजमव केली; पण हा उत्साह व आवेश फार दिवस टिकला नाहीं. देशाभिमानाचा पहिला आवेश ओसरत चालला व युद्ध लांबत चाललें तसतसा सैनिकांमधील उत्साहही कमी होऊं लागला. १९१५ च्या उन्हाळ्यांत तर सर्व युध्यमान राष्ट्रांतून—विशेषतः फ्रान्स वगैरे दोस्त राष्ट्रांतून हेच प्रकार दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. युद्धाचा ताण सहन न झाल्यामुळें रशियांत तर हाहाःकारच उडाला.

रशियाचें लष्कर केव्हांही आजिंक्यच राहणार हा रशियाचा अहंकार या युद्धाच्या वेळीं तर पार रसातळासच गेला. युद्धाच्या पहिल्या पहिल्या चकमकींत सुद्धां झारशाहीला लज्जेनें खालीं मान घालावी लागेल अशी परिस्थिति निर्माण झाली होती. या युद्धांत रशियावर एकामागून एक पीछेहाटीचे प्रसंग आले. आणि १९१५ च्या उन्हाळ्यांत इतर दोस्त राष्ट्रां-

पेक्षां रशियाची परिस्थिति केविलवाणी झाली. निरनिराळ्या रणक्षेत्रांवर एकामागून एक आपले पराभव होत आहेत याचें कारण आपला दुबळे-पणा व नालायकी नसून आपलें लष्करच असावें तितकें मोठें नाहीं, अशी रशियन सेनापतींनीं आपली समजूत करून घेतली व आपली नालायकी झांकण्याकरितां खेडेगांवांतील लाखो शेतकऱ्यांना चाबकाच्या माराखालीं त्यांच्या घरादारांतून बाहेर काढून रणांगणावर नेण्यांत आलें. अशा रीतीनें दीड कोटि लोकांची सैन्यांत भरती करण्यांत आली व लष्कराकरितां उभारलेले डेपो व बराकी रशियन सैनिकांनीं ओतप्रोत भरून गेल्या. महायुद्ध सुरू होऊन वर्षदेखील पुरें झालें नव्हतें. पण एवढ्या अवका-शांत रशियाच्या लष्करांतील लाखों सैनिक धारातीर्थीं पडले व लाखों जखमी झाले आणि शत्रूकडून किती पकडले गेले याचा तर पत्ताच नाहीं. अशा रीतीनें सारखे पराभव होत गेल्यामुळें रशियन सैनिकांतील उत्साह साहजिकच कमी झाला. चाबकाच्या माराखालीं लष्करांत भरती झालेल्या लोकांत उत्साह असणार तरी कसा! शत्रूंच्या तोफांखालीं लाखों रशियन सैनिक बळी पडत होते. त्याचप्रमाणें लाखों सैनिक रणांगणांतून पाय काढून पळून जात होते. "लष्करांतील वातावरण भयप्रद बनलें आहे, सैन्यांतील अधिकारी व सैनिक यांच्यांतील संबंध अत्यंत ताणा-ताणीचे झाले आहेत, सैनिक अधिकाऱ्यांवर तुटूनही पडत आहेत व वारंवार रक्तपाताचे प्रसंग येत आहेत, हजारों सैनिक लष्कर सोडून पळून जात आहेत, अशा रीतीनें लष्करांतील सैनिकांचीं मनें निराश झालीं आहेत, त्यांच्यांत कोणत्याही प्रकारचा जोम राहिलेला नाहीं असेंच दिसून आल्याशिवाय रहात नाहीं." असे रिपोर्ट पेट्रोग्राडमधील सरकार-कडे येऊन धडकत होते. रशियांतील सर्व ठिकाणचे लोक युद्धाला कंटा-ळून गेले आहेत, कोणत्याही अटींवर कां होईना एकदां तह झाला त. बरा असें लोकांना वाटूं लागलें आहे, असें पोलिसखात्याच्या डायरेक्टरानें १९१६ सालीं आपल्या रिपोर्टांत म्हटलें होतें. जुलूमजबरदस्तीनें लष्करांत आपली भरती करण्यांत आली आहे, आमच्या उपासमारीकडे लक्ष न देतां आम्हांला तोफेच्या तोंडीं कसें द्यावयाचें याचाच लष्करी अधिकारी विचार करीत आहेत, याची जाणीव झाल्यामुळें रशियांतील

सैनिकांत सर्वत्र असंतोष व बदफैली पसरली होती. यामुळें लष्करांतील सैनिक बेपर्वा व जिवावर उदार होऊन अधिकाऱ्यांवर तुटून पडत होते व आपल्याला होणाऱ्या शिक्षेबद्दल बेफिकीर होऊन हजारों सैनिक आपापल्या पलटणींचा त्याग करून आपापल्या खेड्यांकडे जात होते. युद्धामुळें होत असलेल्या उपासमारीमुळें व अनेक अनन्वित प्रकारच्या हालांमुळें लष्करांतील सैनिक ज्याप्रमाणें निर्भय व प्रतिकारक्षम बनले होते, त्याचप्रमाणें रशियांतील कारखान्यांतून—विशेषतः युद्धसामग्री तयार करण्याकरितां उभारलेल्या कारखान्यांतून—कामें करणारे कामगारही आपल्यावर होणाऱ्या अन्यायांना तोंड देण्यास समर्थ झाले होते. महायुद्धाच्या दिवसांत युद्धसामग्री पुरविण्याकरितां उभारलेल्या प्रचंड कारखान्यांतून हजारों कामगारांचें केंद्रीकरण झालें होतें व कामगारांना मरेमरेतों छळून त्यांच्याकडून कामें करून घेण्याचे सरकारी हुकूम सुटले होते. यामुळें कामगारांच्या या दिवसांतील चळवळींना साहजिकच राजकीय स्वरूप प्राप्त झालें होतें. कोणत्याही कारणाकरितां कामगारांचा संप झाला कीं त्याला लगेच राजकीय स्वरूप प्राप्त व्हावयाचें असा रशियांत या वेळीं रिवाजच पडला होता. पश्चिम युरोपांत राजकीय संप फारच क्वचित् प्रसंगीं घडून येत. पण राजकीय संप हा रशियांतील कामगार-चळवळीचा प्रमुख कार्यक्रमच होऊन बसला होता. १९०३ ते १९१७ पर्यंतचा रशियांतील संपांचा इतिहास हेंच सांगतो. रशियांतील उद्योग-धंदे फारसे वाढलेले नव्हते. युरोपांतील इंग्लंड, जर्मनीप्रभृति राष्ट्रांच्या मानानें रशियांतील कामगारांची संख्याही मोठी नव्हती. १९०५ सालीं रशियांतील कामगारांची संख्या १५ लाख होती, ती १९१७ सालीं २० लाखांपर्यंत गेली. परंतु रशियांतील संपाच्या चळवळींना लगेच राजकीय संपाचें स्वरूप प्राप्त होई, हें यांतील विशेष होतें.

१९१४ च्या प्रारंभींच्या दिवसांत रशियांत संपाच्या चळवळींना जणूं काय ऊतच आला होता. पण युद्ध झाल्याबरोबर ही चळवळ अर्थात्च कांहीं दिवस मागें पडली. पुढें युद्धाचा पहिला उत्साह ओसरत चालला. रशियाच्या लष्कराचे एकामागून एक पराभव होऊं लागले. आणि खुद्द देशांतही महागाई होऊन जनतेची उपासमार होऊं लागल्यामुळें १९१५

च्या उन्हाळ्यांत राजकीय संपाच्या चळवळींना पुन्हा तोंड फुटलें आणि १९१७ च्या फेब्रुवारींत लष्करांतील शिपायांनीं व कारखान्यांतील कामगारांनीं एकत्र येऊन सरकारविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. १९०५ सालीं व १९१७ सालीं रशियांतील कामगारांनीं प्रचंड राजकीय संप करून कामगारवर्ग क्रांतिकारक असतो, हा मार्क्सचा सिद्धान्त खरा करून दाखविला. या संपाच्या चळवळींतूनच अशा एका संघटनेची निर्मिति झाली कीं, जिनें या चळवळीचा क्रांति करण्याच्या कामीं व पुढें ती टिकविण्याच्या कामींही योग्य तो उपयोग करून घेतला. ही संघटना म्हणजेच 'सोव्हिएट' संघटना होय. बोल्शेव्हिकांच्या या संघटनेनें पहिल्या क्रांतीच्या वेळीं व पुढेंही अत्यंत मोठी कामगिरी बजावली आहे यांत शंका नाहीं.

रशियांतील क्रांतिकारी कामगारवर्गाचे राजकीय संप हें क्रांतिकारी शस्त्र होतें. या शस्त्राचा उपयोग वेळोवेळीं कसा करण्यांत आला व हें शस्त्रच अखेरची क्रांति घडून येईपर्यंत म्हणजे सर्व राज्यसत्ता सोव्हिएटांच्या हातीं येईपर्यंत कसें वापरण्यांत आलें याची कल्पना येण्यासाठीं १९०३ पासून १९१७ पर्यंतचे या संपासंबंधींचे आंकडे खालीं दिले आहेतः—

| वर्ष | | | | राजकीय संपांत किती कामगारांनीं भाग घेतला |
|---|---|---|---|---|
| १९०३ | ... | ... | ... | ८७००० |
| १९०४ | ... | ... | ... | २५००० |
| १९०५ | ... | ... | ... | १८४३००० |
| १९०६ | ... | ... | ... | ६५१००० |
| १९०७ | ... | ... | ... | ५४०००० |
| १९०८ | ... | ... | ... | ९३००० |
| १९०९ | ... | ... | ... | ८००० |
| १९१० | ... | ... | ... | ४००० |
| १९११ | ... | ... | ... | ८००० |
| १९१२ | ... | ... | ... | ५५०००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९१३ | ... | ... | ... | ५०२००० |
| १९१४ | (पहिली सहामाही) | | ... | १०५९००० |
| १९१५ | ... | ... | ... | १५६००० |
| १९१६ | ... | ... | ... | ३१०००० |
| १९१७ | (जानेवारी–फेब्रुवारी) | | ... | ५७५००० |

रशियांतील या संपाच्या चळवळीच्या भरतीओहटीचा इतिहास म्हणजे तेथील बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक पक्षांच्या चळवळीचाच इतिहास होय. १९०३ पासून १९१७ पर्यंतच्या चौदा वर्षांत रशियांतील कामगारचळवळींत हे दोनच पक्ष मुख्यतः काम करीत होते. संपाच्या चळवळीला ओहोटी लागली कीं तिच्या पातळ थरावर मेन्शेव्हिकांनीं आपल्या पार्टीची जमवाजमव करावी व क्रांतिकारकांना विरोध करावा. सरकारच्या भयंकर दडपशाहीमुळें व मेन्शेव्हिकांच्या विरोधामुळें विस्कळित झालेल्या बोल्शेव्हिकांनीं पुन्हा जमवाजमव करून क्रांतीची तयारी करावी. याप्रमाणें १५ वर्षेंपर्यंत चालू असलेल्या झगडयांतून डोकें वर काढलेल्या क्रांतिकारकांनीं महायुद्धाच्या संधीचा पूर्ण फायदा घेतला व रशियांतील राज्यसत्ता काबीज केली. इतकेंच नव्हे तर रशियांतील समाजरचनाच आमूलाग्र बदलून टाकली. "युद्धापूर्वी सरकारशीं अविश्रांतपणें व धैर्यानें झगडणारा कामगारसंघ म्हणजे लेनिनच्या भोंवतीं गोळा झालेला क्रांतिकारक कामगारांचा संघ होय." असें महायुद्धापूर्वीच्या कांहीं वर्षांच्या पोलिसखात्याच्या अहवालांत नमूद करण्यांत आले आहे.

१९१४ च्या जुलैंत युरोपला महायुद्धाच्या क्रुसावर लटकावण्याचा प्रयत्न तेथील मुत्सद्दी करीत होते. पेट्रोग्राडमधील वातावरण क्रांतीच्या संतप्त वाऱ्यांनीं भरून गेलें होतें. तिसऱ्या अलेक्झांडरच्या थडग्यावर पुष्पमाला अर्पण करण्याकरितां आलेले फ्रान्सचे अध्यक्ष एम्. पॉंकारे यांचा पेट्रोग्राडमध्यें मुक्काम होता. त्या वेळीं तेथील रस्तोरस्तीं झालेल्या चकमकींचे व राष्ट्रीय जयघोषांचे प्रतिध्वनि त्यांनाही ऐकूं गेले होते. महायुद्धापूर्वींच म्हणजे १९१२ ते १९१४ मध्यें रशियांतील क्रांतिकारक कामगारवर्ग सरकारशीं दोन हात करूं लागला होता. महायुद्ध या वेळीं सुरू झालें

नसतें तर झारची सत्ता या कामगारांनीं उलथून टाकली असती काय, असा प्रश्न विचारण्यांत येतो. या प्रश्नाला उत्तर देणें कठिण आहे. क्रांती-करितां प्रवृत्त झालेली कामगारांची चळवळ क्रांति होईपर्यंत थांबली नसती हें खरें आहे; पण ही गोष्ट घडून येतांना या क्रांतिकारकांना कोणकोणत्या दिव्यांतून जावें लागलें असतें, किती पराभव त्यांना सहन करावे लागले असते, ही क्रांति होण्यास किती काल लागला असता व रशियांतील शेत-कऱ्यांना व लष्करी सैनिकांना आपलेसें करून घेण्याला त्यांना कोणते उपाय योजावे लागले असते, हें सांगणें कठीण आहे. महायुद्ध सुरू झाल्या-बरोबर या चळवळीला प्रथम जोराचा धक्का बसला व क्रांतिकारकांना मागें हटावें लागलें तरी ही पिच्छेहाट पुढें झालेल्या जोराच्या चढाईलाच उप-योगी पडली, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

महायुद्धाचें पहिलें ढोलगें वाजतांच क्रांतिकारकांची चळवळ कोणी-कडच्या कोणीकडे गुप्त झाली. कामगारवर्गांतील चळवळ्या लोकांचीच लष्करांत प्रथम भरती करण्यांत आली. क्रांतीची चर्चा करणाऱ्या लोकां-नाच आपापले कारखाने सोडून आघाडीवर जावें लागलें. संघ करणाऱ्या कामगारांना जबर शिक्षा देण्यांत आल्या. कामगारांचीं वर्तमानपत्रें सरास बंद करण्यांत आलीं. कामगारसंघांची गळचेपी करण्यांत आली. शेंकडों बायकामुलें व शेतकरी कारखान्यांतून कामावर लावण्यांत आले. युद्धाच्या दिवसांत दुसरी इंटरनॅशनल विस्कळित झाली. कामगारांच्या मनांतील राजकीय भावना नष्ट झाल्या. कारखान्यांतील अधिकारी देशाभिमानाच्या गप्पा मारूं लागले. कामगारवर्गांतील पुष्कळ लोकांना त्यांनीं आपले अनु-यायी बनविलें. कामगारांनीं या प्रसंगीं कोणत्याही प्रकारची चळवळ न करतां स्वस्थ वाट पाहातच बसलें पाहिजे, असें त्यांस सांगण्यांत आलें. क्रांतिकारक कल्पनांचा मागमूसही नाहींसा झाला. कामगारांच्या लहान लहान गटांतून क्वचित् प्रसंगीं क्रांतीचें कुजबुजणें ऐकूं येऊं लागलें. युद्धाच्या या आरंभीच्या दिवसांत कामगार मंडळी आपल्याला बोल्शेव्हिक म्हणवून घ्यावयालाही भिऊं लागली होती. आपण बोल्शेव्हिक आहों असें कळलें तर पोलिस आपल्याला पकडतील म्हणूनच आपल्याला बोल्शेव्हिक म्हणवून घेण्यास कामगार तयार नव्हते असें नाहीं, तर मागासलेल्या विचारसरणीचे

कामगार आपल्याला बेदम मारतील या भीतीनेंही कामगार मंडळी आपल्याला बोल्शेव्हिक म्हणवून घेण्यास भिऊं लागली.

महायुद्धामुळें रशियांत बराच नवीन कामगारवर्ग निर्माण झाला होता. खुद्द पेट्रोग्राडमधील कामगारवर्गांत शेंकडा चाळीसवर नवीन कामगारांची भरती झाली होती. क्रांतिकारकांची परंपरा याप्रमाणें एकाएकीं मोडून गेली होती. युद्धापूर्वीं चालू असलेली कामगारांची चळवळ, तसेंच ड्यूमा सभेंत बोल्शेव्हिक प्रतिनिधींनीं चालविलेलें काम लोपून गेलें होतें आणि या सर्व चळवळीची जागा शांततावादानें व देशाभिमानानें पटकावली होती. पण ही स्थिति फार दिवस टिकूं शकली नाहीं. कारखान्यांतील पहिले मजूर लढाईवर पाठवावयाचे व नवीन अध्यांकच्च्या तयार झालेल्या कामगारांकडून तेथील कामें करून घ्यावयाचीं असा प्रकार रशियांत सर्वत्र चालू होता. खेडेगांवांतील हजारों शेतकरी शहरांतील कारखान्यांतून कामावर लावण्यांत आले होते. युद्धावर गेलेल्या लोकांना सर्व प्रकारची सामग्री पुरवावयाची व देशांतील नागरिक जनतेच्या नेहमींच्या गरजा पुरवावयाच्या, यामुळें रशियांतील कारखाने रात्रंदिवस चालू होते. यावेळीं चालू असलेल्या कारखान्यांतून कामें करणाऱ्या मजुरांच्या पिळणुकीला कोणत्याही प्रकारें सीमाच राहिली नव्हती. जीवनावश्यक वस्तु महाग झाल्यामुळें कामगारांना मिळणारें वेतनाचें प्रमाण अर्थात्च कमी झालें होतें. अशा परिस्थितींत मजुरी वाढवून घेण्याबद्दल कामगारांना संप करणें अपरिहार्यच झालें होतें. झालें, कामगारचळवळीनें पुन्हा उचल खाल्ली. याप्रमाणें एकदां संप होऊं लागल्याबरोबर संपवाल्यांच्या सभा होऊं लागल्या. या सभांतून राजकारणविषयक ठरावही पास करण्यांत येऊं लागले. या सभा मोडून टाकण्याकरितां पोलिस सभांतून घुसूं लागले. संपवाल्यांच्या व पोलिसांच्या झटापटी सुरू झाल्या व लोकांची गर्दी मोडण्याच्या निमित्तानें त्यांच्यावर गोळीबारही करण्यांत येऊं लागले. संपाच्या या झगड्याला प्रथम कापडाच्या गिरण्यांमधूनच सुरवात झाली. संपवाल्यांवर करण्यांत आलेल्या गोळीबाराच्या निषेधार्थ इतर कारखान्यांतूनही संप होऊं लागले; आणि या सहानुभूतीच्या संपांत कांहीं ठिकाणच्या पलटणींतील शिपाईही भाग घेऊं लागले. १९१४-१५ मध्यें या संपांना फारसें उग्र स्वरूप

येऊं शकलें नाहीं, पण यापुढें मात्र रशियांत सर्वत्र संपाची बावटळ पसरूं लागली. कामगारांनीं कितीही संप केले तरी त्यांच्या मागण्यांना दाद द्यावयाची नाहीं असेंच जणूं काय रशियांतील कारखानदारांनीं ठरवून टाकलें होतें व नेहमींप्रमाणें सरकारही दडपशाहीच्या जोरावर संप मोडून काढण्याचा प्रयत्न करून त्यांना मदत करीत होतें. या दुहेरी छळणुकीमुळें "चला, आपण सगळे एकदम संप करूं." या सार्वत्रिक संपाच्या कल्पनेचा पुन्हा प्रादुर्भाव झाला आणि या कल्पनेबरोबरच क्रांतीच्या चळवळीलाही पुन्हा जोराची उठावणी मिळाली.

युद्धाच्या प्रारंभींचे कांहीं महिने गेल्यानंतर रशियांतील परिस्थिति बदलत चालली. रशिया क्रांतीकरितां उन्मुख होऊं लागला. लेनिनला रशियांतील या बदलत्या परिस्थितीचें चांगलें ज्ञान होतें. पण या परिस्थितीचा आपल्याला हवा तसा उपयोग करून घेतां येणें मात्र त्याला या वेळीं शक्य नव्हतें. यामुळें आंतरराष्ट्रीय चळवळीकडेच लक्ष पुरविणें त्याला भाग पडलें. महायुद्धाच्या प्रारंभींच्या दिवसांत रशियांत काय किंवा युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही देशांत काय, लष्कराची भरती करणें, युद्धसामग्री तयार करणें व या गोष्टीला अनुकूल अशाच चळवळी करणें, हेंच काम चालू होतें. या दिवसांत युद्धाशिवाय इतर विषयांकडे लोकांचें लक्ष जाणें शक्यच नव्हतें. पण युध्यमान राष्ट्रांतील सैनिक ठिकठिकाणीं खंदक खणून चढाईपेक्षां आत्मसंरक्षणाच्या मार्गांकडेच अधिक लक्ष देऊं लागले. युद्धांतील पहिला जोम नाहींसा झाला व युद्धामुळें उत्पन्न होणाऱ्या आपत्तींना युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील जनतेला तोंड द्यावें लागलें; त्याबरोबर युद्धाचा प्रश्न मागें पडून इतर तात्बडतोबीचे पोटापाण्याचे प्रश्न पुढें आले व त्यांच्या सोडवणुकीकरितां कामगारचळवळीसारख्या चळवळी सर्वत्रच सुरू झाल्या. या स्थित्यंतराचें द्योतक म्हणूनच कीं काय स्वित्झर्लंडमध्यें १९१५ च्या उन्हाळ्यांत एक युवक परिषद् भरली व त्यानंतर लगेच एक महिला परिषद्ही भरली. या परिषदांना फारसे प्रतिनिधी आले नव्हते व जे प्रतिनिधी आले होते ते क्रांतिकारक धोरणाला पाठिंबा देणारे नव्हते. तथापि क्रांतिकारकांबद्दल सहानुभूति वाटणारे बरेच लोक या परिषदांना आले होते. स्वित्झर्लंडमधील समाजसत्तावाद्यांनीं या परिषदांचा फायदा

घेऊन युद्धविरोधी समाजसत्तावादी लोकांची आंतरराष्ट्रीय परिषद् भरविण्याचें ठरविलें. अशा रीतीनें आपलें क्रांतिकारक धोरण जगापुढें मांडण्याची वाढून आलेली संधि लेनिननें दवडली नाहीं व आपले जास्तींत जास्त प्रतिनिधी या परिषदेला हजर राहतील अशी त्यानें खटपट केली.

ही परिषद् सप्टेंबर (१९१५) मध्यें झिमरवॉल्ड नांवाच्या स्वित्झर्लंडमधील एका लहानशा शहरांत भरली. लेनिननें या परिषदेकरितां फारच जोराची तयारी केली होती. झिनोव्हिफच्या मदतीनें लेनिननें या वेळीं "समाजसत्तावाद व युद्ध" या नांवाचें एक पत्रक लिहिलें. युद्धाच्या बाबतींत बोल्शेव्हिकांचें कोणत्या प्रकारचें धोरण आहे हें या पत्रकांत दाखविण्यांत आलें होतें. हें पत्रक म्हणजे बोल्शेव्हिकांच्या कार्यपद्धतीचें दिग्दर्शन करणारा एक जाहीरनामाच होता. फ्रेंच व जर्मन भाषांत या पत्रकाचा लेनिननें अनुवाद करून घेतला. तसेंच या पत्रकाचा इंग्रजी अनुवाद अमेरिकेंत प्रसिद्ध करण्याबद्दलही त्यानें चिकाटीचा प्रयत्न केला; पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. परिषदेकरितां आलेल्या मंडळींपैकीं फक्त नऊ लोकांनीं लेनिनच्या या धोरणाला संमति दिली. इटली, स्वित्झर्लंड, नॉर्वे, स्वीडन, जर्मनी, लाट्व्हिया वगैरे देशांतून आलेल्या प्रतिनिधींपैकीं हे लोक होते. या प्रतिनिधींपैकीं बहुसंख्य प्रतिनिधी केवळ शांततावादीच होते. थोडे कां होईना, आपल्या मताचा पुरस्कार करणारे कांहीं तरी परराष्ट्रांतील समाजसत्तावादी आपल्याला मिळाले, हें पाहून लेनिनला बरें वाटलें. यानंतर हॉलंडमधील समाजसत्तावाद्यांपैकींही कांहीं जहाल मंडळी लेनिनला येऊन मिळाली. हल्लीं चालू असलेलें युद्ध तहकूब करण्याबद्दल आपण चळवळ करूं, राष्ट्राराष्ट्रांत बंधुभाव व समाजसत्तावाद प्रस्थापित करण्यास या झगड्याचा उपयोग होईल, तेव्हां जगांतील कामगारांनीं शांततेकरिता झगडण्यास पुढें यावें, असें ट्रॉट्स्कीप्रभृति समाजसत्तावादी प्रतिनिधींचें म्हणणें होतें. या शांततावाद्यांचें धोरण वरून दिसायला लढाऊ स्वरूपाचें असलें तरी त्यांच्या प्रत्यक्ष कार्यक्रमाचें स्पष्ट दिग्दर्शन त्यांत करण्यांत आलें नव्हतें. या परिषदेकरितां जमलेल्या प्रतिनिधींत आपल्या मताचे लोक थोडे आहेत ही गोष्ट बोल्शेव्हिकांना उघडपणें दिसून आली होती तरी नाउमेद न होतां आपल्या मताबद्दल सहानुभूति वाटणाऱ्या प्रतिनिधींच्या

संमतीनें त्यांनीं वरील जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यावर सर्व क्रांतिकारक समाजसत्तावाद्यांच्या सह्या होत्या. या परिषदेच्या निमित्तानें क्रांतिवादाच्या मतप्रसाराचें एक पाऊल पुढें सरलें ही गोष्टही कांहीं कमी महत्त्वाची नव्हती. आपल्या मताला मान्यता देणाऱ्या प्रतिनिधींची एक आंतरराष्ट्रीय कमिटीही लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं या परिषदे-नंतर निवडून घेतली. इटालियन क्रांतिकारक समाजसत्तावाद्यांनीं या कामीं पुढाकार घेतला. अशा रीतीनें रशियांतील राज्यक्रांतीच्या वेळीं निर्माण झालेल्या 'थर्ड इंटरनॅशनल'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. 'थर्ड इंटर-नॅशनल' या आंतरराष्ट्रीय क्रांतिवादी कामगारसंघाचा याप्रमाणें लहान प्रमाणावर कां होईना प्रारंभ करण्यांत आला. कांहीं दहा बारा क्रांतिवाद्यांनीं केलेला हा प्रयत्न हास्यास्पदच वाटण्याजोगा होता. युरोपांत चालू असलेल्या महायुद्धाच्या नगाऱ्यापुढें या क्रांतिवाद्यांचें तुणतुणें कोण ऐकणार ! तथापि स्वित्झर्लंडमधील आल्प्स पर्वताच्या एका टेकडीवर युरो-पांतील महायुद्धाच्या वावटळीला तोंड देण्याकरितां कांहीं थोड्या मूठभर क्रांतिवाद्यांनीं लाल बावटा उभारला. या वावटळींत तो बावटा कोणाला फारसा दिसला नाहीं. परंतु त्यावेळचें क्रांतिकारी समाजसत्तावाद्यांचें हें कृत्य शौर्याचें होतें यांत शंका नाहीं. महायुद्धाच्या या दिवसांत सर्व राष्ट्रां-तूनच मनुष्यसंहार चालू होता. पूर्व व पश्चिम-विशेषतः पश्चिमेकडील सर्व राष्ट्रें-या युद्धांत गुंतून गेलीं होतीं. फ्लँडर्स, इप्रेस, लूस, नोव्हा चॅपेल वगैरे रणांगणांवर तर भयंकर कत्तली होऊन या दिवसांत जगांतील प्रत्येक राष्ट्रांत पूर्ण एकतंत्री सर्वाधिकारी सत्ता निर्माण झाली होती. युद्धविरोधी सर्व चळवळी दडपून टाकण्यांत आल्या होत्या. युद्धविरोधी समाजसत्ता-वाद्यांना तर बाहेर तोंड काढण्यासही जागा नव्हती. त्यांचीं सर्व पत्रें बंद करण्यांत आलीं होतीं. जर्मनींतील रोझा लक्झेंबर्ग व लिबनेक्ट, स्कॉटलंड-मधील जॉन मॅक्लीन व रशियाच्या ड्यूमा सभेंतील सर्व बोल्शेव्हिक प्रति-निधी वगैरे सर्व युद्धविरोधी समाजसत्तावाद्यांना तुरुंगांत डांबून ठेवण्यांत आलें होतें.

झिमरवॉल्डच्या परिषदेंत लेनिनप्रभृति बोल्शेव्हिकांनीं थोडेसे हातपाय हलविले, पण यामुळें लेनिनचें मुळींच समाधान झालें नाहीं. आपल्या

क्रांतिवादी मतांचा प्रसार फारच मंद गतीनें होत आहे आणि महायुद्धाच्या धामधुमींत आपल्या कार्याचा प्रसार होणेंही अत्यंत कठिण आहे, ही गोष्ट झिमरवॉल्डच्या परिषदेच्या वेळीं लेनिनला पूर्णपणें कळून चुकली. ही परिषद् भरविण्याच्या कामीं व तींत आपलें मत मांडण्याच्या कामीं लेनिन व क्रुप्सकाया यांनीं फारच मेहनत घेतली होती. या परिषदेमुळें प्राप्त झालेल्या संधीचा शक्य तितका फायदा घेतां आला तरी आपल्या आकांक्षा पूर्ण होण्यास बराच कालावधि लागणार या कल्पनेमुळें या पतिपत्नींचें मन अत्यंत उद्विग्न झालें व मनाच्या या असमाधानवृत्तींतच तीं बर्नमधील आपल्या मुक्कामीं परत आलीं. क्रुप्सकायानें लिहिलेली या वेळची आठवण या पतिपत्नींच्या मनःस्थितीवर प्रकाश पाडणारी आहे:–

"झिमरवॉल्डहून परत आल्यानंतर दुसऱ्या दिवशीं आम्ही रोथॉर्न टेकडीवर फिरावयास गेलों. टेकडीवर आम्ही मोठ्या उत्सुकतेनें चढलों. परंतु टेकडीच्या शिखरावर पोंचतांच इलिच्नें एकाएकीं जमिनीवर अंग टाकलें. अस्ताव्यस्तपणें तो तेथें पडला आणि बर्फावरच झोपीं गेला. यानंतर आकाशांत ढग जमून आले व ते विखरूनही गेले. रोथॉर्नवरून आल्प्स पर्वताचा रम्य देखावा दिसत होता. लेनिन तर अगदीं प्रगाढ झोंपला होता. जवळ जवळ एक तासावर तो या स्थितींत निजून राहिला. झिमरवॉल्डच्या परिषदेच्या वेळीं रात्रंदिवस घेतलेल्या मेहनतीनें तो अगदीं थकून गेला होता. या श्रमांमुळें त्याच्यांत कांहींच त्राण उरला नव्हता.... १९१५ च्या पावसाळ्यांत आम्ही नेहमींपेक्षां अधिक तत्परतेनें लायब्ररींत जात असूं. नेहमींप्रमाणें फिरावयासही जात असूं. परंतु सांप्रतच्या या लोकसत्ताक पिंजऱ्यांत आम्हांला कोंडून घेऊन राहावें लागत आहे ही भावना आमच्या मनांतून नाहींशी होत नसे. कोठें तरी दूरवर क्रांतिकारक लढ्याला जोम चढत आहे, जीवनांत खळबळ उडाली आहे, पण तो प्रदेश येथून किती तरी लांब लांब आहे."

१९१६ च्या फेब्रुवारींत तीं झूरिच् येथें राहावयास गेलीं. या ठिकाणीं तीं एका चांभाराच्या चाळींत भाड्यानें राहिलीं होतीं. या चाळींत अनेक राष्ट्रांतील गरीब कामकरी राहात होते. हे सर्व कामकरी युद्धाला कंटाळले होते. युद्धविरोधी चळवळीला त्यांचा पाठिंबा होता व भांडवलवाल्यांनीं

चालविलेल्या या युद्धाला विरोध करून त्यांचा कांटाच काढला पाहिजे, अशीं मतें ते प्रतिपादन करीत होते. झुरिच् येथें असतांना लेनिनजवळची शिल्लक अगदीं संपुष्टांत आली होती. त्यामुळें हीं दोघें पतिपत्नी एका ऑस्ट्रियन बाईनें चालविलेल्या खानावळींत जेवीत होतीं. चोर व वेश्या हें या बाईचें नेहमींचें गिऱ्हाईक होतें. हीं मंडळी अत्यंत साध्या स्वभावाचीं व सरळ माणसें असतात, असें लेनिनला आढळून आलें. बँकांतून कामें करणारे कारकून व शहरांतील अधिकारी ज्या हॉटेलांत जातात त्यांपेक्षां ही मजुरांची गरीब खानावळ लेनिनला अधिक आवडली. शहरांतलि श्रीमंत हॉटेलांतून आढळणारा वाळला शिष्टाचार व ढोंग त्याला या ठिकाणीं आढळलें नाहीं. या सालच्या उन्हाळ्यांत लेनिननें पुन्हा एका परिषदेची तयारी चालविली. १९१५ अखेर सुरू झालेल्या कामगारवर्गांतील चळवळीमुळें युध्यमान राष्ट्रांतील सरकारें घाबरून गेलीं होतीं. कामगारवर्गांत पसरत चाललेल्या असंतोषला तोंड देणें कठिण होत जाणार ही गोष्टही या सरकारांनीं जाणली होती. यामुळें ही परिषद् उघडपणें भरविणें अशक्य होतें. तेव्हां लेनिननें व त्याच्या दोस्तांनीं डोंगराळ मुलुखांतील एका खेड्यांत ही परिषद् भरविण्याचें ठरविलें व सरकारी हेरांना या गोष्टींचा मागमूसही लागून द्यावयाचा नाहीं अशी सर्व प्रकारें काळजी घेण्यांत आली. किन्थॉल येथें एप्रिल महिन्यांत या परिषदेचें अधिवेशन झालें. क्रांतिवादी जहालांचेंच अधिवेशनांत बहुमत असलेलें आढळून आलें. या जहालांचें पुढारीपण अर्थात्च बोल्शेव्हिकांच्याकडे होतें. फ्रेंच, इटालियन व जर्मन समाजसत्तावाद्यांचाच या जहाल पक्षांत मुख्यतः भरणा होता. इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी या देशांतील कोळशाच्या खाणींतून व दारूगोळ्याच्या कारखान्यांतून कामें करणाऱ्या कामगारांनीं संपाचें शस्त्र उगारलें होतें व या देशांतील लष्करांतूनही असंतोष पसरला होता. या परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्या क्रांतिकारक चळवळीचा सर्वत्र जोरानें प्रसार करावयाचा हेंच या परिषदेंत ठरविण्यांत आलें. क्रांतिवादी कामगारपुढाऱ्यांच्या सहीनें जो जाहीरनामा यापूर्वीं प्रसिद्ध करण्यांत आला होता त्यांत साम्राज्यवाद्यांनीं चालविलेलीं युद्धें कायमचीं थांबवावयाचीं झाल्यास क्रांतीशिवाय तरणोपाय नाहीं असें

प्रतिपादन करण्यांत आलें होतें. तेव्हां या क्रांतिकारक मतांचा प्रसार करण्याकरितां वर्तमानपत्रें काढणें, लष्करांतील सैनिकांना व शेतकऱ्यांना या परिस्थितीची माहिती करून देणें, सर्वत्र राजकीय संप घडवून आणण्याची खटपट करणें व संपवाल्या मजुरांच्या सभा, मिरवणुकी वगैरे काढण्याची तजवीज करणें व हीं सर्व कामें गुप्तपणें करणें वगैरे कामांसंबंधाच्या व्यवहार्य सूचना या परिषदेंत बोल्शेव्हिकांतर्फे मांडण्यांत आल्या होत्या. दुसऱ्या इंटरनॅशनलच्या ज्या कमिटीनें झिमरवॉल्ड व किन्थॉल येथील परिषदा भरविण्याची खटपट केली त्या कमिटीचा हेतु आतां साध्य झाला आहे, असें लेनिनला आढळून आलें. प्रत्यक्ष क्रांतीला हात घालणें ही यापुढची पायरी असून त्याकरितां क्रांतिवादी सोशालिस्टांची नवी इंटरनॅशनल (आंतरराष्ट्रीय कामगारसंघ) स्थापन करणें जरूरीचें आहे ही गोष्ट लेनिनला कळून चुकली होती. युध्यमान राष्ट्रांतील श्रमजीवी वर्गांत व लष्करांतील सैनिकांत जो असंतोष पसरला आहे व ज्या मतांचा प्रसार होत आहे त्यावरून जगांत कोठें तरी क्रांति झाल्याशिवाय राहात नाहीं ही गोष्ट लेनिनला पूर्णपणें कळून चुकली होती. त्यामुळें ही आगामी क्रांति व तीमुळें उपस्थित होणारे अनेक प्रश्न यांच्या विचारांत लेनिनचें डोकें गढून गेलें होतें. या क्रांतीनंतर जगांत ताबडतोब समाजसत्तावादाची प्रस्थापना होईल; तसेंच एका नवींनच उदात्त तत्त्वावर जगांतील सर्व समाजांची प्रस्थापना होईल; जगांतील सर्व राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचे हक्क मिळतील; जगांतील शासनसंस्था नष्ट होतील; जुलूम, अन्याय, पिळणूक, उपासमार, दारिद्र्य, बेकारी यांचा मागमूसही राहणार नाहीं; अशा प्रकारच्या निःशासन समाजरचनेचीं मनोराज्यें करून त्यांत गुंग होणाऱ्या व या उदात्त ध्येयाचा प्रचार करणाऱ्या बुखारिन, पिट्कोव्ह, रॅडेकप्रभृति निःशासनवाद्यांवरही लेनिनला या काळांत टीकास्त्र सोडावें लागलें. या महायुद्धांत क्रांतीची ठिणगी पडेल हें खरें, पण या ठिणगीनें पेटलेल्या वणव्यांत सर्वच राष्ट्रांतील साम्राज्यशाही व भांडवलशाही नष्ट होईल असें नाहीं; आणि रशियासारख्या देशांत क्रांति झाली तरी त्या ठिकाणीं शासनसंस्थाच अजीबात नष्ट होईल असें म्हणतां यावयाचें नाहीं. साम्राज्यशाही व भांडवलशाही नष्ट केल्यानंतर कामगारवर्गाची सर्वाधिकारी सत्ता या राष्ट्रांत प्रथम प्रस्थापित व्हावीच लागेल; आणि

ही सत्ता निर्माण झाल्यानंतर शासनसंस्था आपोआपच रोडावून नामशेष होईल. मार्क्स व लेनिनप्रभृति समाजसत्तावाद्यांचा हाच सिद्धान्त होता. शिवाय 'सर्वाधिकारी कामगारसत्ता' निर्माण व्हावयाची असली तरी तिलासुद्धां प्रथम लोकसत्ताक राज्यसंस्थेचाच आधार घ्यावा लागेल व संपूर्ण लोकसत्ताक राज्यपद्धति निर्माण करून जनतेच्या सर्व प्रकारच्या मागण्या पूर्ण कराव्या लागतील, असें लेनिनप्रभृतींचें म्हणणें होतें. युद्धविरोधी केवळ शांततावाद्यांना लेनिननें ज्याप्रमाणें या वेळीं गप्प बसविलें त्याचप्रमाणें जागतिक क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या निःशासनवादी कट्टर जहालांच्या कल्पनेच्या भरीं न पडतां प्रत्यक्ष व्यवहारांत कोणत्या अंशानें आपलें ध्येय साध्य करतां येईल हें त्याला सांगावें लागलें.

स्वयंनिर्णयाच्या हक्काकरितां, लहान राष्ट्रांच्या संरक्षणाकरितां—विशेषतः संस्कृतीच्या रक्षणाकरितां म्हणून सुरू झालेल्या या युद्धांत संकल्पित हेतूला व संस्कृतीला काळिमा लागेल अशींच कृत्यें चालू होतीं. सॉमे नदीच्या हिरव्यागार तीरांवर व कार्पेथियन जंगलांत व इटलींतील आल्प्स पर्वताच्या पायथ्याशीं या युद्धांतील अनेक चकमकी झडल्या. इतिहासांत तोड सांपडणार नाहीं अशीं भयंकर रणकंदनें या प्रदेशांतून माजलीं आणि पराजय व विजय या शब्दांना अर्थच राहिला नाहीं. या युद्धांत झालेल्या मनुष्यसंहारामुळें कोणत्या पक्षाचा पराजय झाला किंवा जय झाला हें सांगतां येत नव्हतें. विजयाला पराजयाचा वास येत होता व पराजय विजयाचें भाकीत करीत होता. या भयंकर रणधुमाळीचा फायदा घेऊन युध्यमान राष्ट्रांतील सैनिकांतून क्रांतीच्या मतप्रसाराचें काम जोरांत चालू होतें. हजारों बेकायदेशीर पत्रकें दोन्ही पक्षांच्या सैन्यांतून वांटलीं जात होतीं. क्रांतिकारकांची चळवळ दोन्ही पक्षांना नको होती व दोघांनाही ती हाणून पाडावयाची होती. असल्या मतप्रचाराचें काम आपल्या लष्करात होऊं द्यावयाचें नाहीं याबद्दल सर्वत्रच कडक बंदोबस्त ठेवण्यांत आला होता. असल्या बंदोबस्तांतूनही आपलें क्रांतिप्रचाराचें कार्य करणाऱ्या दोन जर्मन लष्करी अधिकाऱ्यांना व वीसोगणती शिपायांना किन्थॉल जाहीरनाम्याच्या प्रती लष्करांत गुप्तपणें वांटल्याबद्दल पकडण्यांत आलें व गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. रशियन लष्करांतील एका संबंध पलटणीनें

मिरवणूक काढून व सभा भरवून आपलें युद्धविरोधी मत प्रदर्शित केलें. रशियांतीलच काय, पण इतर देशांतीलही दारूगोळ्याच्या वगैरे कारखान्यांतील कामगार संपामागून संप करीत होते. पण क्रांतिवादी लोकांच्या या प्रयत्नांकडे युध्यमान राष्ट्रांचें मुळींच लक्ष नव्हतें. या प्रयत्नांचा चालू युद्धाच्या प्रसंगीं कांहीं परिणाम होणार नाहीं, अशीच त्यांची समजूत होती. किन्थॉल जाहीरनाम्यासारखे कितीही क्रांतिकारक जाहीरनामे काढले तरी त्यांची त्यांना पर्वा वाटत नव्हती. बर्न व झूरिच्सारख्या शहरांतील ग्रंथालयांत आपला वेळ घालविणाऱ्या लेनिनसारख्या एका बेकार संपादकाबद्दल तर लष्करांतील बड्या बड्या ऑफिसरांना मुळींच भय वाटत नव्हतें. भिकारड्या कारकुनासारखा पोषाख घालून हिंडणारा लेनिन भयंकर क्रांतिकारक असेल व तो कांहीं करूं शकेल याची त्यांना कल्पनाही नव्हती. लेनिनसारख्या क्रांतिवाद्याचें नांव त्यांच्या कानीं पडलें म्हणजे त्याचा ते उपाहासपूर्वक उल्लेख करीत असत. युद्धाच्या कालांत कोणाचेही पत्रव्यवहार फोडावयाचे व कोठेंही युद्धविरोधी व आपल्या पक्षाला विघातक प्रयत्न गुप्तपणें चालू द्यावयाचा नाहीं असा कडेकोट बंदोबस्त असल्यामुळें युध्यमान राष्ट्रांतील सेनापती क्रांतीवादी सोशालिस्ट पुढाऱ्यांना कस्पटासमान लेखत होते. पण इतका बंदोबस्त असूनसुद्धां १९१६ सालच्या उत्तरार्धांत रशियांत बरीच जोराची खळबळ चालू आहे असें युध्यमान राष्ट्रांतील सेनापतींना व मुत्सद्यांना आढळून आलें. झारचे राज्ययंत्र खिळखिळें झालें होतें. रशियांतील सामान्य जनतेच्या असंतोषाला आळा घालण्याच्या कामीं झारची नोकरशाही असमर्थ झाली होती. क्रांतिवाद्यांच्या वाढत्या मतप्रचारास व चळवळीस दडपून टाकण्याचें काम झारचे पोलिस व लष्कर करूं शकत नाहीं असा अनुभव येऊं लागला होता. रशियांतील या परिस्थितीचें ज्ञान इंग्लंड वगैरे दोस्त राष्ट्रांतील मुत्सद्यांना होऊं लागलें होतें व तेथील खऱ्या परिस्थितीचें अवलोकन करण्याकरितां इंग्लंडमधील मुत्सद्यांनीं रशियांत एक दूतमंडळही (मिशन) पाठविलें होतें. महायुद्धाच्या काळांत इंग्लंड वगैरे दोस्त राष्ट्रांना रशियाची चांगलीच मदत होत होती हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. अशा परिस्थितींत रशियांत कोठें खुट्ट झालें कीं त्याची बातमी

आपल्याला लागली पाहिजे अशी व्यवस्था या राष्ट्रांतील सरकारांनीं केलेली होती. ब्रिटिशांच्या गुप्त हेरखात्याच्या यादींत लेनिनचें नांव होतें कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. तथापि लेनिनच्या हस्तकांनीं रशियांत गुप्तपणें चालविलेल्या चळवळीची बित्तंबातमी काढण्याची व्यवस्था इंग्लंडप्रभृति राष्ट्रांनीं केली होती यांत शंका नाहीं. खुद्द झारचें सरकार व इतर दोस्त राष्ट्रांतील सरकारें आपल्या चळवळीच्या पाळतीवर आहेत, ही गोष्ट लेनिन जाणून होता व या मुत्सद्यांप्रमाणें शत्रुपक्षाकडची व आपल्या पक्षाकडची बित्तंबातमी समजून घेणें लेनिन व त्याच्याबरोबरचे स्वित्झर्लंडमधील त्याचे दोस्त यांना भाग होतें. लेनिनचें गुप्त हेरखातें दोस्त राष्ट्रांच्या गुप्त हेरखात्याइतकें सर्वगामी व सर्वतोपरी समर्थ नव्हतें. इतकी व्यवस्था करण्यास लागणारा पैसाही लेनिनजवळ नव्हता. तथापि रशियांतील सर्व प्रकारची खडान् खडा माहिती लेनिनला समजत होती. बर्नच्या ग्रंथालयांत लेनिन बहुतेक सर्व दिवसभर वाचीत असे. पण या वाचनाखेरीज राहिलेल्या विश्रांतीच्या वेळांत लेनिन व क्रुप्सकाया यांचा युरोपभर पसरलेल्या आपल्या सहकाऱ्यांबरोबर मोठ्या प्रमाणांत पत्रव्यवहार चालू होता. रशिया तर राहोच, पण इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, जर्मनी या देशांतील परिस्थितीचीही कच्ची बातमी त्यांना मिळत होती. १९१६ च्या अखेरीस त्यांना मिळालेल्या बातम्यांवरून युध्यमान राष्ट्रांतील बहुजनसमाज युद्धाला निखालस कंटाळला आहे, केवळ लष्करी कडक शिस्तीमुळेंच पलटणींतील शिपाई आपापल्या जागीं थोपून राहिले आहेत, सर्वत्र असंतोष व अशांतता पसरली आहे, गुप्त पत्रकांनीं व सायक्लोस्टाइलवर काढलेल्या गुप्त वर्तमानपत्रांतील क्रांतीच्या मंत्रानें जनतेचीं मनें भारून टाकलीं आहेत आणि 'क्रांति' 'क्रांति' असा एकच शब्द वातावरणांत दुमदुमून राहिला आहे, ही गोष्ट लेनिनला समजून चुकली होती. आणि रशियांतील जनता तर क्रांतीला हपापली आहे याची लेनिनला खात्रीच होती.

# क्रान्तीचा उठाव

१९१७ मार्च *(जुन्या रशियन कॅलेंडराप्रमाणें फेब्रुवारी)च्या पहिल्या आठवड्यांत रशियांत झालेली क्रांति पीटसबर्गमधील कामगारांनीं व सैनिकांनीं घडवून आणली. रशियांत सर्वत्र असंतोष पसरला आहे याची जाणीव झारलाही पूर्णपणें झाली होती व क्रांतीच्या भीतीनें त्याचें मन हादरून गेलें होते. क्रांतीमुळें आपल्यावर येणारें संकट टाळावयाचें असेल तर जर्मनीच्या कैसरबरोबर—आपला पुतण्या कझन विली याच्याबरोबर स्वतंत्रपणें तह करणें अधिक श्रेयस्कर होईल असें झारला वाटूं लागलें होतें. महायुद्धाच्या दिवसांत झार व त्याचें मंत्रिमंडळ कुचकामाचें ठरलें. युद्धाच्या वेळीं आपल्यावर येऊन पडलेली जबाबदारी या लोकांना पूर्ण करतां आली नाहीं हें पाहून रशियांतील सरदारमंडळ झारच्या राजवटीवर रुष्ट झालें होतें व झारला गादीवरून काढून टाकून रशियांत लोकसत्ताक राज्य स्थापन करण्याचा विचार त्यांनीं चालविला होता. झारला पदच्युत करून त्याच्या जागीं दुसऱ्या झारला गादीवर बसवावयाचें ही गोष्ट तितकी सोपी नव्हती. देशांतील बहुजनसमाजाच्या पाठिंब्याखेरीज ही क्रांति घडून येणें शक्य नव्हतें. शिवाय या मार्गांत आणखी एक मोठी अडचण होती. रशियाच्या गादीवर असलेल्या झारवर त्याच्या राणीचें—झारीनाचें—व तिच्या भोंवतालच्या प्रभावळीचें अत्यंत वजन होतें. झार काय किंवा झारीना काय, दोघांचाही जादूटोण्यावर व मंत्रतंत्रावर विश्वास होता आणि रासपुटीन नांवाच्या एका पाद्रयानें आपल्या बुवाबाजीच्या जोरावर झारीनाला आपलीशी करून टाकली होती. झारीना या रासपुटीनला 'मित्र' या नांवानें संबोधित असे. निकोलस झार दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारा होता. झार-

* या दोन कॅलेंडरांत १३ दिवसांचा फरक आहे.

पेक्षां झारीनाच अधिक कर्तबगार होती. पण तीही रासपुटीनच्या मंत्रतंत्राच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें राज्यकारभारांतील सर्व महत्त्वाच्या प्रसंगीं या 'मित्रा'च्या सल्ल्याशिवाय झारीनाचें पाऊल हालत नसे. उत्तर समुद्रामध्यें हॅंपशायर क्रूझर जर्मनीनें बुडविलें. लॉर्ड किचनेरला या क्रूझरबरोबरच जलसमाधि मिळाली. त्या वेळीं किचनेरचा अंत झाला ही गोष्ट रशियाच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत हितावह अशीच झाली असें आपल्या 'मित्रा'चें मत आहे, असें झारीनानें झारला कळविलें होतें. रासपुटीन हा जर्मनीचा हेर आहे असा त्याच्यावर त्या वेळीं कांहीं लोकांनीं आरोप केला होता. पण तो चुकीचा होता. रासपुतीन हा कोणाचाही हेर नव्हता. झार व झारीनाप्रमाणें रशियांतील मोठमोठे जमीनदार व बँकांचे मालकही त्याच्या बुवाबाजीला भारून त्याच्यामागें लागले होते. यामुळें आपल्या या शिष्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याची काळजी त्यानें वाहावी, हें साहजिकच होतें. बुवाबाजी यशस्वी रीतीनें चालवावयाची तर तिला नेहमीं व्यवहारचातुर्याची जोड असावी लागते; आणि रासपुटीनच्या ठिकाणीं हें चातुर्य व मुत्सद्देगिरी असल्यामुळें रासपुटीनें झारीनाला आपल्या मुठींत ठेवलें होतें व झारीनाच्या बळावर झारलाही तो आपल्या मर्जीप्रमाणें खेळवीत होता. १९१७ च्या प्रारंभीं झारच्या सरकारनें जर्मनीशीं स्वतंत्रपणें तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. या महत्त्वाच्या प्रसंगीं रासपुटीनसारख्या 'मित्रा'च्या सल्ल्याची अत्यंत जरूरीच होती; आणि पश्चिमेकडील फ्रान्सप्रभृति लोकसत्ताक राष्ट्रांपेक्षां जर्मनीसारख्या एकतंत्री राष्ट्राशींच संगनमत करणें अधिक हिताचें आहे असाच सल्ला या झारीनाच्या 'मित्रा'नेंही दिला. झारीनानें या 'मित्रा'च्या सल्ल्यावरूनच जर्मनींतील आपल्या नातेवाईक सरदारांशीं तहासंबंधानें गुप्त पत्रव्यवहार चालू ठेवला होता. पण रासपुटीन व झारीना यांचें हें कारस्थान प्रजातंत्र राजशाहीच्या पुरस्कर्त्यांना अर्थात्च आवडलें नाहीं. झारवर वजन असलेल्या या बुवाचें प्रस्थ नाहींसें करण्याकरितां राजघराण्यांतील कांहीं सरदारांनीं व मुत्सद्यांनीं संगनमत करून रासपुटीनचा निकाल लावण्याचें ठरविलें व त्याचा खून करण्यांत आला. रासपुटीनचा कांटा काढल्यावर झार व झारीना यांनाही बाजूला सारण्याचें त्यांनीं

ठरविलें. परंतु ज्याच्या साहाय्यानें ही क्रांति घडवून आणावयाची तो बहुजनसमाज त्यांच्या पाठीशीं नव्हता. रशियांतील कामगार, विद्यार्थी, शेतकरी, सैनिक या राजवाड्यांतील क्रांतीला अनुकूल नव्हते. कोणत्याही सत्ताधीशवर्गाचें राज्य रशियावर यापुढें चालतां कामा नये असेंच या क्रांतिकारी बहुजनसमाजाला वाटूं लागलें होतें. त्यामुळें एक झार काढून टाकून त्या ठिकाणीं दुसरा झार आणण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. रशियांतील जनतेला लाल बावट्याची क्रांति हवी होती.

१९१६ आक्टोबर १६ रोजीं रशियांत संपाची बावटळ उठली त्या वेळीं जनतेची ही मनोवृत्ति उघडपणें दिसून आली होती. जानेवारी ९ (१९१७) रोजीं म्हणजे 'लाल रविवार' दिनानिमित्त तर रशियांतील बहुतेक सर्व शहरांतील कारखाने ओस पडले होते. मास्को शहरांतील मध्यवर्ती चौकांत संपवाल्या कामगारांनीं लाल बावटा उभारून त्याचा जयघोष केला व त्याबरोबरच महायुद्धासंबंधानें आपला तिरस्कार व्यक्त केला.

२३ फेब्रुवारी हा रशियांतील कामगारक्रांतीचा पहिला दिवस होय. आंतरराष्ट्रीय महिलादिन या दिवशीं आला होता व हा दिवस सभा, मिरवणुका, भाषणें व पत्रकें वांटणें वगैरे प्रकारांनीं साजरा करण्याचें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या लोकांनीं ठरविलें होतें. पीटर्सबर्गमध्यें साजरा करण्यांत येणारा हा आंतरराष्ट्रीय महिलादिन रशियन क्रांतीचा पहिला दिवस ठरेल अशी त्या वेळीं कोणालाही कल्पना नव्हती. या दिनानिमित्त कामगारांनीं एक दिवसाचा संप करावा, असें शहरांतील एकाही कामगारसंस्थेनें जाहीर केलें नव्हतें. व्हायबर्ग बरो कमिटी ही कामगारांची लढाऊ बोल्शेव्हिक संस्था या दिवशीं संप करण्याच्या कल्पनेविरुद्ध होती. १९१७ च्या प्रारंभींच्या दिवसांत कामगारांचीं मनें अत्यंत प्रक्षुब्ध झालेलीं होतीं आणि या दिवसांत कोठेंही व कोणत्याही कारणाकरितां संप झाला कीं, त्याचें यादवींत रूपांतर होणार असें उघड उघड दिसत होतें. रशियांतील यावेळची परिस्थिति या लढ्याला अनुकूल नाहीं, कामगारवर्गाची तितकी तयारी झालेली नाहीं, आपला पक्ष हा लढा पुढें चालविण्याइतका समर्थ झालेला नाहीं, लष्करांतील सैनिकांशीं कामगारांचा यावा तितका संबंध आलेला नसून त्यांची या लढ्याला सहानुभूति मिळावयाची

नाहीं, असें वाटल्यावरून या दिवशीं कोणीही संपावर जाऊं नये असें वरील लढाऊ बोल्शेव्हिक कामगारसंघानें ठरविलें होतें व संघाचा हा निर्णय कामगार मान्य करतील असें त्याला वाटलें होतें. परंतु ता. २३ रोजीं संप न करण्यासंबंधाच्या सूचना देण्यांत आल्या असतांही पीटर्सबर्ग-मधील बऱ्याच गिरण्यांतील स्त्रीकामगारांनीं संप पुकारला व शहरांतील धातूंच्या कारखान्यांतील कामगारांनींही या संपांत भाग घ्यावा अशी संप-वाल्या स्त्रियांनीं त्यांना विनंति केली. कोणत्याही प्रकारची पूर्वतयारी नसतांना या संपाला सुरुवात झाली. बोल्शेव्हिकांनीं अत्यंत नाखुषीनें त्याला आपली संमति दिली आणि एकदां संप सुरू झाल्यावर त्यांत मेन्शे-व्हिक काय किंवा बोल्शेव्हिक काय सर्वच पक्षांचे कामगार येऊन मिळाले. कारखाना सोडून संपवाले रस्त्यावर येऊन उभे ठाकल्यावर दुसऱ्या कार-खान्यांतील कामगारांनाही त्यांनीं बाहेर रस्त्यावर बोलवावें, हा संपवाल्यांचा नेहमींचाच रिवाज आहे; आणि या रिवाजाप्रमाणें शहरांत सर्वत्र संप झाले व शेवटीं बोल्शेव्हिकांनीं त्यांना संमति दिली. "संपाचा पुकारा होतांच हातांतलें काम सोडावयाचें व रस्त्यावर येऊन उभें ठाकावयाचें हा धडा कामगारांना पाठ झाला होता. पण याचा परिणाम शेवटीं काय होणार याचा कोणींही विचार केला नव्हता." असें कायुरोव्ह नांवाच्या पीटर्सबर्ग येथील एका कामगारपुढाऱ्यानें लिहून ठेवलें आहे. संप सुरू झाला कीं हजारों संपवाले रस्त्यावर जमा होणार, त्यांच्या मिरवणुकी निघणार व सभा होणार हें साहजिक होतें आणि असें झालें म्हणजे शांततारक्षणाकरितां लष्करी तुकडी बोलावण्यांत येणार हेंही ठरलेलेंच होतें. महायुद्धाचे हे दिवस होते आणि अशा परिस्थितींत कामगारांचे संप, सभा व मिरवणुका शांततेनें कधींही पार पडावयाच्या नाहींत हें ठर-लेलेंच होतें. पण या परिणामांचा कोणींही विचार केलेला नव्हता. २३ फेब्रुवारी रोजीं झालेल्या संपाचा शेवट क्रांतींत होणार असें मात्र कोणा-लाही वाटलें नव्हतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

रशियांतील क्रांतियुद्धाला आरंभ याप्रमाणें समाजाच्या खालच्या वर्गांतून झाला. आपल्यांतील क्रांतिवादी लढाऊ कामगारसंघ संप कर-ण्याच्या विरुद्ध होते तरी सामान्य कामगारांनीं त्या निर्णयाला धाब्यावर

बसविलें व समाजांतील अत्यंत गांजलेल्या या दलित वर्गानें आपखुषीनें संपाच्या या चळवळीला प्रारंभ केला. कापडाच्या गिरण्यांतील स्त्रीकामगारांनीं या संपांत पुढाकार घेतला होता आणि या संपवाल्या महिलांत बहुतेक सर्व लष्करांतील सैनिकांच्याच स्त्रिया होत्या, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या दिवशीं एकंदर स्त्री व पुरुष मिळून ९० हजार कामगार संपांत सामील झाले होते. या पहिल्या दिवशीं संपवाल्यांच्या सभांना व मिरवणुकांना पोलिसांनीं ठिकठिकाणीं विरोध केला. पण या विरोधाला त्यांनीं जुमानलें नाहीं. व्हायबर्ग भागांतीलच मोठमोठ्या कारखान्यांतून प्रथम या संपाला सुरुवात झाली व नंतर पीटर्सबर्गमधील इतर भागांतही या संपाचा वणवा पेटला. या दिवशीं पोलिसांच्या मदतीकरितां लष्करी सैनिकांनाही बोलावण्यांत आलें होतें. पण या सैनिकांच्या व संपवाल्यांच्या कोठेंही चकमकी घडून आल्या नाहींत. महिलांचा एक प्रचंड समुदाय पीटर्सबर्गच्या म्युनिसिपल सभागृहापुढें जमा झाला होता. या जमावांत कामगार स्त्रियांशिवाय इतर स्त्रियाही सामील झाल्या होत्या. या सर्व स्त्रियांनीं आपली भाकरीची मागणी सभागृहांत जमा झालेल्या नगरपित्यांपुढें मांडली. पण नगरपित्यांपुढें अशी मागणी करणें म्हणजे रेड्यापासून दुधाची अपेक्षा करण्यासारखेंच होतें. शहरांत सर्वत्र झालेल्या सभांतून व मिरवणुकांतून लाल बावटे मिरवण्यांत आले. "भाकरी" "भाकरी" असें या लाल बावट्यांवर लिहिण्यांत आलें होतें. एकतंत्री राजसत्तेचा व युद्धाचा कामगारजनतेला कंटाळा आलेला आहे असें दुसऱ्या कांहीं लाल बावट्यांवरील घोषशब्दांनीं जाहीर करण्यांत आलें होतें. याप्रमाणें २३ फेब्रुवारीचा हा दिवस आंतरराष्ट्रीय महिलादिन म्हणून मोठ्या उत्साहानें व यशस्वी रीतीनें साजरा करण्यांत आला. या दिवशीं पोलिसांच्या जुलुमाला कोणीही बळी पडलें नाहीं. पण उद्यां काय होणार याची कल्पना या दिवशीं रात्रीं देखील कोणाला आली नाहीं.

दुसऱ्या दिवशींही चळवळ कमी झाली नाहीं तर उलट दुपटीनें वाढली. २४ फेब्रुवारी रोजीं पीटर्सबर्गमधील अर्धेअधिक कामगार संपावर गेले. या दिवशीं सकाळीं कामगार लोक आपापल्या चाळींतून बाहेर पडले खरे, पण ते कारखान्यांत गेले नाहींत. तर त्यांनीं ठिकठिकाणीं सभा भरविल्या.

नंतर मोठमोठ्या मिरवणुका निघण्यास सुरवात झाली व शहराच्या मध्य-भागाकडे त्या जाऊं लागल्या. "भाकरी" "भाकरी" या घोषशब्दाबरोबर "एकतंत्री राजसत्तेचा निःपात करा", "युद्धाचा धिक्कार असो" यांचाही घोष करण्यांत येऊं लागला. क्रांतिगीतें गात व घोषवचनांची घोषणा करीत हजारों कामगार नेव्हस्कीकडे—शहरांतील मुख्य भागाकडे—चालले. या मिरवणुकींत शहरांतील इतर लोकही सामील झाले व निळ्या टोप्या घातलेले हजारों विद्यार्थीही नंतर या मिरवणुकींत येऊन मिळाले. "आमच्या संपाच्या चळवळीला शहरांतील लोकांची सहानुभूति होती आणि वॉर हॉस्पिटलमधील सैनिकांनीं तर आमचा जयजयकारच केला." असें एका कामगारानें या प्रसंगाचें वर्णन करतांना म्हटलें आहे. वॉर हॉस्पिटल-मधील जखमी सैनिक या संपवाल्यांच्या मिरवणुकीचें हॉस्पिटलच्या खिड-क्यांतून बाहेर तोंड काढून स्वागत करीत होते. परंतु कोसॅक स्वारांनीं मात्र या मिरवणुकीवर वारंवार हल्ले चढविण्यास कमी केलें नाहीं. त्यांचे घोडे घामाच्या फेसांनीं भरून गेले होते. पण या हल्ल्याच्या वेळीं हे स्वार मिरवणुकींतील लोकांवर बेफामपणें व निर्दयपणें तुटून पडत नव्हते हें स्पष्ट दिसून आलें. घोडेस्वार आले कीं जमाव त्यांना वाट करून देत होता व ते निघून गेले कीं पुन्हा एकत्र जमत होता. मिरवणुकींत जमलेल्या लोकांच्या चेहऱ्यांवर भयाचें चिन्ह मुळींच दिसत नव्हतें. "गोळ्या झाडावयाच्या नाहींत असें वचन कोसॅक देत आहेत." अशी कुजबुज मिर-वणुकींत जमलेल्या लोकांत चालू होती. यानंतर शिव्यागाळी करणाऱ्या व अर्धवट झिंगलेल्या सैनिकांची एक तुकडी मिरवणुकींत शिरली व आपल्या हातांतील भाल्यांनीं त्यांनीं कामगारांवर हल्ले चढविले. पण मिरवणुकींत सामील झालेल्या लोकांनीं या हल्ल्याला धैर्यानें तोंड दिलें. "हे लोक गोळ्या झाडणार नाहींत." असे उद्गार ऐकूं येत होते आणि खरोखरींच त्या दिवशीं या सैनिकांनीं या जमावावर गोळ्या झाडल्या नाहींत. या सर्व गडबडींत एक गोष्ट मात्र स्पष्टपणें दिसून आली. ती म्हणजे पोलिस-खात्यांतील शिपाई संपवाल्यांशीं सहानुभूतीनें वागत नव्हते. कोसॅक स्वारांचें वर्तन मात्र याच्या अगदीं उलट दिसलें. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, संपवालेसुद्धां या कोसॅक स्वारांचें "भले रे गड्या" "भले रे गड्या" म्हणून

स्वागत करीत होते. मिरवणुकींतील लोक पोलिसांवर तुटून पडत होते, त्यांच्यावर दगड व बर्फाचे तुकडे फेकीत होते तर लष्करांतील सैनिकांशीं ते अगदीं निराळ्याच प्रकारें वागत होते. शहरांतील लष्कराच्या भागांत या मिरवणुकी पोंचल्या त्या वेळीं कामगार व त्यांच्या स्त्रिया या सैनिकां-बरोबर जणूं काय मित्रत्वाच्या नात्यानेंच बोलत आहेत असें दिसून आलें. संपवाल्यांची संख्या एकीकडे बेफाम वाढत होती तर दुसरीकडे मिरवणुकींत सामील झालेले संपवाले लष्करांतील सैनिकांशीं सलगीनें वागत असलेले दिसत होते. १९१७ सालीं रशियांत सुरू झालेल्या या संपाच्या चळवळींत ही नवीनच गोष्ट दिसून आली. शहरांतील एका भागांतून मिरवणूक जात असतांना संपवाल्यांनीं पोलिसांचा धिक्कार केला व कोसकांची जयजयकार केला. संपवाल्यांनीं असा भेदभाव कां केला असें एका पोलिस अधिकाऱ्यानें एका संपवाल्याला विचारलें असतां "एका पोलिसानें एका संपवाल्या स्त्रीला हातांतील चाबकानें मारलें, त्याबरोबर एक कोसॅक स्वार पुढें आला व त्यानें पोलिसाला तेथून हाकून लावलें." असें त्यानें सांगि-तलें. क्रांतीच्या वेळच्या गंमती म्हणून ज्या गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांपैकींच वरील एक प्रसंग आहे. सँपसोनीव्हस्की नांवाच्या शहरां-तील एका भागांत संपवाले जमा झाले असतां त्यांचा जमाव मोडून टाक-ण्याबद्दल वरच्या अधिकाऱ्यांनीं कोसॅक स्वारांना हुकूम दिला. कोसॅकांनीं अधिकाऱ्यांचा हुकूम तर पाळला, आपली शिस्त तर मोडली नाहीं; पण आश्चर्य हें कीं, ही गर्दी ते मोडूं शकले नाहींत. संपवाल्याचें व कोसॅकांचें या बाबतींत जणूं काय संगनमत झालें होतें असें दिसून आलें. शहरांतील एका रस्त्यावर तर यापेक्षां निराळाच प्रकार घडून आला. संपवाल्यांची मिरवणूक या रस्त्यावर आली त्या वेळीं ती मोडून टाकण्याच्या भरीस न पडतां तिला अडवून धरण्याचें अधिकाऱ्यांनीं ठरविलें व कोसॅक स्वारांची एक तुकडीच्या तुकडी हा रस्ता अडवून उभी करण्यांत आली. कोसॅ-कांची ही फळी फोडून संपवाले पुढें निघून जाणें शक्य नाहीं असें या अधिकाऱ्यांना वाटलें. कोसॅकांनीं अधिकाऱ्यांचा हुकूम शब्दशः पाळला. त्यांनीं शिस्तीचा मुळींसुद्धां भंग केला नाहीं आणि संपवाले त्यांच्या घोड्यां-च्या पोटाखालून जाऊं लागले त्या वेळीं त्यांनीं त्यांना मुळींसुद्धां अडथळा

केला नाहीं. खरोखरींच कोसॅकांच्या घोड्यांनीं या वेळीं संपवाल्यांना पोटाशीं धरलें व त्यांना विजय मिळवून दिला !

कोसॅक स्वार म्हणजे रशियाच्या झारांचे पिढ्यानुपिढ्यांचे अत्यंत विश्वासू नोकर होते. या स्वारांवर झारची अत्यंत मर्जी होती. या स्वारांना हुकूम दिला कीं मागें पुढें न पाहतां निर्दयपणें त्याची अंमलबजावणी होणारच अशी झारच्या लष्करी अधिकाऱ्यांची अगदीं खात्री होती. पण १९१७ च्या क्रांतीच्या प्रसंगीं झारच्या लष्करांतील कोसॅकांच्या तुकडीनेंच प्रथम मार्गे पाय काढला असें दिसून आलें. यावरून कोसॅक या वेळीं क्रांतिवादी बनले होते असें मात्र कोणी समजूं नये. कोसॅक म्हणजे रशियांतील वतनी शिलेदार होते. आपल्या वतनांचा व आपल्या घोड्यांचाही त्यांना अत्यंत अभिमान असे. दुसऱ्यांच्या घोड्यावर ते कधींहि बसावयाचे नाहींत. सामान्य शेतकऱ्यांचा ते नेहमीं तिरस्कार करीत. आपण म्हणजे कोणी थोर लोक आहोंत असें त्यांना वाटत असे. कामगारवर्गावर तर त्यांचा कधींच विश्वास नसे. पण महायुद्धांतील हालअपेष्टांना हे कट्टर सनातनी राजनिष्ठ लोकही कंटाळून गेले होते. शिवाय कोठें कोणताही प्रसंग येवो त्याला तोंड देण्याकरितां या शिलेदारांना प्रथम बोलावण्यांत येत असे. देशांतील कोणत्याही भागांत त्यांना पाठवीत असत. बहुजन-समाजानें चालविलेली चळवळ हाणून पाडण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करण्यांत येत असे. महायुद्धांत तर निरनिराळ्या अघाडीवर त्यांचीच प्रथम रवानगी करून त्यांच्या शौर्याची कसोटी घेण्यांत येत असे. यामुळें हे कोसॅक स्वारही युद्धाला कंटाळून गेले होते. कोणाच्या प्रयत्नानें कां होईना, हें युद्ध बंद झालें तर बरें होईल असेंच त्यांना वाटत होतें. "युद्ध कसें बंद करावयाचें हें तुम्हांला ठाऊक असलें तर तसें वेलाशक करा. आम्ही तुम्हांला मुळींच त्रास देणार नाहीं." असें जणूं काय हे कोसॅक स्वार आपल्या सहानुभूतीच्या वर्तनानें संपवाल्या कामगारांना सांगत होते. झारचें लष्कर अद्याप मोडलें नव्हतें. त्यांतील शिस्त कायम होती. लष्कराचीं सर्व सूत्रें झारच्या अधिकाऱ्यांच्याच हातीं होतीं. संपवाले कामगार मात्र निःशस्त्र होते व "भाकरी"करितां मिरवणुकी काढून ते रस्त्यांतून फिरत होते.

२३ व २४ फेब्रुवारी रोजीं संपवाल्यांना पोलिसांनीं मारण्याऐवजीं पोलिसांनाच संपवाल्यांनीं बेदम मारलें होतें व पोलिसांपैकीं २८ इसम जखमी झाले होते. जनरल खाबालोव्ह यानें या दोन्ही दिवशीं गोळी-बाराचा हुकूम केला नाहीं. या जनरलनें दयाळू अंतःकरणानें वरील प्रकारचें धोरण स्वीकारलें होतें असें मात्र नाहीं. गोळीबार केव्हां करावयाचा व कसा करावयाचा हें सर्व पूर्वींच ठरविण्यांत आलें होतें. पहिल्या दिवशीं म्हणजे ता. २३ रोजीं संपवाल्यांचा बंदोबस्त करण्याचें काम पोलिसांकडेच देण्यांत आलें होतें. ता. २४ रोजीं संपवाल्यांची गर्दी मोडण्या-करितां घोडेस्वारांची योजना करण्यांत आली होती. गर्दी मोडण्याच्या कामीं चाबूक व भाले यांचाच फक्त उपयोग करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. तिसरे दिवशीं संपवाल्यांची संख्याही वाढली व सरकारी अधि-काऱ्यांचें धोरणही बदललें. या दिवशीं २४०००० कामगारांनीं संपांत भाग घेतला होता. समाजांतील अगदीं खालच्या थरावरचे लोक आतां पुढें आले होते. शहरांतील लहान लहान कारखानेही या दिवशीं बंद पडले होते. मोटारवाल्यांनीं व टांगेवाल्यांनींही संप केला होता. मोठमोठ्या व्यापारी पेढ्या बंद पडल्या होत्या. हायस्कुलांतील विद्यार्थीही या संपांत सामील झाले होते. दोनप्रहरीं हजारों कामगार काझान प्रार्थनामंदिर व त्याच्या भोंवतालच्या रस्त्यावर येऊन जमा झाले. रस्त्यावर ठिकठिकाणीं सभा भरविण्यांत येऊं लागल्या व त्या वेळीं पोलिसांबरोबर बऱ्याच चकमकी झडूं लागल्या. तिसऱ्या अलेक्झांडरच्या थडग्याभोंवतीं जमा झालेल्या संपवाल्यांच्या जमावापुढें कामगार वक्त्यांचीं भाषणें होऊं लागलीं. पोलिस घोडदळानें जमा-वावर गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. एक वक्ता जखमी होऊन खालीं पडला. संपांतील कामगारांनीं आज शस्त्रेंही जमा केलीं होतीं. पोलिसांनीं गोळी-बार सुरू केला त्या वेळीं कामगारांनींही आपल्याजवळच्या रायफलींचा उपयोग करण्यास सुरुवात केली. गर्दीमधून आलेल्या गोळ्यांनीं एक पोलिस इन्स्पेक्टर ठार झाला. पोलिसचा मुख्याधिकारी व आणखी कित्येक पोलिस जखमी झाले. बाटल्या, बॉंब, हातबॉंब लष्करी शिपायांवर फेक-ण्यांत आले. कामगारांनीं युद्धाच्या कालांत ही कला हस्तगत केली होती. संपवाले आज सशस्त्र होऊन पोलिसशीं व लष्कराशीं दोन हात करीत

होते तरी लष्करी सैनिक बेफिकीर होते. इतकेंच नव्हे तर पोलिसांनाच ते उलट विरोध करीत होते. तिसऱ्या अलेक्झांडरच्या थडग्यापाशीं पोलिस घोडदळानें जेव्हां संपवाल्यांवर गोळीबार केला, त्या वेळीं कोसॅक स्वारांनीं या पोलिसांवरच एक बंदुकीची फेर झाडली. त्यामुळें या घोडदळानें तेथून पळ काढला. आणि एका ठिकाणीं तर एका कोसॅकनें एका पोलिस इन्स्पेक्टराला आपल्याजवळच्या खंजीरानें ठार केलें. हें पाहून संपवाल्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. याप्रमाणें कोसॅक व पोलिस यांच्यांतच बाचाबाची सुरू झाल्याबरोबर पोलिसखात्याचे सैनिक तेथून निघून गेले व संपवाल्यांच्या जमावावर उघडपणें हल्ला करीनासे झाले. नंतर आणखी एक लष्करी सैनिकांची तुकडी संपवाल्यावर चाल करून आली. आणि आश्चर्य हें कीं, "भाईहो, तुम्ही पोलिसांना मदत करण्याकरितां आला नाहीं ना ?" असा प्रश्न संपवाले त्या तुकडींतील सैनिकांना विचारूं लागले. "पोलिसांना निःशस्त्र करा" अशीच ओरड या वेळीं सुरू झाली. पायदळांतील सैनिकांना आपलेंसें करून घेण्याच्या कामीं संपवाल्यांतील स्त्रीकामगारांनीं बरीच मोठी कामगिरी केली. त्या छातीठोकपणें या सैनिकांच्या तुकडीकडे चालून जात, त्यांच्या रायफली आपल्या हातांत धरीत व "तुमचीं बायनटें खालीं टाका व आमच्यांत सामील व्हा." अशी त्यांना विनंति नव्हे, तर जवळ जवळ हुकूमच करीत. हा सर्व प्रकार पाहून या सैनिकांचीं मनें बावरून जात. त्यांना आपल्या कृत्याची लाज वाटे, त्यांचा निश्चय डळमळीत होई आणि एका सैनिकानें मनाचा निश्चय करून आपल्या बायनटची दिशा बदलली कीं सगळे सैनिक त्याचें अनुकरण करीत. सैनिकांची फळी दुभंगे आणि "भले रे दोस्त" अशा आरोळ्यांनीं सर्व वातावरण दुमदुमून जाई. संपवाले सैनिकांभोंवती जमा होत व आपल्याला येऊन मिळण्याबद्दल त्यांना विनंति करीत.

"पीटर्सबर्गमधील सर्व चळवळ उद्यांपर्यंत थांबलीच पाहिजे." असा निकोलस झारनें जनरल खाबालोव्हला तारेनें हुकूम पाठविला. हा हुकूम हातांत मिळाल्यावर संपवाल्यांना ताळ्यावर आणण्याकरितां खाबालोव्हनें जोराची तयारी केली. संपवाल्यांचा जमाव मोडण्याकरितां ठिकठिकाणीं पुन्हा लष्करी तुकड्या पाठविण्यांत आल्या आणि या तुकड्यांपैकीं एका

तुकडीनें संपवाल्यांच्या विरोधांना न जुमानतां व विनवण्यांना भीक न घालतां एका ठिकाणीं गोळीबार केला. या गोळीबारांत तीन संपवाले ठार झाले व दहा संपवाले जखमी झाले. संध्याकाळच्या सुमारास जनरल खाबालोव्हनें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. "पुढील तीन दिवसांत जे संपवाले कामावर जाणार नाहींत त्यांना युद्धाच्या आघाडीवर पाठविण्यांत येईल." अशी धमकी या जाहीरनाम्यांत दिली होती.

ता. २६ रोजीं रविवार असल्यामुळें सर्व कारखाने बंद होते. यामुळें सर्व कामगार या दिवशीं एकत्र जमा होऊं शकले नाहींत व पोलिसांशीं दोन हात करण्याचा त्यांना प्रसंग आला नाहीं. या दिवशीं शहरांतला नेव्हस्की नांवाचा मधला चौक शांत होता हें पाहून "आज सर्व शहर शांत आहे." अशी तार झारीनानें झारला पाठविली. पण ही शांतता फार वेळ टिकली नाहीं. आदल्या दिवशीं रात्रीं शहरांतील निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या कामगारांपैकीं शंभर कामगारपुढाऱ्यांना पकडण्यांत आलें. यांपैकीं बहुतेक पुढारी क्रांतिकारक संस्थांचे प्रतिनिधी होते. बोल्शेव्हिकांच्या पेट्रोग्राड कमिटीचे पांच सभासदही यांत होते. या सर्व चिन्हांवरून दुसरे दिवशीं सरकार संपवाल्यांवर जोराची चढाई करणार हें उघड होतें. ता. २६ रोजीं बोल्शेव्हिकांच्या व्हायबर्ग कमिटींतील उरलेले सभासद शहराच्या सीमेबाहेरील एका बागेंत जमा झाले व यापुढें कशा रीतीनें संपवाल्यांनीं आपल्या हालचाली चालू ठेवावयाच्या हें त्यांनीं ठरविलें. संपाच्या गेल्या तीन दिवसांत संपवाल्यांचें सामर्थ्य वाढतच गेलें होतें. शहरांतील व्हायबर्ग भाग संपवाल्यांच्या पूर्ण ताब्यांतच आला होता. ता. २५ रोजीं रात्रीं संपवाल्यांनीं ठिकठिकाणच्या पोलिसठाण्यांवर हल्ले करून त्यांची नासधूस करून टाकली होती व कांहीं तुरळक पोलिस ऑफिसरांना ठारही केलें होतें. संपवाल्यांनीं पोलिसठाणीं उद्ध्वस्त केल्यामुळें मुख्य पोलिसठाण्याचा व शहरांतील इतर पोलिसठाण्याचा संबंध तुटला होता. आणि ता. २६ रोजीं सकाळीं केवळ व्हायबर्गच नव्हे तर नेस्की व लिटिंकी हे शहरांतील आणखी दोन भाग क्रांतिकारकांच्या ताब्यांत गेले होते. ता. २६ रोजीं रविवार असल्यामुळें संपवाले सकाळच्या वेळीं एकत्र जमा होऊं शकले नाहींत. पण दिवस जसजसा वर येऊं लागला तसतशी संप-

वाल्यांची रस्त्यांतील गर्दी वाढत चालली व हा सर्व जमाव शहराच्या मध्यभागाकडे जाऊं लागला. संपवाल्यांना शहराच्या मध्यभागाकडे येऊंच द्यावयाचें नाहीं असें आज पोलिस अधिकाऱ्यांनीं ठरविलें होतें. पण त्यांचा निश्चय तडीस जाऊं शकला नाहीं. शहरांतील निरनिराळ्या पुलांवर पोलिसांचा बंदोबस्त ठेवून संपवाल्यांच्या मिरवणुकांना जागजागीं थोपविण्यांत आलें. फेब्रुवारी महिन्यांत नेव्हा नदी बर्फमय होत असते. पुलावरून जाण्यास मज्जाव झाल्यावर संपवाले बर्फमय बनलेल्या या नदीवरूनच पलीकडे जाऊं लागले. त्याबरोबर त्यांच्यावर एकामागून एक बंदुकांच्या फेरी झाडण्यांत आल्या. या गोळीबाराला संपवाल्यांनीं जुमानलें नाहीं. ता. २६ रोजीं शहराचा सर्व नूर बदलून गेला होता. शहरांत जिकडे तिकडे पोलिस व लष्कर यांच्या तुकड्याच तुकड्या ठेवण्यांत आल्या होत्या. संपवाले नेव्हस्कीच्या मधल्या चौकाकडे जसजसे येऊं लागले तसतसा त्यांच्यावर चोहोंकडून गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. या गोळीबाराला अनेक संपवाले बळी पडले व पुष्कळ संपवाले जखमी झाले. अँब्युलन्स मोटारींची येरझार सुरू झाली. या गोळीबाराच्या बातमींत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी होती. ती म्हणजे या गोळ्या कोठून सुटत होत्या व त्या कोण सोडीत होते हें उघडपणें दिसत नव्हतें. गेल्या दोन दिवसांच्या अनुभवानें शहाणे होऊन संपवाल्यांवर उघड उघड हल्ला करण्याचें पोलिसांनीं बंद केलें होतें. इमारतींच्या खिडक्यांमागून, गच्च्यांवरील दरवाजांमागून व मोठमोठ्या खांबांमागून ते संपवाल्यांवर गोळ्या झाडीत होते. संपवाल्यांच्या मिरवणुकी थांबविण्याकरितां पाठविलेल्या लष्करी तुकड्यांचें धोरणही आज बदललेलें दिसत होतें. या तुकड्यांतील सैनिकांनीं आज गोळीबार केलाच पाहिजे असे कडक हुकूम त्यांना देण्यांत आले होते आणि या हुकुमाप्रमाणें या सैनिकांनीं ठिकठिकाणीं बंदुकांच्या फेरी झाडल्या. ता. २६ च्या गोळीबारांत ४० लोक मरण पावले व तितकेच जखमी झाले असें सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. हा आंकडा अर्थात् विश्वसनीय नव्हता. कारण संपवाल्यांनीं किती जखमी लोक उचलून नेले होते याची नक्की संख्या सांगणें कठिण होतें. ता. २६ रोजीं पोलिसांनीं व लष्करी तुकड्यांनीं केलेल्या या

चढाईमुळें संपवाल्यांचा जोर कमी होतो कां वाढीस लागतो हें ठरावयाचें होतें. पण या दिवशीं संपवाल्यांनीं निःशस्त्र असतांही या चढाईला जें निर्भयपणें तोंड दिलें त्यावरून संपवाल्यांचा जोर कमी न होतां उलट तो सारखा वाढतच आहे असें दिसून आलें. जनतेचीं मनें अत्यंत प्रक्षुब्ध झालीं आहेत व हा प्रक्षोभ सारखा वाढत आहे असा रिपोर्ट पोलिस-खात्यातर्फे करण्यांत आला होता व तो बहुतांशीं खराही होता. कारण संपवाल्यांचा जमाव आतां पिछेहाट घेण्यास तयार नाहीं असें ता. २६ रोजीं दिसून आलें होतें. संपवाल्यांनीं या दिवशीं पोलिसांवर उलट सशस्त्र हल्ला चढविला अशांतला भाग नाहीं. आपल्यावर गोळीबार होत आहे असें दिसत असतांही संपवाल्यांचा जमाव रस्त्यावरून हलत नसे. जीव वांचविण्याकरितां मागें पळून जावयाचें हें त्यांच्या मनांतही आलें नाहीं. गोळीबार झाला तरी रस्त्याच्या तक्तपोशीवरच पडून राहावयाचें, रस्त्यावर पसरलेल्या दगडांचा आसरा घ्यावयाचा व रस्त्यावर पडलेल्या बर्फावर डोकें ठेवून स्वस्थ पडून रहावयाचें, अशा प्रकारचें शौर्याचें व धिटाईचें धोरण आज संपवाल्यांनीं स्वीकारलें होतें. लष्करी सैनिक आपल्यावर गोळीबार करीत आहेत हें पाहात असतांही त्यांनीं त्यांच्यावर दगडफेक केली नाहीं किंवा बर्फाच्या तुकड्यांचा वर्षावही केला नाहीं. या सैनिकांचा प्रतिकार न करतां त्यांना आपल्याकडे वळवावयाचें असेंच जणूं काय संपवाल्यांनीं ठरविलें होतें. "शत्रूंवर गोळ्या झाडा." असे झारचे अधिकारी लष्करी सैनिकांना हुकूम देत होते तर "तुमच्या भावाबहिणींवर गोळ्या झाडूं नका." अशा आरोळ्या कामगारांच्या जमावांतून बाहेर पडत होत्या.

संपवाल्यांवर गोळीबार करून त्यांना नामोहरम करण्याचा सरकारचा प्रयत्न चालू होता. निःशस्त्र लोकांची चळवळ हाणून पाडण्यास गोळीबार हा एकच रामबाण उपाय आहे अशी पोलिस अधिकाऱ्यांची खात्री असल्यामुळें गोळीबार करण्याचें प्रमाणही वाढत चाललें होतें. अशा परिस्थितींत कामगारपुढाऱ्यांचीं मनें चलबिचल होऊं लागलीं. ता. २६ रोजीं सायंकाळीं भरलेल्या व्हायबर्ग कमिटीच्या सभेंत या वेळीं संप मागें घेणेंच इष्ट आहे अशी चर्चा सुरू झाली. कामगारपुढाऱ्यांपैकीं कांहींचीं मनें अशा रीतीनें चलबिचल झालीं होतीं खरीं, पण बहुजनसमाज आपल्या

जागेवर अद्याप कटून उभा राहिला होता. त्याचें मन स्थिर होतें. "लष्करांतील तुकड्यांनीं संपवाल्यांच्या जमावाला विरोध केला नाहीं. पोलिस अधिकाऱ्यांच्या हुकुमाप्रमाणें पोलिस सैनिकांनीं वेळोवेळीं उचल खाल्ली असतांही त्यांचें त्यांनीं कांहीं चालूं दिलें नाहीं. यामुळें बहुजनसमाज धीट बनला आहे. गेल्या दोन दिवसांत संपवाल्यांच्या मिरवणुका बिनविरोध पार पडल्या. 'युद्धाचा धिक्कार असो', 'एकतंत्री राजसत्तेचा धिक्कार असो' अशा घोषवाक्यांनीं सर्व वातावरण दुमदुमून गेलें होतें. आणि क्रांतीला सुरुवात झाली आहे, संपवाल्यांचा विजय होत चालला आहे, ही चळवळ हाणून पाडण्याचें सामर्थ्य सरकारी अधिकाऱ्यांत राहिलेलें नाहीं, लष्कर या चळवळीच्या बाजूचें झालें आहे, क्रांतीचा विजय होण्याचा काल समीप आला आहे, कारण या क्रांतिवाल्यांना लष्करी सैनिक उघडपणें जाऊन मिळतील असा रंग दिसत आहे; अशा परिस्थितींत ही चळवळ थंड व्हावयाची नाहीं तर उलट ती सारखी वाढतच जाईल, तिचा विजय होईल व क्रांति घडून आल्याखेरीज राहणार नाहीं." असा रिपोर्ट बोल्शेव्हिकांच्या कमिटींत शिरलेल्या शुर्कानोव्ह नांवाच्या एका गुप्त हेरानें सरकारकडे केला होता. बोल्शेव्हिकांत सामील व्हावयाचें, त्यांच्या कमिट्यांतून निवडून यावयाचें, वेळोवेळीं क्रांतिकारक जहाल भाषणें करावयाचीं, कामगारांना सशस्त्र क्रांति करण्यास उत्तेजन द्यावयाचें आणि उलट सरकारकडे कामगारांच्या चळवळींची कच्ची हकीगत कळवून ती हाणून पाडण्याकरितां गोळीबाराचा सर्रास उपयोग करण्याबद्दल सुचवावयाचें, असलीं कामें करणारे किती तरी गुप्त हेर बोल्शेव्हिकांत शिरले होते आणि या गुप्त हेरांपैकींच एकानें वरील रिपोर्ट सरकारकडे केला होता. बोल्शेव्हिकांतील कांहीं पुढाऱ्यांचीं मनें क्रांतीच्या विजयाबद्दल त्यांना खात्री देत नव्हती. पण सरकारनें बोल्शेव्हिकांत पेरलेल्या या गुप्त हेरांनीं कामगारांच्या मनःस्थितीचें पूर्ण ज्ञान करून घेतलें होतें व क्रांतीचा हा प्रयत्न यशस्वी होणार अशी त्यांना खात्री वाटत होती. गेल्या तीन दिवसांतील लढ्यांत कामगार व लष्करी सैनिक यांच्यातील सलोखा वाढत चालला होता आणि या सलोख्याचें दृश्य चिन्ह म्हणूनच कीं काय ता. २६ रोजीं संध्याकाळच्या सुमारास इंपीरियल गार्डच्या पावलोव्हस्की रेजिमेंटनें बंडाचें

निशाण उभारलें. नेव्हस्की चौकांत जमलेल्या संपवाल्यांवर या पलटणींतील शिकाऊ तुकडीनें गोळीबार केला म्हणून या अत्याचाराच्या निषेधार्थ या रेजिमेंटनें बंडाचें निशाण उभारलें. आपल्यावर गोळ्या झाडण्यांत येत आहेत, पावलोव्हस्की रेजिमेंटमधील तरुण सैनिक हे अत्याचार करीत आहेत अशी बातमी या चौकांत जमलेल्या संपवाल्यांपैकीं कांहीं कामगारांनीं दोन-प्रहरीं या रेजिमेंटच्या बराकींतून जाऊन सांगितली. हें बीं खडकावर पडलें नाहीं. संध्याकाळीं ६ वाजतां या रेजिमेंटमधील चौथ्या तुकडीनें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय आपल्या बराकी सोडल्या व नेव्हस्की चौकांत गोळीबार करणाऱ्या सैनिकांचा समाचार घेण्याकरितां ती त्यांच्या-वर चाल करून गेली. क्रांतियुद्धांत क्रांतिकारकांच्या बाजूनें प्रथम पदार्पण या रेजिमेंटनेंच केलें. वाटेंत या पलटणीची व घोडदळ पोलिसांची चकमक उडाली. सैनिकांनीं या पोलिसांवर बंदुकांच्या फेरी झाडल्या. एक पोलिस व एक घोडा ठार झाला व एक पोलिस व एक घोडा जखमी झाला. ही बंडवाली तुकडी पुन्हा आपल्या बराकींत परत आली व सर्व पलटणच्या पलटण सामील करून घेण्याची तिनें खटपट केली. या खटपटींत बंडवा-ल्यांना यश आलें नाहीं. या तुकडीपैकीं १९ सैनिकांना पकडण्यांत आलें व बाकीचे सैनिक अधिकाऱ्यांना शरण गेले. रात्रीं या तुकडीची मोजदाद करण्यांत आली, त्या वेळीं २१ सैनिक आपल्या रायफलींसह बेपत्ता झालेले आढळून आले. हे सैनिक दुसरीकडे कोठें जाणार ? संपवाल्यांच्या चाळींत ते गुप्तपणें शिरले. त्या ठिकाणीं त्यांना निर्धास्त आसरा मिळाला.

ता. २६ रोजीं सर्वत्र गोळीबार झाले व संपवाल्यांचे मुडदे पाडण्यांत आले हें पाहून झारच्या प्रधानमंडळाला हायसें वाटलें. ता. २७ रोजीं पहाटे रशियाचा त्या वेळचा प्रधान प्रोटोपोपोव्ह यानें आपल्याला मिळाले-ल्या माहितीवरून संपवाल्यांपैकीं कांहीं लोक आतां परत कामावर जाण्यास तयार झाले आहेत असें झारला कळविलें. वस्तुस्थिति अगदीं वेगळी होती. संपवाल्यांपैकीं कोणीही कामावर जाण्यास तयार नव्हता. आदल्या दिवशीं झालेल्या गोळीबारामुळें संपवाले निरुत्साही झाले नव्हते. या गोळी-बाराला कांहीं संपवाले बळी पडले होते. पण गेल्या तीन दिवसांत मिळा-लेल्या अनुभवानें या नुकसानीची भरपाई केली होती. हजारों कामगारांनीं

रस्त्यांतून मिरवणुका काढावयाच्या, मिरवणुकीला विरोध करणाऱ्या शत्रूंशीं दोन हात करावयाचे, लष्करी सैनिकांशीं सलगी करावयाची, घोड्यांच्या पोटाखालून रांगत जावयाचें, पोलिसांवर हल्ले करावयाचे, गोळीबार सुरू झाल्याबरोबर त्याला न भितां आपल्या जागेवरच कटून राहावयाचें, कधीं कधीं बाजूला होऊन सैनिकांना व घोडेस्वारांना रस्ता करून द्यावयाचा, निरनिराळ्या चव्हाट्यांवर गोळीबारास बळी पडलेल्या संपवाल्यांचीं प्रेतें तेथेंच टाकून पुढें चालूं लागावयाचें, पोलिसांवर उलट हल्ले चढवून त्यांचीं हत्यारें हिसकावून घ्यावयाचीं, अशा प्रकारच्या अनेक हालचालींमुळें संपवाल्यांना आपल्या सामर्थ्याबद्दल आतां विश्वास वाटूं लागला होता. रात्र पडली म्हणजे हे संपवाले आपल्या चाळींत परत येत व दिवसभर झालेल्या दंगलींत आपण काय मिळविलें याचा विचार करीत. ता. २७ रोजीं म्हणजे क्रांतीच्या चौथ्या दिवशीं–रात्रीं वरीलप्रमाणें संपवाले जेव्हां आपल्या बिऱ्हाडीं आले त्या वेळीं आपण आज शत्रुपक्षाशीं समानतेनें झगडलों, दोन्ही पक्षांचें आज सारखेंच नुकसान झालें असें त्यांना आढळून आलें.

ता. २८ रोजीं सकाळीं संपवाले पुन्हा रोजच्याप्रमाणें कारखान्यांसमोर जमा झाले व या ठिकाणीं झालेल्या सभांतून संपाचा लढा तसाच पुढें चालू ठेवावयाचा असें ठरविण्यांत आलें. बोल्शेव्हिकांच्या व्हायबर्ग कमिटीनें संपाचीं सगळीं सूत्रें आतां आपल्या हातीं घेतलीं होतीं व हा संप असाच पुढें चालू ठेवण्याचा निश्चय तिनें केला होता. व्हायबर्गप्रमाणें शहरांतील इतर भागांतल्या संपवाल्यांनींही हाच धडा गिरविला. संपाचा लढा आजही सुरू ठेवावयाचा म्हणजे सशस्त्र बंडालाच सुरुवात करण्यासारखें होतें. पण या गोष्टीची कोणालाच जाणीव झालेली दिसत नव्हती. बहुजनसमाज क्रांतीला प्रवृत्त झाला असतां वेळोवेळीं या समाजाच्या भावना ओळखून त्यांना पुढला मार्ग दाखवून द्यावयाचा व त्यांचें नेतृत्व पत्करावयाचें ही कला श्लियाप्निकोव्ह, झालुट्स्की व मोलोटोव्ह वगैरे बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती मंडळांतील सभासदांनाही साध्य झालेली नव्हती. जनतेच्या भावना ओळखून त्यांना योग्य वळण देण्याचें काम फक्त लेनिनच करूं शकला असता. लेनिनचा या बाबतींत हातखंडा होता. पण

लेनिन या वेळीं पेट्रोग्राडमध्यें नव्हता. केरेन्स्की, चीड्झे व स्कोबेलेव्ह वगैरे सनदशीर चळवळीचे पुरस्कर्ते संपवाल्यांच्या भोंवतीं घुटमळत होते व क्रांतिवादी कामगारांनीं पतकरलेलें हें धोरण धोक्याचें आहे असें जाहीर करून या चळवळीला ते विरोधच करीत होते. बोल्शेव्हिकांपैकीं कांहीं मंडळी संपाचीं सूत्रें हलवीत होतीं; तथापि ही सर्व चळवळ कामगारांनींच स्वतः चालविली होती. क्रांतिवाल्या कामगारांचें नेतृत्व स्वीकारण्याचें सामर्थ्य पेट्रोग्राडमध्यें त्या वेळीं हजर असलेल्या कोणत्याही कामगारपुढाऱ्यांत नव्हतें. अशा परिस्थितींत ठिकाठिकाणचे संपवाले आपल्याला जें सुचेल तें करीत होते. लष्करांतील सैनिकांनीं आपल्याला येऊन मिळावें असा एक जाहीरनामा ता. २६ रोजीं शहरांतील एका भागांतल्या कामगारांनीं काढला होता व तो ता. २७ रोजीं शहरच्या सर्व भागांतून वांटण्यांत आला होता. हा जाहीरनामा बाहेर पडल्यानंतर बोल्शेव्हिक मध्यवर्ती मंडळांतील एक सभासद श्लियाप्निकोव्ह यानेंही एक अशाच अर्थाचा जाहीरनामा काढला. सामान्य कामगारांनीं आपल्या जबाबदारीवर एखादें कृत्य करावें व नंतर पुढाऱ्यांनीं त्याची री ओढावी असाच जणू काय त्या वेळीं रिवाज पडला होता. श्लियाप्निकोव्ह याचें कृत्य त्यापैकींच होतें./

ता. २७ हा दिवस क्रांतिवाल्यांच्या दृष्टीनें अत्यंत आणीबाणीचा गेला. ठिकठिकाणीं मशीन गन्स लावून व त्यांच्या फेरी झाडून कामगारांचीं गर्दी उधळून लावावयाची असा प्रकार आज सर्वत्र चालू होता. या गोळीबाराला तोंड द्यावयाचें म्हणजे आपल्यापाशींही असल्याच तोफा असावयास पाहिजेत असें संपवाल्यांना वाटूं लागलें होतें. पण त्या मिळवावयाच्या कोठून व कशा! आपल्या चळवळीला यशस्वी करावयाचें असल्यास कामगारांनीं मशीन गन्स ताब्यांत तरी घेतल्या पाहिजेत किंवा मशीन गन्सच्या माऱ्यापुढें या बंडाची वाताहत तरी करून घेतली पाहिजे असा प्रसंग या दिवशीं बंडवाल्यांवर येऊन ठेपला होता. पण बंडवाल्यांना या वेळीं मशीन गन्ससारखीं अस्त्रें मिळवून दिल्यास संपवाल्यांचें व लष्कराचें उघड उघड युद्ध सुरू होईल आणि हा रक्तपात एकदां सुरू झाला म्हणजे त्याला शेवटपर्यंत संपवाल्यांना तोंड देतां यावयाचें नाहीं अशा विचारानें श्लियाप्निकोव्हनें कामगारांची ही मागणी नाकारली. श्लियाप्निकोव्हचा

दूरदर्शीपणा खरोखरीच हिताचा ठरला. मशीन गन्सच्या माऱ्याखालीं या दिवशीं संपवाल्यांचा धुव्वा उडाला खरा, पण त्यामुळें लष्करांतील सैनिकांचे डोळे उघडले. क्रांतिवादी कामगारांच्या चळवळीचा धुव्वा उडवून आपण आपल्या पायावरच धोंडा पाडून घेत आहों असें या सैनिकांना वाटूं लागलें व त्याचें प्रत्यंतर म्हणूनच कीं काय दुसरे दिवशीं सकाळीं राखीव पलटणी (रिझर्व गार्ड)मधील तुकड्यांनीं बंडाचें निशाण उभारलें. लष्करांतील सैनिकांनीं संपवाल्यांवर गोळीबार केलेच पाहिजेत असे कडक हुकूम सुटले होते व शहरांत सर्वत्र पसरलेल्या संपवाल्यांवर सर्रास गोळीबार व मशीन गन्सच्या फेरी चालू होत्या व कामगारांच्या बायका, आया, बहिणी व त्यांचे प्रेमीजन या गोळीबाराला धैर्यानें तोंड देत होते. संपवाल्यांच्या या घडाडीनें व शौर्यानें वरील राखीव पलटणीमधील सैनिकांचीं मनें हळहळलीं व पावलोव्हस्की रेजिमेंटमधील सैनिकांप्रमाणें त्यांनींही बंडाचें निशाण उभारलें. व्हॉलिन्स्की रेजिमेंटमधील सैनिकांनीं या बंडांत प्रथम पुढाकार घेतला. ता. २७ रोजीं सकाळीं ७ वाजतां ज्या शिकाऊ लष्करी तुकडीवर जनरल खाबालोव्हचा अत्यंत विश्वास होता त्या तुकडीनें वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूम मानण्याचें नाकारलें, आपल्या कमांडरला त्यांनीं ठार केलें व आपल्या भोंवतालच्या पलटणींच्या बराकींकडे जाऊन त्यांनीं तेथील सैनिकांनाही बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. संपवाले ज्याप्रमाणें शेजारच्या कारखान्यापुढें जाऊन तेथील कामगारांना संपावर आणीत त्यापैकींच हाही प्रकार होता. व्हॉलिन्स्की पलटणींतील या तुकड्यांनीं आपल्या रायफली वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्याचें नाकारलें. एवढेंच नाहीं तर या बंडखोरांनीं लिटोव्हस्की व प्रेओब्राझेन्स्की येथील पलटणींतील सैनिक फोडले व या सर्व सैनिकांनीं मिळून पोलिसांच्या बराकींवर हल्ला चढविला व त्यांची धुळधाण उडविली. याच दिवशीं दोनप्रहरीं पेट्रोग्राडच्या सर्व मुख्य मुख्य रस्त्यांवर रणधुमाळी माजली. या रणधुमाळींत कोण कोणावर गोळीबार करीत होते हें सांगणें कठीण होतें. दोन्ही पक्ष एकमेकांवर गोळ्या झाडीत होते. संपवाल्यांतील तरुण मुलेंही आपल्या हातीं अकस्मात् आलेल्या रिव्हॉल्व्हरांच्या फेरी झाडीत होतीं. सरकारचे दारूगोळ्याचे कारखाने व शस्त्रा-

गारें बंडवाल्यांनीं काबीज केलीं. हजारों ब्राउनिंग पिस्तुलें तेथून नेण्यांत आलीं अशीही बातमी या वेळीं उठली होती. कांहीं कांहीं ठिकाणीं संपवाले व सरकारचे लष्करी सैनिक यांच्यांत प्रत्यक्ष हातघाईच्या चकमकी झडल्या. शहरामध्यें याप्रमाणें संपवाले व लष्करी सैनिक यांच्यांत रणधुमाळी चालू होती तर या बातम्या ऐकून तिकडे सरकारच्या राखीव पलटणींतील तुकड्या बंडाचें निशाण उभारीत होत्या. ठिकठिकाणच्या लष्करांतील सैनिकांनीं बंडें पुकारावयाची अशी जणूं सांथच या वेळीं उठली होती. सायंकाळच्या सुमारास प्रसिद्ध सेमेनोव्हस्की रेजिमेंटमधील सैनिक बंडवाल्यांना येऊन मिळाले. १९०५ सालीं याच पलटणीनें त्यावेळच्या क्रांतिकारकांना नेस्तनाबूद केलें होतें. ३ डिसेंबर १९०५ रोजीं याच रेजिमेंटमधील सैनिकांनीं पहिल्या पेट्रोग्राड सोव्हिएटच्या सभासदांना अटक केली होती. इतर सर्व लष्कर बंडवाल्यांना जाऊन मिळालें, पण ही रेजिमेंट कधींही असलें कृत्य करणार नाहीं अशी लोकांची समजूत होती. पण आश्चर्य हें कीं, ही रेजिमेंट १९१७ सालीं पहिल्या पांच दिवसांच्या क्रांतीच्या धुमाळींत क्रांतिकारकांना येऊन मिळाली. १९०५ ची क्रांति होऊन ११ वर्षें होऊन गेलीं होतीं, पण या अकरा वर्षांत क्रांतिवादी कामगारांनीं चालू ठेवलेली चळवळ फुकट गेली नव्हती. याप्रमाणें सेमेनोव्हस्की रेजिमेंटच काय तर शहराच्या रक्षणाकरितां ठेवलेले सर्व १५०००० लष्कर या दिवशीं हळू हळू क्रांतिकारकांना येऊन मिळालें.

शहरांतल्या सर्व लष्करी पलटणी याप्रमाणें बंडवाल्यांना सामील झाल्या हें पाहिल्यावर शहरांतील टेलीफोनची इमारत, लिटोवस्की किल्ला व मॅरिन्स्की राजवाडा यांच्या संरक्षणाकरितां क्रॉन्स्टॅटहून राजनिष्ठ लष्करी तुकड्या पाठवाव्या अशी तार जनरल खाबालोव्हनें तेथल्या कमांडरला पाठविली; पण खुद्द क्रॉन्स्टॅट किल्लाच आपल्या ताब्यांत राहतो कीं नाहीं अशी भीति उत्पन्न झाली आहे, असें त्या कमांडरकडून उलट उत्तर मिळालें.

ता. २७ रोजीं संपवाल्यांनीं शहरांतील तुरुंगाचे दरवाजे खुले केले व सर्व राजकीय कैद्यांना मुक्त केलें. जनरल खाबालोव्हनें ४८ तासांपूर्वीच ज्या कामगारपुढाऱ्यांना तुरुंगांत खेंचलें होतें ते बोल्शेव्हिकांचे व मेन्शेव्हिकांचे पुढारीही या वेळीं बाहेर आले. तुरुंगांतून बाहेर पडल्याबरोबर मेन्शेव्हिक

पुढारी ड्यूमा सभेकडे रवाना झाले व बोल्शेव्हिक पुढारी शहराच्या निरनिराळ्या भागांतील कामगारांना व सैनिकांना जाऊन मिळाले. पेट्रोग्राड राजधानी पूर्णपणें क्रांतिकारकांच्या ताब्यांत घेण्याचें काम या पुढाऱ्यांना करावयाचें होतें. शत्रूला श्वास घेण्याइतकाही अवकाश न ठेवतां क्रांतीचें कार्य पुरें करण्याचा त्यांनीं निश्चय केला होता. बंडखोर लष्करी तुकड्यांना बरोबर घेऊन टॉरीड राजवाडा काबीज करण्याची कल्पना कोणीं काढली हें सांगतां येत नाहीं, पण उत्साहाच्या भरांत क्रांतिकारकांनीं हा राजवाडाही आपल्या ताब्यांत घेतला.

याप्रमाणें सर्व राजधानी आपल्या कबजांत घेतल्यानंतर क्रांतिकारकांनीं आपल्या शत्रूंचा मागमूस लावून त्यांना कैद करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें शेकडों लोक केवळ संशयावरून अटकेंत ठेवण्यांत आले. स्टेट कौन्सिलचे अध्यक्ष, प्रधानमंडळाचे सभासद, पोलिस अधिकारी, गुप्त पोलिसखात्यांतील लोक वगैरे कैद केलेल्या लोकांच्या रांगाच्या रांगा टॉरीड राजवाड्यांत दाखल होत होत्या. प्रोटोपेपोव्हसारखे प्रधानमंडळाचे सभासद आपण होऊन क्रांतिकारकांच्या स्वाधीन झाले. कारण तसें करणेंच या वेळीं सुरक्षितपणाचें होतें. याप्रमाणें पांच दिवसांच्या या क्रांतींत झार, त्याचे दरबारी, त्याचें सरदारमंडळ व त्याचे सेनापति यांची सत्ता धुळीस मिळविण्यांत आली. जनरल खाबालोव्ह व त्याचे विश्वासू व खात्रीचे लष्करी अधिकारी आरमार-खात्याच्या जागेंत जाऊन बसले. त्यांच्या बिऱ्हाडाभोंवतीं मशीन गन्स, रायफली व हातबॉंब यांचा ढिगारा पडला होता. लष्कराची नोकरी सोडून जे सैनिक क्रांतिकारकांना जाऊन मिळाले त्यांच्यापैकीं कांहीं सैनिकांनीं आपल्याजवळचीं हीं शस्त्रास्त्रें आपल्या सेनापतीपाशीं सुपूर्त केलीं होतीं.

ता. २८ फेब्रुवारीं रोजीं सकाळीं बोल्शेव्हिकांच्या सेंट्रल कमिटीनें रशियांतील जनतेला उद्देशून एक जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्याच्या शेवटीं पुढील घोषवचनें घालण्यांत आलीं होतीं:— "क्रांतीच्या लढ्यांत सामील व्हा. श्रमजीवी वर्गांतील सर्व लोकांनीं या लढ्यांत सामील झालें पाहिजे. क्रांतीचा लालबावटा रशियांत आज सर्वत्र फडकत आहे. लोकसत्तात्मक प्रातिनिधिक सत्ता चिरायु होवो. क्रांतीकारी कामगारवर्ग चिरायु होवो! क्रांतिकारी लोक व क्रांतिकारी सैनिक चिरायु होवोत!"

क्रांतिकारकांची ही चळवळ सुरू झाली त्या वेळीं झारीनानें निकोलस झारला एक पत्र लिहिलें होतें. "रस्त्यांतून इकडे तिकडे आरोळ्या ठोकीत फिरावें यापेक्षां जास्त चांगलें काम करण्याचें ज्यांना माहीत नाहीं अशा कांहीं तरुण मुलांनीं व मुलींनीं सुरू केलेला हा उडाणटप्पूपणाचा धंदा आहे." असें तिनें त्या पत्रांत म्हटलें होतें. "रशियांतील हवाच अलीकडे फार खराब झाली आहे व त्यामुळेंच या तरुण–तरुणींचीं माथीं बिघडलीं आहेत." असें या पत्रांत शेवटीं तिनें आपलें मत व्यक्त केलें होतें.

रशियांतील हवा खराब झाली आहे याची बातमी रशियाच्या सरहद्दीवर फार उशीरां पोंचली. सरहद्दीवर खंदक खणून व त्यांत पडून राहून शत्रुसैन्याला तोंड देणाऱ्या सैनिकांना तर ती फारच उशीरां मिळाली. सेन्सॉर खात्यानें ही बातमी बाहेर पडूं न देण्याची अतिशयच खबरदारी घेतली होती. स्वित्झर्लंडमधील निर्वासितांना ही बातमी समजली त्या वेळीं तर त्यांना आश्चर्यच वाटलें. २२ जानेवारीं रोजीं स्विस यंग सोशालिस्टांपुढें '१९०५ ची क्रांति' या विषयावर लेनिनचें एक व्याख्यान झालें. रशियांत आणखी एक क्रांति होणार आहे, १९०५ च्या क्रांतीपेक्षां अगदीं भिन्न स्वरूपाची ही क्रांति होणार आहे असें लेनिननें या व्याख्यानांत सांगितलें. पण त्या वेळीं त्याला काय वाटलें कोणाला ठाऊक "आम्ही जुन्या पिढीचीं माणसें या आगामी क्रांतीची रणधुमाळी पाहण्यास जिवंत राहतो कीं नाहीं!" असे संशयाचे उद्गार त्यानें त्या वेळीं काढले. जागतिक युद्धाचे वेळीं साम्राज्यवाद्यांचें प्रगट झालेलें सामर्थ्य, त्यांचीं अवाढव्य लष्करें, त्यांचे कर्तबगार सेनापती, त्याचप्रमाणें या साम्राज्यवादी राष्ट्रांतील मुत्सद्यांनीं आपापल्या राष्ट्रांतील कामगारवर्गावर बसविलेली छाप, कैसर व किंग जॉर्ज यांच्या पुरस्काराखालीं व त्यांच्या नांवानें निघालेल्या समाजवाद्यांच्या संस्था, या सर्वांपुढें झिमरवॉल्ड व किन्थॉल येथें जमलेल्या आंतरराष्ट्रीय क्रांतिवादी समाजवाद्यांच्या गटांचा काय पाड, असे विचार लेनिनच्या मनांत कदाचित् आले असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

जागतिक युद्धाचा पहिला भर ओसरला होता व ठिकठिकाणच्या क्रांतिकारांना आपले हातपाय हलविण्यास थोडी सवड मिळूं लागली

होती. लेनिनचें चित्त पूर्णपणें वेधून टाकील इतकें व्यापक स्वरूप आत या खळबळीला प्राप्त झालें होतें. लेनिनचें लेखनकार्य पूर्वीप्रमाणेंच चालू राहिलें होतें. झूरिच् येथील ग्रंथालयांत बसून कार्ल मार्क्स व एंजल्स यांच्या ग्रंथांतील उतारे तो आपल्या नोटबुकांत टिपून घेत होता. जानेवारी-अखेरपासून रशियांत थोडयाफार प्रमाणांत कामगारांच्या चळवळीला प्रारंभ झाला होता. पण लेनिनसारख्या निर्वासितांना या बाबतींत कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें. त्यामुळें फेब्रुवारी सुरू झाला—ज्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत रशियांत क्रांतीचा स्फोट झाला तो महिना सुरू झाला तरी लेनिनचें मार्क्स व एंजल्स यांच्या ग्रंथांतील उतारे टिपून घेण्याचेंच काम चालू होतें. थोडयाच दिवसांत आपल्याला हे उतारे टिपलेलें नोटबुक दूर फेकून द्यावें लागेल याची लेनिनला या वेळीं कल्पनाही नव्हती. फेब्रुवारी २३ पासून २८ तारखेपर्यंत पेट्रोग्राड शहरांत क्रांतिवादी कामगारांनीं रणधुमाळी माजविली ही बातमी लेनिनला केव्हां समजली हें नक्की सांगतां येत नाहीं. बहुधा मार्च १५ च्या सुमारास त्याला ही बातमी समजली असावी. लेनिन व क्रुप्सकाया यांना जेव्हां ही बातमी समजली त्यावेळचें मजेदार वर्णन क्रुप्सकायानें आपल्या एका आठवणींत केलें आहे.

"आमचें जेवण उरकलें होतें. लेनिन लायब्ररींत जाण्याच्या तयारींत होता. भांडीं घासण्याचें व विसळण्याचें माझें काम संपत आलें होतें. इतक्यांत ब्रॉन्स्की आंत धांवत आला. 'काय तुम्हांला ही बातमी समजली नाहीं? रशियांत क्रांति झाली!' असें तो म्हणाला व वर्तमानपत्रांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अंकांतून आलेल्या बातम्या तो सांगूं लागला. ब्रॉन्स्की ही बातमी सांगून घराबाहेर गेला व आम्हींही सरोवरावर गेलों. सरोवराच्या कांठीं लावलेल्या बोर्डावर ताजीं वर्तमानपत्रें टांगून ठेवण्यांत आलीं होतीं. त्यांतील तारा आम्हीं पुनःपुन्हा किती वेळां तरी वाचल्या. रशियांत खरोखरच क्रांति झाली होती. इलिच्च्या मनाची तर अत्यंत खळबळ उडून गेली होती. आम्हीं तो सर्व दिवस व रात्र कशी घालविली हें मला आठवत नाहीं."

दुसऱ्या दिवशीं काय तारा येतात हें पाहण्यास लेनिनचें मन अत्यंत

उतावीळ झालें होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या तारा वाचल्याबरोबर स्टॉकहोम येथें असलेल्या अलेक्झांड्रा कोलोन्टाई इला त्यानें एक पत्र लिहिलें. रशियांतील क्रांतीसंबंधाच्या तारा वाचल्याबरोबर त्याच्या मनावर त्यांचा पहिल्यांदा काय परिणाम झाला याची कल्पना या पत्रांतील पुढील उताऱ्यावरून येण्यासारखी आहेः—"पेट्रोग्राडमध्यें १४ मार्चच्या क्रांतीसंबंधाच्या सरकारी तारांचा दुसरा हप्ता प्रसिद्ध झाला आहे. कामगार लोकांनीं एक आठवडाभर रक्तपाताच्या लढाया चालविल्या आहेत. तथापि मिल्युकोव्ह अधिक गुच्कोव्ह अधिक केरेन्स्की हेच सत्ताधिकारी बनले आहेत ! हा सर्व जुना युरोपियन नमुना आहे......असो. पण त्याची फिकीर करण्याचें कारण नाहीं. युद्धांतून उद्‌भूत झालेल्या पहिल्या क्रांतीची ही पहिली पायरी आहे. क्रांतीचा हा उठाव शेवटचा नाहीं किंवा तो रशियापुरताच थांबून राहील असेंही नाहीं.........सेकंड इंटरनॅशनलच्या धोरणानें ही क्रांतीची चळवळ कधींही चालतां कामा नये. कॉट्स्कीच्या धोरणाबरहुकूम ही चळवळ कधींही चालतां कामा नये... यापुढें लोकसत्ताक मतांचाच प्रचार करण्यांत आला पाहिजे; साम्राज्यशाहीविरुद्ध आतां यापुढें युद्ध सुरू झालें पाहिजे; सर्व क्रांतिकारक चळवळींचा प्रसार याच धोरणानें झाला पाहिजे. आंतरराष्ट्रीय कामगार क्रांतीच्या धोरणानें यापुढील चळवळी व यापुढील लढे चालविण्यांत आले पाहिजेत; कामगार सोव्हिएटांच्या (पंचांच्या) प्रतिनिधींच्या हातीं सर्व राज्यसत्तेचीं सूत्रें येतील याच दृष्टीनें यापुढील सर्व चळवळी चालल्या पाहिजेत.... १९०५ च्या प्रचंड क्रांतीनंतर १९१७ सालीं ही यशोदायी क्रांतीची चळवळ सुरू झाली आहे."

रशियांतील क्रांतीच्या बातम्या एकामागून एक धडकूं लागल्यानंतर ग्रंथालयांत जाण्याला लेनिनला आतां कोठली फुरसत मिळणार ! यापुढें आतां ग्रंथालयें बाजूला पडलीं. क्रांतीच्या बातम्यांनीं लेनिनचें मन भारून गेलें. क्रांतीची चळवळ आपल्या धोरणाप्रमाणें कशी चालवावी याचा विचार करण्यांतच लेनिनचा प्रत्येक क्षणन् क्षण जाऊं लागला. झारचीं सत्ता उलथून टाकल्यानंतर रशियांतील सर्व कामगारपक्षांचें एकीकरण करण्याची भाषा सुरू होईल, ही गोष्ट लेनिननें जाणली होती.

या संबंधांत कोलोन्टाईला लेनिननें पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें होतें:– "संघटना (ऑर्गनायझेशन) कमिटी, ट्रॉट्स्की आणि मंडळी वगैरे समाजसत्तावादी देशाभिमान्यांशीं एकी करण्याचे मूर्खपणाचे प्रयत्न आतां करण्यांत येतील. हे प्रयत्न सफल होऊं न देण्याचें काम आतां आपल्याला करावें लागेल. क्रांतीच्या या पहिल्या अवस्थेंत आपण याच गोष्टींपासून सावध राहिलें पाहिजे आणि हें काम करतांना खऱ्या आंतरराष्ट्रीय सुसंगत धोरणानें आपल्या स्वतःच्या पक्षाचें काम आपण पुढें चालविलें पाहिजे. बहुजनसमाजाची संघटना करणें, खेडेगांवांतील जनता व घरगुती कामें करणारे नोकरचाकर यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणें, क्रांतीनंतर ज्या नवीन तत्त्वांवर समाजाची रचना करावयाची आहे त्या तत्त्वांची ओळख समाजांतील अगदीं मागासलेल्या वर्गांनाही करून देणें व अशा रीतीनें आपल्या कामाची व्याप्ति वाढविणें हें तावडतोबीचें काम आपण आपल्या हातीं घेतलें पाहिजे. त्याचप्रमाणें नव्या सरकारचें धोरण उघडकीला आणावयाचें व लष्करांतील सैनिकांचे गट करून त्यांना तें समजावून द्यावयाचें, तसेंच कामगार सोव्हिएटांच्या प्रतिनिधींच्या हातीं सर्व राज्यसत्तेचीं सूत्रें जातील अशी तयारी करावयाची हेंही काम आपण तितक्याच निकडीनें हातीं घेतलें पाहिजे. कामगार सोव्हिएटांच्या हातीं आलेली राज्यसत्ताच जनतेला भाकरी, शांतता व स्वातंत्र्य देऊं शकेल. क्रांतीनंतर तिला विरोध करणारी प्रतिक्रियात्मक सत्ता खालींनें निर्माण होईल; पण तिची धुळधाण उडविण्याचें काम आपल्याला हातीं घ्यावें लागेल. नव्या हंगामी राजवटीवर आपला विश्वास नाहीं व तिला मदत करण्यास आपण तयार नाहीं हें दाखवून दिलें पाहिजे...... नव्या राजवटींतील अधिकाऱ्यांच्या हालचालींकडे आपण पूर्ण लक्ष ठेवलें पाहिजे व प्रचलित सामाजिक तत्त्वांपेक्षां अधिक उदात्त तत्त्वांवर समाजाची प्रस्थापना करण्याची तयारी आपण केली पाहिजे."

लेनिननें कोलोन्टाईला पाठविलेलें पत्र तारेच्या भाषेंत लिहावें त्याप्रमाणें लिहिलें होतें. रशियन राज्यक्रांतीच्या या घाईच्या दिवसांत स्विस लोकसत्ताक राज्यांत जवळ जवळ कैद्याप्रमाणेंच राहणाऱ्या या क्रांतीवादी पुढाऱ्यानें लिहिलेला आणखी एक पत्राचा नमुना उपलब्ध झाला असून त्या पत्रांत

पुढील विचार लेनिननें प्रगट केले आहेत:-"पेट्रोग्राडमध्यें जिकडे तिकडे आतां उत्साहच उत्साह भरलेला दिसून येईल. या उत्साहाच्या भरांत क्रांतिकारी तत्त्वावर नव्या पक्षाची उभारणी करण्याकडे कोणी लक्ष देणार नाहीं. या पक्षाची उभारणी करण्याची पद्धतशीर तयारी आतांच केली पाहिजे. सेकंड इंटरनॅशनल आज ज्या तत्त्वांवर प्रस्थापित करण्यांत आली आहे तीं तत्त्वें झुगारून दिलीं पाहिजेत. या नव्या पक्षाचें सेकंड इंटर-नॅशनलशीं कोणत्याही बाबतींत साद्दश्य असतां कामा नये. क्रांतिकारक मतांचा प्रचार करा, नव्या समाजाची प्रस्थापना करा, नव्या तत्त्वांचा पुरस्कार करण्याइतकी जागृति समाजांत निर्माण करा, सामान्य जनतेंत नव्या नव्या संघटना निर्माण करा आणि कामगार सोव्हिएटांच्या हातीं राज्यसत्ता आल्याशिवाय शांतता प्रस्थापित व्हावयाची नाहीं, हें जनतेला सिद्ध करून द्या."

क्रांतीनंतर रशियांत कोणत्या प्रकारची राज्यसत्ता प्रस्थापित करावयाची ही गोष्ट लेनिननें आपल्या वरील पत्रांत स्पष्ट केली होती. फेब्रुवारी-मधील क्रांतीनंतर झारची सत्ता नाहींशी झाली. १९०५ च्या क्रांतिकार-कांचें उदाहरण डोळयांपुढें ठेवून कामगार व सैनिक यांच्या प्रतिनिधींचें एक सोव्हिएट पेट्रोग्राडमध्यें स्थापन करण्यांत आलें. परंतु या सोव्हिएटमध्यें मेन्शेव्हिक पक्षाचें बहुमत होतें. त्यामुळें भांडवली गटांच्या सत्तेला विरोध करणारी शक्ति असें जें सोव्हिएटचें अस्सल स्वरूप तें जाऊन हंगामी सर-कारसारख्या भांडवली सरकारलाच मदत करण्याचें धोरण तीं स्वीकारूं लागलीं. याप्रमाणें कामगार व सैनिक यांनीं घडवून आणलेल्या क्रांतीचा फायदा घेऊन लोकसत्तेच्या भपकेदार नांवाखालीं देशांतील भांडवलदार व जमीनदारवर्गाचे पुढारी सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेणार असा रंग दिसूं लागला. पण या परिस्थितीला तोंड द्यावयाचें कसें! लेनिनप्रभृति श्रमजीवी लोकांच्या सत्तेचे कैवारी रशियापासून कितीतरी दूर असलेल्या देशांत अडकून पडले होते. महायुद्धाच्या वेळीं स्वित्झरलँडचें प्रजासत्ताक राष्ट्र तटस्थ राहिलें, पण या राष्ट्राच्या सर्व सरहद्दींवर खंदकांच्या रांगा-च्या रांगा पडल्या होत्या. युध्यमान राष्ट्रांतील हेरांनीं या राष्ट्राला जणूं काय वेढाच दिला होता. यामुळें स्वित्झर्लंडच्या या तुरुंगांतून बाहेर पडावयाचें

करें, हा प्रश्न लेनिनप्रभृति पुढाऱ्यांपुढें दत्त म्हणून उभा होता. केसांचा टोप घालून स्त्रीवेषांत इंग्लंड व फ्रान्समधून रशियांत जातां येईल, असें जिनिव्हा येथील कार्पिन्स्की नांवाच्या आपल्या एका स्नेह्याला त्यानें लिहिलें होतें. लेनिनच्या या युक्तीला त्याच्या स्नेह्यांनीं संमति दिली असती तर टोप घातलेल्या व स्त्रीवेष धारण केलेल्या लेनिनचा फोटो घेण्यांत आला असता व बर्न येथील दोस्त राष्ट्रांच्या वकीलमंडळापुढें पासपोर्टाची परवानगी मिळविण्याकरितां त्याला उभें करण्यांत आलें असतें ! पण या गोष्टीला त्याच्या दोस्तांनीं संमति दिली नाहीं. "असल्या आणीबाणीच्या प्रसंगीं आपणाला येथें राहावें लागत आहे हें पाहून माझ्या अंतःकरणाला वेदना होत आहेत." असें स्टॉकहोम येथील आपल्या एका मित्राला त्यानें पत्रद्वारां कळविलें होतें व वरीलपेक्षांही विचित्र युक्त्या त्यानें त्या पत्रांत सुचविल्या होत्या. लेनिननें ज्या दिवशीं हें पत्र लिहिलें त्याच दिवशीं जिनिव्हा येथें रशियन निर्वासितांची एक सभा भरली होती व स्वित्झर्लंडमध्यें कोंडून पडलेल्या निर्वासित पुढाऱ्यांनीं रशियांत कसें जाऊन उतरावें याचा विचार चालला होता. या सभेंत मार्टोव्ह यानें एक युक्ति सुचविली व तीच युक्ति थोड्या-बहुत फेरफारानें मान्य करण्यांत आली. रशियांत स्थानबद्ध करण्यांत आलेल्या कांहीं जर्मनांच्या बदला रशियांत जाण्याची आपण जर्मन सर-कारची परवानगी घ्यावी व जर्मनींतील मार्गानें आपण रशिया गांठावा अशी ही योजना होती. कार्पिन्स्कीनें लेनिनला ही गोष्ट कळविली. पण या पत्रांत सुचविलेल्या युक्तीचा विचार न करतां दुसऱ्याच कांहीं धाडसाच्या युक्त्या शोधून काढण्यांत लेनिननें रात्रीच्या रात्री जागून काढल्या. क्रुप्सकायानें लिहिलेली यावेळची आठवण पाहिल्यास लेनिनच्या त्यावेळच्या मनःस्थितीची कल्पना आल्याखेरीच राहत नाहीं.

"क्रांतीची बातमी समजल्यापासून लेनिन निजला नाहीं. सारी रात्र रशियांत जावयाचें कसें याचा विचार करण्यांत जात असे व अनेक अश्र-द्धेय युक्त्या पुढें मांडून तो त्यांच्यासंबंधानें विचार करीत असे. आप-ल्याला विमानांतून जातां येईल असें तो एकदां म्हणाला. पण अशा तऱ्हेच्या युक्त्या काढणें व त्यावर बोलत राहणें म्हणजे अर्धवट झोपेंत बरळत सुटण्यासारखेंच होतें. ही युक्ति साध्य व्हावयाची असल्यास एका

तटस्थ राष्ट्रांतून परराष्ट्रीय इसमास जाण्याचा पासपोर्ट मिळविणें या कामीं जरूर होतें. स्वीडिश लोकांसंबंधानें युध्यमान राष्ट्रांचीं मनें निःशंक होतीं. स्वीडनमधील आपल्या समाजवादी दोस्तांकडून असा एखादा पास-पोर्ट मिळणेंही शक्य होतें. पण आम्हां दोघांनाही स्वीडिश भाषा येत नव्हती ही आणखी एक अडचण आमच्यापुढें दत्त म्हणून उभी होती. थोडी मोडकी तोडकी भाषा येऊन भागण्याजोगें नव्हतें. 'तुझा काय नेम सांगावा ! निजल्यानंतर स्वप्नांतही तुला मेन्शेव्हिक दिसतील व 'बदमाष' 'बदमाष' म्हणून तूं बरळत उठशील आणि आपलें बिंग तूं बाहेर फोडशील.' असें म्हणून मी त्याला चिडवीत असे."

दोघा पतिपत्नींचा अशा रीतीनें मतभेद झाला असतांही स्टॉकहोम-मधील गानेट्स्की नांवाच्या आपल्या दोस्ताला त्यानें एक पत्र लिहिलें. या पत्राच्या पाकिटांत त्यानें आपला व झिनोव्हिफचा असे दोन फोटोही पाठवून दिले व बहिरे व मुके असे जवळजवळ आपणासारखे दिसणारे दोन स्वीडिश इसम पाहून ठेवण्याबद्दल त्यानें त्याला या पत्रांत लिहून कळविलें. लेनिनचा हा साधेभोळेपणा पाहून गानेट्स्कीलाही हसूं आलें असलें पाहिजे. पण या सर्व हकीगतीवरून लेनिनचें मन या वेळीं किती उतावीळ झालेलें होतें हें मात्र समजून आल्याखेरीज राहणार नाहीं.

याच सुमारास लेनिनला मार्टोव्हनें आपल्या सूचनांचें पाठविलेलें पत्र मिळालें. लेनिननें शेवटीं त्याची सूचनाच पसंत केली. रॉबर्ट ग्रिम, फ्रिट्झ प्लॅटन वगैरे स्विस सोशालिस्टांना त्यानें एकत्र बोलावलें व स्विस सरकार व जर्मन वकील यांच्याशीं या बाबतींत वाटाघाट करण्यासंबंधानें त्यांना सुच-विलें. मार्टोव्हनें सुचविलेली ही युक्ति खरोखरीच अत्यंत धाडसाची होती व आश्चर्य हें कीं, असलें धाडस करण्याइतकें मनोधैर्य त्यांना न झाल्यामुळें ही युक्ति प्रत्यक्ष अंमलांत आणण्याचें त्यांनीं नाकारलेंही. पण लेनिन असा डगमगणारा नव्हता. या भानगडीच्या वाटाघाटी त्यानें तशाच पुढें चालू ठेवल्या व 'प्रवदा' पत्राकरितां "दूर देशांतील पत्रें" नांवाची लेखमाला त्यानें लिहिली. क्रांतीनंतर पुन्हा सुरू झालेल्या 'प्रवदा' पत्राचा अंक पाहून त्याला अत्यंत आनंद झाला होता. साम्राज्यवादी राष्ट्रें युद्धास प्रवृत्त झालीं कीं त्या युद्धाचें पर्यवसान आपसांतील युद्धांत—यादवींत—व क्रांतींतच

झालें पाहिजे, रशियांत आज जी क्रांति झाली आहे तिला समाजसत्तावादी क्रांतीचें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य आहे, असें या लेखमालेंतील पहिल्या लेखांत त्यानें प्रतिपादन केलें होतें.

स्विस सोशालिस्ट पार्टीचे पुढारी रॉबर्ट ग्रिम यांनीं जर्मन सरकारशीं सुरू केलेल्या वाटाघाटी आतां संपत आल्या होत्या व सर्व रशियन निर्वासित देशभक्तांना समाधान वाटेल अशाच प्रकारची तडजोड ग्रिम यानें घडवून आणली होती. लेनिन तर दिवसेंदिवस अधिकाधिक उतावीळ होत चालला होता. जर्मनींतून प्रवास करून रशियांत शिरण्याची कल्पना बोल्शेव्हिकांना पूर्णपणें मान्य असल्याचें त्यानें ३१ मार्च रोजीं ग्रिमला कळविलें व सर्व निर्वासितांची एकदम आतांच निघण्याची तयारी नसेल तर आपण एकटेच प्रथम निघणार, यापुढें आपल्याला दिरंगाई सहन होणार नाहीं, असेंही त्यानें या तारेंत ग्रिमला कळविलें. या वाटाघाटीचे सर्व कागद फ्रिट्झ प्लॅटन या उत्साही व तरुण समाजसत्तावादी स्विस पुढाऱ्याच्या हातीं लवकरच आले व त्यानें लेनिनच्या प्रवास करण्यासंबंधाच्या सर्व अटी बर्न येथील जर्मन वकिलापुढें सादर केल्या. यानंतर वाटाघाटी पुऱ्या होऊन लेनिनप्रभृतींना रशियांत सुरक्षितपणें पोंचविण्याची सर्व जबाबदारी प्लॅटनवरच टाकण्यांत आली. या बाबतींत जर्मन अधिकाऱ्यांशीं पत्रव्यवहार करावयाचा असल्यास तो प्लॅटननेंच करावा व त्याच वेळीं लेनिन ज्या डब्यांतून जाणार त्यांत कोणाला घ्यावयाचें व कोणाला घ्यावयाचें नाहीं, हें त्यानें ठरवावें. युद्धाचे वेळीं परराष्ट्रांतून प्रवास करणारांना जे हक्क दिले जातात तसले हक्क या डब्यांतील लोकांना दिले गेले आहेत, असें समजण्यांत यावें व रशियांत पोंचतांच तेथील जर्मन व ऑस्ट्रियन युद्धकैदी मुक्त करण्यांत यावे, असेंही ठरविण्यांत आलें होतें. लेनिनप्रभृति समाजसत्तावादी पुढारी रशियांत शिरले म्हणजे झारला आपल्याशीं स्वतंत्र तह करणें भाग पडेल अशाच कल्पनेनें या सोशालिस्टांना जर्मन सरकारनें आपल्या मुलुखांतून रशियांत जाण्यास वाट दिली. युद्धकैद्यांची अदलाबदल करण्याचें अस्पष्ट कलम या वाटाघाटींत मान्य करण्यांत आलें होतें, पण आपल्याला रशियांत जाण्यास मिळावें म्हणून राष्ट्रीय दृष्ट्या रशियाला विघातक व स्वतःच्या इभ्रतीला अपमानकारक अशी कोणतीही

अट लेनिननें मान्य केलेली नव्हती. इंग्लंड व फ्रान्समधूनही बोल्शेव्हिक रशियांत गेले असते, पण या दोन्ही राष्ट्रांनीं कोणत्याही प्रकारची मदत करण्याचें नाकारल्यामुळें त्यांना जर्मनींतून जाण्याचा हा मार्ग पतकरावा लागला. जर्मनींतून वाट काढण्याची ही कल्पना लेनिननें काढली नाहीं. मेन्शेव्हिक मार्टोव्हनेंच ती काढली. यानंतर थोड्याच आठवड्यांनीं मार्टोव्हप्रभृति इतर सर्व राजकीय पक्षाच्या २०० रशियनांनीं हाच मार्ग स्वीकारला. जर्मनींतील मार्गानें आपण रशियांत गेल्यास आपल्यावर हवे तसले भयंकर आरोप करण्यांत येतील ही गोष्ट लेनिन पूर्णपणें जाणून होता. म्हणूनच परराष्ट्रांतील सोशालिस्टांची या बाबतींत पूर्ण संमति घेण्याची खबरदारी त्यानें घेतली होती. या धाडसाचा तावडतोब परिणाम काय होईल हेंही तो जाणून होता. रशियाच्या हद्दींत पाय टाकल्याबरोबर आपल्यास कदाचित् अटक करण्यांत येईल; परंतु स्वित्झर्लंडमध्यें या वेळीं स्वतंत्र असण्यापेक्षां रशियांतील तुरुंगांत कैदी म्हणून राहणें अधिक श्रेयस्कर आहे असा त्यानें विचार केला होता. धाडसाचा प्रसंग आला म्हणजे लेनिन मागें घेतो असा आरोप त्याच्यावर कोणीही व कधींही केलेला नव्हता. जर्मनींतून रशियांत जाण्याच्या कल्पनेला आपली संमति आहे अशा मजकुराच्या संमतिपत्रकावर जर्मन, फ्रेंच, पोलिश, स्विस, स्वीडिश, नॉर्वेजियन इत्यादि सोशालिस्ट पुढाऱ्यांच्या सह्या होत्या. यांपैकीं कांहीं पुढारी पार्लमेंटचे सभासद होते व स्टॉकहोमच्या नगराध्यक्षानेंही या पत्रकावर सही केली होती. रोमां रोलांलासुद्धां ही कल्पना पसंत होती, पण या पत्रकावर सह्या घेण्यांत आल्या त्या वेळीं तो हजर राहूं शकला नाहीं. या बाबतींतल्या वाटाघाटी आतां पुऱ्या झाल्या आहेत असें प्लॅटनमार्फत लेनिनला कळविण्यांत आलें. बर्नकडे जाणारी गाडी यानंतर दोन तासांनीं जावयाची होती. पण एवढ्या थोड्या अवकाशांत लेनिननें आपल्या झुरिच् येथील बिऱ्हाडांतील सामानसुमानाची बांधाबांधी केली व कशीतरी गाडी गांठली. बर्न येथें गेल्यानंतर जर्मनीकडे जाणाऱ्या गाडींत लेनिनला बसविण्यांत आलें. लेनिन व त्याचे दोस्त ज्या डब्यांत बसले होते त्याला सील करण्यांत आलें होतें. याप्रमाणें स्वित्झर्लंडमधून बाहेर पडून लेनिननें पुन्हा एकदां रणक्षेत्रांत पदार्पण केलें. जर्मनींतील शेतांतून त्याची गाडी चालली होती. या शेतांतून

कांहीं थोडीं बायका व मुलें कामें करीत असतांना त्यांना दिसलीं. कोठेंही पुरुषमाणसें आढळलीं नाहींत. गाडी चालू असतां लेनिन कधीं कधीं विचारांत अगदीं मग्न होत असे तर कधीं कधीं आपल्या डब्यांतील तीस दोस्तांबरोबर हंसतखेळत असे, त्यांची थट्टा करीत असे व त्यांच्याबरोबर गातही असे. बर्लिन येथें ही गाडी कांहीं वेळ थांबली. नंतर बंदराच्या स्टेशनकडे रवाना झाली. हीं सर्व मंडळी मग एका बोटींत बसलीं. स्वीडनमधील एका ठाण्यावर उतरून ते नंतर स्टॉकहोमला गेले. स्टॉकहोमच्या वेटिंग रूमवर लालबावटा उभारून लेनिनच्या स्वागतार्थ त्या ठिकाणीं स्वीडिश सोशालिस्टांची भाषणेंही झालीं. फिनलंडच्या सरहद्दीवर आल्यानंतर बर्फाच्या गाड्यांतून त्यांना कांहीं वेळ जावें लागले. नंतर ही मंडळी रशियाच्या गाडींत बसली. रशियन सैनिकांच्या टोळयांच्या टोळ्या या गाडींत घुसल्या व त्यांनीं गाडींत गर्दी करून सोडली. या निर्वासितांना सामोरें जाण्याकरितां केरेन्स्कीनें सैनिकांची एक तुकडीही पाठविली होती. ही तुकडी गाडींत घुसली त्यावेळीं आपल्याला अटक करण्यांत येतें कीं काय अशी भीति लेनिनच्या दोस्तांना वाटली. लेनिनबरोबर असलेल्या एका दोस्तानें यावेळीं "जागतिक क्रांति चिरायु होवो" अशी घोषणा केली. या घोषणेचा अर्थ या सैनिकांना समजला नाहीं व ते गोंधळून गेले. या तुकडीवरील अधिकारी युद्धाचा पुरस्कर्ता होता. त्याच्याबरोबर लेनिन जोरजोरानें बोलत होता व या तुकडींतील सैनिकांनीं लेनिनचें भाषण ऐकण्याकरितां त्यांच्याभोंवती गर्दी केली होती. पेट्रोग्राडजवळील बेलूस्ट्रोव्ह गांवीं ज्या वेळीं ही गाडी आली त्या वेळीं कामगारांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या स्वागतार्थ जमल्या होत्या. बोल्शेव्हिक पक्षांतील कांहीं दोस्तही या ठिकाणीं आले होते. आपल्याला अटक करण्यांत येईल कीं काय अशी भीति लेनिनच्या डब्यांतील दोस्तांनीं त्यांच्याजवळ व्यक्त केली. त्या वेळीं या दोस्तांनीं त्यांची थट्टाच केली. फिनलंड स्टेशनवरील देखावा मात्र अत्यंत संस्मरणीय व अनपेक्षितही होता. तुरुंगांतून व हद्दपारीच्या शिक्षेतून मुक्त झालेले लेनिनचे दोस्त प्लॅटफॉर्मवर त्यांच्या स्वागतार्थ उभे होते. त्या ठिकाणीं सैनिकांची एक तुकडी उभी होती व त्यांचीं बागनटें स्टेशनच्या प्रकाशांत चमकत होतीं. आप-

त्या भाईबरोबर लेनिन जेव्हां प्लॅटफॉर्मवर आला त्या वेळीं या तुकडीच्या ऑफिसरनें लेनिनला सलामी दिली व आपल्या खणखणीत आवाजानें या तुकडीला 'अटेन्शन'चा हुकूम दिला. स्टेशनभोंवतीं तर गर्दीच गर्दी जमली होती. लाल बावट्यावर सर्च लाईट पाडण्यांत येत होते. जिकडे पहावें तिकडे सानंद व सोल्हासयुक्त चेहरे दिसत होते व चिलखती गाड्यांचे छोटे बुरुज सर्वत्र पसरलेले आढळून येत होते. बँड वाजूं लागला. प्रथम मार्सेलिसचें राष्ट्रगीत गाण्यांत आलें व नंतर आंतरराष्ट्रीय गीत झालें व यानंतर टाळ्यांचा प्रचंड गजर झाला व क्रांतीची घोषणा करण्यांत आली. "क्रांतिकारक कामगार व नाविक तुमचें स्वागत करीत आहेत." असें लेनिनला त्याच्या एका दोस्तानें सांगितलें. नाविकांच्या कमांडरनें रशियांतील क्रांतीची हकीगत लेनिनला थोडक्यांत सांगितली. इतक्यांत "आपण थोडें भाषण करावें अशी नाविकांची इच्छा आहे." असें कोणी तरी लेनिनच्या कानांत कुजबुजलें. या गंभीर प्रसंगानें लेनिनचें मन आकर्षून टाकलें होतें. तो थोडासा पुढें चालत गेला. त्यानें आपल्या डोक्यावरची टोपी खालीं काढली व तो बोलूं लागला.

"नाविक भाई हो, हंगामी सरकारनें दिलेल्या अभिवचनांवर तुमचा विश्वास आहे कीं नाहीं हें मला अद्याप समजलें नाहीं. तथापि मी तुमचें आज उलट अभिनंदन करीत आहे. हंगामी सरकारचे अधिकारी आज तुमच्याशीं गोड बोलत असतील, ते तुम्हांला अवळपघळ वचनेंही देत असतील. पण ते तुम्हांला व रशियन जनतेला फसवीत आहेत अशी माझी खात्री झाली आहे. लोकांना आज शांततेची गरज आहे. त्यांना भाकरी पाहिजे आहे. त्यांना त्यांची जमीन पाहिजे आहे. आणि हे अधिकारी युद्ध तसेंच चालू ठेवतील, तुमची भूक कायम ठेवतील, तुम्हांला ते भाकरी देणार नाहींत आणि जमीनदारांच्या जमिनी जमीनदारांच्या स्वाधीन ठेवतील.... आम्हांला या परिस्थितींत सामाजिक क्रांतीकरितांच लढलें पाहिजे. शेवटपर्यंत आपणाला लढत राहिलें पाहिजे. कामगारजनतेचा पूर्ण विजय होईपर्यंत आपण लढत राहिलें पाहिजे. जागतिक समाजक्रांति चिरायु होवो."

हें भाषण झाल्याबरोबर कामगारांनीं लेनिनभोंवती 'गर्दी केली.

त्यांनीं त्याला आपल्या खांद्यावर घेऊन मिरवीत नेलें. एका चिलखती गाडीवर त्याला त्यांनीं उभें केलें. या ठिकाणींही तो थोडेंसें बोलला व नव्या कामगार-क्रांतिकारी लढ्याचें स्वरूप त्यानें कामगारांना थोडक्यांत समजावून दिलें. पुढें या हलत्या किल्ल्याच्या टोंकावर बसवूनच कामगारांनीं त्याची मिरवणूक काढली व बोल्शेव्हिक मुख्य ठाण्यावर म्हणजे झारची रखेली नर्तकी शेसिन्स्काया इच्या वाड्यांत त्याला आणून पोंचविलें. लेनिनच्या तत्त्वज्ञानाचा विजय झाला होता, पण हें तत्त्वज्ञान अंमलांत येऊन त्याचा पूर्ण विजय अद्याप व्हावयाचा होता. या वाड्यांत जाण्यापूर्वी बाहेर जमलेल्या कामगारांना उद्देशून लेनिननें आणखी एक छोटेंसें भाषण केलें व नंतर तो आपल्या बहिणीच्या घरीं गेला. विश्रांति घेण्याकरितां तो आपल्या बहिणीच्या बिन्हार्डी गेला नाहीं. अविस्मरणीय अशा आजच्या प्रसंगानंतर लेनिननें विश्रांति घेणें अशक्यच होतें. यापुढें आपल्या पक्षाचें धोरण कशा प्रकारचें असावें यासंबंधानें त्यानें या ठिकाणीं कांहीं टांचणें केलीं. बरीच रात्र होईपर्यंत तो लिहीत बसला होता. ज्या प्रसिद्ध प्रबंधा-संबंधानें यापुढील क्रांतीच्या दिवसांत जोराचा वादविवाद चालू झाला तो प्रबंध (थिसीस ऑफ ४ एप्रिल) त्यानें या रात्रीं लिहून काढला. लेनिननें हा प्रबंध लिहिला त्या वेळीं कामेनेव्हसारख्या दोस्तांनाही आपल्या पार्टींतून काढून लावण्याचा प्रसंग येईल ही गोष्ट त्यानें पूर्णपणें जाणली होती. पण त्यानें या बाबतींत पूर्ण निश्चय केला होता. विशेषतः पेट्रोग्राडमधील कामगारांचा उत्साह पाहून तर त्याच्या या निश्चयाला बळकटीच आली होती. या रात्रीं तो झोंपला कीं नाहीं याची शंकाच आहे.

दुसरे दिवशीं कामगार व सैनिक प्रतिनिधींच्या सोव्हिएटांची अखिल रशियन परिषद् (कॉंग्रेस) झाली. या परिषदेंत आदल्या दिवशीं लिहिलेला प्रबंध आधारादाखल घेऊन लेनिननें त्यावर भाषण केलें. या प्रबंधांत पुढील दहा मुद्दे लेनिननें मांडले होते:— पहिला मुद्दा युद्धासंबंधाचा होता. राष्ट्राभिमानी लोकांच्या वृत्तीचा त्यांत निषेध केला होता व भांडवलशाहीची सत्ता नष्ट झाल्याशिवाय लोकसत्तात्मक शांति जगाला लाभावयाची नाहीं असें त्यांत म्हटलें होतें. दुसऱ्या मुद्यांत रशियांतील परिस्थितीचा विचार केला होता. हंगामी सरकारचें खरें धोरण उघड-

कीला आणून दाखवावें अशी विनंति तिसऱ्या मुद्द्यांत केली होती. सोव्हिएट मंडळांत बोल्शेव्हिकांचा गट अगदीं अल्पसंख्याक असल्यामुळें त्यांनीं दुसऱ्या पार्टीचीं बिंगें उघडकीला आणावीं, अतिशय धिम्मेपणानें त्यांनीं हें काम करीत राहावें व त्याच वेळीं सोव्हिएटांच्या हातीं सर्व राज्यसत्ता गेली पाहिजे, असें चौथ्या मुद्द्यांत प्रतिपादन केलें होतें. जनतेला सशस्त्र करणें जरूर आहे असें पांचव्या मुद्द्यांत सांगितलें होतें. जमिनीचें राष्ट्रीकरण करावें, मोठमोठ्या इस्टेटी जप्त कराव्या व नमुनेदार शेतींत त्यांचें रूपांतर करावें असा पुरस्कार सहाव्या मुद्द्यांत केला होता. समाजवादाच्या प्रस्थापनेकरितां अवश्य त्या योजना अंमलांत आणाव्या, बँकांचें राष्ट्रीकरण करावें, मालाची पैदास व विभागणी यांवर सोव्हिएटांचें नियंत्रण असावें, असें सात व आठ या मुद्द्यांतून दाखवून दिलें होतें. आपल्या पक्षाचें धोरण निश्चित करावें, त्याचा कार्यक्रम व नांव यांच्यांत बदल करावा व एक नवा क्रांतिकारी आंतरराष्ट्रीय कामगारसंघ (इंटरनॅशनल) निर्माण करावा, असें शेवटल्या दोन मुद्द्यांत सुचविलें होतें. या परिषदेंत लेनिननें दोन तास भाषण केलें. एखादा साधा शिपाई, कामगार व शेतकरी महायुद्धासंबंधानें कसा विचार करतो हें त्याच्या भाषणांत स्पष्टपणें दिसून आलें. "सामान्य जनतेला अगदीं नाइलाज म्हणून महायुद्धांत भाग घ्यावा लागला होता, मुलुखगिरी करण्याची तिची इच्छा नव्हती. तेव्हां युद्ध बंद करावयाचें असल्यास भांडवलशाहीची सत्ताच उलथून पाडली पाहिजे ही गोष्ट जनतेला समजावून दिली पाहिजे. कांहीं थोडया व्यक्तींच्या सदिच्छेच्या जोरावर आपल्याला युद्ध बंद करतां येईल असें समजणें मूर्खपणाचें आहे. क्रांति घडवून आणणें ही अत्यंत बिकट गोष्ट आहे. या वेळीं चुका होणें अपरिहार्य आहे. तथापि जनतेला आपण या वेळीं सावधगिरीच्या सूचना देत राहणें अवश्यक आहे. जनतेंत वर्गजागृति करून तिचे हक्क तिला समजावून देणें हेंच आपलें धोरण असलें पाहिजे.... आपला पक्ष अल्पसंख्य असला तरी हरकत नाहीं. त्याची आपण फिकीर करतां कामा नये. आपल्याला मुलुखगिरी करावयाची नाहीं, असें सामान्य लोक जेव्हां म्हणतात तेव्हां त्यांचें तें बोलणें खरें असतें. परंतु गुच्कोव्ह, ल्व्होव्हसारखे हंगामी

सरकारचे दिवाण जेव्हां असेंच सांगूं लागतात तेव्हां त्यांत मात्र खोटेपणा असतो. आपल्या राष्ट्राचें रक्षण आपण केलें पाहिजे असें एखादा कामगार म्हणतो तेव्हां सर्वतोपरी दलित झालेल्या समाजाचें अंतःकरणच त्याच्या मुखानें बोलत असतें. क्रांतिकारकांची भरमसाट स्तुति करीत सुटणें ही गोष्टही हितावह नाहीं. क्रांतीच्या अपयशाला हें वर्तन कारणीभूत होतें. ... राज्य कसें चालवावयाचें तें शिका. या बाबतींत आपल्याला कोणीही हरकत करूं शकणार नाहीं. ... राज्य करण्याची कला पुस्तकांतून शिकावयाची नसते. ... ... कायदे कागदावर लिहून ठेवले म्हणजे त्यांना महत्त्व प्राप्त होतें असें नाहीं तर ज्या वृत्तीचे लोक हे कायदे अंमलांत आणतात त्यावरून त्यांना महत्त्व प्राप्त होत असतें. ... रशियांत आज ऐक्याचा प्रयत्न चालू आहे. स्वसंरक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या लोकांशीं ऐक्य करण्याचा प्रयत्न चालू आहे. असा प्रयत्न करणें म्हणजे समाजसत्तावादाचा विश्वासघात करण्यासारखेंच आहे. *लिब्नेक्टप्रमाणें ११० विरुद्ध एकानें उभें राहणें हेंच माझ्या मतें श्रेयस्कर आहे. राज्यसत्ता काबीज करण्यास या वेळीं कोणताही पक्ष तयार नाहीं असें जें म्हणण्यांत येतें तें खरें नाहीं. असा पक्ष आज हयात आहे व तो म्हणजे आमचा पक्ष होय. सर्व राज्यसत्ता आपल्या हातीं घेण्यास आमचा पक्ष तयार आहे" असें लेनिन आपलें हें भाषण संपवितांना पुन्हा एकदां म्हणाला. लेनिनचें हें वाक्य ऐकून सभेंत एकदम हशाच हशा पिकला. "हसा, वाटेल तितके तुम्ही हसा." लेनिन पुन्हा जोरानें ओरडून बोलला. "राज्यसत्ता काबीज करण्याची तुम्हांला भीति वाटत असेल तर आमचा पक्ष ती काबीज करण्यास तयार आहे." असें तो आणखी एकदां म्हणाला. "जो सर्वांत शेवटीं हसतो तोच पुढें पुष्कळ काळपर्यंत हसत राहतो (ही हू लाफ्स् लास्ट लाफ्स् लॉंगेस्ट)" या म्हणींतील स्वारस्य लेनिन पूर्णपणें जाणून होता व म्हणून लोकांनीं कितीही थट्टा केली तरी त्याची त्यानें मुळींसुद्धां पर्वा केली नाहीं.

---

* जर्मनीच्या रीच्स्टॅग (प्रातिनिधिक सभा) मध्यें युद्धाचें अंदाजपत्रक मतास घालण्यांत आलें त्या वेळीं ११० समाजवाद्यांनीं त्याला अनुकूल मत दिलें व फक्त लिब्नेक्टनें विरुद्ध मत देऊन युद्धाबद्दल आपली नापसंती व्यक्त केली.

कामगार व सैनिक प्रतिनिधींच्या अखिल रशियन सोव्हिएट परिषदेंत (ऑल रशियन सोव्हिएट कॉंग्रेस) वरील आशयाचे विचार प्रदर्शित करून लेनिननें आपली भूमिका स्पष्ट केली होती. सोव्हिएटांची ही परिषद् टॉरीड राजवाड्यांत झाली. राजवाड्याच्या खालच्या मजल्यांतील दिवाणखान्यांत मेन्शेव्हिकांची सभा चालू होती. बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांच्या संयुक्त सभेंतही लेनिननें हेच विचार प्रदर्शित केले. "वात झालेला माणूस जसें कांहीं तरी बरळत सुटतो त्याप्रमाणें लेनिनही कांहीं तरी बडबडत आहे." असें प्लेखानोव्हनें लेनिनच्या या भाषणानंतर उद्गार काढले. क्रांतिकारी लोकसत्ताक राज्यसंस्था प्रस्थापित करण्याची संधि आली असतां लेनिन आपसांतील यादवीचें निशाण उभारीत आहे, असाही दोष कांहीं लोकांनीं लेनिनला दिला. आपल्या प्रबंधांत लेनिननें जे सिद्धांत मांडले होते, त्यांना संमति देण्याचें खुद्द लेनिनच्या दोस्तांपैकींही पुष्कळांनीं नाकारलें. या परिषदेंत हजर असलेल्या बोल्शेव्हिकांनीं बहुमतानें लेनिनची ही विचार-सरणी नामंजूर केली आणि कामेनेव्हनें तर 'प्रवदा' पत्रांत एक लेख लिहून बोल्शेव्हिक पक्षाशीं आपला यापुढें कांहीं संबंध नसल्याचें जाहीर केलें. याप्रमाणें लेनिनच्या विरुद्ध सर्व बाजूंनीं काहूर उठलें तरी तो मुळींच डगमगला नाहीं. हद्दपार झालेला स्टॅलिन रशियांत नुकताच परत आला होता. कामेनेव्हशीं कांहीं बाबतींत त्याचें जुळत असे. परंतु लेनिननें आपल्या प्रबंधांत प्रगट केलेलीं मतें जेव्हां त्याला समजलीं तेव्हां त्यानें कामेनेव्हचा नाद सोडला व तो लेनिनला येऊन मिळाला. कामेनेव्हशीं आपण कांहीं दिवस संगनमत केलें ही आपल्या आयुष्यांत आपण मोठी चूक केली असें त्यानें कबूल केलें. स्टॅलिननंतर दुसरे कांहीं दोस्तही लेनिनला मिळाले. बोल्शेव्हिकांपैकीं कांहीं मंडळी गॉर्कीनें सुरू केलेल्या 'नवजीवन (न्यू लाइफ)' पत्राला जाऊन मिळाली. सुवर्णमध्याचा पुरस्कार करणारा आपला पक्ष आहे, असें गॉर्कीप्रभृतींचें म्हणणें होतें. मॉस्कोमधील बहुतेक सर्व पुढारी कामेनेव्हलाच जाऊन मिळाले होते. बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती कमिटीच्या सभेंत लेनिननें श्लियाप्निकोव्हच्या मतांचा धुव्वा उड-विला. "लेनिनला अतिशय घाई झाली असून त्याच्या कोटाचीं मागचीं टोंकें धरून ठेवून त्याला आवरलें पाहिजे." असें श्लियाप्निकोव्हचें म्हणणें होतें.

लेनिनच्या प्रबंधाचा पुरस्कार सार्वजनिक रीत्या करणारी अॅनस्टेशिया कोलोन्टाई ही एकच काय ती बोल्शेव्हिक स्त्री होती. बोल्शेव्हिक पक्षांतील पुढाऱ्यांपैकीं या वेळीं इतकें धाडस कोणींही केलें नव्हतें. बोल्शेव्हिकांविरुद्ध असलेल्या पत्रांनी कोलोन्टाईची थट्टा उडविली. पण आपल्या पक्षातील लोकांना हा कार्यक्रम समजावून देण्याचा लेनिननें धडाका चालविला होता. शेशिन्स्की महालांतील गच्चीवरून रोजच्या रोज त्याचीं भाषणें चालू होतीं. हजारों कामगार त्याचीं हीं भाषणें ऐकण्याकरितां जमत असत. याशिवाय 'प्रवदा' पत्रांतून तर या विषयावर त्याचे लेखांमागून लेख प्रसिद्ध होत होते. लेनिनची ही चिकाटी फुकट गेली नाहीं. यानंतर लवकरच बोल्शेव्हिकांची पेट्रोग्राड येथें एक परिषद् झाली. या परिषदेंत लेनिनची ही विचारसरणी मान्य करण्यांत आली. इतकेंच नाहीं तर लेनिनला या पक्षाचा सन्माननीय अध्यक्ष म्हणूनही निवडण्यांत आलें.

लेनिन जर्मन सरकारचा हेर आहे, कैसरचा तो पगारी हस्तक आहे, रशियांत गोंधळ माजवून देण्याबद्दल कैसरनें मुद्दाम त्याला पाठविलें आहे, अशा प्रकारच्या अफवा पसरविण्याचें काम हंगामी सरकारचीं पत्रें या वेळीं करीत होतीं. तरी आपली विचारसरणी लष्करी सैनिकांपुढें मांडण्याचें त्यानें ठरविलें व लष्करी पलटणींतून आपल्याविरुद्ध जोराची चळवळ चालू असतांही इस्माइलोव्हस्क रेजिमेंटमधील सैनिकांच्या एका सभेस तो स्वतः हजर राहिला. सैनिकांचीं अंतःकरणें आपलींशीं करण्याची कला लेनिनला पूर्णपणें साधली होती. लष्करांत चळवळ करण्याकरितां बोल्शेव्हिकांनीं बोल्शेव्हिक मिलिटरी कमिटी स्थापन केली होती व या कमिटीतर्फेंच ही सभा बोलावण्यांत आली होती. सैनिकांकरितां एक स्वतंत्र वर्तमानपत्र काढावयाचें असें या कमिटीनें ठरविलें व त्याकरितां उभारलेल्या फंडाला मदत करण्याबद्दल लेनिननें या सभेंत विनंति केली. लेनिनचें भाषण संपल्यानंतर पुष्कळांनीं पैसे, आपल्या हातांतल्या आंगठ्या व सिगारेटच्या पेट्या लेनिनच्या स्वाधीन केल्या. एका जखमी शिपायानें कसा तरी प्लॅट-फॉर्म गांठला व आपल्याला लढाईंत मिळालेला सेंट जॉर्जेस क्रॉस या पत्राच्या मदतीकरितां म्हणून दिला. पेट्रोग्राडमध्यें आल्यानंतर ज्या ज्या सैनिकांशीं लेनिनचा संबंध आला त्यावरून आपली विचारसरणी सैनि-

क्रांना पटत चालली आहे असें त्याला दिसून आल्याशिवाय राहिलें नाहीं.

रशियांतील कामगारांनीं क्रांति करून आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें; तेव्हां या क्रांतीनंतर आलेला मे-दिन रशियांत सर्वत्र अत्यंत उत्साहानें साजरा करण्यांत आला हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. पेट्रोग्राडमध्यें या दिवशीं दोन मिरवणुका निघाल्या. दोस्त राष्ट्रांचा विजय होईपर्यंत आपण युद्धापासून परावृत्त होणार नाहीं, एकनिष्ठेनें आम्ही तें चालू ठेवूं, असें हंगामी सरकारचा एक जबाबदार अधिकारी मिल्युकोव्ह यानें दोस्त राष्ट्रांना कळविलें आहे अशी बातमी या दिवशीं बाहेर पसरली होती. पेट्रोग्राडमध्यें दोन मिरवणुका निघण्यास हीच गोष्ट कारणीभूत झाली होती. एका मिरवणुकींत कामगार व सैनिक सामील झाले होते. हंगामी सरकारचा ते निषेध करीत होते, बोल्शेव्हिकांच्या घोषवाक्यांचा व लेनिनच्या नांवाचा ते जयजयकार करीत होते. या मिरवणुकीच्या बाबतींत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, लष्करी सैनिकांच्या तुकड्यांमागून तुकड्या या मिरवणुकींत सामील झाल्या. बोल्शेव्हिकांनीं या बाबतींत कोणतीही खटपट केली नव्हती किंवा कोणतीही चिथावणी दिली नव्हती. हे सर्व सैनिक स्वयंस्फूर्तीनें मिरवणुकींत सामील झाले होते व इतर जयजयकारांबरोबर मिल्युकोव्हनें राजीनामा द्यावा अशीही घोषणा ते करीत होते. दुसऱ्या मिरवणुकींत पांढरपेशे व शिष्ट लोक सामील झाले होते. कांहीं ऑफिसरही तिच्याबरोबर चालले होते. हे लोक जर्मन हेरांचा निषेध करीत होते व दोस्त राष्ट्रांचा व हंगामी सरकारच्या प्रधानांचा जयजयकार करीत होते. या दोन्ही मिरवणुकी कांहीं ठिकाणीं एकत्र आल्या. त्यांच्यांत थोडी चकमकही झाली व दोन्ही पक्षांतर्फे कांहीं गोळ्याही झाडण्यांत आल्या. या मिरवणुकींत कामगार व सैनिक यांच्यापुढें लेनिननें दोन वेळां भाषण केलें. या मिरवणुकींत सैनिकांनीं स्वयंस्फूर्तीनें भाग घेतला व मिल्युकोव्हप्रभृति क्रांतिविरोधी पुढाऱ्यांनीं राजीनामे द्यावे अशी घोषणा केली. त्याचा परिणाम असा झाला कीं, मिल्युकोव्ह व गुच्कोव्ह या दोघां दिवाणांना आपल्या जागांचे राजीनामे द्यावे लागले व झेरेटेलीप्रभृति पांच सोशालिस्ट पुढारी प्रधानमंडळांत घेण्यांत आले. परंतु यामुळें आंतरराष्ट्रीय धोरणांत कांहीं फरक घडला

नाहीं. कारण केरेन्स्की हाच नव्या सरकारचा मुख्य प्रधान होता व मिल्युकोव्हप्रमाणें दोस्त राष्ट्रांकडे त्याचाही ओढा होता. पण रशियांतील कामगार व सैनिक आपल्या बाजूचे आहेत ही गोष्ट लेनिनला मे-दिनाच्या या समारंभांत पूर्णपणें कळून आली. यानंतर ता. ७ मे रोजीं बोल्शेव्हिक पार्टीची सभा झाली. या सभेंत लेनिनच्याच मताला पाठिंबा मिळाला. लेनिन रशियांत आल्यानंतर दोन महिन्यांत पार्टीच्या सभासदांची संख्या २३६०० वरून ७९००० पर्यंत गेली होती. या सभेंत लेनिनच्या प्रसिद्ध प्रबंधाच्या अनुरोधानेंच सर्व ठराव करण्यांत आले. भांडवलदार व समाजसत्तावादी वर्तमानपत्रांतूनही लेनिनचा निषेध करण्यांत आल्यामुळें या सभेंतील ठरावांकडे लोकांचें लक्ष लागलें होतें आणि लेनिनच्या धोरणाला अनुकूल असे हे ठराव झाल्यामुळें त्याचें नांव रशियांत सर्वतोमुखीं झालें. या सभेंत कामेनेव्ह, रायकॉफ व नोगिन यांनीं लेनिनला विरोध केला. पण त्यांच्या उपसूचनांना कोणीं दुजोरादेखील दिला नाहीं. लेनिनच्या ठरावांवर त्यांनीं मतें दिलीं नाहींत, ते तटस्थ राहिले व त्यांतच त्यांनीं समाधान मानून घेतलें. सर्व सत्ता सोव्हिएटांच्या हातीं आली पाहिजे, जमीन शेतकऱ्यांच्या मालकीची झाली पाहिजे, जमिनी व बँका यांचें राष्ट्रीकरण झालें पाहिजे, औद्योगिक संघां(ट्रस्ट)वर सरकारचा ताबा असला पाहिजे, कामगारांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यांत आले पाहिजेत; बोल्शेव्हिक पक्षाचें व कामगारवर्गाचें तावडतोबीचें ध्येय या दृष्टीनें वरील ठराव या सभेंत मंजूर करण्यांत आले. हें ध्येय एकाएकीं साध्य व्हावयाचें नाहीं, याकरितां पुष्कळ काम करणें जरुरीचें आहे; मुख्यतः शेतकरी–सैनिकांना आपलेसें करणें हेंच मुख्य काम आहे. फक्त कामगारवर्गच जमीनदारवर्गाला बाजूला सारील, जनतेला शांतीचा लाभ करून देईल व सर्व जमिनी शेतकऱ्यांना मिळवून देईल, असाही खात्रीलायक विश्वास या सभेंत व्यक्त करण्यांत आला. पूर्वीच्या रशियन साम्राज्याखालील सर्व परतंत्र राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा पूर्ण हक्क देण्यासंबंधाचा स्टॅलिनचा रिपोर्ट मान्य करण्यांत आला. या रिपोर्टावर सभेंत खूपच वादविवाद झाला. या परतंत्र राष्ट्रांचा साम्राज्यापासून अलग होण्याचा हक्कही मान्य करण्यांत आला. वर्गहितरक्षणाच्या दृष्टीनें सामान्य जनतेला कितीही सांगितलें तरी आम्ही युद्ध कसें बंद पाडणार याची

कल्पना तिला येत नाहीं, आमचें म्हणणें तिला समजणें कठिण जातें म्हणून आपल्याला जें काय वाटतें तें आपण स्पष्टपणें जनतेपुढें मांडलें पाहिजे: आयता तयार व संपूर्ण असा समाजसत्तावाद रशियांत प्रस्थापित करतां येईल असें लेनिनला कधींही वाटलें नाहीं. लहान लहान सुधारणा करीत करीत बऱ्याच वर्षांच्या शिक्षणानें ही गोष्ट साध्य होईल ही गोष्ट लेनिननें जाणली होती. पण हें सर्व करण्यापूर्वी कामगारजनतेच्या हातीं राज्यसत्ता आली पाहिजे या गोष्टीवर लेनिनचा पूर्ण कटाक्ष होता. सत्ता हातीं नसेल तर सुधारणेचें अगदीं पहिलें पाऊलदेखील टाकतां येणार नाहीं; शिवाय हें सरकारसुद्धां नव्या धर्तीचें असलें पाहिजे. कोट्यवधि जनतेचें मत प्रतिपादन करणारें असें तें लोकसत्ताक राज्य असलें पाहिजे. सोव्हिएटांच्या रूपानें राज्यकारभारांत जनतेचा हात असला पाहिजे. या बाबतींत खुद्द कामगारांनींच त्याच्यापुढें कथन केलेला अनुभव त्यानें या सभेंत सांगितला:—

"ज्या भाषणानें माझ्या मनावर अत्यंत परिणाम केला त्याचा उल्लेख करून मी आजचें भाषण संपवीत आहें. एका कोळशाच्या खाणींतील मजुराचें एक प्रशंसनीय भाषण मला ऐकावयास मिळालें. एकही पुस्तकी शब्द उपयोगांत न आणतां आपण क्रांति कशी घडवून आणली हें त्यानें सांगितलें. आपणावर कोणीतरी अध्यक्ष असावा कीं नाहीं हा प्रश्न त्यांना कधींच पडला नाहीं. खाण त्यांनीं ताब्यांत घेतली व खाणींतील कोळसा बाहेर काढण्याच्या कामीं अडथळा न येईल अशी व्यवस्था राखणें हाच त्यांच्यापुढें मुख्य प्रश्न होता. नंतर भाकरीचा प्रश्न दत्त म्हणून पुढें उभा राहिला. भाकरीची तर अतिशयच वाण भासत होती. ही भाकरी मिळविण्याचा मार्गही त्यांनीं निश्चित केला. क्रांतीनंतरचा हाच कार्यक्रम महत्त्वाचा असतो. तो कसा पार पाडावयाचा ही गोष्ट पुस्तकांत छापलेली सापडावयाची नाहीं. स्थानिक सत्ता काबीज करण्याचा हाच खरा मार्ग आहे. पेट्रोग्राडमध्यें भांडवलदारवर्गानें जें स्थान पटकावलें आहे तसें रशियांत इतरत्र कोठेंही आढळणार नाहीं. या ठिकाणीं सर्व सत्ता भांडवलवाल्यांच्याच हातीं आहे. परंतु देशाच्या इतर सर्व भागांतील शेतकऱ्यांनीं समाजसत्तावादाच्या विशिष्ट कार्यक्रमास बांधून न घेतां शुद्ध राजकीय उपायांचा

अवलंब करून त्यांनीं सर्व जमिनी आपल्या कबजांत घेतल्या. क्रांतिकारक चळवळींतील हा राजकीय सत्ता काबीज करण्याचा कार्यक्रम म्हणजेच क्रांति यशस्वी करण्याचा खरा मार्ग होय, असें मला वाटतें. अत्यंत सावधगिरीनें व दक्षतेनें आपण हे उपाय अंमलांत आणले पाहिजेत. खरोखरी अंमलांत आणण्यायोग्य असेच हे उपाय आहेत. हेच उपाय प्रगतीचा मार्ग दाखवितील. असलेच उपाय आपण अंमलांत आणले पाहिजेत. त्याच्याशिवाय गत्यंतर नाहीं."

क्रांतीनंतर रशियांत दाखल होऊन लेनिनला अवघे तीनच आठवडे झाले होते. जर्मनीच्या मार्गानें रशियांत प्रवेश करण्यासंबंधानें लेनिनप्रभृतींची जर्मन सरकारशीं वाटाघाट चालू होती त्या वेळीं ब्रिटिश वकिलानें लेनिन हा एक भयंकर मनुष्य आहे अशी त्याची शिफारस केली होती. हा भयंकर माणूस त्याच्या कांहीं थोड्या निर्वासित दोस्तांना माहित होता. रशियांतील सामान्य जनतेनें त्याला अलीकडे पाहिलेंही नव्हतें. परंतु रशियांत येऊन महिनाही झाला नाहीं तोंच हा भयंकर माणूस आत्मविश्वासपूर्वक राज्यसत्ता काबीज करण्याच्या गोष्टी बोलूं लागला. हंगामी सरकारचा नायनाट करा असें म्हणणें या प्रसंगीं थोडें चुकीचें असलें तरी थोडक्याच दिवसांत तसें म्हणण्याची, नव्हे तसें करण्याची पाळी आल्याशिवाय राहणार नाहीं असें तो लोकांना सांगत होता. रशियांत आल्यापासून रात्रंदिवस त्याचें मतप्रसाराचें काम चालू होतें. रोजच्या रोज व्याख्यानें द्यावयाचीं, वर्तमानपत्रांतून लेख लिहावयाचे व बोल्शेव्हिक पक्षाच्या वारंवार होणाऱ्या सभाकरितां ठराव तयार करावयाचे, हें त्याचें काम सारखें चालूच होतें. लेनिन हा वक्ता म्हणून तर कधींच प्रसिद्ध नव्हता. पण रशियांत आल्यानंतर त्याचीं जीं भाषणें होत होतीं तीं मात्र अत्यंत परिणामकारक होत असत. विशेषतः लष्करी सैनिकांपुढें तो भाषण करूं लागला म्हणजे त्याला विलक्षण स्फुरण चढत असे. त्याचें भाषण चालू असतां हे सैनिक वारंवार टाळ्यांचा गजर करीत असत, पण याबद्दल त्याला फारसें बरें वाटत नसे; परंतु त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांना उत्तरें देण्यांत त्याला फार आनंद वाटत असे. त्याच्या बोलण्यांत भाषेच्या दृष्टीनें विशेष अर्थ कांहीं नसे; पण आपल्या स्पष्टवक्तेपणामुळें श्रोत्यांचीं मनें तो आपलीशीं करून टाकी. अगदीं साध्या घरगुती भाषेंत

तो आपलें म्हणणें लोकांपुढें मांडीत असे व पुन्हा पुन्हा त्या त्याच गोष्टी सांगून अगदीं मठ्ठ डोक्याच्या लोकांनासुद्धां तो आपलें म्हणणें पटवून दिल्याशिवाय राहात नसे. तो कधींही आवेशयुक्त भाषणें करीत नसे किंवा केरेन्स्कीप्रमाणें क्रांतिकारक म्हणींनीं त्याचें भाषण भरलेलें नसे. केरेन्स्की हा धंद्यानें वकील होता. गौरवयुक्त, आवेशयुक्त व अलंकारिक भाषा वापरून श्रोत्यांना आपलेसें करण्याची कला त्याला साधली होती. पण लेनिनपाशीं तसला कोणताही गुण नव्हता. आपल्याला जें काय सांगावयाचें तें अत्यंत धीमेपणानें तो सांगत असे व आपलें म्हणणें स्पष्टपणें समजावून देण्याची तो काळजी घेत असे. लेनिन स्वतः पुष्कळ भाषणें करीत असे, पण त्याचबरोबर दुसऱ्यांचीं भाषणेंही तो मनःपूर्वक ऐकत असे. खाणींतून कामें करणारे मजूर, सैनिक, कारखान्यांशीं व बाल्टिक समुद्रांतील आरमाराशीं नुकताच संबंध आलेले बोल्शेव्हिक पक्षांतील चळवळे यांची भाषणें ऐकण्याची त्याला फार आवड असे व त्यांच्याशीं तो आनंदानें चर्चाही करीत असे. केरेन्स्की व मिल्युकोव्हप्रभृति मेन्शेव्हिक पुढाऱ्यांचें तसें नव्हतें. मजुरांशीं व सैनिकांशीं बोलत बसण्यांत व त्यांचीं भाषणें ऐकण्यांत त्यांना कमीपणा वाटत असे. मॉ. मॉरिस पॅलेलोग व सर जॉर्ज बुकॅनन यांच्यासारख्या फ्रेंच व ब्रिटिश वकिलांबरोबर बोलत बसणें व त्यांचें म्हणणें ऐकून घेणें हेंच महत्त्वाचें आहे असें त्यांना वाटत असे.

लेनिनला रशियांत येऊन एक महिना लोटला नाहीं तोंच ट्रॉट्स्की पेट्रोग्राडमध्यें येऊन दाखल झाला. क्रांतीनंतर रशियांत प्रवेश करण्याच्या बाबतींत लेनिननें जी खबरदारी घेतली तितकी खबरदारी ट्रॉट्स्कीनें घेतली नाहीं. तो ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हातीं सांपडला व त्यांनीं त्याला स्थानबद्ध करून टाकलें. कांहीं झालें तरी ब्रिटिशांच्या हातीं या वेळीं सांपडावयाचें नाहीं, असें लेनिननें मोठ्या शहाणपणानें ठरविलें होतें. पण ट्रॉट्स्कीला ही आपत्ति टाळतां आली नाहीं. एक महिन्यानें उशीरां कां होईना ट्रॉट्स्की रशियांत आला, पण पूर्ण मतांतर होऊन तो रशियांत आला व लेनिनला येऊन मिळाला. महायुद्ध सुरू झाल्यापासून आंतरराष्ट्रीय धोरणानें ट्रॉट्स्की कामगारक्रांतीचा विचार करीत आला होता; पण यासंबंधींचें लेनिनचें धोरण त्याला आतां मान्य होऊं लागलें होतें. यामुळें

त्याचें व लेनिनचें क्रांतीच्या बाबतींत एकमत झालें. ट्रॉट्स्की हुशार व महत्त्वाकांक्षी होता. लेनिनप्रमाणेंच तोही बोलूं लागल्याबरोबर बोल्शेव्हिक मंडळींत लेनिनच्या खालोखाल लोक त्यालाच मान देऊं लागले. पुढें ऑगस्ट महिन्यांत तो प्रत्यक्ष बोल्शेव्हिक पक्षांतच सामील झाला व त्यामुळें त्याचें वजन आणखी अधिकच वाढलें. कामगार व सैनिक यांच्यापुढें तो बोलूं लागला म्हणजे क्रांतीकरितां अवश्य असलेला आवेश व प्रतिपक्षाबद्दलचा द्वेष तो त्यांच्यांत निर्माण करीत असे. पण लेनिन व ट्रॉट्स्की यांच्या भाषणांत व विचारसरणींत एक मोठा फरक होता. लेनिनची विचारसरणी तर्कशुद्ध होती. आतांपर्यंत काय काम झालें व व पुढें काय केलें पाहिजे याची स्पष्ट व निश्चित कल्पना लेनिन लोकांना देत असे. ट्रॉट्स्की बोलूं लागला म्हणजे तो श्रोतृसमुदायांत आवेश उत्पन्न करी व त्यांच्या मनाची खळबळ उडवून देई. लेनिन आपल्या भाषणानें श्रोत्यांना विचार करावयास लावी व त्यांच्या भावनांना प्रत्यक्ष कृतीचें स्वरूप कसें द्यावयाचें याचा मार्ग तो त्यांना दाखवून देई.

पुष्कळ वर्षें फटकून राहिलेला ट्रॉट्स्की याप्रमाणें ऐन क्रांतीच्या दिवसांत लेनिनला येऊन मिळाला. स्टॅलिन तर यापूर्वीच लेनिनचा पूर्ण दोस्त झाला होता. लेनिनची विचारसरणी बोल्शेव्हिकांना आतां पूर्णपणें पटली होती. पण इतकी सर्व अनुकूलता असली तरी पूर्ण क्रांति होऊन लेनिनच्या मताप्रमाणें सर्व सत्ता सोव्हिएटांच्या हातीं येण्यास अद्याप अवकाश होता. लेनिनच्या दीर्घोद्योगाची व चिकाटीची अद्यापि कसोटी लागावयाची होती. क्रांतीनंतर रशियांतील परिस्थिति विचित्र झाली होती. रशियांत या वेळीं जवळ जवळ दोन सरकारें नांदत होतीं असें म्हटलें तरी चालेल. केरेन्स्कीप्रभृति हंगामी सरकारचा कारभार चालविणारे प्रमुख पुढारी दोस्त राष्ट्रांच्या वकिलांबरोबर व त्यांच्या सेनापतींबरोबर संगनमत करून महायुद्धांतील चढाईचा मोर्चा पुढें चालू ठेवण्याच्या कामीं त्यांना मदत करण्यास तयार होते; आणि हंगामी सरकारांतील सोव्हिएटांचे प्रतिनिधी शांततेकरितां सर्व जगाला उद्देशून विनंतिपत्रकें प्रसिद्ध करीत होते. रशियांतील कामगार व सैनिक जनतेचा खरा ओढा या सोव्हिएटांकडेच होता. जनतेची खरी इच्छा हे सोव्हिएट प्रतिनिधीच बोलून

दाखवीत होते. तथापि मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांच्या पुढाऱ्यांवरील जनतेचा विश्वास अद्याप नष्ट झालेला नव्हता. हंगामी सरकार शांतीकरितांच प्रयत्न करीत आहे असें तिला वाटत होतें. हें सरकार आपल्या जमिनीसंबंधाच्या प्रश्नाचा निकाल लावील व श्रीमंतांच्या हातीं असलेल्या सत्तेला आळा घालील अशीही या जनतेला आशा वाटत होती. पण क्रांति होऊन दोन महिने होऊन गेले तरी शेतकरी, कामकरी व सैनिक यांच्या कोणत्याच आशा सफल होतील असा रंग दिसेना. जमीनदाराकडून जमिनी काढून घेऊन त्या खेड्यांतील शेतकऱ्यांत वांटून देण्याचें काम या सरकारनें पुरें केलें नाहीं. तें काम तसेंच पडून राहिलें आणि कारखानदार सोव्हिएटांच्या व कामगारप्रतिनिधींच्या मतांना उघड उघड धाब्यावर बसवूं लागले तरी सरकार त्याची दाद घेईनासें झालें. इतकें झालें तरी हंगामी सरकार शांतीकरितां खटपट करील, आपणां सर्वांना पोटभर भाकरी खायला मिळेल, असें रशियांतील जनतेला वाटत होतें. पण ती आशा पूर्ण होण्याऐवजीं जूनच्या प्रारंभीं महायुद्धांतील नवीन चढाईच्या धोरणाला हंगामी सरकार प्रोत्साहन देण्यास तयार झालें आहे असें तिला आढळून आलें. जून व जुलैमध्यें चढाईला सुरुवात झाल्यास दोस्त राष्ट्रांस मदत करण्याचें हंगामी सरकारनें मार्च महिन्यांतच ठरविलें होतें. फ्रेंच मिलिटरी मिशनचे अध्यक्ष जनरल जानिन यांना जनरल अलेक्सेयेव्ह यानें तसें वचनही दिलें होतें. युद्धाच्या बाबतींत रशिया जें धोरण स्वीकारील त्यावरच रशियाकडे युद्धसामग्री यापुढें पाठवावयाची कीं नाहीं हें ठरवावें लागेल अशी धमकीवजा सूचना मि. बाल्फोर यांनीं हंगामी सरकारकडे पाठविली होती. मॉ. आल्बर्ट थॉमस व मि. आर्थर हेंडरसन हे फ्रेंच व ब्रिटिश कामगारपुढारी रशियन क्रांतिकारी कामकऱ्यांना युद्धाकरितां प्रवृत्त करीत होते. रशियांतील कामकरी जनतेला आपला उद्धार करून घ्यावयाचा असेल तर तिनें दोस्त राष्ट्रांना या वेळीं मदत केली पाहिजे व दोस्त राष्ट्रांनीं आपापसांत केलेल्या तहाच्या अटी पूर्ण करण्यासाठीं व त्यांचा युद्धाचा हेतु सफल करण्यासाठीं रशियन कामगारांनीं आपले प्राण खर्ची घालण्यास तयार असलें पाहिजे, असें या कामगारपुढाऱ्यांचें म्हणणें होतें. हंगामी सरकारच्या पार्लमेंटांतील मेन्शेव्हिक व सुधारणावादी सोशालिस्टांना

वरील सर्व गोष्टी मान्य होत्या; म्हणूनच युद्ध चालू ठेवण्याच्या कामीं त्यांची खटपट चालू होती. पण ज्यांच्या जोरावर चढाईच्या कामीं केरेन्स्की-प्रभृति हंगामी सरकारचें अधिकारीमंडळ दोस्त राष्ट्रांना मदत करणार, ते सैनिकच यापुढें युद्धाला तयार होतील असें दिसत नव्हतें. क्रॉन्स्टॅटमध्यें रशियन लष्कराचा व आरमाराचा मोठा तळ होता. या ठिकाणीं बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचेंच वजन होतें. बोल्शेव्हिक पुढारी रास्कोल्निकोव्ह याच्यावर तेथील आरमारी सैनिकांचा पूर्ण विश्वास होता. तेथील सोव्हिएटांनीं क्रॉन्स्टॅट शहर ताब्यांत घेऊन सर्व सत्ता काबीज केली होती. तेथें असलेल्या लष्करांतील ५२ व्या पलटणीनें बंडाचें निशाण उभारलें; आपल्या पलटणीवरील अधिकाऱ्यांना अटक केली व आघाडीवर लढण्यास जाण्याचें नाकारलें. पहिल्या मशीन गन पलटणीनें शहरांतून मोठमोठ्या मिरवणुका काढल्या व बोल्शेव्हिक पुढारी सेमाश्को याची तुरुंगांतून सुटका केली. युद्धविरोधी चळवळ केल्याबद्दल सेमाश्कोला तेथील हंगामी सरकारच्या अधिकाऱ्यांनीं तुरुंगांत डांबून ठेवलें होतें. काळ्या समुद्रावरील आरमारांतील बऱ्याच पलटणींनीं वरीलप्रमाणेंच बंडें केलीं. सेवास्टपोल गॅरिझनमधील सैनिकांनीं तोच कित्ता गिरविला आणि सैनिकांच्या या चळवळीला सहानुभूति दाखविण्याकरितां तिकडील कारखान्यांतील कामगारांनींही संप केले.

चढाईच्या कामीं हंगामी सरकार दोस्त राष्ट्रांना मदत करणार आहे असें समजतांच पेट्रोग्राडमधील कामगारांचा संताप तर अनावरच झाला. तेथील सैनिकांना सरकारचें हें धोरण मुळींच पसंत पडलें नाहीं. बोल्शेव्हिकांच्या पीटर्सबर्ग कमिटीची एक सभा ताबडतोब बोलावण्यांत आली. शहरांतील सर्व कारखान्यांचे प्रतिनिधी या सभेला हजर होते. सरकारच्या धोरणाचा निषेध करण्याकरितां शहरांतून सुसंघटित मिरवणुका काढण्यासंबंधानें या सभेंत विचार करण्यांत आला. कामगारांच्या व सैनिकांच्या या संयुक्त मिरवणुका सशस्त्र असाव्या अशीही सूचना या वेळीं करण्यांत आली होती. परंतु लेनिनला ही सूचना पसंत नव्हती. अशा प्रकारची सशस्त्र मिरवणूक काढण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं; पेट्रोग्राडमधील सैनिकांचा पाठिंबा मिळेल व ते सरकारला मोठ्या शौर्यानें

विरोधही करूं शकतील; परंतु अशी स्थिति सर्वत्र नाहीं. लेनिननें मोठ्या धीमेपणानें व स्पष्ट रीतीनें आपलें म्हणणें सभेंतील मंडळींना पटवून दिलें व सशस्त्र मिरवणुकीच्या बाजूला असलेल्या कामगारपुढाऱ्यांना त्यानें आपलेंसें करून घेतलें.

रशियांत याप्रमाणें सर्वत्र युद्धविरोधी चळवळ चालू असतांही हंगामी सरकारनें ता. १ जुलै रोजीं चढाईला सुरुवात केली. सरकारच्या या बेपर्वाईच्या धोरणामुळें या चळवळीला अधिकच तेज चढलें. या दिवशीं पेट्रोग्राडमध्यें सर्व रस्त्यांतून कामगारांच्या व सैनिकांच्या प्रचंड मिरवणुका निघाल्या. या मिरवणुकांत चार लाखांवर कामगारांनीं व सैनिकांनीं भाग घेतला होता. मिरवणुकींत सामील झालेले हे सर्व लोक निःशस्त्र होते, पण निश्चयी होते. हंगामी सरकारच्या पार्लमेंटांतील भांडवलदार पक्षाच्या दहा प्रतिनिधींनीं राजीनामा द्यावा, सर्व सत्ता सोव्हिएटांनीं आपल्या हातीं घ्यावी व युद्ध ताबडतोब बंद करावें, अशा मागण्यांची घोषणा मिरवणुकींत जमलेले लोक करीत होते. या युद्धविरोधी चळवळीमुळें व्यक्त झालेला संताप अद्याप शमलाही नव्हता तोंच आघाडीवर गेलेल्या रशियन सैन्याच्या पराभवाच्या बातम्या देशांत येऊन धडकल्या व आपले सैनिक आघाडीवर बळी देऊन हंगामी सरकारनें केलेल्या गुन्ह्याचें तीव्र स्वरूप जनतेच्या नजरेस आलें. हंगामी सरकारच्या अधिकाऱ्यांनीं केलेलें आणखी एक दुष्कृत्य या वेळीं उघडकीस आलें. युद्धामुळें व क्रांतीमुळें रशियांत सर्वत्र अन्नाची टंचाई भासत होती. या वेळीं देशांतील सर्वच जनतेला धान्य वगैरे अन्नसामग्री मिळवून देण्याची व्यवस्था सरकारच्या अधिकाऱ्यांनीं केली नाहीं. इतकेंच नव्हे तर शहरांतील भांडवलदार लोकांच्या भागांतून ठिकठिकाणीं धान्याचे सांठे करून ठेवण्यांत आल्याचें बाहेर आलें. भांडवलदारांना मदत करण्याचें हंगामी सरकारचें धोरण वरील प्रकारामुळें अधिकच उघडकीस आलें व शहरांतील संपाला व मिरवणुकांना यामुळें उत्तेजनच मिळालें. सरकारच्या या दुष्कृत्याची बातमी लष्करांत पसरली त्या वेळीं तेथील सैनिक संतप्त झाले. दुसऱ्या मशीनगन पलटणींतील सैनिक तर आपापल्या बराकींतून बाहेर पडले व शहरांतील संपवाल्यांना ते येऊन मिळाले. १५ जुलै रोजीं

हंगामी सरकारच्या दहा भांडवलदार प्रतिनिधींनीं राजीनामा दिला. पण तेवढ्यानें लोकांचें समाधान झालें नाहीं. त्याच दिवशीं रात्रीं मशीनगन पलटणींतील सैनिकांनीं सशस्त्र मिरवणूक काढण्याचें ठरविलें व हंगामी सरकार उलथून पाडून सोव्हिएटांनीं सर्व सत्ता आपल्या हातीं घ्यावी अशी त्यांस विनंति केली. क्रॉन्स्टॅटमधील आरमारी सैनिकांना व कारखान्यांतील कामगारांच्या प्रतिनिधींनाही या चळवळींत सामील होण्याबद्दल निरोप पाठविले. क्रांतिकारक कामगार आतां सैनिकांकडे जात नव्हते तर उलट सैनिकच आतां कामगारांकडे क्रांतीच्या चळवळींत सामील होण्याबद्दल निरोप पाठवूं लागले होते. जगांतील क्रांत्यांच्या इतिहासांत असा हा पहिलाच प्रसंग होता यांत शंका नाहीं. पेट्रोग्राडमधील सैनिकांनीं सुरू केलेल्या या चळवळीला अर्थात् चोहोंकडून पाठिंबा मिळाला. शहरांतील आणखी कांहीं पलटणी या सैनिकांना येऊन मिळाल्या. कारखाने भराभर बंद पडूं लागले आणि कामगार लोक रस्त्यावर येऊन गर्दी करूं लागले. यांपैकीं कांहीं कामगार सशस्त्र होऊनही मिरवणुकींत सामील झाले होते. ता. १७ रोजीं या चळवळीला तीव्र स्वरूप प्राप्त झालें. सशस्त्र मिरवणुकी काढण्याचा हा प्रसंग नव्हे हें लेनिन प्रथमपासूनच सांगत होता. या मिरवणुकी शेशिन्स्की महालावरून चालल्या त्या वेळीं लोकांनीं आत्मसंयमन करावें, आपल्या वृत्ति उच्छृंखल होऊं देऊं नयेत असा त्यानें उपदेश केला. पण त्याच्या म्हणण्याला कोणीं मान दिला नाहीं. टॉरीड राजवाड्याकडे या सैनिकांनीं व सशस्त्र कामगारांनीं आपला मोर्चा वळविला.

हंगामी सरकारमधील सोव्हिएट प्रतिनिधींनीं सर्व राज्यसत्ता आपल्या ताब्यांत घ्यावी अशी या क्रांतीला उतावीळ झालेल्या सैनिकांची इच्छा होती. पण खुद्द सोव्हिएटांच्याच अंगीं तितकें धैर्य नव्हतें. या सोव्हिएटांपैकीं बरेच लोक हंगामी सरकारचेच पुरस्कर्ते होते. शहराच्या संरक्षणाकरितां ज्या पलटणी ठेवण्यांत आल्या होत्या त्यांतीलही कांहीं पलटणी हंगामी सरकारच्या बाजूच्या होत्या. केरेन्स्की या वेळीं युद्धमंत्री झाला होता. जर्मन हेरांनीं देशांत हा गोंधळ माजविला आहे, लेनिन हा या चळवळीचा पुरस्कर्ता आहे, रशियांत सर्वत्र गोंधळ माजवून जर्मनांना

स्वारी करण्यास हा देश मोकळा करून देण्याचा लेनिनचा विचार आहे, लेनिन हा एक भयंकर देशद्रोही माणूस आहे अशा प्रकारच्या अफवांनीं ज्यांचीं डोकीं फिरून गेलीं आहेत अशा सरहद्दीवरील सैनिकांच्या पलटणी केरेन्स्कीनें शहरांत आणून दाखल केल्या. झालें, दुसऱ्या दिवशीं शहरांत सर्वत्र गोळीबार सुरू झाला. क्रांतिकारकांच्या मिरवणुकी हळू हळू मोडून गेल्या आणि शहरांत सर्वत्र प्रतिक्रियेला सुरुवात झाली. क्रांतीनंतर रशियांत जो गोंधळ माजला आहे त्याला मुख्यत: बोल्शेव्हिक लोकच कारण झाले आहेत अशी समजूत सर्वत्र पसरल्यामुळें जनतेच्या रोषाचा मोर्चा आतां बोल्शेव्हिक पुढाऱ्यांकडे वळला. केरेन्स्की या वेळीं फारच दूरदर्शीपणानें वागला. युद्धविरोधी मिरवणुकींवर कांहीं थोड्या ठिकाणीं गोळीबार झाले. पण या अत्याचारांना त्यानें प्रोत्साहन दिलें नाहीं. मशीन गन पलटणींतील सैनिकांचीं हत्यारें त्यानें काढून घेतलीं. क्रॉन्स्टॅटहून आलेल्या आरमारी सैनिकांना पुन्हां परत पाठविण्याची त्यानें व्यवस्था केली. याच दिवशीं रात्रीं लेनिन 'प्रवदा' पत्राच्या ऑफिसांत कांहीं वेळ गेला; पण तो ऑफिसमधून बाहेर पडतो न पडतो तोंच एका लष्करी तुकडीनें त्या ऑफिसवर हल्ला केला आणि तेथें त्यांच्या हातीं लागलेले कागदपत्र जाळून टाकले व इतर सामानाची नासधूस केली. ता. १९ रोजीं सकाळीं प्रसिद्ध झालेल्या वर्तमानपत्रांतून बोल्शेव्हिक पार्टीतून हांकून लावलेल्या अलेक्झिन्स्की व सोशल रेव्होल्यूशनरी पांक्राटोव्ह यांनीं आपला एक लेख प्रसिद्ध केला. रशियांत गोंधळ माजवून देण्याबद्दल जर्मन सरकारनें लेनिनला नियमित पगार चालू ठेवला आहे याबद्दलचा आपल्यापाशीं निश्चित पुरावा आहे, असें त्यांनीं या लेखांत म्हटलें होतें. वर्तमानपत्रांतून अशा प्रकारचे लेख प्रसिद्ध झाल्यामुळें बोल्शेव्हिकांच्या चळवळी दडपून टाकण्याबद्दल व त्यांच्या पुढाऱ्यांना पकडण्याबद्दल सर्वत्र बोलवा ऐकूं येऊं लागली.

अशा परिस्थितींत लेनिननें लपून राहावें अशी स्वेर्डलोव्हनें लेनिनला विनंति केली. नाखुषीनें कां होईना, पण लेनिननें या गोष्टीला मान्यता दिली. लेनिनच्या अटकेचा हुकूम या दिवशीं रात्रीं काढण्यांत आला व त्याच्या खोलीची झडती घेण्यांत आली. या वेळीं तो आपल्या खोलींत

नव्हता. तेथून बऱ्याच लांबवर राहणाऱ्या अलेलुयेव्ह नांवाच्या म्हाताऱ्या बोल्शेव्हिक कामकऱ्याच्या बिऱ्हाडीं तो लपून राहिला होता. हा म्हातारा लेनिन–स्टॅलिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचा प्रेमळ दोस्त होता. पुढें क्रांतीनंतर याच म्हाताऱ्याच्या मुलीचें स्टॅलिनशीं लग्न झालें. लेनिन याप्रमाणें दडून राहिला तरी पेट्रोग्राड सोडून बाहेर पळून जाण्याची व सध्यां चालू असलेला झगडा मध्येंच सोडून देण्याची त्याची इच्छा नव्हती. लेनिनच्या बिऱ्हाडावर दुसऱ्यांदा हल्ला करण्यांत आला व क्रुप्सकाया, लेनिनचा मेहुणा व लेनिनची मोलकरीण यांना पकडून नेण्यांत आलें. या सर्व मंडळींना पुढें लवकरच सोडूनही देण्यांत आलें. परंतु जे अधिकारी लेनिनच्या शोधार्थ आले होते ते त्याचा खून करण्याच्या बुद्धीनेंच आले होते, असें पुढें कळून आलें. या प्रसंगीं आपण हंगामी सरकारच्या हातीं लागलों तर हे लोक आपली चांदी उडविल्याशिवाय राहणार नाहींत ही गोष्ट लेनिननेंही पूर्णपणें जाणली होती; आणि या लोकांच्या सूडबुद्धीला आपण बळी पडलों तर "मार्क्सवाद व सरकार (मार्क्सिझम् ॲन्ड स्टेट)" हें आपलें नोटबुक छापून प्रसिद्ध करावें अशी कामेनेव्हला त्यानें एक चिठ्ठी लिहून ठेवली होती व स्टॉकहोममध्यें आपलें हें नोटबुक कोणापाशीं मिळेल हेंही त्यानें या चिठ्ठींत लिहिलें होतें. आपल्या पक्षाविरुद्ध याप्रमाणें काहूर उठविण्यांत आलेलें पाहून बोल्शेव्हिकांच्या पीटर्सबर्ग कमिटीनें घाईघाईनें रेनॉल्ट फॅक्टरींतील वॉचमनच्या झोंपडींत एक गुप्त सभा बोलावली. पीटर्सबर्गमधील कामगारांनीं सार्वत्रिक संप पुकारावा अशा प्रकारची सूचना द्यावी कीं नाहीं याबद्दल सभेंत बराच खल झाला. लेनिननें या सूचनेला मान्यता दिली नाहीं. त्याचें म्हणणें त्याच्या दोस्तांनीं ऐकून घेतलें व सार्वत्रिक संप पुकारण्यासंबंधाचा नाद सोडून दिला. आपल्यावरील दोषारोपांची चौकशी करून घेण्याबद्दल लेनिननें या वेळीं तयार व्हावें कीं नाहीं याचा विचार करण्याकरितां याच वेळीं क्रुप्सकाया याकोव्हलेव्ह, ओर्ड्झोनिकिड्झे, नोगिन व झिनोव्हिफ वगैरे मंडळी अलेलुयेव्हच्या बिऱ्हाडीं जमलीं होतीं. वरील दोषारोपांचें सार्वजनिकरीत्या निराकरण झाल्याशिवाय आपल्या पक्षासंबंधानें लोकांचीं मनें शुद्ध होणार नाहींत असें कांहींनीं बोलून दाखविलें. सार्वजनिकरीत्या आपली चौकशी

होणार नाहीं ही गोष्ट लेनिननें जाणली होती व तसें तो म्हणालाही. या चर्चेच्या वेळीं स्टॅसोव्हा नांवाची एक बाई आंत आली. लेनिन हा पोलिसांचा हस्तक आहे यासंबंधींचा पुरावा पोलिसखात्यापाशीं आहे अशी टॉरीड राजवाड्यांत सर्वत्र चर्चा चालू होती असें तिनें सांगितलें. याप्रमाणें चोहोंकडून आपल्यावर भयंकर दोषारोप करण्यांत येत आहेत हें पाहून लेनिनचें मन उद्विग्न झालें. या गोष्टीचा त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्याचा चेहरा उतरून गेला. आत्मसंयम करण्याची त्याची ताकद नष्ट झाली व शत्रूच्या स्वाधीन झाल्याशिवाय आतां दुसरा मार्ग राहिला नाहीं असें त्यानें बोलून दाखविलें. लेनिनच्या या विचाराला स्टॅलिननें जोराचा विरोध केला. "जमीनदार व भांडवलदार लोकांचे हे कैवारी तुला तुरुंगापर्यंतही जाऊं देणार नाहींत, ते तुझा वाटेंतच खून करतील." असें स्टॅलिननें निर्भीडपणें सांगितलें. तेथें जमलेल्या इतर मंडळींनाही स्टॅलिनचें हें म्हणणें पटलें व झिनोव्हिफसह लेनिननें पेट्रोग्राड सोडावें असें ठरविण्यांत आलें. स्टॅलिनप्रभृतींनीं लेनिनचे या वेळीं प्राण वांचविलें असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं; कारण हंगामी सरकारच्या अधिकाऱ्यांच्या हातीं लेनिन लागला असता तर त्यांनीं लेनिनचा खून करण्यास कधींही कमी केलें नसतें. कार्ल लिबनेक्ट व रोझा लक्झेंबर्ग यांचा बर्लिन येथें यानंतर दीड वर्षांनीं जसा खून करण्यांत आला त्याचप्रमाणें लेनिनचाही खून झाल्याशिवाय राहिला नसता.

लेनिननेंही पुढें या बाबतींत आग्रह धरला नाहीं व ता. २४ जुलै रोजीं झिनोव्हिफसह पेट्रोग्राडबाहेरील एका खेड्यांत येमेलियानोव्ह नांवाच्या रायफल फॅक्टरींतील एका कामगाराच्या घरीं तो जाऊन राहिला. येमेलियानोव्ह हा बोल्शेव्हिक पक्षाचा जुना सभासद होता आणि इतर पुष्कळ रशियन कामगारांप्रमाणें आपल्या लहानशा शेतावर झोपडी बांधून तो राहात होता. त्यानें या दोन्ही पाहुण्यांना आपल्या झोपडींत जागा दिली व तबेल्यावरील माचीवर या दोघां पळपुट्यांना त्यानें लपवून ठेवलें. कांहीं दिवसांनीं त्यानें यांच्याकरितां एक लहानशी स्वतंत्र गवतानें झाकलेली अशी झोपडी बांधून दिली व मग माचीवर राहावयाचें सोडून तें या झोपडींत येऊन राहिले. या ठिकाणीं गवत कापून आणणें, मासे पकडणें व

मुलांशीं खेळणें यांत ते आपला वेळ घालवूं लागले. पण आपल्याजवळच असलेल्या शहरांत रोज काय काय गोष्टी घडत आहेत याची बित्तंबातमी ठेवून या शहरांतल्या चळवळीशीं असलेला आपला संबंध त्यांनीं तोडला नाहीं.

लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना आपल्या मार्गांतून बाजूला काढण्याचे कामीं हंगामी सरकारच्या अधिकाऱ्यांनीं यश मिळविलें. पण सरहद्दीवरील टार्नोपोल येथें रशियन सैन्याचा भयंकर पराभव झाल्यामुळें त्यांच्या या यशावर विरजण पडलें. जर्मन सैन्याला तोंड देण्याचें सामर्थ्य रशियन सैन्यांत आतां राहिलेलें नाहीं ही गोष्ट या पराभवामुळें आणखी एकदां सिद्ध झाली व क्रांतिविरोधी पक्षाच्या धोरणाला एक जबरदस्त धक्का बसला. रशियांतील आजच्या नव्या सरकारला यश यावयाचें असेल तर त्याची आजची रचनाच बदलून टाकली पाहिजे, हंगामी सरकारचीं सर्व राज्यसूत्रें एखाद्या सर्वाधिकाऱ्याच्या (डिक्टेटर) हातींच दिलीं पाहिजेत, या धोरणाचा पुरस्कार नव्या सरकारांतील एक गट करूं लागला. या जागेकरितां मुख्य प्रधान केरेन्स्की व मुख्य सेनापति कॉर्निलोव्ह हे दोन उमेदवार उभे राहिले. पण कॉर्निलोव्हनें आपली उमेदवारी यशस्वी होण्याकरितां जो उतावीळपणा व अप्रसंग केला त्यामुळें क्रांतिविरोधी लोकांचा डाव फसला व समाजांतील त्याचें वजन खाडकन् कमी झालें. आपल्याला सर्वाधिकारी न केल्यास लष्कराच्या जोरावर आपण तें पद काबीज करूं असा निर्वाणीचा खलिता त्यानें केरेन्स्कीला पाठविला. केरेन्स्कीला या प्रसंगीं साहजिकच लोकसत्ताक तत्त्वांचा पुरस्कार करण्याचा उमाळा आला व त्यानें सोव्हिएटांची मदत मागितली. कॉर्निलोव्हचें हें कृत्य बोल्शेव्हिकांच्या चांगलेंच पथ्यावर पडलें. कॉर्निलोव्हच्या निर्वाणीच्या खलित्याला केरेन्स्कीनें अर्थात्च भीक घातली नाहीं. उलट कॉर्निलोव्हही कच्च्या दिलाचा नव्हता. हंगामी सरकारचा तो सर सेनापति होता. रशियन राज्यसत्तेचें सर्वाधिकारित्व मिळविण्याकरितां आपल्या घोडदळासह तो पेट्रोग्राडवर चालून आला. बोल्शेव्हिकांना तेंच पाहिजे होतें. त्यांनीं या संघर्षाचा पूर्ण फायदा घेण्याचें ठरविलें. कॉर्निलोव्ह आपल्या घोडदळासह पेट्रोग्राडवर चालून येत आहे ही बातमी ऐकतांच शहरांतील एकूण

एक कामगार खडबडून जागा झाला व या लष्करी अरेरावापासून क्रांतिकारी राजधानीचें संरक्षण करण्याचें त्यांनीं ठरविलें. शहराचें संरक्षण करण्याचे कामीं बोल्शेव्हिकांनीं पुढाकार घेतल्यामुळें त्यांच्याविरुद्ध उठलेली दोषारोपांची वावटळ आपोआप नष्ट झाली व पाहिल्याप्रमाणें रशियन जनतेवरील त्यांचें वजन शीगेला चढलें. क्रांतिविरोधी लोकांशीं संगनमत न करतां व भांडलवलार व दोस्त राष्ट्रांचे हस्तक यांच्याशीं कोणतीही तडजोड करण्यास तयार न होतां जनतेची बाजू घेऊन सतत लढत राहणारा असा हा बोल्शेव्हिकांचा एकच पक्ष आहे, अशी जनतेची या वेळीं खात्री पटली. कॉर्निलोव्हच्या या कृत्यामुळें रशियांत या वेळीं अशी परिस्थिति उत्पन्न झाली होती कीं, सोव्हिएटांना अत्यंत शांततेनें व रक्तपात होऊं न देतां सर्व राज्यसत्ता काबीज करतां आली असती. मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील सामान्य सभासदही नवीन हंगामी संयुक्त सरकारच्याविरुद्ध चळवळ करूं लागले होते. पण झेरेटेली व डॅनप्रभृति सोव्हिएट पुढाऱ्यांना या संधीचा फायदा घेतां आला नाहीं. लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना लपून राहण्याचा प्रसंग आला असतांना बाहेर असलेल्या थोड्या सामान्य पुढाऱ्यांना असलें तडकाफडकीचें धोरण स्वीकारणें शक्य झालें नाहीं. कॉर्निलोव्हच्या वरील स्वारीला अर्थात्च यश आलें नाहीं व हंगामी सरकारच्या मुत्सद्द्यांनीं पुन्हा कशी तरी एकीचीं ठिगळें जोडून नवें हंगामी संयुक्त सरकार बनविलें व असल्या ठिगळें जोडलेल्या संयुक्त सरकारला सोव्हिएट पुढाऱ्यांना मदत करावी लागली. पण कॉर्निलोव्हच्या उतावीळपणामुळें व महत्त्वाकांक्षेमुळें एक गोष्ट मात्र नक्की झाली. दुसरी राज्यक्रांति करून सर्व राज्यसत्ता सोव्हिएटांनीं हातीं घेणें अगदीं अपरिहार्य आहे, असें रशियांतील जनतेला वाटूं लागलें.

लेनिनचा सल्ला न ऐकतां सशस्त्र मिरवणूक काढण्याची घाई केल्यामुळें जी परिस्थिति निर्माण झाली तीमुळें बोल्शेव्हिक पक्षाची मात्र वाताहात झाली. लेनिन व झिनोव्हिफ यांना तर हंगामी सरकारच्या भीतीनें लपून राहावें लागलें. बोल्शेव्हिकांचे दुसरे पुढारी तुरुंगांत डांबले गेले. ट्रॉट्स्की व लुनाचार्स्की हे अद्यापि बोल्शेव्हिक पक्षाचे सभासद झाले नव्हते

तरी त्यांनाही अटक करून तुरुंगांत टाकण्यांत आलें होतें. शेशिन्स्की महाल हें बोल्शेव्हिकांचें क्रांतीनंतरचें मुख्य ठाणें बनलें होतें. पण इंगामी सरकारच्या कैवाऱ्यांनीं तो आपल्या ताब्यांत घेतला. यामुळें बोल्शेव्हिकांनीं पूर्वीप्रमाणें शहराच्या मजूरवस्तींतील व्हायबर्ग भागांत आपलें मुख्य ठाणें हलविलें. ता. ३ ऑगस्ट रोजीं फरारी लेनिनवर देशद्रोहाचा व सरकारविरुद्ध सशस्त्र बंड उभारल्याचा आरोप ठेवण्यांत आला व शहरांतील सर्व पोलिसखातें त्याच्या शोधाच्या मागें लागलें. लेनिनच्या शोधाकरितां कुत्र्यांचाही उपयोग करण्यांत आला. इतकेंही करून लेनिनचा पत्ता लागेना त्या वेळीं तो परदेशीं गेला असला पाहिजे असाही कित्येकांनीं तर्क केला.

बोल्शेव्हिकांनीं यापुढें कोणतें धोरण स्वीकारावें याचा विचार करण्याकरितां व्हायबर्ग कमिटीच्या सभा वरचेवर भरत होत्या. या सभांपैकींच एका सभेंत एका आशावादी दोस्तानें कांहीं झालें तरी शेवटीं लेनिनच मुख्य प्रधान होणार असे उद्गार काढले. शहरांत कोणकोणत्या चळवळी चालू आहेत याची वित्तंबातमी देण्याचें काम शॉटमन नांवाचा दोस्त करीत असे. या दोस्तानें वरील गोष्ट सहज लेनिनपाशीं बोलून दाखविली. लेनिन या वेळीं एका झाडाच्या बुंधावर बसून "बोल्शेव्हिक आपल्या हातीं राज्यसत्ता राखूं शकतील काय?" या नांवाचें पत्रक लिहीत होता. शॉटमननें सांगितलेली वरील हकीगत ऐकतांच "असें झालें तर त्यांत कांहींच आश्चर्य नाहीं." असें तो म्हणाला. ट्रॉट्स्कीसारखे बोल्शेव्हिक पक्षाबद्दल सहानुभूति दाखविणारे लोक तुरुंगांत डांबले गेले होते व पेट्रोग्राडमध्यें आपण बोल्शेव्हिक आहों असें सांगण्याचीही कोणाला सोय राहिली नव्हती. अशा परिस्थितींतही लेनिनचा आत्मविश्वास कायम होता. त्यानें वरील पत्रक लिहिण्याचें काम चालू ठेवलें होतें. हा 'भयंकर' माणूस शहराजवळच कांहीं मैलांवर असलेल्या एका रानांत गवताच्या झोंपडींत वेषान्तर करून राहिला होता. त्यानें आपली दाढी काढून टाकली होती आणि शहरापासून दूर असलेल्या या रानांत राहून पुढील सर्व कारस्थानांची त्यानें तयारी चालविली होती. सर जॉर्ज बुकॅननप्रमाणें हवे तेवढे पैसे खर्च करून सर्वत्र हेरांचें जाळें पसरण्याचें

सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं नव्हतें तरी शहरांतील व रशियाच्या मुख्य मुख्य भागांतील चळवळींची बातमी मिळण्याची तजवीज त्यानें केली होती. रशियांत आजच्या घटकेस हंगामी सरकारचें राज्य नाहीं किंवा सोव्हिएटांचेंही नाहीं. येथें कोणी कोणाला विचारीत नसून जनरल कॉर्निलोव्हच्या नेतृत्वाखालीं काम करणारा लष्करी गटच रशियावर राज्य चालवीत आहे हें त्याला दिसून आलें होतें. जुलैअखेरपर्यंत सोव्हिएटांना विरोध करण्याइतकें सामर्थ्य हंगामी सरकारच्या अंगीं नव्हतें. या वेळीं मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहाल पुढाऱ्यांनीं राज्यसत्ता हातीं घेण्याचें धैर्य दाखविलें असतें तर सर्व सत्ता शांततेनें व कोणत्याही प्रकारचा रक्तपात न होतां सोव्हिएटांना काबीज करतां आली असती. पण ही परिस्थिति आतां पालटली होती. "'सर्व सत्ता सोव्हिटांच्या हातीं आली पाहिजे' या घोषवाक्याला आतां कांहीं अर्थ राहिलेला नाहीं. हल्लींचीं सोव्हिएटें या बाबतींत पूर्ण नादान ठरलीं आहेत. त्यांच्या शहाणपणाचें दिवाळें निघालें आहे. सोशल रेव्होल्यूशनरी व मेन्शेव्हिक पक्षांच्या तीं पूर्ण आहारीं गेलीं आहेत. कसायानें कत्तलखान्याकडे चालविलेल्या जनावरांप्रमाणें त्यांची स्थिति झाली आहे. क्रांतिविरोधी चळवळीला यश मिळालें आहे. अशा परिस्थितींत पुन्हा नव्या क्रांतिलाच हात घालणें जरूरीचें झालें आहे. शेतकरी-कामकरी व सैनिक यांनीं एकत्र येऊन हंगामी सरकार उलथून पाडण्याची वेळ आतां आली आहे. ही क्रांति खरोखर सोव्हिएटांनींच करावयाची आहे; पण या सोव्हिएटांत हंगामी सरकारशीं तडजोड करणारीं सोव्हिएटें मात्र आढळणार नाहींत. क्रांतिकारी युद्धाचा पुरस्कार करणारीं अशींच हीं सोव्हिएटें असतील."

लेनिननें लपून बसलेल्या आपल्या जागेंत लिहिलेल्या पत्रकांत वरील विचार प्रदर्शित केले होते. याच सुमारास पेट्रोग्राडच्या व्हायबर्ग भागांत बोल्शेव्हिक कॉंग्रेसचें अधिवेशन भरविण्यांत आलें. १९०७ सालीं भरलेल्या बोल्शेव्हिक कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतर भरलेल्या अधिवेशनांत हेंच अधिवेशन अत्यंत महत्त्वाचें ठरलें. हें अधिवेशन भरविण्याच्या कामीं स्टॅलिननें पुढाकार घेतला होता. लेनिनची विचारसरणी व त्याचें धोरण या अधिवेशनापुढें स्पष्टपणें मांडण्याची जबाबदारी स्टॅलिननें आपल्या अंगावर घेतली होती.

लेनिनचा गुप्तसंदेशवाहक दोस्त शॉटमन यानें लेनिनचें वरील पत्रक या अधिवेशनापुढें सादर केलें. त्यामुळें स्टॅलिनला एक प्रकारची मदतच झाली. स्वेर्डलोव्ह स्टॅलिनलाच मदत करीत होता. उरल प्रांतांतील कोळशाच्या खाणींतील व लोखंडाच्या कारखान्यांतील कामगारवर्गांत स्वेर्डलोव्ह अत्यंत लोकप्रिय झाला होता. तिकडील कामगार त्याला 'याशा' या टोपण नांवानें संबोधीत. 'याशाची मूर्ति ठेंगणी व किरकोळ होती. पण त्याचा आवाज जबरा होता. झारच्या कारकीर्दीत उरल प्रांतांत गुप्तपणानें राहून तेथील कामगारवर्गाची त्यानें संघटना केली होती. गुप्तकटवाला व कामगारांचा पुढारी म्हणून त्याची प्रसिद्धि होती. याशानें या अधिवेशनाच्या वेळीं एक चूक केली व त्याचें फळ लेनिनप्रभृतींनाही भोगावें लागलें. लेनिननें पाठविलेल्या पत्रकांतील सूचनांना उद्देशून तो म्हणाला कीं, "भाई हो, लेनिन आज आपल्यांत केवळ चैतन्यरूपानेंच वावरत नसून आपल्याबरोबर एका दृष्टीनें तो या अधिवेशनाच्या कामांत भागही घेत आहे." याशा ही गोष्ट सहज बोलून गेला खरा, पण हंगामी सरकारच्या वर्तमानपत्रांनीं ताबडतोब "पेट्रोग्राडमध्यें लेनिन" असे अगडबंब मथळे देऊन ही गोष्ट जाहीर केली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रसिद्ध झालेल्या वर्तमानपत्रांतून ही बातमी सर्वत्र पसरली. पोलिसही सावध झाले. लेनिनवर पुन्हा हें एक मोठें संकटच आलें. लेनिननें यापुढें रशियांत राहतां कामा नये, त्यानें ताबडतोब फिनलंड गांठलें पाहिजे असें ठरविण्यांत आलें. लेनिनला फिनलंडमध्यें सुरक्षितपणें पोंचविण्याची सर्व जबाबदारी शॉटमननें आपल्या अंगावर घेतली. केसांचा टोप घालून लेनिनला स्त्रीवेष द्यावा व सेस्ट्रोरेट्स्क कारखान्यांतील एका कामगाराचे कागदपत्र त्याच्याबरोबर देऊन सामान्य माणसाप्रमाणें सरहद्दीपलीकडे त्याला नेऊन पोंचवावें अशी कल्पना प्रथम निघाली होती. परंतु सरहद्दीवर ठेवण्यांत आलेले कोसॅक पहारेकरी प्रत्येक उतारूची कसून तपासणी घेतात व फोटोंतील चेहऱ्याशीं सरहद्द ओलांडूं पाहणाऱ्या इसमाचें सादृश्य आहे कीं नाहीं हें ते सूक्ष्मपणें पाहतात असें समजून आल्यामुळें ही कल्पना रहित करण्यांत आली. नंतर आगगाडीच्या एंजिनचा फायरमन म्हणून त्यानें सरहद्द ओलांडावी असें ठरविण्यांत आलें. आपल्या फायरमनापैकीं एकाला रजा देऊन त्या जागीं लेनिनची अर्थात् वेषान्तर करून

योजना करण्यास सरहद्दीकडे जाणाऱ्या गाडीचा एंजिन ड्रायव्हर तयार झाला. शॉटमनची ही युक्ति सफल झाली. पेट्रोग्राडजवळील आपल्या एकान्तांतील झोंपडींतून निघून सरहद्दीकडील गाडी गांठण्याच्या कामीं लेनिनला व त्याच्याबरोबरच्या दोस्तांना अतिशय हाल सोसावे लागले. रात्रीं जंगलांतून व कांट्याकुट्यांतून जातांना त्यांची वाट चुकली. तथापि मोठ्या मुष्किलीनें ठरलेल्या जागीं लेनिन व झिनोव्हिफ गाडीची वाट पहात बसले. गाडी या ठिकाणीं येऊन दाखल झाल्याबरोबर शॉटमन तेथें ताबडतोब खालीं उतरला. त्या ठिकाणीं रखवालीस असलेल्या शिपायांना त्यानें आपल्याशीं बोलण्यांत गुंतविलें व इकडे लेनिननें गाडीच्या एंजिनच्या पुढच्या डब्यांत उडी मारून फायरमनचें काम करण्यास सुरुवात केली व एंजिनच्या भट्टींत लाकडाचे ओंडके व कोळसे भरण्यांत तो गुंग होऊन गेला. या गडबडीचा फायदा घेऊन झिनोव्हिफला गाडींत चढण्याचें साधलें नाहीं. त्यानें पुन्हा पेट्रोग्राडचा मार्ग धरला व एका गुप्त जागेंत तो लपून राहिला. लेनिन मात्र फिनलंडला सुरक्षितपणें पोंचला व हेल्सिंगफोर्स येथें एका सोशालिस्ट पोलिस अधिकाऱ्यानें त्याला आपल्या घरीं आश्रय दिला.

क्रांतिविरोधी लोकांचा आज जय झाल्यासारखा दिसत आहे, पण तो क्षणिक आहे ही गोष्ट लेनिन पूर्णपणें जाणून होता आणि या आत्मविश्वासामुळेंच लेनिनचें समचित्तत्व असल्या गडबडीच्या दिवसांतही ढळूं शकलें नाहीं. लेनिन हेल्सिंगफोर्स येथें एका सोशालिस्ट पोलिस अधिकाऱ्याच्या घरीं राहात असतांनाच स्वित्झर्लंडमध्यें लिहावयास घेतलेलें "सरकार व क्रांति (स्टेट ॲन्ड रेव्होल्यूशन)" हें पुस्तक लिहून संपलें. झुरिच् येथील ग्रंथालयांत लेनिन वाचावयास जात असे त्या वेळीं त्यानें हें पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली होती. यानंतर मध्यंतरीं किती तरी गडबडीचे दिवस गेले होते. रशियांत क्रांति झाल्याची बातमी ऐकून स्वदेशांत येण्यासंबंधानें त्यानें जर्मन सरकारशीं वाटाघाटी केल्या. रशियांत आल्यावर आपली क्रांतिकारी विचारसरणी आपल्या पक्षांतील लोकांना व कामगारजनतेला समजावून देण्याकरितां त्याला अतोनात श्रम करावे लागले. हें काम चालू असतां त्याच्या प्रतिपक्षानें व प्लेखानोव्हसारख्या खुद्द त्याच्या जुन्या

१७

दोस्तांनींही त्याला वेडयांत काढलें. यानंतर लेनिन हा जर्मन सरकारचा पगारी हस्तक आहे असा भयंकर आरोप त्याच्यावर ठेवण्यांत आला. या प्रसंगीं तर त्याच्या अंतःकरणाला अतोनात वेदना झाल्या. या प्रसंगानंतर त्याला रशियांतच कधीं तबेल्याच्या माळ्यावर तर कधीं गवतानें झांकलेल्या झोंपडींत दिवस काढावे लागले; आणि पुढें तेथूनही त्याला पळ काढून रशियाबाहेर फिनलंडमध्यें हेल्सिंगफोर्स येथें एका पोलिस अधिकाऱ्याचा पाहुणचार घ्यावा लागला. पण इतक्या सर्व खळबळींत आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याचें लेखनकार्य अव्याहत चालू होतें. हें पुस्तक लिहीत असतांना राज्यसत्तेंत घडून येणारीं स्थित्यंतरें तो प्रत्यक्ष पाहात होता. लोकसत्ताक राज्यपद्धति ही काय चीज आहे हें तो प्रत्यक्ष अनुभवीत होता. लेनिननें या पुस्तकांत दुसऱ्या अनेक ग्रंथांचे आधार दिले आहेत, पण त्याशिवाय प्रत्यक्ष अनुभविलेले सिद्धान्त त्याला या पुस्तकांत मांडतां आल्यामुळें त्याचा हा ग्रंथ खरोखरच अत्यंत अप्रतिम झाला असून राजकारण विषयांतील एक प्रमाणभूत ग्रंथ म्हणून त्याच्या या ग्रंथाची ख्याति झाली आहे. हेल्सिंगफोर्स येथें राहावयास गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं या ग्रंथाचें शेवटचें प्रकरण लेनिन लिहूं लागला असतांना त्यानें हें प्रकरण पुढील विचार ग्रथित करून एकाएकीं संपविलें आहे. "क्रांतीसंबंधानें आतां यापुढें लिहीत बसण्यापेक्षां क्रांतीचा प्रत्यक्ष अनुभव घेत राहणेंच अधिक उपयुक्त व अधिक आल्हादकारक आहे."

केरेन्स्की व कॉर्निलोव्ह यांच्यांत सर्वाधिकारित्वाबद्दल स्पर्धा लागली व कॉर्निलोव्हचें धाडस फुकट गेलें, हें मागें सांगितलेंच आहे. रशियन राज्यक्रांतींतील हा एक महत्त्वाचा प्रसंग होता. या प्रसंगामुळें या क्रांतीला एक निराळीच कलाटणी मिळाली. बोल्शेव्हिकांना पुन्हा उघडपणें आपल्या चळवळी सुरू करण्यास वाव मिळाला. जनतेवरील त्यांचें वजन पुन्हा वाढत चाललें. रशियांतील स्थानिक सोव्हिएटांमधून बोल्शेव्हिकांचे बहुसंख्य प्रतिनिधी निवडून आले आणि खेड्यांतील सोव्हिएटांमध्येंही त्यांचा अधिकार मानण्यांत येऊं लागला. हेल्सिंगफोर्समध्यें असतांना लेनिननें या सर्व बदलणाऱ्या परिस्थितीचें चांगलें आकलन केलें असल्यामुळें सर्व बाजूंनीं खालावलेल्या हंगामी सरकारविरुद्ध बंडाची तयारी करण्याची वेळ जवळ

येत चालली आहे, असें त्यानें बोल्शेव्हिकांच्या पेट्रोग्राडमधील सेंट्रल कमिटीला कळविलें. ता. १० सप्टेंबर रोजीं तर आपल्या दोस्तांच्या परवानगीची वाट न पाहतां त्यानें हेल्सिंगफोर्स सोडलें व पेट्रोग्राडजवळील एका बाजूच्या भागांत तो गुप्तपणें येऊन राहिला. एक आठवड्यानंतर तो प्रत्यक्ष पेट्रोग्राडमध्येंच दाखल झाला. पण अद्यापि त्यानें आपल्या हालचाली अत्यंत गुप्तच राखल्या होत्या. रशियांत या वेळीं ताबडतोब बंडाचें निशाण उभारलें पाहिजे असें लेनिनला वाटूं लागलें होतें व त्याप्रमाणें या बंडाच्या तयारीलाही तो लागला होता. मास्को येथील सोव्हिएटांत बोल्शेव्हिकांचें बहुमत झालें होतें. ट्रॉट्स्की तुरुंगामध्यें असतांनाच ऑगस्टमध्यें बोल्शेव्हिक पक्षाला पूर्णपणें येऊन मिळाला होता. पेट्रोग्राडमधील सोव्हिएटांनीं त्यालाच आपला अध्यक्ष निवडलें व लष्करी क्रांतिकारी कमिटीचेंही अध्यक्षपद बोल्शेव्हिकांनीं त्यालाच समर्पण केलें. ही लष्करी (मिलिटरी) क्रांतिकारी कमिटी बोल्शेव्हिकांनीं उघडपणें स्थापन केली होती. त्यांच्या या कृत्याला कोणीही कायदेशीर रीत्या अडथळा करूं शकलें नाहीं. रशियांतील सर्व लष्करी व आरमारी पलटणींशीं या कमिटीनें आपले संबंध जोडले होते. सोव्हिएटांनीं अधिकृत रीत्या या कमिटीला मान्यता दिली होती. या कमिटीनें लष्कराशीं व आरमाराशीं आपले संबंध वाढविले होते, त्याचप्रमाणें सामान्य शेतकरी-कामकरी जनतेची संघटना करण्याचेंही कार्य तिनें आपल्या अंगावर घेतलें होतें. याप्रमाणें भावी क्रांतीची तयारी खूप जोरानें चालू झाली होती. बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती कमिटीतर्फे या तयारीचीं सर्व सूत्रें हलत होतीं व स्टॅलिन, स्वेर्डलोव्ह, सोकोल्निकोव्ह, झरझिन्स्की, व बुबनोफ वगैरे मध्यवर्ती कमिटींतील बोल्शेव्हिकांच्या कर्तृत्ववान् पुढाऱ्यांनीं हें सर्व काम अत्यंत दक्षतेनें व फारसा गवगवा न करतां चालविलें होतें.

रशियांत या वेळीं घटना परिषद् (कॉन्स्टिटयूअंट असेंब्ली)च्या निवडणुकी चालू होत्या. या निवडणुकींत बोल्शेव्हिकांचेंच बहुमत होणार हें उघड होतें. तथापि सोशल रेव्होल्यूशनरी पक्षावर परंपरागत विश्वास ठेवीत असलेला प्रचंड शेतकरीसमाज या पक्षांतील लोकांनाही निवडून आणणार असें उघड दिसत होतें. परंतु शेवटीं कांहीं झालें तरी सोव्हिएटांच्या दुसऱ्या अखिल

रशियन कॉंग्रेसमध्यें बोल्शेव्हिकांचें व सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहाल गटाचें बहुमत होणार ही गोष्टही ठरून गेली होती. याप्रमाणें आपला पक्ष बहुमतानें निवडून येणार असें दिसत असतांही ऑक्टोबर २३ रोजीं झालेल्या बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीच्या सभेंत बंडाचें निशाण ताबडतोब उभारलें पाहिजे, अशी सूचना लेनिननें आणली. मेन्शेव्हिक सुखानोव्हच्या बिऱ्हाडीं मध्यवर्ती कमिटीची ही सभा भरली होती. सुखानोव्ह मेन्शेव्हिक होता; पण त्याची पत्नी बोल्शेव्हिक होती म्हणून त्याच्या घरीं ही सभा भरूं शकली. लेनिनच्या वरील सूचनेला या सभेंत बराच विरोध झाला. कॉन्स्टिटयूअंट असेंब्लीच्या निवडणुकीचें काय होतें तें पाहावें व मग बंडाला हात घालावा, असें कामेनेव्ह व झिनोव्हिफ यांचें म्हणणें होतें. परंतु लेनिन व मध्यवर्ती कमिटींतील त्याचे इतर दोस्त यांनीं बंडाचें निशाण उभारण्याची हीच आणीबाणीची व योग्य वेळ आहे असें ठरविलें. मध्यवर्ती कमिटींतील हा मतभेद आंतल्या आंत दबून राहणें शक्यच नव्हतें. गॉर्कीच्या 'नवजीवन' पत्रांतून या मतभेदाला तोंड फुटलें. लेनिनला या गोष्टीचा अर्थात्च राग आला व त्यानें या दोघां भाईंना आपल्या पक्षांतून काढून लावण्याबद्दल मध्यवर्ती कमिटीपुढें सूचनाही आणली. पण इतर मंडळींनीं बरीच मनधरणी केल्यामुळें त्यानें ही सूचना मागें घेतली. बंडाचें निशाण उभारण्यास हीच योग्य संधि आहे, या वेळीं हयगय करण्यांत आल्यास आपल्यावर पराजयाचा प्रसंग आल्याशिवाय राहणार नाहीं या निर्णयाला लेनिन कसा येऊन पोंचला याचें विवेचन त्याच्याच शब्दांत देणें अधिक चांगलें. "क्रांतीचें बंड यशस्वी व्हावयाचें असेल तर कोणत्याही गुप्तकटवाल्यांनीं किंवा कोणत्याही एखाद्या पक्षानें त्याच्या हालचालींचीं सूत्रें चालवितां कामा नये. समाजांतील पुढारलेल्या वर्गानेंच हें काम हातीं घेतलें पाहिजे. क्रांतिकारी भावना जनतेच्या मनांत उत्कटत्वानें उद्भूत झाल्या असतील त्याच वेळीं बंडाचें निशाण उभारण्यांत यावें. क्रांतीच्या चळवळीला ऐतिहासिक दृष्टया सामर्थ्य प्राप्त झालें असेल अशाच आणीबाणीच्या प्रसंगीं क्रांतीचें निशाण उभारावें. समाजांतील पुढारलेल्या व क्रांतीला उन्मुख झालेल्या जनतेचें सामर्थ्य वाढीस लागलें आहे व तिच्या शत्रुपक्षाची बावरल्यासारखी स्थिति झाली आहे अशीच

वेळ क्रांतीला अत्यंत उचित आहे असें समजावें. परंतु याप्रमाणें सर्व परिस्थिति अनुकूल असतांना या क्रांतीशीं आपला कांहीं संबंध नाहीं, असें म्हणणें म्हणजे कम्युनिझम् (मार्क्सवाद) व क्रांतिवाद यांचा विश्वासघात करण्यासारखेंच आहे.'' लष्करी दृष्ट्या यशस्वी क्रांतीचीं लक्षणें लेनिननें पुढीलप्रमाणें सांगितलीं आहेत. "ताबडतोबीचा निर्णय, अधिक बलशाली लष्करी सामर्थ्य, चढाईचें धोरण, आकस्मिकपणें शत्रूवर चढाई करणें व धैर्यानें शत्रूशीं दोन हात करण्यास तयार असणें.'' क्रांति यशस्वी व्हावयाची असल्यास वरील लक्षणांची परिपूर्ति होईल अशी तयारी आपण केली पाहिजे, असें लेनिनचें म्हणणें होतें.

बोल्शेव्हिक पक्षाचे लोक नव्या क्रांतीच्या तयारीला लागले आहेत ही गोष्ट आतां झांकून राहिलेली नव्हती. शहराच्या संरक्षणार्थ ठेवलेल्या पलटणींतील सैनिक, कारखान्यांतील कामगार व ठिकठिकाणच्या कामगारमंडळांचे सभासद यांच्या सभांतून व वर्तमानपत्रांतून या विषयासंबंधानें उघड उघड चर्चा चालू झाली होती. हें क्रांतीचें निशाण कोणत्या घटकेला उभारावयाचें व कोणत्या पद्धतीनें तें उभारावयाचें एवढीच गोष्ट काय ती आतां गुप्त राहिली होती. पेट्रोग्राडच्या लष्करी कमिटींतील बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचा लेनिननें या बाबतींत सल्ला घेतला होता. आरमारांतील बहुतेक सर्व सैनिक व लष्करांतील बऱ्याचशा तुकड्या आपल्या बाजूच्या असल्या तरी आपण थोडा दम काढला पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. लेनिनला ही गो पसंत नव्हती. या लोकांचें म्हणणें ऐकायला लेनिन तयार नव्हता. क्रांतीचें निशाण उभारण्याची हीच वेळ आहे, असें त्याचें अंत:करण त्याला सांगत होतें. आपल्या आत्मविश्वासाच्या बळावर लेनिननें आपल्या लष्करी सल्लागारांना ही गोष्ट पटवून दिली व लेनिनच्या सांगण्याप्रमाणें तेही क्रांतीच्या तयारीला लागले. कामेनेव्ह व झिनोव्हिफ यांनीं आपले मतभेद बाजूला ठेवून आपल्या पक्षाच्या शिस्तीला मान तुकविली आणि दुसरे दिवशीं क्रांतीचा उठाव केला पाहिजे असें ६ नोव्हेंबर रोजीं लेनिननें मध्यवर्ती कमिटीला कळविलें. लेनिन पेट्रोग्राडमध्यें आतांपर्यंत लपूनच राहिला होता. पण या दिवशीं संध्याकाळीं बऱ्याच उशीरां त्यानें आपल्या अज्ञात स्थानाचा

त्याग केला व बोल्शेव्हिकांचें नवें मुख्य ठाणें स्मोल्नी इन्स्टिटयूट या ठिकाणीं तो दाखल झाला. "रशियांतील क्रांति यशस्वी व्हावयाची असेल तर रशियांतील कामगारांनींच ती क्रांति घडवून आणली पाहिजे." असें अठ्ठावीस वर्षांपूर्वी प्लेखानोव्हनें म्हटलें होतें. प्लेखानोव्हची ही भविष्यवाणी खरी होण्याची वेळ आतां येऊन ठेपली होती.

# ऑक्टोबर क्रान्ति

नोव्हेंबर ७ (रशियन कॅलेंडरप्रमाणें २५ ऑक्टोबर* ) रोजीं सकाळीं ठरल्याप्रमाणें पेट्रोग्राड सोव्हिएटांचें सशस्त्र लष्कर ठिकठिकाणीं जमा झालें व पोस्ट ऑफिसें व तार ऑफिसें, सर्व रेल्वे स्टेशनें व सरकारी इमारती त्यानें ताब्यांत घेतल्या. हंगामी सरकारचें मुख्य ठाणें विंटर पॅलेसमध्यें होतें व याच ठिकाणीं फक्त प्रतिकाराचा देखावा करण्यांत आला. क्रॉन्स्टॅटहून आलेल्या 'आरोरा' नांवाच्या लाइट क्रूझरनें विंटर पॅलेसच्या संरक्षणाच्या कामीं हंगामी सरकारला मदत करण्याऐवजीं नेव्हामध्यें नांगर टाकून राहावें कां समुद्रावर निघून जावें, असा सल्ला त्यावरील अधिकाऱ्यांनीं स्मोल्नीमधील बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना विचारला. कॉर्निलोव्हनें ऑगस्टमध्यें पेट्रोग्राडवर चाल करण्याचें ठरविलें त्या वेळीं विंटर पॅलेसचें रक्षण करण्याकरितां हें क्रूझर सज्ज ठेवण्यांत आलें होतें. पण या वेळीं क्रूझरावरील नाविकांनीं बोल्शेव्हिक पुढाऱ्यांशीं संगनमत केलें व विंटर पॅलेसची काळजी करीत न बसतां बोल्शेव्हिकांच्या मिलिटरी रेव्होल्यूशनरी (लष्करी क्रांतिकारी) कमिटीकडून पुढें कोणता हुकूम येतो याची वाट पाहात बसले. आरोरावरील नाविकांनीं विचारल्याप्रमाणें नेव्हामध्येंच या क्रूझरनें नांगर टाकून राहावें असा हुकूम देण्यांत आला आणि हें क्रूझर केरेन्स्कीच्या सरकारला उपयोगी पडण्याऐवजीं बोल्शेव्हिकांनाच एक रेडियो स्टेशन या नात्यानें उपयोगी पडलें. शिवाय प्रसंग आल्यास प्रत्यक्ष युद्धाच्या कामींही त्याचा उपयोग करण्याचें लष्करी क्रांतिकारी कमिटीनें ठरविलें होतें.

नोव्हेंबर ७ रोजीं क्रांतिकारी बोल्शेव्हिक राजधानी काबीज करण्याचा प्रयत्न करणार हें समजल्यावर हंगामी सरकारच्या अधिकाऱ्यांनींही तिच्या संरक्षणा-

---

* म्हणून या क्रांतीस 'ऑक्टोबर क्रान्ति' म्हटलें जातें. क्रांतीनंतर १९१८ च्या फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेपासून सोव्हिएट सरकारनें रशियांत नवें युरोपियन (ग्रेगोरियन) कॅलेन्डर सुरू केलें व जुनें रशियन कॅलेंडर रद्द केलें.

करितां आपल्यापरीनें प्रतिकाराची व्यवस्था केली होती. राजधानीमधील लष्करी शाळांतील तरुणांना युद्धाकरितां तयार राहण्याचा हुकूम देण्यांत आला होता. आजुबाजूच्या लष्करी ठाण्यांवरून तुकड्या बोलावण्यांत आल्या होत्या. पाव्हलोव्हस्कहून तोफांच्या गाड्या बोलावण्यांत आल्या होत्या. उत्तर सरहद्दीवरील आघाडीवरून विश्वास ठेवण्यालायक सैन्याच्या तुकड्या राजधानीकडे ताबडतोब पाठविण्याबद्दल कळविण्यांत आलें होतें व लष्करी सावधगिरीच्या दृष्टीनें विंटर पॅलेसवरील लष्करी पहारा वाढवावा, नेव्हावर तात्पुरते पूल उभे करावे, पोलिसांनीं सर्व मोटारींची पाहणी करावी, स्मोल्नी इन्स्टिटयूटशीं असलेला टेलिफोनचा संबंध तोडून टाकावा, असेही हुकूम देण्यांत आले होते. न्यायखात्याचे प्रधान मॅलियांटोविच यांनीं शहरांतील सर्व बोल्शेव्हिकांना ताबडतोब पकडण्यांत यावें असहि हुकूम दिले होते. पण हे सर्व हुकूम जागच्या जागींच राहिले. त्यांची अंमलबजावणी होऊं शकली नाहीं हें पाहून हंगामी सरकारच्या अधिकाऱ्यांपैकींच एकानें "हंगामी सरकारचे दिवस आतां भरले आहेत." असे उद्गार काढले. हंगामी सरकारच्या अधिकाऱ्यानें काढलेले हे उद्गार अगदीं सार्थ होते. सुरुंगाची वत्ती जळत जातां जातां शेवटीं एकदम स्फोट होतो. रशियन राज्यक्रांतीचें अगदीं असेंच झालें. हंगामी सरकारचे अधिकारी ही गोष्ट प्रत्यक्ष पाहातच होते; तेव्हां त्यांनीं वरील आशयाचे उद्‌गार काढले यांत कांहींच आश्चर्य नाहीं. रशियांतील कामकरी जनतेचा असंतोष शीगेला पोंचला होता. रशियांतील सर्व सोव्हिएटें बोल्शेव्हिकांना येऊन मिळालीं होतीं. लष्करांतील सैनिक प्रक्षुब्ध झाले होते. देशांतील शेतकरी जमीनदारांवर तुटून पडत होते. राष्ट्रीय चळवळीलाही भरती आली होती. भांडवलदार व सत्ताधारी वर्गाचे लोक घाबरून गेले होते व शेवटच्या क्रांतीचा बार केव्हां उडवावयाचा यासंबंधानें खुद्द बोल्शेव्हिकांतही खूप चर्चा चालू होती. अशा सर्व तयारीनंतरच नोव्हेंबर ७ च्या क्रांतीला सुरुवात झाली. यामुळें या क्रांतीच्या प्रसंगीं युद्धाच्या चकमकी, रक्तपात, तोफांच्या सरबत्त्या, दंगेधोपे वगैरे मनाला थरारून टाकणारे प्रकार कांहींच घडून आले नाहींत.

नोव्हेंबर ७ रोजीं बोल्शेव्हिकांच्या लष्करी क्रांतिकारी कमिटीनें

ठरल्याविप्रमाणें लाल लष्कराच्या साहाय्यानें तिनें सर्व राजधानी ताब्यांत घेतली. नोव्हेंबर ७ रोजीं सकाळीं या क्रांतीच्या हाल-चाली सुरू झाल्या. सकाळीं लोक आपापल्या घरांतून बाहेर पडतात तोंच 'कामगार व सैनिक' या बोल्शेव्हिक वृत्तपत्रांत लेनिनचा जाहीरनामा प्रसिद्ध झालेला त्यांनीं पाहिला. या पत्राच्या मुखपृष्ठावर रशियांतील नाग-रिकांना उद्देशून पुढील मजकुराचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला होता:—

"हंगामी सरकार उलथून टाकण्यांत आलें आहे.... ज्या ध्येयाकरितां रशियांतील लोक आजवर झगडत होते तें आतां सिद्धीस गेलें आहे. लोकसत्ताक राज्यपद्धति, शांततेची ताबडतोब प्रस्थापना, जमीनदारांची जमिनीवरील मालकी नाहींशी करणें, उत्पादनाच्या साधनांवर कामगारांचा ताबा व सोव्हिएट सरकारची स्थापना या गोष्टी ताबडतोब अंमलांत आण-ण्याचें ठरविण्यांत आलें आहे. सैनिक, कामकरी व शेतकरी यांची ही क्रांति चिरायु होवो."

स्मोल्नी इन्स्टिटयूटमधील एका खोलींत लेनिननें हा जाहीरनामा तयार केला व त्याच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ७ रोजीं लष्करी क्रांतिकारी कमिटीनें क्रांतीच्या हालचाली कशा कराव्या याच्याही सूचना त्यानें लिहून काढल्या. प्रत्यक्ष क्रांतीच्या दिवशीं तर बोल्शेव्हिकांच्या या ठाण्याकडे संदेशवाहक सैनिकांच्या सारख्या येरझाऱ्या चालू होत्या. ठिकठिकाणच्या विजयाच्या बातम्या या ठिकाणीं येऊन थडकत होत्या. अमक्या ठिकाणीं क्रांतिकारी सैनिकांना अमुक प्रकारची मदत पाहिजे, अमुक ठिकाणावर क्रांतिकारकांनीं हल्ला चढविला, अमुक ठिकाणची माहिती अद्यापि याव-याची आहे वगैरे अनेक बातम्या घेऊन संदेशवाहक क्षणोक्षणीं या ठिकाणीं दाखल होत होते. संध्याकाळच्या सुमारास पेट्रोग्राड सोव्हिएटांची जाहीर सभा झाली. या सभेला लेनिन हजर होता. तो प्लॅटफॉर्मवर चढतो न चढतो इतक्यांत आरोरा क्रूझरनें विंटर पॅलेसवर तोफांची सरबत्ती सुरू केल्याचें त्यानें ऐकलें. आरोरा क्रूझर आतां क्रांतिवाल्यांना येऊन मिळालें होतें. हंगामी सरकार क्रांतिवाल्यांचा यापुढें प्रतिकार करूं शकत नाहीं ही गोष्ट आतां सिद्ध झाली होती. आरोरा क्रूझरची तोफांची सरबत्ती व

सभेंत जमलेल्या लोकांच्या टाळ्यांचा प्रचंड कडकडाट या दोन्हींनीं सर्व वातावरण दुमदुमून गेलें. पण लेनिनचें भाषण सुरू झाल्याबरोबर सर्वत्र एकदम शांतता पसरली. आज काय घडून आलें आहे व आतां पुढें काय करावयाचें आहे याची माहिती लेनिननें या सभेंत करून दिली. लेनिन या सभेंत उभें राहून बोलत होता. मोजक्या शब्दांत व निश्चयी स्वरांत तो आपलें म्हणणें लोकांपुढें मांडीत होता. त्याचा एकेक शब्द लोकांच्या अंतःकरणाचा ठाव घेत होता. पण जमलेल्या लोकांपैकीं किती जण लेनिनला ओळखत होते, हें सांगतां यावयाचें नाहीं. फेब्रुवारीच्या क्रांतीनंतर लेनिन एप्रिलच्या आरंभीं फिनलंड स्टेशनमध्यें दाखल झाला त्यापूर्वीं लेनिनचें नांवही कित्येकांना माहीत नव्हतें. जुने बोल्शेव्हिक त्याला ओळखीत होते. 'प्रवदा' पत्राच्या पुष्कळ वाचकांनीं त्याचे लेख वाचले होते. त्याच्या शत्रूंना मात्र तो पक्का माहीत होता व गुप्त पोलिस तर त्याला पूर्णपणें जाणून होते. एप्रिलनंतर जवळ जवळ तीन महिने तो पेट्रोग्राडमध्यें मोकळेपणानें फिरत होता. पण त्यानंतर पुन्हा त्याला लपून राहावें लागलें आणि अगदीं थोडयाच दिवसांपूर्वीं तो पुन्हा पेट्रोग्राडला आला खरा, पण या वेळींसुद्धां अर्धवट लपूनच त्याला आपलें सर्व काम करावें लागत होतें. अशा परिस्थितींत पेट्रोग्राडमधील सामान्य कामगारसमाज त्याला कसें ओळखणार? तथापि लेनिनचें या सभेंतील भाषण अत्यंत परिणामकारक झालें. पेट्रोग्राडमधील कामगारांना लेनिनची पुरी ओळख नव्हती. परंतु लेनिनला मात्र त्यांच्या अंतःकरणाची पूर्ण ओळख झाली होती. यामुळें या सभेंत कामगारांना अगदीं जें काय पाहिजे होतें तेंच तो बोलत होता. या सभेंत लेनिन आपल्याला कसा दिसला, तो काय बोलला व त्याच्या भाषणाचा लोकांवर काय परिणाम झाला याचें या सभेंत हजर असलेल्या एका स्त्रीनें केलेलें वर्णन वाचनीय आहेः—

"एक ठेंगणासा मनुष्य प्लॅटफॉर्मवर चढला. त्याचें तें दणकट शरीर, रुंद खांदे व हजामत केलेला चेहरा पाहून मी चकीतच झालें. 'कां बरें तो कोणासारखा दिसत असावा' मी विचार करूं लागलें. माझ्या डोक्यांत थोडा प्रकाश पडूं लागला. त्याच्या डोक्याच्या वरच्या भागाला पूर्णपणें

टक्कल पडलें होतें. डोक्याच्या मागच्या बाजूस तांबूस केस दिसत होते. शेतकऱ्याच्या गळ्याप्रमाणें त्याचा गळा रुंद व भरदार होता. त्याच्या चेहऱ्यावर आजारीपणाची पिवळट छटा दिसत होती. त्याच्या गालाचीं रुंद हाडें, त्याचे चमकणारे पिंगट बारीक डोळे व करारीपणा दर्शविणारें त्याचें तोंड याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. त्याचें कसलेलें शरीर, त्याचे रुंद हात हें सर्व पाहिलें म्हणजे सामर्थ्य, विश्वास व मानीपणा यांची तो केवळ मूर्तीच आहे असें मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. त्याच्या तीव्र दृष्टिक्षेपामुळें मी विशेषच आश्चर्यचकित झालें. विशेषतः त्याचा घोगरा आवाज व 'र' चा उच्चार करतांना त्याची होत असलेली मजेशीर गडबड यामुळें माझें चित्त त्याच्याकडे अधिकच वेधलें. लेनिनच्या आवाजांत विशिष्ट प्रकारचें माधुर्य होतें. त्याचें भाषण ऐकूं लागलें म्हणजे त्याच्याबद्दल आपलेपणा वाटे व त्याचें अंतःकरण कळकळीनें भरून गेलें आहे असें आढळून येई. त्याचा करारी चेहरा पाहिला व त्याचा तीव्र व खणखणीत आवाज ऐकला म्हणजे विजयाबद्दल खात्री असलेला आत्मविश्वास, आपलें इच्छासामर्थ्य व करारीपणाच्या आपल्या भावना तो श्रोत्यांच्या अंतःकरणांत संचरवीत आहे असें वाटल्यावांचून राहात नाहीं. बोलावयास उभे राहतांच त्यानें उच्चारलेले पुढील पहिले शब्द मी कधींही विसरणार नाहीं. 'समाजाची नवी उभारणी करण्यास आम्ही आतां सज्ज झालों आहों.' या विचारानें माझें मन काबीज केलें, माझें मन आनंदानें भरून गेलें. माझ्याजवळच एक सैनिक उभा होता. तो उघडच एक शेतकरी होता. त्याची दाढी चांगली लांब होती. एक मोठा कोट त्यानें अंगांत घातला होता. हा शेतकरी सैनिक लेनिनचें भाषण लक्षपूर्वक ऐकत होता. कामगारांच्या या पुढाऱ्याच्या तोंडून त्यानें जेव्हां हें वाक्य ऐकलें तेव्हां त्याच्या गालावरून चांगले टप्पोरे अश्रु ओघळले. दलित वर्गांतील प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांत दडून राहिलेली आशाच हा कामगारांचा पुढारी बोलून दाखवीत आहे असें त्याला वाटलें. गुलामगिरींतून आपण खरेंखुरें मुक्त होऊं, असलीं आशादायक अभिवचनें तो देत होता. खंदकांतून परत घरीं आलेल्या या सैनिकांच्याच डोळ्यांतून केवळ या दिवशीं आनंदाश्रु गळाले नाहींत तर त्या दिवशीं या सभेंतील बरेच लोक या क्रांतिकारी पुढाऱ्याचें

कळकळीचें भाषण ऐकून आनंदानें ढळढळां रडले."

क्रांतीनंतरचा विजयोत्सव करण्यास बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना आतां वेळच राहिला नव्हता. जें कांहीं आपण मिळविलें आहे तें आपल्याकडेच राहील अशी खात्री नाहीं, क्षणभरसुद्धां आपल्याला आतां फुरसत नाहीं, असेंच प्रत्येक जण समजत होता. केरेन्स्कीचा पराभव होऊन तो रशियांतून पळून गेला होता. विंटर राजवाडा बोल्शेव्हिकांच्या ताब्यांत आला होता. या राजवाडयाच्या संरक्षणाकरितां असलेले कांहीं अधिकारी पळून गेले होते व कांहीं शहरांत लपून राहिले होते. ज्या सैनिकांनीं या वेळीं प्रतिकार केला होता त्यांच्या हातांतील हत्यारें काढून घेण्यांत आलीं होतीं. पण एवढ्यावरून बोल्शेव्हिकांचा पूर्ण विजय झाला आहे असें मात्र म्हणतां येत नव्हतें. हंगामी सरकार नष्ट होऊन त्या ठिकाणीं सोव्हिए-टांचें नवें सरकार प्रस्थापित झालें आहे असें जाहीर करणें व त्याप्रमाणें राज्याचीं सर्व सूत्रें सोव्हिएटांनीं हातीं घेणें जरूरीचें होतें. याच दिवशीं रात्रीं ११ वाजतां सोव्हिएटांची दुसरी अखिल रशियन कॉंग्रेस भरवि-ण्यांत आली व रशियाचें नवें सरकार जाहीर करण्यांत आलें. सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील नेमस्त मताचे प्रतिनिधी व मेन्शेव्हिक प्रतिनिधी या परिषदेंतून उठून गेले व आपल्या विरोधाचें त्यांनीं प्रदर्शन केलें. ही कॉंग्रेस स्मोल्नी इन्स्टिटयूटमध्येंच भरली होती. लेनिन या अधिवेशनाच्या प्रारंभीं हजर होता. पुढें कांहीं वेळानें तेथून तो याच इमारतींतील आपल्या खोलींत गेला. या खोलींत त्यानें विश्रांति घेतली नाहीं. रशियांत नवीन स्थापन झालेल्या सरकारची संघटना करावयाची, या सरकारतर्फें निर-निराळीं आज्ञापत्रें काढावयाचीं, दुसऱ्या दिवशींच्या अधिवेशनाच्या वेळीं कोणीं काय बोलावयाचें हें ठरवावयाचें, हीं कामें त्याला करावयाचीं होतीं. लेनिनच्या या खोलींत कांहींच फर्निचर नव्हतें. जमिनी-वर जाजमें पसरलेलीं होतीं व भिंतीच्या बाजूला दोन उशा होत्या. लेनिन व ट्रॉट्स्की या उशा डोक्याखालीं घेऊन भावी सरकारच्या संघटनेचा विचार करीत होते. मेन्शेव्हिक पक्षाचा डॅन नांवाचा पुढारी या कॉंग्रेसमध्यें बोलण्याकरितां उभा राहिला असतां "सध्यां डॅन बोलत आहे, त्याला तुम्ही उत्तर दिलें पाहिजे." असा निरोप

या खोलींत आला. त्या वेळीं ट्रॉट्स्कीनें हें उत्तर देण्याचें काम केलें. प्रत्येक ५।१० मिनिटांनीं कोणी तरी या खोलींत येऊन सभेत त्या वेळीं काय चाललें आहे तें सांगत असे. त्याच वेळीं विंटर राजवाड्यावरील हल्ल्यासंबंधाच्याही बातम्या मधून मधून आल्या व शेवटीं रात्रीं बऱ्याच उशिरां हा राजवाडा पूर्णपणें काबीज करण्यांत आल्याची बातमी आली. या परिषदेंत बोल्शेव्हिकांचेंच बहुमत होतें. परिषदेस हजर असलेल्या ६५० प्रतिनिधींपैकीं ३९० प्रतिनिधी बोल्शेव्हिक पक्षाचे होते. सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील नेमस्त लोक व मेन्शेव्हिक परिषदेंतून उठून गेले तरी या दोन्ही पक्षांतील जहाल मंडळींनीं नवीन सोव्हिएट सरकारलाच पाठिंबा दिला. "बेकायदा मंडळाचे सभासद ठरवून आम्हांला आजवर देशाबाहेर हद्दपार करण्यांत आलें होतें व दूरदेशीं आम्ही कोठेंही भटकत होतों. ही स्थिति आज पालटली आहे. आमचा निर्वासितांचा पक्ष अधिकारारूढ झाला आहे, तेव्हां ही जबाबदारी संभाळणें अत्यंत त्रासाचें काम आहे. कोणाचेंही डोकें फिरून जाईल अशी ही जबाबदारी आहे." असे उद्गार लेनिननें या प्रसंगीं काढले.

दुसरे दिवशीं सकाळीं नव्या सरकारची संघटना तयार करण्यांत आली. लेनिनला या नव्या सरकारचा अध्यक्ष नेमण्यांत आलें व ट्रॉट्स्कीकडे परराष्ट्रीय खात्याचा कारभार सोपविण्यांत आला. लोकप्रधानमंडळ (कौन्सिल ऑफ पीपल्स कॉमिसर्स)–सोव्हिएट नारोड्निक् कोमिसरोव्ह–एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'सॉव्हनारकोम' असें या नव्या सरकारचें नामाभिधान करण्यांत आलें. या सॉव्हनारकोममध्यें बोल्शेव्हिकांशिवाय दुसऱ्या कोणालाही घेण्यांत आलें नाहीं. कामेनेव्ह, झिनोव्हिफ, रायकोव्ह, लुनाचार्स्की, रायझानोफ वगैरे बोल्शेव्हिकांतील प्रमुख बुद्धिमान् पुढारी देशांतील इतर सोशालिस्ट पक्षांशीं संगनमत केल्याशिवाय लेनिनला पाठिंबा देण्यास तयार नव्हते. पण लेनिननें ही अट मानली नाहीं. कांहीं बुद्धिमान् व्यक्तींचीं हीं मतें आहेत, सामान्य जनतेचा याला पाठिंबा नाहीं ही गोष्ट त्यानें पूर्णपणें जाणली होती. नवीन सरकारला थोडें तरी संघटित स्वरूप दिल्यावर त्याचे सर्व जाहीरनामे त्यानें या अधिवेशनांत वाचून दाखविले. कोणाकडून युद्धखर्च घ्यावयाचा नाहीं किंवा

कोणाचा मुलुखही खालसा करावयाचा नाहीं या तत्त्वावर युरोप व आशियांतील रशियाच्या सरहद्दीवरील राष्ट्रांशीं तावडतोब तहाच्या वाटाघाटी करण्यास नवें सरकार तयार आहे, असें एका जाहीरनाम्यांत म्हटलें होतें. 'शांतता, जमीन व भाकरी' यांकरितांच कामकऱ्यांनीं व शेतकऱ्यांनीं या क्रांतीला मदत केली होती. यामुळें क्रांतीनंतर वरील तीन्ही गोष्टी रशियांतील जनतेला प्राप्त करून द्यावयाच्या हें नव्या सरकारचें कर्तव्य होतें. म्हणून तहासंबंधानें या सरकारनें पहिला जाहीरनामा काढला होता. नुकसान भरपाई दिल्याशिवाय जमीनदारांच्या सर्व जमिनी जप्त करण्यांत याव्या असा दुसरा जाहीर हुकूम या सरकारमार्फत काढण्यांत आला होता. हा जाहीर हुकूम सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहाल सभासदांनीं तयार केला होता. बोल्शेव्हिक पक्षाच्या जमिनीबाबतच्या कार्यक्रमाहून हा जाहीर हुकूम बराच भिन्न होता तरी लेनिननें ही गोष्ट मोकळ्या मनानें कबूल केली होती.

"जीवन हा एक उत्तम शिक्षक आहे. कोणाचें म्हणणें खरें आहे, हें हा शिक्षकच दाखवून देईल. एका बाजूनें शेतकरी व दुसऱ्या बाजूनें आम्ही बोल्शेव्हिक या प्रश्नाचा निर्णय करूंच करूं. क्रांतीनंतरच्या या नवजीवनाच्या ओघांत आम्हा दोघांनाही काम करण्यास हें जीवनच आम्हांला भाग पाडील व परस्परसहकार्यानेंच या नव्या सरकारची घटना आम्हांला करावी लागेल. आम्ही या जीवनाचीच कांस धरली पाहिजे आणि या नवजीवनाच्या निर्मितीच्या बाबतींत जनतेला आम्ही पूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे."

लेनिनचे हे विचार अत्यंत मननीय आहेत. लेनिन प्रसंगीं तडजोडीला कसा तयार असे हें वरील जमिनीबाबतच्या जाहीर हुकुमाला त्यानें संमति दिल्यामुळें पूर्णपणें सिद्ध झालें आहे. लेनिननें काढलेला हा जाहीरनामा शेतकऱ्यांच्या स्थानिक कमिट्यांतील सभासदांच्या मतांना अनुकूल असाच होता. शेतकरी सोव्हिएटांची काँग्रेस मात्र या जाहीरनाम्याच्या बाबतींत थोडी विरुद्ध होती. पण देशांत शांतता प्रस्थापित करावयाची असेल तर व देशापुढचा भाकरीचा प्रश्न व जमिनीच्या मालकीचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर वरील प्रकारचें धोरणच स्वीकारणें जरूरीचें आहे, असें लेनिननें या काँग्रेसमधील सभा.

सदांना पटवून दिलें व सॉव्हनारकोममध्यें सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहाल मंडळींपैकीं तीन सभासद घेण्यांत आले.

क्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या या नव्या कामकरी–शेतकरीवर्गाच्या सरकारला भाकरीचाही प्रश्न सोडवावयाचा होता. जे लोक अद्यापि युद्धाची आवश्यकता प्रतिपादन करीत होते त्यांचीं तोंडें या सरकारनें प्रथम बंद केलीं व जे लोक दुसऱ्याच्या श्रमावर जगत होते त्यांना या सरकारच्या राज्यकारभारांत कोठेंही थारा दिला नाहीं. आपण दिलेलीं अभिवचनें ताबडतोब पूर्ण करण्यांत आलीं पाहिजेत याचा ध्यासच जणूं काय लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं घेतला होता. क्रांतीनंतर आपण दिलेलीं अभिवचनें पूर्ण करण्याचे कार्यक्रम या सरकारनें ताबडतोब आंखले व ते पूर्ण अंमलांत आणण्याच्या कामींही ते कटिबद्ध झाले. लेनिन ज्या ठिकाणीं राहिला होता त्या स्मोल्नी इन्स्टिटयूटमध्यें तर सर्वत्र गडबड उडून गेली होती. शहरांतील निरनिराळ्या कारखान्यांतील कामगारांच्या झुंडीच्या झुंडी लेनिनला पाहण्याकरितां या ठिकाणीं सारख्या येत होत्या व जो तो आपापल्या घरांतल्या अडचणी लेनिनपुढें मांडीत होता. स्मोल्नी इन्स्टिटयूटमध्यें या दिवसांत कोणालाही मज्जाव नव्हता. जे जे लोक लेनिनला या वेळीं भेटावयाला आले त्या त्या लोकांशीं लेनिन मोकळ्या मनानें बोलला व त्यांच्या गरजा पूर्ण करण्याची त्यानें तजवीज केली. लेनिनपाशीं कांहीं कामगारांनीं मीठमिरचीकरितां पैसे मागितले तर कोणी कोणी रॉकेलच्या बाटलीचीही मागणी केली. लेनिननें या दिवशीं कोणालाच विन्मुख पाठविलें नाहीं. पण असल्या वैयक्तिक मदतीनें राष्ट्रापुढचे वरील महत्त्वाचे प्रश्न सुटावयाचे नाहींत हें तो जाणून होता; म्हणून जमिनीबाबतचा जाहीरनामा काढल्याबरोबर बँकांचें राष्ट्रीकरण, देशांतील उद्योगधंद्यांवर कामगारांचा ताबा, भांडवलदार लोकांवर काम करण्याची सक्ति वगैरे सर्व कार्यक्रम या क्रांतीनंतरच्या पहिल्या आठवड्यांतच हातीं घेण्यांत आले. नव्या सरकारची अद्याप पुरेशी संघटना झालेली नव्हती व त्याविरुद्ध वर्तन करणाऱ्या लोकांना कडक शासन करण्यासही तें नाखुष होतें. राष्ट्रांतील कोणत्याही वर्गानें आळशी राहतां कामा नये, प्रत्येकानें काम केलेंच पाहिजे,

हा हुकूम भांडवलदारांना जाचक वाटला. पण या हुकुमाला कांहीं लोकांनीं मान्यता दिली नाहीं म्हणून त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा जुलूम मात्र करण्यांत आला नाहीं. या परिस्थितीचा फायदा घेऊन भांडवलदारवर्गांतील कांहीं लोकांनीं नव्या सरकारला मान्यता देण्याचें व त्यांच्याशीं सहकार्य करण्याचें नाकारलें. बँकांतील कारकून, पोस्ट ऑफिसांतील कारकून, टेलिफोनवर काम करणाऱ्या तरुण स्त्रिया यांनीं सोव्हिएट सरकारवर बहिष्कार घालण्याचें ठरविलें व आपापलीं कामें बंद करून त्यांनीं संप केले. लेनिननें या संपवाल्यांना शासन केलें नाहीं; तर उलट या लोकांपैकींच आपल्याला अनुकूल असलेल्या लोकांचें साहाय्य घेऊन व तरुण कामगारांना व त्यांच्या स्त्रियांना या कामाचें तात्पुरतें शिक्षण देऊन सरकारी कामकाज अडूं दिलें नाहीं. यामुळें अर्थात्च हीं सर्व मध्यमवर्गीय मंडळी ताळ्यावर आलीं. पांढरपेशा वर्गांतील हे लोक झारच्या सरकारपुढें भ्याडपणानें नमून राहात असत; पण नव्या जनतेच्या सरकारशीं मात्र आढ्यतेनें वागूं लागले आहेत, हें पाहून लेनिननें 'प्रवदा' पत्रांतून त्यांची चांगली कानउघाडणी केली. आपसांतील युद्धाला सुरुवात करण्याचें या लोकांच्या मनांत होतें. नव्या सरकारबद्दल त्यांना अर्थात्च प्रेम वाटत नव्हतें. पण या युद्धाचें निशाण उभारण्याइतकें मनोधैर्य त्यांच्या ठिकाणीं दिसून आलें नाहीं. वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकीं कांहीं लोक व लष्करांतील कांहीं तरुण अधिकारी यांनीं या वेळीं प्रतिकार करण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नव्या सरकारविरुद्ध या लोकांच्या अंत:करणांत द्वेषाग्नि धुमसत होता, पण भ्याडपणामुळें त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य मात्र त्यांच्यांत नव्हतें. तेव्हां अशा लोकांवर देखरेख ठेवण्याकरितां नव्या सरकारला गुप्त पोलिसखातें ठेवावें लागलें. सोव्हिएट सरकारचें हें गुप्त पोलिसखातें 'चेका' या नांवानें प्रसिद्ध झालें होतें.*

याच वेळीं घटना परिषदे (कॉन्स्टिटयूअंट असेंब्ली) च्या प्रश्नानें उचल खाल्ली. ऑक्टोबर क्रांतीनंतर एका आठवड्यानें या असेंब्लीच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकींत सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाचे लोकच अधिक निवडून आले; निवडणुकीच्या वेळीं जीं मतें देण्यांत आलीं त्यांपैकीं फक्त शें. २५

* हें गुप्त पोलिसखातें सोव्हिएट सरकारनें नुकतेंच बंद केलें आहे.

मतें बोल्शेव्हिकांच्या उमेदवारांना मिळालीं. १८ जानेवारी १९१८ रोजीं या असेंब्लीची सभा भरली. या असेंब्लीनें सोव्हिएट सरकारास मान्यताच देण्याचें नाकारलें. हें सरकार कायदेशीर रीतीनें प्रस्थापित झालें आहे, असें म्हणण्यास या असेंब्लीचे सभासद तयार नव्हते. अशा परिस्थितींत सोव्हि-एट सरकारनें आपल्या अधिकाराखालीं ही असेंब्लीच बरखास्त करून टाकली. घटना परिषदेवरील आपल्या प्रबंधांत या संबंधाचीं कारणें लेनिननें नमूद केलीं आहेत. ८ जानेवारीच्या 'प्रवदा' पत्रांत हा प्रबंध प्रसिद्ध करण्यांत आला. हीं कारणें थोडक्यांत पुढीलप्रमाणें देण्यांत आलीं होतीं:—

भांडवलदारी लोकसत्ताक तत्त्वांचें पूर्णपणें आविष्करण करण्याकरितां घटना परिषदेच्या मागणीला बोल्शेव्हिकांच्या कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आलें होतें. पण १९१७ मधील मार्चनंतर झालेल्या घडामोडींत पार्ले-मेंटरी राज्यपद्धतीपेक्षां सोव्हिएट राज्यपद्धतीच अधिक लोकसत्ताक व उच्च दर्जाची आहे ही गोष्ट बोल्शेव्हिक पक्षानें दाखवून दिली आहे. समाज-सत्तावादी क्रांति अनायासानें घडवून आणण्यास सोव्हिएट लोकसत्ताक राज्यपद्धतीच सर्वथैव समर्थ आहे. भांडवलदारी पार्लेमेंटरी पद्धतीपेक्षां सोव्हि-एट पद्धतीच अधिक लोकसत्तात्मक आहे. कारण निवडून देणारे व निवडून येणारे यांचा एकमेकांशीं या पद्धतीमुळें अधिक निकट संबंध येतो. शिवाय सोव्हिएट पद्धतींत आणखी एक विशेष हा आहे कीं, निवडून दिलेल्या प्रतिनिधींना निवडून देणारे मतदार केव्हांही परत बोलावूं शकतात व त्यांच्या जागीं दुसरे प्रतिनिधी नेमूं शकतात. पार्लेमेंटरी लोकसत्ताक पद्धतीच्या नियमाप्रमाणें देखील या घटना परिषदेची निवडणूक समाधानकारक रीतीनें होऊं शकली नाहीं. कारण सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाचे प्रतिनिधी या पक्षानें आगाऊच (या पक्षांत जहाल व मवाळ हे गट पडण्यापूर्वी) तयार केलेल्या उमेदवारांच्या यादीप्रमाणें निवडून आले होते. या पक्षांत कांहीं जहाल मताचे लोक आहेत या समजुतीनेंच बहुजनसमाजांतील लोक या पक्षाकडे आकर्षिले जात होते. पण प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळीं मात्र फारच थोडे जहालमतवादी निवडून आले. परंतु निवडणुकीनंतर राज्यसत्तेच्या विभा-गणींत जो आमूलाग्र फरक पडला आहे त्यावरूनच सर्व जनता सोव्हिएट सरकारच्या बाजूची आहे, हें सिद्ध झालें आहे. सोव्हिएटांचे जे प्रतिनिधी

निवडणुकींत यशस्वी झाले आहेत त्यांना शेतकरी, कामकरी व सैनिक सोव्हिएटांच्या काँग्रेसनें मँडेट (आज्ञापत्र) दिलें आहे व या मँडेटप्रमाणें त्यांनीं वागलें पाहिजे, अशी त्यांच्यावर जबाबदारी टाकण्यांत आली आहे. एकीकडे सामान्य जनता शांततेकरितां हपापली आहे तर दुसरीकडे आपसांतील युद्धाचीं लक्षणें दिसत आहेत. अशा वेळीं घटना परिषदेचा प्रश्न श्रमजीवी जनतेच्या हिताच्या दृष्टीनेंच सोडविला पाहिजे. केवळ घटनाविषयक तात्त्विक दृष्टीनेंच या प्रश्नाचा विचार करण्यांत अर्थ नाहीं. हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवावयाचा असल्यास सोव्हिएट क्रांतीला मान्यता द्यावी व पुनर्निवडणुकीचें तत्त्वही मान्य करण्यांत यावें. असें न झाल्यास क्रांतिकारक पद्धतीनेंच या प्रश्नाचा विचार करण्यांत येईल. आणि शेवटीं असेंच झालें.

घटना परिषद् मोडून टाकण्यांत आली व रशियाचा राज्यकारभार सोव्हिएट लोकसत्ताक तत्त्वाच्या अनुरोधानें चालणार हें उघड उघड सिद्ध झालें. पण प्रत्यक्ष राज्यघटना मात्र निश्चित झाली नाहीं. १९१८ च्या जुलैंत भरलेल्या सोव्हिएटांच्या पांचव्या काँग्रेसमध्यें ही घटना निश्चित करण्यांत आली. यानंतर बोल्शेव्हिक पक्षाची सातवी काँग्रेस भरली. या काँग्रेसच्या अधिवेशनांत या पार्टीचे पूर्वींचें सोशल डेमोक्रॅटिक पार्टी हें नांव रद्द ठरवून त्याऐवजीं कम्युनिस्ट पार्टी असें नवीन नांव देण्यांत आलें. पार्टीचें नांव बदलण्याची ही सूचना लेनिननेंच आणली होती. सोशल डेमोक्रॅटिक व कम्युनिस्ट या दोन्ही शब्दांत कोणता फरक आहे ही गोष्ट या ठिकाणीं सांगणें जरूर आहे. विशेषतः 'कम्युनिस्ट' या शब्दासंबंधानें तर फारच गैरसमज पसरविण्यांत आलेले आहेत. निःशासन समाजपद्धतीचा निषेध व्यक्त करण्याकरितां व राजकीय लोकसत्ताक पद्धतीचा पुरस्कार करण्याकरितां जर्मन सोशालिस्टांनीं सोशल डेमोक्रॅट हा शब्दप्रचार रूढ केला. मार्क्स व एंजल्स यांनीं या शब्दाला मान्यता दिली होती, पण तो त्यांना कधींही आवडला नव्हता. कम्युनिस्ट हाच शब्दप्रचार त्यांना अधिक पसंत होता. १८४८ सालीं मार्क्सप्रभृतींनीं जी पार्टी प्रस्थापित केली तिचें पहिलें नांव कम्युनिस्ट पार्टी असेंच होतें व त्यांनीं या पार्टीतर्फे जो जाहीरनामा काढला त्यालाही त्यांनीं 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' असेंच नांव दिलें होतें. याशिवाय या शब्दाला आणखी एका दृष्टीनें महत्त्व आहे. "प्रत्येकाला

त्याच्या जरूरीप्रमाणें मिळावें व प्रत्येकाकडून त्याच्या कुवतीप्रमाणें काम करून घ्यावें." हें या पार्टीचें अंतिम ध्येय असल्याकारणानें या पार्टीला कम्युनिस्ट पार्टी असें नांव देणें जरूरीचें आहे, वरील तत्त्वाच्या दृष्टीनें कम्युनिझम् ही सोशालिझमूहून उच्च दर्जाची स्थिति आहे, असें लेनिनचें म्हणणें होतें. याशिवाय समाजसत्तावादाची अंतिम पायरी गांठावयाची या दृष्टीनें पॅरिस कम्यूनची परंपरा पुढें चालविणें जरूरीचें होतें व दुसऱ्या (सेकंड) इंटरनॅशनलच्या संधिसाधू समाजसत्तावादाला हाणून पाडण्याकरितांही या पार्टीचें नांव बदलणें आवश्यक होतें, असेंही एक कारण लेनिननें या वेळीं दिलें होतें.

क्रांतीनंतर जवळ जवळ एक महिन्यांतच या नव्या सरकारनें आपला कार्यक्रम अंमलांत आणण्याचा जोराचा प्रयत्न केला. कॉन्स्टिटयूअंट असेंब्लीचा प्रश्न सोडविण्याच्या भरीला पडून या कार्यक्रमांत अडथळा आणावयाचा नाहीं असें लेनिनप्रभृतींनीं ठरविलें होतें व त्याप्रमाणें एकेक कार्यक्रम अंमलांत आणण्यास त्यांनीं सुरुवात केली. उत्पादनावर कामगारांचा ताबा निर्माण करणें ही या कार्यक्रमांतील पहिली योजना होती. या योजनेप्रमाणें सर्व कारखाने ताबडतोब राष्ट्राच्या मालकीचे करण्यांत आले. मालकांना नुकसानभरपाई देण्यांत आली नाहीं. तसेंच सर्व बँकांचेंही राष्ट्रीकरण करण्यांत आलें. आठ तासांचा दिवस मंजूर करण्यांत आला व जादा कामा (ओव्हर टाईम) संबंधाचेही नियम करण्यांत आले. धर्म (चर्च) व सरकार यांची फारकत करण्यांत आली. सर्व विश्वविद्यालयें व दुय्यम शाळा सर्वांकरितां मोकळ्या ठेवण्यांत आल्या. शिक्षण सार्वत्रिक करण्यांत आलें. रोमानोव्ह घराण्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यांत आली व सर्व जमीन व खनिज पदार्थांच्या सर्व खाणी सरकारच्या ताब्यांतील आहेत, असें जाहीर करण्यांत आलें. या कार्यक्रमाबाबतचे बहुतेक सर्व जाहीर हुकूम लेनिननें स्वतःच लिहिले होते व लोकप्रधानमंडळाचा (कौन्सिल ऑफ पीपल्स कॉमिसर्स) अध्यक्ष या नात्यानें कांहीं हुकुमांना त्यानें मंजुरी दिली होती. शेतकऱ्यांना सर्व जमीन आपल्या मालकीची झाली पाहिजे, असें वाटत आहे व कामकऱ्यांना कारखान्यांवर आपला ताबा असला पाहिजे असें वाटत आहे; पण सर्व जगांत भांडवल-

शाही जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत या बाबतींत पूर्ण ताबा मिळणें शक्य नाहीं. याकरितां "रशियांतीलच नव्हे तर परराष्ट्रांतील भांडवलशाही-सुद्धां नष्ट करा. मग सर्व कांहीं तुमचेंच आहे." असें लेनिननें क्रांतिकारी शेतकरी–कामकरीवर्गाला जाहीर रीतीनें कळविलें होतें व रशियांत सोव्हिएट सरकार प्रस्थापित झाल्याबरोबर रशियांतील भांडवलशाहीचें उच्चाटण करण्यास त्यानें प्रारंभही केला होता. नव्या सरकारच्या संघटनेंत शेतकऱ्यांच्या सोव्हिएटांचा समावेश करून घेण्यासंबंधाचा वादही ता. १ डिसेंबर रोजीं नवा हुकूम जाहीर करून लेनिननें मिटवून टाकला. नव्या सरकारच्या घटनेंत शेतकरी सोव्हिएटांना घेण्यांत आलें असून सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाच्या प्रतिनिधींना अधिकाराच्या जागाही देण्यांत आल्या आहेत, असें लेनिननें या हुकुमान्वयें जाहीर केलें. लेनिनच्या या हुकुमामुळें क्रांतीला विरोध करणाऱ्या लोकांचे हातपायच मोडल्यासारखे झाले व बोल्शेव्हिक कामगार व क्रांतिकारी शेतकरी यांच्यांत ऐक्य घडवून आणण्याचा उपक्रम करण्यांत आला.

नवें सोव्हिएट सरकार प्रस्थापित झालें त्या दिवशींच लेनिननें सोव्हिएट कॉंग्रेसपुढें तहाचा जाहिरनामा विचाराकरितां मांडला होता व तो सर्वानुमतें मंजूरही करण्यांत आला होता. कोणत्याही राष्ट्राचा मुलूख खालसा करण्यांत येऊं नये, स्वयंनिर्णयाचा हक्क सर्व राष्ट्रांना देण्यांत यावा, कोणाकडूनही युद्धखर्च घेण्यांत येऊं नये, युध्यमान राष्ट्रांतील सर्व युद्धकैद्यांना सोडून देण्यांत यावें वगैरे तत्त्वांची घोषणा या तहाच्या जाहीरनाम्यांत करण्यांत आली होती व शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी या राष्ट्रांतील श्रमजीवी जनतेनें आपल्या क्रांतिकारी परंपरेला अनुसरून चळवळ करावी, अशीही विनंति या जाहीरनाम्याच्या अखेर करण्यांत आली होती. इंग्लंडप्रभृति दोस्त राष्ट्रांनीं रशियांतील क्रांतिकारकांच्या या विनंतीला मुळींच मान दिला नाहीं. रशियांतील नव्या सरकारला मान्यता देण्याचेंही त्यांनीं नाकारलें. युद्धाला अनुकूल असलेल्या रशियन सेनापतीला काढून टाकून त्याच्या जागीं बोल्शेव्हिक सेनापति क्रायलेन्को याची नेमणूक केली व जर्मनीकडे तहाची मागणी करण्याकरितां प्रतिनिधी पाठविण्यांत आले, या गोष्टीचा इंग्लंडप्रभृति दोस्त राष्ट्रांना राग

आला. तहाच्या वाटाघाटीकरितां ज्या दिवशीं जर्मनीकडे प्रतिनिधी पाठविण्यांत आले त्याच दिवशीं सार्वत्रिक शांततेबद्दलची मागणीही सोव्हिएट सरकारनें इंग्लंडप्रभृति दोस्त राष्ट्रांकडे केली. ५ डिसेंबर रोजीं युद्धतहकुबीच्या करारपत्रावर सह्या झाल्या व ब्रेस्ट लिटोव्हस्क येथें तहाच्या वाटाघाटीला सुरुवात झाली.

मध्यंतरींच्या कालांत झारच्या साम्राज्याखालीं असलेल्या राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचें तत्त्व लागू करण्यांत आलें. सोव्हिएट सरकारनें रशियनेतर राष्ट्रांचा रशियन लोकसत्ताक राष्ट्रापासून विभक्त होण्याचा हक्क मान्य केला व फिनलंड व यूक्रेन प्रांतांच्या स्वातंत्र्याच्या हक्कालाही मान्यता दिली. फिनलंडमध्यें भांडवलदारी सरकार अस्तित्वांत होतें व यूक्रेनमध्यें सुधारणावादी सोशालिस्टांचें वर्चस्व होतें, ही गोष्ट माहीत असूनही सोव्हिएट सरकारनें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

ब्रेस्ट लिटोव्हस्क येथें तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्यावर इंग्लंडप्रभृति दोस्त राष्ट्रें आपलें धोरण बदलतील असें वाटलें होतें. पण तसें घडून आलें नाहीं. जर्मनींत क्रांतीचे वारे वाहात असतांना सोव्हिएट रशियाला जर्मनीशीं तहाची वाटाघाट करण्यास मोकळें सोडणेंच मुत्सद्देगिरीचें आहे असें दोस्त राष्ट्रांना वाटलें. ब्रेस्ट लिटोव्हस्क येथें जर्मनीशीं याप्रमाणें तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या; पण या वाटाघाटींसंबंधानें आलेल्या बातम्या मात्र आशादायक नव्हत्या. जर्मनीनें घातलेल्या अटी अपमानकारक होत्या. या अटी मान्य केल्यास रशियाचे तुकडे होतील हें उघड दिसत होतें. कोणाचाही मुलूख खालसा करावयाचा नाहीं, या तत्त्वावर शांततेची उभारणी करावयाची अशी रशियाची घोषणा होती. पण प्रत्यक्ष तहाच्या वाटाघाटीच्या वेळीं हें तत्त्व पाळावयाचें व त्यालाच चिकटून राहावयाचें कीं पुन्हा क्रांतियुद्धाची तयारी करावयाची असा बिकट प्रश्न सोव्हिएट सरकारपुढें येऊन पडला होता. साम्राज्यवादी राष्ट्रांशीं तहाच्या वाटाघाटी करून देवाणघेवाण करावयाची हें आंतरराष्ट्रीय समाजसत्तावादाच्या मूलतत्त्वांविरुद्ध आहे असें कांहीं कम्युनिस्ट भाई म्हणूं लागले होते. त्यांची ही विचारसरणी भ्रममूलक होती. संपाला उतरती लागली असतांना संपवाले पुढारी कांहीं अंशीं कामगारांच्या हितसंबंधांविरुद्ध असलेल्या अटींना मान्यता

देतात म्हणून ते समाजसत्तावादाला बट्टा आणतात असें म्हणतां येत नाहीं. तह केला तर रशिया साम्राज्यवादी जर्मनीचा हस्तक बनला असें लोक म्हणणार; बरें, युद्ध चालू ठेवलें तर साम्राज्यवादी इंग्रज व फ्रेंच राष्ट्रांचा रशिया हस्तक झाला अशी तिकडूनही नांवें ठेवण्यांत येणार. कोणतेंही कृत्य करा साम्राज्यवाद्यांच्या हातून रशियाची सुटका होणें शक्य नाहीं असा प्रसंग या वेळीं रशियावर येऊन ठेपला होता. या प्रश्नाचा निर्णय करतांना कोणत्या साम्राज्यवादी राष्ट्राला अधिक पसंत करावयाचें हा महत्त्वाचा मुद्दा नसून समाजसत्तावादी क्रांति स्थिर व दृढतर कशी होईल, याचाच विचार करणें श्रेयस्कर होतें यांत शंका नाहीं. जर्मनींतील आंतरराष्ट्रीय क्रांतिवादी कामगार अमुक इतक्या वेळांत आपण क्रांति करूं अशी हमी देऊं शकत असतील तर या प्रश्नाचा पुन्हा विचार करणें जरूर आहे. पण असें अभिवचन कोणी देऊं शकत नसल्यामुळें या प्रश्नाचा विचार रशियांतील समाजसत्तावादी क्रांतीच्या दृष्टीनेंच केला पाहिजे असें लिबनेक्टनें आग्रहपूर्वक कळविलें होतें. रशियन लष्करांतील शेतकरी सैनिक तर कट्टर युद्धविरोधी होते. शांततेकरितां कितीही किंमत द्यावी लागली तरी ती द्यावी असें शेतकरीवर्गाचें मत होतें. कामकऱ्यांनीं व गरीब शेतकऱ्यांनीं ही क्रांति घडवून आणली होती आणि पुन्हा जर क्रांतियुद्ध झालें तर शेतकरीवर्गाचे लोक कामकऱ्यांना मदत करण्यास तयार नव्हते. युद्ध पुन्हा सुरू झालें तर मागेंपुढें जर्मनी रशियांतील बिगर समाजसत्तावादी सरकारशीं तह करण्यास तयार होईल. रशियांतील समाजसत्तावादी लोकसत्ताक सरकारनें जगांतील भांडवलदार राष्ट्रांविरुद्ध युद्ध सुरू केलें व जगांतील भांडवलदारी सरकारें उलथून पाडण्याचा स्पष्ट उद्देश पुढें ठेवून अंतःकरणपूर्वक हें युद्ध चालविलें तर त्याला क्रांतियुद्ध म्हणतां येईल. पण अशा प्रकारचा उद्देश स्पष्टपणें पुढें ठेवून हें युद्ध सुरू करणें या वेळीं अशक्य होतें. युद्ध जर सुरू केलें तर पोलंड, लिथुआनिया व लाटव्हिया यांच्या स्वातंत्र्याकरितांच तें सुरू केलें असा त्याचा अर्थ होता. पण दोन तीन राष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काचें संरक्षण करण्यापेक्षां समाजसत्तावादी लोकसत्तेचें संरक्षण करणें या वेळीं अत्यंत जरूरीचें होतें. लेनिननें हीच गोष्ट लक्षांत घेऊन तहासंबंधाची आपली

विचारसरणी बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती कमिटीपुढें मांडली. पण कमिटींतील बहुमतानें ही सूचना फेटाळून लावली. जर्मनीशीं या वेळीं तह न केल्यास आपलें नुकसान करण्याइतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं आतां उरलेलें नाहीं असें लेनिनला वाटत होतें. म्हणून आपलेंच धोरण मध्यवर्ती कमिटीनें स्वीकारावें असा आग्रह त्यानें धरला नाहीं. मास्को, बाल्टिक आरमार वगैरेवरील बोल्शेव्हिक संघटनांचे प्रतिनिधी तसेंच सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहालमतवादी मुलूख खालसा करण्याच्या तहाविरुद्ध होते. फक्त पेट्रोग्राड कमिटींतील स्वेर्डलोव्ह, झिनोव्हिफ, स्टॅलिन, सोकोल्निकोव्ह व स्मिल्गा हे कमिटींतील पांचच सभासद काय ते लेनिनला अनुकूल होते. मध्यवर्ती कमिटीच्या सभेला हजर असलेल्या पार्टीच्या ६३ कार्यकर्त्या प्रतिनिधींपैकीं फक्त १५ च मतें लेनिनच्या तहाच्या सूचनेला अनुकूल पडलीं होतीं. ३२ जहाल कम्युनिस्टांनीं क्रांतिकारी युद्धाच्या बाजूनें मतें दिलीं व धड युद्धही नाहीं किंवा तहही नाहीं अशा प्रकारचें ट्रॉट्स्कीचें धोरण बाकीच्या १६ प्रतिनिधींनीं उचलून धरलें. तहाच्या करारनाम्यावर आज सही करावयाची नाहीं आणि जर्मनीनें जर चढाईचें धोरण स्वीकारलें तर त्याला प्रतिकारही करावयाचा नाहीं, असें ट्रॉट्स्कीचें मत होतें. सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहाल मतवाद्यांनींही याच धोरणाला पाठिंबा दिला होता. क्रांतीचा देखावा करूं पाहणारा ट्रॉट्स्की व क्रांतिकारी कामगारांचा पुढारी लेनिन यांच्या मतांत मूलतःच फरक होता. तहाच्या वाटाघाटी व या वाटाघाटींत मांडण्यांत आलेल्या अटी यांचा फायदा घेऊन जर्मनीसारख्या भांडवलदारी राष्ट्राविरुद्ध गवगवा करावयाचा व क्रांतीचें रक्षण करणें हेंच रशियांतील पुढाऱ्यांचें आजचें कर्तव्य आहे, असें जगांतील कामगारांना दाखवावयाचें व अत्यंत आवश्यक झालें म्हणूनच सोव्हिएट रशियाला जर्मनीशीं साम्राज्यवादी तत्त्वांवर तह करावा लागला असें सिद्ध करून द्यावयाचें, असें ट्रॉट्स्कीचें म्हणणें होतें. ट्रॉट्स्कीचें हें चेंगटपणाचें धोरण जर्मनीच्या लष्करी बाण्याला अनुकूल असेंच होतें. जर्मनीला रशियाशीं तह करणें पसंत नव्हतें तर रशियावर विजय मिळवावा अशी त्याची इच्छा होती; आणि जसजसा एक एक दिवस जाईल

तसतसें रशियांतील लष्कर विस्कळितच होत जाईल, अशी त्याची खात्री झालेली होती. तहाच्या वाटाघाटींचा फायदा घेऊन जगभर चळवळ करण्यास लेनिनची कांहींच हरकत नव्हती. पण जर्मनीनें अत्याचार केल्यानंतर त्याला बळी पडण्यापेक्षां क्रांति करून आपण जें काय मिळविलें आहे त्यांतलेंच जास्तींत जास्त कसें सांभाळावयाचें याचा विचार करावा, जगापुढें देखावा करण्याच्या नादीं लागूं नये, असें लेनिनचें मत होतें. राष्ट्राभिमानाला बळी पडून लेनिननें या प्रकारचें धोरण स्वीकारलें होतें असें कोणी यावर भाष्य केल्यास तें चुकीचें होईल. २१ जानेवारी रोजीं झालेल्या मध्यवर्ती कमिटीच्या सभेंत भाषण करतांना झिनोव्हिफ असाच लेनिनवर घसरला. पण लेनिननें उत्तरादाखल केलेल्या आपल्या भाषणांत वरील धोरणाचें स्पष्टीकरण केलें. "रशियांतील क्रांतीपेक्षां जर्मनींतील क्रांति किती तरी महत्त्वाची आहे. रशियन क्रांतीला बळी देऊन जर्मनींतील क्रांति यशस्वी होत असेल तर तसें करण्यासही हरकत नाहीं. जर्मनींतील कामगारांकरितां रशिया तसें करण्यास तयारही होईल. पण खरी परिस्थिति अशी नाहीं. जर्मनींतील क्रांति फक्त गर्भावस्थेंत आहे आणि समाजसत्तावादी लोकसत्तेच्या रूपानें क्रांतीचें बाळसेदार बाळ रशियांत आज जन्मास आलें आहे व आपल्या अंगीं असलेली सर्व शक्ति खर्च करून तें गर्जना करीत आहे. तेव्हां अमुक घडून येईल अशा आशेच्या भरीं पडून जुवा खेळण्याच्या नादीं लागण्यापेक्षां जें प्रत्यक्ष अस्तित्वांत आहे त्याचेंच रक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे." असें लेनिननें या वेळीं सांगितलें.

पण अखेर ट्रॉट्स्कीचेंच मत प्रभावी झालें. जर्मनीनें केलेल्या मागण्या स्वीकारण्याजोग्या नाहींत असें आढळून आल्यामुळें १० फेब्रुवारी १९१८ रोजीं तहाच्या वाटाघाटी थांबल्या. 'युद्ध नाहीं व तहही नाहीं' हें ट्रॉट्स्कीचें धोरण स्वीकारण्यांत आलें. तहाच्या वाटाघाटींकरितां गेलेलें शिष्टमंडळ परत आल्यानंतर पुढें कोणता मार्ग स्वीकारावयाचा याचा निर्णय करण्याकरितां मध्यवर्ती कमिटीची सभा भरली. जर्मनीच्या अटी ताबडतोब मान्य कराव्या, असें लेनिननें आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें; पण सभेस हजर असलेल्या ११ सभासदांपैकीं ६ नीं प्रतिकूल मत दिल्यामुळें त्याची सूचना नामंजूर

झाली. युद्धतहकुबीचा करार नाशाबीत ठरला आहे असें जर्मनीनें लगेच याच दिवशीं जाहीर केलें व अत्यंत कमकुवत झालेल्या रशियन सरहद्दीवरील लष्करावर त्यानें चाल केली. रशियाच्या बाजूनें कोणत्याही प्रकारचा प्रतिकार होऊं न शकल्यामुळें जर्मनीला मुबलक लूट हातीं लागली. पेट्रोग्राडच्या लष्करांतील कडवे रेड गार्डदेखील जर्मनीच्या चढाईपुढें टिकाव धरूं शकले नाहींत व जर्मनीच्या हल्ल्यापासून बचाव करून घेण्याकरितां सरहद्दीपासून ५० मैलपर्यंत ते मागें हटले. रशियांतील लष्कर शत्रूच्या हल्ल्याला तोंड देण्यास कोणत्याही प्रकारें समर्थ राहिलेलें नाहीं, ही गोष्ट सिद्ध झाली व लेनिनचेंच म्हणणें खरें ठरण्याची पाळी येऊन ठेपली. १८ फेब्रुवारी रोजीं जर्मनीच्या चढाईच्या आणखी बातम्या येऊन थडकल्या. मध्यवर्ती कमिटीची सभा भरली. जर्मनीच्या सर्व अटी मान्य करून तहाची वाटाघाट पुढें चालवावी अशी तार करण्यासंबंधाची लेनिनची सूचना पुन्हा पहिल्याप्रमाणें एक मत लेनिनच्या सूचनेविरुद्ध अधिक पडून नापास झाली. लगेच त्याच दिवशीं पुन्हा दुसरी सभा बोलावण्यांत आली. जर्मनीच्या अटी तावडतोब मान्य करण्यांत याव्या अशी सूचना लेनिननें कमिटीच्या या सभेपुढें पुन्हा आग्रहपूर्वक मांडली. बोल्शेव्हिक सरकार अधिकारच्युत करावें, अशी जर जर्मनीची मागणी असेल तर जर्मनीविरुद्ध आपल्याला लढलेंच पाहिजे; कारण समाजवादी लोकसत्ताक राज्य रक्षण करण्याकरितांच आम्हांला तह करावयाचा आहे. पण जर्मनीची मागणी तशी नसेल तर क्रांतीचा सर्व प्रयत्न फुकट घालविण्यांत आला असेंच इतिहास आमच्या बाबतींत लिहून ठेवील, असें लेनिननें या प्रसंगीं बोलून दाखविलें. लेनिनचें हें भाषण कळकळीनें भरलेलें होतें. लेनिनच्या तहाच्या प्रयत्नाला या सभेंत मात्र यश मिळालें. ट्रॉट्स्कीनें या वेळीं लेनिनच्या बाजूनें मत दिलें व त्याच्या सूचनेला कमी पडत असलेल्या एका मताची भर झाली. याप्रमाणें ता. १९ फेब्रुवारी रोजीं सोव्हिएट प्रतिनिधिमंडळातर्फे जर्मनीच्या अटी आपणांस मान्य असल्याचें त्या सरकारला कळविण्यांत आलें. सोव्हिएट सरकार पदच्युत करण्याची अट जर्मनीच्या मागणींत अर्थातच नव्हती. फिनलंड, इस्थोनिया, लाटव्हिया व यूक्रेन हे प्रांत रशियापासून अलग करण्यांत यावे, त्यांच्यावर जर्मनीचा कबजा असल्याचें मान्य करण्यांत यावें, तसेंच

महायुद्ध संपेपर्यंत फिनलंड आखातावरील प्स्कोव्ह व होमेलपासून डॉन नदीवरील रोस्टोव्हपर्यंतचा एक जमिनीचा तुकडा जर्मनीच्या ताब्यांत देण्यांत यावा, असें या अटींत म्हटलें होतें. जर्मनीच्या अटी मान्य असल्याचें सोव्हिएट सरकारकडून समजतांच जर्मन सरकारतर्फेंही उलट उत्तर आलें व ता. २३ रोजीं या उत्तरासंबंधानें चर्चा करण्याकरितां मध्यवर्ती कमिटीची सभा भरविण्यांत आली. जर्मनीच्या या उत्तराला मान्यता न देतां सोशालिस्ट लोकसत्ताक सरकारचें अस्तित्वच धोक्यांत येईल असें धोरण बोल्शेव्हिक पक्षाचे लोक स्वीकारतील तर आपण या पक्षाच्या सभासदत्वाचा राजीनामा देऊं, असें या वेळीं लेनिननें मध्यवर्ती कमिटीच्या सभासदांना कळविलें. कमिटींतील बहुसंख्य सभासद या वेळींही त्याच्या विरुद्धच होते. फक्त त्याचे नेहमींचे दोस्त त्याच्या बाजूनें मतें देत होते. परंतु त्याच्याविरुद्ध असलेल्या आठ सभासदांपैकीं बुखारिनप्रभृति सभासद त्याच्याविरुद्ध मतें देत होते तर ट्रॉट्स्कीप्रभृति चार सभासद प्रत्येक वेळीं तटस्थ राहात होते. यामुळें सोव्हिएट प्रतिनिधींच्या या सभेंत जर्मनीच्या अटी मान्य करण्यांत आल्या व सोकोल्निकोव्ह याच्या पुढारीपणाखालीं एक नवीन शिष्टमंडळ ब्रेस्टकडे पाठविण्यांत आलें. तहाच्या करारनाम्यावर या शिष्टमंडळानें सह्या केल्या; पण केवळ पाशवी शक्तीपुढें आपल्याला नमावें लागत आहे हें दाखविण्याकरितां त्यांनीं या अटींसंबंधानें विस्तृतपणें चर्चा करण्याचें नाकारलें.

तहाच्या करारनाम्यावर सह्या केल्यानें या प्रकरणाचा निकाल होणें शक्यच नव्हतें; हें जाणूनच १४ मार्च रोजी सोव्हिएटांच्या कॉंग्रेसचें एक खास अधिवेशन भरविण्यांत आलें. या खास अधिवेशनांत जर्मनीच्या अटी मान्य झाल्या नाहींत, तहाचा प्रयत्न फसला व जर्मनीशीं पुन्हा युद्ध करण्याचा प्रसंग आला तर इंग्लंडप्रभृति दोस्त राष्ट्रांची मदत घेण्याचेंही लेनिननें ठरविलें होतें. सोव्हिएट सरकार अजीबात नष्ट होण्यापेक्षां नाइलाज म्हणून दोस्त राष्ट्रांशीं संगनमत करून सोशालिस्ट लोकसत्ताक सरकार कसें तरी जिवंत राखण्याचा लेनिननें विचार केला होता. जर्मनीच्या अटी मान्य करण्याचें मध्यवर्ती कमिटींत ठरविण्यांत आल्यानंतर तहासंबंधानें अनुकूल लोकमत मिळविण्याचा लेनिननें जोराचा प्रयत्न केला.

व त्यांत त्याला यश मिळालें. ता. २३ फेब्रुवारीपासून ते १५ मार्चपर्यंत लेनिनला या तहाच्या बाबतींत आपल्या पक्षांतील लोकांशींच झगडावें लागलें. २३ फेब्रुवारी रोजीं जर्मनींनें घातलेल्या अटी समजल्यापासून तें १५ मार्च रोजीं त्याला सोव्हिएट सरकारची मंजुरी मिळवीपर्यंतचे क्रांतिकारी लेनिनच्या आयुष्यांतील हे दिवस अत्यंत महत्त्वाचे व बोधप्रद असे होते. लेनिनच्या अंगीं असलेले सर्व उदात्त गुण या कालांत प्रगट झाले असें म्हणावयास हरकत नाहीं. एका विशिष्ट मताचा प्रचारक, कार्यकर्ता व वक्ता या नात्यानें लेनिनला रशियांतील लोक ओळखीत होते. बहुजनसमाजाला रुचेल असेंच तो लिहीत असे व बोलत असे. जनतेच्या अंतःकरणांत दबून राहिलेल्या भावना तो बोलत असे. यामुळें त्याचीं भाषणें नेहमीं उत्तेजक अशीं असावयाचीं. लोकांच्या भावना संयमित करण्याचें काम त्याच्या भाषणांनीं आजपर्यंत कधींच केलें नव्हतें. या तहाच्या वाटाघाटीच्या वेळीं मात्र लेनिनवर निराळाच प्रसंग ओढवला. त्याच्या अगदीं निकटवर्ती दोस्तांना ज्या गोष्टी ऐकण्याच्या संवयी लागल्या होत्या व त्यांचे त्याच्यासंबंधानें जे ग्रह बनले होते त्याच्या अगदीं विरुद्ध असें वर्तन लेनिनला करावें लागलें. लेनिन या वेळीं ज्या गोष्टी सांगूं लागला होता त्यांविरुद्ध बोल्शेव्हिक पक्षांतील कोणत्याही माणसाला हवी तशी टीका करतां आली असती. सामान्य व्यवहारज्ञानाच्या, शहाणपणाच्या व वस्तुस्थितिनिदर्शक अशा गोष्टी कोणी सांगूं लागला तर त्याला क्रांतिविरोधी ठरवून त्याच्यावर टीकास्त्र उपसण्यास लेनिन कधींही कमी करीत नसे. पण तोच लेनिन आतां व्यवहारज्ञानाच्या व दूरदर्शीपणाच्या गोष्टी सांगूं लागला होता. लेनिनचा थोरपणा अशा प्रसंगींच व्यक्त झाला. सशस्त्र मिरवणुकी काढून क्रांतीला हात घालूं नये असें लेनिन जुलै–ऑक्टोबरमध्यें सांगत होता. ऑक्टोबरमध्यें लेनिननें आपलें बलाबल ओळखलें होतें व अत्यंत दूरदर्शीपणानें त्या वेळीं तो वागला होता. तशाच प्रकारचें व्यावहारिक धोरण लेनिननें या तहाच्या वाटाघाटीच्या वेळीं स्वीकारलें होतें. अलोट उत्साहशक्ति व धैर्यानें पुढें येऊन प्रगट केलेलें दूरदर्शित्व यांचें संमीलन लेनिनच्या स्वभावांत झालें होतें. स्वतःच्या कार्यपद्धतींतील अचूकपणा हेंच लेनिनचें सामर्थ्य होतें .

लेनिन क्रांतिवादी खरा, पण तो व्यवहारवादाच्या, धीमेपणाच्या व विधायक

कार्यक्रमाच्या गोष्टी सांगूं लागला ही गोष्ट तरुण क्रांतिवाद्यांना मुळींच पटली नाहीं. विशेषतः सैनिक वर्गांतील तरुणांना तर लेनिनचें हें धोरण मुळींच आवडलें नाहीं. व्यवहारवाद, विधायक कार्यक्रम व 'आस्ते कदम' टाकणाऱ्या सुधारणा पुढें मांडून लेनिन सर्वाधिकारी अरेराव होऊं पाहात आहे. जर्मनीसारख्या साम्राज्यवादी राष्ट्राशीं तह घडवून आणून आपलें व आपल्या पक्षाचें सामर्थ्य तो वाढवूं पाहात आहे. तेव्हां या अरेरावी सत्तेला वेळींच हाणून पाडण्याच्या उद्देशानें लेनिनला ठार करण्याचा या सैनिक क्रांतिवाद्यांनीं एक कट रचला. सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील एका जुन्या सभासदानें याची गुप्त तयारी कशी करावी, हें त्यांना शिकविलें. हे कटवाले लेनिनच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याकरितां स्मोल्नीच्या आसपास गुप्तपणें वावरूं लागले. अशी टेहळणी करीत असतां मिखाइलोवस्की येथील राइडिंग स्कूलची पाहणी करण्यास लेनिन जाणार आहे असें त्यांना समजलें. लेनिन या शाळेंत पाहणी करण्याकरितां गेला असतां तो बाहेर पडण्याची वाट पाहात ते उभे राहिले. लेनिन पाहणीचें काम संपवून बाहेर आला व आपल्या मोटारींत बसला. ही मोटार जवळच्या पुलावरून जात असतां तिच्यावर एकानें बॉंब टाकावयाचा असें ठरलें होतें. पण या बॉंब टाकणाऱ्या कटवाल्याचें मत आयत्या वेळीं बदललें. बॉंब टाकण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. ठरल्याप्रमाणें बॉंब पडला नाहीं असें पाहातांच त्याच्या मागें उभे असलेल्या कटवाल्यांनीं आपल्या हातांतील पिस्तुलें झाडलीं. स्विस सोशालिस्ट फ्रिट्झ प्लॅटन यानें लेनिनला अंगाखालीं झांकून टाकलें. लेनिनच्या डोक्यांत शिरणारी गोळी प्लॅटनच्या हातांत शिरली व लेनिन या प्राणसंकटांतून मोठ्या मुष्किलीनें वांचला. लेनिन यावेळीं मोठ्यानें हंसला. कटवाल्यांच्या टोळीपैकीं दोघांना पकडण्यांत आलें. या कटवाल्यांना तुरुंगांत पुस्तकें वाचावयास द्यावीं व या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून त्यांना ताबडतोब सोडून द्यावें, असें लेनिननें सांगितलें.

" तहाच्या वाटाघाटीच्या या दिवसांत बुखारिन, रॅडेक, पोक्रोव्हस्की वगैरे 'लेफ्ट (जहाल) कम्युनिस्ट' म्हणवून घेणाऱ्या लोकांनींच लेनिनला पदोपदीं विरोध केला. या लोकांना सोशालिस्ट रेव्होल्यूशनरीं पार्टीमधील जहालमतवादी

मंडळींचा पाठिंबा होता. जर्मनीशीं या वेळीं तह करणें अपमानास्पद असून क्रांतीचें संरक्षण करण्याकरितां शेतकरी–कामकरी लोकांनीं जर्मन साम्राज्यशाहीविरुद्ध लढलेंच पाहिजे असें या विरोधी मंडळींचें म्हणणें होतें. ऑक्टोबरनंतर क्रांतीचें पाऊल सारखें पुढें पडत होतें, यामुळें पिछेहाटीचा प्रसंग आला असतां कसें वागावें याचा विचारसुद्धां करण्यास हे लोक तयार नव्हते. “जी जी परिस्थिति निर्माण होईल तिला पाठ देण्याचें सामर्थ्य तुमच्या आंगीं नसेल, प्रसंगीं चिखलांतूनही पोटावर सरपटत जाण्याची तुमची तयारी नसेल तर तुम्ही क्रांतिकारक नव्हे; तर केवळ पोकळ वडबड करणारे आहां असेंच म्हणावें लागेल. क्रांतीचा मार्ग सुखाचा नाहीं. क्रांति पूर्ण फलदायी होण्यास अनेक पिछेहाटीचें प्रसंगांना धैर्यानें तोंड द्यावें लागत असतें, असें इतिहास सांगतो.” तहाच्या वाटाघाटींसंबंधानें चर्चा करतांना लेनिननें वरील आशयाचें भाषण करून १९०५ सालच्या पहिल्या क्रांतीच्या प्रसंगाची आठवण लोकांना करून दिली होती. “ही क्रांति अपयशी ठरली त्या वेळीं बोल्शेव्हिक पार्टीनें ड्यूमामध्यें प्रवेश करण्याचें ठरविलें. झारबद्दल राजनिष्ठेची शपथ घेऊनही ड्यूमा सभेंत शिरून काम करण्याचा त्यांनीं निश्चय केला. हें धोरण अपमानास्पद होतें, पण क्रांतीच्या दृष्टीनें तें फायदेशीर होतें, म्हणूनच पार्टीनें त्या वेळीं नमतें घेतलें. क्रांतियुद्ध यापुढें चालविण्याची आपली ताकद नाहीं असें दिसत असतांना तें पुढें चालविण्यासंबंधानें जे लोक गोंगाट करीत आहेत, त्यांची कार्याकार्यविवेकशक्ति नष्ट झाली आहे, प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय आहे हें ते पाहूंच इच्छित नाहींत असेंच म्हणण्याची पाळी आली आहे.” जर्मनीच्या अटी मान्य कराव्या कीं नाहीं यासंबंधानें लेनिननें प्रगट केलेली ही स्पष्ट विचारसरणीच शेवटीं प्रभावी ठरली व बोल्शेव्हिक पार्टीच्या सातव्या कॉंग्रेसमध्यें २८ विरुद्ध १२ मतांनीं लेनिनची तहाच्या बाबतींतील सूचना मान्य करण्यांत आली. यानंतर भरलेल्या सोव्हिएट कॉंग्रेसच्या खास अधिवेशनांतही ७८४ विरुद्ध २६१ मतांनीं लेनिनचा जर्मनीच्या अटी मान्य करण्याचा ठराव मंजूर झाला. जहाल कम्युनिस्ट, पार्टीचें ऐक्य मोडूं नये म्हणून तटस्थ राहिले. ब्रेस्ट लिटोव्हस्क तहाच्या बाबतींत लेनिननें स्वीकारलेलें धोरणच

शहाणपणाचें होतें असें आढळून आल्यावर या जहाल कम्युनिस्टांनीं आपली चूक कबूल केली. पण सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहाल पुढारी मात्र आपल्या मूर्खपणाला चिकटून राहिले. त्यांनीं सोव्हिएट सरकारमधील आपल्या जागांचे राजीनामे दिले व सरकारविरोधी पक्षांत ते सामील झाले.

रशियांतील एकतंत्री राज्यसत्तेविरुद्ध व भांडवलशाहीविरुद्ध क्रांति केल्यानंतर रशियांतील क्रांतिकारकांना जर्मनीशीं लढावें लागलें असतें तर आपलें सामर्थ्य पुन्हा एकवटण्याकरितां लागणारा अवकाशही त्यांना मिळाला नसता व जर्मनीनें या क्रांतिकारकांचा धुव्वाही उडविला असता, हें जाणूनच लेनिननें जर्मनीच्या अटी सोव्हिएट सरकारास मान्य करण्यास लावलें. लेनिनच्या या धोरणामुळें रशियन क्रांतिकारकांना श्वास घेण्याला तरी अवकाश मिळाला. आपल्या सत्तेचें दृढीकरण करणें, कामगारवर्गानें आपल्या ताब्यांत घेतलेल्या उद्योगधंद्यांची वाढ करणें व रशियांतील समाजव्यवस्थेची पुनर्घटना करणें वगैरे किती तरी कामें सोव्हिएट क्रांतिकारकांना यापुढें करावयाचीं होतीं. तहाच्या वाटाघाटी संपवून जर्मनीशीं झालेला तह जाहीर केल्याबरोबर ताबडतोब लेनिन क्रांतीच्या दृढीकरणाच्या प्रयत्नास लागला. २९ एप्रिल १९१८ रोजीं झालेल्या मध्यवर्ती कमिटीच्या कार्यकारी सभेपुढें झालेल्या आपल्या भाषणांत व त्याच दिवशीं प्रसिद्ध करण्यांत आलेल्या पत्रकांत त्यानें आपली याबाबतची योजना मांडली. जर्मनीशीं युद्ध करण्याची ताकद रशियन क्रांतिकारकांत उरलेली नाहीं, क्रांतीची खळबळ थांबवून रशियाला दम घेण्यास अवकाश मिळावा, देशांत केवळ कांहीं तास चालू असलेले कारखाने पुन्हा जोरांत चालू होतील अशी व्यवस्था करावी, शेतकऱ्यांची व विशेषतः कामकऱ्यांची भुकेची ओरड थांबवावी व सर्वत्र स्थिरस्थावर करावें या उद्देशानें लेनिननें जर्मनीशीं तह घडवून आणला. पण रशियांतील भांडवलदार लोकांच्या कच्छपीं असलेल्या लोकांनीं इंग्लंड व फ्रान्सप्रभृति दोस्त राष्ट्रांच्या साहाय्यानें नव्या सरकारविरुद्ध बंड उभारलें. लेनिननें आपसांतील युद्धाच्या या नव्या संकटालाही मोठ्या धैर्यानें तोंड दिलें.

# क्रान्तीनंतर

रशियांत यापुढें कम्युनिस्टांची सत्ता असावी कां युरोपांतील साम्राज्य-वादी राष्ट्रांशीं संगनमत केलेल्या भांडवलवाल्यांची सत्ता असावी याचा निर्णय लावण्याकरितांच जणूं काय रशियांत आपसांतील युद्धाला सुरुवात झाली. जर्मनीच्या अटी मान्य करून त्याच्याशीं तह घडवून आणण्याच्या बाबतींत ट्रॉट्स्कीनें लेनिनशीं सहकार्य केलें होतें व यासंबंधांत बोल्शेव्हिक पार्टीनें केलेला निर्णय मान्य करून तो या पक्षाशीं एकरूप झाला होता. यामुळें त्याला अर्थात्च पुन्हा क्रांतिकारी लष्करी कमिटीचा अध्यक्ष निवडण्यांत आलें. आपसांतील युद्धाच्या या नव्या संकटाला तोंड देण्याकरितां नवें लाल लष्कर (रेड आर्मी) उभारण्यासाठींच ही तयारी करण्यांत आली होती. जर्मनीशीं तह करण्याच्या बाबतींत मतभेद होऊन सरकारविरोधी पक्षांत सामील झालेले जहाल सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी सोव्हिएट सरकार उलथून पाडण्याची तयारी करूं लागले. याकरितां त्यांनीं अनेक गुप्तमंडळें स्थापन केलीं. ब्रिटिश व फ्रेंच गुप्त पोलिसखात्यांचे अधिकारीही या नव्या सरकारचें उन्मूलन करण्याकरितां अशाच प्रकारचे प्रयत्न करूं लागले होते. लेनिनग्राड (पूर्वीचें पेट्रोग्राड) व मास्को शहरांतील भुयारांतून व गुप्तस्थानांतून कटवाल्यांच्या सभा ते भरवूं लागले होते. या कटवाल्यांना पैशाची वाण कधींच पडली नाहीं. आपापल्या सरकारच्या वकिलातीकडून त्यांना पैशाचा भरपूर पुरवठा होत असे. पेट्रोग्राडमधील ब्रिटिश वकिलातीचें ठाणें म्हणजे नव्या सरकारच्या शत्रूंचें आश्रयस्थानच बनलें होतें. या नव्या बंडाची तयारी करण्यांत मुख्यतः सरदार घराण्यांतील लोकच गुंतले होते. दोस्त राष्ट्रांचीं क्रूझरें सोव्हिएट सरकारला मदत करण्याच्या निमित्तानें मुरमांस्क बंदरापर्यंत येऊन पोंचलीं होतीं. जर्मनीपासून सोव्हिएटांचें रक्षण करावयाचें ढोंग त्यांनीं घेतलें होतें. रशियांतील लष्करी दारूगोळा जर्मनीच्या हातीं लागूं नये, जर्मनीनें ही सामग्री नेण्यापूर्वीं या दारूगोळ्याचीं

कोठारें आपणच रिकामीं करण्याकरितां त्यांनीं लष्कराच्या तुकड्याही पाठविल्या होत्या. पण हीं जुनीं कोठारें रिकामीं करण्याऐवजीं त्यांत त्यांनीं अधिकच माल भरला व पेट्रोग्राडकडे त्या तुकड्या चाल करून येऊं लागल्या. सरकारविरुद्ध असलेल्या असंख्य अराजकांशीं त्यांनीं संगनमत केलें. या आपसांतील बंडाळीच्या बाबतींत सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील लोकांनीं मुख्यतः भाग घेतला होता. या पक्षाचे लोक अशा रीतीनें क्रांतिविरोधी बनले नसते तर व त्यांची मदत दोस्त राष्ट्रांना मिळाली नसती तर आपसांतील युद्धाला सुरुवातच झाली नसती. युद्धतहकुबीनंतर नव्या सरकारविरुद्ध उघड उघड प्रचार करणाऱ्या लोकांनाही सरकारी राज्यकारभारांत भाग घेण्याची संधि देण्यांत आली. यामुळें त्यांचें वजन कमी होण्याऐवजीं उलट तें वाढलें व विशेषतः शेतकरीवर्गावर त्यांचें असलेलें वजन तर आणखी अधिकच वाढलें. मध्यम स्थितींतील शेतकऱ्यांनीं या वेळीं जोराची उचल खाल्ली. आपसांतील युद्धाचे ते आधारस्तंभच होते. दोस्त राष्ट्रांचे हस्तक, सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाचे लोक व झेकोस्लोव्हाक यांना प्रथम प्रथम जे जय मिळाले त्यांत त्यांना या शेतकऱ्यांची मदतच मुख्यतः कारणीभूत झाली. व्होल्गा प्रांतांतील झेकोस्लोव्हाक पलटणींनीं बंडाचें निशाण उभारलें. तिकडील सोव्हिएट लष्करावर सशस्त्र हल्ले केले आणि जॉर्जिया प्रांतांतील मेन्शेव्हिकांनीं तर सोव्हिएट रशियापासून कॉकेशस प्रांत स्वतंत्र झाला आहे, असें जाहीर केलें. क्रिमिया व सैबेरिया या प्रांतांतील भांडवलवाल्यांनीं सर्व राज्यसत्ता आपल्या ताब्यांत घेतली व रशियाचा मध्य आशियाशीं असलेला सर्व संबंध तोडून टाकला. १९१८ च्या मेमध्यें या आपसांतील बंडाळीला सुरुवात झाली व अवघ्या दोन महिन्यांत सोव्हिएट सरकार नामशेष होतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. दोस्त राष्ट्रांना तर या बंडांत आपल्याला यश मिळणार अशी खात्री वाटूं लागली. त्यांचे सर्व वकील व्होलोग्डा येथें या यशाची वाट पहात राहिले होते. ब्रिटिश व फ्रेंच गुप्त पोलिसखात्यांतील बडेबडे अधिकारी आणखी गुप्त कट रचीत होते. मॉस्को व पेट्रोग्राडवर एकाएकीं छापा घालावा व लेनिन, ट्रॉट्स्की व इतर बोल्शेव्हिक पुढारी यांना अटक करून त्यांना गोळ्या घालून ठार करावें, अशी त्यांनीं तयारी केली. पेट्रोग्राडमधील

सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाचे पुढारी, माजी लष्करी अधिकारी, राजसत्ताक पक्षाचे पुढारी व दोस्तराष्ट्रांचे लष्करी अधिकारी यांनीं रशियावर चोहों-कडून हल्ले चढवून पेट्रोग्राड ताब्यांत घ्यावें व मास्कोवर चाल करून जावें असें ठरविलें. सोव्हिएट सरकारविरुद्ध अशा रीतीनें सर्वत्र बंडाळी उपस्थित झाली होती, पण अंतिम ध्येय व भावी कार्यक्रम या दृष्टीनें या बंडखोरांत एकोपा नव्हता. दोस्त राष्ट्रांचे लष्करी अधिकारी, मुत्सद्दी, गुप्त पोलिस-खात्यांतील हेर, सरदार, राजकारणी पुढारी व पांढरपेशा वर्गांतील बुद्धि-मान् पुढारी या सर्वांचें ध्येयाच्या बाबतींत एकमत होणें शक्य नव्हतें. तरी क्रांतिकारकांच्या हृदयांतील देव बनलेला त्यांचा एकमेव पुढारी लेनिन या सर्वांच्या डोळ्यांत खुपत होता व त्याला नाहींसा करण्यासंबंधाचे सर्व प्रयत्न मात्र हे सर्व कटवाले एकमतानें करीत होते.

बोल्शेव्हिकांना या संकटाची पूर्ण जाणीव होती. आपल्याविरुद्ध शेंकडों कट रचण्यांत आले आहेत व बऱ्याच लष्करी पलटणीही आपल्या-विरुद्ध उठल्या आहेत हेंही ते जाणून होते. रशियांतील भांडवलवाल्या व सरदार घराण्यांतील लोकांना सोव्हिएट सरकारची सत्ता उलथून पाडा-वयाची होती; आणि रशियासारख्या एका मोठ्या देशांत शेतकरी–काम-करीवर्गाचें राज्य प्रस्थापित व्हावें, ही गोष्ट युरोपांतील साम्राज्यवादी राष्ट्रांनाही पसंत नव्हती. रशियांतील झारची सत्ता नष्ट झाली तरी हरकत नाहीं, पण त्या ठिकाणीं एकदम शेतकरी–कामकरी सोव्हिएटांची सत्ता निर्माण होणें त्यांच्या स्वार्थाच्या दृष्टीनें विघातक होतें. म्हणूनच हे सर्व लोक आपल्या हितसंबंधांचें रक्षण व्हावें व आपल्या स्वार्थाला धक्का पोंहोचूं नये या उद्देशानें एक झाले होते. क्रांतीनंतर सोव्हिएट सरकारनें रशियांतील बहुजनसमाजाची भुकेची तक्रार राहूं नये म्हणून प्रयत्न केला होता; पण तो व्हावा तितका यशस्वी झाला नव्हता. 'भुकेची ओरड' हें या आपसां-तील युद्धाचें एक महत्त्वाचें आर्थिक कारण होतें. महायुद्धाच्या कालांत रशियांतील भुकेच्या ओरडीला सुरुवात झाली. केरेन्स्कीच्या कारकीर्दींत या ओरडींत भर पडली व सोव्हिएट सरकार स्थापन होऊन ९।७ महिने झाले तरी हें भुकेचें संकट सोव्हिएटांना अजीबात नष्ट करतां आलें नाहीं, असें आढळून आलें. पुटिलोव्ह येथील पोलादी कार-

खान्यांतील कामगारांचें एक शिष्टमंडळ लेनिनकडे आलें व त्यांनीं आपलें याबाबतचें गाऱ्हाणें त्याच्यापुढें मांडलें. "धान्याचा व्यवहार करणाऱ्या लोकांत नफेबाजी वाढली असून ती कशी हाणून पाडावयाची याचा विचार सोव्हिएट सरकार व कामगारवर्ग यांना करावयाचा आहे. या प्रश्नाचा निकाल ताबडतोब करावयाचा असेल तर धान्याच्या खाजगी व्यापारास पूर्ण मनाई केली पाहिजे. आपल्याजवळ अधिक असलेलें धान्य कोणी लपवून ठेवीत असेल तर त्याला तसें करूं देतां कामा नये. शेतकऱ्यानें आपल्याजवळ असलेलें जास्तीचें धान्य ठराविक दरानें सरकारला विकलें पाहिजे. शेतकऱ्यापाशीं किती अधिक धान्य आहे याची नोंद करण्यांत आली पाहिजे. अगदीं कडक रीतीनें ही नोंद करण्यांत आली तरच रशियांतील सर्व नागरिकांत भाकरीची न्याय्य वांटणी करतां येईल आणि हें सर्व काम कामगार-सरकारच्या नियंत्रणाखालींच चाललें पाहिजे." भाकरीचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत सोव्हिएट सरकार कशा प्रकारचे प्रयत्न करणार आहे याचें वरीलप्रमाणें लेनिननें या शिष्टमंडळापुढें दिग्दर्शन केलें. आपसांतील युद्ध संपेपर्यंत लेनिननें आंखलेला हा कार्यक्रम पूर्णपणें अंमलांत होता. या बंडाळीच्या वेळीं हा कार्यक्रम हातीं घेतला नसता तर सोव्हिएट सरकारचें अस्तित्वच धोक्यांत आलें असतें. आपसांतील युद्धाला जीं अनेक कारणें झालीं त्यांपैकीं 'भाकरीची ओरड' हें एक मुख्य कारण आहे व सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षानें या परिस्थितीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना सोव्हिएट सरकारविरुद्ध उठविलें आहे, ही गोष्ट लेनिननें पूर्णपणें जाणली होती. सर्व देशाला भाकरीचा पुरवठा केला पाहिजे आणि शेतकऱ्यांवर तर या बाबतींत जुलूम होतां कामा नये या दोन्ही गोष्टी लेनिनला साधावयाच्या होत्या. भाकरी मिळत नाहीं ही सबब पुढें करून गरीब शेतकऱ्यांना व कामकऱ्यांना सोव्हिएट सरकारविरुद्ध उठवावयाचें व मध्यम वर्गातील शेतकऱ्यांकडे असलेला फाजील धान्याचा पुरवठा त्यांच्याकडून काढून घेतल्याबद्दल त्या लोकांना सोव्हिएट सरकारविरुद्ध चिथवावयाचें अशीं दोन्ही कामें या पक्षांतील लोक करीत होते. ब्रेस्ट लिटोव्हस्कच्या तहानंतर सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील जहाल लोकांनीं कायदेशीर रीतीनें सरकारविरोधी पक्ष निर्माण केला होता तरी सोव्हिएट सरकारशीं

ते एकनिष्ठ होते. सोव्हिएट सरकारच्या भांडवलवाल्या शत्रूंशीं ते फटकून वागत होते, परंतु भाकरीच्या ओरडीमुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन सरकारनें या बाबतींत स्वीकारलेल्या योजनेचा विपर्यस्त अर्थ शेतकऱ्यांपुढें त्यांनीं मांडला व शेतकरी समाजांत उत्पन्न झालेल्या असंतोषांत आणखी भरच टाकली. जूनच्या पहिल्या आठवड्यांत झालेल्या सोव्हिएटांच्या पांचव्या काँग्रेसमध्यें या पक्षांतील एक पुढारी मेरी स्पिरिडोनोव्हा इनें अंगांत भूत संचारल्याप्रमाणें वर्तन केलें व अत्याचाराला प्रोत्साहन देणारें भाषण करून बोल्शेव्हिक पुढारी शेतकऱ्यांवर अत्यंत जुलूम करीत आहेत, जर्मन साम्राज्यवाद्यांचे ते हस्तक बनले आहेत, रशिया देश जर्मनांना विकून टाकीत आहेत, असें सांगितलें. बोल्शेव्हिक पुढारी जर्मन साम्राज्यवाद्यांना सामील झाले आहेत हा आरोप किती हास्यास्पद आहे, ही गोष्ट लेनिननें या वेळीं दाखवून दिली व धान्यावरील नियंत्रणाच्या बाबतींत सोव्हिएट सरकार कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यास तयार नाहीं हें त्यानें स्पष्टपणें सांगितलें. या काँग्रेसचें अधिवेशन अद्याप संपलें नव्हतें तोंच मास्को येथील जहाल सोशालिस्ट रेव्होल्यूशनरींनीं रशियांत सर्वत्रच बंडाळी माजविली. याशिवाय मुरमान्स्कच्या बाजूला इंग्लिशांनीं, व्लाडिव्होस्टाकच्या बाजूला जपानी लष्करानें, यूक्रेनवर जर्मनांनीं, व्होल्गा प्रांतांत झेकोस्लोव्हाकांनीं धुमाकूळ माजविला होता. रशियावर याप्रमाणें चोहोंबाजूंनीं हल्ले चढविले जात असल्यामुळें सोव्हिएट सरकारच्या अस्तित्वाबद्दल आशा ठेवण्यास मुळींसुद्धां जागा राहिलेली नव्हती. पण अशा परिस्थितींतही लेनिनचें मन खंबीर होतें. आपल्या प्रत्येक भाषणांत, प्रत्येक लेखांत व प्रत्येक पत्रांत आपण शेवटीं शत्रूंचा नायनाट करणार असले आत्मविश्वासाचे विचार तो प्रगट करीत होता. सोव्हिएट सरकार स्थापन झाल्यानंतरही रशियांत सर्वत्र भुकेची ओरड सुरू झाली व सर्वत्र पुन्हा अंदाधुंदी सुरू झाली या अनर्थाला बोल्शेव्हिकांचें धोरणच कारणीभूत झालें, असें म्हणतां यावयाचें नाहीं. महायुद्ध व केरेन्स्कीप्रभृति सुधारणावादी सोशालिस्टांचें धोरणच या सर्व अनर्थांच्या मुळाशीं होतें; आणि क्रांतिविरोधी चळवळींनें तर या सर्व संकटांत भरच टाकली होती. शिवाय परराष्ट्रांच्या लष्करांचें साहाय्य घेऊन

रशियांतील क्रांतीला हाणून पाडण्याच्या धोरणामुळें रशियांत सर्वत्र गोंधळ माजला होता. अशा रीतीनें या नव्या सरकारवर चोहोंकडून संकटांचे ढग आले होते, पण हें सरकार लोकप्रिय होतें. बहुजनसमाजाच्या मान्यतेच्या जोरावर हें सरकार अस्तित्वांत आलें होतें. "जो काम करणार नाहीं त्याला भाकरी खाण्याचा हक्क नाहीं." या तत्त्वावर हें नवें सरकार प्रस्थापित झालेलें असल्यामुळें या सरकारच्या राजवटींत गरीबांना अन्नान्नदशा प्राप्त होण्याचें कांहींच कारण नव्हतें. रशियांतील सामान्य शेतकऱ्यांना व कामकऱ्यांना ही गोष्ट कळून चुकली होती. आपल्याविरुद्ध सगळें जग झालें तरी आपल्याला त्याची पर्वा नाहीं. कारखान्यांतील व खाणींतील मजूर जोंपर्यंत आपल्यामागें आहेत तोंपर्यंत नव्या सरकारला कोणापासूनही भीति बाळगण्याचें कारण नाहीं, हा वर्ग आपल्या ध्येयापासून कधींही च्युत व्हावयाचा नाहीं, आजच्या अराजक परिस्थितींतून व गोंधळांतून एक नवीनच वर्ग आपल्याला निर्माण करतां येईल, असा आपल्याला विश्वास वाटूं लागला आहे असें लेनिन म्हणत असे. ध्येयाची कल्पना स्पष्टपणें डोळ्यापुढें ठेवून त्याप्रमाणें शब्दशः वागणारा व त्याप्रमाणेंच साधें व सरळ बोलणारा असा लेनिनसारखा क्रांतिकारी पुढारी या वर्गाला लाभला असल्यामुळें त्याच्या नेतृत्वाखालीं कसल्याही संकटांना तोंड देण्यास ते तयार झाले होते. सोव्हिएट सरकार जाऊन त्या जागीं क्रांतिविरोधी लोकांच्या हातीं सत्ता गेल्यास अन्नाचा तुटवडा पडेल असें नाहीं; पण हें अन्न गरीबांना मिळणार नाहीं, श्रीमंतांनाच तेवढें तें मिळेल; आणि दारूगोळ्याच्या कारखान्यांतून १६ तास काम करण्याचा प्रसंग कामगारवर्गावर आल्याशिवाय राहणार नाहीं, जर्मनीशीं गुप्त तह करण्यांत येतील, जनतेच्या सर्रास कत्तली करण्यांत येतील व लष्करभरतीचे कँप सर्वत्र उघडण्यांत येतील, शेतकऱ्यांना पुन्हा खंदकांत जाऊन पडावें लागेल, आपल्याला मिळालेल्या जमिनी पुन्हा जमीनदारांकडे परत जातील व थोडासा प्रतिकार केल्याबरोबर छळ, गोळीबार हेंच पुन्हा आपल्या नशिबीं आल्याशिवाय राहणार नाहीं, ही गोष्ट रशियांतील सामान्य जनतेनें पूर्णपणें जाणली होती. अशा परिस्थितींत कोणतें सरकार राहूं द्यावें ! सोव्हिएट सरकार राहूं द्यावें कीं क्रांतिविरोधी सरकारला आपले हातपाय पसरण्यास

वाव द्यावा, याचा निर्णय रशियांतील जनतेनें केला होता; म्हणूनच आपसांतील युद्धाला व परराष्ट्रीय हल्ल्यांना त्यांना यशस्वी रीतीनें तोंड देतां आलें. भूक लागली तर आपलीं पोटें आवळून ठेवूं, भुकेचे कढ सहन करूं, आपल्या निढळाचा घाम गाळूं, कसल्याही प्रकारचीं दुःखें आलीं तरी तीं मुकाट्यानें सहन करूं, कामकऱ्यांची व शेतकऱ्यांची सत्ता आपल्याला चालेल, परंतु दोस्त राष्ट्रांच्या बायनटांच्या जोरावर निकोलस झार रशियावर सत्ता गाजविण्याकरितां आला तर ही गोष्ट आपण कधींही सहन करणार नाहीं, असा रशियांतील सामान्य जनतेनें निश्चय केला होता. सामान्य जनतेच्या या सामान्य व साध्या विचारसरणीपुढें मेन्शेव्हिक व सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील मोठमोठ्या वक्त्यांचें वक्तृत्व लुळें पडलें होतें. क्रांतिविरोधी लोकांना आपल्या प्रचारांत मुळींच यश मिळत नव्हतें असें नाहीं. एकाद्या लहानशा कारखान्यांत जेथें खेड्यांतूनच सर्व मजूर आले आहेत अशा ठिकाणीं बोल्शेव्हिकांना प्रतिकार करण्यांत येत असे. त्यांच्यावर हात टाकण्यांत येत असे व आपले प्राण वांचविण्याकरितां बोल्शेव्हिकांना कित्येक प्रसंगीं प्रत्यक्ष लढावेंही लागत होतें. पण केव्हां तरी क्वचित् उद्भवणारे हे प्रसंग सोडून दिले तर सामान्यतः मेन्शेव्हिक व सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी लोकांचीच दुर्वेवडी उडविण्यांत येत होती. असें असलें तरी उलट क्रांतिविरोधी पक्षांचेंही बल कमी झालें नव्हतें. १९१८ सालीं उन्हाळ्याच्या अखेरीस भरलेल्या अखिल रशियन मेन्शेव्हिक परिषदेंत दोस्त राष्ट्रांच्या लष्कराशीं संगनमत करून रशियांतील नव्या सरकारला विरोध करण्याचा ठराव पास झाला. मास्को येथील फ्रेंच मिशननें सरहद्दीवर सफेत पलटणी पाठविण्याची तयारी केली. सोव्हिएट सरकारला जर्मनीशीं युद्ध करावेंच लागेल अशी परिस्थिति निर्माण करण्याचें सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील लोकांनीं ठरविलें आणि २० जून रोजीं तर पेट्रोग्राड येथें बोल्शेव्हिक पुढारी व्होलोडार्स्की याचा खून करण्यांत आला. ६ जुलै रोजीं जहाल सोशालिस्ट क्रांतिकारकांनी जर्मन वकील कौंट मीरबॅक याचा खून केला व पेट्रोग्राड व मास्को हीं दोन्हीं शहरें ताब्यांत घेण्याचा प्रयत्न केला. सफेत पलटणींनीं (व्हाइट गार्ड) तर याच दिवशीं यारोस्लाव्हल ताब्यांत घेतलें. ब्रेस्ट लिटोव्हस्क येथें जर्मनीशीं तह करण्यांत आला व जर्मन वकील मास्को येथें येऊन

राहिला, याचा फायदा घेऊन कम्युनिस्ट पुढारी जर्मन साम्राज्यवाद्यांचे हस्तक आहेत अशा कंड्या पिकवावयास व जनतेचीं मनें त्यांच्याविरुद्ध कलुषित करण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. क्रांतीमुळें उत्पन्न झालेली परिस्थिति, महायुद्ध व आपसांतील बंडाळी यामुळें असल्या प्रकारच्या कंड्यांवर लोकांचा साहजिकच विश्वास बसत असे. लेनिनचें दूरदर्शित्व व त्याची कार्यपद्धति याची कल्पना नसल्यामुळें क्रांतिकारकांतीलही पुष्कळ तरुण पुढारी या कंड्यांवर विश्वास ठेवीत असत. लेनिन व जर्मन सेनापति लुडेन्डॉर्फ यांच्यांत गुप्त करार झाला आहे, असल्या खुळचटपणाच्या कंड्यांवरही जहाल सोशालिस्ट क्रांतिकारक विश्वास ठेवीत असत. भांडवलवाल्या वर्गांतील लोकांनीं असल्या गोष्टींवर विश्वास ठेवला तर त्यांत कांहींच नवल नव्हतें; कारण कम्युनिस्टांचें मन त्यांना समजणें शक्यच नव्हतें.

पण खरी परिस्थिति अगदीं निराळी होती. जर्मनी काय किंवा दोस्त राष्ट्रें काय दोन्हींही कम्युनिस्टांच्या विरुद्धच होतीं. दोस्त राष्ट्रें कम्युनिस्टांचा जितका द्वेष करीत होतीं किंवा त्यांना पाण्यांत पाहात होतीं तितक्या द्वेषबुद्धीनें व वैरभावानें जर्मन सरकार कम्युनिस्टांशीं वागत नव्हतें एवढेंच फार तर म्हणतां येईल. दोस्त राष्ट्रांनीं झेकोस्लोव्हाकांना हाताशीं धरलें तर जर्मनीनें डॉन नदीच्या तीरावर राहणाऱ्या कोसॅकांना सोव्हिएट सरकारविरुद्ध चिथविलें. अशा रीतीनें युरोपांतील सर्वच साम्राज्यवादी राष्ट्रें कम्युनिस्टांविरुद्ध उठलीं होतीं हें उघड होतें. कौंट मीरबॅक याच्या खुनामुळें रशियाचें जर्मनीशीं चांगलें वांकडें येईल, जर्मनी रशियावर हल्ला केल्याशिवाय राहणार नाहीं; आणि जर्मनीशीं एकदां युद्ध जुंपल्यावर सोव्हिएट सरकार अर्थातच अप्रिय होईल व खुद्द कम्युनिस्ट पक्षांतीलच जहाल लोक लेनिनप्रभृति पुढाऱ्यांवर तुटून पडतील, अशी सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील लोकांची कल्पना होती. या दोन्ही गोष्टींपैकीं एक गोष्ट मात्र साधली आणि महायुद्धाच्या बाबतींत जर्मनीवर जो आणीबाणीचा प्रसंग आला तो आला नसता तर सोशालिस्ट रेव्होल्यूशनरींचा दुसरा उद्देशही साध्य झाला असता.

कौंट मीरबॅक याच्या खुनाची बातमी ऐकतांच लेनिन स्वतः होऊन जर्मन वकिलातींत हजर झाला व या खुनाबद्दल त्यानें दिलगिरी प्रदर्शित

केली. जर्मन सरकार या वेळीं ज्या अटी सुचवील त्या सर्व मान्य करण्यास लेनिन तयारही झाला असता; परंतु मास्कोमधील आपल्या वकिलातीचें संरक्षण करण्याकरितां जर्मन लष्कराची एक तुकडी ठेवण्यांत यावी अशी अट जर्मन सरकारनें सुचवली. ही अट मात्र लेनिननें साफ नाकारली. जर्मन सरकारनें ही अट परत घेतली आणि आपल्या वकिलातीची कचेरी त्यानें प्स्कोव्ह येथें नेली. लुडेन्डॉर्फनें रशियावर पुन्हा नवीन हल्ला करण्याचें निश्चित केलें, परंतु पश्चिम आघाडीवर या वेळीं जे अनेक उत्पात घडून आले त्यामुळेंच लुडेन्डॉर्फला आपलें हल्ल्याचें धोरण मागें घेणें भाग पडलें. फ्रान्समधील युद्धभूमीवरील परिस्थिति याप्रमाणें बदलत चालली आहे ही गोष्ट लेनिनच्या लक्षांत आली होती. पण महायुद्धांतील या स्थित्यंतरापूर्वीच जर्मनीच्या बाबतींत निश्चयात्मक धोरण स्वीकारण्याचें लेनिननें ठरविलें होतें. मीरबॅकच्या खुनाला पंधरवडा लोटतो न लोटतो इतक्यांत सर्व कारखान्यांचें राष्ट्रीकरण करण्याचें आपलें धोरण सोव्हिएट सरकारच्या लोकप्रतिनिधीमंडळानें (सॉव्हनारकोमनें) जाहीर केलें. जर्मन कारखान्यांना या बाबतींत वगळण्यांत येणार नाहीं असेंही या वेळीं जर्मन सरकारला कळविण्यांत आलें. जर्मन सरकारनें या बाबतींत आपला निषेध व्यक्त केला तरीसुद्धां २८ जून रोजीं हा राष्ट्रीकरणाचा कायदा पास करण्यांत आला.

याप्रमाणें क्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या नव्या सोव्हिएट सरकारवर आलेले संकटाचे ढग हळू हळू वितळूं लागले. रशियांतील कांहीं क्रांतिकारकांनीं या सरकारविरुद्ध केलेले कट निष्फळ ठरले. जर्मनीबरोबर लढण्याचा प्रसंग सोव्हिएट सरकारवर आला नाहीं. मास्को व पेट्रोग्राडमधील बंडाळी मोडण्यांत आली. मेन्शेव्हिकांना व जहाल-मवाळ दोन्ही पक्षाच्या सोशल रेव्होल्यूशनरींना सोव्हिएट सभेतून बाहेर हांकून लावण्यांत आलें. त्यांचे सर्व बेत ढासळून पाडण्यांत आले व बोल्शेव्हिकांचें सामर्थ्य पूर्वीपेक्षांही अधिक वाढलें. १६ जुलै १९१८ रोजीं निकोलस झार व त्याच्या कुटुंबांतील मंडळींना गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. झेकोस्लोव्हाक लोक झारला व त्याच्या कुटुंबांतील लोकांना मोकळें सोडतील म्हणून आधींच इकॅटेरीनबर्ग येथील सोव्हिएटनें वरील प्रकारचा हुकूम दिला

होता. सोव्हिएट सरकारविरुद्ध करण्यांत आलेल्या उघड उघड बंडाळीला झपाट्यानें अपयश येत चाललें होतें तर त्याच वेळीं लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना व्यक्तिशः ठार मारून दहशत उत्पन्न करण्याचा प्रयत्नही सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील आपल्याला नेमस्त म्हणविणारे लोक करीत होते. या सर्व गडबडींत देशांतील कारखाने मंद गतीनें चालूं लागले होते. परंतु या कारखान्यांतून कामें करणाऱ्या कामगारांचा उत्साह मात्र कमी झालेला नव्हता. क्रांतीवरील संकटांना तोंड देण्याकरितां ते सशस्त्र व संघटित बनले होते. शहरांप्रमाणें खेड्यापाड्यांतूनही क्रांतीचें बी रुजविण्याकरितां त्यांनीं आपला मोर्चा तिकडे फिरविला होता. खेड्यांतील गरीब कामगार शेतकऱ्यांचीं मंडळें ते स्थापित होते. श्रीमंत शेतकऱ्यांनीं चोरून ठेवलेलें धान्य ते आपल्या ताब्यांत घेत होते. कारखान्यांमधून, खेड्यापाड्यांतून व सोव्हिएटांतून परराष्ट्रीय हल्ला व आपसांतील युद्ध या भावी वाढत्या संकटांची जाणीव ते त्यांना करून देत होते. रशियांत आतां कोणी भांडवलवाला राहिला नव्हता. कोणीही जमीनदार अस्तित्वांत नव्हता. सामान्य जनतेची उपासमार होत असतांना गुप्त तहांचीं कलमें पाळण्याकरितां रोज ५,००,००,००० रुबल खर्ची पडत नव्हते. भावी कालाला आपल्या मर्जीप्रमाणें स्वरूप देण्याचें काम त्यांनीं आपल्या अंगावर घेतलें होतें. लेनिन हा सोव्हिएट सरकारचा अध्यक्ष होता. राज्यकारभारावर त्याला देखरेख ठेवावी लागत होती. रोजच्या रोज किती तरी बैठकींना त्याला हजर राहावें लागत होतें. कायदा, लष्करी व्यवस्था, परराष्ट्रीय राजकारण या सगळ्यांकडे त्याला लक्ष द्यावें लागत होतें; आणि इतकें करूनही तो मधून मधून कारखान्यांतून मजुरांची स्थिति पहाण्याकरितां जात असे व मजुरांच्या सभांना हजरही रहात असे. ३० ऑगस्ट (१९१८) रोजीं पेट्रोग्राड चेकाचा (गुप्त पोलिसखात्याचा) मुख्याधिकारी युरिट्स्की याचा खून करण्यांत आल्याची बातमी आली. त्याबरोबर लेनिननें यापुढें मजुरांच्या सभांना हजर राहूं नये आणि त्या दिवशीं होणाऱ्या सभांना तर हजर राहूंच नये असें मास्को कमिटीनें ठरविलें. कमिटीचा हा निर्णय लेनिननें मानला नाहीं. संध्याकाळीं मास्को नदीपलीकडील मायकेलसन कारखान्याला त्यानें भेट दिली. त्याच्या-

बरोबर कोणीही शरीरसंरक्षक नव्हता. तो एकटाच मोटारमधून बाहेर पडून कारखान्यांत गेला. मजुरांची सभा झाली. आंतरराष्ट्रीय गीत गाण्यांत आलें. लेनिन सभेतून बाहेर आला. त्याच्या मोटारचा शॉफर त्याची वाटच पहात होता. लेनिनच्या भोंवतीं कामगारांचा बराच घोळका जमला होता व त्यांच्याबरोबर तो मोठ्या उत्सुकतेनें बोलत होता. मोटारी-कडे येत असतांना एका स्त्रीबरोबर त्याचें बोलणें चालू होतें. "धान्याचा पुरवठा करणाऱ्या खात्यांतील लोकांनीं पुष्कळ बेकायदेशीर कृत्यें केलीं आहेत ही गोष्ट खरी आहे, पण या कृत्यांबद्दल चौकशी करून त्या खात्यां-तील दोष काढून टाकतां येतील." असें तो आपल्याजवळ उभ्या अस-लेल्या स्त्रीला सांगत होता. शॉफरनें लेनिनचे हे शब्द ऐकले व त्यानंतर लगेच त्याच्यावर तीन गोळ्या झाडण्यांत आल्या व लेनिन धाडकन् जमिनीवर पडला. या तीन गोळ्यांपैकीं एक गोळी त्याच्या फुप्फुसांत शिरली व एक गोळी मानेंत शिरली. लोक भीतीनें पळून जाऊं लागले. शॉफरनें मोटारमधून बाहेर उडी टाकली. त्याच्या हातांत रिव्हॉल्व्हर होता. लेनिनच्या संरक्षणा-करितां तो त्याच्याजवळ येऊन उभा राहिला. पळणाऱ्यांच्या गर्दीतून हल्ला करणाऱ्या इसमाला शॉफर पकडूं शकला नाहीं. कार-खान्यांतील कामगार-कमिटीच्या लोकांनीं लेनिनला उचललें. जवळच्या दवाखान्यांत त्याला घेऊन जाण्याचा त्यांचा विचार होता. "मी त्याला कोणत्याही दवाखान्यांत नेणार नाहीं; मीं त्याला घरीं नेणार आहें." असें शॉफर म्हणाला. जखमी झालेल्या लेनिनच्या तोंडूनही "घरीं, घरीं" असेच उद्गार बाहेर पडले. मंडळींनीं त्याला उचललें. पण तें त्याला आव-डलें नाहीं. तो तसाच अडखळत अडखळत मोटारपर्यंत गेला. क्रेम-लिनमध्यें गेल्यावर आपल्या खोलींत चालत जाण्याचा त्यानें हट्ट धरला. त्याचा चेहरा पांढराफिकट पडला होता. जखमांमुळें कितीही वेदना होत असल्या तरी त्यानें हूं कां चूं केलें नाहीं. डॉक्टरांनीं त्याच्या जखमा बांधल्या त्या वेळींही त्याच्या तोंडून एकही कण्हण्याचा शब्द बाहेर पडला नाहीं. जखमा भयंकर स्वरूपाच्या होत्या. सामान्य प्रकृतीचा माणूस त्यांना बळीच पडला असता. पण लेनिनची प्रकृति सुदृढ होती इतकेंच नव्हे तर जगून काम करीत राहण्याची व जें कार्य हातीं घेतलें आहे तें पुरें

करण्याची प्रचंड इच्छाशक्ति त्याच्या अंतःकरणांत जागृत होती.

लेनिनवर हल्ला करणारी फॅनी कॅप्लन नांवाची एक स्त्री होती. ती सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षांतील होती. याच दिवशीं बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचे खून करण्याचे याचप्रमाणें आणखी अनेक ठिकाणीं प्रयत्न करण्यांत आले, अशा बातम्या आल्या. उघड उघड बंडाळीचे प्रयत्न अयशस्वी ठरल्यावर सोव्हिएट सरकारच्या शत्रूंनीं असल्या दहशत उत्पन्न करणाऱ्या गुप्त प्रयत्नांना हात घातला होता. लेनिनवर याप्रमाणें हल्ला झाल्यानंतर ३१ ऑगस्ट रोजीं सकाळीं सोव्हिएट सरकारतर्फे एक पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें. दहशतवाद्यांविरुद्ध युद्ध जाहीर करणारे जाहीरनामे सर्वत्र लावण्यांत आले. दहशतवाद्यांचा नायनाट करण्याच्या कामीं सोव्हिएट सरकारनें मुळींसुद्धां मागेंपुढें पाहिलें नाहीं. दहशतवाद्यांचा बंदोबस्त करण्यासंबंधानें देशांतून सर्वत्रच मागणी करण्यांत येऊं लागली. कामगारांच्या हजारों सभा होऊन त्यांत त्यांनीं दहशतवाद्यांसंबंधानें आपला संताप व्यक्त केला. जुनी राज्यसत्ता मागें पडून रशियांत नवी राज्यसत्ता प्रस्थापित होत होती. अशा वेळीं नव्या राजवटीच्या पुढाऱ्यालाच ठार करण्याचा प्रयत्न करण्यांत आला हें पाहून रशियांतील शेतकरी–कामकरीवर्गाचा संताप अनावर होणें साहजिक होतें. फॅनी कॅप्लनच्या गोळीनें एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली. रशियांत यापुढें कोणाचें राज्य असावें याचा पूर्ण निर्णय लागला. या गोळीनें रशियांतील क्रांतीचा पाया दृढ केला. मायकेलसन कारखान्यांत भाषण करतांना आपण या क्रांतीच्या युद्धांत "विजय मिळवूं किंवा मरून जाऊं" असें लेनिननें म्हटलें होतें. या गोळीमुळें खुद्द त्याच्यावरच मरणाचा प्रसंग आला होता. पण त्यांतून तो सहीसलामत वांचला. असल्या भयंकर जखमा झाल्या असतांही त्यानें त्यांची पर्वा केली नाहीं. या जखमांतून बरें होण्याकरितां लागणारी पूर्ण विश्रांतीही त्यानें घेतली नाहीं. तो लगेच कामाला लागला. १६ सप्टेंबर रोजीं झालेल्या मध्यवर्ती कमिटीच्या सभेला तो हजर राहिला व सभेंत चालू असलेल्या कामाला त्यानें मदत केली. त्याच्या गळ्यांत गोळी घुसली होती, पण या गोळीकडे लक्ष देण्यापेक्षां अधिक महत्त्वाच्या गोष्टींकडे त्याला लक्ष द्यावयाचें होतें.

महायुद्धाचा शेवट होऊन जर्मनीचा पराभव झाला. जर्मन व इंग्रज सैनिक पश्चिम रणक्षेत्रांत एकमेकांची कत्तल करीत होते ती बंद झाली. पण या सर्व सैनिकांनीं आतां आपला मोर्चा रशियाकडे वळविला व तेथील सोव्हिएट लोकसत्ता उलथून पाडण्याचा चंग बांधला. कॅप्लननें लेनिन-वर गोळ्या झाडल्या त्याच्या आदल्याच दिवशीं मुरालोव्ह, केडरोव्ह वगैरे सोव्हिएट सेनापतींना लेनिननें तारा पाठवून रशियावर चोहोंकडून चाल करून येऊं पाहणाऱ्या दोस्त राष्ट्रांच्या सैनिकांना कसें तोंड द्यावयाचें हें कळविलें होतें. शत्रूंना थोपवून धरण्याकरितां कोणकोणत्या ठिकाणीं तटबंदी करण्यांत आली आहे व कोणते आगगाडीचे रस्ते व पूल उद्ध्वस्त करण्यांत येत आहेत हें कळविण्याबद्दल त्यानें केडरोव्हला पाठविलेल्या तारेंत विचारपूस केली होती. ७ नोव्हेंबरच्या क्रांतीच्या दिवशीं पेट्रोग्राडच्या संरक्षणाच्या बाबतींत लेनिननें स्वतः पुढाकार घेतला होता त्याचप्रमाणें सोव्हिएट लोकसत्तेचें संरक्षण करण्याकरितां रशियन लष्करी हालचालींचीं सर्व सूत्रें त्यानें आतां आपल्या हातीं घेतलीं होतीं. लहान राष्ट्रांचें रक्षण करावयाचें व स्वयंनिर्णयाचे हक्क जगांतील सर्व राष्ट्रांना द्यावयाचें याकरितांच दोस्त राष्ट्रें लढत आहेत अशी फुशारकी महायुद्ध चालू असेपर्यंत मारण्यांत येत होती. पण महायुद्ध बंद होतांच हीं उदात्त तत्त्वें दोस्त राष्ट्रांनीं बाजूला गुंडाळून ठेवलीं व रशियांतील क्रांतीला विरोध करून तेथील शेतकरीकामकरी-सत्तेचा पूर्ण नायनाट करण्याचें त्यांनीं ठरविलें. क्रांतीनंतर लेनिननें शांततेकरितां अतोनात खटपट केली, पण सोव्हिएट लोकसत्तेच्या प्रत्यक्ष अस्तित्वावरच गदा आलेली पाहून त्यानें 'लाल लष्कर' (रेड आर्मी) उभारण्याचें निश्चित केलें. सोव्हिएट लोकसत्तेच्या संरक्षणाकरितां देशांतील हजारों तरुण स्वयंस्फूर्तीनें या लाल लष्करांत सामील झाले. पण शत्रूला तोंड देण्यास आवश्यक इतक्या लष्कराची भरती करण्याकरितां सक्तीचें लष्कर उभें करण्याचें-ही फर्मान लेनिनला काढावें लागलें. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे रशियांतील बुद्धिमान् वर्गांतील लोक व शेतकरी या राष्ट्ररक्षणाच्या मोहिमेंत सोव्हिएट सरकारच्या लष्करांत सामील होण्यास तयार झाले. सैबेरियांतील आघाडीवर तर तेथील स्थानिक शेतकऱ्यांच्या लष्करी तुकड्यांनीं दोस्त राष्ट्रांच्या लष्करी हल्ल्याला यशस्वी रीतीनें तोंड दिलें. लष्करांतील

जबाबदारीच्या जागा स्वीकारून या हल्ल्याला यशस्वी रीतीनें तोंड देतील असे फारच थोडे लष्करी तज्ज्ञ लेनिनला या वेळीं मिळाले. जुन्या लष्करांतील बरेच तरुण अधिकारी लेनिनला मदत करण्यास तयार झाले. हें सर्व लाल लष्कर केवळ बोल्शेव्हिकांनीं उभारलें होतें. झारची सत्ता उलथून पाडण्याकरितां कम्युनिस्टांनीं कंबर कसली होती त्याचप्रमाणें सोव्हिएट सत्तेचें रक्षण करण्याकरितांही आतां हजारों कम्युनिस्ट तरुण स्त्रीपुरुष पुढें आले; आणि यांपैकीं कांहीं कांहीं सामान्य कामगारही पुढें लाल लष्करांतील सेनापती बनले.

क्रांतीच्या रक्षणाकरितां उभारलेल्या लष्कराचें आधिपत्य ट्रॉट्स्कीला देण्यांत आलें होतें. क्रांतिकारी लष्करी (रेव्होल्यूशनरी मिलिटरी) कौन्सिलचा सर्व कारभार त्याच्याच स्वाधीन करण्यांत आला होता. अदम्य उत्साह, प्रबल इच्छाशक्ति, लोकांचीं मनें थरारून सोडणारें वक्तृत्व वगैरे गुण त्याच्या ठिकाणीं होतें; पण अर्वाचीन युद्धांत लागणारे धीमेपणाचे गुण त्याच्या अंगीं नव्हते. क्रांतीच्या वेळीं ट्रॉट्स्की हाच रशियन क्रांतिकारक लष्कराचा सेनापति होता. पण या क्रांतीनंतर सर्व जगांत तावडतोब क्रांति झाल्याशिवाय कामगारवर्गाला समाजसत्ताक राज्यपद्धति निर्माण करतां यावयाची नाहीं असें त्याला वाटूं लागलें होतें. तसेंच क्रांतीच्या वेळीं दोस्त या नात्यानें शेतकरीवर्गाचा कांहीं उपयोग होणार नाहीं असेंही त्याला खात्रीपूर्वक वाटत होतें. ट्रॉट्स्की ज्या पक्षाला येऊन मिळाला होता त्या पक्षाबद्दल त्याला फारसें प्रेम वाटत नव्हतें. जुन्या राजवटींतील राजनिष्ठ सेनापतीच लष्करें उभारूं शकतील असें त्याचें मत झालें होतें. शिवाय त्याची लष्करी संघटनेची व लष्करावर हुकुमत चालविण्याची पद्धतीही या वेळीं कम्युनिस्ट सैनिकांना आवडली नाहीं. दोन स्पेशल गाड्यांतून तो रशियाच्या सरहद्दींवरील रणक्षेत्रांवर धांवाधांव करीत होता. शिवाय ज्यांची अंमलबजावणी होण्याचा संभव नाहीं असल्या विचित्र योजना तो आंखीत होता व विचित्र हुकूमही तो सोडीत होता. या दिवसांत त्याची भेट घेणेंच दुरापास्त होऊन बसलें होतें. शिवाय एखादा पराभव झाला कीं त्याचें डोकें फिरून जात असे. या पराभवाचा दोष नवीन बोल्शेव्हिक अधिकाऱ्यांवर तो टाकीत असे व कम्युनिस्ट सैनिकांना आपला दरारा वाटावा

म्हणून दहा पांच बोल्शेव्हिक सैनिकांना गोळ्या घालून ठार करण्याचा हुकूम तो तारेनें पाठवीत असे. असें असलें तरी क्रांतीच्या वेळीं व क्रांती-नंतर सोव्हिएट सत्तेचें आपसांतील यादवीपासुन व परचक्रापासून संरक्षण करण्याची बहुमोल कामगिरी ट्रॉट्स्कीनें बजावली यांत शंका नाहीं. १९१८ सालच्या अखेरीस सोव्हिएटांना फारसें मोठें लष्कर उभारतांच आलें नाहीं. १९१९ च्या प्रारंभीं ५० ते ६० हजार सैनिकांची फक्त कागदावर नोंद झाली होती, पण प्रत्यक्ष संख्या फारच थोडी होती. लष्करामागून फिरणारे बाजारबुणगेच फार होते; आणि लष्करांतून पळून जाणारांची संख्या वाढत चालली होती. यामुळें सोव्हिएटांना ठिक-ठिकाणीं मावार घ्यावी लागत होती. अशा परिस्थितींत क्रांतिकारी लष्करी मंडळाच्या कामांत लेनिनला वारंवार ढवळाढवळ करावी लागली.

१९१९ च्या प्रारंभीं झालेल्या बोल्शेव्हिकांच्या आठव्या कॉंग्रेसमध्यें याच प्रश्नाचा खल झाला. ट्रॉट्स्की या कॉंग्रेसच्या अधिवेशनाला हजर राहिला नाहीं. मध्यवर्ती कमिटीतर्फे लेनिन, स्टॅलिन व सोकोल्निकोव्ह यांचींच या अधिवेशनांत भाषणें झालीं. व्यवस्थित शिस्तीचें लष्कर रशि-यांत अद्याप उभारण्यांत आलेलें नाहीं; आणि तसें झालें नाहीं तर क्रांती-चा प्रयत्न फुकट जाईल अशी त्यांनीं तक्रार केली. या वेळेपासूनच स्टॅलिनला लेनिननें विश्वासांत घेतलें व आणीबाणीच्या प्रसंगीं सोव्हिएट रशियाचें रक्षण करण्याचें सामर्थ्य स्टॅलिनमध्यें आहे या विश्वासानें लष्करी तज्ज्ञ म्हणून लेनिन त्याचा सल्ला घेऊं लागला.

सोव्हिएट रशियावर या वेळीं खरोखरच आणीबाणीचा प्रसंग आला होता. डेनिकिनच्या घोडदलानें लाल लष्कराच्या पिछाडीवर हल्ला चढ-विला होता व उरलच्या आसपास त्याचें सैन्य येऊन थडकलें होतें. डेनिकिनचें हें लष्कर मास्कोहून फारशा अंतरावर राहिलेलें नव्हतें. "सोव्हिएट लोकसत्ता शत्रूंनीं चोहोंकडून वेढली असून सर्व रशियानें या वेळीं एकजुटीनें शत्रूला तोंड दिलें पाहिजे." असें विनंतिपत्र या वेळीं लेनिननें काढलें होतें. या वेळीं आपल्या सर्व शक्ति कम्युनिस्टांनीं आप-ल्या शत्रूंचा धुव्वा उडविण्याच्या कामींच खर्ची घातल्या पाहिजेत, कोल-चॅक व डेनिकिन हे दोस्त राष्ट्रांचे सेनापती कोणत्या उद्देशानें रशियावर

चाल करून येत आहेत हें लोकांना नीट समजावून सांगितलें पाहिजे, या युद्धांत पराभव झाल्यास झारशाहीपेक्षांही अत्यंत जुलमी राज्यसत्ता रशियांत प्रस्थापित होईल याची जाणीव आपल्या लष्करांतील सैनिकांना करून दिली पाहिजे, असे हुकूम लेनिननें सर्वत्र पाठवून दिले. लेनिन व स्टॅलिनप्रभृति कम्युनिस्ट पुढाऱ्यांनीं या वेळीं जी उचल खाल्ली ती अगदींच फुकट गेली नाहीं. या चळवळीमुळें शेतकरी सैनिक आतां लष्करांतून बाहेर पळून जाईनासे झाले व हजारों पळून गेलेले शेतकरी पुन्हा लष्करांत सामील झाले. राष्ट्ररक्षणाशीं संबंध नसलेलीं सर्व कामें सोडून देऊन प्रत्येक कम्युनिस्ट आघाडीवर जाणाऱ्या सैन्यांत येऊन दाखल झाला. बोल्शेव्हिकांना 'रानटी' या नांवानें संबोधणाऱ्या लोकांना पकडण्यांत येऊन त्यांना आघाडीवरचे खंदक खणण्याचें व रस्ते तयार करण्याचें काम देण्यांत आलें; आणि रशियापाशीं जी शस्त्रसामग्री शिल्लक राहिली होती तिचा पूर्णांशानें उपयोग करून डेनिकिनप्रभृतींच्या दोस्त राष्ट्रांच्या हल्ल्यांना तोंड देण्याची लेनिननें तयारी केली.

सोव्हिएट लोकसत्ता या वेळीं अगदीं नामशेष होण्याचा प्रसंग आला होता. मास्को व पेट्रोग्राडभोंवतीं दोस्त राष्ट्रांचीं लष्करें तळ देऊन बसलीं होतीं. या लष्करापाशीं हवा तेवढा दारूगोळा होता; त्यांचीं विमानें व लढाऊ जहाजें सर्व युद्धसामग्रीनें जय्यत तयार होतीं; त्यांचे सेनापती कसलेले लष्करी तज्ज्ञ होते. लाल लष्कराची परिस्थिति मात्र याच्या अगदीं उलट होती. त्यांच्यापाशीं चिलखती गाड्या नव्हत्या, कांहीं जुन्या मोडक्यातोडक्या विमानांशिवाय त्यांच्यापाशीं नवीं चांगलीं विमानेंही नव्हतीं व त्यांचें घोडदळही असावें तितकें भरपूर नव्हतें. पण असल्या परिस्थितींतही लेनिनच्या लष्करी तयारीला यश आलें. सर्व बाजूंनीं जय्यत तयारी असलेल्या दोस्त राष्ट्रांच्या लष्करांचा ठिकठिकाणीं पराभवच होत गेला. दोस्त राष्ट्रांच्या सेनापतींचा पराजय व लेनिनप्रभृति क्रांतिकारकांचा विजय ही यावेळची अद्भुत व आश्चर्यमय घटना होती. भुकेलेल्या, दमलेल्या पण क्रांतीच्या रक्षणाच्या ईर्षेनें सर्वस्व अर्पण करण्यास तयार झालेल्या लाल लष्करांतील शेतकरी-कामकरी सैनिकांनीं हा विजय संपादन केला खरा, पण त्यापेक्षांही दोस्त राष्ट्रांच्या सफेत लष्करांतील (व्हाइट आर्मी)

शेतकरी सैनिकांची कुचराई, त्या लष्करांतील अधिकाऱ्यांचा भ्याडपणा व सोव्हिएट रशियाविरुद्ध लढण्याची सैनिकांची नाखुषी या गोष्टीही या विजयाला कारणीभूत झाल्या, असें म्हणण्यास हरकत नाहीं. याशिवाय लाल लष्करांत सामील झालेल्या हजारों कम्युनिस्टांचें शिस्तीचें वर्तन व आपल्याबरोबर अडाणी सैनिक घेऊन शत्रूंच्या चिलखती गाड्यांवर धांवून जाऊन त्या काबीज करण्याच्या कामीं त्यांनीं दाखविलेलें धाडस व इतर अनेक प्रसंगीं त्यांनीं दाखविलेलें शौर्य आणि त्यांतल्या त्यांत एखाद्या लष्करी तज्ज्ञाप्रमाणें लेनिननें वेळोवेळीं दिलेले हुकूम व स्वीकारलेलें धोरण, या गोष्टीही दोस्त राष्ट्रांच्या पराजयास कारणीभूत झाल्या यांत शंका नाहीं. चळवळे पुढारी व मुत्सद्दी लष्कराच्या बाबतींत ढवळाढवळ करूं लागले म्हणजे लढाईचें मातेरें झालें असें समजावें अशी एक म्हण आहे. पण ही म्हण क्रांतीला लागू नाहीं. क्रॉमवेल लष्करी तज्ज्ञ म्हणून कधींच प्रसिद्ध नव्हता. तो क्रांतिकारी चळवळ्या पुढारी होता. अब्राहाम लिंकन हा सर्वसामान्य गृहस्थ होता. पण अमेरिकेंतील आपसांतील युद्धाच्या वेळीं उत्तर अमेरिकेच्या लष्कराचा तो एक आधारस्तंभ होऊन बसला होता. व्यापक ग्रहणशक्ति, बारीकसारीक गोष्टीही समजून घेण्याची जिज्ञासा, वज्रप्राय इच्छाशक्ति, शुद्ध विवेकबुद्धि व स्पष्ट ध्येयवादित्व या गुणांमुळें लेनिनही या वेळीं एक नमुनेदार लष्करी माणूस बनला व सोव्हिएट लाल लष्कराच्या विजयाला तो पुष्कळ अंशीं कारणीभूत झाला.

मार्च १९२० मध्यें या युद्धाचा शेवट होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. कोलचॅक व डेनिकिन यांचा पराभव झाला व इंग्लंडनें या युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें. पण फ्रान्सची खुमखुमी अद्याप जिरली नव्हती. त्यानें सेनापति रँगल याला मदत करून क्रीमियांतील डेनिकिनचें लष्कर पुन्हा संघटित करण्याची खटपट केली व पोलंडला सोव्हिएट रशियाविरुद्ध उठविलें. फ्रान्सचा पाठिंबा मिळाल्यावर पोलंडचा पिल्सुडस्की यानें यूक्रेनवर हल्ला चढविला व कीव्ह शहर ताब्यांत घेतलें. पोलंड व फ्रान्स या राष्ट्रांनीं सोव्हिएट रशियावर चढविलेला हल्ला म्हणजे युरोपांतील साम्राज्यशाहीनें रशियांतील शेतकरी-कामकरी सत्ता उलथून पाडण्याकरितां केलेला अखेरचाच प्रयत्न होता. या झटापटींत सोव्हिएट रशियाला

यावें तसें यश आलें नाहीं. लेनिननें रिगा येथें पोलंडशीं स्वतंत्र रीतीनें तह केला आणि रँगलला एकाकी गांठून त्याचा पूर्ण पराभव केला व १९२० च्या नोव्हेंबरांत त्याला रशियांतून बाहेर हांकून लावलें.

याप्रमाणें सोव्हिएट रशियाविरुद्ध उठलेलें वादळ १९२० अखेर शांत झालें व लेनिनप्रभृतींना रशियांत प्रस्थापित झालेली समाजसत्तात्मक राज्यपद्धति दृढमूल करण्यास अवकाश मिळाला. रशियांतील कामगार-क्रांतीचा नायनाट करण्याकरितां खुद्द देशांतीलच कांहीं लोकपक्षांनीं प्रयत्न केला व त्याकरितां परकीय साम्राज्यवादी राष्ट्रांचीही त्यांनीं मदत घेतली. अशा रीतीनें आपल्यावर आलेल्या या भयंकर संकटाला तोंड देण्याकरितां लेनिननें लष्कराच्या बळावर देशांतील खासगी व्यापार बंद केला व शेतकऱ्यांपाशीं वाजवीपेक्षां जास्त असलेलें धान्य ठराविक किंमत देऊन आपल्या ताब्यांत घेतलें व बरेच कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करून सोडले. लेनिनप्रभृतींनीं युद्धाच्या कालांत स्वीकारलेलें हें धोरण "लष्करी समाजसत्तावाद ( वॉर कम्युनिझम् )" या नांवानें प्रसिद्ध होतें. युद्ध चालू होतें तोंपर्यंत हें लष्करी धोरणही चालू ठेवणें अपरिहार्य होतें. आपसांतील युद्ध जसजसें वाढूं लागलें व परकीयांचा हात या युद्धांत जसजसा जास्त शिरूं लागला तसतसे देशांतील कारखानदारही उघडपणें या क्रांति-विरोधी युद्धांत सामील होऊं लागले. तेव्हां क्रांतीचा नाश करण्याकरितां प्रवृत्त झालेल्या या लोकांच्या हातीं कारखाने ठेवणें इष्ट नसल्यामुळें १९१८ च्या जूनच्या अखेरीस सोव्हिएट सरकारनें एक वटहुकूम काढून ४००० कारखाने राष्ट्राच्या मालकीचे करून टाकले; तरी देशांतील कांहीं कारखाने व खाणी अद्यापि कारखानदारांच्या ताब्यांत ठेवण्यांत आल्या होत्या; पण ही स्थिति फार वेळ टिकूं शकली नाहीं. युद्धामुळें देशांतील धान्याचा पुरवठा कमी पडूं लागला, बरेचसे कामगार शहरें सोडून खेडेगांवांतून आपल्या शेतीवर उदरनिर्वाहाकरितां जाऊं लागले त्या वेळीं देही कार-खाने एकामागून एक बंद पडूं लागले. युद्ध सुरू झाल्यानंतर धान्याच्या बाबतींतील खुला व्यापार बंद करण्यांत आला होता. यामुळें आपल्या कुटुंबाला जरूर असेल तेवढ्याच धान्याची पैदास शेतकरी करूं लागले. कुलक ( सुखवस्तु शेतकरी ) तर साम्राज्यवादी शत्रूंनाच उघडपणें जाऊन

मिळाले आणि मध्यम स्थितींतील शेतकऱ्यांचीं मनें हेलकावे खाऊं लागलीं. लाल लष्करांत शेतकरी सैनिकांचीच संख्या जास्त असल्यामुळें त्यांच्या मनावरही या घटनेचा दुष्परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. लष्करी सत्तेच्या जोरावर कारखान्यांचें राष्ट्रीकरण करण्यांत आलें व धान्याच्या खुल्या व्यापाराला पायबंद घालण्यांत आला. परंतु लष्करी सत्तेचा उपयोग करून शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या ताब्यांतून काढून घेण्यांत आल्या नाहींत किंवा मोठ्या प्रमाणावर धान्याची पैदास करावी म्हणून त्यांच्यावर जुलूम-जबरदस्तीही करण्यांत आली नाहीं. रशिया हा शेतकऱ्यांचा देश असल्यामुळें तेथील शेतकऱ्यांची वैयक्तिक मालमत्ता रक्षण करण्याची व ती वाढविण्याची त्यांची भांडवलदारी ईर्षा कमी झालेली नव्हती. रशियांतील उद्योगधंदे समाजाच्या ताब्यांत घेण्यांत आले, पण रशियांतील शेतकऱ्याला समाजसत्तावादाचें मर्म अद्याप समजलें नव्हतें. हा शेतकरी पूर्ण समाजसत्तावादी होण्यास बराच अवधि लागला आणि जबरदस्तीनें नव्हे तर शिक्षणप्रसारानें लेनिननें या वर्गाला आपलेंसें करून घेतलें. रशियांतील प्रत्येक शेतकऱ्याला व कामकऱ्याला समाजसत्तावादाचें रहस्य समजलें पाहिजे व रशियांतील राज्य हें शेतकरी-कामकरीवर्गाचें राज्य आहे असें त्यांना वाटलें पाहिजे, म्हणून देशाच्या राज्यकारभारांत या श्रमजीवी वर्गाचा जास्तींत जास्त हात असला पाहिजे, असा लेनिननें प्रयत्न केला. क्रांतीनंतर रशियांत समाजसत्ताक राज्यपद्धति सुरू झाली खरी, पण या राजवटींतही इतर भांडवलदारी राष्ट्रांप्रमाणें नोकरशाहीचें प्रस्थ माजलें. लेनिनला ही गोष्ट आवडली नाहीं. रशियाच्या समाजसत्तावादी राज्यांत सुशिक्षित सत्ताधारी लोकांची एक नवीन जात निर्माण करण्याची लेनिनची मुळींच इच्छा नव्हती. खाजगी मालमत्ता धारण करणारा व श्रमजीवी लोकांना पिळून काढणारा वर्ग ज्याप्रमाणें नष्ट करावयाचा त्याप्रमाणेंच राज्यकारभार चालविणाऱ्या नोकर लोकांचाही वर्ग नष्ट करण्याचें लेनिननें ठरविलें होतें. नोकर लोकांच्या या वर्गाबद्दल लेनिनला अत्यंत तिटकारा वाटत होता. उच्च वर्गांतील लोकांनीं राज्यकारभार हातीं घेऊन तो निर्जीव बनवून टाकावा ही गोष्ट लेनिनला पसंत नव्हती. अशा प्रकारचा राज्यकारभार

म्हणजे एका विशिष्ट वर्गानें आपलेंच वर्चस्व राखण्याकरितां चालविलेला राज्यकारभार होय, असें लेनिनचें मत होतें. क्रांतीपूर्वीच्या जुन्या अपहरणात्मक राज्यपद्धतीचाच तो एक अवशेष असल्यामुळें त्याचा नायनाट करून टाकण्याचें लेनिननें ठरविलें होतें. राज्यकारभारांतील अधिकारीवर्गाचें प्रस्थ नाहींसें करावयाचें झाल्यास सामान्य शेतकऱ्याला व कामकऱ्यालाही राज्यशासनाचें सामान्य शिक्षण मिळालें पाहिजे अशी त्यानें व्यवस्था केली. अधिकारीवर्गात परंपरागत आलेले मानापमानाचे सर्व शिष्टाचार त्यानें बंद केले. कोणत्याही कामकऱ्याला व शेतकऱ्याला आपलें गाऱ्हाणें थेट वरच्या अधिकाऱ्यापर्यंत बिनदिक्कत मांडतां आलें पाहिजे, त्याला कोठेंही अडथळा होतां कामा नये, असे त्यानें हुकूम सोडले. उपासमारीनें गांजलेल्या मास्को येथील कांहीं कामगारांना धान्य न देतां रिकाम्या हातानें त्यांना परत पाठविलें याबद्दल धान्यविक्रीखात्यांतील एका अधिकाऱ्याला कैद करण्याचा त्यानें हुकूम केला व ही गोष्ट वर्तमानपत्रांतून व हस्तपत्रकांतून प्रसिद्ध करावी व असले गुन्हे यापुढें घडल्यास त्या गुन्हेगारांना प्रसंगीं गोळी घालून ठार करण्यांत येईल, असें त्यानें जाहीर केलें. लांचलुचपत, वशिलेबाजी हे भांडवलदारी राज्यपद्धतींतील परंपरागत आलेले दोष असून अत्यंत कडक धोरण स्वीकारून तें काढून टाकण्यांत आले पाहिजेत, असें तो आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत होता. लांचलुचपतीबाबतचे कायदे अत्यंत सौम्य आहेत व त्यांची अंमलबजावणीही सौम्य रीतीनें होते अशी त्यानें न्यायखात्याचे प्रधान कुर्स्की याच्याजवळ तक्रार केली होती. लांचलुचपत, राज्यकारभारांतील दिरंगाई व अधिकारशाही यांविरुद्ध लेनिननें निर्दयतेनें हत्यार चालविलें. त्याचप्रमाणें राज्यकारभारावर बहुजनसमाजाचा पूर्ण ताबा राहील व रशियाचें सरकार हें पूर्णपणें कामकऱ्यांचें बनेल अशा प्रकारची विधायक योजनाही लेनिननें आंखली. सरकारी कारभारावर शेतकरी व कामकरीवर्गाच्या प्रतिनिधींची देखरेख राहील, असें एक स्वतंत्र खातेंच लेनिननें निर्माण केलें. लेनिनच्या या योजनेला स्टॅलिनची पूर्ण संमति होती. श्रमजीवी वर्गातील लोकांवर—विशेषतः स्त्रियांवर जे नाना प्रकारचे जुलूम होत आहेत त्यांचा बंदोबस्त झाला पाहिजे, स्त्रियांना आपल्या मागण्या

व तक्रारी मोकळेपणानें सरकारपुढें मांडतां आल्या पाहिजेत व त्या दूर करण्याच्या बाबतींत कोणत्याही प्रकारचा अडथळा येतां कामा नये, समाजांतील अत्यंत मागासलेल्या या स्त्रीवर्गाला सरकारच्या कारभारावर देखरेख ठेवतां येईल व या कारभारावर आपलें नियंत्रण आहे असें त्यांना अभिमानपूर्वक वाटेल अशी तजवीज लेनिननें केली. हें सर्व काम संघटित झालेल्या कम्युनिस्ट पक्षानें व देशांतील कामगारसंघांनीं केलें पाहिजे, असें लेनिनचें म्हणणें होतें. बोल्शेव्हिक पार्टीच्या बाराव्या कॉंग्रेस-मध्यें लेनिननें याच प्रकारच्या सूचना मांडल्या व त्या मंजूर करण्यांत आल्या. शेतकरी-कामकरी-चौकशीखातें व मध्यवर्ती नियंत्रणकमिटी या दोन्ही संस्थांच्या सहकार्यानें राज्यकारभारावर देखरेख करण्याचें काम झालें पाहिजे व कोणी कितीही वजनदार व लोकप्रिय असला तरी त्याचे या बाबतींतील दोष बाहेर उघडपणें जाहीर करण्यांत आले पाहिजेत, त्याचें दिरंगाईचें वर्तन, नालायकी व किरकोळ कां होईना पण लांचलुचपत घेण्याची त्याची संवय या सर्वांवर निर्भीडपणें टीका करण्यांत आली पाहिजे, असा लेनिनचा कटाक्ष होता. शिष्टाचार व दिरंगाई यांचा तर लेनिनला फारच तिटकारा वाटत असे; आणि लेनिननें या बाबतींत टीकास्त्र उचलल्यामुळें सरकारी खात्यावरील मोठमोठ्या मंडळींशीं त्याचें वितुष्ट उत्पन्न झालें. पण लेनिननें त्याची पर्वा केली नाहीं.

सरकारी राज्यकारभारावर योग्य प्रकारें देखरेख करतां यावी या दृष्टीनेंच कामगारसंघांचा उपयोग करावयाचा असल्यामुळें या कामगारसंस्थांचा सरकारी राज्यकारभाराशीं बिलकूल संबंध असतां कामा नये, अगदीं स्वतंत्रपणानें त्यांना आपली चळवळ चालवितां आली पाहिजे व सरकारी हितसंबंधांच्या रक्षणापेक्षां कामगारांच्या हितसंबंधांचें रक्षण त्यांना करतां येईल इतकें स्वातंत्र्य व महत्त्व त्यांना प्राप्त झालें पाहिजे, कामगारसंघ म्हणजे शेतकरी-कामकरी राज्यसत्तेच्या सामर्थ्याची राखीव सेना असून हे संघ अत्यंत प्रबल व कार्यक्षम होतील अशी काळजी घेण्यांत आली पाहिजे, असें लेनिनचें सांगणें होतें. कामगारवर्गाच्या सर्वाधिकारी सत्तेची (डिक्टेटरशिप ऑफ दी प्रॉलेटेरियट) स्थापना पूर्ण लोकसत्ताक तत्त्वावरच झाली पाहिजे. सॉव्हि-एट राज्यपद्धति म्हणजे अत्यंत उच्च दर्जाची लोकसत्ताक राज्यपद्धति होय, असें

आपण सिद्ध केलें पाहिजे, अशी लेनिनची महत्त्वाकांक्षा होती. पिळणूक करणाऱ्या वर्गाला या पद्धतींत मुळींसुद्धां थारा देतां कामा नये व कामगारसंघांच्या साहाय्यानें प्रत्यक्ष राज्यकारभाराशीं बहुजनसमाजाचा कायमचा संबंध जोडावा, सर्वाधिकारी सत्तेच्या तत्त्वावर देशाचा राज्यकारभार चालला तरी ही सर्वाधिकारी सत्ता कामगारांची असावी, या सत्तेवर श्रमजीवी वर्गाचें नियंत्रण असावें, उलट या सत्तेनें कामगारवर्गावर आपलें प्रभुत्व गाजवूं नये, समाजांतील खालच्या वर्गाकडून मिळालेल्या स्फूर्तीच्या जोरावर सरकारचा राज्यकारभार चालावा, शासित व शास्ते यांचे हितसंबंध एकाच स्वरूपाचे असावे, सामान्य जनतेचे विचार व मागण्याच आम्ही प्रगट करतों व पूर्ण करतों म्हणूनच आम्ही राज्यकारभार चालवूं शकतों, असें लेनिन म्हणत असे.

बहुजनसमाजाचे हितसंबंध सुरक्षित राखावयाचे या धोरणानें राज्यकारभार चालू ठेवावयाचा हें खरें असलें तरी प्रत्येक बाबतींत जनतेचें मत घेण्याचीच जरूरी आहे असें नाहीं. मतप्रचाराची चळवळ करून जनतेच्या मताला वाटेल तें वळण देतां येईल अशी ट्रॉट्स्कीची विचारसरणी होती. युद्धकालांत जडलेल्या अरेरावीच्या संवयीचाच केवळ हा परिणाम होता. रशियांतील समाजसत्ताक राज्याचे आंतरराष्ट्रीय संबंध जागतिक क्रांतीला पोषक होतील असेच असले पाहिजेत, जगांतील सर्व औद्योगिक राष्ट्रें समाजसत्तावादी झाल्याशिवाय सर्व दृष्टींनीं मागसलेला रशिया समाजसत्तावादी होणार नाहीं, रशियांतील समाजसत्तावादी क्रांति ही जागतिक क्रांति करण्याच्या दृष्टीनें टाकलेलें पहिलें पाऊल आहे, असें ट्रॉट्स्कीचें मत असल्यामुळें सोव्हिएट लोकसत्ताक राजवटींत प्रत्यक्ष उपस्थित झालेल्या प्रश्नांकडे त्याचें पूर्ण दुर्लक्ष होतें व लष्कराची व मतप्रचाराच्या चळवळीची संघटना याच गोष्टींवर त्याचा विशेष भर होता. जागतिक क्रांति हें लेनिनचेंही अंतिम ध्येय होतें. रशियन क्रांति हा त्यांतील एक भाग आहे व रशियांतील सोव्हिएट लोकसत्ता जगावयाची असेल तर पाश्चात्य राष्ट्रांचा तिला पाठिंबा मिळाला पाहिजे, ही गोष्ट लेनिनला मान्य होती. "इतिहासाचें भवितव्य पूर्णत्वानें आपण निश्चित करूं शकत नाहीं. इतिहासांतील घडामोडी अगदीं आपल्या मनाप्रमाणें घडून येत नाहींत. जागतिक क्रांति आज ना उद्यां खात्रीनें घडून येईल, पण तिची तयारी मंद गतीनें चालू आहे. पाश्चात्य राष्ट्रें भांड-

वलदारीचा पुरस्कार करणारी असली व ती भांडवलदारी राहिली तरी क्रांतीनंतर आलेल्या संकटांना रशियानें धैर्यानें तोंड दिलें आहे, या संकटांतून तो सहीसलामत वांचला आहे व आज रशियांत समाजसत्तात्मक राज्यपद्धति प्रस्थापित करणें शक्य झालें आहे. रशियानें तेवढें सामर्थ्य आतां संपादन केलें आहे." लेनिनची विचारसरणी वरील प्रकारची होती. यामुळें लेनिन राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करूं लागला होता, कामगारसत्तात्मक कां होईना पण राष्ट्रीयत्वाच्या भावनेला तो बळी पडत चालला होता, असें तला मुळींच भाग नाहीं. जागतिक क्रांति झाल्याशिवाय रशियांतील सोव्हिएट लोकसत्ता जगावयाची नाहीं किंवा तिचें सामर्थ्य वाढावयाचें नाहीं, असें कित्येक कम्युनिस्ट पुढाऱ्यांना वाटत होतें; पण ही विचारसरणी त्याला मान्य नव्हती. ज्या सामर्थ्याच्या जोरावर रशियांतील बोल्शेव्हिकांनीं क्रांति घडवून आणली व परचक्र आलें असतां त्याचें निवारणही ज्या सामर्थ्यावर केलें त्याच्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता; म्हणून जागतिक क्रांतीचें स्तोम न माजवितां सोव्हिएट लोकसत्तेच्या दृढीकरणाची व रशियांतील उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ करण्याची योजना लेनिननें आंखली होती. जागतिक क्रांति आतां अगदीं जवळ आली आहे असें महायुद्धाच्या अखेरीच्या दिवसांत कांहीं लोकांना वाटत होतें. पण व्हर्सायच्या तहानंतर जागतिक क्रांतीसंबंधाच्या या आशा नष्ट होत चालल्या व १९२३ च्या पावसाळ्यांत जर्मनींतील क्रांतिकारक चळवळींचा पूर्णपणें बीमोड झाल्यानंतर तर या आशेला कोठें जागाच राहिली नाहीं. लेनिनला १९२१ सालींच या परिस्थितीची कल्पना आली होती व तिला अनुसरूनच युरोपांतील इतर देशांच्या परिस्थितीवर विसंबून न राहतां स्वतंत्र धोरणानें रशियांतील आर्थिक व्यवहार चालविण्याचें त्यानें ठरविलें होतें. क्रांतीनंतर सुरू झालेल्या आपसांतील युद्धाच्या कालांत आर्थिक दृष्ट्या अनेक बिकट प्रसंग रशियावर आले होते. या कालांत बहुतेक कारखाने बंद झाले, घरांतील उष्णता कायम ठेवण्याकरितां कोळसाही मिळेनासा झाला, मोठमोठ्या रस्त्यावरूनही दिवे लागेनासे झाले, नवीन समाजरचना प्रस्थापित करण्याच्या ईर्षेनें पुढें आलेल्या कामगारवर्गांतील लोक रोगांच्या सांथींना व उपासमारीला बळी पडूं लागले व अन्नान्नदशा

होऊन खेड्यापाड्यांतून धान्याच्या शोधार्थ लोक हिंडूं लागले. असल्या बिकट परिस्थितींतही रशियाचें औद्योगीकरण कसें करावयाचें व रशियांत नवें युग कसें निर्माण करावयाचें याच्या अवाढव्य योजनांचीं स्वप्नें लेनिनला पडत होतीं. सैबेरियांतील अनेक भागांत कोळशाच्या खाणी काढतां येतील व अनेक ठिकाणीं धरणें बांधून विद्युच्छक्तीचीं केंद्रें निर्माण करतां येतील ही कल्पना सैबेरियांत पूर्वी हद्दपार झालेल्या क्रिझिझानोव्हस्की नांवाच्या दोस्तानें त्याच्यापुढें मांडल्याबरोबर वर्तमानपत्रांतून या योजनेचा सर्वत्र गाजावाजा करून ती लोकप्रिय करून टाकण्याची त्यानें व्यवस्था केली. ही योजना अंमलांत आणून १०।२० वर्षांत सर्व देशभर विद्युच्छक्तीचीं केंद्रें निर्माण करतां येतील, असें त्यानें या वेळीं बोलून दाखविलें.

रशियांतील सर्व रेल्वेंना विद्युच्छक्तीचा पुरवठा करतां येणें अशक्य आहे अशी क्रॅसीन नांवाच्या विद्युत्खात्यांतील एका तज्ज्ञ एंजिनियरानें शंका व्यक्त केली. त्या वेळीं लेनिननें त्याची थट्टाच उडविली. क्रांतीनंतरच्या हलाखीच्या दिवसांत प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार मि. वेल्स यानें रशियाला भेट दिली. त्या वेळीं रशियांतील जनतेची प्रत्यक्ष हलाखीची स्थिति व लेनिनच्या अवाढव्य योजना पाहून लेनिन हा क्रेमलिनमध्यें बसून अनेक प्रकारच्या स्वप्नतरंगांत वाहात जाणारा प्राणी (ड्रीमर इन दी क्रेमलिन) आहे, असें त्यानें म्हटलें होतें. पण मि. वेल्स याच्या भेटीनंतरच्या १० वर्षांत लेनिनच्या या सर्व स्वप्नसृष्टीचें प्रत्यक्ष सृष्टींत रूपांतर झालेलें आपण पाहात आहों. त्यानें कल्पिलेल्या सर्व योजना त्यांच्या निश्चित मुदतपूर्वींच म्हणजे दहा वर्षांतच फलद्रूप झालेल्या आहेत. "स्वप्नसृष्टि निर्माण करण्याची मनुष्याची शक्ति पूर्णपणें नष्ट करण्यांत आली व त्यानें ज्या कार्याला नुकता हात घातला आहे त्या कार्याचे काय परिणाम होतील याचा विचार त्याला करतां आला नाहीं तर कला व विज्ञान यांच्या क्षेत्रांत संशोधन करण्याकरितां किंवा कोणताही उद्योगधंदा चालविण्याकरितां लागणारी अविश्रांत श्रम करण्याची शक्ति व स्फूर्ति त्याला प्राप्त होणार नाहीं." १९०२ सालीं कम्युनिस्ट पक्षाच्या संघटनेच्या कार्याला लेनिननें जेव्हां हात घातला त्या वेळीं त्यानें पिसारेव्हच्या वरील वचनाचा उल्लेख आपल्या दोस्तांपुढें केला होता. क्रांतीनंतर लेनिननें मनांत वागविलेलें

एक एक स्वप्न सत्यसृष्टींत प्रतीतीला येऊं लागलें त्या वेळीं "आपल्या चळवळींत काम करणाऱ्या लोकांत दुर्दैवानें असल्या स्वप्नसृष्टींत दंग होणारीं माणसें फार थोडीं आहेत, आपल्या व्यवहारवादित्वाचीच ते घमेंड मारीत असतात." असें लेनिननें सहज बोलून दाखविलें.

आपसांतील युद्ध बंद झालें, पोलंडशी तह करण्यांत आला, तथापि देशांतील आर्थिक परिस्थिति मुळींच सुधारली नाहीं; उलट ती अधिकच बिघडली. उद्योगधंदे व शेती यांचें पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता भासूं लागली. अशा परिस्थितींत उद्योगधंदे, शेती वगैरे उत्पादनाचीं सर्व साधनें लष्कराच्या ताब्यांत घ्यावीं आणि या शक्तीच्या बळावर आपल्याला वाटेल तेवढी जीवनावश्यक वस्तूंची पैदास करावी, असें प्रतिपादन करणारा एक वर्ग पुढें आला. पण या साधनांचा उपयोग करण्यांत आला असता तर सरकार व बहुजनसमाज यांच्यांत कायमचें वितुष्ट पडलें असतें. सरकार म्हणजे जनतेवर सत्ता गाजविणारी संस्था नव्हे, लोकव्यवहार सुयंत्रित चालण्यास मदत करणारी अशी ती संस्था आहे, असें लेनिनचें मत होतें. यामुळें कामगारसंस्था व उद्योगधंद्यांतील त्यांचें कार्यक्षेत्र या प्रश्नावर विचार चालू झाला त्या वेळीं बोल्शेव्हिक पुढाऱ्यांत साहजिकच दुमत झालें. कामगारसंघांच्या योजना अंमलांत आणण्याच्या कामीं लष्कराची मदत घेण्यांत यावी असें ट्रॉट्स्की-प्रभृतींचें मत पडलें. लेनिन, स्टॅलिन, कॅलिनिन, रुड्झुटक वगैरेंनीं ट्रॉट्स्कीच्या गटाला विरोध करण्याचें ठरविलें. देशांतील परिस्थिति दिवसें-दिवस बिघडतच चालली होती. उपासमारीनें गांजलेले कामगार पुष्कळ ठिकाणीं संपावर गेले होते. खेडेगांवांतून शहरांकडे धान्याचा पुरवठा येईनासा झाला होता. संपवाल्यांच्या लहान लहान टोळ्या शहरांतून लूटमार करीत फिरूं लागल्या होत्या. उपासमारीनें गांजलेले हे संपवाले कम्युनिस्टांना पाण्यांत पाहूं लागले होते. सभांतून ते त्यांना बोलूं देत नव्हते व मेन्शेव्हिक व सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी पुढाऱ्यांनीं या वेळीं पुढें यावें असें ते म्हणूं लागले होते. लाल लष्करांतील पुष्कळ सैनिक लष्कर सोडून आपापल्या गांवांकडे पळून जात आहेत अशा भयप्रद बातम्या चोहोंकडून येऊं लागल्या होत्या. १८ फेब्रुवारी (१९२१) रोजीं क्रॉन्स्टॅट येथें नाविक

सैनिकांनीं एक सभा भरविली व तींत सोव्हिएटांची पुन्हा निवडणूक व्हावी, कम्युनिस्टांना या सोव्हिएटांतून बाहेर काढून लावावें, इतर सोशालिस्ट पक्षांच्या वर्तमानपत्रांवरील बंदी उठविण्यांत यावी, अशा मागण्या त्यांनीं केल्या. ता.१ मार्च रोजीं मुख्य प्रधान कॅलिनिन यालाही एका जाहीर सभेंत विरोध करण्यांत आला. याशिवाय शेतकीच्या बाबतींत स्वीकारलेलें लष्करी समाजसत्तावादाचें (वॉर कम्युनिझमचें) धोरण शेतकऱ्यांना पसंत नाहीं व त्यांच्यांतही असंतोष पसरत चालला आहे अशाही बातम्या आल्या. रशियांतील सोव्हिएट सत्तेवर हें एक नवीनच संकट येऊं पाहात होतें, पण तें लवकरच टळलें. क्रॉन्स्टॅट येथील कम्युनिस्टांनीं या बंडखोरांचा चांगलाच समाचार घेतला. तेथील कम्युनिस्टांनीं आपल्या पक्षाच्या सभासदत्वाचे राजीनामे वर्तमानपत्रांतून जाहीर केले होते व या बंडवाल्यांना ते मिळाले होते. याप्रमाणें आपसांतील बंडाळीची लाट उसळली असतां व दोन्ही बाजूंनीं गोळीबार चालू असतां बोल्शेव्हिक पक्षाच्या दहाव्या कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. या अधिवेशनांत तीनशेंवर प्रतिनिधी हजर होते. लष्करी समाजसत्तावादाचा या परिषदेंत प्रचंड बहुमतानें निषेध करण्यांत आला. शेतकऱ्यांकडून आजवर जें जादा धान्य जप्त करून नेण्यांत आलें त्याची नुकसानभरपाई करून देण्याचें ठरविण्यांत आलें. याकरितां धान्यावर वाढता कर बसवावा असाही ठराव मंजूर करण्यांत आला व नवीन आर्थिक धोरणाची योजना कॉंग्रेसपुढें मांडून लष्करी समाजसत्तावादाला मूठमाती देण्यांत आली.

लष्करी समाजसत्तावादाचें धोरण स्वीकारून रशियांत झपाट्यानें सर्वत्र समाजसत्तावादाची प्रस्थापना करावी असा बुखारिन-ट्रॉट्स्कीप्रभृतींचा विचार होता तर उलट लेनिननें नवीन आर्थिक धोरणाचा पुरस्कार करून पूर्ण समाजसत्ता स्थापन करण्याच्या या प्रयत्नाला पिछेहाटीचें वळण दिलें. याचा अर्थ असा नाहीं कीं, लेनिननें समाजसत्तावादाची प्रस्थापना करण्याचा नाद अजीबात सोडून दिला. या नव्या धोरणामुळें खेड्यांपाड्यांतून भांडवलदार पद्धतीला उत्तेजन मिळालें व व्यापाऱ्यांचा एक नवीनच वर्ग अस्तित्वांत आला हें खरें आहे, परंतु कारखाने, रेल्वे व परराष्ट्रीय व्यापार हीं जीं समाजसत्तेचीं मुख्य केंद्रें तीं मात्र सरकारनें पूर्णपणें

आपल्या ताब्यांत ठेवलीं. मध्यम वर्गांतील गरीब शेतकऱ्यांना समाजवादी बनवावयाचें असेल तर ती गोष्ट कामगारवर्गाच्याच हातांत आहे. त्यांनीं प्रचंड कारखाने समाजसत्ताक तत्त्वावर चालवून दाखवून शेतकऱ्यांमध्यें वर्गजागृतीची भावना निर्माण केली पाहिजे. "शेतांत पुष्कळ धान्य पिकविल्यानें रशियाचा उद्धार होईल असें कोणी म्हणत असेल तर तें चुकीचें आहे. शेतकरी लोकांना जीं आउतें लागतात त्यांची पैदास केल्यानें रशियाचा उद्धार व्हावयाचा नाहीं. प्रचंड प्रमाणावर मालाची पैदास करणारे कारखाने निर्माण झाल्यास त्यांतच रशियाचें हित आहे. रशियांत असे प्रचंड कारखाने निर्माण करावयाचे असल्यास त्यांना सरकारची मदत देणें जरूरीचें आहे आणि ही गोष्ट आपण करूं शकलों नाहीं तर रशियाची धडगत नाहीं." अशा आशयाचे विचार लेनिननें कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या चौथ्या कॉंग्रेसमध्यें जमलेल्या प्रतिनिधींपुढें बोलून दाखविले. "आपल्याला आज थोडीशी पिछेहाट घ्यावी लागत असली तरी शेवटीं त्याचा परिणाम चांगला झाल्याशिवाय राहणार नाहीं." असें लेनिनचें यावेळचें ब्रीदवाक्य होतें.

'नेप' या नांवानें प्रसिद्ध असलेलें नवीन आर्थिक धोरण १९२१ मार्चमध्यें झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या दहाव्या अधिवेशनांत मंजूर करण्यांत आलें, हें मागें सांगितलेंच आहे. लष्करी समाजसत्तावादी धोरणामुळें गांजून गेलेल्या शेतकरीवर्गांतील असंतोष नाहींसा करण्याकरितां हें धोरण स्वीकारण्यांत आलें होतें हें उघड आहे. अशा प्रकारचें धोरण स्वीकारून व्यवहाराकरितां लेनिननें तत्त्वाचा बळी घेतला, असा आरोप त्याच्यावर करण्यांत आला. लेनिन वास्तववादी होता आणि त्याचा वास्तववाद विरोधविकासन्यायाला अगदीं अनुसरून होता. वस्तुस्थिति कशी असावी याचा विचार करण्यापेक्षां वस्तुस्थिति प्रत्यक्ष कशा प्रकारची आहे, हें पाहण्याचें धैर्य लेनिनच्या अंगीं होतें आणि प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें ज्ञान करून घेतल्यावर तिला अनुसरून आपलें पुढील धोरण ठेवण्याचें धैर्यही त्याच्या ठिकाणीं होतें. तात्त्विक सिद्धान्तावर भर देणारे त्याचे कांहीं दोस्त वस्तुस्थिति काय आहे, हें पाहण्यास व तिचें ज्ञान करून घेण्याचें त्रासाचें काम अंगावर घेण्यासच तयार नव्हते. सर्व

प्रसिद्ध लोकनायकांप्रमाणें लेनिन आशावादी होता. कितीही संकटें आलीं तरी डरावयाचें नाहीं, त्यांतूनच कांहीं तरी मार्ग काढावयाचा, या लेनिनच्या अंगीं असलेल्या आशावादित्वाच्या क्रांतिकारी सद्‌गुणाचा ऑक्टोबरच्या क्रांतीच्या वेळीं अगदीं कळस झाला. आपला क्रांतीचा प्रयत्न निष्फळ होणार व शत्रु आपल्यावर मात करणार असें दिसून आलें तरी शेवटच्या क्षणापर्यंत धीर सोडावयाचा नाहीं व प्रसंगच आला तर अगदीं शेवटच्या क्षणाला तडजोड करून मोकळें व्हावयाचें व आपले प्रयत्न निष्फळ होऊं द्यावयाचे नाहींत हा तर हा लेनिनचा नेहमींचा दंडक होता. क्रांतीच्या काळांत अनेक प्रसंगीं लेनिनच्या अंगच्या या गुणांची कसोटी लागली. ब्रेस्ट लिटोव्हस्कचा तह हा असल्या प्रसंगांपैकींच एक प्रसंग होता. जर्मन साम्राज्यावाद्यांचें लष्कर चढाई करूं शकणार नाहीं अशी कांहींशी आशा वाटत होती तोंपर्यंत त्यानें ट्रॉट्स्कीला त्याच्या धोरणाप्रमाणें वागूं दिलें. पण पुढें त्यानें एकाएकीं तह करण्याचें ठरविलें व आपले दोस्त कितीही नाराज झाले तरी त्यानें त्यांची पर्वा केली नाहीं. नवीन आर्थिक धोरण लेनिननें जाहीर केलें त्या वेळींही असाच प्रसंग होता. आपसांतील युद्धाचा शेवट होईपर्यंत लष्करी समाजसत्तावादाच्या धोरणाबरहुकूम देशांतील उद्योगधंद्यांवर व शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर सरकारी नियंत्रण ठेवण्यांत आलें; पण समाजसत्तावादाची प्रस्थापना करण्याचा हा मार्ग नव्हे असें कम्युनिस्ट पक्षांतील लोकांना आढळून आलें व शेतकरी लोकांनीं सरकारविरुद्ध प्रत्यक्ष बंडच पुकारलें त्या वेळीं ट्रॉट्स्कीप्रभृतींच्या लष्करी दंडुकेशाहीला फांटा देऊन नवें आर्थिक धोरण त्यानें जाहीर केलें. लेनिननें हें धोरण अगदीं शेवटच्या क्षणाला स्वीकारलें व आपल्या दोस्तांना त्यांचा मार्ग पूर्णपणें चोखाळण्याची संधि देऊन स्वीकारलें. यामुळें त्याचा परिणामही तावडतोब झाला. अन्नाचा तुटवडा, उपासमार व लष्करी दंडुकेशाहीचा जुलुम यांमुळें उपस्थित झालेलीं बंडें पुन्हां लष्कराच्या जोरावर मोडून काढणें शक्यच नव्हतें. नवीन आर्थिक धोरण जाहीर झाल्याबरोबर ही बंडाळी आपोआपच नामशेष झाली.

शेतकऱ्यापाशीं असलेलें शिलकी धान्य त्याच्याकडून जबरदस्तीनें काढून न घेतां त्याच्याऐवजीं मालाच्या रूपांत वाढता कर घेण्यांत यावा, कर

भरल्यावर आपल्यापाशीं शिल्लक असलेलें धान्य त्यानें कोणालाही विकावें. नवीन आर्थिक धोरणांतील मुख्य कलम वरील प्रकारचें होतें. याशिवाय खासगी व्यापार करणें, खासगी मालकीचे कारखाने काढणें यालाही परवानगी देण्यांत आली. त्याचप्रमाणें घरांवरील खासगी मालकीचा हक्कही या नव्या आर्थिक धोरणाच्या जाहीरनाम्यांत मान्य करण्यांत आला. फक्त परदेशांशीं व्यापार करण्याचा मक्ता मात्र सरकारनें आपल्याकडे राखून ठेवला. या बाबतींत मात्र कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यास लेनिन तयार नव्हता. इंग्लिश भांडवलवाल्यांबरोबर या बाबतींत वाटाघाटी चालू असतां परराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींतलें हें धोरणही बदलण्यांत येईल, असें क्रॅसिन बोलल्याचें लेनिनला समजलें त्या वेळीं 'क्रॅसिन वेडा होत चालला आहे' असें लेनिननें उद्गार काढले.

नवीन आर्थिक धोरण ही खरोखर पिछेहाटच होती. क्रांतीनंतर समाजसत्तावादाच्या प्रस्थापनेच्या दृष्टीनें कम्युनिस्ट पक्षानें जी प्रगति केली होती त्या प्रगतीच्या कार्यक्रमांतील कांहीं कार्यक्रम अव्यवहार्य म्हणून त्यांना सोडून द्यावे लागले होते. पण ही शरणागति मात्र नव्हती आणि तत्त्वच्युत होऊन लेनिनप्रभृति पुढाऱ्यांनीं विरोधी परिस्थितीपुढें मान वांकविली असें मुळींच नव्हतें. "धडाक्यानें शत्रूवर चाल करून न जातां खंदक खणून शत्रूबरोबर झुंजत राहणें किंवा अकस्मात् छापा घालून किल्ला ताब्यांत न घेतां त्याला वेढा घालून बसणें अशांपैकींच हा वरील प्रकार आहे." अशी लेनिननें 'नेप'च्या बाबतींत उपमा दिली होती. "पोर्ट आर्थरच्या किल्ल्यावर जपानी सेनापतीनें प्रथम जोराचा हल्ला चढविला; परंतु तो परतून लावल्यावर त्याला तो वेढा देऊन बसला. जपानी सेनानीनें स्वीकारलेलें पूर्वींचें धोरण चुकीचें होतें काय? मुळींच नाहीं. त्याचें पहिलें धोरण शूरपणाचें होतें व त्या प्रसंगीं तशा प्रकारचेंच धोरण स्वीकारणें शक्य होतें. किल्ल्यावर अकस्मात् चढाई करूनही तो हस्तगत होत नाहीं असें दिसून आल्यावर तेंच धोरण पुढें चालू ठेवणें चुकीचें आहे, हें समजून घेणें अगत्याचें असतें. जपानी सेनानीनें पहिलें धोरण बदललें व तो वेढा घालून बसला तरी त्याचें पूर्वींचें उद्दिष्ट कायमच होतें व या नवीन धोरणामुळें तें सफल होऊन पोर्ट आर्थरचा किल्ला त्यानें हस्तगतही केला." अशा

रीतीनें लेनिननें नवीन आर्थिक धोरणाचें योग्य रीतीनें समर्थन केलें होतें. केवळ शेतकऱ्यांनीं मागणी केली म्हणून नवीन आर्थिक धोरण स्वीकारणें आवश्यक झालें असें नाहीं, तर महायुद्ध व आपसांतील युद्ध यांमुळें देशाला जी विपन्नावस्था प्राप्त झाली होती ती नाहींशी करण्याकरितां व आपल्याला झालेल्या जखमा भरून काढण्याकरितां अशा प्रकारचें धोरण स्वीकारणें इष्ट होतें. राष्ट्रांतील अंतर्गत व्यापार पुन्हा सुस्थितीवर आणण्याकरितां असलें धोरण स्वीकारण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. राष्ट्रांतील भांडवलाची पुन्हा जमवाजमव करण्याकरितां असेंच करणें जरूरीचें होतें. भांडवलशाही धोरणाचा अंशतः स्वीकार केल्यानें तत्त्वाची हानि पतकरून आम्ही शरणागत झालों असें म्हणतां यावयाचें नाहीं. लष्करी समाजसत्तावादाचें धोरण राजकीय सत्ता आपल्या हातांत राखण्याच्या दृष्टीनें यशस्वी ठरलें असून 'नेप'चें धोरण स्वीकारलें तरी राजकीय सत्ता कामगारवर्गाच्याच हातांत राहावयाची आहे. आर्थिक व्यवहाराचीं मुख्य केंद्रें या कामगारसत्तेच्याच ताब्यांत आहेत. मोठमोठे महत्त्वाचे कारखाने, बँका व परराष्ट्रीय व्यापार या सरकारच्याच ताब्यांत राहावयाचीं आहेत. याप्रमाणें या नवीन धोरणाचें लेनिन पुनःपुन्हा समर्थन करीत होता.

नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यांत आलें तरी राष्ट्राला झालेल्या जखमा लवकर भरून आल्या नाहींत. १९२१ सालीं पडलेल्या दुष्काळानें रशियांतील जनतेला पुन्हा एक वर्षभर त्राहीत्राही करून सोडलें. आणि एवढ्या अवकाशांत 'नेप'नें एक नवीनच भांडवलदारांचा वर्ग निर्माण केला. जुन्या भांडवलदारवर्गांत असलेले दुर्गुण या 'नेप' लोकांतही दिसून येऊं लागले. पोलिसांचें व कायद्यांचें संरक्षण या लोकांना मिळाल्यामुळें राष्ट्रांमध्यें एक नवीनच मालकवर्ग निर्माण झाला व क्रांतीचा सत्यानाश झाला, असें वाटून कम्युनिस्ट व त्यांचे दोस्त हताश झाले.

अशा उदासवाण्या परिस्थितींतच (१९२२ मार्च अखेर) कम्युनिस्ट पक्षाच्या अकराव्या कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. लेनिननें अत्यंत उत्साहानें या अधिवेशनांत भाग घेतला. लेनिन हजर असलेल्या पार्टीच्या या शेवटच्या अधिवेशनांत त्याचे बौद्धिक गुण उत्कटपणें प्रगट झाले. या अधिवेशनांत झालेलें त्याचें पुढील भाषण मननीय होतें. "रशियांत समाजसत्तावादाची

प्रस्थापना करावयाची असेल तर सामान्य शेतकऱ्याशीं प्रेमाची गट्टी केल्याशिवाय भागावयाचें नाहीं. रशियांत झपाट्यानें समाजसत्ता प्रस्थापित करूं, असे जे मनोरथ आपण केले होते ते सत्यसृष्टींत यावयास थोडासा काल जावा लागेल, फारच मंदगतीनें आपलें पाऊल पुढें पडेल; पण बहुजनसमाजाला आपल्या मागून न्यावयाचें असल्यास अशाच प्रकारचें धोरण स्वीकारणें आवश्यक आहे. हें धोरण बरेच दिवस दक्षतेनें अंमलांत आणल्यासच भांडवलदारी राष्ट्रांनीं चालविलेल्या चढाओढींत आपला टिकाव लागेल. आपल्या शेजारचा भांडवलदार आपल्या व्यवहारांत दक्ष आहे, चोरासारखा तो वागतो, नफ्यावर त्याची दृष्टि असते, आणि तुम्ही कम्युनिस्ट मात्र नवी पद्धति अंमलांत आणूं पहात आहां. तुमचीं ध्येयें उदात्त आहेत, तुम्ही पवित्र माणसें आहांत अगदीं जिवंतपणें स्वर्गांत जाण्याची तुमची योग्यता आहे, परंतु व्यवहार कसा करावयाचा हें तुम्हांला माहीत आहे काय ! कम्युनिझमूचा अहंकार आपण सोडला पाहिजे. नवीन व खडतर संकटांनीं युक्त असलेल्या कार्यांत यश येण्यासाठीं आपण पुनःपुन्हा नेटानें यत्न केला पाहिजे. आपण एखादा मार्ग पतकरला व त्यानें आपल्याला आंधळ्या गल्लींत आणून पोंचविलें असें आढळून आल्यास आपल्यास परत फिरलें पाहिजे व पुन्हा नवीन वाटेला लागलें पाहिजे. एकच काय तर दहा दहा वेळां आपल्याला असें करावें लागलें तरी तसें आपण केलें पाहिजे व आपल्या ध्येयाची प्राप्ति करून घेतली पाहिजे. आपण अहंमन्य होतां कामा नये. आपण कम्युनिस्ट आहों. ध्येयहीन व पक्षहीन व्यापारी कारकुनांप्रमाणें आपण नाहीं, असाही अहंकार आपण बाळगतां कामा नये. हा कारकून पांढरपेशा असेल, निःसंशय तो पांढरपेशाच आहे, परंतु आपला उद्योग कसा करावयाचा हें त्याला माहीत आहे.... आणि तुम्हांला मात्र तें माहीत नाहीं. नव्या भांडवलदारांच्या स्पर्धेविरुद्ध बरेच दिवस झगडा चालवावा लागेल. हा मार्ग कंटाळवाणा वाटला तरी त्यामुळें आपण केव्हांही नामोहरम होतां कामा नये. काबीज केलेला सर्व प्रदेश आपण आपल्याजवळ राखूं शकलों नाहीं. कामकरी व शेतकरी यांच्या उत्साहशक्तीच्या जोरावर आम्ही एवढा प्रदेश तरी काबीज करूं शकलों. पण आतां आम्हांला बरीच लांबवर पिछेहाट करावी लागत आहे, तथापि तत्त्वाची हानि होऊं न देतां

आपण तसें करण्यास तयार असलें पाहिजे. आम्ही जें पूर्वी नेहमीं सुचवीत होतों तेंच तुम्ही आतां करीत आहां असें मेन्शेव्हिक व सोशालिस्ट पक्षाचे लोक आतां ओरडत सुटले आहेत. परंतु आम्हीं आज जी सत्ता काबीज केली आहे त्यापूर्वीच, अगदीं अयोग्य प्रसंगीं, त्यांनीं या सूचना केल्या होत्या; आणि पुन्हा ते तसेंच सांगत राहतील तर आम्ही त्यांचा बंदोबस्त केल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांच्या बाबतींत स्वीकारलेलें हें धोरण विसंगत आहे असें त्यांना वाटेल. पण या आरोपाचें निराकरण अगदीं सुलभ रीतीनें करतां येईल. एखादें लष्कर पिछेहाट करीत असतें त्या वेळींच शिस्तीची जास्त जरूरी असते. चढाई करून जाणाऱ्या लष्करांत इतकी शिस्त ठेवावी लागत नाहीं, कारण सर्वच पुढें जाण्याच्या बाबतींत स्पर्धा करीत असतात. परंतु पिछेहाट सुरू झाली असतां प्रत्येकजण मागें नळून जाण्याच्या बाबतींत एकमेकांशीं स्पर्धा करूं लागला तर त्याचा तावडतोब नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं. क्रांतीच्या काळांत आपल्यावर एकापेक्षां एक महत्त्वाचे प्रसंग येऊन गेले. १९१७साली तह करण्याचा प्रश्न आमच्यापुढें उभा होता. १९१९–२० सालीं आपसांतील युद्धांत विजय कसा संपादन करावयाचा या प्रश्नानें आमचीं मनें ग्रासून टाकलीं होतीं. आजच्या पिछेहाटीच्या प्रसंगीं शिस्त कशी राखावयाची याचाच विचार आपणाला केला पाहिजे. प्रचंड बहुजनसमाजाच्या दृष्टीनें समुद्रांतील एका थेंबाप्रमाणें आमची स्थिति आहे. आणि लोकांना जें वाटतें तें अगदीं बरोबर आम्ही प्रगट करूं शकूं तरच राज्यकारभार चालवूं शकूं...आजवर ज्या सर्व क्रांतिकारक पक्षांना अपयश आलें त्याचें कारण असें कीं, या पक्षांतील लोक अहंमन्य झाले, आपलें सामर्थ्य कशांत आहे हें ते पाहूं शकले नाहींत आणि आपल्यांतील दोष प्रगटपणें बोलण्याचें धैर्य त्यांना झालें नाहीं. आमच्यांतील दोष उघडपणें बोलण्यास आम्ही भीत नसल्यामुळें आम्हांला अपयश यावयाचें नाहीं आणि आमच्यांतील हे दोष नाहींसे करण्यासही आम्ही समर्थ होऊं."

लेनिनचें हें भाषण म्हणजे त्यानें आपल्या पक्षाला दिलेला शेवटचा संदेशच होता.

# अंतकाल

लेनिनची प्रकृति दणकट होती. आजारी होऊन तो अंथरुणावर पडून राहिला आहे असें त्याच्या सर्व आयुष्यांत कधीं घडून आलें नाहीं. त्याला नेहमीं मानसिक त्रास झाला म्हणजे मात्र तो उदासवाणा होत असे व त्याचा स्वभावही त्रासिक बनत असे. अशा वेळीं एकांतांत कोठें तरी खेड्यांत राहून विश्रांति घेण्याची त्याला जरूरी भासे व तसें तो करीतही असे. पण आपल्या निरोगी प्रकृतीबद्दल त्याला नेहमीं अभिमान वाटत असे. निकोप प्रकृतीचे नमुनेदार उदाहरण म्हणून पहावयाचें असेल तर आपल्या प्रकृतीकडे पाहावें असें तो कधीं कधीं थट्टेनें म्हणत असे. पण क्रांतीनंतर त्याच्यावर जी जबाबदारी व जो कामाचा बोजा पडला त्याच्या भाराखालीं तो खंगून गेला आणि त्यांतल्या त्यांत १९१८ च्या ऑगस्ट महिन्यांत त्याच्यावर ज्या गोळ्या झाडण्यांत आल्या त्या दिवसापासून त्याची प्रकृति ढासळत चालली. गळ्यांत गोळी असतांही त्याचें काम तसेंच चालू होतें. गळ्यांत गोळी ठेवून घेऊन अत्यंत बिकट प्रश्नांचा तो विचार करीत असे व मोठमोठ्यांची मति गुंग होऊन जाईल असले गुंतागुंतीचे प्रश्नही तो सोडवीत असे. याशिवाय लेख व पत्रकें लिहावयाचीं व अत्यंत गहन प्रश्नांवर लांब लांब गंभीर भाषणें करावयाचीं हें त्याचें काम चालूच होतें. क्रांतीनंतर आपसांतील युद्धाला सुरुवात झाली व दहशतवादी पक्षांतील लोकांनीं कम्युनिस्ट पुढाऱ्यांचे व्यक्तिशः खून करण्यासही सुरुवात केली तरी त्याला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. गळ्यांत शिरून अडकून बसलेली गोळी तशीच वागवीत आपल्यावर पडलेलीं सर्व जबाबदारीचीं कामें तो अविश्रांतपणें करीत होता. पण १९२१ च्या प्रारंभीं क्रॉन्स्टॅट-मधील कम्युनिस्टांनीं बंडाचें निशाण उभारलें व ट्रॉट्स्कीबरोबर मतभेद झाला यामुळें नवीन आर्थिक धोरण अंमलांत आणण्याची सर्व जबाबदारी त्याच्यावरच पडली. या वेळीं मात्र आपल्या हातून पूर्वीसारखें काम होत नाहीं, आपली प्रकृति ढासळत चालली आहे, दिवसेंदिवस आपण अधि-

कायिक अशक्त होत चाललों आहों व आपल्याला विश्रांति घेतलीच पाहिजे असें त्याला वाटूं लागलें.

विश्रांति घ्यावीशी वाटली कीं गॉर्कीला जाऊन राहावयाचें असा त्याचा नेहमींचाच परिपाठ होता. त्याप्रमाणें या वेळींही तो गॉर्कीला गेला. लेनिनला पूर्ण विश्रांति मिळावी म्हणून त्याच्याकडे कोणतेही कामाचे कागदपत्र पाठवावयाचे नाहींत असें मध्यवर्ती कमिटीनें ठरविलें; पण या ठिकाणीं तो फार दिवस राहिला नाहीं. १९२२ च्या वसंत ऋतूंत त्याच्या गळ्यावर शस्त्रक्रिया करण्यांत येऊन गळ्यांत अडकून राहिलेली गोळी काढून टाकण्यांत आली. या शस्त्रक्रियेमुळें आलेली अशक्तता घालविण्या-करितां तो पुन्हा गॉर्कीला जाऊन राहिला. या शस्त्रक्रियेमुळें तर त्याची प्रकृति फारच ढासळली त्याच्या मेंदूवरही त्याचा परिणाम झाला व मेच्या २६ तारखेस अर्धांगवायूचा झटका येऊन त्याचा उजवा हात व पाय लुला पडला. त्याच्या जिभेवरही या झटक्याचा परिणाम होऊन तीही अंशतः लुली पडून त्याचें बोलणें स्पष्टपणें उमटेनासें झालें. या आजारांतून बरा होऊन तो ऑक्टोबरमध्यें पुन्हा कामाला लागला. ता. २० नोव्हेंबर रोजीं मास्को सोव्हिएटच्या सभेंत त्यानें भाषण केलें व कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या चौथ्या अधिवेशनासही तो हजर राहिला. सार्व-जनिक सभेंतलें लेनिनचें हें भाषण शेवटचेंच ठरलें. लेनिन याप्रमाणें कामाला लागला तरी त्याची पूर्वींची शक्ति आतां अर्थात् राहिली नव्हती. त्यानें आपलें कांहीं काम कामेनेव्ह व रायकोफ यांजकडे सोंपविलें. डिसें-बरमध्यें त्याची प्रकृति पुन्हा बिघडली. १६ डिसेंबर रोजीं त्याला आणखी एक झटका आला. या झटक्यानंतर सरकारी कामकाज करण्याचें त्यानें सोडून दिलें, पण त्याचें लेखनाचें काम चालूच होतें. या लेखांतून लेनि-ननें क्रांतीचें शास्त्रीय विवेचन केलें आहे. लेनिनच्या तत्त्वज्ञानावर प्रकाश पाडणारे असे हे लेख आहेत. शेतकरी व कामकरी वर्गाच्या प्रतिनिधींनीं सरकारी कामकाजावर कशी देखरेख करावी याची एक नवीन योजना त्यानें कांहीं लेखांतून मांडली आहे. सोव्हिएट राज्यघटनेला शुद्ध लोकसत्ताक स्वरूप प्राप्त करून देण्याकरितां त्यानें ज्या योजना मनाशीं आंखल्या होत्या त्यां-पैकींच ही एक योजना होती. कामकरीवर्गात कर्तृत्ववान् कम्युनिस्ट

पुढारी निर्माण करावे आणि सरकारी कामकाज व कम्युनिस्ट पार्टीतर्फे होणाऱ्या चळवळी यांच्यावर देखरेख करतां येईल असें खास शिक्षण त्यांना देण्यांत यावें, अशी त्याची योजना होती. सहकार्य या विषयावर त्यानें याच वेळीं लिहिलेल्या लेखांत शेतकरी व कामकरी यांचें सहकार्य कसें होईल याचा विचार त्यानें केला आहे. जमीन समाजाच्या ताब्यांत घेऊन मोठ्या प्रमाणावर सामुदायिक शेती करण्याचे जे प्रयोग आज रशियांत चालू आहेत त्यांतील मूलतत्त्वांचा ऊहापोह लेनिननें या लेखांत केला आहे.

ता. ९ मे १९२३ रोजीं त्याला आणखी एक झटका आला. त्याला या झटक्यानंतर मात्र कोणतेंही काम करतां आलें नाहीं. त्याच्या सर्व शक्ति नष्ट झाल्या. आपल्या आयुष्यांत आजवर त्यानें अनेक शत्रूंना तोंड दिलें, या झगड्यांत अनेक वेळां मानसिक यातना सोसण्याचा प्रसंग त्याच्यावर आला तरी तो अगदीं असहाय्य झालेला नव्हता. अनेक वेळा विस्कळित झालेले आपल्या पक्षाचे दोस्त त्यानें पुनःपुन्हा संघटित केले. आपल्या प्रबल इच्छाशक्तीच्या, सूक्ष्म, दूरदर्शी व शुद्ध बुद्धिसामर्थ्याच्या व आपल्या एकनिष्ठ दोस्तांच्या साहाय्यानें त्यानें आपल्या शत्रूंचा निःपात करून आपलें उद्दिष्ट साध्य केलें. क्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या सोव्हिएट लोकसत्तेचें दृढीकरण करण्याचें काम त्याला यापुढें करावयाचें होतें. पण एकामागून एक आलेल्या निसर्गाच्या तडाक्यांनीं त्याला पूर्ण असहाय्य बनविलें. असल्या असहाय्य स्थितींतही अत्यंत आशेनें जवळजवळ सहा महिने तो मृत्यूशीं झुंज देत राहिला होता. मृत्यूपूर्वी दोन दिवस क्रुप्स-काया 'जीवनावरील प्रेम' ही जॅक लंडनची गोष्ट लेनिनला वाचून दाखवीत होती. पुढील आशयाची ही गोष्ट होतीः—"निर्मनुष्य अशा बर्फमय अरण्यांत एक आजारी माणूस प्रवास करीत होता. उपासमारीनें तो गांजला होता व एका मोठ्या नदीच्या पैलतीरावर जाण्याचा तो प्रयत्न करीत होता. त्याची शक्ति क्षणोक्षणीं कमी होत चालली होती. सटासट पाय निसटत असल्यामुळें एकेक पाऊल पुढें टाकणें हे मोठ्या मुष्किलीचें झालें होतें. अशा परिस्थितींत त्याची एका लांडग्याशीं गांठ पडली. हा लांडगाही भुकेनें व्याकुळ झाला होता. दोघांमध्यें जोराची

झटापट सुरू झाली. शेवटीं त्या माणसाचा जय झाला. पण तो अर्धमेला होऊन गेला, त्याचे सर्व अवयव छिन्नविछिन्न झाले, तथापि शेवटीं त्यानें आपलें उद्दिष्ट साध्य केलें." ही गोष्ट वाचून झाल्यावर लेनिनला थोडें बरें वाटलें, असें क्रुप्सकायानें म्हटलें आहे.

मे महिन्यांत आलेल्या झटक्यानें त्याचें बोलणें अजीबात बंद झालें. त्याला गॉर्की येथें नेण्यांत आलें. आपल्या प्रिय रशियांतील एका खेड्यांत तो मृत्यूशीं झगडत राहिला होता. त्याचीं प्रिय माणसें त्याच्या भोंवतीं होतीं; पण दुःखाची गोष्ट ही कीं, त्याला आपले विचार व्यक्त करतां येत नव्हते. स्वदेशांत असो वा परदेशांत असो लेखनानें व भाषणानें बहुजन-समाजाला ज्यानें जागृत केलें, संघटित केलें, क्रांतीचा फैलाव केला, त्यांत यशही मिळविलें अशा थोर सामर्थ्यवान् पुरुषाला कित्येक महिने वाचाहीन होऊन असहाय्य स्थितींत असह्य शरीरयातना भोगाव्या लागल्या ! पण असल्या परिस्थितींतही लेनिनचा आशातंतु कायम होता. उन्हाळा जसजसा कमी होऊं लागला तसतशी त्याची प्रकृति पुन्हा सुधारूं लागली. त्याला बोलतां येऊं लागलें. १९ ऑक्टोबर रोजीं मास्को येथेंही कांहीं तास त्याला आणलें होतें. पण यानंतर त्याची प्रकृति पुन्हा बिघडली. १९२४ च्या जानेवारींत त्याची दृष्टि किंचित् मंद झाल्याचें आढळून आलें तरी त्याची उत्साहशक्ति कमी झालेली नव्हती. त्याची प्रकृतीही सुधारत चालली आहे असें वाटूं लागलें होतें. परंतु २१ जानेवारी रोजीं सकाळीं ६ वाजून ५० मिनिटांनीं अर्धांगवायूचा त्याला चौथा झटका आला आणि या शेवटच्या झटक्यांतच हा थोर पुरुष कालवश झाला.

× × ×

लेनिनचा ज्या दिवशीं अंत झाला त्याच्या आदल्या दिवशींच पहाटे तो बुखारीन व त्याच्या बिऱ्हाडाजवळील कांहीं शेतकरी यांच्याबरोबर शिकारीला गेला होता. बर्फावरील गाडीवर बसूनच व तो या मंडळीबरोबर गेला होता. या शिकारीच्या व निशाणबाजीच्या खेळांत तो मनापासून भाग घेत होता. या फिरण्यामुळें तो बराच दमून गेला असें पाहून डॉक्टरांनीं त्याला निजून राहण्याचा सल्ला दिला. पहाटे तीन वाजतां तो चांगलें मनापासून जेवला व श्रमपरिहार होऊन त्याला चांगली हुशारी वाटत आहे, असें दिसून

आलें. पण यानंतर अडीच तासांनींच पक्षघाताचा त्याला शेवटचा झटका आला.

जेवतांना रात्रीच्या शिकारीच्या खेळासंबंधानें तो बोलत होता. विशेषतः एका तरुण शिकारी कुत्रीसंबंधानें त्याचें बोलणें चालू होतें. या कुत्रीला अद्याप शिकारीचें पूर्ण शिक्षण मिळालें नव्हतें त्यामुळें ती मधून मधून घाबरत असे. पण शिकारी कुत्र्यांत जरूर असलेली हुशारी तिच्या ठिकाणीं होती.

"शिकारी कुत्र्याचे सर्व गुण तिच्यांत आहेत, पण तिला कांहीं दिवस मात्र जाऊं दिले पाहिजेत. तिच्याशीं फारशी दांडगाई करण्यांत अर्थ नाहीं. ती लहान आहे, खुळचट आहे व फाजील उत्साही आहे. पण तिला तुम्ही वेळ दिलात तर ती सर्व कांहीं शिकेल."

लेनिनचे हे शेवटचेच शब्द होते, असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि लेनिननें नव्या रशियासंबंधानेंच असे उद्गार काढले असाही तर्क यावर कोणी बसवितात. यानंतर त्याला थोडी गुंगी आली व तो कांहीं वेळ निजला. त्याची पत्नी त्याच्याजवळच बसली होती. एकाएकीं लेनिनचा श्वासोच्छ्वास मोठ्या कष्टानें चालू आहे, असें क्रुप्सकायाला आढळून आलें. त्याबरोबर घरांतच राहात असलेल्या डॉक्टरांना तिनें बोलावलें. त्याला मूर्च्छना आली असून वात झाला आहे असें त्यांना आढळून आलें. त्याची शुद्धि गेली होती व श्वास घेण्यासाठीं तो मधून मधून खोकत होता.

त्याच्या अंतकाळच्या प्रसंगीं त्याची पत्नी, मराया व ॲना या त्याच्या बहिणी व त्याचा दोस्त बुखारीन ही मंडळी त्याच्याजवळ होतीं.

रात्रीं एकाएकीं वादळ होऊन भयंकर बर्फ पडल्यामुळें तारायंत्राच्या तारा ठिकठिकाणीं तुटून पडल्या होत्या, यामुळें लेनिनच्या मृत्यूची बातमी मास्कोला या दिवशीं रात्रीं ८ वाजतां पोंचली व मास्कोमधील नागरिकांना व बाहेरच्या लोकांना तर ही बातमी दुसरे दिवशीं सकाळीं समजली.

या दिवशीं सकाळीं ११॥ वाजतां अध्यक्ष कॅलिनिन यानें अखिल रशियन सोव्हिएट कॉंग्रेसचें तावडतोबीचें अधिवेशन भरविलें. अधिवेशनांत हजर असलेल्या सर्व सभासदांना त्यानें उभें राहण्यास सांगितलें व लेनिन-

च्या मृत्यूची बातमी त्यानें मोठ्या कष्टानें सरकारी रीत्या जाहीर केली व त्यासंबंधीं काढलेलें जाहीर पत्रक त्यानें वाचून दाखविलें. "यापुढें जानेवारी २१ हा दिवस राष्ट्रीय शोकदिन म्हणून पाळण्यांत यावा." असें या पत्रकांत म्हटलें होतें.

लेनिनच्या मृत्यूनंतर तिसरे दिवशीं गॉर्कीहून स्पेशल गाडीनें त्याचा मृत देह मास्कोला आणण्यांत आला. मास्को शहरांतील मध्यचौकांत असलेल्या स्तंभगृहांत त्याचा देह लोकांच्या दर्शनाकरितां ठेवण्यांत आला होता.

बाहेर भयंकर थंडी पडली होती. शून्यांशाखालीं २८ अंश 'फॅरेनहाईट' उष्णतामान होतें. पण अशा थंडींतही लाखों लोकांनीं लेनिनच्या देहाचें अंत्यदर्शन घेतलें. यापुढें जवळ जवळ ७२ तास सारखें रात्रंदिवस चौघा चौघांच्या रांगा करून लोकांनीं लेनिनला शेवटचा प्रणाम केला. तासीं अंदाजें १२००० प्रमाणें एवढ्या अवकाशांत १० लाख लोकांनीं त्याचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें. याशिवाय किती तरी लोकांना जवळ जाऊन दर्शन घेतां आलें नाहीं, असें मि. वॉल्टर ड्यूरंटी नांवाच्या अमेरिकन रिपोर्टरनें या वेळचें वर्णन केलें आहे. लेनिनचें अंत्यदर्शन घेतलेल्या लोकांपैकीं पुढील दोन नमुनेदार उदाहरणेंही त्यानें या रिपोर्टांत दाखल केलीं आहेत. यांपैकीं पहिलें उदाहरण त्याच्या बिऱ्हाडांतल्या मोलकरणीचें. या मुलीचें वय वीस वर्षांचें होतें. इचा बाप एक लहानसा जमीनदार होता. पण क्रांतीच्या कालांत त्याची सर्व इस्टेट शेतकऱ्यांनीं बळकावून घेतली होती. ही मुलगी बारा वाजतां मध्यरात्रीं या थोर पुरुषाच्या दर्शनाकरितां लोकांच्या बारींत जाऊन उभी राहिली तों पहांटे पांच वाजतां तिला दर्शन मिळालें. या पुरुषाला तिनें जिवंतपणीं पाहिलें नव्हतें व या पुरुषानें तिच्या आयुष्याची धूळधाणही केली होती. पण लेनिनचें अंत्यदर्शन घेण्याकरितां जात असताना तिनें पुढील उद्गार काढले:—

"लेनिन हा सर्व जगांत अत्यंत थोर पुरुष होऊन गेला. जगांतील प्रत्येक माणसानें सुखी व्हावें, स्वतंत्र व्हावें व शांततेनें त्यानें आयुष्य घालवावें अशी त्याची इच्छा होती. या पुरुषाचें दर्शन मला घेतलेंच पाहिजे."

दुसरें उदाहरण एका मध्यमवयाच्या शेतकऱ्याचें. त्याची शुभ्र दाढी त्याच्या छातीवर रुळत होती. त्याच्या मिशा व दाढी थिजलेल्या बर्फानें भरून गेल्या होत्या. त्यानें आपल्याबरोबर आपली बायको व दोन लहान मुलें आणलीं होतीं. मास्कोपासून ३० मैल असलेल्या खेड्याहून हीं सर्व मंडळी चालत आलीं होतीं. या शेतकऱ्यानेंही लेनिनला पाहिलें नव्हतें. क्रांतीपूर्वी तो जितका सुखी होता तितका आज तो सुखीही नव्हता. १९१८ सालीं त्याच्याजवळच्या पांच गायींपैकीं चार गायी त्याच्यापासून जबरदस्तीनें सरकारमार्फत नेण्यांत आल्या होत्या. त्याच्या बापानें विकत घेतलेली कांहीं जमीनही सोव्हिएट सरकारनें ताब्यांत घेतली होती. परंतु "लेनिन हा शेतकऱ्यांचा प्रिय मित्र होता. तो माझ्यासारखाच रशियन होता. परकीय झारसारखा तो झार नव्हता. म्हणूनच अंतकालचें दर्शन घेण्याच्या इच्छेनें मी येथें आलों. माझी बायको व मुलेंही त्याच्या दर्शनाकरितां आम्ही येणार असें म्हणालीं व आम्ही पहाटे आमच्या गांवाहून निघालों. दिवसभर चालून रात्रीं येथें येऊन पोंचलों." असें तो म्हणाला.

मुख्य प्रधान लेनिन याच्या मरणाचा आणखी एक मोठा परिणाम झाला. मास्को, पेट्रोग्राड, खारकोव्ह, कीव्ह, ओडेसा व सैबेरियांतील शहरें यांतील हजारों कामगारांनीं कम्युनिस्ट पार्टींत आपल्याला घेण्याबद्दल अर्ज पाठविले. लेनिनच्या मृत्यूपूर्वी या पार्टीच्या सभासदांची संख्या ४,००,००० होती ती त्याच्या मृत्यूनंतर ७,५०,००० वर गेली.

लेनिनच्या मृत्यूनंतर सोव्हिएट सरकारतर्फे अनेक जाहीर पत्रकें प्रसिद्ध झालीं. बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती कमिटीनेंही अनेक पत्रकें प्रसिद्ध केलीं.

"लेनिन, आमचा पुढारी, मरण पावला. या प्रसंगाला धैर्यानें तोंड दिलें पाहिजे, आपली संघशक्ति वाढविली पाहिजे व वज्रप्राय शिस्तीचें आपण पालन केलें पाहिजे." असें एका पत्रकांत म्हटलें होतें.

लेनिनच्या अंत्यसमारंभाच्या दिवसांत त्याच्या इतर प्रमुख दोस्तांपेक्षां त्याची सहचारिणी क्रुप्सकाया हिनें जनतेचें लक्ष आपल्याकडे ओढून घेतलें होतें. लेनिनशीं लग्न झाल्यापासून तों त्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत आपलें सहचारिणीचें कर्तव्य तिनें अक्षरशः पाळलें होतें. सामान्य लोकांच्या कल्पनेप्रमाणें या दोघां पतिपत्नींना संसारसुख असें कधींच लाभलें नाहीं.

या दोघांचा जन्म दुःखाकष्टांत व दारिद्र्यांत गेला. हद्दपारी तर त्यांच्या नशि-बालाच पुजलेली होती. कधीं सरकारनें हद्दपारीची शिक्षा दिली म्हणून तर कधीं रशियांत राहणें अशक्य होऊन स्वतःच हद्दपार झाल्यामुळें त्यांच्या संसाराला कोठेंही स्थिरपणा असा कधीं लाभलाच नाहीं. पण अशा परिस्थितींत क्रुप्सकायानें लेनिनला कधींही एकाकी भासूं दिलें नाहीं. लेनिननें हातीं घेतलेल्या क्रांतीच्या कार्यांत किती तरी निराशेचे प्रसंग आले. या वेळीं कधीं कधीं त्याच्या वृत्ति प्रक्षुब्ध होत व तो आपल्या मनाला-ही त्रास करून घेत असे. पण असल्या प्रसंगींही आपल्या निरलस, शांत व धीमेपणाच्या स्वभावानें क्रुप्सकायानें लेनिनला धीर देऊन तर कधीं त्याच्या कलाप्रमाणें घेऊन त्याला कार्यप्रवृत्त केलें. लेनिनचा सगळा गुप्त पत्रव्यवहार संभाळावयाचा, लेनिननें जे अनेक ग्रंथ व लेख लिहिले त्या कामीं टिपणें वगैरे करून त्याला हरप्रकारें मदत करावयाची, आणि हद्दपारीच्या दिवसांत आपल्या घरीं नेहमीं येत असलेल्या कम्युनिस्ट दोस्तांचें आदरातिथ्य करावयाचें, कधीं कधीं अडाणी हद्दपार भाई घरीं येऊन त्यांनीं आडदांडपणाचें वर्तन केलें तरी त्याबद्दल केव्हांही त्रास करून घ्यावयाचा नाहीं व त्यांना प्रेमानें व लडिवाळपणानें वागवावयाचें, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मजुरांच्या चाळींतून व कारखान्यां-तून कधीं गुप्तपणें तर कधीं उघडपणें फिरून कामगारांना वर्गजागृतीचें शिक्षण द्यावयाचें, वर्गजागृतिविषयक पत्रकें व लेख त्यांना वाचून दाख-वावयाचे व प्रत्यक्ष क्रांतीच्या प्रसंगीं लेनिनवर पडलेल्या कामांपैकीं बरींचशीं कामें आपल्या अंगावर घेऊन त्याचा भार हलका करावयाचा, असलीं अनेक कामें क्रुप्सकायानें लेनिनच्याबरोबर त्याच्या अंतकालापर्यंत केलीं व आपलें सहचारिणीपद तिनें सार्थ केलें. अशा रीतीनें लेनिनची सेवा करणाऱ्या व क्रांति करून नवा रशिया बनविण्याच्या कामीं त्याला कायावाचामनें मदत करणाऱ्या क्रुप्सकायाकडे सर्व जनतेचें लक्ष वेधावें यांत कांहींच आश्चर्य नाहीं. क्रुप्सकायाचा पोषाख नेहमींच अत्यंत साधा असे. अंत्यसमारंभाच्या दिवसांतील सुतकी पोषाखांत असलेल्या क्रुप्सकायाबद्दल तर लोकांना अतिशयच आदर वाटला.

इतक्या सर्व वर्षांच्या दगदगीच्या व कष्टमय आयुष्याच्या दिवसांत

क्रुप्सकायाची प्रकृति कधींही बिघडली नव्हती. तिच्या या निकोप प्रकृतीबद्दल लोकांना आश्चर्य वाटे. त्यापेक्षांही जास्त आश्चर्य तिच्या शांत व समचित्तत्वाबद्दल त्यांना वाटत असे. लेनिनच्या मरणानंतर तिला दोन रात्री सारखें अलोचन जागरण घडलें. या जागरणानंतर लेनिनचा मृत देह कांचेच्या शवपेटिकेंतून गार्की स्टेशनपर्यंत चार मैल मिरवत आणण्यांत आला. या स्मशानयात्रेंत ही पन्नास वर्षांची स्त्री पायीं चालत आली व मास्कोला आल्यानंतर पुढेंही ४।४॥ मैल अत्यंत कडाक्याच्या थंडींत स्तंभगृहापर्यंत ती पायींच चालली. लेनिनचा मृत देह स्तंभगृहांत अंत्यदर्शनाकरितां ठेवण्यांत आल्यानंतर त्याच दिवशीं सायंकाळीं बाहेरील एका बाजूच्या व्हरांड्यांत वृद्ध क्रांतिकारी क्लारा झेट्किन इच्याशीं जर्मनींतील क्रांतिकारी चळवळींत स्त्रियांनीं कशा प्रकारचा भाग घ्यावा, याची ती चर्चा करीत होती.

लेनिनच्या दफनविधीच्या आदल्या दिवशीं भरलेल्या रशियन फेडरल सोव्हिएट कॉंग्रेसमध्यें तिनें एक लहानसें भाषण केलें व सर्वांच्या नेत्रांतून अश्रूंचे पूर वाहविले. क्रुप्सकायाच्या या भाषणामुळें मिळालेल्या स्फूर्तीमुळेंच बुखारिननें या प्रसंगीं अवघ्या अर्ध्या तासांत एक जाहीर पत्रक लिहिलें व हेंच पत्रक लेनिनच्या दफनविधिनंतर जाहीर करण्यांत आलें. लेनिनच्या मृत्यूनंतर क्रुप्सकायाला रशियांतून व बाहेरच्या देशांतून ज्या असंख्य तारा आल्या त्यांना तिनें पुढीलप्रमाणें उत्तर दिलें:—

"लेनिनच्या मृत्यूबद्दल तुम्हा सर्वांना अत्यंत दुःख होत आहे. पण लेनिनच्या व्यक्तित्वाचा बाह्य गौरव करून या दुःखाचें तुम्ही प्रदर्शन करूं नका. त्याच्या नांवाचीं स्मारकें तुम्ही उभाराल व त्यांप्रीत्यर्थ प्रचंड समारंभही तुम्ही कराल. अशा प्रकारच्या बाह्य समारंभांचा व शिष्टाचारांचा लेनिनला नेहमींच कंटाळा असे. असल्या गोष्टींना तो फारच कमी किंमत देत असे. आपल्या देशांत आज किती दारिद्र्य पसरलें आहे व अव्यवस्था माजली आहे याचा विचार करा. लेनिनच्या नांवाचा तुम्हांला गौरव करावयाचा असेल तर पाळणे, लहान मुलांकरितां गृहें, शाळा, ग्रंथालयें, दवाखाने, आरोग्यस्थानें बांधा आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट सांगावयाची म्हणजे त्याची इच्छा पूर्ण होईल अशा प्रयत्नाला लागा."

२८ जानेवारी रोजीं लेनिनची शवपेटिका स्तंभगृहांतून उचलण्यांत आली. सर्वत्र तोफांची सलामी देण्यांत आली. स्टॅलिन, कॅलिनिन, झिनोव्हिफ, बुखारिन, रायकोफ, कामेनेव्ह वगैरेंनीं आपल्या खांद्यांवरून ही पेटिका क्रेमलिन राजवाड्याजवळ मुद्दाम तयार केलेल्या संगमरवरी समाधिस्थानीं आणली. शेकडों वर्षांपूर्वी पोलंडच्या अधिराज्यापासून रशियाला स्वतंत्र करणारा लोहार मिरीन याच्या ब्रॉंझ धातूच्या पुतळ्याशेजारींच लेनिनचें हें समाधिस्थान तयार करण्यांत आलें होतें.

लेनिनची शवपेटिका या स्थानीं ठेवण्यांत आली त्या वेळीं पेट्रोग्राड कम्युनिस्ट पार्टीचा एक सभासद येव्हडोकिमोव्ह याचें भाषण झालें. कम्युनिस्ट पार्टीच्या मंडळींच्याच नव्हे तर रशियांतील सर्व लोकांच्या आवाजापेक्षां याचा आवाज मोठा होता, म्हणून त्याची या महत्त्वाच्या प्रसंगीं योजना केली होती. लाखों माणसें या वेळीं या प्रचंड चौकांत जमलीं होतीं. पण सर्वत्र अगदीं शांत होतें. लेनिनच्या अंत्य समारंभाच्या वेळीं हजर असलेल्या या समाजापुढें येव्हडोकिमोव्ह यानें पुढील आशयाचें भाषण केलें.

"लेनिनचें आपण आज दफन करीत आहों. कामगारक्रांतीच्या मागें असलेली बौद्धिक शक्ति आज आमच्यांतून नाहींशी झाली आहे. त्याच्या थोर मुत्सद्दीगिरीला व इच्छाशक्तीला आम्ही मुकलों आहों. लाखों कामकरी, शेतकरी व वासाहतिक राष्ट्रांतील गुलामीनें गांजलेले लोक या सामर्थ्यशाली पुढाऱ्याच्या मृत्यूबद्दल शोक करीत आहेत. कामकरी रशियाची शक्ति या पुढाऱ्यानें संघटित केली व क्रांतीच्या संकटमय लढ्यांत त्यांना विजय प्राप्त करून दिला. रशियांतील हे लाखों कामकरी त्याच्या अखेरच्या विश्रांतिस्थानीं त्याचें दर्शन घेण्याकरितां आज एकत्र जमा झाले आहेत.

"या बहुजनसमाजाच्या पुढाऱ्याच्या मृत्यूमुळें सर्व जगांतीलच वातावरण दुःखशोकानें व्याप्त झालें आहे. ज्या शत्रूंच्या विरुद्ध त्यानें क्रांतीचा ज्वलज्जहाल लढा लढविला त्या सर्व लोकांनीं आपल्या मनांत नसतांही आपलीं निशाणें खालीं उतरविलीं आहेत. मानवी समाजांतील एक दैदीप्यमान तारा लोपला ही गोष्ट त्यांच्या मनाला आज पटली आहे. लेनिन

आपल्यांतून देहानें नाहींसा झाला असला तरी नवयुगाच्या सीमेवर उभी असलेली एक शक्तिशाली विभूति या नात्यानें शतकानुशतकें लोक त्याची आठवण काढीत राहतील. कारण यापुढेंही छळ, गुलामी व जुलूम यांच्या-विरुद्ध मानवजातीला शतकानुशतकें झगडा चालवावा लागेल.

"दलित वर्गानें स्वातंत्र्याच्या लढ्यांत या वेळीं पहिल्यांदा पाऊल टाकलें व त्यांत त्यानें विजयही संपादन केला. जगाच्या इतिहासांत हें पहिलेंच उदाहरण आहे. कामगार–सर्वाधीशसत्तेचें पोलादी चिलखत घालून या विजयाचें त्यांनीं संरक्षण केलें आहे. आपल्या विजयाचें अशा रीतीनें रक्षण करण्याचा हा उपक्रमही जगाच्या इतिहासांत पहिलाच आहे. आपल्या इतिहासाच्या भवितव्याची दिशा ठरविणारे व आपल्या नवजीवनावर मालकी गाजविणारे असे हे पहिलेच शहरांतील कामकरी, खेड्यांतील दरिद्री शेतकरी व साम्राज्याच्या वसाहतींतील दलित गुलाम आहेत. श्रमजीवी जनतेला आपल्या आंगच्या सुप्त सामर्थ्याची ओळख पटली असा हा जगाच्या इतिहासांतील पहिलाच प्रसंग आहे.

"लेनिन मरण पावला तरी लाखों लोकांच्या अंतःकरणांत–कामकरी, शेतकरी व दलित राष्ट्रांतील गुलाम जनता यांच्या अंतःकरणांत तो आज वसत आहे. कम्युनिस्ट पार्टीच्या सामुदायिक बुद्धिमत्तेच्या रूपानें तो जीवंत आहे. युरोप व आशिया यांच्या सीमेवर त्यानें निर्माण केलेल्या कामकरी सर्वाधिकारी सत्तेच्या रूपानें तो वसत आहे.

"जुनें जग मरत चाललें आहे. भांडवली संस्कृतीची कैदाशीण आई असलेल्या युरोपचा नाश झाला आहे; तिचे तुकडे तुकडे झाले आहेत; ती विद्रूप बनली आहे. कामगारांच्या अंगमेहनतीच्या जोरावर युरोपांतील भांडवलानें जगांत अनेक यांत्रिक आश्चर्यें घडवून आणलीं. पण त्याबरो-बरच पृथ्वीच्या दोन्ही गोलांतील लाखों लोकांवर गुलामगिरीचें जड जोखड लादलें आणि दुष्टपणा, क्रौर्य, जुलूम, रक्तपात, गुलामगिरी व दहशत या दोषांनीं युक्त असलेल्या साम्राज्याला बळकटी आणली.

"पण आपल्या अंगीं असलेल्या चातुर्याचा व संशोधनबुद्धीचा उपयोग शास्त्रीय पद्धतीनें आत्मघात कसा करावयाचा याच कामाकडे केला गेला असून स्वतः निर्माण केलेल्या जाळ्यांतच युरोप आज अडकून पडलें आहे व

जागतिक युद्धाच्या रूपानें एक प्रचंड आत्मविघातक गर्ता त्यानें खणून ठेवली आहे. भांडवलरूपी हें सैतानी यंत्र आतां खिळखिळें झालें असून त्याचे तुकडे तुकडे होण्याची वेळ आतां आली आहे. परंतु आजच्या घटकेस युरोपांतील भांडवल टिकून राहिलें असलें तरी त्याच्या सैतानी हल्ल्यापासून संरक्षण व्हावयाचें असेल तर तसें करण्यास एक प्रचंड विजयशाली शक्ति समर्थ आहे. ही शक्ति म्हणजे श्रमजीवी जनता होय. या जनतेच्या ठिकाणीं असलेली उत्साहशक्ति व वर्गजागृतीच लाखों लोकांना संघटित करूं शकते व त्यांना योग्य मार्गही दाखवूं शकते.

"आमचा भाई लेनिन या जनतेचा नेता होता. सर्व कामकरी व शेतकरी जनतेची उत्साहशक्ति कशी उपयोगांत आणावयाची याची किल्ली लेनिनला माहीत होती. या समाजाच्या अंतःकरणांत खोल शिरून त्यानें ती जागी केली. वर्गजागृतीची भावना त्यानें त्यांच्यांत निर्माण केली. सर्वतोपरी जुलमानें गांजलेल्या अत्यंत दलित अशा जनतेला त्यानें मुक्ततेचा मार्ग दाखवून दिला. जगांतील बलसंपन्न लोकांपुढें त्यानें "सर्वाधिकार सोव्हिएटांना" हें साधें पण धाडसी घोषवाक्य ठेवलें व तसा चमत्कार घडूनही आला.

"आमच्या सरकारची संघशक्ति आतां वाढत आहे. बहुजनसमाज—कामकरी, शेतकरी, पुरुष, स्त्रिया, या सर्वांचीं अंतःकरणें खडबडून जागीं झालीं आहेत व नवजीवन निर्माण करण्याच्या प्रयत्नास जनतेनें हात घातला आहे. अत्यंत उघडपणानें व निश्चयानें तिनें सरकारची सत्ता आपल्या हातीं घेतली आहे व जुन्या, सडक्या व निरर्थक गोष्टींचा ती त्याग करीत आहे. भयंकर रणकंदन झाल्यानंतरच आमचा देश आपल्या पायावर आतां स्थिर उभा राहिला आहे व कामकरी-शेतकरीराज्याची भरभराट होत आहे.

"लेनिनच्या मृत्यूमुळें आमच्या नौकेचा प्रिय कर्णधार नाहींसा झाला आहे. ही उणीव भरून निघणें अशक्य आहे. आमच्या सरकारला लेनिननें अत्यंत बिकट प्रसंगांतून वांचविलें. लेनिनच्या ठिकाणीं जशा प्रकारची बुद्धिमत्ता होती, तसली हुशारी आतां कोठेंही आढळावयाची नाहीं. अमोघ प्रयत्न करण्याची हातोटी व वज्रप्राय इच्छाशक्ति हे त्याचे गुणही दुसरीकडे कोठें आढळायचे नाहींत.

"लेनिननें जें कार्य हातीं घेतलें होतें त्या कार्याला त्यानें योग्य दिशा लावून दिली आहे. व्हलाडिमीर इलिचच्या लाखों शिष्यांनीं त्याचें हें बलशाली निशाण दृढनिश्चयानें हातीं धरलें आहे आणि आतां व सर्व जगाला ते निराळें वळण देऊं लागले आहेत. सर्व राष्ट्रांतील कामगारांनो एक व्हा !

"भाई हो, व दोस्तांनो, आपला लाल बावटा उंच उभा करा. स्वातंत्र्याच्या लढ्यांत मागेंपुढें पाहूं नका. कामगारांचें कधींच कांहीं नुकसान होत नसतें. सर्व राष्ट्रांतील कामगारांनो एक व्हा !"

# सूचि

अडोराट्स्की–१३१
अलाकेव्हका–३०
अलेक्झांडर (साशा)–५, ९, १०, ११, १६, १७, १८, २० (फांशी), २१, २७
अकसाकोव्ह–७
अॅक्सेलरॉड–४५, ४६, ४८, ४९, ९४,९७,१२६
अलेक्सेयेव्ह (डॉक्टर)–८७
अलेक्सेयेव्ह (जनरल)–२४५
अनाटोल फ्रान्स–१४४
अॅना–३२३
अझेव्ह–१०६
अलेक्झिन्स्की–२४९
अलेलुयेव्ह–२५०
अब्राहाम लिंकन–३०३
आस्ट्राखान–१
आस्लाव्ह–२१
आल्बर्ट थॉमस–२४५
आरोरा–२६३,२६५
इलिया निकोलायविच उलियानोव्ह–१,२,४,५,८,१४
इस्क्रा–८२,८४,८७,९५,९७
इलिसारोव्ह–६७
इस्माइलोव्हस्क–२३८
एडिंग्टन–१४४
एप्रिल ४ चा प्रबंध–२३४,२३५
एंजल्स–२८,४७
ओल्गा–३३
ओडेसा–११४
ओर्ड्झोनिकिड्झे–१६८
कॅपिटल (ग्रंथ)–२८,२९,३९
कम्युनिस्ट (थर्ड) इंटरनॅशनल–१५६,१९६,३२०
कम्युनिस्ट पार्टी–२७४
कॅटन–१४७
कॅलिलिन–३११, ३१२, ३२३
कामेनेव्ह–१७५, १८१, २३४, २३७, २४०, २६९, ३२०
काझान–२, ३, २५
कामोव्ह–१३८
कार्ल मार्क्स–२८, ४६, ४८
कायुरोव्ह–२०६
कार्पिन्स्की–२२८
कॉट्स्की – ४७,९८,१५५,१५७, १८३,२२५
कार्निलोव्ह–२५२, २५३, २५५, २५८
कॉन्स्टिटयूअंट असेंब्ली – २५९, २७२, २७४

किचनेर–२०४
किंशिनेव्ह–१०६
किंथॉल–१९८, १९९
कुलक–२१, २२, ३१, १२८, ३०४
केरेन्स्की–२५, २१९, २२५, २३२, २४०, २४३, २४८, २५२, २५८, २६९
केडरोव्ह–२९९
कोकुश्किनो–२६, २७, ३४
कोसॅक–१८, ११९, २०८, २१०
कोरलॅन्ड–११९
कोलोन्टाई–१८२, २२५, २२६, २३८
कोलचॅक–३०३
कोपेनहेगन–१५५
क्रॅसीन–३१०, ३१५
क्रायलेंको–२७६
क्रास्नोयास्र्क–६०
क्रॉन्स्टॅट–१२१, २२१, २४६, ३११
क्रॉमवेल–३०३
क्रिझिझानोव्हस्की-३९,१५१,३१०
क्रुप्सकाया–लेनिनशीं प्रथम परिचय ४९,-हद्दपारी ६४,-लग्न ६५,-जीवनवृत्त ३२५,३२७
क्रेमलिन–३१०, ३२८
क्लिकोव्ह–५२
क्लारा झेट्किन–१५५
खाबालोव्ह–२११, २१३
गनाशन–३७
गानेट्स्की–२२९
गॉर्की–३०, १३५, १३७, १४० १४१, १५२, १५३, १६८, २३७
गेपॉन–१०९,११०,११२,११३
गुचूकोव्ह–२२५, २३५, २३९
चीड्झे–२१९
चेखोव्ह–३३
चेर्नीशेव्हस्की–६८, १४५, १४८
चेका–२७२, २९६
जमीन व स्वातंत्र्यपक्ष–३१,३४
जानिन–२४५
जॉन मॅक्लीन–१९६
जॉर्ज बुकॅनन–२४३,२५४
झार–दुसरा अलेक्झांडर–१४,१८, २१,–तिसरा अलेक्झांडर–१८, २५,–निकोलस–२०१,२२३
झाल्ुट्स्की–२१८
झॉवर्ट्किन्–६२
झिनोव्हिफ– १६९, १९५, २२९, २५१,२५७,२७९
झिमरवॉल्ड–१९५,१९७
झेरेटेली–२३९,२५३
झुबॅटोव्ह–१०९,११०
झेम्लियाश्का–९३
टामरफोर्स–१२३,१२४
टार्नोपाल–२५२

टॉरीड—२२२,२३७,२४८
टॉलस्टॉय—१७,६८,१४५,१४६
डुर्गेनीव्ह—१७,६८
ट्रॉट्स्की—८९, ९५, ११६, १५०, १६२, १६६, १८३, १८७, १९५, २२६, २४३, २४४, २५४, २५९, २६९, २७९, २८०, २८२, २८७, २९८, ३०८, ३११
डॅन—१५०,१५१,२५३,२६९
डिसेंब्रिस्ट—१४८
डेनिकिन—३०१,३०३
डोस्टोव्हस्की—१४१
ड्यूमा—१२६,१२८,१३५,१६० १६२, १७१, १७४, १८१, १९३
नारोड्निक—१८, २४, २९
निझनि—नोव्हगोराड—३
नेक्रासोव्ह—६८, १४५
नेप—३१३, ३१५, ३१६
नेव्हा—२१४
नोगिन—२४०
पॅनिना—१३१
पावलोव्हस्क—२६४
पावलोव्हस्की—२१६, २१७
पांक्राटोव्ह—२४९
पॉंकारे—१९१
पॉल लाफार्ग—४७
पिट्कोव्ह—१९९
पिल्सुडस्की—३०३
पिसारेव्ह—१४५, ३१०
पीपल्स पार्टी (पाप्युलिस्ट पक्ष)—२४, २९,३५, ७२, ७६
पीटर अलेक्झीव्ह—२४
पुष्किन—१७, ६८, १४५
पुटिलोव्ह—१०९, १६४, २८९
पेंझा—नोबल्स इन्स्टिटयूट—२
प्येस्कोव्ह—३०
पोक्रोव्हस्की—२८४
पोर्ट आर्थर—१०८, १०९
पोर्टस्मथ—११७
पोट्रेसेव्ह—७४, ८१, ८२, ९४, ९७
पोटेम्किन—११४
पोरोनिनो—१७८
प्रवदा—१६२, १६९, १७२, १७४, १८२, २२९, २३७, २७३
प्रेग (परिषद)—१६६, १६७
प्रोटोपोपोव्ह—२१७,२२२
प्लॅटन—२२९, २३०, २८४
प्लेखानोव्ह—२४, २९, ४८, ७३, ८२, ८४, ९४, ९७, ११६, १२६, १५२, १५३, १६५, १६८,१८६,२३७
प्लेव्ह—१०५
प्स्कोव्ह—७९, ८०, ८२
फॅनी कॅप्लन—२९८

फेडोसियेव्ह—३०, ३१, ६१, ७०
फेल्झ्—१३४
बर्गसाँ—१४०
बर्नस्टीन—७२, ७३
बॅबुष्किन—१३२
बरट्रँड रसेल—१४२
बॅसल—१७८
बॅसिल—१, २
बाकुनिन—२९
बॅागडॅनोफ—१४०, १५३
बागेटोव्ह—६, ७, ८,
बाझारोव्ह—१४०,१५३
बाडायेव्ह—१७१
बुखारिन—१६९, १७३, १८२, १८६, १९९, २८२, २८४, ३१२, ३२२
बोल्शेव्हिक पक्ष—९४, ११५, ११६, १२२, १३२, १६५, १६६
ब्रॉन्स्की—२२४
ब्रुसेल्स (कॅाँग्रेस)—९१
ब्रेस्ट लिटोव्हस्क—२७७, २८५
ब्रोमन—१२०
भूदास—२, ३, २१
मराया—३२३
मरिया अलेक्झांड्रोव्हना—३,४
•महिला दिन—२०५
मॅरिन्स्की—२२१
मॅक—१४०,१४२
मॅलिनोव्हस्की—१६७,१७३, १७४
मॅलियान्टोविच्—२६४
मायकेलसन—२९६
मार्टिनोव्ह—११६
मार्टोव्ह—४९,५१,७४,८१,९४, ९७, १२६, १६६, २२८, २२९
मॉरिस पॅलेलोग—२४३
मिनुसिंक्स—६०
मिखाइलोव्ह—५०, ५१
मिरीन—३२८
मीरबॅक—२९३,२९४
मिल्युकोव्ह—२२५,२३९
मुंबई—१४७
मेन्शेव्हिक पक्ष—९४, ११५, ११६ १२२,१६५,१६६
मेरी फेडोरोव्हना—१५९
मेरी स्पिरिडोनोव्हा—२९१
मोलोटोव्ह—२१८
यारोस्लाव्हल—२९३
युरिट्स्की—२९६
येव्हडोकिमोव्ह—३२८
येनेसी—६०
येमेलियानोव्ह—२५२
यो—८७
रॅडेक—१८६, १९९, २९४
रॅगल—३०४
राजकीय संप—१९०
रायझानोफ—२६९

रास्कोल्निकोव्ह–२४६
रासपुटीन–२०१, २०४
रायकोफ–२४०, २६९, ३२०
रॉबर्ट ग्रिम–२२९, २३०
रॉथस्टिन–१३४
रुझवेल्ट–११८
रुड्झुटक–३११
रेचिंग–७१
रेड सन्डे (लाल रविवार) १११
रोझा लक्झेंबर्ग–९८, १५२, १५५, १८२, १८३, १८६, १९६, २५१
रोमानोव्ह (घराणें)–२०७
रोझमिरोविच–१७३, १७४
रोमां रोलां–२३१
लंडन (परिषद्)–११६, १३५
लर्मोन्टोव्ह–६८
लुसेलबर्ग (किल्ला)–२०
लॅन्सबरी–१३४, १३५
लॉइड जॉर्ज–१५५, १५७
लॉरा–४६
लिट्व्हिनॉफ–१८२
लिटोव्हस्की–२२१
लिबनेक्ट–१८२, १८३, १९६, २३६, २५१
लुच्–१६२
लुडेंडॉर्फ–२९४
लेना–१५९
लुनाचार्स्की–१११, १३९, १५३ २६९
लेना अस्टापोव्ह–२०
लेनिन, व्ह्लाडीमीर इलिच–जन्म ५, युनिव्हर्सिटींत प्रवेश २५, समाराला गेला ३०, कायद्याचा डिप्लोमा ३२, वकिलीस सुरुवात ३३, पहिलें परदेशगमन ४३, पहिला तुरुंगवास ५१, ५२, सैबेरियांत हद्दपारीची शिक्षा ५६, दुसरें परदेशगमन ८२, रशियांत गुप्तपणें प्रवेश १२१, जिनिव्हाला गेला १३०, नोव्हि टार्गचा तुरुंगवास १७८, रशियांत प्रवेश २३२, अज्ञातवास २५१, पेट्रोग्राडमध्यें प्रवेश २५९, खुनाचा पहिला प्रयत्न २८४, फॅनी कॅप्लननें गोळ्या झाडल्या २९७, पक्षघाताचा शेवटचा झटका व मृत्यू ३२२
लेपेशिन्स्की–५४, ६७, ११३
लोपॅटिन–२९
वान्येव्ह–५१, ५२
वर्कर्स कॉज–४९, ५१
वॉर कम्युनिझम्–३०४, ३१२
वॉल्टर ड्यूरंटी–३२४
विटे–१५९
विंटर राजवाडा–२५, १११, २६३, २६९

वेल्स–३१०
व्हॅसिली–११२
व्हॅसिलीव्ह–११४
व्हॅपेरेड (आघाडी)–९९, १०२, १०३, ११२
व्हाल्केनस्टीन–३४
व्हायबर्ग–११२, २१३, २१५, २१८ २५४, २५५
व्हाइटहेड–१४२
व्हॉलिन्स्की–२२०
व्हिक्टर चेरनोव्ह–३५
व्हीरा फिग्नेर–२४
व्हिक्टर ॲडलर–१७९
व्हेरा झासुलिच्–२९, ८३, ९७, १०२
व्होरोंट्सेव्ह–३५
व्होलोडार्स्की–२९३
शॉटमन–२५४,२५६,२५७
शुशेन्स्कोई–६०
शुर्कानोव्ह–२१६
शेशिन्स्की–२४८,२५४
श्लियाप्निकोव्ह – १८२, १८४, २१८,२१९,२३७
समारा–३०,३१
सॅफारोव्ह–१६९,१७०
साराटोव्ह–२१
सॉव्हनारकोम–२६९
सिंबिर्स्क–४,५
सिडने वेब–६०,६६
सुशिमा–१०८
सुखानोव्ह–२६०
सेकंड इंटरनॅशनल–२९, १५५, १८४, २२५, २२७
सेमाश्को–२४६
सेमेनोव्हस्की–२२१
सेवास्टपोल–१२१
सोशल डेमोक्रॅटिक पक्ष (रशियन)–२९, ४८, ७२, ९९, ११६, ११७
सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष–१२२, २७१, २७३, २७९, २८४, २८६, २८९, २९८
सोकोल्निकोव्ह-२७९,२८२,३०१
स्कोबेलेव्ह–२१९
स्मिल्गा–२७९
स्मोल्नी–२६२,२६४,२६५
स्टॅलिन-१२४,१२७,१६८,१७४, २३७, २४०, २४४, २५१, २५५, २७९, ३०१, ३०६, ३११,
स्टॉलिपिन–१२६,१२८
स्टूटगार्ट–१५२,१५५,१५७
स्टॉकहोम (कॉंग्रेस)–१२६
स्वेर्डलोव्ह–१४९, १६८, १७४, २४९, २५६, २७९
हर्झेन–६८,१४५,१४८
हॉप्टमन–१४५

हॉफेनूहॉस–६९,७०
हिंडमन–१५७,१८०
हेल्सिंगफोर्स–१३०,२५७
हेंडरसन–२४५

---

# संदर्भ-ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Lenin (biography) | by | Ralph Fox |
| 2 | Lenin | ,, | D. S. Mirsky |
| 3 | Lenin | ,, | Leon Trotsky |
| 4 | Lenin | ,, | James Maxton |
| 5 | Lenin | ,, | R. Palme Dutta |
| 6 | History of the Russian Revolution | ,, | Leon Trotsky |
| 7 | Russia To-day and Yesterday | ,, | Dillon |
| 8 | Brief History of Russia | ,, | Pokrovasky |
| 9 | Russia Reported (1921-1933) | ,, | Walter Duranty |